
तेलंगणातील
अरे मराठा समाज
भाषा आणि संस्कृती
श्रीधर रंगनाथ कुळकर्णी
चंद्रपूर
करीमनगर
बस्तर
वरंगल
खम्मम
आंध्र प्रदेश
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई.

## अनुक्रमणिका

# तेलंगणातील अरे-मराठा समाज
# भाषा आणि संस्कृती

## अनुक्रमणिका

# तेलंगणातील अरे-मराठा समाज

## भाषा आणि संस्कृती


लेखक

**श्रीधर रंगनाथ कुलकर्णी**

एम्. ए. पीएच्. डी.

भूतपूर्व प्रमुख, मराठी विभाग,
उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद



**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**


## अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** — मे, १९८७

**प्रकाशक** — श्री. सू. द्वा. देशमुख
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०० ०३२

© — सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई-४०० ०३२

**मुद्रक** — चंद्रकांत तापस
श्री प्रसाद मुद्रण
८ वर्धा मार्ग, नागपूर-४४० ०१२

**मुखपृष्ठ** — श्री. पां. ल. जैतापकर

**किंमत** — **३५ रुपये**

## अनुक्रमणिका

# प्रस्तावना

आपल्या भाषेत दशग्रंथी आणि अष्टावधानी असे दोन शब्दप्रयोग अस्तित्वात आहेत. दशग्रंथी म्हणजे विद्वान आणि अष्टावधानी म्हणजे बुद्धिमान, सर्वत्र लक्ष ठेवणारा, अनेक ठिकाणचे अवधान ठेवणारा. पण माझे मित्र श्री. श्रीधरराव कुळकर्णी यांचे सम्यक् वर्णन हे दोन्ही शब्द वापरूनही पूर्ण होऊ शकत नाही. त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनंत कला आहेत. त्यांच्या आत्मचरित्रातसुद्धा त्या पूर्णपणे आल्या नाहीत. कारण संकोच हाही त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. ते कवी आहेत की नाहीत हे मला माहित नाही. पण जे रवीला दिसत नाही ते कवीला दिसते, असे म्हणतात. याबाबतीत श्रीधररावांची प्रकृती कवी सारखी आहे. त्यांनी ज्या सहजतेने ४२ च्या छोडो भारत चळवळीत श्रीमती उषा मेहता यांच्या बरोबर मुंबईमध्ये कॉंग्रेस रेडिओ चालविला किंवा कै. आनंदराव वाघमारे यांचे 'मराठवाडा' हे वृत्तपत्र निझामविरुद्धच्या लढ्यात नेटाने प्रसिद्ध केले आणि ज्या निश्चयाने त्यांनी उस्मानिया विद्यापीठातील मराठीच्या अध्यासनाला स्थैर्य आणून दिले, त्याच नेटाने त्यांनी संशोधनाच्या अनेक क्षेत्रात पण राघोभरारी मारली. ह्या सर्व गोष्टी ते करू शकले कारण त्यांच्याजवळ केवळ पुस्तकी पांडित्य किंवा बुद्धीतून उत्पन्न होणारी विचारांची आकडेमोडच नव्हती तर समुद्रात बुडी मारून मोत्याची शिंपले बाहेर काढणाऱ्या पाणबुड्याची, अनुभवातून उत्पन्न होणारी कुशलता पण होती. त्यांच्या साऱ्या जीवनाला आणि कर्तृत्वालाच प्रत्यक्ष अनुभवाची उब, विश्लेषणाची धार आणि सामान्यांना न गवसणारी अशी दृष्टी आहे. त्यामुळेच या मराठीच्या प्राध्यापकाची निर्मिती मराठी पुरतीच मर्यादित राहिली नाही. त्यांनी संगीतात मुलुखगिरी केली, शास्त्रातील पडदे उकलून दाखवायचा प्रयत्न केला, जुने साहित्य शोधून काढले, समाज प्रबोधन केले. प्रस्तुत ग्रंथ हा त्यांच्या अनुभव-व्यासंगाचा असाच एक अंश आहे. हा समाजशास्त्रावरील ग्रंथ आहे, भाषाशास्त्रावरील ग्रंथ आहे, बोलीबद्दलचा ग्रंथ आहे, एका मराठी भाषिक जातीबद्दल विचार करावयास लावणारा ग्रंथ आहे, मराठीच्या एका बोलीच्या शब्दकोशाचा ग्रंथ आहे, अरे मराठ्यांच्या तमाशा लोक-रंजन आदी कलांचे स्वरूप सांगणारा ग्रंथ आहे.

नाजुक भावनातून निघालेल्या काव्याची आसक्ती आणि कर्कश व वरून रूक्ष वाटणारे पांडित्य ह्या परस्पर विरुद्ध वाटणाऱ्या गोष्टी एकत्र आणून श्रीधररावांनी या ग्रंथाच्या संदर्भात शोधाशोध केली आणि काळाच्या पोटात सामान्यपणे विरत जाणाऱ्या इतिहासाच्या संशोधनाचे कार्य "बळाने काढू ये मणि मकरदाढेत दडला" या बाण्याने त्यांनी पूर्ण केले. असा हा ग्रंथ साहित्य संस्कृती मंडळाला प्रकाशित करण्याची संधी श्रीधररावांनी दिली याबद्दल त्यांचे प्रथमतः आभार.

श्रीधरराव कुळकर्णी यांनी अरे मराठा समाजाची पाहणी करून त्यातून जे निष्कर्ष काढले आहेत ते समाजशास्त्राच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. पण त्यातील काही गोष्टींचाच येथे मी विचार करणार आहे.

प्रथम "अरे मराठा समाज" हा शब्दप्रयोग कसा रूढ झाला आणि या समाजाचे मराठी समाजाशी काय नाते आहे हे पाहणे फार महत्त्वाचे होईल. श्रीधररावांच्या मते "अरे मराठा" प्रयोग जातीवाचक आहे. " 'अरे मराठा समाज' हा शब्दप्रयोग जातीय व्यवसायाचा निदर्शक आहे, हे सिद्ध झाले आहे" (पान ७) ज्याप्रमाणे अरे मराठा समाज हे नाव, त्याप्रमाणे अरे क्षत्रिय, अरे वाडु या नावाने पण हा समाज ओळखला जातो. या समाजाची भाषा जरी मराठीचीच एक बोली असली तरी या बोलीचे अनेक प्रकार आहेत. आपल्या पाहाणीत श्रीधररावांना

अनुक्रमणिका

“खाटीक जमातीच्या एकाच कुटुंबात बोलीच्या तीन तऱ्हा आढळल्या” (पान ७). मला वाटते “अरे मराठा” हा जातिव्यवसायवाचक शब्द आहे याकरिता श्रीधररावांनी केलेला युक्तिवाद अपुरा आहे. कारण त्यातून वास्तविक जे सिद्ध होते ते हे की भिन्न व्यवसायाच्या आणि मराठी भाषेच्या अनेक बोली किंवा पोट बोली बोलणाऱ्या लोकांची ही वसाहत आहे. त्यात खाटिक आहेत, कुणबी आहेत. इतरही मराठी भाषिक लोक आहेत. आणि खरे म्हणजे जेव्हा एक वसती दुसरीकडे हालते तेव्हा त्या वसतीत असलेले सर्व जातीचे लोक पण एका ठिकाणाहून दुसरीकडे जातात. अशा वसाहतीतील लोकांच्या बोली जरी भिन्न असल्या तरी त्यांची भाषा एक असते. ‘अरे मराठा’ हा व्यवसाय निदर्शक शब्द आहे असे म्हणताना श्रीधरराव यांच्या युक्तिवादाच्या मागे निश्चितच एक कारणपरंपरा असणार. पण मला वाटते “अरे मराठा” हा जातिवाचक शब्द नसून भाषावाचक शब्द आहे असा “हायपॉथेसिम” अभ्युपगम स्वीकारून त्यांनी विचार करून पहावा. माझ्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ येवढी एकच गोष्ट सांगितली तर पुरे की महाराष्ट्राच्या बाहेर आजही आपण जेव्हा जातो तेव्हा बाहेरचे लोक आपणास सरसहा मराठा किंवा मरहट्टा म्हणून संबोधतात. मला हा अनुभव पंजाब, हरयाना, उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार, बंगाल, आसाम आणि दक्षिणेतील तेलुगू, तामिळ, केरळी प्रदेशात आला आहे. महाराष्ट्राच्या बाहेर व हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात १४ वर्षे रहाण्याचा मजवर प्रसंग आला. या सर्व ठिकाणी मी मराठा म्हणूनच ओळखला जाई. याचा अर्थ मी शहाण्णव कुळी होतो किंवा कुणबी आदिमिश्रित अशा व्यापक मराठा जातीचा सदस्य होतो असा नाही. अरे मराठा समाजातील ‘मराठा’ हा शब्द असाच भाषेचा किंवा बोलीचा द्योतक आहे असे मी मानतो. हा समाज अर्थातच मराठी भाषा बोलणारा आहे. पण महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेशी त्यांचा संपर्क दिसत नाही. असे कसे झाले असाही एक प्रश्न या संदर्भात विचारला जाऊ शकतो. याचेही उत्तर माझ्या मते सरळ आहे. मराठी मुलखातून बाहेर गेल्यावर या छोट्या वसाहतींचे एक बंदिस्त जग झाले आणि बाहेरच्या जगाशी त्यांचा संबंध तुटला, अलमोडा व पंजाब, हरयाना, सागर इत्यादी भागात जाऊन राहिलेल्या मराठी समाजाच्या बाबतीतही हीच स्थिती आहे. सागरच्या (सगेरिअन) मराठी भाषेचा एक नमुना येथे प्रस्तुत करतो.

आई मुलाचे संभाषण

मुलगा : आई कढीत **छीटा** पडला.

आई : **टांग खीचून** काढून टाक.

उत्तरी पहाडात राहणाऱ्या पंत, जोशी आदी लोकांनी तर आपल्या भाषेस कधीच तिलांजली दिली. तंजावरकडील मराठी लोक अजूनही मराठी भाषा बोलतात, पण तीही “म्या सदरा नेसला” अशा प्रकारची असते. तेव्हा खरा प्रश्न अशी मराठी भाषिकांची वसाहत मराठी मुलखाबाहेर कशी झाली, केव्हा झाली हा आहे. पण अशा वसाहती होतात, होत राहतात येवढे मात्र खरे. अफगाणीस्थानात ग्रीक लोकांची अशी एक वसाहत हजारो वर्षे होती. कै. शं. बा. जोशी यांच्या ग्रंथात (मराठी संस्कृती) मराठी मुलखातही प्राचीन कानडी वसाहती असल्याचा उल्लेख आहे. या वसाहती अर्थातच अनेक कारणामुळे होऊ शकतात. एक तर अशी वसाहत मूळ वस्तीचा अनुशेष असू शकतो किंवा ती नवीनच वसाहत असू शकते. “अरे मराठा समाजाच्या” संदर्भात यापैकी काय झाले असावे हा विचार निश्चितच सामाजिक इतिहासाला उपयुक्त होईल.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रात ४००/५०० वर्षापूर्वी दुर्गादेवीचा एक मोठा दुष्काळ पडला होता. त्या काळात अन्न आणि पाण्याकरिता गावेच्या गावे एका ठिकाणाहून दुसरीकडे गेली होती. त्यापैकी काही तेलंगणात सुद्धा गेले असणार आणि असे गेलेले लोक पुढे तेथेच स्थायिक झाले असणे शक्य आहे. युद्ध आणि व्यापार यांच्या निमित्तानेसुद्धा लोकसंख्या एका ठिकाणाहून दुसरीकडे जात असे. पेशव्यांच्या बरोबर उत्तर हिंदुस्थानात गेलेले अनेक लोक हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश आणि गुजरात, बंगाल इत्यादी भागात स्थायिक झालेले आहेत. मराठी लोक आंध्र प्रदेश, तंजावर इत्यादी ठिकाणी पण स्थायिक झालेले आहेत, आणि आज त्यांना आजच्या मराठीचा गंध पण नाही. राजसत्ता व व्यवसाय यामुळे सुद्धा स्थलांतरे होतात. रामेश्वरचा पुजारी हा मराठी बोलणारा आहे. तंजावूरला लोक अजूनही मराठी बोलतात. अर्थात ते मराठी आपल्याला समजण्यासारखे नाही. व्यापारामुळेही लोकाची स्थलांतरे झालेली आहेत. मदुराईच्या आसमंतात गांधीग्राम येथे मला काही लोक भेटले होते. त्यांची घरातली भाषा जुन्या काळाची गुजराती. पण बाहेर ते तामीळच बोलतात. त्यांना तामीळ बोलताना पाहिले तर सामान्य तामीळ माणूस आणि हा गुजराती माणूस यांच्यात काहीही फरक आढळणार नाही. त्यांची व्यक्तिनामे मात्र थोडीशी वेगळी. आणि त्यामुळेच मी त्यांच्या वंशाबद्दल विचारणा केली आणि ते गुजराती वंशाचे आहेत असे मला कळले. आजही या समाजामध्ये बेटी व्यवहार हा त्यांच्या त्यांच्यातच होतो. आणि त्यामुळे या समाजाचे अस्तित्व टिकून आहे. श्री. वेणू गोपाळराव नावाचे सी. बी. आय. चे प्रसिद्ध अधिकारी होते. ४००/५०० वर्षापूर्वी त्यांचे पूर्वज गुजरात मधून राजमहेंद्री विशाखापट्टण भागात स्थायिक झाले असे ते सांगत असत. तिरुपती येथे मला एक पिंगळी नावाचे प्रोफेसर भेटले होते. मी मराठी आहे असे ते सांगत. शिवाजी महाराजांचे पंतप्रधान श्री मोरोपंत पिंगळे यांचे ते वंशज. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. या संदर्भात प्रसिद्ध कन्नड संशोधक श्री. शं. बा. जोशी यांचे मत विचारात घेणे गैरवाजवी ठरू नये. त्यांच्या मताप्रमाणे मूळचा कर्नाटक आजच्या खानदेश भागात होता. 'खानदेश' या शब्दातील 'खान' या पदाचा संबंध मुसलमान संस्कृतीशी नसून कन्न म्हणजे कानडी लोकांशी आहे. श्री. जोशी यांचे म्हणणे चूक की बरोबर याचा विचार येथे करण्याचे कारण नाही. पण लोकसंख्यांची अदलाबदल ही पूर्वी फार मोठ्या प्रमाणावर होत असे हे मात्र खरे. अशी अदलाबदल दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मोठ्या प्रमाणावर झाली. पूर्व प्रशिया हा जर्मनीचा भाग रशियनांनी रशियास जोडला आणि तेथील संपूर्ण जर्मन लोकसंख्या हलवून तेथे रशियन लोकांना बसविले हे प्रसिद्ध आहे. जर्मन तत्वज्ञ कांट हा तेथील रहिवाशी. कोनेजबर्गला तो प्रोफेसर होता. या कोनेजबर्गचे नवे नामकरण आता कॅलिनिनग्राड असे झाले आहे. आणि तो रशियन मुलुख आहे. तेव्हा तेलुगु मुलखात मराठी भाषेची हिरवळ सापडणे त्यात अशक्य असे काही नाही.

अशा स्थलांतरित लोकांच्या ज्या वसाहती असतात त्यातील लोक आपल्या चालीरीतीला व जमातीला चिकटून असतात व त्यामुळे त्यांचे मूळ रूप (ज्या काळात त्यांच्या वसाहती झाल्या असतील त्या काळात) कायम रहाते. ते त्या प्रदेशातील भाषा शिकतात पण आपली भाषा विसरत नाहीत. त्यांचा शब्दसंग्रह थोडा थोडा कमी होत असेल, यात इतर भाषेतील शब्दही येत असतील. पण मूळ भाषा ओळखू येण्याइतका मूळचापणा त्यात कायम रहातो. श्रीधररावांनी आपल्या पुस्तकात लोकगीतांचे जे नमूने दिले आहेत त्यात इंग्रजी भाषेचे शब्द सुद्धा आलेले दिसतात. त्यामुळे बोलीभाषेतील संग्रह कसा वाढतो त्यावरही प्रकाश पडतो. "नैवरा कांकी रुसलं" (पृष्ठ २७८) या लोकवाक्यात कांकाच, रेडिओवरे, सायकलवरे हे इंग्रजी शब्द पण आले आहेत हे विसरता येणार नाही. तसेच त्यांच्या "थोरु जामाई" या पुढच्या लोकगीतात, जुने शब्द कसे कायम राहिले आहेत हे पण पाहाण्यासारखे आहे. "हिरे मोडीले हलू हलू, चिरे मोडिले हलू हलू, नवर खंडे पानाचे

अनुक्रमणिका

केले बाई विडे, तारा पडल्यात होड्यावरे मोरू बसले थोरु जमाई,'' तसेच ''तोंडू रंगल हळदीन, कप्पाळ रंगल कुंकवानं, भाकू रंगल मोतीयान, अंगू रंगल हळदीन'' हे शब्दप्रयोग सुद्धा पाहाण्यासारखे आहेत. तोंड, कपाळ, अंग या शब्दाची येथे तोंडू, कपाळू, अंगू, अशी रूपे झाली आहे. ही रूपे प्राचीन मराठीच्या तोंडवळ्याची आहेत. आणि त्यामुळे प्राचीन मराठी काव्याची आठवण झाल्यावाचून राहत नाही. तसेच म्होर म्हणजे समोर, आजही आमच्याकडे समोर या अर्थाने म्होर असा शब्दप्रयोग केला जातो. मोर हे म्होरचच एक रूप आहे हे लक्षात घेतले पाहिजे. हिरे मोडीले हलू हलू याचा अर्थ मात्र स्पष्ट होत नाही. हलू हलू हे हळू हळूचेही रूप होऊ शकते आणि हलवू हलवूचेही रूप होऊ शकते. भाषाशास्त्रवेत्त्यांनी हे कशाचे रूप आहे ते स्पष्ट करावे [थंडी वाजते (बाधते) आणि घंटा वाजते (वादते) या भिन्न प्रयोगात वाजते हे एकच रूप झाले आहे.] लोकगीतावरील आपल्या टिप्पणीत श्रीधररावांनी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे.

या भागातील आराध्य दैवत तिरुपतीचा बालाजी वा व्यंकटेश्वर याचा लोकगीतातून अभाव दिसतो. पंढरीचा विठोबा देखील त्यांना गवसला नाही. यावरून विठ्ठल भक्ती महाराष्ट्रात रूढ होण्यापूर्वीच अरे मराठा समाजाचे स्थलांतर झाले असले पाहिजे, असा निष्कर्ष श्रीधरराव काढतात. श्रीधररावांनी या संदर्भात आणखी एका गोष्टीचा येथे विचार करावयास हरकत नाही. तिरुपतीचा व्यंकटेश्वर हा वरंगल करीमनगर भागात किती लोकप्रिय देव आहे याचा पण त्यांनी आढावा घेतला पाहिजे. करीमनगर भागातील प्रतीकाशी म्हणून प्रसिद्ध असलेले विमलवाड्याचे देवालय हे राजराजेश्वराचे म्हणजे शंकराचे. हाच देव राजन्ना या नावाने श्रीधररावांनी सांगितलेल्या लोकगीतात आलेला आहे. पोचम्मा हे जर पार्वतीचे नाव असेल तर या भागातील दैवत शंकर पार्वती तर नसतील ना. आणि हेच देव अरे मराठा समाजाने आपले दैवत म्हणून मानले नसतील ना, अशी शंका येऊ शकते. लोकगीतात विठ्ठल भक्तीचा अभाव का दिसतो यावर यामुळे प्रकाश पडू शकणार नाही काय? पंढरपूरचा विठोबा मराठी माणसाचे आराध्य दैवत होण्यापूर्वी हा समाज इकडे आला असला पाहिजे असे श्रीधरराव म्हणतात. पण राजराजेश्वर हे येथील लोकांचे दैवत आहे हे पाहिल्यानंतर ही वसाहत १३ व्या शतकापूर्वीची की नंतरची या प्रश्नाचा पुनश्च विचार करावा लागणार.

श्रीधररावांना वरंगल आणि करीमनगर या भागातच हा समाज विशेषाने आढळतो. याचे एक स्पष्टीकरण असे होऊ शकते, की एकेकाळी महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक इत्यादी प्रांताची भाषावार वर्गवारी झाली नव्हती, तेव्हा मराठी, कानडी आणि तेलुगु समाज हा एकमेकात मिसळलेला होता. आंध्र कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगण इत्यादी भाग सातवाहन राजांच्या अधिपत्याखाली होते आणि त्यामुळेच या 'अश्मक' देशाच्या भागांच्या 'त्रिके अश्मिके' असा उल्लेख शिलालेखादीतून आलेला आहे, याचा पण विचार व्हावा. आजही तेलुगु कानडी, मराठी लोकात यांच्या सर्व स्तरावर त्यांच्या त्यांच्या जातीत रोटी-बेटी व्यवहार सुरू आहे.

दुसरेही स्पष्टीकरण शक्य आहे. जुन्या काळी आपले गतिमत्त्व आजच्यापेक्षा कमी होते असे मला दिसत नाही. करीमनगर जिल्ह्यातील मंथनी भागातील ब्राह्मण वाईकडून तेथे आले. कारण वाई भागात दुष्काळ पडला होता अशी आख्यायिका आहे. हाच ब्राह्मण पुढे वऱ्हाड काशीपर्यंत पोचला. करीमनगर, वारंगल, आदिलाबाद, जालना, नांदेड या तेलंगण-मराठवाडा भागात तसेच चंद्रपूर, यवतमाळ इत्यादी भांगात कोंबटी, पद्मशाली नावच्या जातीचे लोक आहेत ते मराठी आणि तेलुगू ह्या दोन्ही भाषा बोलतात, भांड्याचा व्यापार आणि विणकामाचा व्यवसाय करतात. हे तेलुगू भाषी लोक महाराष्ट्राच्या भागात स्थायिक झाले आहेत. बंजारा

अनुक्रमणिका

लोकांची ही गोष्ट अशीच आहे. हे मूळचे राजस्थानचे रहिवाशी. व्यापार-वाणिज्य हा त्यांचा व्यवसाय. पण पुढे मूळ लोकांशी यांचा संपर्क तुटला आणि ठिकठिकाणी ते तांड्यातून राहू लागले. आजही आपल्याकडील समाज शेळ्या मेंढ्याना चारता यावे म्हणून ज्या भागात हिरवी पालवी वा चारा आढळतो तिकडे उन्हाळ्यात जातो व पावसाळ्याच्या मध्यास परततो.

राणाप्रतापने जेव्हा मोगलांशी लढाई सुरू केली तेव्हा चितोडच्या आसपास राहणारे गडीलोहार जातीचे राणाप्रतापच्या सैन्यातील लोक राणाप्रतापच्या पराभवानंतर ठिकठिकाणी पांगले. पण हे पांगलेले लोक मुसलमानी रेट्यामुळे केवळ दक्षिणेत गेले असे दिसत नाही. या लोकांपैकी काही लोकांनी पंजाब, अफगाणिस्तान, इरान इत्यादी देश ओलांडून युरोपात प्रवेश केला. मी युगोस्लाव्हियात प्रोफेसर असताना बोसनियातून मला भेटावयास एक माणूस मुद्दाम झाग्रेबला आला होता, आणि मला पाहिल्याबरोबर तो मला कडकडून भेटला. त्याला हिंदुस्थानी येत नव्हते, की हिंदी येत नव्हते. तो धर्माने मुसलमान होता. पण मला तो जे म्हणाला ते फार महत्त्वाचे. तो म्हणाला आम्ही मूळचे हिंदुस्थानी, गडीलोहार जातीचे, राणाप्रतापच्या सैन्यात राबणारे, हिंदुस्थानी माणसाची भेट झाली हे मी माझे भाग्य समजतो. त्याचे भारतप्रेम टिकले होते, पण जात, धर्म मात्र बदलले होते. कोणता माणूस कोठे जाईल हे कधी सांगता येणे शक्य नसते. मला १९५८ मध्ये ऑस्लोला एक नार्वेजियन मुलगी भेटली होती. ती म्हणाली मी इंडियन आहे. कारण पाच पिढ्याच्या पूर्वीचा तिचा पूर्वज हिंदुस्थानातून नार्वेत गेला आणि तेथेच राहिला. आपल्याला वाटते त्यांच्यापेक्षा जाती आणि देश यांचे संमिश्रण पुष्कळच वेगळ्या प्रकाराने होते. निजामाबाद जिल्हा हा आज आंध्र भाषिकांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. पण खास निजामाबाद या गावाचे नाव इंदूर असे होते आणि समर्थ रामदासस्वामीचा पट्टशिष्य उद्धव हा तेथील होता ही गोष्ट आपणास पुष्कळच काही सांगून जाते. १९६४ मध्ये मी दिल्लीत असताना आमच्या घरी एक बाई कामास होती. त्या बाईने एक दिवस मला सांगितले की “मी मराठी आहे.” आपण दिल्लीच्या मराठी समाजाचा जेव्हा विचार करतो तेव्हा उच्च-विद्याविभूषित, सरकारी नोकरीत किंवा उद्योग व्यवसायात असलेल्या उच्चभ्रू लोकांचाच आपण विचार करतो. पण दिल्लीत १९६४-६५ सालात ७०/८० हजारापेक्षा अधिक असा खालचा समाज हा मूळात मराठी भाषिक होता, हे आपल्या खिजगिणतीतही नसते. या समाजातील बायांनी एक गोष्ट आतापर्यंत जतन करून ठेवली आहे ती म्हणजे त्यांचे लुगडे नेसण्याची पद्धत. (आता ही पद्धतही नाहीशी होईल). झोपडीत राहणाऱ्या ७०/८० हजार लोकांच्या बाया या नऊवारी लुगडी नेसत होत्या आणि कासोटा घालीत होत्या, ही एक महत्त्वाची गोष्ट त्या उत्तर प्रदेशीय, परदेशी वा पंजाबी नाहीत हे सिद्ध करण्यात पुरेशी होती. खरे म्हणजे आपला समाज अनेक स्तरावर सारखा ढवळला जात असतो हे विसरता येणार नाही. अरे मराठा समाजाची श्रीधररावांनी पाहाणी केली आहे ती ही अशीच वरंगळ आणि करीमनगर जिल्ह्यात राहिलेल्या मराठी समाजाची. बहुधा हा समाज महाराष्ट्राची सीमा ओलांडून आंध्रमध्ये गेला असावा असे समजणे अधिक योग्य होईल. आज ही सीमोल्लंघने होतात. मंथनीतून वऱ्हाडात अवतरलेला अन्नमवारू, वझलवारू, वेलंकीवारू, लुल्लमवारू हे वऱ्हाडातील मराठी पुढारी झाले. अन्नमवारूचे अणे झाले, लुल्लमवारूचे लुले झाले. पण सर्वांचेच नावातील वारू हे शब्द सुटले नाहीत. हे लोक तेलुगू आपस्तंब आहेत. पण आज ते मराठी आहेत. महाराष्ट्रातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजातील लग्ने पारंपारिक धार्मिक नियमांच्या चौकटीत सुद्धा या आपस्तंबांशी होऊ शकतात आणि होतात हे पण ध्यानात ठेवले पाहिजे.

महाराष्ट्रातील कोणत्या भागातून या समाजाने सीमोल्लंघन केले हा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे. “अरे मराठा” हा बोली निदर्शक शब्द आहे हे ध्यानात आल्यावर कोणताही अभिनिवेश न धरता हा समाज कोठून आला याचा विचार करता येईल. अरे मराठा समाजाच्या बोलीतील पुष्कळसे शब्द हे जुन्या मराठीतील आहेत. आजही त्यातील काही शब्द वऱ्हाडी बोलीत तंजावरी बोलीत आढळतात. काही सातारकडल्या बोलीत पण आढळतात, पण असे शब्द सर्वच भागात वापरात दिसतात. पण या शब्दामुळे अरे मराठा समाजाच्या मूळ ठिकाणाचा मागोवा घेता यावा. या दृष्टीने श्रीधररावांनी दिलेल्या लोककथांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. गोष्ट अंबरसिंग राजाच (म्हणजे गोष्ट अंबरसिंग राजाची) “अंबरसिंग मराठी राजा अमरावती नगरातून ऱ्हात” अशी गोष्ट सुरू होते. या अंबरसिंगाचे अमरावती नगर कोणते? आंध्रप्रदेशातही अमरावती हे. फार प्रसिद्ध स्थान आहे. पण हा जर मराठी राजा तर त्याची राजधानीही मराठी मुलखात हवी. जर ही अमरावती वऱ्हाडी मुलखातील असली तर “अरे मराठा समाजातील लोकांचे स्थलांतर वऱ्हाडातून झाले असावे असा तर्क करता येईल. या दृष्टीने ‘थोर जामाई” या लोकगीताचा पण विचार व्हावा. “जामाई” हा शब्द हिंदी वळणाचा आहे. हिंदी मुलुखाच्या जवळ राहणारे मराठी लोक याच वळणाचे शब्द वापरतात. या दृष्टीने सुद्धा हे स्थलांतर नागपूर- वऱ्हाडातून होणे अशक्य नाही.

मुंबई-पुण्याकडील लोकांना अरे मराठा समाजाची भाषा समजणे कठीण असले तरी माझ्या लहानपणी आमच्या घरात आणि आमच्या गाववकुसात जी भाषा बोलली जात असे त्याचा या अरे मराठा समाजातील बोलीशी बराच संबंध दिसतो आणि त्यातील बरेच शब्द मी अजूनही समजू शकतो. ऐलाडू म्हणजे अलीकडे, आता म्हणजे सासू. कारण आता म्हणजे आत्या (आणि आते घरी सून) असा शब्दप्रयोग आहे. अवग्गे म्हणजे अवघे, अवकारी म्हणजे आकारी अवंदा म्हणजे यंदा, उपेग म्हणजे उपयोग, ईसर म्हणजे विसर, ईद्या म्हणजे विद्या, ईट म्हणजे विट, असे कितीतरी शब्द या संदर्भात सांगता येतील. (अवंदा, उपेग हे शब्दप्रयोग साताऱ्याकडेही आढळतात.)

थोडक्यात, अरे मराठा समाजाची वसाहत ही मराठी लोकांची तेलंगणातील वसाहत आहे ही महत्त्वाची गोष्ट श्रीधररावांच्या संशोधनातून सिद्ध झाली. जरी पूर्वीच्या काळी दूरदूरच्या ठिकाणाहून स्थलांतरे झाली असली तरी वरंगल आणि करीमनगर या जिल्ह्यातील ही वसाहत कोठून तरी फार दुरून येऊन येथे केली गेली असणे संभवनीय दिसत नाही. दिल्लीच्या वसाहती सारखी ही वसाहत दिसत नाही. तसेच मुंबईतील तेलुगु गवंड्याच्या वसाहती सारखीही ती नाही. त्यामुळे जवळच्याच भागातून हे स्थलांतर झाले असावे असा निष्कर्ष काढता यावा. हा जवळचा भाग कोणता असेल? मला वाटते नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, अमरावती अशा भागातूत हे स्थलांतर झाले असावे. भाषेच्या दृष्टीनेही हा अजमास जुळेल असे वाटते. कदाचित हा जुन्याकाळचा मराठी मुलुखही असू शकेल, आणि तेलुगु लोकांनी हा प्रदेश व्यापल्यावर ही मराठी “पॉकेट्स” पण काही ठिकाणी राहिली असतील. करीमनगर-वारंगल जिल्ह्याप्रमाणे इतर ठिकाणची पाहणी केल्यासही ही गोष्ट सिद्ध होऊ शकेल.

“अरे मराठा” समाजाबद्दल बोलताना श्रीधरराव कुळकर्णी यांनी “अरे” हा शब्द आर्यवाचक असावा असे सुचविले आहे. हे त्यांचे म्हणणे सिद्ध होऊ शकेल की नाही हे सांगता येत नाही. पण ही महत्त्वाची सूचना आहे यात शंकाच नाही. मराठा शब्दाप्रमाणे “अरे” पण “मराठी” वाचक तरी निश्चितच आहे. मराठी ही

अनुक्रमणिका

संस्कृतोद्भव भाषा आहे की नाही कोण जाणे. श्री. खैरे यांच्या म्हणण्याप्रमाणे ती तामिळोद्भव भाषा सुद्धा असू शकेल. पण मराठीच्या माणसाला संस्कृत किंवा इतर संस्कृतोद्भव भाषा समजणे हे जितके सोपे जाते तितके तामिळ, कानडी, तेलुगु किंवा मल्याळम ह्या भाषा समजणे सोपे जात नाही. याचा अर्थ असा नव्हे की मराठी भाषेत या भाषेतील शब्द आले नाहीत किंवा इतरांचाही प्रकार आला नाही, पण मराठी आणि इतर दाक्षिणात्य भाषा यांच्यामुळे मराठी आणि इतर दाक्षिणात्य भाषांची संस्कृती वेगळी झाली आहे, मराठी माणसाचा चेहरामोहरा हा इतर लोकाच्यांपासून वेगळाच वाटतो यात शंका नाही. "अरे" हा शब्द या वेगळेपणाचा द्योतक असू शकतो. जसे हिंदु हा शब्द इतरांनी आपल्याला दिला. तसेच "अरे" या शब्दाने एका विशिष्ट समाजाचे निदर्शन होऊ शकते. ते इतरांनी दिलेले नामाभिधान नसेलच असे समजण्याचे कारण नाही. संस्कृतमध्ये अरे आणि अरे असे संबोधनाबरोबर वापरता येणारे शब्द आहेत. पण हे शब्द सुद्धा कुठून आले असा प्रश्न विचारता यावा. पाणिनीच्या काळात अरे हा शब्द होता का? असेलही. पण तो आर्यवाचक नसेल हे कशावरून? संस्कृत नाटकात "आर्य" आणि "आर्यपुत्र" असे शब्द येतात. याच शब्दाचं रूपांतर होऊन अरे हा शब्द आला नसेल असे निश्चितपणे सांगता येणार नाही. पाणिनीच्या अष्टाध्यायीत "भोभगोअघो अपूर्वस्य योऽशी" असे सूत्र आहे. त्यावरून त्याकाळी कदाचित अरे पेक्षा भो, भगो इत्यादी शब्दांना प्राधान्य दिले जात असेल काय? सामान्यनामाचे काळाच्या महिन्यात संबोधनात रूपांतर व्हावे हे सहज शक्य आहे. आणि अरे मराठा समाज जर आर्यमराठा समाज असेल तर आर्य शब्दाची अरे मध्ये कशी परिणती होत गेली हे पण आपणास कळून येईल. या ठिकाणी एवढेच फक्त सांगितले पाहिजे की अरे मराठा म्हणताना या भागातल्या तेलुगु लोकांना तेलगूभिन्न मराठी समाज एवढेच अभिप्रेत असावे, यापेक्षा अधिक काही असण्याचे कारण नाही. वर सांगितल्याप्रमाणे अरे मराठा समाज हा मराठा जातिवाचक शब्द दिसत नाही तर तो मराठी भाषावाचक शब्द दिसतो.

श्रीधरराव कुळकर्णी यांचे या विषयावरील लेखन चालले असतानाच मी ते पाहिले आणि साहित्य संस्कृती मंडळाकडे ते द्यावे अशी विनंती केली. श्रीधररावांनी ही. विनंती मान्य केली आणि अरे मराठा समाजातील त्यांचा संशोधन प्रबंध साहित्य संस्कृती मंडळाला प्रकाशित करायला दिला याबद्दल त्यांचे पुनश्च एकवार आभार.

१३ मे, १९८७<br>
बुद्धजयन्ती<br>
४२, यशोधन<br>
मुंबई.

**सुरेन्द्र बारलिंगे**<br>
अध्यक्ष<br>
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

## अनुक्रमणिका

# स्वगत

आंध्रप्रदेशातील तेलंगण विभागात कित्येक शतकांपासून वास करणारा अरे-मराठा समाज, या समाजाचे सांस्कृतिक जीवन आणि प्रतिकूल वातावरणातही या समाजाने जोपासलेली मराठी मायबोली यांच्याशी संबंधित असलेला अभ्यास सादर करताना एक प्रकारच्या कृतकृत्यतेचा अनुभव मी घेत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने हे प्रकाशन हाती घेतले नसते तर परिश्रमपूर्वक सिद्ध झालेले हे संशोधन कधीच प्रकाशात आले नसते. मंडळाने या कामी पुढाकार घेतला त्यामुळे महाराष्ट्राबाहेर सुरक्षित राहिलेले मराठी भाषेचे प्राचीनतम स्वरूप मराठी वाचकांच्या निदर्शनास येत आहे.

तेलंगण विभागातील अरे-मराठा समाजाची मराठी बोली आणि त्यांचे सांस्कृतिक जीवन यांचा अभ्यास आणि संशोधन करण्याचा प्रकल्प उस्मानिया विद्यापीठाने मंजूर केला. विद्यापीठ-अनुदान-मंडळाने त्यास मान्यता दिली. गावोगाव हिंडून अभ्यासाची मूळ साधने गोळा करण्यास आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ या मान्यतेमुळे प्राप्त झाले. उस्मानिया विद्यापीठ आणि विद्यापीठ-अनुदान-मंडळ या दोन्ही संस्थांचा लेखक ऋणी आहे.

हे कार्य पूर्ण करण्यात अनेकांचा हातभार लागला. मूळ साधनांचा संग्रह करण्याचे काम अत्यंत कष्टाचे. सुमारे पाच वर्षे ते चालू होते. काकतीय विद्यापीठात तेलगू भावेचे प्रोफेसर असलेले डॉ. जगन्नाथम् पेरवार (पवार) यांचे या कार्यात महत्त्वाचे सहकार्य लाभले. साधने गोळा करण्यासाठी करावी लागणारी पायपीट माझ्या बरोबरीने केली प्रा. सांबशिवराव भोसले यांनी. करीमनगर जिल्ह्यातील जमीकुंटा येथील शासकीय महाविद्यालयात तेलुगू भाषेचे अध्यापन करणाऱ्या या भल्या माणसाने स्वतःची महत्त्वाची कामे बाजूला ठेवून माझ्याबरोबर सतत प्रवास केला. इतकेच नव्हे तर माझा प्रवास सुखावह आणि लाभप्रद होईल याची चिंताही सातत्याने वाहिली. त्यांच्या अदम्य उत्साहाने मला 'चालते' ठेवले. प्रा. सांबशिवराव यांची जोड लाभली नसती तर हे कार्य तडीस गेले असते किंवा नाही याची शंकाच आहे. या सन्मित्रांचे ऋण शब्दातीत आहे. त्यांचे आभार मानून मोकळे होणे शक्य नाही. त्यांचे ऋणाईत राहण्यातच मला धन्यता वाटते.

वरंगल आणि करीमनगर या दोन्ही जिल्ह्यातील मराठी भाषिक जनतेने केलेले सहकार्य अविस्मरणीय आहे. आपल्या मायबोली संबंधाने वाटणारे प्रेम आणि जिव्हाळा यांचा वर्षाव त्यांनी माझ्यावर केला. या प्रेमाला आपण थोडेतरी पात्र ठरावे ही जाणीव हे कार्य पूर्ण करण्यास प्रेरक ठरली आहे. या जनतेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यास पुरेसे शब्द मला गवसत नाहीत. त्यांनी दर्शविलेला निःस्वार्थ जिव्हाळा हा माझ्या आयुष्यातला फार मोलाचा ठेवा आहे.

साधनांचा संग्रह आणि तद्नंतर या साधनांचे वर्गीकरण-विश्लेषण आणि त्याच्या आधाराने लेखन होत असताना दिवस कसे गोड स्वप्नासारखे निघून गेले. वास्तवाचे भान आले तेव्हा मात्र चिंतेने मला पूर्णपणे ग्रासले. संशोधनपर ग्रंथ, भाषाशास्त्रासारखा रुक्ष आणि उपेक्षित विषय, यांवर आधारलेला ग्रंथ प्रकाशात आणणार कोण? 'सारी सोंगे आणता येतात, पण पैशाचे सोंग मात्र आणता येत नाही' ही म्हण पूर्णपणे प्रत्ययास आली. आपले कार्य शेवटी आपल्याच रुमालात बंदिस्त राहणार असे ठामपणे वाटू लागले –

अनुक्रमणिका

वयाची साठी ओलांडल्यानंतर जीवनात आश्चर्यकारक असे फारसे वाट्यास येत नसते. माझ्या सुदैवाने एक चमत्कार मात्र घडला! एक दिवस माझे स्नेही डॉ. सुरेंद्र बारलिंगे अगदी सकाळीच माझ्या घरी आले. रामप्रहरात मित्रांच्या गाठीभेटी घेणे हा त्यांचा नित्याचा शिरस्ता. त्यात आश्चर्यकारक असे काही नव्हते. परंतु त्यांनी आश्चर्याचा धक्का दिला तो या पुस्तकाला साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने "मागणी" घालून! मी स्वप्नात नाही याची पण खात्री करून घ्यावी लागली. ग्रंथ त्यांच्या वसंगळी घातला तो प्रस्तावना त्यांनी लिहावी ही अट घालून, कारण, तत्त्वज्ञानाइतकाच समाजशास्त्र आणि भाषाविज्ञान या क्षेत्रांतही त्यांचा अधिकार मोठा आहे याची मला जाणीव होती.

– निराशेच्या भयंकर गर्तेतून मला वर काढणाऱ्या या सन्मित्राविषयी वाटणारी कृतज्ञता कोणत्या शब्दात व्यक्त करावी हेच मला समजत नाही!

मी महाराष्ट्राबाहेर पडलो नसलो तरी या देशात घडलेल्या स्थित्यंतराने महाराष्ट्र माझ्यापासून दूर नेला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने मात्र या मर्यादांचा विचार न करता हे प्रकाशन हाती घेतले याबद्दल मंडळाचा मी अत्यंत म्हणी आहे.

संशोधन महर्षि डॉ. वि. भि. तथा भाऊसाहेब कोलते यांचा ऋणानुबंध ही माझ्या आयुष्यातली फार मोठी कमाई आहे. विद्यार्थीदशेत त्यांचा परिचय झाला त्याच बेळी त्यांच्या संशोधनकार्याने मला प्रभावित केले होते. स्वतःचे संशोधन करीत असतानाही इतरांच्या कार्याविषयीची आस्था हा डॉ. भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्वाचा एक असाधारण विशेष आहे. माझ्या सर्वच लहान मोठ्या संशोधनात त्यांचे मार्गदर्शन मला लाभले आहे. इतकेच नव्हे तर 'स्वस्थ बसलो तर भाऊसाहेब काय म्हणतील?' हा 'धाक' ही आजमितीस कायम आहे. प्रस्तुत ग्रंथ त्यांना अर्पण करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

साधन-सामग्रीचे संकलन आणि विश्लेषण करीत असताना माझे स्नेही डॉ. व. दा. कुळकर्णी यांच्याशी झालेल्या चर्चेचा बराच उपयोग झाला, लेखन चालू असताना पहिले वाचन त्यांनीच केले व काही उपयुक्त सूचनाही केल्या. डॉ. व. दा. कुळकर्णी यांनी ग्रंथाची सूची तयार करण्याचे कार्यही आस्थेने केले आहे. त्यांचे आभार मानलेले त्यांना रूचणार नाहीत म्हणून त्यांच्या सहकार्याची नोंद करून ठेवतो.

साहित्य संस्कृति मंडळाचे सचिव श्री. सू. द्वा. देशमुख यांनी ग्रंथाचे मुद्रण व अन्य संबंधित बाबीकडे आस्थेने लक्ष पुरविले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ग्रंथाला आकर्षक रूप देणारे नागपूरच्या श्री प्रसाद मुद्रण या संस्थेचे धनी श्री चंद्रकांत तापस आणि त्यांचे सहकारी यांचाही मी आभारी आहे. ग्रंथाचे मुद्रण नागपूर येथे करावयाचे ठरल्यानंतर एक पेच निर्माण झाला. हैदराबाद-नागपूर मुंबई ही 'त्रिस्थळी' यात्रा सफल व्हावयाची कशी? माझे स्नेही डॉ. मधुकर आष्टीकर यांनी या त्रिस्थळीवर 'सेतू' बांधून मला चिंतामुक्त केले. मुद्रिते तपासण्याचे जिकिरीचे काम त्यांनी अंगावर घेतले. डॉ. आष्टीकर यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

चैत्र शुद्ध, शके १९०९,
मार्च ३०,१९८७
२-१-५१२/४ नल्लकूंटा,
हैदराबाद-५०००४४

**श्रीधर रंगनाथ कुळकर्णी**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

प्रथम खंड ........ १६

समाज-रचना आणि संस्कृती ........ १६

अरे-मराठा समाज ........ १७

सामाजिक व सांस्कृतिक जीवन ........ ३०

प रि शि ष्टे ........ ५७

द्वितीय खंड ........ ९६

अरे-मराठी बोली : भाषा शास्त्रीय अभ्यास ........ ९६

बोलीच्या अभ्यासाची दिशा ........ ९७

शब्द-संग्रहाचे विश्लेषण ........ १०६

प रि शि ष्टे ........ ११९

ध्वनि-व्यवस्था ........ १२२

प रि शि ष्टे ........ १४७

रूप-व्यवस्था ........ १५२

वाक्य-रचना ........ १७४

फलश्रुती ........ १८२

प रि शि ष्टे ........ १८६

तृतीय खंड ........ १९३

अभ्यासाची मूळ साधने ........ १९३

अरे-मराठी बोलीतीत शब्दसंग्रह ........ १९५

लोक-गीते........................................................................................................ २३३

लोक-कथा....................................................................................................... २९०

अरे-बोलीच्या क्षेत्राबाहेरील मराठी ................................................................................... ३०८

प्रमुख आधार ग्रंथ .............................................................................................. ३२८

## प्रथम खंड

## समाज-रचना आणि संस्कृती

अनुक्रमणिका

१

## अरे-मराठा समाज

**१. महाराष्ट्राबाहेरील मराठे व त्यांची बोली; २. प्रस्तुत अभ्यासाची क्षेत्र-मर्यादा; ३. तेलंगणातील अरे-समाज; ४. देव-दैवते आणि सण-वार; ५. मद्य-मांस-निषेध; ६. समाज-नियंत्रण पंचांकडे; ७. वंशश्रेष्ठत्वाची जाणीव; ८. द्वैभाषिक अरे-मराठा; ९. समाजनिष्ठ भाषाविज्ञान; १०. पुढील अभ्यासाची दिशा.**

### १. महाराष्ट्राबाहेरील मराठे आणि त्यांची बोली

महाराष्ट्रातून स्थलांतर करून भिन्न भिन्न भाषिक प्रदेशात स्थायी झालेल्या मराठी भाषिकांचे सामाजिक जीवन आणि त्यांच्या बोलीचे स्वरूप यांचा अभ्यास आतापर्यंत उपेक्षित राहिलेला आहे. रामेश्वरापासून नेपाळपर्यंत आणि बंगालपासून पंजाब-काश्मीरपर्यंत मराठी भाषिक नागरिक विखुरलेले आहेत. उद्योगधंद्याच्या निमित्ताने अगदी अलिकडच्या काळात बाहेर पडलेले, नैसर्गिक आपत्तीमुळे स्थलांतर करणारे, तसेच पुरातन काळात विशिष्ट कारणांमुळे स्थलांतर करून त्या त्या प्रांतात स्थायी झालेले असे कितीतरी प्रकार या स्थलांतरित मराठी भाषिकांत आढळतील. मराठ्यांच्या राजकीय वर्चस्वाच्या काळात लष्करी व मुलकी जबाबदाऱ्या सांभाळण्याच्या निमित्ताने परप्रांतात गेलेली मराठी घराणी त्या त्या भागात स्थायी झालेली आहेत. नशीब काढण्यासाठी बाहेर पडलेल्या कित्येकांनी वेगवेगळ्या भाषिक विभागात घरे-बांधली आहेत. भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर स्थलांतर न करताही अनेक मराठी भाषिक 'परदेशी' झाले आहेत. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या विभागातील मराठी भाषिक या सदरात मोडतात.

या सर्वांची संख्या बरीच मोठी आहे. भिन्न भाषिकांच्या सहवासात राहिल्यामुळे या सर्वांच्या तोंडी असलेली मराठी बोली सर्वत्र सारखी नाही. भिन्न भिन्न प्रांतांत नांदणाऱ्या मराठी भाषिकांचे समाजजीवनही एकसंध आहे असा दावा करता येणार नाही. काही शहरांतून पांढरपेशांची 'महाराष्ट्र-मंडळे' असली तरी शहरांपासून दूर असलेल्या भागांत नांदणाऱ्या परप्रांतीय मराठी भाषिकांची दखल घेणे तसे दुरापास्तच. या मराठी समाजांपैकी कित्येकांचे महाराष्ट्राशी संबंध अनेक पिढ्यांपासून तुटलेले आहेत. तथापि, अशा समाजाने आपल्या परीने मराठी भाषा व परंपरा जतन करून ठेवल्या आहेत. देशात सर्वच प्रांतात आढळणाऱ्या या 'परदेशी' मराठी भाषिकांचे सामाजिक जीवन आणि त्यांनी जपून ठेवलेल्या मराठी बोली यांचे अध्ययन हे मराठी भाषा व परंपरा यांच्याविषयी आस्था बाळगणाऱ्यांना फार मोठे आव्हान आहे. परप्रांतात विखुरलेल्या मराठी भाषिकांच्या भाषिक व सांस्कृतिक विशेषांच्या अध्ययनाच्या अभावी महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास व मराठी भाषेचा विकास यांचा अभ्यास अपूर्णच राहील.

परप्रांतातील मराठी भाषिकांचे समाजजीवन आणि त्यांनी कायम ठेवलेली मराठी भाषा यांची पाहणी करून महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास पूर्ण करण्यासाठी अनेक प्रकल्प हाती घ्यावे लागतील. अशा

अनुक्रमणिका

प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाकडून चालना मिळावी ही रास्त अपेक्षा अवास्तव ठरू नये. सहस्रकरांना आव्हान देणारे हे कार्य एकाच पिढीत पूर्ण होईल याचीही शाश्वती देता येणार नाही. पण, कुठे तरी प्रारंभ झाला तरच त्याचा शेवट होण्याचा प्रश्न उद्‌भवेल. ब्रिटिश शासनाच्या काळात Linguistic Survey of India सारखा प्रकल्प सिद्धीस गेला. स्वराज्यात अशा प्रकारचे कार्य तडीस जाण्यास प्रत्यवाय नसावा.

या पर्वतप्राय कार्याच्या तुलनेने अगदी धूलिकणासमान शोभावा एवढा लहानसा प्रकल्प उस्मानिया विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यांच्या सहयोगाने मला हाती घेता आला. प्रत्यक्ष कार्य करीत असताना ते किती व्यापक आणि परिश्रमाचे आहे याची जाणीव झाली. सुमारे पाच वर्षे भ्रमण करून गोळा केलेल्या सामग्रीच्या आधाराने संशोधन केल्यानंतर जे फलित हाती आले ते मराठी भाषा आणि परंपरा यांचा अभिमान बाळगणाऱ्या वाचकांस सादर करताना गोवर्धनाला आपलीही करांगुली लागल्याचे समाधान मी अनुभवीत आहे!

प्रथम विचार होता हैदराबाद शहरातील भिन्न थरांत वावरणाऱ्या मराठी नागरिकांच्या बोलींची पाहणी करण्याचा. इंद्रधनुष्याला लाजवितील एवढे या नगरीच्या मराठी बोलींना विविध रंग आहेत. भारत सरकारच्या विविध उद्योगात नोकरीवर असलेले ‘ताज्या दमाचे’ मराठी भाषिक, हैदराबादेत कित्येक पिढ्यांपासून स्थायी असूनही पुण्या-मुंबईशी सातत्याने संपर्क राखून आपले ‘ताजेपण’ जोपासणारा ‘शिष्ट’ समाज, निजामाच्या जमान्यात ‘मुलाजमत’ करून स्वराज्यात सेवानिवृत्त झालेला नोकरपेशा वर्ग, ‘मोगलाईत’ दरबारी ‘ऊठबस’ असलेला रईस, लष्करी पेशाच्या निमित्ताने या भागात आलेल्या घराण्यांतील शिपाईगिरी न करणारे वंशज, ‘बाजार बुणग्यात’ एकेकाळी राहून निरनिराळे व्यवसाय करणाऱ्या घराण्यांचे वारसदार, भटक्या विमुक्त जमातीतून घरवारी झालेले मराठी भाषिक ‘बोहारी’ व जोशी, असे कितीतरी सांस्कृतिक थर सांगता येतील. प्रत्येक समाजात रूढ असलेल्या मराठी बोलीस काही न्याराच ढंग व सांस्कृतिक गंध आढळतो. या पाहणीतून दृष्टी अधिक रुंदावली व एकंदरीत तेलंगणातील मराठी बोलींचे अध्ययन करावे असा विचार बळावला.

## २. प्रस्तुत अभ्यासाची क्षेत्र-मर्यादा

आंध्रप्रदेशातील तेलंगण विभागात ८ जिल्हे पूर्वीपासून होते, आदिलाबाद, करीमनगर, निजामाबाद, महबूबनगर, नलगोंडा खम्मम, मेदक आणि वरंगल. हैदराबाद परिसरातील काही भाग वेगळा करून रंगारेड्डी हा जिल्हा नव्याने अस्तित्वात आला आहे. या नऊ जिल्ह्यांपैकी आदिलाबाद व निजामाबाद या जिल्ह्यांना मराठवाड्याची सीमा लागून आहे. करीमनगर जिल्हा वऱ्हाडच्या सीमेलगत येतो. हे नऊ जिल्हे आणि हैदराबाद-सिकंदराबाद हे जोडनगर या भागांतून मराठी भाषिकांची वसाहत आढळून येते. सुखवस्तु जमीनदार, विणकर, कापडाचा व्यापार करणारे भावसार क्षत्रिय, शेतकरी, सरकारी व खाजगी क्षेत्रातील नोकरवर्ग अशी या भागातील मराठी भाषिकांची वर्गवारी करता येईल. नोकरपेशा वर्गात तेलंगणातील मराठी भाषिक व बाहेरून नव्याने आलेले मराठी भाषिक असा भेद करता येईल. आदिलाबाद व निजामाबाद या जिल्ह्यातून मराठी माध्यमाच्या सरकारी शाळा आहेत. शासकीय व्यवहाराच्या दृष्टीने आदिलाबाद जिल्ह्यापुरती मराठी ही दुय्यम भाषा म्हणून शासनाने मान्य केली आहे.

अनुक्रमणिका

जाती-जमातींच्या संदर्भात विचार केला असताना स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण बोली असलेल्या अनेक जमाती तेलंगणात आढळून आल्या. ब्रह्मखत्री गीरगोसावी, भावसार क्षत्रिय, पद्‌मशाली, स्वकुल साळी, जोशी (भटक्या जमातींपैकी कुडमुडे जोशी, स्मशान जोगी इ.), चांभार, सईस अशी काही जमातींची नावे देता येतील. या जमातींचे वास्तव्य साधारणपणे बाजारपेठांच्या गावी असते. वर्तमान प्रवाही मराठीशी त्यांचा संबंध येतो. त्याचप्रमाणे व्यवसायाच्या निमित्ताने अन्य भाषिकांच्या बोलींचे संस्कारही त्यांच्यावर होतात. या सर्वच जमातींची मराठी बोली सारखी नाही. जातिपरत्वे व स्थलपरत्वे मराठी बोलीची भिन्न रूपे आढळतात. महाराष्ट्राशी (विशेषतः मराठवाड्याशी) सोयरसंबंध चालू असलेल्या जमातींची बोली त्यामानाने वेगळी पडते. खाटिक जमातीच्या एकाच कुटुंबात बोलीच्या तीन तऱ्हा आढळल्या. या कुटुंबातील कर्ता पुरुष मराठी भाषा समजू शकतो, बोलत नाही. त्याचे आई-वडील थेट तेलंगणातील रूढ मराठी बोली बोलतात. सून पुण्याची. तिची भाषा त्यामानाने निराळीच वाटली.

जाती-जमातीत रूढ असलेल्या मराठी बोलीची पाहणी करीत असताना ग्रामीण विभागातील एका वैशिष्ट्यपूर्ण बोलीचा परिचय घडला. तेलंगण विभागात शेती करणाऱ्या शेतकऱ्याची मराठी बोली मला निराळी वाटली. या जमातीत रूढ असलेल्या बोलीस बरीच एकविधता असल्याचे निदर्शनास आले. इतकेच नव्हे तर मराठी भाषेच्या विकासातील महत्त्वाचे धागेदोरे जुळविण्याच्या दृष्टीने ही बोली अधिक श्रीमंत असल्याचा प्रत्यय प्राथमिक पाहणीतच आला. हा मराठी भाषिक शेतकरी समाज आंध्र प्रदेशात 'अरेवाडू' या नावाने ओळखला जातो. आपण मराठे आहोत याची या जमातीस जाणीव आहे. परंतु, मराठी ही समृद्ध वाङ्मय असलेली भाषा आहे हे मात्र त्यांच्या गावीही नाही! तेलगू भाषेत वर्तमानपत्रे व ग्रंथ आहेत त्याचप्रमाणे आपल्या भाषेतही ते अस्तित्वात आहेत याची गंधवार्ताही त्यांना नाही. या समाजात रूढ असलेल्या बोलीने मात्र प्राचीन मराठीचे अनेक विशेष वर्तमान काळात टिकवून धरले आहेत हे आश्चर्यकारक वाटले तरी सत्य आहे.

या वैशिष्ट्यामुळे अरे-मराठा समाज आणि त्याची बोली यांचे संशोधन व विश्लेषण मला तरी एक प्रकारचे आव्हानच वाटले. अरे-समाजाचे भाषिक व सांस्कृतिक अध्ययन हे माझ्या संशोधनाचे क्षेत्र निश्चित झाले ते अशा रीतीने.

आंध्र प्रदेशात तेलंगण विभागात आणि या विभागाबाहेरही अरे-मराठा समाज आढळतो. बहुसंख्य तेलुगू भाषिक प्रदेशात एखाद्या बेटासारखी तुरळक वाढलेली ही मराठी भाषिक कुटुंबे शोधून काढणे हेच एक दिव्य. या शोधासाठी मी वरंगल आणि करीमनगर (वऱ्हाडनजिक असलेला भाग वगळून) या दोन जिल्ह्यांची निवड केली. हेतू हा की मराठी भाषिकच्या टापूचा अगदी दूरान्वयानेही संपर्क नसलेल्या भागात पाहणी करता यावी. वाहतुकीच्या आधुनिक साधनांपासून दूर अंतरावर असलेल्या टापूची निवड पाहणीसाठी मुद्दामच करण्यात आली. सुमारे पाच वर्षे सवड मिळेल त्याप्रमाणे दोन पायांच्या बळावर अधिकांश प्रवास करून साधनसामग्री गोळा करण्यात आली. या प्रवासात अंतःकरणाला हेलावून सोडणारे सौहार्दच अधिक वाट्याला आले. चित्त उद्विग्न करणारी उदासीनताही कित्येक ठिकाणी प्रत्ययास आली. परंतु, मराठी भाषा आणि परंपरा यांच्या विषयीच्या अभिमानाच्या धारेत या विषालाही अमृताची माधुरी लाभली!

अनुक्रमणिका

## ३. तेलंगणातील अरे-समाज

तेलंगणातील अरे-मराठा समाज हा प्रामुख्याने शेतीवर निर्वाह करतो. कोरडवाहू शेती ही त्याला अधिक प्रिय. पाण्याखाली नसलेल्या भागात या समाजाची वसाहत हमखास आढळते. काळी जमीन व अरे मराठा यांचे साहचर्य तेलंगणात सर्वत्र परिचित आहे. किंबहुना काळ्या जमिनीचा माग काढीत (तांबडमातीचा टापू वगळून) या समाजाने वसाहती केल्या आहेत. महाराष्ट्राबाहेर प्रत्येक मराठी भाषिक स्वतःला मराठा म्हणून घेत असला तरी महाराष्ट्रात मात्र मराठा ही संज्ञा जातिवाचक आहे. शहाण्णव कुळीचे, क्षात्र कुलोत्पन्न आणि प्रामुख्याने शेतीभाती करणारे या अर्थाने जातिव्यवसायाचा समुच्चयात्मक बोध महाराष्ट्रात 'मराठा' या संज्ञेने होतो. तेलंगणात 'अरे-मराठा', 'अरे-क्षत्रिय', 'अरेवाडू', या नावाने ओळखला जाणारा समाज देखील असाच जातिव्यवसायाचा निर्देशक आहे.

प्रामुख्याने ग्रामीण भागात विखुरलेल्या या समाजात रूढ असलेल्या काही लोकगीतांवरून व काही सामाजिक आचारधर्मांच्या आधाराने असे अनुमान निघते की, निर्जन अरण्यात वसाहत करण्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातील 'मराठ्यानी' या भागात स्थलांतर केलेले असावे. आजही एखाद्या गावालगत स्वतःची वाडी वा 'पल्ली' वसवून अरे-मराठा नांदताना दिसतो. १०-१५ घरांच्या वाड्यांपासून ते ३०० घरांच्या पल्लीपर्यंत अरे मराठ्यांच्या वसाहती मी पाहिल्या आहेत. वसाहत लहान असो वा मोठी, निखळ मराठ्यांची असो वा संमिश्र, आपापल्या परिसरात अरे मराठा बराच प्रभावी असतो. अगदी परवापर्यंत पोलीस पाटीलकीची वतने या समाजात वंशपरंपरेने चालत होती वतनदारी खालसा झाल्यावर देखील या समाजाचे आपापल्या परिसरातील महत्त्व कमी झाले नाही. १९८३ साली झालेल्या सरपंचांच्या निवडणुकांत एका वरंगल जिल्ह्यात सुमारे ४० सरपंच या समाजाचे निवडून आले. भाषिक आणि काही मर्यादेपर्यंत सामाजिक क्षेत्रात आपले वेगळेपण कायम ठेवूनही एकंदरीत लोकजीवनाशी समरस होण्यात या समाजाने चांगलेच यश मिळविले आहे.

आर्थिक दृष्ट्या हा समाज फारसा संपन्न नाही. शेतमालकांपेक्षा शेतमजूर संख्येने अधिक आहेत. शेतमालकांत देखील तीन-चार एकरांचे धनी असलेले अधिक. धनिक शेतकरी अगदी अपवादात्मक. अरे मराठ्याची प्रतिष्ठा मात्र त्याच्या अर्थबळावर अवलंबून नसते. अत्यंत सचोटीचा, कष्टाळू, नैतिक दृष्ट्या उच्च पातळी सांभाळणारा पण हट्टी अशी त्याची ख्याती आहे. त्यामुळे या समाजातील शेतमजुरावर बेकार राहण्याची पाळी सहसा येत नाही. मराठी भाषिकांना अभिमानास्पद वाटावी अशी प्रतिष्ठा अरे समाजाला ग्रामीण तेलुगू भागात लाभलेली आहे.

आपण क्षात्रकुलोत्पन्न आहोत अशी या समाजाची धारणा आहे. शहाण्णव कुळी मराठा-समाजात रूढ असलेली कितीतरी आडनावे या समाजात रूढ आहेत. [परिशिष्टात अरे-मराठा समाजात रूढ असलेली नावे दिली आहेत. त्यांपैकी शहाण्णव कुळीत रूढ असलेली नावे तारांकित केली आहेत.] काही घराण्यांनी या भागातल्या गावांची नावे आडनावादाखल धारण केली आहेत. तथापि, आपण थोर कुळातले क्षात्रवंशीय आहोत ही जाणीव सार्वत्रिक आहे. तुळजा भवानी हे या समाजाचे कुलदैवत. एकाही पुरुषाने वा त्याच्या नजिकच्या पूर्वजाने तुळजापूर पाहिलेले नाही. तथापि, कार्यप्रसंगाला प्रथम आवाहन होते ते तुळजाभवानीचे. तुळजाभवानीचे गोंधळी (भोपे) एकेकाळी वर्षातून एकदा या भागात भिक्षेसाठी येत असत. आता मात्र ही भिक्षा थांबली आहे. भटक्या जमातीच्या सदरात 'गोंधळी' ही जात नमूद करण्यात आली आहे. त्यांचा या गोंधळ्यांशी संबंध पोचतो किंवा नाही हे निश्चित सांगता येत नाही.

अनुक्रमणिका

अरे-मराठा समाजाच्या आश्रयाने "अरे-गुंदले" या नावाने ओळखली जाणारी मराठी भाषिक जमात आढळते. ही जात कालमानाने शेतमजुरी करीत असली तरी या जातीचा मूळ व्यवसाय कथेकऱ्यांचा. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या कुळात होऊन गेलेले थोर पुरुष होत ही जाणीव या कथेकऱ्यांच्या वतीनेच अरे-समाजात प्रसृत झालेली दिसते. या कथेकऱ्यांना शिवचरित्राचे ज्ञान मुळीच नाही. नाममहिम्यावरच ते समाधान मानतात. अरे-गोंधळी फावल्या वेळात मराठी नाटकांचे प्रयोग ग्रामीण रंगभूमीवर सादर करीत असतात. नाटकांची कथानके लोककथेवर प्रामुख्याने आधारलेली असतात. मऱ्हाटराजा व राणी या नाटकाच्या नायिका असतात. रामायण-महाभारताच्या कथाभागावरही काही नाटके सादर झालेली आहेत. संगीत प्रधान नाटके देखील ही मंडळी सादर करते. या जमातीत नाट्य-गीतांची रचना करणारे कवीही आढळले. [काही नाटकातील गाणी परिशिष्टात दिली आहेत. उपेंद्र हा गोंधळी या गीतांचा कर्ता.]

## ४. देव-दैवते आणि सणवार

तुळजा भवानीच्या खालोखाल अरे-समाजात राजन्ना या दैवतास मान्यता लागली आहे. करीमनगर जिल्ह्यात बेमलवाडा येथील राजराजेश्वर म्हणजे अरे-समाजास पूज्य असलेला राजन्ना. कोत्ताकुंडा येथील इरन्ना या दैवतास देखील शुभकार्याच्या प्रसंगी आवाहन करण्यात येत असते. हे स्थान एकतर भैरवाचे असावे किंवा पुरातन काळातील एखाद्या वीराचे स्मारक. हनुमंताची पूजा तेलंगणात सार्वत्रिक नाही. महाराष्ट्रातल्या कोणत्याही खेड्यात इतर देवस्थाने नसली तरी मारुतीचे देऊळ असतेच. तेलंगणात तसे आढळणार नाही. परंतु अरे-मराठा समाज ज्या गावात नांदतो त्या गावात मात्र मारुतीचा उघडा पार अवश्यमेव असतो. या खेरीज पोचाम्मा (पोचामाई) सारख्या स्थान देवताही हा समाज पूज्य मानतो.

काही सणांच्या निमित्ताने या समाजाने मूळ मराठी परंपरा कायम ठेवल्या आहेत. नागपंचमीचा सण तेलंगणात नसतो. अरे-समाजात माल नागपंचमीला बरेच महत्त्व आहे [तिसऱ्या खंडातील लोकगीतात नागपंचमीच्या सणावरचे एक गीत आले आहे.] दिवाळीच्या सणाला आपल्याकडे लेक-जावई बोलावण्याचा प्रघात आहे. अरे-समाजात नागपंचमी व संक्रांत या सणांना लेक-जावयाची बोळवण होत असते. दिवाळीला लेकीला दिवाळसण घालण्याची प्रथा अरे समाजात नाही. तेलंगणात दिवाळी एकाच दिवसाची असते. हा समाजही तेलुगू पद्धतीनेच दिवाळी साजरी करतो. त्यामुळे भाऊबीज अर्थात नसतेच. परंतु, भाऊबीजेच्याच तोडीचा दुसरा एक सण या समाजात आहे : 'वाट्याचा सण' या नावाने तो साजरा होतो. वैशाख शुद्धात (अक्षय्य तृतीयेपासून पौर्णिमेपर्यंत) केव्हा तरी. बहीण भावाघरी खोबऱ्याच्या वाट्या घेऊन जाते, भावाला ती ओवाळते आणि भाऊ आपल्या ऐपतीप्रमाणे बहिणीची बोळवण करतो.

तेलंगणात नसलेला आणखी एक सण या समाजात पाळतात : तो म्हणजे बैलाचा पोळा (श्रावण वद्य अमावस्या). शेतीवर निर्वाह करणाऱ्या या समाजाने हा सण अद्यापही कायम ठेवणे स्वाभाविक आहे. मराठवाड्यात ज्या पद्धतीने पोळा साजरा करतात तीच पद्धती अरे-समाजात रूढ आहे. (शेतीच्या अवजारांची मराठवाड्यात रूढ असलेली नावेच अरेबोलीत रूढ आहेत हेही या संदर्भात ध्यानात ठेवण्यासारखे आहे). चैत्री पाडवा हा तेलुगू समाजातही वर्षारंभाचा सण म्हणून साजरा होत असतो. अरे-समाजात पाडव्याच्या दिवशी गुढी उभारण्यात येत नाही. या समाजाची हा सण साजरा करण्याची प्रथा अगदी वेगळी आहे. पाडव्याच्या दिवशी अरे-मराठा शुचिर्भूत होऊन सकाळीच कुऱ्हाडीसह शेतात जातो. आपटा किंवा सौंदड या झाडावर तो

एक धाव घालतो. घरी येऊन त्याच कुऱ्हाडीने तो नारळ फोडतो. नंतर कुऱ्हाडीची पूजा होते. पाडव्याच्या दिवशी मौन पाळावयाचे असते. वाईट शब्द त्या दिवशी मुखातून बाहेर पडल्यास वर्ष चांगले जात नाही ही समजूत. म्हणून हे मौन. घरातली कोणतीही वस्तू पाडव्याच्या दिवशी बाहेर जाऊ द्यावयाची नाही हा कटाक्ष. [देशावर गौरीपूजेच्या दिवशी (महालक्ष्मी) असाच निर्बंध पाळण्यात येत असतो.]

भाताच्या मुलखात राहूनही अरे-मराठा आपल्या मूळघरच्या भाकरीस विसरला नाही. निदान एकवेळच्या जेवणात भाकरी ही असतेच. तेलंगणाला सर्वस्वी अपरिचित असलेली पुरणपोळी आणि कानोला अरे कुटुंबात सणावाराला असतोच. स्वतःला क्षत्रिय म्हणविणारा हा समाज मांसभक्षण आणि मद्यपान निषिद्ध मानतो हे बुचकळ्यात टाकणारे आहे. मद्य-मांसांचे सेवन करतो तो 'कॉंटे' (कडू) मऱ्हाटा, अक्करमाशा. अशांना समाज वाळीत टाकतो अशा घराण्याशी बेटी-व्यवहार वर्ज्य गणलेला आहे. मद्यमांस या समाजाने वर्ज्य का मानले आहे याविषयी अधिक संशोधन होणे आवश्यक आहे. मद्य-मांस सेवनाची क्षत्रिय-मराठ्यांची परंपरा तेलंगणात खंडित झाली याच्या मुळाशी काही सामाजिक वा सांस्कृतिक कारणे असली पाहिजेत.

**५. मद्यमांस निषेध**

'तुम्ही शिकार करता, मग मांसभक्षण का करीत नाही?' असा प्रश्न मी एका वृद्धास विचारला होता. त्याने दिलेले उत्तर लक्षात घेण्यासारखे आहे. उत्तराचा सारांश थोडक्यात असा: 'आम्ही शेतीच्या निमित्ताने रानात राहतो. आमचा सारा बारदाना उघड्यावर असतो. श्वापदापासून जनावराचे रक्षण व्हावे यासाठी शिकार करणे क्रमप्राप्त असते. परंतु, केलेली शिकार खाणे हे आमच्या कुलधर्मात बसत नाही.' खाटिक जमातीतही (अरे-कटिगे) मांसभक्षण वर्ज्य आहे हे समजल्यानंतर तर मला आश्चर्याचा धक्काच बसला! या भागातील खाटिक जमातीच्या पंचांची मुलाखत मी या संदर्भात घेतली. त्यांनी जी परंपरागत कथा सांगितली तिचा सारांश असा :

> 'आमचे पूर्वज एका चक्रवर्तीच्या सैन्यात अधिकारी होते. एकदा या चक्रवर्तीने परप्रांतावर स्वारी केली. लढाई दीर्घकाळ चालली. आमच्या पूर्वजांच्या हाताखाली असलेली लष्करी तुकडी बंड करण्याच्या तयारीत असल्याचा संशय राजाला आला. त्याने सर्वच तुकडीला एका घोर धरण्यात नेऊन सोडले. अरण्यातल्या धनगरांनी या तुकडीला आश्रय दिला. आम्ही उच्च कुळातले. त्यांच्या हातचे जेवण आम्हाला जमत नसे म्हणून शेळ्यांचे दूध धनगर आम्हाला देत. त्यांचा दिवस त्यामुळे घसरला. उपकाराची फेड म्हणून आम्ही शिकार करून नजिकच्या वस्तीत मांसविक्री करू लागलो. या शिकारीने धनगरांच्या शेळ्यांचे रक्षण झाले व उपकाराची परतफेडही. वाईट दिवसांत देखील आमच्या पूर्वजांनी मांसविक्री केली असली तरी मांसभक्षण केले नाही. तोच धर्म आम्ही पाळतो...'

ही दंतकथा आहे. वास्तवाचे समाधानकारक उत्तर या कथेत सापडत नाही. एखादेवेळी खाटिक समाजापुरती ती खरी मानली तरी शेतकरी समाजास ती लागू पडत नाही. मूळ प्रश्न उरतोच--अरे-समाजात मद्य-मांस-सेवन निषिद्ध का?

एक संभाव्य कारण देता येईल. तेराव्या-चौदाव्या शतकात आंध्रप्रदेशास मराठी भाषा व मराठी माणूस परिचित होता. या सुमारास होऊन गेलेला तेलुगू कवि पालकुरी सोमनाथ याने आपल्या पंडिताराध्य चरित्रात एक मराठी पद दिले आहे. त्याच्या 'शतक' रचनेत देखील एक मराठी भाषेतले शतक आढळते. सोमनाथ वीरशैव पंथाचा. आंध्रप्रदेशातील श्रीशैलम् येथील मल्लिकार्जुनाची स्तुती त्याच्या पंडिताराध्य चरितात आढळते. या स्तुतीच्या संदर्भातच मराठी गीत आले आहे. [इतिहास मोठा विलक्षण असतो. तेलुगू ग्रंथातील मराठी गीताचा संबंध ज्या श्रीशैलमुशी येतो त्याच देवस्थानावर पुढे सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांना वैराग्याने वेढले होते. सभासदाच्या बखरीनुसार शंकराला शिरकमल अर्पण करण्याचा त्यांचा विचारही बळावला होता. याच पर्वतावर भवानीचा साक्षात्कार त्यांना झाला. ज्या गोपुरावर महाराजांना साक्षात्कार झाला ते 'शिवाजी गोपुरम्' या नावाने आजही ख्यात आहे.] या ज्योतिर्लिंगास आजही वीरशैव मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येतात. तेराव्या चौदाव्या शतकात आंध्रप्रदेशात वीरशैव पंथ बराच प्रभावी असावा. 'लीळाचरित्रा'त वरंगलच्या तेल्याच्या घरी चक्रधरांनी केलेल्या लीलेचा समावेश आहे श्रीचक्रधरांचे दर्शन झाल्यानंतर तेल्याच्या हातीचे खड्ग गळून पडते. तो सभोवतालच्या लोकांना म्हणतो :

> 'एया लिंगा आजि लिंगभेदु जाला होता : अरे तुम्ही अवघौ परतीं जा : माझेया घरा आजि माझा देओ आला : माझेया घरा माझे सोमनाथ आला : माझेया घरा मलिनाथु आला : आजि माझें पुजितें लिंग आले:' [लीळाचरित्र (कोलते प्रत) पृ. १८.]

हा तेली वीरशैव पंथाचा होता हे उघड आहे. या पंथात मद्य-मांस वर्ज्य आहे. शक्यता अशी दिसते की अरे-मराठा प्रत्यक्षात वीरशैवपंथाचा अनुयायी झालेला नसला तरी या पंथाच्या प्रभावाखाली निश्चितच नांदला असावा परिणामस्वरूप स्वरूप मद्य-मांस निषेधाचा आचारधर्म समग्र अरे समाजाने स्वीकारलेला असावा किंवा वीरशैव व मराठे यांच्यामध्ये सामाजिकदृष्ट्या सरमिसळ होऊन उभयपक्षी आचारधर्माचा समन्वय झालेला असावा. समन्वयाच्या या प्रक्रियेत मद्यमांस-निषेधाला सामाजिक स्वरूप आले असावे.

आजही या समन्वयाची महत्त्वाची निशाणी अरे-समाजात आढळते. सामाजिक आचाराच्या दृष्टीने हा समाज तसा एकसंध असला तरी काही घराण्यांतून प्रेताचे दहन करण्याची प्रथा आहे तर कित्येक घराण्यात प्रेताचे दफन होत असते. वीरशैव समाजात प्रेताचे खणन (दफन) करण्याची प्रथा आहे. अरे-समाजातील काही घराण्यांतून आढळणारी खणन प्रथा निश्चितच वीरशैव परंपरेची निदर्शक आहे.

हा महानुभाव-परंपरेचा प्रभाव नसेल कशावरून? असाही प्रश्न या ठिकाण उपस्थित होऊ शकतो. महानुभावपंथात मद्यमांसाचा निषेध आहे त्याचप्रमाणे महात्मेयांचे 'निक्षेप' (दफन) झाल्याचे उल्लेखही महानुभावांच्या चरित्र-ग्रंथांत आढळतात. परंतु, स्वतः चक्रधरांनी तैलंग देशात भ्रमण केले असले तरी 'कान्नडदेशा तैलंगदेशा न वचावें' अशी त्यांनी आपल्या अनुयायांना आज्ञा केली आहे. ही आज्ञा लक्षात घेता चक्रधरस्वामींच्या पश्चात् तेलंगणात महानुभाव पंथाचा प्रसार झाला असेल असे वाटत नाही. कानड-तैलंग देशाच्या प्रवासाप्रमाणेच मातापूर (माहूर) व कोल्हापूर या देवीच्या स्थानासंबंधी निषेधात्मक वचने महानुभाव वाङ्मयात आढळतात. तुळजापूरच्या भवानीस कुलदैवत मानणारा अरे समाज म्हणूनच महानुभावपंथाच्या प्रभावामुळे मद्यमांस निषेधक झाला असे मानणे शक्यतेच्या कोटीत बसत नाही.

मराठवाड्याच्या सरहद्दीस लागून असलेल्या निजामबाद जिल्ह्यात कामारेडीच्या परिसरातील सदाशिवपेठ भागात महानुभावांचे मठ आहेत. या मठाचे अनुयायी मराठी भाषिक आहेत. या भागातले दत्तमंदिर दोनशे वर्षांपेक्षा अधिक पुरातन नाही. त्याचप्रमाणे या परिसराबाहेर महानुभाव पक्षाचा प्रसार झालेला नाही. ही बाब लक्षात घेता अरे-समाजाचा मद्यमांस-निषेध महानुभावपंथांशी निगडित करता येत नाही. शिव-शक्तीची उपासना करणारे वीरशैव आणि राजराजेश्वर-तुळजाभवानी यांचे भक्त असलेले अरे-मराठे या दोन समाजांत केव्हातरी सरमिसळ होऊन वीरशैवपंथाचा मद्यमांस निषेधाचा आचार समन्वित समाजाने स्वीकारलेला दिसतो. अरे-समाजाचे मूळ स्थान वरंगल भागातील **महालिंगम्पल्ली** हे असून जमातीचे प्रमुख असलेल्या घराण्यात ‘खणन’ पद्धती अस्तित्वात आहे. त्यावरून अरे-समाजाचा मद्य-मांस-निषेध वीरशैवपंथातून सभ्रांत झालेला आहे याविषयी संदेह उरत नाही.

### ६. समाज नियंत्रण पंचाकडे

हा निषेध वगळता इतर अनेक बाबतीत शहाण्णव कुळी मराठे आणि अरे-मराठे यांच्या सामाजिक आचारात बरेच साम्य आहे. या जमातीत विधवा-पुनर्विवाह वर्ज्य आहे. घटस्फोट निषिद्ध गणले जातात. विवाहसंबंध जाती बाहेर होत नाहीत. मामाच्या मुलीवर अग्रहक्क असतो. वरसंशोधन मुलीचा बाप करीत असतो. सोयरीक पक्की होण्यापूर्वी जातपंचायत विश्वासात घ्यावी लागते. आपल्या कुलश्रेष्ठत्वास एखाद्या विवाहाने बाध तर येणार नाही याची काळजी जातपंचायत घेत असते. त्या त्या परिसरातील टिळ्याचे मानकरी ‘कुलवृद्ध’ या नात्याने पंचायतीत बसतात. उभय कुळांचा विचार करून पंचायतीने सोयरसंबंधास मान्यता दिल्यानंतर वरपिता साखरपुडा करतो. ‘निश्चित तांबुलम्’ या नावाने हा समारंभ होतो. हा समारंभ वधूपित्याच्या निवासस्थानी होतो. लग्नतिथी बहुधा याच वेळी निश्चित होते.

एकंदरीत समाजरचनेचा विचार केला असताना असे दिसून येते की, हा समाज आजही सामाजिक न्यायनिवाड्यासाठी जातपंचायतीवर अवलंबून आहे. प्रत्येक परिसरात मानकऱ्यांची घराणी वंशपरंपरेने निश्चित झालेली आहेत. या मानकऱ्यांच्या संबंधाने असे सांगण्यात येते की, त्या त्या घराण्यातल्या पूर्वजांनी त्या त्या भागात प्रथम वसाहत केली. त्यांच्या कर्तबगारीने त्या भागाला स्वतंत्र वसाहतींचा दर्जा प्राप्त झाला. याच मंडळींनी स्वतंत्रपणे गावगाडा उभा केला व प्रसंगपरत्वे वतनदाऱ्या देखील मिळविल्या. पाटीलकीची वतने बहुधा अशाच मानकरी घराण्यांत चालत आलेली होती. निजामी राजवटीत देखील बहुसंख्य तेलुगू भागात मराठा पाटील आणि त्यातूनही पोलीस पाटील राहावा हे या समाजाच्या कर्तृत्वाचेच निदर्शक मानावे लागेल. रानावनात गावे वसवावयाची, गावगाडा संघटित करावयाचा, राजसत्तेची मानमान्यता या वसाहतींना मिळवा-वयाची आणि वतनदारीही संपादन करावयाची या सर्व गोष्टी असामान्य कर्तृत्व, चिकाटी आणि मुत्सद्देगिरी यांच्यावाचून अशक्य ठरल्या असत्या. वाडवडिलांचा मुलुख सोडून सर्वस्वी परमुलखात अशा प्रकारचे यश संपादन करणे असाधारणच म्हटले पाहिजे. या कर्तृत्वाविषयीची कृतज्ञता. सारा अरे-समाज त्या त्या घराण्यांना ‘कुलश्रेष्ठ’त्वाचा मान देऊन व्यक्त करताना दिसतो. कुलवृद्धांचा शब्द सारा समाज प्रमाण मानतो. येलकुर्ती या गावाचे उदाहरण या संदर्भात देता येण्यासारखे आहे. या संमिश्र वस्तीच्या गावात गेल्या १५-२० वर्षांत एकही प्रकरण कोर्टात गेले नाही. सारी प्रकरणे जात पंचायतीनेच निकालात काढली आणि संबंधितांनी हा निकाल प्रमाण मानलाही.

अनुक्रमणिका

### ७. वंशश्रेष्ठत्वाची जाणीव

एकेकाळी महाराष्ट्रातील खानदानी मराठा घराण्यात स्त्रियांना गोषा होता. या समाजात काही स्थळी थोड्याफार प्रमाणात ही पद्धती आढळली. शेतमजूरी करणाऱ्या स्त्रिया पाटलाच्या ओसरीला येण्यास मागेपुढे पहात होत्या. घरी नव्याने येणाऱ्या पुरुष-पाहुण्यांना जेवण वाढणे हे बहुतेक पुरुषांकडेच असते. अगदी घरात रूळलेला माणूस असेल तरच गृहस्वमिनी पाहण्यांचे ‘ताट करते.’ या वातावरणात स्त्रीगीतांचा संग्रह करणे ही फार मोठी तपश्चर्याच होती. कुलवृद्धांना इरेला घालून देखील संस्कार-गीते कष्टानेच मिळवावी लागली. एकेका गावी ३-४ वेळा तरी जावे लागले. कधी पडद्याआड टेपरेकार्डर ठेवून तर कधी ते चालू करून स्वतःच पडद्याआड बसावे लागले.

मूळ वसाहती झाल्या त्यावेळी अठरापगड जाती महाराष्ट्रातून या भागात आल्या असाव्यात असे मानण्यास आधार सापडतो. परंतु सध्या मात्र मराठा ही एकच जमात अरे-समाजात आढळते. गोंधळी जमात तुरळक प्रमाणात टिकून आहे. इतर जाती-जमाती तेलगू भाषिक जातीजमातीत कालांतराने मिसळून गेलेल्या असाव्यात. वंशश्रेष्ठत्वाचा जाणिवेतून मराठा जमात सभोवतालच्या तेलुगू समाजात मिसळून गेली नाही. वंशश्रेष्ठत्वाच्या जाणीवेतूनच तेलुगू समाजाशी मराठ्यांनी विवाहसंबंध जोडले नसावेत. मराठी भाषा या समाजाचे कित्येक शतके टिकवून धरली तीही आपले कुळ, परंपरा व भाषा इतरांच्या मानाने श्रेष्ठ आहे या अभिमानातूनच.

वंशश्रेष्ठत्वाच्या कल्पना कित्येकदा दुसऱ्या टोकाला गेलेल्या दिसल्या. आंध्रप्रदेशात अरे-मराठा ही जमात आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गात नोंदविलेली आहे. मागासवर्गीयांस उपलब्ध असलेल्या सर्व सवलती कायद्याने या जमातीस मिळू शकतात, परंतु, त्याचा लाभ घेण्याची तयारी मात्र या समाजाची नाही. ‘आम्ही थोर कुळातले आहोत. आम्ही बॅकवर्ड कसे?’ असा त्यांचा सवाल असतो. मागासवर्गीयांचे प्रमाणपत्र घेणे, निदान मुलांच्या शिक्षणासाठी, त्यांना अपमानास्पद वाटते.

घरी धनधान्यांची समृद्धी असूनही मागासवर्गीयांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सवलती हस्तगत करण्याची स्पर्धा सभोवती चालू असतानाही बाणेदार अरे-मराठा मात्र दारिद्र्याने गांजलेला असतानाही स्वतःस मागासलेला म्हणवून घेण्यात अपमान मानतो.

आपत्तीत सापडला तरी सिंहं गवत खात नसतो हेच खरे!

### ८. द्वैभाषिक अरे-मराठा

महाराष्ट्रातल्या मराठ्यांच्या मानाने अरे-मराठा एका बाबतीत संपूर्णपणे निराळा आहे. जन्मापासून नसला तरी बोलण्याची क्षमता ज्या वयात प्राप्त होते तेव्हापासून तेलुगू आणि मराठी या दोन्ही भाषा तो सारख्याच सहजतेने बोलत असतो. घरात त्याच्या कानी मराठी भाषा पडते आणि दाराबाहेर तेलुगू भाषेचे संस्कार त्याच्यावर घडतात. आपण दोन भाषा बोलतो ही जाण येण्यापूर्वीच त्याच्या मनात भाषांचे दोन कप्पे

अनुक्रमणिका

वाढीस लागतात आणि त्याबरोबरच या दोन्ही भाषांच्या प्रयोगाचे तारतम्यही. तो केवळ अंतःप्रेरणेने तेलुगू वा मराठी भाषेचा उपयोग प्रसंगानुसार करीत असतो. अरे-मराठा तेलुगू भाषा 'शिकत' नाही. मातृभाषा मराठी ही त्याच्या बाबतीत जेवढी 'सहज' असते तेवढीच तेलुगू भाषा देखील त्याने आत्मसात केलेली असते. वाढत्या वयाबरोबर त्याची या संबंधातील जाणीव वाढते ती एवढीच की, 'मऱ्हाट' भाषा आपली '**कुलभाषा**' आहे तर तेलूगू ही एक '**सहज**' भाषा आहे. मराठी ही जणू त्याच्या रक्ताचा हुंकार. म्हणूनच कित्येक शतके मराठी टापूपासून वेगळा राहूनही अरे-मराठा आपली कुलभाषा टिकवून आहे. उत्तरेत स्थायी झालेल्या काही मूळ मराठी भाषिक घराण्यांप्रमाणे तो मराठी भाषा कधीच विसरला नाही.

सामाजिक व्यवहारात गरजेपोटी अथवा प्रतिष्ठेपायी मातृभाषेव्यतिरिक्त अन्य व्यावहारिक भाषेचा स्वीकार माणूस करीत असतो. जित-जेते या नात्याने बांधलेल्या संमिश्र समाजात जेत्यांची भाषा अवगत असणे प्रतिष्ठेचे लक्षण गणले जाते. उच्चभ्रू समाजात प्रवेश मिळावा म्हणून कनिष्ट वर्ग वरिष्ठ समाजाची भाषा अनुकरणं बुद्धीतून उचलत असतो. आजच्या युगात देखील बालवयापासून मुलांवर केवळ इंग्रजी भाषेचेच संस्कार व्हावेत ही उच्चभ्रू समाजाची व त्यांचे अंधानुकरण करणाऱ्यांची धडपड चाललेली आहेच. या प्रक्रियेत मातृभाषेला नुसतेच गौण स्थान लाभते असे नव्हे तर नकळत एक प्रकारचा तिरस्कारही मातृभाषेसंबंधाने वाढीस लागतो, मातृभाषेच्या लोपात क्रमाक्रमाने या प्रवृत्तीची परिणती होत असते.

द्वैभाषिक अरेसमाजात यांपैकी काहीही घडले नाही. इंग्रजी भाषेचा संस्कार झालेला सुशिक्षित वर्ग ज्याप्रमाणे मराठी बोलताना अनेक इंग्रजी शब्द सहजगत्या वापरतो तसाही प्रकार अरे-मराठा माणसाच्या बाबतीत घडत नाही. तो मराठी बोलतो तेव्हा तेलगू शब्द वा वाक्यांश वापरणार नाही. त्याच प्रमाणे मराठीमिश्रित तेलगू भाषाही बोलताना तो आठवणार नाही. त्याच्या बोलीवर एकंदरीत तेलगू भाषेचा संस्कार अत्यल्प असावा हे भाषाशास्त्रीय दृष्ट्याही आश्चर्यकारक वाटते. [भाषाशास्त्रीय अभ्यासात या विशेषाचे अधिक विवरण आले आहे.] कित्येक शतके तेलगू भाषेच्या प्रभावक्षेत्रात नांदूनही या समाजाची मराठी बोली अविकृत स्वरुपात रहावी हा भाषाशास्त्राच्या क्षेत्रातला एक मोठाच चमत्कार गणला पाहिजे.

या चमत्काराचा उलगडा भाषाशास्त्रीय अभ्यासाने होणारा नसून सांस्कृतिक जीवनाच्या आधारानेच हे कोडे उलगडण्याची शक्यता आहे!

मराठी आणि तेलुगू या दोन्ही भाषा सारख्याच सहजतेने बोलणाऱ्या अरेसमाजाची मराठी ही मातृभाषा असली तरी तेलुगू ही त्याच्या दृष्टीने परकीय भाषा नसते. या समाजाच्या भाषाव्यवहाराची मीमांसा केवळ भाषिक अंगाने करता येणार नाही. सांस्कृतिक अंगाचा त्यावर सखोल परिणाम झालेला आहे. किंबहुना भाषिक व सांस्कृतिक अगे या समाजाच्या बाबतीत परस्परावलंबी आहेत. एखाद्या समाजाचे द्वैभाषिकत्व सांस्कृतिक दृष्ट्या लक्षात घेण्याजोगे नसते अशी भूमिका अगदी परवापर्यंत पाश्चात्य राष्ट्रांतील भाषावैज्ञानिकांनी घेतलेली होती. द्वैभाषिक समाज भाषाभ्यासाच्या दृष्टीने एकंदरीत कनिष्ठ प्रतीचा, म्हणून दखल न घेण्याच्या योग्यतेचा अशी समजूत भाषावैज्ञानिकांत प्रचलित होती. १९४० पासून मात्र या समजुतीत बदल होत गेला आहे. अमेरिका आणि आफ्रिका या दोन खंडांतील द्वैभाषिकांचे अध्ययन विद्वानांनी केले आहे. या अध्ययनाने द्वैभाषिक समाजाच्या भाषिक अंगाकडे बघण्याचा दृष्टीकोन पालटत चालला आहे. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि त्या

त्या क्षेत्रातील सांस्कृतिक परंपरा यांच्या प्रकाशात द्वैभाषिक समाजाचा अभ्यास लाभप्रद ठरतो या निर्णयावर विद्‌वान मंडळी आली आहे. या विविध अंगांनी करावयाच्या संशोधनाचे शास्त्रही नव्याने अस्तित्वात येऊ पहात आहे. या विचारमंथनातून निष्पन्न झालेले निकष अरे-समाजाचा भाषिक व सामाजिक अभ्यास करताना बरेच उपकारक ठरतात.

## ९. समाजनिष्ठ भाषाविज्ञान

कोणतीही भाषा वा बोली समाजजीवनाच्या संदर्भात अधिक समर्थपणे डोळ्यात भरते. कारण भाषा एकाकी वाढत नसते. ती विकास पावते समाजजीवनाच्या आधाराने. भाषेला आधारभूत असलेला शब्द व्यक्तिनिर्मित ध्वनिसमूहातून आकाराला येत असला तरी शब्दांना अर्थ लाभतो तो सामाजिक जीवनाच्या संदर्भातून. 'भाषा हे संस्कृतीचे अंग आहे.' किंबहुना, 'भाषा म्हणजेच संस्कृती' असे ग्रीनबर्ग म्हणतो ते याच हेतूने. कोणत्याही भाषेला मूलभूत सामाजिक परिमाण असते. इतिहास आणि संस्कृती यांच्या परंपरांनी या परिमाणाचे स्वरूप निश्चित होत असते. 'अनुभूती'चे पाठबळ नसलेले 'शब्दज्ञान' अध्यात्माच्या क्षेत्रात अगदी 'कोरडे' ठरते त्याच प्रमाणे भाषेचा वा बोलीचा केवळ वर्णनात्मक अभ्यास निरर्थक ठरण्याचा संभव अधिक. तो अर्थपूर्ण करावयाचा तर भाषा वा बोली यांचा अभ्यास त्या त्या भागाचा इतिहास, समाजजीवन आणि संस्कृती यांच्या पार्श्वभूमीवरच केला पाहिजे.

भाषा ही सांस्कृतिक जीवनाचे माध्यम असते. सांस्कृतिक जीवनातील परिवर्तन आणि अंतःप्रवाह यांचा प्रभाव भाषेवर अवश्यमेव पडत असतो. प्रत्येक सांस्कृतिक प्रवाहात एक निश्चित संघटन असते : जीवनाला नवे संदर्भ देणारे तसेच शब्दांच्या अर्थसामर्थ्यांची कक्षा वाढविणारे. या प्रक्रियेतून वाट काढणाऱ्या भावेचा केवळ (ध्वनि व रूपव्यवस्था या क्षेत्रापुरता मर्यादित) वर्णनात्मक अभ्यास झाला तर सांस्कृतिक जीवनाचा अर्थ हाती लागणार नाही. भाषेचा विकास आणि सांस्कृतिक जीवनातील अंतःप्रवाह परस्परावलंबी असल्यामुळेच शब्दांच्या अर्थाला नवे घुमारे फुटतात. परिणामतः भाषेचा केवळ वर्णनात्मक अभ्यास अपर्याप्त ठरतो.

अरे-मराठा समाज, त्याने दीर्घकाळ जतन करून ठेवलेली मराठी बोली आणि या समाजाचे द्वैभाषिकत्व यांचे यथार्थ आकलन तेलंगणातील सांस्कृतिक जीवनाच्या पार्श्वभूमीवरच योग्य रीतीने होऊ शकते. एखाद्या सलग भाषिक विभागातील भाषेचा अभ्यास करताना सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ उकलून दाखविणे फारसे कष्टाचे नसते. लिखित स्वरूपात उपलब्ध असलेले वाङ्‌मय, इतिहासास आधारभूत असलेली साधने, सांस्कृतिक जीवनातील घडामोडी इत्यादिकांच्या साहाय्याने त्या त्या भागाचे सांस्कृतिक जीवन आणि भाषा यांचा परस्पर संबंध शोधणे सोपे असते. परंतु सलग भाषिक भूखंडाच्या बाहेर वाढलेली, लिखित वाङ्‌मयाची परंपरा नसलेली आणि अन्य भाषेच्या प्रभावी वर्तुळात नांदणारी बोली अभ्यासावयाची असते तेव्हा असे अध्ययन बरेच गुंतागुंतीचे होऊन बसते. बहुसंख्याकांच्या भाषिक क्षेत्रात अगदी बेटासारखी वाढणारी अल्पसंसख्यांकांची बोली आपल्या मूळ प्रदेशातून कोणत्या परंपरा घेऊन आली आणि अन्य भाषिक क्षेत्रातील कोणत्या परंपरा तिने आत्मसात केल्या यांचे विश्लेषण करता आले नाहीतर असा अभ्यास निरर्थक ठरतो. उभय भाषिक क्षेत्रातील भाषा आणि संस्कृती यांचे सम्यक ज्ञान नसेल तर असा अभ्यास दिशाहीन ठरण्याचा धोकाही असतो.

अनुक्रमणिका

## १०. पुढील अभ्यासाची दिशा

अरे-मराठी बोली आणि अरे-मराठा समाजाचे द्वैभाषिकत्व या पार्श्वभूमीवर तपासले पाहिजे. तेलुगू भाषिकांशी बोलताना अरे-मराठा तेलुगूचा वापर करतो व स्वकीयाशी मराठीतून भाषाव्यवहार करतो हे स्वाभाविक वाटते. परंतु, स्वकीयाशी बोलताना देखील कित्येकदा तो आलटून पालटून मराठी व तेलुगू या भावातून का बोलतो, त्या मागे काही शिस्त आहे काय? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सुशिक्षित मराठी माणसाच्या संभाषणात इंग्रजीची अकारण भेसळ आढळते तशी तेलुगूची भेसळ अरे-मराठ्याच्या संभाषणात दिसून येत नाही. तो धेडगुजरी तेलुगू वा मराठी बोलणार नाही.

वैयक्तिक आणि स्वसमाजाच्या पातळीवर अरे माणूस कटाक्षाने मराठीचा वापर करतो हे सत्य आहे. परंतु, आपल्याच समाजात सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांवर विचार-विनिमय करण्याचा प्रसंग येतो तेव्हा मात्र प्रवाही तेलुगू भाषेचा तो अवलंब करतो. हे अंतःप्रेरणेने सहजगत्या घडत असले तरी या परिवर्तनाच्या मुळाशी सामाजिक जाणीव सुप्त रूपात वास करते असाच निर्वाळा देता येईल. सामाजिक जाणीव आणि सामाजिक बांधीलकी फक्त सुशिक्षित समाजात असते असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. अशिक्षित असूनही सुसंस्कृत असलेल्या समाजात देखील या जाणीवा तेवढ्याच तीव्र असतात. अनुभवाची आणि ज्ञानाची मर्यादा या जाणीवांना पडत असेलही. परंतु मूलतः जाणीवेचा अभाव नसतो. म्हणूनच अशा जाणीवा भाषेचे अंग घेऊन व्यक्त होत असतात. 'पाडुरंगाष्टक' आणि नामदेवाचा 'तू माझी हरिणी....' हा अभंग, दोन्ही भक्तिक्षेत्रातले असले तरी संस्कृत स्तोत्र आणि मराठी अभंग यांच्या भावनिक कक्षा भिन्न असतात. त्यामुळे एकच माणूस भावनिक साहचर्याच्या अनुसंधानाने स्तोत्र वा अभंग यांचे पठन करताना दिसला तरी त्याच्या भावनिक कक्षा भिन्न राहतील. लोककथा, पौराणिक कथा आणि वर्तमान वाङ्मयातील कथा एकाच माणसाच्या तोंडून ऐकल्या तरी तिहींचा भाषिक डौल भिन्न राहील त्याचप्रमाणे या कथांचे भावनात्मक आवाहन देखील विभिन्न असेल.

अरे समाजाच्या भाषाव्यवहारात देखील अशाच प्रकारची शिस्त माझ्या अनुभवास आली. वैयक्तिक जीवन आणि कौटुंबिक परिसर यांच्या कक्षा ओलांडून त्याला सामाजिक असे काही प्रकट करावयाचे असते तेव्हा तो स्वकीयांच्या समाजातही तेलुगू भाषेचा वापर करतो. सामाजिक जीवन आणि तेलुगू भाषा यांचे साहचर्य त्याच्या अंतःप्रेरणेत कुठेतरी दृढ झालेले आहे. शब्दांची वाण पडते म्हणून तो असे करतो असे नसून विशिष्ट भावना आणि विशिष्ट भाषा यांच्या (सुप्त) साहचर्याचे नकळत भान राहिल्याने विशिष्ट संदर्भात तेलुगूचा आश्रय केल्याविना आत्मप्रगटीकरण होणार नाही असे अरे-माणसास जाणवत असावे असे दिसते.

अरे-मराठी बोलीचे यथार्थ आकलन होण्यासाठी या समाजाचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन आणि या जीवनाशी निगडित असलेला भाषिक अनुबंध यांचा मागोवा आवश्यक ठरतो. भाषाशास्त्रात रूढ असलेल्या वर्णनात्मक (Descriptive) पद्धतीने हा अभ्यास सादर केला तर या बोलीचे वर्तमानकालीन स्वरूप-विशेष तेवढे स्पष्ट करता येतील. या विशेषांस आधारभूत असलेल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रेरणांचा उलगडा केवळ वर्णनात्मक अभ्यासाने होणार नाही. त्यासाठी ऐतिहासिक (historical) आणि तुलनात्मक

अनुक्रमणिका

(Camparative) भाषा विज्ञानाच्या प्रणालींचा तर आधार घ्यावाच लागेल. परंतु त्याबरोबरच समाजनिष्ठ भाषाविज्ञानाचे (socio linguistics) निकषही लक्षात घ्यावे लागतील.

अभ्यासाची ही दिशा लक्षात घेऊनच प्रथम आंध्र-महाराष्ट्र यांच्या सांस्कृतिक संबंधांचा विचार करावयाचा आहे.

∫∫∫

अनुक्रमणिका

## सामाजिक व सांस्कृतिक जीवन

**१. आंध्र-महाराष्ट्राचे शेजारसंबंध; २. आर्य, अरे आणि मराठे; ३. तेलंगणातील मराठ्याचे स्थलांतर केव्हा झाले? ४. स्थलांतर तेराव्या शतकापूर्वी; ५. पंढरीचा विठ्ठल आणि तिरुपतीचा बालाजीः ६. एकरूप होऊनही पृथगात्म; ७. 'हा तो क्षात्रधर्म'; ८. मऱ्हाटी संस्कृतीचे सातत्य; ९. वैशिष्ट्यपूर्ण वास्तुरचना; १०. लोकगीतांतील समाज- जीवन; ११. नाटकाचे वेड सुटेना! १२. मराठे : तेलुगू रंगभूमीचे आद्य शिल्पकार; १३. 'नाटक आमच्या रक्तात आहे!' १४. 'मानापमान': रंगभूमीवर आणि समाजात; १५. अरे-मराठी बरेलीची सांस्कृतिक पार्श्वभूमी.**

### १. आंध्र-महाराष्ट्राचे शेजारसंबंध

आंध्र आणि महाराष्ट्र हे एकमेकांच्या शेजारी असलेले भूखंड शालिवाहन शकाचा समान वारसा चालविणारे. सुमारे पावशतकापूर्वी सध्याच्या शासकीय सीमारेषा निश्चित होण्यापूर्वी देखील आंध्र आणि महाराष्ट्र हे दोन भूखंड अस्तित्वात होते वर्तमानकाळात मध्यवर्ती शासनाने त्यांच्या भौगोलिक सीमा निश्चित केल्या एवढेच. महाराष्ट्राचा तिसरा भाषिक शेजारी कर्नाटक. हाही शालिवाहन शकाने महाराष्ट्राशी निगडित केलेला. इतिहासकाळात आंध्र, महाराष्ट्र आणि कर्नाटक भिन्न राजवटींच्या शासनाखाली होते. या तिहींच्या सीमांतही भिन्नकाळात थोडेफार परिवर्तन झाले. तरी मूळ शेजारधर्म कायम राहिला. यादवकाळात मराठी-कानडीची बरीच देवाण-घेवाण झाल्याचे भाषाशास्त्रज्ञांनी नमूद केले आहे. परस्पर देवाणघेवाणीच्या दृष्टीने तेलुगू आणि मराठी यांच्यासंबंधी फारसा अभ्यास झालेला नसला तरी लगतचा तेलंगण पुरातन कालातील महाराष्ट्रास अपरिचित नव्हता त्याचप्रमाणे तेलुगू पंडितांना तरी मराठी भाषा व मराठी माणूस यांची ओळख नव्हती असे म्हणता येत नाही. या निकट संबंधामुळे प्रारंभ काळात बरेच तेलुगू-कानडी शब्द मराठी भाषेत रूढ झाले. अपभ्रंश भाषेतील देश्य शब्द देखील द्राविड भाषांतून 'पाहुणे' म्हणून आलेले आहेत. पुढे ते 'आपलेच घर' समजून अपभ्रंश भाषेप्रमाणेच मराठीच्या क्षेत्रातही वावरू लागले हा भाग वेगळा. या तिन्ही भाषिक भागांतील नागरिक परस्परांच्या मुलखात प्रवास करीत असत. प्रवासाची साधने आताच्या सारखी सुगम नसतानाही सांस्कृतिक निमित्तकारणाने या तिन्ही मुलखांत वर्तमान काळाइतका दुरावा नव्हता असे इतिहासावरून निदर्शनास येते.

'लीळाचरित्र' या मराठी भाषेतल्या आद्य चरित्रग्रंथात तेलंग-देशासंबंधी अनेक उल्लेख आहेत. 'कानडदेशा तेलंगदेशा न वचावे : ते विषय बहल देश : तेथ अवधूत मान्य : महाराष्ट्रीं असावें' [लीळाचरित्र, कोलते प्रत, पृ. ७०५] अशी श्री चक्रधरांची आपल्या शिष्यांना आज्ञा होती. 'गोविंदप्रभुचरित्रातं' देखील तेलंग देश व तेलंग देशीय यांचे उल्लेख आहेत. या तिन्ही भाषिक विभागांत आजही काही मर्यादेपर्यंत समान सांस्कृतिक अनुबंध आढळतात. शालिवाहन शकाव्यतिरिक्त कित्येक सामाजिक व सांस्कृतिक प्रथा या तिन्ही भागांत समान आहेत.

तेराव्या शतकातील मराठी भाषेने द्राविड शब्दांची बरीच उसनवारी केल्याचे आढळते. कालांतराने उसनवारीचे प्रमाण घटले तरी सांस्कृतिक संबंध तुटले असे मानण्याचे कारण नाही.

'आंध्रदेसी तैलकारा भेटि' झाल्याची गोष्ट स्वतः श्रीचक्रधरांनी आपल्या शिष्यांना सांगितली आहे [तत्रैव, पृ. १८]. 'ओरंगली', म्हणजे सध्याचे तेलंगणातील वरंगल, झालेल्या काही लीला लीळाचरित्रात नमूद आहेत [तत्रैव, पृ. २६ ते ३१.]. दादोस याने स्वतःसाठी एक आणि श्रीचक्रधरांसाठी एक अशा दोन वाट्या तेलंगणातून आणल्याचा वृत्तांत लीळाचरित्रात आला आहे. [तत्रैव, पृ. ६०८]. नशीब काढण्यासाठी सुद्धा काही मंडळी महाराष्ट्रातून तेलंगणात जात असावी. [तत्रैव पृ. ५६९; ६७०]. एखाद्याला हद्दपार करावे अथवा दूर पाठवून द्यावे या अर्थाने 'तेलंगदेश घालवून द्या' अशा प्रकारचा वाक्प्रचार यादवकाळात रूढ असावा. [पृ. ४०१ 'अवाघिया नेउनि घालाविया तेलंग देसीं'.]. महानुभाव वाङ्मयातील आणखी दोन निर्देश सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे वाटतात. म्हाइंभट्टा संबंधीचा पहिला निर्देश लीळाचरित्रात आला आहे, [म्हाइंभट ते सरलाचे : म्हाइंभटवासीं पांच दरिसनें वाचिली. सहावे दरिसन प्रभाकर : ते ये देसी वाचू नै ये : मग तेलगंदेसीं वाचुनि आले-लीळाचरित्र, पृ. ४२२.] दुसरा उल्लेख आहे गोविंदप्रभुचरित्रातला [गोविंदप्रभुचरित्र, सं. व. दि. कुळकर्णी ९५-९६.] .एका द्राविड भक्ताने 'आपले देसीचे वस्त्र' गोविंदप्रभूस अर्पण केले. श्रीप्रभूंनी ते स्वीकारले. त्यावर या द्राविडाने 'आपुलिया भारवा' श्रीप्रभूची स्तुती केली अशी माहिती मिळते. या उल्लेखांवरून आंध्र-महाराष्ट्रात विद्याव्यासंगाच्या दृष्टीने परस्पर संपर्क अस्तित्वात होता असा निष्कर्ष निघतो. याच संदर्भात सतराव्या शतकातला 'मननग्रंथ'ही विचारात घेण्यासारखा आहे. वेदांतपर असलेला हा गद्यग्रंथ ''यथातैलंग'' मराठी भाषेत अनुवादित करण्यात आला आहे. [गोगटे गोपाळ रावजी (सं.) विवेकसार उर्फ मननग्रंथ, धुळे, राजावाडे संशोधनमंडळ, १९३८.] सोळाव्या शतकाच्या शेवटी संत एकनाथांच्या शिष्यपरंपरेचा प्रवेश तेलंगणात झाला होता अशी माहिती मिळते. या शिष्यपरंपरेत परशुराम लिंगमूर्ती हा तेलुगू ग्रंथकार होऊन गेला. परशुराम लिंगमूर्ती हा वरंगलचा. [श्रीचक्रधरांनी वरंगलला अनेक लीळा केल्या; म्हाईभट्ट शास्त्राध्ययनासाठी वरंगललाच गेले होते. संत एकनाथांची शिष्यपरंपरा चालविणारा लिंगमूर्ती हाही वरंगलचाच. आजही अरे-समाजाची वस्ती वरंगल भागात भरपूर आहे. निदान तेराव्या शतकापासून वरंगल हे मराठी भाषिकांचे महत्त्वाचे केंद्र होते की काय?] त्याचा श्रीसीतारामांजनेयसंवादमु' हा तेलुगू ग्रंथ दत्तसंप्रदायात प्रमाण मानला जातो. इ. स. १७१० हा त्याचा काल असून त्याची गुरूपरंपरा अशी :

श्रीदत्तात्रेय—जनार्दन—एकनाथ—नरहरि महेशगरू—मांगोजी रामगुरू—कोनेरी—महादेव योगी—परशुराम लिंगमूर्ती.

## २. आर्य, अरे आणि मराठे

तेलुगू वाङ्मयात मराठे संबंधीचा प्राचीनतम निर्देश आढळतो तेराव्या-चौदाव्या शतकात रचलेल्या ग्रंथात. पालकुरी सोमनाथ या कवीच्या 'पंडित आराध्यचरित [तत्रैव, पृ. २६ ते ३१.] या ग्रंथात इतर अनेक भाषांतील गीतांबरोबरच मराठी भाषेतलेही एक गीत श्रीशैलम येथील मल्लिकार्जुनाच्या स्तुतिपर आले आहे. या गीताची भाषा मराठी असली तरी कवि मात्र 'अरे माटा' असा उल्लेख करतो. मराठी भाषेला अरे भाषा हे नाव तेराव्या शतकात आंध्रप्रदेशात प्रचलित होते असा या उल्लेखाचा अर्थ होतो. अरे भाषा बोलणारे ते अरेवाडू हे ओघाने आलेच. इ. स. १२९० च्या मैलंगी येथील शिलालेखातही मराठी भाषेचा 'अरे' याच नावाने निर्देश आला आहे. [महाराच सारस्वत, (पाचवी आवृत्ती), पृ. ६७७.]

दक्षिणेत निदान तेराव्या शतकापासून मराठी भाषा अरे भाषा या नावाने ओळखली जात होती त्या अर्थी तेराव्या शतकात मराठी भाषिक समाजाचे स्थलांतर या भागात झालेले होते हे निश्चित. या संदर्भात दुसरीही एक गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे. अरे माणसाला 'तू कोण?' असा प्रश्न तेलुगू भाषेतून केला तर उत्तर मिळते, 'अरेवाडू'. हाच प्रश्न मराठी भाषेतून केला तर मात्र 'मराटा हाव' असे उत्तर मिळते. आपण मराठे आहोत याची जाणीव अरे समाजाला असली तरी आपण 'अरेवाडू' या नावाने या भागात ओळखले जातो याचे भान त्याला असते.

'अरे' हा आर्य या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे यात शंका नाही. दक्षिणेतल्या कोणत्याही माणसाला महाराष्ट्रात 'मद्रासी' या नावाने ओळखले जाते त्याचप्रमाणे उत्तरेकडून येणारे ते आर्य या न्यायाने मराठी माणूस दक्षिणेत 'अरे' या नावाने ओळखला जात असावा. त्याची भाषा ती 'अरे माटा' तथापि, आंध्र-प्रदेशातील सर्वच मराठी भाषिकांना 'अरेवाडू' या नावाने संबोधले जात नाही. महाराष्ट्रात 'मराठा' ही संज्ञा जातिव्यवसायाचा सामुदायिक बोध करणारी आहे. त्याच प्रमाणे आंध्र प्रदेशात शेती करणारा मराठी भाषिक तेवढा 'अरेवाडू' या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रात 'मराठा' या शब्दाच्या अर्थाचा संकोच झाला तसाच आंध्र प्रदेशात अरे (आर्य) शब्दालाही संकुचित अर्थ प्राप्त झाला आहे. मराठी भाषिक क्षात्रकुलोत्पन्न शेतकरी या अर्थाने 'अरे' अथवा अरे-मराठा हा शब्द आंध्र प्रदेशात रूढ आहे. त्याची बोली ती अरे-मराठी.

तेलंगणातील अरे-मराठा हा महाराष्ट्रातील शहाण्णव कुळी मराठ्यांचा भाईबंद ठरतो हे यापूर्वी स्पष्ट केले आहे. 'अरे, हा जोशी किंवा कोल्हाटी या जमातीचा वाचक असल्याचे एका पाहणीत नमूद करण्यात आले आहे. [Enthoven, R. V., Tribes and Castes of Bombay Vol. I (1922) p.43.] पूर्वीच्या मुंबई प्रांतात या नावाची एखादी भटकी जमात असेलही तथापि, तेलंगणातील अरे जमात नावाची भटक्या जमातीत मोडत नाही, हे निश्चित. दुसऱ्या एका पाहणीत आलेले अरे जमातीचे पुढील वर्णन मात्र तेलंगणातील मराठी शेतकऱ्यांस पूर्णपणे लागू पडते [Russel, Hiralal, The Tribes and Castes of Central Provinces of India, Vol. I, (1916) P. 342.] :

> 'Are-a Cultivating Caste of Chanda district. The Caste is found in Madras and Bombay. This name is apparently used in the South as a genric term for immigrants from the North, just as people coming from the Northern India (in Central provinces) are called Pardesi. Are is synonym for Arya and is used as an equivalent of Maratha and sometimes in a still wider sense, apparently to designate an immigrant Aryan into the Dravidian country of the South. **The Ares of the Central provinces appear to be kunbis who have migrated into the Telugu Country.**" [जाड ठसा लेखकाचा]

महाराष्ट्रातून आंध्र प्रदेशात स्थलांतरित झालेला कुणबी समाज हा अरे या नावाने ओळखला जात असे असा १९१६ मधील पाहणीचा निष्कर्ष वरील उताऱ्यात आला आहे. 'The Caste and Tribes of Southern India' (1919) या ग्रंथात अरे जमाती संबंधाने पुढील माहिती मिळते :

'Are : A synonym for Marathi....In South Kanara Arya kshatri occurs as the equivalent of Are, and in the Telugu Country Are kapu refers to Marathi cultivators.... The term Arya which is a synonym of Are is used as an equivalent of Marathi.... The true Ares husband men of Marathi origin"....P.36.

स्वातंत्र्यपूर्व कालातील मुंबई, मध्यप्रांत आणि मद्रास या तीन प्रांतांतील जातिजमातींचे जे अधिकृत वृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत त्यांच्या आधाराने अरे जमातीसंबंधाने पुढील माहिती मिळते :

(२) हा समाज भटक्या जमातीपैकी असावा.
(२) आर्य या संस्कृत शब्दापासून झालेला 'अरे' हा शब्द मराठी भाषिकांचा वाचक या अर्थाने दक्षिणेत योजला जातो.
(३) अरे-समाज महाराष्ट्रातून तेलुगू प्रदेशात स्थलांतरित झालेला शेतकरी समाज आहे.

१८११ च्या Madras Census Report मध्ये कारवार, वल्लारी व अनंतपूर या भागात शेती व्यवसाय करणाऱ्या मराठी भाषिकाची नोंद आहे, साहित्यसंस्कृति मंडळाने प्रकाशित केलेल्या 'A Survey of Marathi Dialects' या मालिकेतील चौथा खंड कोचीन मधील मराठी बोलीचे स्वरूप-विवेचन करणारा असून सहाव्या खंडात कसरगोड या केरळ-कर्नाटकाच्या सरहद्दीवरील विभागातील मराठी बोलीची माहिती देण्यात आली आहे. कोचीन आणि कसरगोड हे दोन्ही भाग महाराष्ट्राबाहेर आहेत. या भागात स्थायी झालेल्या मराठी भाषिकांपैकी पांढरपेशा वर्ग कोकणी, वऱ्हाडी या बोलींतून भाषाव्यवहार करीत असतो. शेतकरी समाज मात्र आपण 'मराटे'असून आपली भाषा "मराटी" आहे असे मानतो

[(a) Ghatge A. M. **A Survey of Marathi** Dialects Vol. IV (1967)
(b) Ghatge A. M. **A Survey of Marathi Dialects** Vol. VI (1970)]. } Introduction

डॉ. घाटगे यांनी दिलेल्या माहितीच्या आधाराने पुढील निष्कर्षावर यावे लागते :

(१) तेराव्या शतकात कर्नाटकाच्या परिसरात 'अरेमातु' या नावाने मराठी भाषा ओळखली जात असे.
(२) सुमारे पाऊण शतकापूर्वीपर्यंत या भागातील मराठी भाषिक शेतकरी 'अरे' या नावाने संबोधला जाई.
(३) आता मात्र परिस्थिती बदलली असून या भागातला शेतकरी स्वतःला 'मराटो' म्हणवितो आणि आपली भाषा 'मराटी' असल्याचे सांगतो.

कोचीना, कसरगोड आणि तेलंगण या महाराष्ट्राबाहेर असलेल्या तिन्ही विभागात मराठी भाषिक शेतकऱ्यांच्या वसाहती आहेत. तेराव्या शतकात दक्षिणेत 'अरे' या नावाने ही जमात ओळखली जात असे. सुमारे अर्ध्या शतकापासून कोचीन व कसरगोड भागातील मराठी शेतकरी 'मराटो' या नावाने संबोधला जात आहे. तेलंगणातील मराठी शेतकऱ्याच्या बाबतीत तसे नामांतर आलेले दिसत नाही.

दक्षिणेत स्थलांतर करून आलेल्या सर्व भागांतील मराठी शेतकऱ्यांचे स्थलांतर केव्हा झाले? ते एकाच काळात झाले अथवा निरनिराळ्या कालखंडात? यांपैकी प्राचीनतम काळात कोणत्या भागात मराठ्यांनी स्थायी स्वरूपाची वस्ती केली? या तिन्ही भागातील शेतकऱ्यात भाषिक व सांस्कृतिक दृष्ट्या कितपत साधर्म्य आहे? असे किती तरी प्रश्न या संदर्भात उभे राहतात. या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर परिभ्रमण आणि संशोधन यांची आवश्यकता आहे. कसरगोड आणि कोचीन या भागांतील बोलींचे जे वर्णनात्मक स्वरूप उपलब्ध आहे त्यावरून अरे बोलीचे या दोन्ही भागांतील बोलींशी काही बाबतीत जवळचे नाते असल्याचे जाणवते. उच्चाराच्या काही लकबी या तिन्ही बोलीत समान आहेत. काही समान शब्द देखील या तिन्ही भाषांत आढळतात [शब्दसंग्रहात कसरगोड (क) आणि कोचीन (को) या बोलीत आढळणाऱ्या शब्दांची नोंद करण्यात आली आहे.]. दक्षिणेतील आणखी एक मराठी बोली म्हणजे तंजाऊरच्या भागात रूढ असलेली. या बोलीचा निश्चित इतिहास सांगता येण्यासारखा आहे. शहाजी राजे बंगळूरच्या सुभेदारीवर असताना दक्षिणेतल्या लहान-मोठ्या संस्थानिकांच्या 'बंदोबस्तासाठी' आपला फौजफाटा घेऊन त्यांना जावे लागे. पुढे नायकराजांचा पराभव करून व्यंकोजी राजांनी तजाऊरला मराठ्यांची गादी स्थापन केली. व्यंकोजी राजे आणि त्यांचे वंशज यांनी नायक राजांची सांस्कृतिक परंपरा चालविली त्याचप्रमाणे स्वतःच्या कर्तृत्वाने या भागातील सांस्कृतिक जीवनात नव्या परंपराही निर्माण केल्या. आजची तंजावरी मराठी बोली भोसल्यांच्या फौजेत व दरबारच्या आश्रयास असलेल्या मराठ्यांच्या बोलीची वारस आहे. सतराव्या शतकाच्या शेवटी महाराष्ट्रातून स्थलांतर करणाऱ्यांच्या वंशजांची ती बोली आहे.

### ३. तेलंगणात मराठ्यांचे स्थलांतर केव्हा झाले?

मराठी भाषा तंजाऊरच्या भागात केव्हा पोचली हे ऐतिहासिक साधनांच्या आधाराने निश्चितपणे सांगता येते. पण, कसरगोड, कोचीन आणि तेलंगण या विभागात मराठी भाषा केव्हा पोचली हे निश्चित करणारी साधने मात्र उपलब्ध नाहीत. अरे बोलीचे वर्तमान स्वरूप लक्षात घेऊन स्थलांतरच्या काळासंबंधी थोडाफार अंदाज बांधता येईल, निर्णायक मत मात्र देता येणार नाही. कालनिर्णयाचे उपोद्बलक साधन या दृष्टीने भाषेच्या स्वरूपाचा आधार घेता येईल. परंतु भाषेच्या स्वरूपावरूनच केवळ कालनिर्णय करणे योग्य होणार नाही.

प्रारंभी दिग्दर्शित केल्याप्रमाणे आंध्र-महाराष्ट्राचे सांस्कृतिक दळणवळण ऐतिहासिक काळात अगदीच नव्हते असे म्हणता येणार नाही. लीळाचरित्रावरून तेराव्या शतकातील देवाणघेवाणीची थोडीफार कल्पना करता येते. लीळाचरित्रापूर्वीचा कान्हेगाव (जि उस्मानाबाद) येथील शके ११८० चा कृष्णदेव यादवाचा (शासनकाल इ. स. १२४७ ते ११६०) शिलालेख उपलब्ध आहे. या शिलालेखातील कृष्णदेव यादवाची बिरुदावली लक्षात घेण्यासारखी आहे : बिरुदावलीत अतिशयोक्ती असते हे मान्य करूनही या शिलालेखात आलेल्या बिरुदावलीतील "तेलंगरायस्थापनाचार्य" हे पद लक्ष वेधून घेते. इ. स. १२५८ च्या सुमारास राजकारणाच्या दृष्टीने यादवराजांचा तेलंगन प्रांताशी बराच जवळचा संबंध होता असे या शिलालेखाच्या आधाराने स्पष्ट होते. पराभूत झालेल्या तेलंगनप्रांताच्या राजाला मदत करून कृष्णदेव यादवाने त्याला गादीवर बसविले अथवा पदच्युत राजाची गादीवर स्थापना केली हे समजण्यास मार्ग नाही. तथापि तेलंगणाच्या राजकारणाशी यादव राजांचे संबंध जिव्हाळ्याचे होते एवढे मात्र निश्चित. [मूळ शिलालेखातील आवश्यक भाग असा : स्वस्ति स्त्री सकु ११८० कालयुक्त संवच्छरे मार्गसिरि सुघ १० गुरौ स्त्री समाधिगत पश्चमहासब्द द्वारावती पुरवराधीश्वर विस्णुवंसोद्भव यादवकुलकलिकाभास्कर

अरिराय उरसल्ल सहितराय जंग झंप ॥०॥ गुर्जरराय वारणिक । मालवी रायप्रतिमाल्ल तेलंगरायस्थापनाचार्य राय नारायणेत्यादि समस्त राजावलि विराजमान श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ति श्री कान्हरदेव राज्योदये...'] लीळाचरित्रातील उल्लेखावरून आंध्र-महाराष्ट्राचे संबंध सांस्कृतिक पातळीवर निकटचे होते असा निष्कर्ष निघतो.

तेलुगू वाङ्मयातील 'पंडिताराध्यचरितां'चा उल्लेख पूर्वी आला आहेच. हा ग्रंथ तेराव्या शतकातला. या ग्रंथात आलेले मराठी पद मुद्दामच उद्धृत करीत आहे. ग्रंथकर्ता सोमनाथ यास मराठी भाषा बऱ्यापैकी अवगत होती हे या पदावरून सूचित होते :

**मागं राहू नको मज बापु मनत । भागवत वाटे भक्त ते मनत**
**वरलिंग गुरूलिंग शंभु जो मनत । पुखर केत्ति दूर पुर हो ते मनत**
**अखि सिरि कशास दखसील मनत ।।**
**मग महाराटाचा महादेव आमचा । गगन राजा आमचा कइलास आमचा**
**असुमराजा आमचा सुखदेव आमचा । सुखकर आपुले शुभ देऊ आमचा**
**अरे ठाव हे भक्त अपुलें लिंग । सिरिगिरि मलय्या चरम दियंता**
**सुखताल जतिमान ला खेलनाचे । मखर जे सिरिगिरि मल्लय्या राजा**
**साब्ब संताप संसार नाटकने । प्रबत मल्लय्या पुनु हर जान चित्त**
**आमचा महाभक्त अखिल सम्मेल ।।**
**शरण हे चिद्दर जवल ते मनत । वरसुख सुखीभाजु वरदु मनत ।।** [मूळ तेलुगू ग्रंथात मराठी संहिता बरीच अशुद्ध असून ती शक्य तेवढी संशोधित केली आहे.]

याच कवीचे 'वृषाधिप शतक' नावाचे एक काव्य आहे. या काव्यातही काही मराठी भाग आहे
[देववरा तुम्हीच । गुरूदेव म्हणू तरी तुम्हीच
गोसावी तरी तुम्हीच । तुमचा प्रसाद आम्हा करा ॥].

आंध्र-महाराष्ट्राच्या वाङ्मयीन देवाण-घेवाणीचा आणखी एक आधार उपलब्ध आहे. तो आहे सतराव्या शतकातला. एका यतीने 'विवेकसार' या नावाचा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिला. त्याच्या शिष्याने त्याचे तेलुगू रूपांतर केले. पुढे या तेलुगू रूपांतरवरून या ग्रंथाचा मराठी अनुवाद झाला 'विवेकसार उर्फ मननग्रंथ'. हा अनुवाद इ. स. १६६० च्या पूर्वीचा आहे. मराठी अनुवादाचा समाप्तिलेख बराच उद्बोधक आहे.

> ''इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत्वासुदेवेंद्रस्वामी जे देही विवेकसार नाम ज्याचें तो ग्रंथ संस्कृत फकिकारूप केला ॥ तेहींच परम दयाळुपणें आपुले शिष्य श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीरघुनाथेंद्रस्वामी जे यांचे हातीं संस्कृतानधिकारी ऐसे जे ब्राह्मण आणि श्रीपाद तैलंग याकारणें तैलंग भाषेकरून ग्रंथ करा म्हणून आज्ञा केली त्या उपरीं तेंहीं मनन ऐसें नाम ठेउन ग्रंथ केला ॥ या उपरीं श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीबाळकृष्णानंद सरस्वती स्वामी जे तेंही महाराष्ट्र ब्राह्मण आणि श्रीपाद संस्कृतानधिकारी त्यांस वेदांत शास्त्रानुसार अभिप्राय जो यांचे ठाईं अभिनिवेश होउन साक्षात्कारा कारणे स्वशिष्य बाळाजी अंबाजी नामक लक्ष्मेश्वराचे ग्रहस्थ

पौरुषत्रय वेदांताचे ठाईं निष्ठा आहे ज्यास त्यास आज्ञा केली त्यावरून तेहीं महाराष्ट्र ग्रंथ यथा तैलंग केला तो श्रीस्वामीच्या दयेकरून समाप्तितें पावला ॥" [विवेकसार उर्फ मननग्रंथ, पृ., १९५-९६.]

वरील विवेचनावरून आंध्र-महाराष्ट्राचे सांस्कृतिक दळणवळण व देवाण-घेवाण तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापासून चालू असल्याचे सिद्ध होत असले तरी तैलंगप्रांतात अरे-जमातीने वसाहती कोणत्या काळात केल्या याचा उलगडा मात्र होत नाही. वसाहतीचा काल सूचित करणारे एकमेव साधन उपलब्ध आहे ते म्हणजे अरेबोलीने जतन, करून ठेवलेले प्राचीन मराठीचे. विशेषतः अन्य पुराव्यांच्या अभावी केवळ भाषिक विशेषांच्या आधाराने काळाचा निर्वाळा देणे धाडसाचे ठरेल वसाहतीच्या काळाची एक विशिष्ट मर्यादा सूचित करणारे एक गमक मात्र समाज-जीवनाच्या निरीक्षणात आढळले :

अरे समाजात रूढ असलेल्या लोकगीतांत पंढरपूर आणि विठ्ठल यांचा उल्लेख करणारे एकही गीत मला आढळले नाही. आजही विठ्ठलभक्ती अरे समाजास परिचित नाही.

## ४. स्थलांतर तेराव्या शतकापूर्वी

महाराष्ट्राच्या लोक जीवनात पंढरी आणि विठोबा याचे स्थान अत्यंत जिव्हाळ्याचे आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही ग्रामीण भागात फेरफटका केला तरी तेथल्या सांस्कृतिक जीवनात विठ्ठलाचे अस्तित्व सहजगत्या जाणवते. अगदी तळागाळातल्या समाजातल्या स्त्रियांच्या तोंडी देखील 'इट्ठलांच्या' चार-दोन 'वव्या' सहज आढळतील. सतांनीच पंढरपूरला माहेर मानलेले नसून प्रपंचाच्या रामरगड्यात वावरणाऱ्या स्त्रिया देखील माहेराचा गौरव करताना पंढरपुराचा अवश्यमेव उल्लेख करतील. संतांच्या कथा-आख्यायिकांची वाण ही अगदी मागासलेल्या भागात देखील जाणवणार नाही. मराठी माणसाचे मन एवढे विठ्ठलमय झालेले असताना अरे बोलीतल्या लोकगीतांत पंढरी व विठोबा यांचा उल्लेख देखील नसावा हे खरोखरच आश्चर्यकारक वाटते ——

——पण, संशोधनाच्या दृष्टीने ते मार्गदर्शकही ठरते!

विठ्ठल हे दैवत किती पुरातन आहे या वादात न शिरता लोकजीवनाशी विठ्ठलाच्या जिव्हाळ्याचा संबंध केव्हापासून आला हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. संतज्ञानेश्वरांनी इ. स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरीची रचना केली. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा तो प्रमाण ग्रंथ. ज्ञानेश्वरीत विठ्ठलभक्तीचा साक्षात् उल्लेख नसला तरी ज्ञानेश्वर-नामदेव यांच्या अभंगाच्या द्वारे महाराष्ट्रात विठ्ठल भक्तीचा प्रसार सर्वत्र झाला. संत नामदेवांनी समाधी घेण्यापूर्वी म्हणजे इ. स. १३५० पूर्वी अठरापगड जाती वारकरी-संप्रदायाच्या ध्वजाखाली संघटित झालेल्या होत्या. इतर अनेक पथोपपंथ अस्तित्वात असूनही वारकरी पंथाने सर्वव्यापी 'महाराष्ट्र धर्माचे' महत्त्व संपादन केले होते. जनजीवनावर विठ्ठलभक्तीचे साम्राज्य ज्ञानेश्वर-नामदेवांच्या काळापासूनच सुरू झाले होते.

अशा महाराष्ट्रातून स्थलांतर करणारा अरे-मराठा विठ्ठल-भक्तीच्या बाबतीत कोरडा कसा?

या प्रश्नाचे एकच उत्तर संभवते : लोकजीवनाशी विठ्ठलभक्तीचा संबंध येण्यापूर्वीच अरे जमातीने स्थलांतर केले असावे. अगदी अलिकडचा काळ घेतला तरी तेराव्या शतकाच्या मध्यावर मराठ्यांनी तेलंगणात स्थलांतर केले असे गृहीत धरले तर ते अनैतिहासिक ठरू नये. अरेबोलीच्या स्वरूपाचेही पाठबळ या अनुमानास मिळते.

दुसऱ्या खंडात अरे-बोलीचे विस्ताराने विश्लेषण करण्यात आले आहे. या विश्लेषणात यादवकालीन मराठी भाषेपेक्षाही पुरातन असे विशेष अरे-बोलीत असल्याचे सप्रमाण प्रस्थापित करण्यात आले आहे. या निष्कर्षांच्या आधारे तेलंगणातील मराठ्यांच्या वसाहती तेराव्या शतकापूर्वी झालेल्या होत्या हे निश्चितपणे प्रस्थापित होते. त्याचप्रमाणे समाजाची बोली दहाव्या शतकातील महाराष्ट्री अपभ्रंशाला अधिक जवळची आहे हे निदर्शनास येते.

अभ्यासाचा विषय असलेली अरे-बोली अशा रीतीने सुमारे हजार वर्षांची भाषिक परंपरा परभाषिक मुलखात सांभाळत आहे असाच त्याचा अर्थ होतो. पुढच्या खंडात अरे-बोलीच्या स्वरूपाचे व तिच्या ऐतिहासिक परंपरांचे साधार विवेचन करण्यात आले आहे. विठ्ठलभक्तीच्या अभावातून निघणारे अनुमान भाषिक स्वरूपानेही कसे दृढ केले आहे हे या विवेचनातून स्पष्ट होईलच.

### ५. पंढरीचा विठ्ठल आणि तिरुपतीचा बालाजी

तथापि, काही गोष्टी कोड्यात टाकतातच त्याही या ठिकाणी नमूद केल्या पाहिजेत. पंढरीच्या आषाढी-कार्तिकीच्या वारीस महाराष्ट्राच्या कोन्या-कोपऱ्यातून भाविक वारकरी येतात तसेच इतर काही भागातूनही दिंड्या पताकासह भक्तजन येत असतात. कर्नाटक आणि आंध्र या लगतच्या प्रांतातूनही वारीला विशेषतः आषाढीला बराच समुदाय जमत असतो. आंध्र प्रदेशातील रायल सीमा भागातले तेलुगू भक्त नियमाने पंढरीची वारी करतात. कृष्णा जिल्ह्यातील मछलीपट्टण या शहरानजीक पांडुरंगाचे एक देवालयही आहे. पंढरपूरचे सर्व उत्सव या देवळात होतात. दर एकादशीला येथे मोठी यात्राही भरते. हे देवस्थान फार पुरातन नसले तरी पाऊणशे वर्षापूर्वी या स्थानाची स्थापना एका सोनारास स्वप्न-साक्षात्कार झाल्यावरून करण्यात आली असे सांगतात. आराधनेची सारी गीते तेलुगू भाषेतच असतात. या देवस्थानाच्या भक्तगणात अरे-मराठा आढळला नाही. आंध्र प्रांतात वेगवेगळ्या प्रणालीचे कीर्तन-संप्रदाय आहेत. हरिकथा या नावाने हा संप्रदाय ओळखला जातो. पूर्व किनाऱ्याच्या भागात आढळणारा एक कीर्तन संप्रदाय मराठी माणसाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरतो या संप्रदायात कीर्तनारंभी संत तुकारामांचा मराठी अभंग म्हणण्याची प्रथा आहे. संत तुकारामांच्या परंपरेपासून स्फूर्ति घेऊन हा संप्रदाय सुरू झालेला असावा. या सांप्रदायिकांना मराठी भाषेचे ज्ञान नाही. गुरुपरंपरेने चालत आलेले काही मराठी अभंग तेवढे ते गातात.

आंध्रप्रदेशात विठ्ठलोपासना अगदीच नाही असे नाही. परंतु या उपासनेच्या माहेरघराहून आलेला अरे-मराठा मात्र विठ्ठलाच्या उपासनेस परिचित असलेला आढळला नाही.

महाराष्ट्रातल्या विठ्ठलभक्तीइतकीच आंध्रप्रदेशातील लोकजीवनात दृढ मूल झालेली तिरुपतीच्या व्यंकटेशाची उपासना आहे. या उपासनेचे संस्कारही अरे-समाजावर झालेले नाहीत. तेलंगणातच नव्हे तर तेलंगणाच्या सरहद्दीवर असलेल्या मराठवाड्याच्या भागातही तिरुपतीचा बालाजी हे आराध्य दैवत मानले जाते. सरहद्दीवर असलेल्या भागात "तैलंगराज" या स्वरूपात बालाजीची भक्तिगीते लोकवाङ्मयात आढळतात. [विषयाची कल्पना देण्याच्या दृष्टीने परिशिष्टात तेलंगणाच्या सरहद्दीवरील मराठी गीतांचे संकलन देण्यात आले आहे.] कित्येक शतके तेलंगणात नांदूनही अरे-समाजाने तिरुपतीच्या बालाजीचा अंतर्भाव आपल्या दैवतांत तर केला नाहीच. पण लोकगीतांतही बालाजीच्या नावाची एकही ओवी आढळली नाही. राजन्ना, पोचम्मा, ईरन्ना आदि स्थानदेवतांचा स्वीकार या समाजाने केला. परंतु या भागातील लोकदैवत असलेला बालाजी मात्र या समाजाने दूरच ठेवला आहे. ग्रामीण भागात सभोवतालचा समाज बालाजीचा भक्त असूनही अरे- समाजावर मात व्यंकटेशाच्या उपासनेचा संस्कार झाला नाही. माझ्या पाहणीत फक्त एकच घराणे, मूळचे शैव असूनही दोन पिढ्यांपासून तिरुपतीची उपासना स्वीकारणारे आढळले.

—वंशश्रेष्ठत्वाच्या जाणीवेचा हा एक निराळा आविष्कार तर नसेल?

अरे समाजाचे मूळ प्रदेशातून स्थलांतर झाले त्या काळात महाराष्ट्रात शिवभक्ती प्रभावी होती. विठ्ठलभक्तीच्या प्रसारापूर्वी महाराष्ट्रात शिवभक्ती रूढ होती असे इतिहास सांगतो. वैजनाथ (परळी), नागनाथ (औंढा), घृष्णेश्वर (वेरुळ) ही ज्योतिर्लिंगे आणि कोल्हापूर, माहुर, तुळजापूर येथील शक्तिपीठे या परंपरेचीच साक्ष देतात. पंढरीचा विठोबा किती पुरातन आहे हा विद्वानांच्या वादाचा विषय असला तरी ज्ञानदेव-नामदेव काळात विठ्ठलभक्तीचा प्रसार महाराष्ट्रात झाला याविषयी वाद नाही. अरे समाजाच्या स्थलांतरापूर्वी महाराष्ट्रात विठ्ठलभक्ती रूढ असती तर या समाजाच्या देवता-पंचायतनात विठोबाला स्थान मिळालेच असते. आणि अरे-बोलीच्या लोकगीतांतही विठ्ठल आणि पंढरपूर यांचा अभाव जाणवला नसता.

प्रश्न असा उद्भवतो की विठ्ठलाच्या मानाने छत्रपति शिवाजी महाराज हे बरेच उत्तरकालातले. त्यांच्याविषयीचा अभिमान अरे समाजात का आढळावा? प्रश्न निरुत्तर करणारा आहे खरा. माझ्या पुढेही हा प्रश्न होताच. म्हणून अरे- वसाहतीतून प्रवास करीत असताना या समाजाला छत्रपतींची ओळख किती मर्यादेपर्यंत आहे हे तपासून पाहण्याचा प्रयत्न केला. शाळांतून शिक्षण घेतलेल्या अगदी मोजक्या व्यक्तींना इतिहासाच्या पुस्तकातून असलेली माहिती परिचयाची आहे. इतरांना स्वराज्य-स्थापनेसारख्या गोष्टींचे आकलन नाही. पुराण-कालातील रामासारखाच हाही एक राजा होऊन गेला; फरक एवढाच की तो आपल्या कुळातला होता व आपल्याप्रमाणेच तुळजाभवानीचा भक्त होता एवढेच ज्ञान सर्वसाधारण समाजात दिसून आले. तो क्षत्रिय-मराठा होता एवढ्यानेच तो अरे-समाजाच्या अभिमानाचा विषय बनला असे दिसते. शिवछत्रपतींच्या दक्षिण दिग्विजयाच्या काळात या भागात स्थिरावलेल्या काही मराठ्यांकडून 'शिवमाहात्म्य' प्रसृत झाले असावे. कथेकरी गोंधळ्यांनी पौराणिक राजांच्या धर्तीवर वर्णिलेला 'शिवप्रताप' समाजाच्या परिचयाचा असावा. कुलाभिमानाच्या भावनेने शिवछत्रपतींना लोकस्मृतीने सदैव जागृत ठेवले असावे असे दिसून येते.

अनुक्रमणिका

### ६. एकरूप होऊनही पृथगात्म

आपल्या मूळ प्रदेशातून परमुलखात स्थलांतर करणारे कित्येक समाज कालांतराने स्थानिक समाजाशी बहुधा एकरूप होत असतात 'वार' हे अन्त्यपद असलेली आडनावे धारण करणारी वऱ्हाडातील कुटुंबे, नियोगी या आडनावाची घराणी आणि इतर काही जातीजमाती तेलंगणातून महाराष्ट्रात गेलेल्या जमातींचे वंशज आहेत. या घराण्यांची आडनावे व कित्येकांचे अगदी कौटुंबिक स्वरूपाचे कुळाचार वगळले तर ही स्थलांतरित घराणी भाषा आणि समाजजीवन या दोन्ही दृष्टींनी मराठी समाजाशी एकरूप झालेली आढळतील. मराठवाड्यातील कोमटी समाज तेलंगणातून आलेला आहे. ह्या समाजाने तिरुपतीचा बालाजी हे आपले कुलदैवत कायम ठेवले आहे. इतर बाबतीत हा समाज मराठी जीवनात पार मिसळून गेला आहे. परंतु तेलुगू भाषिकांच्या समाजात कित्येक शतके नांदूनही अरे समाजाने मात्र आपली मराठी भाषा व काही मराठी कुळपरंपरा कायम ठेवल्या आहेत. भाषेबरोबरच काही सामाजिक विशेषांचे संगोपनही या समाजाने आपल्या मगदुराप्रमाणे केले आहे.

आपल्या मूळ प्रदेशातून स्थलांतर करून भिन्न भाषिक क्षेत्रात स्थायी झालेला अल्पभाषिक समाज प्रतिकूल वातावरणात आपली मूळ भाषा शतकानुशतके कायम ठेवतो तेव्हा अशा समाजाचा केवळ भाषाविषयक अभ्यास हा सर्वच दृष्टींनी अपर्याप्त ठरतो——भाषेचे स्वरूप उलगडून दाखविण्यास देखील तो अपुरा ठरतो. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि भाषाविज्ञान याच्या आधाराने अल्पभाषिक समाजाची ओळख करून घेतली तरच मूळ भाषिक भूखंडापासून दूर राहूनही अशा समाजाने टिकवून धरलेले भाषेचे स्वरूप यथार्थरीत्या समजून घेता येते. भाषा हे विचारांची देवाण-घेवाण करण्याचे साधन असले तरी ते शेवटी सांस्कृतिक जीवनाच्या प्रकटीकरणाचे माध्यम असते. म्हणूनच भाषेचे सांस्कृतिक दृष्टिकोनातून केलेले अध्ययन आणि संस्कृतीचे भाषिक आधाराने केलेले समालोचन परस्परपूरक ठरते. भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास हा एका परीने त्या त्या भाषिक समूहाच्या संस्कृतीचाही अभ्यास असतो.

अरे-मराठी बोलीचा अभ्यास करताना हा दृष्टिकोन ध्यानात ठेवणे अगत्याचे ठरते. हा समाज तेलुगू भाषिक समाजात वावरतो. व्यापक समाजजीवनाचा एक घटक या नात्याने त्याच्या द्वैभाषिकत्वाने जीवन-प्रवाहाशी आवश्यक ती तडजोड केली आहे. तरीही कौटुंबिक जीवनापुरती का असेना त्याने आपली मराठी प्रचलित ठेवली आहे. सांस्कृतिक जीवनात अरे-मराठा दोन प्रवाहांचे प्रतिनिधित्व करीत असतो. तेलंगणात रूढ असलेले सांस्कृतिक जीवन आणि मराठी भाषेच्या परंपरेने लाभलेला सांस्कृतिक वारसा. या दुसऱ्या घटकाच्या प्रभावामुळे तो एकूण समाज-जीवनाशी एकरूप होऊनही पृथगात्म राहिलेला आहे. अरे-समाजाचे सांस्कृतिक व्यक्तिमत्व तसे दुहेरी आहे : तेलंगणातील सांस्कृतिक जीवनाचा संस्कार घडलेले आणि मराठी भाषेच्या परंपरेने संस्कारित झालेले.

तेलंगणात नांदणाऱ्या मराठ्यांना आपली पृथगात्मता कायम ठेवण्याची आवश्यकता का भासली? बहुसंख्य समाजापेक्षा आपण वेगळे आहोत ही जाणीव या समाजात सातत्याने का राहिली?

अनुक्रमणिका

अर्थबळ हे कारण संभवत नाही. कारण, बहुसंख्य अरे समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकात मोडणारा आहे. शासनाची तशी मान्यताही आहे. शिक्षणाचा प्रसार आणि त्यामुळे लाभणारी प्रतिष्ठाही या समाजाच्या वाट्याला आली नाही. सुशिक्षित व सरकारी नोकरीत असलेल्या मराठ्याचे प्रमाण शेकडा एकाहूनही कमीच आहे. आपण क्षत्रिय आहोत आणि इतर समाजाच्या मानाने वांशिक श्रेष्ठत्व आपल्या वाट्यास आले आहे ही धारणाच या समाजाचे पृथगात्मत्व पोसत असावी. या समाजाच्या वसाहतीसंबंधीच्या दंतकथा आणि आख्यायिका आणि मराठ्यांनी या भागात वेळोवेळी संपादन केलेल्या वतनदाऱ्या या धारणेस पोषकच ठरल्या आहेत.

**७. 'हा तो क्षात्रधर्म!'**

सामाजिक जीवनाचा वेध घेण्यासाठी वेगवेगळ्या थरांतील भिन्न वयोमानाच्या व्यक्तींच्या मुलाखती घेत असताना 'तुम्ही आलात कोठून?' हा माझा प्रश्न बहुतेकांना वेडगळ वाटला. 'आम्ही गेलो होतो कुठं?' 'इत्तंच तर होतो' हे बहुतेकांचे ठरलेले उत्तर! महाराष्ट्रातून ही मंडळी आलेली असावी या भावनेने त्यांच्या मुलाखती-घेणारा मीच गावंढळ ठरलो! ७० ते ९० वयोमानाच्या काही व्यक्तींनीं मात्र ''या भागात अरण्य होतं, आमच्या पूर्वजांनी जंगल तोडून वसाहती केल्या-'मऱ्हाटा तितुका मेळवून' गाववाडा उभा केला आणि या वसाहतींना राजाचा कौल मिळविला'' अशी माहिती दिली. तिसऱ्या खंडात दिलेली सिद्दोजी——पिरोजीची कथा या माहितीस पोषक ठरते. विवाहविधीच्या पूर्वी देवक बांधण्याचे जे गीत परंपरेने चालत आले आहे तेही या धारणेस पुष्टी देणारे आहे. देवकाच्या दोन गीतांतील आवश्यक भाग पुढे दिला आहे. त्यावरून या धारणेची कल्पना येईल :

(१) **शेत्री (क्षत्रीय) चालला डोंगरा ।। छत्री चालला डोंगरा**
**त्यानं तोडिलं मोगरु । त्यानं तोडिले मोगरू**
**त्यानं बांविले नगरु । त्यानं बांविले नगरु ।।**

(२) **बैसई देवका, वैसइ देवका**
**देवक्या चालिला डोंगरी । देवक्या चालिला डोंगरी**
**आलं वाजतु गाजतु । तेनं पिर्थिमी लवतु**
**सूर्व्याचं घरी काजवं । सूर्व्याचं घरी काजवं**
**आलं पिर्थिमीचं राजं । आलं पिर्थिमीचं राजं ।।**

पहिल्या गीतांत क्षात्र कुलोत्पन्न (नवरदेव) डोंगरावर गेला आहे. त्याने मोगर तोडले आणि नगर बसविले असा आशय आहे. मोगर या शब्दाचे अर्थ दोन : झोपडीला आधारभूत असलेली मेढी व पायदळ. नगर वसविण्यास आवश्यक असणारी जंगलतोड त्याने केली व नंतर नगर बसविले असा एक अर्थ. शत्रूच्या पायदळाच्या नायनाट करून त्याने विजय मिळविला व त्याच स्थळी (विजयाच्या स्मरणार्थ) नवी नगरी वसविली हा दुसरा अर्थ. नगर वसविण्याचा पराक्रम त्याने केला हा मुख्यार्थ शेवटी कायम राहतोच दुसऱ्या गीतातील नवरदेवाचा 'उन्नमयतीव

अनुक्रमणिका

धरित्रीम्' असा थाट आहे. तो पृथ्वीचा राजा आहे हा भाव व्यक्त झाला आहे. या दोन्ही पारंपरिक गीतांत अरे मराठ्यांचा क्षात्रधर्म ध्वनित झाला आहे.

'निर्जन भागात वसाहती करण्यास प्रोत्साहन देऊन राजाने आपले कोषागार समृद्ध करावे' हे राजधर्माचे एक अंग कौटिल्यापासून रामचंद्रपंत अमात्यापर्यंत होऊन गेलेल्या सर्वच राजनीतीशास्त्रज्ञांनी सांगितले आहे. नव्या वसाहती करण्यास पुढे येणारांची 'सर्फराजी' करावी, वतने व इनामे देऊन त्यांचा गौरव करावा, निर्जन स्थान जागते व वसते करण्याचा हरपरीने खटाटोप करावा अशा आशयाच्या सूचना मराठ्यांच्या ऐतिहासिक कागदपत्रांतही आढळतात. या परिपाटीस अनुसरून नव्या वसाहती करण्याच्या उमेदीने प्रथम मराठे तेलंगणात आले असावेत. निर्जन स्थळ वसते करणे हे एक प्रकारचे आव्हानच असते. शौर्य, उद्यमशीलता संघटन कौशल्य आणि क्षात्रवृत्ती हे गुण अंगी असलेली माणसेच अशा प्रकारचे आव्हान स्वीकारू शकतात. जवळचे आप्तेष्ट, गणगोत यांच्यासह-वर्तमान वेगवेगळ्या काळात मराठ्यांच्या शस्त्रसज्ज तुकड्या या भागात आल्या असाव्यात. वसाहती नावारूपाला आल्यानंतर सभोवतालची स्थानिक जनताही या वसाहतीत आली असेल. तथापि मूळ वसाहतकर्त्यांची प्रतिष्ठा त्यांना लाभणे शक्यच नव्हते. वसाहती वसविणाऱ्यांच्या दृष्टीने स्थानिक जनता 'प्रजानन' त्यांचे क्षेम आणि संरक्षण हा क्षात्रधर्माचा भाग. तथापि, प्रजाजनांना बरोबरीच्या नात्याने वागविणे हे त्याकाळात विहित नव्हते. साहजिकच प्रजाजन व इतर असे भेद पडले. त्याचप्रमाणे प्रजाजनांशी सोयरसंबंध जोडणे कमीपणाचे ठरले. काळ पालटला तरी श्रेष्ठत्वाचा वारसा मात्र चालू राहिला. या श्रेष्ठत्वाचे प्रतीक मराठी भाषा ही देखील कुलधर्म व कुलपरंपरा यांच्या इतक्याच श्रद्धेने जोपासण्यात आली. एवढ्या दीर्घ कालावधीत या भागात मराठी भाषा टिकून राहिली त्याचे श्रेय क्षात्रधर्माविषयीच्या अभिमानाकडे जाते.

कालांतराने नव्या वसाहती गजबजल्या. स्थानिक जनतेची भर पडल्यामुळे वसाहतींची लोकसंख्या वाढली. मूळ वसाहतकर्ते त्यामानाने अल्पसंख्य राहिले. पण, वसाहतीच्या पाठोपाठ मराठ्यांना वतनदाऱ्या मिळाल्या आणि स्थानिक शासनाचे अधिकार एकाच जमातीकडे राहिले. त्यामुळे मराठ्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेत अंतर पडले नाही. अगदी परवापर्यंत पाटील, कुळकर्णी यांची वतने अरे कुटुंबात चालत आलेली होती. राजवटी आल्या आणि गेल्या तरी अरे-समाजाची वसाहत असलेल्या ग्रामीण भागातील शासनाची चौकट फारशी बदलली नाही. काही धोरणी राज्यकर्त्यांनी तर मराठ्यांच्या हाती शासन राहील याची हेतुपूर्वक दक्षता घेतली. स्थानिक जनतेने दंड केलेच तर आपला 'हातचा' असावा हा उद्देश अशा व्यवस्थेच्या मुळाशी नसेलच असे म्हणता येणार नाही. तथापि 'प्रजापरिपालन' हाही आपला एक कुळाचार आहे ही भावना मराठा-समाजात वास करीत असावी. ग्रामीण नेतृत्वाच्या संदर्भात शंकरराव नायकोट यांनी दिलेली मुलाखत या दृष्टीने लक्षात घेण्याजोगी वाटते.

अरे समाजाच्या वेगळेपणाला-वंशश्रेष्ठत्वाच्या जाणीवेस म्हणा——कडवेपणाचा वा दुरभिमानाचा दर्प लाभला नाही. याचे श्रेय पारंपरिक नेतृत्वाच्या सामंजस्यास दिले पाहिजे. अरे समाजाची वस्ती असलेल्या गावांत व सभोवतालच्या परिसरात तेलुगू समाज या जमातींशी सलोख्याने वागतो. समाजात इतर अनेक जाती-माती असतात त्या प्रमाणेच भिन्न भाषा असलेली ही एक जमात अशीच भावना एकंदरीत दिसून आली.

अनुक्रमणिका

अरे समाजाचे द्वैभाषिकत्व या भावनेस पोषकच ठरले आहे. या समाजाचे स्वतःचे असे 'कुलधर्म' आणि 'कुलाचार' व्यापक समाजजीवनास व एकात्मतेस बाधक न ठरता पूरकच ठरले आहेत.

**८. मऱ्हाटी संस्कृतीचे सातत्य**

या समाजाचा प्रधान व्यवसाय शेतीचा. फार थोडे शेतमालक तेही तीन-चार एकर जमिनीचे. बहुसंख्य समाजाचा निर्वाह शेतमजुरीवर होतो. अरे शेतमालक आपल्याच समाजातला माणूस शेतमजुरीवर ठेवतो. त्यांचे संबंध मजूरमालकाचे असल्याचे आढळले नाही. तेलंगणात पाण्याखालची जमीन बरीच असली तरी मराठी शेतकरी माल कोरडवाहू शेतीवर प्रसन्न असतो. ज्वारी आणि कापूस या विदर्भ मराठवाड्यात असलेल्या प्रधान पिकांवर अरे समाजाचा भारी जीव. हेतुपूर्वक असेल अथवा योगायोगानेही घडले असेल तेलंगणातील काळ्या मातीच्या टापूत अरे समाजाची वसाहत विशेषेकरून आढळते. महाराष्ट्रातून स्थलांतर करताना आपल्या प्रांतासारखी शेतजमीन पाहूनच तो स्थिरावलेला दिसतो. त्याची आजची शेतीची पद्धतीच नव्हे तर शेतीच्या आयुधांची नावे देखील मराठवाडा-वऱ्हाड या भागात रूढ असलेलीच आहेत. शेती आणि शेतकरी या भागातील मुलाखती या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत.

शेतीच्या आयुधांची परंपरागत नावे या बोलीत कायम राहिली. त्याचप्रमाणे नातेवाचक शब्द देखील बरेच मराठी भाषिक प्रदेशात रूढ असलेले आढळतात. काही प्रादेशिक संस्कार मात्र कित्येक शब्दांवर झाले आहेत. पुढे दिलेल्या यादीवरून त्याची कल्पना येईल :

**आई/माई** : माई हा शब्द अधिक प्रचलित आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात माय हा शब्द आढळतो. काही भागात आईच्या आईसाठी म्हणजे आजीसाठी 'आई' हा शब्द योजला जातो.

**आज्ञी** : मातामही व पितामही दोहींसाठी आज्ञी हा शब्द रूढ असला तरी माय-आज्ञी आणि बाप-आज्ञी असे स्पष्टीकरण बोलताना होत असते. मातामह आणि पितामह यांच्या बाबतीत देखील माय-आज्ञं, बाप-आज्ञं असे वेगळे शब्द रूढ आहेत.

**सवत्र-माई** : सावत्र आई.

**बापु** : बाप.

**थोल्ला-बापु/चुलतं** : चुलत्याच्या बाबतीत थोडाफार प्रादेशिक भेद आढळतो. तो तेलुगू भाषेत रूढ असलेल्या समानार्थक शब्दांचा परिणाम असावा. बापाच्या मोठ्या भावास चुलता न म्हणता 'थोल्ला बापु' म्हणतात तर बापाचा धाकटा भाऊ 'चुलतं' या नावाने संबोधला जातो.

**म्हेउनं /म्हेउनी** : मामाच्या मुलीशी लग्न लावण्याची प्रथा असल्याने मामेभाऊ आणि मामेबहीण व बायकोचा भाऊ आणि बायकोची बहीण या दोहोंसाठी अनुक्रमे म्हेउनं व म्हेउनी असे शब्द रूढ आहेत. (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांत देखील याच संज्ञा प्रचलित आहेत). धाकट्या भावाच्या बायकोस देखील म्हेउनीच म्हणतात.

**बनुजी** : आत्याची मुलगी/थोरली नणंद.

**भावो/बावो** : बहिणीचा नवरा व आत्याचा मुलगा यांसाठी एकच शब्द. तेलुगू भाषेत बहिणीच्या यजमानास 'बावा' ही संज्ञा आहे.

भावा (नवऱ्याचा थोरला भाऊ), देर (नवऱ्याचा धाकटा भाऊ-दीर), माऊसी (मावशी), मामा, मामी या सारखे शब्द या बोलीत व मराठीत समान आहेत, लेंकु (लेक पुत्र आणि लेंकी (कन्या) या दोहींसाठी कित्येकदा 'पुरुष-लेंकु' आणि 'बाई-लेंकु' असे प्रयोग होतात. मोगपिल्ला व आडपिल्ला या तेलुगू शब्दांचे ते अनुकार आहेत-

अरे बोलीत रूढ असलेले आप्तवाचक शब्द मराठी भाषिक समाजाशी नाते प्रस्थापित करणारे आहेत. संख्यावाचक शब्द मात्र या समाजाचे अज्ञान ध्वनित करतात. या बोलीत एक ते दहा आणि शंभर एवढेच संख्या वाचक शब्द रूढ आहेत. या अकरा आकड्याभोवती एकूण संख्या वाचक फेर धरतात. एकूण संख्या दहा व शंभर यांच्या संदर्भात सांगितली जाते. तीन दहा (३०), दोन दहा नु चार (२४), तीन संबर वरे दोन धा (३२०), धा नु सा (१६) या पद्धतीने संख्या सांगण्याची प्रथा आहे. शिक्षण तेलुगू भाषेत होत असल्याने सुशिक्षित समाज देखील अशाच संख्यावाचक शब्दांचा प्रयोग करीत असतो. या बाबतीत शिक्षित-अशिक्षित समपातळीवर आढळले.

स्वराज्य प्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार वाढलेला असला तरी या समाजापर्यंत तो अद्याप पोचला नाही. एक तर हा समाज लहानलहान गावांतून विखुरला आहे. परगावीं मुले पाठवून त्यांना शिक्षण देणे आर्थिक दृष्ट्या समाजाला परवडणारे नाही. तेलुगू भाषेचे कामचलाऊ शिक्षण काहींना मिळते. मराठी भाषा ही लेखनिविष्ट भाषा असल्याचेच समाजाच्या गावी नसल्याने या भाषेतून शिक्षण घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही!

कायदे मंडळासाठी होणाऱ्या निवडणूका आणि राजकीय पक्षांचा प्रचार यामुळे नव्या जाणीवा अलीकडे मूळ धरू लागल्या आहेत. भाषावार प्रांतरचनेने भाषेला महती प्राप्त झाली. त्यामुळे आपल्या भाषेच्या नागरिकांचा संघटित गट असावा ही जाणीव तरुण पिढीत वाढीस लागली आहे. माफक शिक्षण असलेल्या व राजकीय पक्षोपक्षांच्या कार्यात भाग घेणाऱ्या तरुणांत अरे समाजाची संघटना असली पाहिजे ही महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे. या महत्वाकांक्षेतूनच 'अरे मराठा क्षत्रिय संघमु' ही संघटना उदयास आली. या संघटनेने अद्याप बाळसे धरले नसले तरी प्रारंभ झाला आहे हे विशेष. परिशिष्टात दिलेल्या ग्रामीण नेतृत्वाच्या संदर्भातील मुलाखतीवरून या नव्या जाणीवांची कल्पना येईल.

अनुक्रमणिका

## ९. वैशिष्ट्यपूर्ण वास्तुरचना

समाजाचे निरीक्षण करताना काही ठळक गोष्टी निदर्शनास आल्या त्यांची नोंद घेतली पाहिजे. पुरुषांच्या पेहरावावरून आणि नावांवरून तेलुगू आणि मराठा वेगळा वाटत नाही. जुन्या पिढीतील स्त्रियांत नऊवारी पातळ तग धरून आहे. तरुण पिढीत मात्र सहावारी साड्यांची प्रथा आढळली. आंध्र-प्रांतात फेटा वा टोपी यांना महत्त्व नाहीच. शुभकार्यात डोक्यावर काहीतरी आवरण असावे असा दंडक तेलुगू समाजात नाही. कपाळाला भस्म वा कुंकाचा टिळा आणि खांद्यावर उत्तरीय मात्र असते. जुन्या पिढीतील अरे मराठा मात्र डोक्यावर मराठी पागोटे सांभाळून आहे. लग्न साखरपुडा अशा प्रसंगी 'अरमूरी पटका' [अरमूर हा निजामाबाद जिल्ह्यातील तालुक्याचा नाव. या गावी मराठी विणकर समाजाची वस्ती बरीच आहे. 'पटबेगर' या नावाने ओळखळे जाणारे विणकर फक्त रेशमी, अर्धरेशमी वा कृत्रिम रेशमी धाग्याचे विणकाम करतात. अरमुरी फेटे आणि साळ्या या भागात बऱ्याच प्रसिद्ध आहेत. पटवेगर समाजाची मराठी बोली बरीच निराळी आहे. हा समाज स्वतःला क्षत्रिय म्हणवितो. या समाजाच्या बोलीत गुजराती शब्द विपुल आढळतात. आंध्रात सर्वत्र पसरलेल्या व कापडाचा व्यापार करणाऱ्या भावसारांच्या मराठी बोलीहून ही अगदी भिन्न बोली पटवेगर समाज बोलतो.] तुरळक का असेना जनसमूहात उठून दिसतो.

कच्च्या बांधणीची घरे आणि वाडे यांच्या बाह्यांगावरून घर मराठ्यांचे की तेलुगू माणसाचे हे सहज ओळखता येते. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस 'देवळ्या' (कोनाड) असतील ते घर मराठ्याचे असे निश्चित समजावे. मातीच्या घरांना चुना देऊन गेरूचे पट्टे ओढलेले असतात. त्यातही 'मऱ्हाटी वळण' सहज वेगळे पडते. घरांच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूस साधारणपणे चार फूट उंचीवर गेरूच्या पट्टीवर हाताच्या बोटांनी काढलेली चुन्याची सदाफुलीच्या आकाराची रांगोळी आढळली तर ते घर हमखास मराठ्याचे असे समजावे. जुने वाडे पाहात असताना मराठवाड्यातील देशमुख-पाटलांच्या घरावरून आपण जात आहोत असा भास होतो. 'माहूर टापू' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्यातील जुन्या वाड्यांची रचना शेकडो मैल दूर असलेल्या अरे-समाजाच्या वाड्यांत आढळेल. हे वाडे साधारणपणे दुपाखी असतात. घराच्या छताची उंची मध्यभागी बरीच असते. आतल्या बाजूस फळ्या टाकून पोटमाला (आधुनिक False ceiling सारखा) तयार केलेला असतो. या माळ्यावर शेतीची अवजारे व अडगळीचे सामान ठेवलेले असते.

वाड्यांच्या अंतर्गत रचनेत देखील 'खानदानी मराठा' वळण आढळले. 'जनाना' आणि 'मर्दाना' असे घराचे दोन वेगळे व स्वतंत्रपणे वावरता येतील असे भाग पडतात. या भागांना उघडा चौक चिरेबंदी असतो. या चौकात मोरीची सोय असते. पाहुण्यांची व्यवस्था या बाहेरच्या चौकात असलेल्या दालनात करण्यात येते. प्रवेशद्वाराच्या आत दोन्ही बाजूस ओसरीसारखा भाग असतो. 'ढालज' या नावाने (कधी डहालज असाही उच्चार होतो) तो ओळखला जातो. कामकाजाच्या निमित्ताने येणारी माणसे या डहालजेतच टेकतात. गावगाड्याचे, पंचायतीचे व्यवहार येथेच होतात. काही खास माणसे आली तरच बाहेरच्या चौकात असलेल्या दालनात त्यांची ऊठबैस होते. खाशांचे खाणे-पिणे, चहापाणी या भागात होते. घरांतून पदार्थांची ने-आण पुरुषांनाच करावी लागते. घरातली स्त्री बाहेरच्या चौकात दिसणार नाही. शेजारीच नांदणाऱ्या तेलुगू स्त्रीच्या वाट्याला एवढ्या मर्यादा असल्याचे दिसून आले नाही. सुमारे ५० वर्षांपूर्वी मराठवाड्यात आणि महाराष्ट्रात देखील ग्रामीण भागात असलेली मर्यादा या भागात आजमितीस आढळते. ती इष्ट का अनिष्ट हा वाद अप्रस्तुत ठरतो. तेलंगणातील अरे समाजाने आपले परंपरागत 'मराठी वळण' सोडले नाही हे दिग्दर्शित व्हावे या हेतूने

हा उल्लेख केला. तेलुगू समाजातील वातावरणाचा या बाबतीत मराठ्यांवर काही परिणामच झालेला दिसून येत नाही. आपण इतरांहून वेगळे आहोत या जाणीवेतूनच हा वेगळेपणा आलेला दिसतो.

### १०. लोकगीतांतील समाज-जीवन

तिसऱ्या खंडात उपलब्ध लोकगीतांचा संग्रह दिलेला आहे. मौखिक परंपरेने चालत आलेला तो एक सांस्कृतिक वारसाच मानावा लागेल. ही गीते प्रामुख्याने स्त्रीसमाजातूनच मिळालेली असली तरी अरे समाजाचे सांस्कृतिक जीवन आणि स्वभाववैशिष्ट्य यांच्या दृष्टीने ती मोलाची ठरतात. अभ्यासाच्या सोईच्या दृष्टीने या गीतांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. या वर्गीकरणातील कौटुंबिक जीवन महाराष्ट्रातील ग्रामीण कौटुंबिक जीवनापेक्षा निराळे नाही महाराष्ट्रातील लोकगीतांतून आढळणारे समाजजीवन आणि वास्तव समाजजीवन यांत वाढत्या वेगाने फरक पडत चालला आहे. सामाजिक स्थित्यंतर महाराष्ट्रात बऱ्याच वेगाने घडून येत आहे तेलंगणातील ग्रामीण भाग सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने अगदी मंद गतीने वाटचाल करीत आहे. त्यामुळे अरे बोलीतील लोकगीतांत आढळणारे समाजजीवन आणि वास्तव जीवन यात फारसे अंतर पडलेले नाही. या समाजाच्या बाबतीत काळ खरोखरच थांबला की काय अशी शंका येते.

कित्येक शतकांच्या सहजीवनानंतर देखील अरे समाजाच्या विवाहपद्धतीवर तेलुगू विवाहपद्धतीचा थोडा देखील संस्कार झाला नाही याचे आश्चर्य वाटते. या संस्काराचे अगदी जवळून निरीक्षण करता यावे या हेतूने एका मांडवघरी मी दोन-तीन दिवस मुक्काम केला होता. विवाहाच्या पूर्वतयारीपासून ते मुलीची सासरी पाठवणी होईपर्यंत मी वऱ्हाडी मंडळीत होतो. अगदी प्रारंभीचा आंबील-मांडव, देवता आवाहन, हळद, तेलवण, वारल्याचे मुहूर्त, मांडवाचे मुहूर्त, देवक, वाशिंग आणि विवाहविधी या टप्प्यांतून जात असताना माझ्या लहानपणी पाहिलेल्या ऐस-पैस चार दिवसांच्या लग्न सोहळ्याचा पुन्हा अनुभव घेतल्याचे सारखे जाणवत होते. मांडवातील गाणी, रुसणे फुगणे, उखाणे अगदी सारे सारखेच! सर्वावर कळस म्हणजे तांदुळ पिकवणाऱ्या प्रदेशात जोंधळ्याच्या अक्षता म्हणजे मराठी मुलखाची निशाणीच!

काही बाबतीत मात्र वेगळेपण जाणवले. लग्नाच्या अगोदरच्या दिवशी वराने शुचिर्भुत होऊन कुऱ्हाड घेऊन शेतात जावयाचे असते. पळसाचे वा सौंदडीचे जोड त्याने स्वतः तोडून त्याचा तिवईवजा चौरंग करावयाचा असते. या चौरंगावर सारे मंगलविधी करावयाचे असतात. या समारंभास ‘पाट बांधणे’ असे नाव आहे. वधूच्या घरी ‘पाट बांधन्या’ची कामगिरी मुलीच्या थोरल्या भावाकडे असते. देवकाचा विधि असाच निराळा वाटला. लग्नाच्या दिवशी सकाळी मंगलस्नान झाल्यावर देवक बांधण्याचा कार्यक्रम असतो नवी वस्त्रे परिधान केलेल्या नवरदेवाच्या खांद्यावर कुऱ्हाड असते. त्याच्या खांद्यावर असलेल्या उपरण्यात नवरदेवाची बहीण दहीभाताची ‘शिदोरी’ बांधत तदनंतर देवकाचे गीत गात गात नवरदेव मिरवणुकीने मारुतीच्या पारावर जातो. देवाला ‘पानपुडा’ अर्पण केल्यानंतर नवरदेवाला मारुतीच्या साक्षीने बाशिंग बांधण्यात येते. नंतर तो मिरवत मिरवत लग्नमंडपात येतो. तेथे विवाह-समारंभ पार पडतो. आज दिसणारे हे वेगळे विधी कदाचित् कधी काळी महाराष्ट्रात रूढ असतीलही मुळ मुलखात लुप्त झालेले हे विधी अरे समाजात तसेच कायम राहिले असतीलही.

अनुक्रमणिका

लग्न कोणाच्याही घरी असले तरी सर्व समाजाने ते आपल्याच घरचे कार्य समजून हातभार लावावयाचा ही प्रथा आजही या भागात आहे. ‘जाय जुई सेवंती’ हे गीत या दृष्टीने बरेच बोलके ठरते. या गीतात केवळ भूतकाल नमूद झालेला नसून ते वर्तमानकालीन वास्तव आहे. स्त्रीचे सासर-माहेर, वैवाहिक जीवनातील समृद्धी, भावाचा जिव्हाळा, नणंद-भावजयांचे कडू-गोड संबंध हे विषयही लोकगीतांच्या संग्रहात आले आहेत. डोहाळ्याची गीते खूपच काव्यमय आहेत. अगदी पहिल्या महिन्यापासून ते प्रसृतीपर्यंत पहिलटकरणीचे कौतुक कोणत्या प्रकारे होते याची या गीतावरून कल्पना येईल. एक अधिक काव्यमय गीत मला घेता आले नाही. ‘आमन्चं मनसुं तुमी काइजाना’ या चार ओळीच्या समग्र गीताचा आशय गीताच्या प्रास्तविकात दिला आहे. गर्भवतीच्या जिवाची घालमेल आणि तिची दिनचर्या यांचं सुंदर वर्णन या गीतात मुळात आले आहे. एकाच भगिनीस हे गीत पाठ होते. तिने ते प्रथम मुक्तपणे म्हटले. परंतु ध्वनिमुद्रणाच्या प्रसंगी मात्र गीतातील शब्द नायिकेच्या गळ्यातच राहिले.

अशा रीतीने बरेचसे स्त्रीजीवन अव्यक्त राहिलेले असले तरी जे व्यक्त झाले त्याच्या आधारे स्त्रीजीवनाचे अनेक पैलू स्पष्ट झाले आहेत. स्फुट गीतांतून हा आविष्कार अधिक समर्थपणे झाला आहे.

पुत्र-जन्मोत्सवाची गीते एका वेगळ्या दिशेने विचार करावयास लावणारी आहेत. हा समाज शिवभक्त. तरीही डोहाळे, बारसे आदींच्या निमित्ताने प्रतिमा आल्या आहेत त्या देवकी व बाळकृष्ण यांच्या. संतांच्या बाळक्रीडेच्या अभंगांना एखादी लोकपरंपरा आधारभूत होती की काय? पुत्रजन्मोत्सवाच्या अरे-बोलीतील गीतांत आणि संतांच्या बाळक्रीडेच्या अभंगात या एकाच परंपरेचे भिन्न पडसाद तर पडले नसतील? ‘पाळण्या’तून येणारा बाळकृष्ण विचारप्रवृत्त करतो एवढे मात्र खरे!

**११. नाटकाचे वेड सुटेना!**

मराठ्यांनी या भागात नव्या वसाहती केल्या त्या काळात अठरापगड जातींचे लोक बरोबर होते अशी माहिती वृद्धांकडून मिळते. प्रत्यक्षात क्षत्रियाखेरीज अन्य मराठी भाषिक जमाती आढळल्या नाहीत. अपवाद गोंधळी आणि खाटिक या जमातींचा. गोंधळी तुरळक आढळले. खाटिक जमातीचे पंच हैदराबादी स्थायी झाले आहेत. तेलंगणाच्या भ्रमणात खाटिक जमातीची (मराठी भाषिक) एकही व्यक्ती मला भेटली नाही. बारा बलुतेदारांपैकी सारेच तेलुगू भाषेत आहेत. तेलुगू ब्राह्मण अरे-समाजाचे पौरोहित्य करतात. पण, विधिविधानात तसा या पुरोहितांचा फारसा संबंधही पोचत नाही. अरे समाजाची लहान मोठी कार्ये संस्कार-गीतांच्याच द्वारे प्रामुख्याने होतात. कुलवृद्ध अथवा कुलवृद्धा हीच अशा प्रसंगी ‘पौरोहित्य’ करीत असते. लग्न समारंभात मानकऱ्यांना टिळे लावणे, मंगळ अक्षता टाकणे आणि मंगळसूत्र बांधण्याच्या वेळी मंत्रोच्चार करणे या पलीकडे पुरोहिताची फारशी गरज नसते.

वसाहतकर्त्यांबरोबर अठरापगड मराठी भाषिक आले असे मानले तर क्षत्रियाखेरीज इतर जाती-जमाती (ब्राह्मणवर्गासह) कालांतराने स्थानिक तेलुगू भाषिक जातिजमातीत विलीन झाल्या असण्याची शक्यता आहे. आंध्र प्रदेशात ‘नियोगी’ या नावाने ओळखली जाणारी ब्राह्मणांची एक जात आहे. या जमातीतल्या दोघांनी आपल्या आजोबा-पंजोबांच्या काळातले मोडीत लिहिलेले कागदपत्र आपल्या घरात असल्याचे सांगितले. या

नियोगी जमातीपैकी काही घराणी तरी एके काळी मराठी भाषिक असावीत. करीमनगर जिल्ह्यांतील मंथनी या गावाच्या आसपास असलेल्या वैदिक ब्राह्मणांत मराठी व तेलुगू या दोन्ही भाषा बोलणारी मंडळी आहे. नव्या पिढीत मात्र द्वैभाषिकत्व लोपले आहे. महाराष्ट्राच्या सरहद्दीवर नसलेल्या या भागातच तेवढी द्वैभाषिक ब्राह्मण घराण्यांची परंपरा का असावी हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

गोंधळी हे अरे क्षत्रियांच्या आश्रयाने राहतात. आज ही जमात शेतमजूरी करीत असली तरी त्यांचा मूळ व्यवसाय कथेकऱ्यांचा. भारताच्या सूतसंस्कृतीचे हे या युगातील वारसदार. क्षत्रिय कुळातील मंडळींना कथा-आख्याने सांगून सांस्कृतिक जीवनाचे सातत्य राखण्याची कामगिरी आतापर्यंत या जमातीने चोखपणे बजावली आहे. या जमातीची कथाकथन शैली फारच आकर्षक असते. सर्वसाधारण अरे माणसांच्या बोलीच्या तुलनेने गोंधळ्यांच्या कथा-कथनाच्या भाषेत संस्कृत शब्दांचे प्रमाण अधिक वाटले. लोककथांप्रमाणेच रामायण, महाभारत, पुराणे यांतील कथा हे गोंधळी फार प्रभावीपणाने सांगतात. या कथांत रात्र कशी संपते हे उमगतही नाही. त्यांच्या भाषेला एक प्रकारची लय आहे, गोडवा आहे. कथा-कथनाचे कार्यक्रम साधारणपणे श्रावण महिन्यात व चैत्राच्या पहिल्या पंधरवाड्यात होत असतात. तिसऱ्या खंडातील दोन कथा वरंगल नजिक महालिंगम्पल्ली या गावच्या उपेंद्र या नावाच्या गोंधळ्याकडून ऐकल्या. त्याच्याच शब्दात त्या जशाच्या तशा दिल्या आहेत. भाषिक अभ्यासाच्या दृष्टीने या कथांना महत्त्व आहेच. समाजजीवन समजून घेण्यास देखील त्या उपकारक ठरतील यात शंका नाही.

गोंधळ्यांनी आपल्या साथीदारांसह सांगितलेल्या कथा ही एक पर्वणीच असते. रात्रीची जेवणी झाल्यानंतर सुरू होणारा हा कार्यक्रम उजाडेपर्यंत चालतो. कार्यक्रम ज्यांनी ठरविलेला असतो त्यांच्याकडून गोंधळ्यांना ‘भिक्षा’ (बिदागी) मिळते. गोंधळी हा बहुश्रुत असतो. तसाच तो जात्याच नटही. कथेतील आरोह-अवरोह, पात्रांचे संवाद, त्यांच्या भावभावना यांचा प्रत्यक्ष प्रत्यय आणून देण्याचे कसब त्याच्या वाणीत आणि अभिनय कलेत असते. ही जमात कथा आख्याने ‘लावते’ त्याप्रमाणेच मराठी संगीत नाटकांचे प्रयोगही करीत असते. लोककथा किंवा रामायण-महाभारतातील आख्याने यांवर नाटकाची कथानके आधारलेली असतात. उपेंद्र या गोंधळ्याने अशा नाटकांसाठी रचलेली काही पदे या खंडास जोडलेल्या परिशिष्टात दिली आहेत. या पदांपैकी काही पदे मी ऐकली आहेत. प्रयत्न करून देखील गोंधळ्यांची नाटके पाहण्याचा योग आला नाही. त्यांची नाटके फाल्गुन वद्य अमावस्येपासून (कालामवस्या) चैत्री पौर्णिमेच्या कालात होतात. या दिवसात शेतमजूरी करणारे गोंधळी शेतीच्या कामातून मोकळे असतात. म्हणून गावोगाव विखुरलेले ‘नट’ नाटक सादर करू शकतात. इतर ऋतूत नाट्यप्रयोग करणे गोंधळ्यांना आणि गावकऱ्यांनाही परवडत नाही.

मराठी माणसाच्या रक्तात भिनलेले नाटकाचे वेड महाराष्ट्राशी संबंध तुटलेला असतानाही कायम राहिले आहे हे विशेष. या वेडातूनच आंध्रप्रदेशातील तेलुगू रंगभूमीची अभिमानास्पद परंपरा मराठी माणसाने निर्माण केली आहे हेही तेवढेच गौरवास्पद आहे!

अनुक्रमणिका

## १२. मराठे : तेलुगू रंगभूमीचे आद्य शिल्पकार

तेलगू रंगभूमीचा पाया मराठ्यांनी घातला हे आश्चर्यकारक वाटले तरी ऐतिहासिक सत्य आहे. गेली शंभर वर्षे अरे समाजाने तेलुगू रंगभूमीची सेवा निष्ठेने केली आहे. आंध्रप्रदेशाच्या सांस्कृतिक जीवनास मराठ्यांनी दिलेली ही फार मोलाची जोड आहे. आज प्रामुख्याने ग्रामीण भागात संगीत तेलुगू नाटकांचे प्रयोग करणाऱ्या ‘सुरभी नाटक मंडळ्या’ सुमारे साठाच्या वर आहेत. वर्षाकाल वगळता आंध्रप्रदेशात उगवणारी एकही रात्र मराठी नटांनी सादर केलेला तेलुगू नाटकाचा प्रयोग पाहिल्याशिवाय मावळत नाही.

सुमारे शंभर वर्षांपूर्वी संजीवराव बनारसे यांनी उदरनिर्वाहाचे साधन या नात्याने कळसुत्री बाहुल्यांचे खेळ सुरू केले. कुटुंबाची विपन्नावस्था दूर होते न होते तोच संजीवरावांचे निधन झाले आणि त्यांच्या कुटुंबीयांना उदर निर्वाहासाठी पुन्हा दारोदार फिरावे लागले! सुदैवाने कुटुंबातील सर्वांचाच कंठ चांगला होता. रस्त्यावर गाणी गावून लोकरंजन करणाऱ्या या कुटुंबास थोडे स्थैर्य आल्यावर पेद्द रामय्या या संजीवरावाच्या कर्तबगार पुत्राने आपल्या पित्याच्या काळातील कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचे पुनरुज्जीवन केले. रामय्याने चामड्याच्या बाहुल्या आकर्षक रंग देऊन तयार केल्या आणि संगीताच्या पार्श्वभूमीवर रामायण-महाभारतातील आख्यानांचे प्रयोग या बाहुल्यांच्या द्वारे सादर केले. एक सुवर्णसंधी लवकरच बनारसे कुटुंबाचे घर शोधत आली:

कडप्पा जिल्ह्यातील सुरभी या गावी रामी रेडी व बेसा रेडी या देशमुख- बंधूंच्या आश्रयाने बनारसे कुटुंब रहात असे. त्यांच्या मुलीचे लग्न ठरले आपल्या आश्रयदात्यांच्या घरी निघालेल्या कार्यात काही तरी नवे करून दाखववे या ईर्षेने पेद्द रामय्या बनारसे यांनी आपल्या कुटुंबीय मंडळीसह ‘कीचकवध’ या नाटकाचा प्रयोग लग्नप्रसंगी केला. त्याची पत्नी पापाबाई हिने या नाटकात सैरंध्रीची भूमिका केली. तेलुगू रंगभूमीची प्राणप्रतिष्ठा मराठी नटांनी केली त्याचप्रमाणे या रंगभूमीवरील पहिली स्त्रीनटी पापाबाई ही देखील मराठी स्त्री. इ. स. १८८५ च्या सुमारास हे नाटक रंगभूमीवर आले!

ही नाटके लोकप्रिय होऊ लागली. परगावांची निमंत्रणे मिळू लागली, व्याप वाढला. एकट्या बनारसे कुटुंबाला हा व्याप झेपेना. त्यांनी इतरांना या कार्यात सहभागी करून घेतले. प्रथम अवटी कुटुंब नाटक मंडळीत सामील झाले. नंतर आले शिंदे; पुढे रेखनदार आणि पवारही या मंडळीत सामील झाले. सर्व अरे क्षत्रिय कुळातले. घरात भाषा मराठी, रंगभूमीवर तेलुगू. नाटकांचा दर्जा वाढावा आणि तेलुगू भाषेचे उच्चार सुधारावेत या हेतूने सुरभी नाटक मंडळीने तेलुगू पंडित नोकरीस ठेवले. शास्त्रोक्त गायनाचे शिक्षण देणारे गायन मास्तरही मंडळीत आले. काही तेलुगू पंडित प्रतिभावान् होते. त्यांनी रामायण-महाभारतातील काही आख्यानांवर नवा साज चढवून नाटके लिहिली व ती या नट-नटींकडून बसवून घेतली. पंडितांची भाषा संस्कृत-प्रचुर. त्या काळात तेलुगू वाङ्मयात संस्कृतप्रचुर तेलुगू भाषेस व संस्कृतातील प्रबंध शैलीस प्रतिष्ठा होती. पंडितांची प्रौढ भाषा व भारदस्त शैली मातृभाषा मराठी असलेल्या व तेलुगू-लेखन-वाचनाचा गंधही नसलेल्या नट-नटींनी कौशल्याने पेलून धरली. तोच अधिकार या नटसंचाने संगीताचा क्षेत्रात देखील संपादन केला. संस्कृतप्रचुर आणि दीर्घ समास असलेली तेलुगू भाषा रंगभूमीवर नट सहजपणे बोलत असताना पाहिले व ऐकले म्हणजे खरोखरच आश्चर्य वाटते.

नटसंचाच्या परिश्रमाचे फळ म्हणून सुरभि नाटक मंडळ्यांना लोकप्रियतेबरोबरच प्रतिष्ठाही लाभली. स्वतःला प्रतिष्ठित समजणारे मराठे मात्र सोयरसंबंधाच्या बाबतीत 'नाटकवाल्यां'पासून फटकून राहू लागले! संकटासारखा सोयरा नसतो. नाटक मंडळीत सामील झालेल्या घराण्यांनी. आपसात विवाहसंबंध घडवून आणले. व्यवसायाचे नाते विवाहबंधाने अधिक रूढ झाले. नाटक मंडळी हा एक कौटुंबिक व्यवसाय बनला. घराण्याची व नाट्य व्यवसायाची अडचण भागविण्याच्या निमित्ताने एक पुरुषाने चार चार स्त्रियांशी-लग्न करणे ही इष्टापत्ती ठरली!

या परंपरेत गोविंदराव बनारसे ही फारच मोठी कर्तबगार व्यक्ती होऊन गेली. श्रेष्ठ गायक-नट म्हणून त्यांची कीर्ती होतीच. परंतु कुशाल संघटक असल्याने नाटक मंडळीतील विविध घटकांत सौहार्द कायम ठेवण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले पहिल्या महायुद्धापूर्वी गोविंदराव आपल्या नाटक मंडळीसह ब्रह्मदेशातही जाऊन आले. नाटकांवर त्यांना पैसा बराच मिळाला. लोककल्याणासाठी त्यांनी खर्चही बराच केला. [या खंडास जोडलेल्या परिशिष्टात गोविंदरावांची एक कन्या शांताबाई यांची मुलाखत आणि माझ्या रोजनिशीतील एक उतारा दिला आहे. पूरक माहिती म्हणून या साधनांचा उपयोग व्हावा.] गोविंदरावांना दहा मुली होत्या. आज अस्तित्वात असलेल्या सुरभि नाटक मंडळ्यांपैकी अधिकांश गोविंदरावांच्या मुलींच्या विस्ताराच्या मालकीच्या आहेत. काही बनारसे कुटुंबांच्या मालकीच्या एकूण बनारसे आणि अवटी या दोन घराण्यांतील मंडळी रंगभूमीच्या आघाडीवर आहेत. अवटी घराण्यातील बाबाराव यांचा १९८२ सालातील श्रेष्ठ नट म्हणून आंध्रशासनाने सुवर्णपदक देऊन गौरव केला आहे. मलेशियात झालेल्या तेलुगू विश्व संमेलनासाठी बाबाराव अवटी यांना आंध्रशासनाने सरकारी खर्चाने पाठविले होते.

मराठी माणसाला महाराष्ट्राबाहेर एवढा मान मिळावा हे अभिमानास्पदच. रेड्डीबंधूंच्या आश्रयासाठी 'कीचकवध' या नाटकाचा पहिला प्रयोग ज्या सुरभी गावी झाला त्या गावाचे नाव ही घराणी कृतज्ञतापूर्वक आपल्या आडनावापूर्वी लावतात. 'सुरभीवाले' या नावानेच आंध्रप्रदेशात या नाटक मंडळ्या ओळखल्या जातात. या ग्रामनामांवर आता दंत-कथा आख्यायिका यांची पुटे चढू लागली आहेत. 'सुरभी म्हणजे कामधेनू. आमच्या पूर्वजांनी आम्हाला रंगभूमीरूपी कामुधेनू दिली आहे' असे सुरभी या नावाचे स्पष्टीकरण कानांवर पडते एखाद्या दैवताची निष्ठेने उपासना करावी त्याप्रमाणे ही मंडळी रंगभूमीची निष्ठेने सेवा करीत आली आहे. गेले शतकभर ही अखंड उपासना चालू आहे.

या नाट्य साहित्याचा व्यवसाय हा एक प्रकारचा 'गृहोद्योग' असतो. पडदे रंगवण्यापासून ते पट उभारणीपर्यंत सर्व लहान-मोठी कामे घरातील सर्व-मंडळी करीत असतात. रात्री इंद्राची भूमिका करणारा नट दिवसा कुदळ-फावडे घेऊन रंगपीठ तयार करताना आढळून येईल तर लक्ष्मीच्या भूमिकेत रंगभूमीवर येणारी नटी दिवसा केरसूणी घेऊन नाट्यगृह झाडत असलेली दिसेल. या नाटकमंडळ्यांजवळ स्वतःचा असा स्वयंपूर्ण लवाजमा असतो. नाटके गावोगाव करावयाची म्हणजे बरोबर सारे साहित्य असणे अनिवार्य. प्रत्येक गावी वस्ती नजीक थोडाफार उतार असलेले शेत निवडून त्यावर नाट्यगृह उभारले जाते. कुंपणापासून ते छतापर्यंत पत्र्यांचा वापर होतो. खुर्च्या, बाक आणि पीठ हे प्रेक्षागृहाचे तीन वर्ग. समोरच्या बाजूस जमीन खोदून खुर्च्या मांडल्या जातात. थोड्या अधिक उंचीवर बाक आणि उंचवट्यावर पीठ असते. रंगमंच खूपच विस्तीर्ण असतो. बहुतेक नाटकात ट्रिकसीन असतात. ते दाखविता यावेत याकरिता पडद्याबरोबरच विजेच्या यंत्राच्या योगाने चालणारी दृश्यांची व्यवस्था असते. प्रत्येक कंपनीत वीजनिर्मिती करणारे यंत्र असते. त्यामुळे ट्रिकसीन वा

प्रकाश-योजना यांच्या बाबतीत नाटक मंडळी स्थानिक वीजपुरवठ्यावर अवलंबून रहात नाही. रंगभूमीवरील विंगांचा उपयोग अनेक प्रकारे होतो : काम नसणारांचे विश्रांती स्थान, मुलांचे शयनगृह, प्रपंचाचे सामान असलेले कोठी घर आणि आजारी-दुर्बलांचे शुश्रूषागृह. नाटक संपल्यावर सर्व मंडळी रंगभूमीवरच झोपतात. माणसे एकाच परिवारातली असल्याने संकोचाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**१३. नाटक आमच्या रक्तात आहे!**

रात्री दहाच्या सुमारास नाट्यप्रयोग सुरू होतो. सकाळी तीन ते चार पर्यंत तो चालतो. त्यानंतर सर्वांची जेवणी ती सकाळपर्यंत चालतात. नाट्य प्रयोग एक दिवस आड सोडून होतो. नाटके बहुतेक पौराणिक वा त्या त्या भागातील साधुसंतांच्या चरित्रावर आधारलेली असतात. एकाच कथानकावर आधारलेली नाटके भिन्न मंडळ्या आपापल्या परींनी सादर करीत असतात. अवटी व बनारसे या दोन घराण्यांच्या पद्धती भिन्न आहेत. ट्रिकसीन्सवर भर सर्वांचाच असला तरी अवटी घराण्याचे संगीत अधिक प्रगत वाटते. सुरभी नाटकांत दाक्षिणात्य संगीतास स्थान नाही हे विशेष. नाटकात येणारे श्लोक मात्र दाक्षिणात्य पद्धतीने म्हटले जातात. अन्य पदे हिंदुस्थानी संगीताच्या रागदारीत असतात. पेश करण्याचा ढंग जुन्या पिढीतील नाट्यसंगीताच्या धर्तीचा.

तेलुगू रंगभूमीवर मराठी नट पौराणिक नाटकाचा घाट व मराठी नाट्यसंगीताचा घाट घेऊन कसा उभा राहिला हा अधिक संशोधनाचा विषय आहे. रंगभूमीचा तुलनात्मक अभ्यास आणि तेलंगणाबाहेरील अरे मराठा माझ्या कार्यक्षेत्रात बसत नसल्या कारणाने सांस्कृतिक जीवनाचे आवश्यक संदर्भ दिग्दर्शित करण्यापुरताच आढावा या ठिकाणी दिला आहे.

सत्यवान् सावित्री या नाटकात सावित्रीची भूमिका करणाऱ्या नटीला ‘अभिनयाचे शिक्षण कुठे घेतले?’ असा प्रश्न विचारला तेव्हा तिने असा काही अभिनय केला की, प्रश्न विचारण्यात माझाच मूर्खपणा झाला हे जाणवले. नंतर तिने स्वतःला सावरले. ‘अहो आम्ही जन्मलो रंगभूमीवर. वयाच्या मानाने पडतील त्या भूमिका आम्ही केल्या. मोठ्या माणसांच्या भूमिका लक्ष देऊन मनात साठवून ठेवल्या. झाले. काही वर्षांपूर्वी माझी आत्या (आणि सासू देखील) ही भूमिका करीत असे. आता अत्या सत्यवानाच्या आईची भूमिका करते मी सावित्रीची!” (आमची प्रश्नोत्तरे तेलुगू भाषेत झाली हे या ठिकाणी लक्षात ठेवावे).

‘ब्रह्मम्‌गारुचरितम्’ या नाटकात संताची भूमिका करणाऱ्या प्रकाशराव अवटी यांना नाटक संपल्याबरोबर भेटलो. त्यांची गाणी मला फार आवडली म्हणून त्यांचे अभिनंदन केले. या नाटकातील संगीत सौभद्रातील संगीतावर बेतलेले वाटले. काही तेलुगू पदांशी जुळणारी मराठी गाणी मी माझ्या अपुऱ्या तयारीनिशी त्यांना म्हणून दाखविली. माणूस नंतर बराच खुलला. मेकअप उतरण्याचे काम चालू ठेवीतच प्रकाशराव माझ्याशी बोलू लागले. [सुरभी नाटक मंडळ्यांत मेकअपमन नसतो. प्रत्येकाने स्वतःचा मेक-अप करावयाचा असतो.] सकाळी सात वाजले तरी आम्ही बोलतच होतो. [तेलुगू संगीत नाटकाच्या विकासातील एका महत्त्वाच्या टप्प्याचा उल्लेख या ठिकाणी करणे आवश्यक वाटते. १९२५ ते ३५ या कालखंडात तेलुगू रंगभूमीवर बालगंधर्वांची गायकी आणि त्यांची अभिनय शैली यांचा बराच प्रभाव पडला होता. मराठी नाटकांतील संगीताचे प्रतिध्वनी या कालखंडातील तेलुगू रंगभूमीवर उमटले होते. कै. स्थानम् नरसिंहराव हे स्त्रीभुमिकेमुळे गाजलेले नट कित्येक वर्षे बालगंधर्वांच्या नाटक मंडळीत पडतील ती कामे करून विद्यार्जन करीत होते. गंधर्वांची गायकी आणि

अभिनयशैली त्यांनी उचलली आणि आपल्या प्रांतात परतल्यावर तेलुगू रंगभूमीवरून तीचा प्रसार त्यांनी केला. त्यांच्या मृत्यूपूर्वी ३-४ वर्षे त्यांच्या सहवासात काही दिवस घालविण्याचा योग आला. बालगंधर्वांच्या कितीतरी आठवणी त्यांनी अत्यंत कृतज्ञताभावाने कथन केल्या. संगीत नाटक अकादमीने त्यांचा 'गौरव केल्यानंतर एका जाहीर सभेत त्यांनी बालगंधर्वांचे ऋण कृतज्ञतापूर्वक मान्य केले. आणखी एका प्रसंगी नाट्यविषयक परिसंवादात त्यांच्या बरोबर सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले होते.

१९३५ साली नरसिंहराव आणि बलभद्रपात्रडू सूर्गराव यांनी पुढाकार घेऊन आंध्रप्रदेशातील सागर किनाऱ्याच्या काही भागात बालगंधर्वांच्या नाटकांचे काही प्रयोग घडवून आणले होते.

——तत्पूर्वीच गंधर्वांच्या मराठी नाट्यगीताच्या चाली तेलुगू नाटकात सुप्रतिष्ठित झाल्या होत्या.]

'आपल्या रक्ताच्या थेंबाथेंबात नाटक भिनले आहे' असे धनाजी शिंदे सहज बोलून गेले त्यात अतिशयोक्ती मुळीच वाटली नाही. [मायाबाजार नाटकातील घटोत्कच ही धनाजीची ख्याती असलेली भूमिका.] काही कर्ती मंडळी वगळली तर नाटक मंडळीत असणाऱ्या इतरांना नाटकाबाहेरचे विश्वच अपरिचित आहे. 'नाटक जगणे' म्हणजे नेमके काय असते हे नाटकमंडळीच्या बिऱ्हाडी काही दिवस काढल्यानंतर लक्षात येते. बालगंधर्व प्रेक्षकांना 'माय-बापहो!' या नावाने संबोधीत ही मंडळी प्रेक्षकांना देवता-स्वरूप मानते. नाटकाचा नेटका प्रयोग ही या देवतेची आराधना. नाटक चालू असताना काही गर्भिणी पडद्यामागेच प्रसूत होतात. कित्येकदा आजारी माणसे गतप्राण होतात. प्रेत तसेच झाकण्यात येते. नाट्यप्रयोग संपतो आणि नंतरच आप्तांचा शोक आणि मृताची उत्तरक्रिया यांना अवकाश मिळतो.

सुरभी नाटक मंडळ्यांतील नटनटींशी बोलताना अभावितपणे दुसरेही नाट्य घडत होते. आम्ही सारे मराठी भाषिक असूनही तेलगूच्या माध्यमातून एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. अरेबोली समजून घेण्याइतकी माझी प्रगती झालेली असली तरी या बोलीतून बोलणीचा सराव मला नव्हता. शिकलेल्या माणसापुढे आपल्या मराठीचे प्रदर्शन कशाला या जाणीवेत अवघड भूमिका सहजपणे रंगविणारे नट-नटी मराठीतून बोलण्यास मात्र कचरत होते!

## १४. 'मानापमान' : रंगभूमीवर आणि समाजात

सुरभी नाटक मंडळीची परंपरा एका शतकाची असली तरी तत्पूर्वी देखील 'विधिनाटक' वा 'भाण' यांच्या धर्तीवर नाट्यप्रयोग करणारे मराठी भाषिक आंध्रप्रदेशात निदान तेराव्या शतकात तरी होते असे मानता येईल एवढा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे. 'भाण्डीरभाषा व्याकरण' या नावाचा संस्कृत ग्रंथ वा. गो. परांजपे यांना उपलब्ध झाला होता. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या तीन अंकातून (मार्च १९२८, सप्टेंबर १९२८ आणि मार्च १९३०) या ग्रंथाचा काही भाग मराठी अनुवादासह त्यांनी प्रकाशित केला. या ग्रंथात भाण्डीर भाषेच्या व्याकरणाची संस्कृत सूत्रे असून त्यावर संस्कृत भाष्यही आहे. भाष्यकार तेलुगू भाषिक असल्याने त्याने भाण्डीर भाषेतील शब्दांना पर्यायी तेलुगू शब्द दिले आहेत. ज्या भाषेचे व्याकरण या ग्रंथात आले आहे ती मराठीच होती यात शंका नाही. इतकेच नव्हे तर उच्चारप्रक्रिये संबंधाने जे नियम या व्याकरणात आले आहेत ते अरेबोलीस लागू पडणारे आहेत. [या संबंधीचे अधिक विवेचन दुसऱ्या खंडात आले आहे.] संस्कृत पंडितांनी गीताच्या मराठी भाषेचे व्याकरण लिहावे, त्यावर संस्कृत भाष्य देखील उपलब्ध असावे याचा अर्थ एवढाच की, तेराव्या शतकात मराठी गीते गाणारे भाण्डीर आणि त्यांची गीते व त्या गीतांची भाषा यांना आंध्रप्रदेशात प्रतिष्ठा होती. याच गीत-नाट्यकारांची परंपरा सुरभी नाटक मंडळ्या चालविणाऱ्या मराठ्यांनी चालविली नसेल कशावरून?



दि. १८-४-८४ रोजी महालिंगम्‌पल्ली (जि. वरंगल) येथे झालेल्या नाट्यप्रयोगातले हे एक दृश्य.
छाया : वाहिनी फोटो स्टुडिओ वरंगल डॉ. जगन्नाथम् पवार यांच्या सौजन्याने.

अनुक्रमणिका

“बालावंती” या लोककथेवर आधारलेल्या नाटकातील एक दृश्य –

तिसऱ्या खंडात समाविष्ट केलेल्या ‘राजा अंबरसिंगाची गोष्ट’ या कथेवर हे नाटक आधारलेले आहे.

– राजा अमरसिंह पुत्रप्राप्तीसाठी तपश्चर्येस निघण्यापूर्वी प्रधानाकडे राज्यकारभाराची सूत्रे सोपवितो तो प्रसंग वरील चित्रात आहे.

– मध्यभागी राजा (आसनस्थ) एका बाजूस प्रधान व दुसऱ्या बाजूस विदूषक. विदूषकाची भूमिका नाटकात महत्त्वाची आहे. झालेला व घडणारा कथाभाग तेलुगू भाषेतून तो प्रेक्षकांना सांगतो व हे सांगत असताना हुजऱ्याचीही भूमिका विदूषक करीत असतो.

अनुक्रमणिका

अधिक संशोधनानंतर ही अखंडता प्रस्थापित झाली तर 'आंध्रप्रदेशात' गीत-नाट्याचे प्रवर्तन मराठ्यांनी तेराव्या शतकात केले अशी नोंद इतिहासाला करावी लागेल आणि सुरभी नाटक मंडळी आकस्मिक उदयास आली असे मानण्याची आपत्ती येणार नाही. अधिक संशोधन अर्थात् आवश्यक आहे.

लोकरंजनाचे व्रत दीर्घकाल आचरणाऱ्या नटांच्या अंतःकरणात काही वेदना असतात याचा प्रत्यय १९८२ च्या शिवजयंतीच्या निमित्ताने रघुनाथपल्ली येथे भरलेल्या मेळाव्यात आला. या मेळाव्यापूर्वी एकच महिना आंध्रशासनाने श्रेष्ठ नट म्हणून बाबाराव अवटी यांचा गौरव केला होता. या मेळाव्यासाठी त्यांना बोलावण्यात आले होते. श्यामसुंदर अवटी, शिंदे, रेखनदार इत्यादी अनेक नाटक मंडळ्यांचे मालकही या मेळाव्यास उपस्थित होते. मेळावा सामाजिक स्वरूपाचा होता. आपसात चर्चा मराठीत आणि व्यासपीठावरील भाषणे मात्र तेलुगू भाषेतून असा हा द्वैभाषिक मेळावा होता. बाबाराव अवटी यांचा सत्कार या मेळाव्यात झाला. सत्काराला उत्तर देताना बाबारावांनी तेलुगूतून जे भाषण केले ते अंतःकरणाला पीळ पाडणारे होते. आशय थोडक्यात असाः

> "आपण मराठे आहोत याचा आपणां सर्वांना सारखाच अभिमान आहे. या मेळाव्याने केलेल्या गौरवावरून आमच्या कलेबद्दल सर्वांना अभिमान वाटतो हे स्पष्ट आहे. जिवाचे रान करून नाट्यशारदेची सेवा करणाऱ्या आम्हां नाटक्यांचे आपण कौतुक करता. आम्हाला संतोष वाटतो. प्रेक्षकांची समाधानाची पावती हा नटाचा खरा गौरव..? परंतु आम्ही मराठे आहोत या नात्याने मराठा समाज आम्हाला किती जवळ करतो? आमच्या तोंडावरचे रंग पुसल्यानंतर जे आम्ही उरतो त्यांना अरे समाजात स्थान आहे काय?... काळ बदलत चालला आहे. परंपरागत व्यवसाय आम्हा सर्वांनाच रोजगार देऊ शकेल असे दिसत नाही. आमच्यातले काही शिक्षण घेत आहेत. कित्येकांनी इतर व्यवसाय सुरू केले आहेत. या व्यवसायातले व बाहेरचे आम्ही 'नाटके' असलो तरी अरेकुळातले आहोत. समाज आम्हाला तशी मान्यता देणार आहे काय? नट हा शेवटी माणूसच असतो. त्यालाही इतरांप्रमाणे प्रतिष्ठित सामाजिक जीवन जगण्याची महत्त्वाकांक्षा असते. आमची ही महत्त्वाकांक्षा पूर्ण होणार आहे काय?"
>
> 'पळस गेला कोकणा, तीन पाने चुकेनात' असे म्हणतात ते खोटे नाही. महाराष्ट्रात गेल्या पिढीतील थोर नटांनाही अशाच जळत्या पायघड्यांवरून प्रवास करावा लागला होता!

**१५. अरे मराठी बोलीची सांस्कृतिक पार्श्वभूमी**

परप्रांतात मराठी भाषिक टापूची सरहद्द जवळपास नसताना तेलुगू भाषिक प्रदेशात बेटे उगवल्यासारखी अरे समाजाची तुरळक वस्ती हाच मुळी कुतुहलाचा विषय. या वसाहती तेराव्या शतकाच्या पूर्वी झालेल्या असाव्यात असा आनुषंगिक साधनांच्या आधारे निघणारा निष्कर्ष. तेराव्या शतकाच्या पूर्वी नक्की

कोणत्या काळात ही मराठी कुटुंबे या भागात आली याचा अंदाज बांधता येत नाही. अरे समाजाच्या स्थलांतराची कमाल कालरेषा तेराव्या शतकाच्या अलिकडे ओढता येत नाही एवढे मात्र निश्चित. या कालानंतर मराठी भाषिक प्रदेशाशी या समाजाचे संबंधच आले नाहीत. याचा अर्थ असा की, या समाजाचे जे ‘मराठीपण’ आहे ते तेराव्या शतकाच्या आसपासचे, कदाचित् पूर्वीचेही. या कालानंतर आजच्या महाराष्ट्रात व पूर्वीच्या मराठीभाषी मुलखात स्थित्यंतरे अनेक झाली. राजकीय, सामाजिक, धार्मिक स्थित्यंतरांप्रमाणेच मराठी भाषेचे रंगरूप देखील बदलत गेले. म्हणून प्राचीन मराठी वाङ्मय आज विद्वानांच्या मध्यस्तीने समजून घ्यावे लागते. लीळाचरित्र आणि पंचोपाख्यान या ग्रंथावर, देखील संपादनाचे संस्कार करावे लागतात, टिप्पणी लिहावी लागते व शब्दकोश देखील जोडावा लागतो. बखरी तशा अलिकडच्या. पण, टीका-टिप्पणीची पाठराखणी नसेल तर त्याही उलगडत नाहीत. कारण उघड आहे. काळ बदलला. भाषेतले संदर्भ बदलले. वर्तमान जीवनात नवे संकेत निर्माण झाले. भाषा मराठी असली तरी ती नित्याच्या परिपाठीची नसल्यामुळे ‘समजून’ घ्यावी लागते.

प्रमाण मराठी भाषेशी परिचित असलेल्यांच्या आकलन क्षेत्रात प्रादेशिक बोली आणून द्यावयाची म्हणजे देखील अशाच प्रकारचा खटाटोप करावा लागतो. प्रदेशभेदाने भाषेला निराळे वळण लागते त्याचप्रमाणे रूढ शब्दांनाही नवे अर्थ प्राप्त होतात. सामाजिक संदर्भ बदलल्यामुळे शब्दांच्या अर्थात परिवर्तन घडते. प्रमाण भाषेत रूढ नसलेले शब्द प्रादेशिक बोलीत प्रचलित असतात. त्यांचे अर्थ व त्या सर्वांवरून सूचित होणारे सामाजिक व सांस्कृतिक संकेत यांचाही धांडोळा घ्यावा लागतो. बदललेली उच्चार-प्रक्रिया देखील समजून घ्यावी लागते. अपरिचित वाटणाऱ्या बाबींचा उकल एकदा झाला म्हणजे कोणती बोली दुर्गम न राहता सुबोध होते.

मराठी भाषेचे कालसापेक्ष स्वरूप समजून घेणे हे प्राचीन मराठी वाङ्मयाच्या आकलनास जेवढे आवश्यक असते तेवढे प्रादेशिक बोलींच्या बाबतीत नसते. काळाच्या ओघात भाषेचा जो स्वाभाविक विकास झालेला असतो तो बऱ्याच अंशाने प्रादेशिक बोलींच्या वाट्यास येत असतोच. त्यामुळे प्रादेशिक बोलींच्या अभ्यासात कालाचे अंतर कमी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अरे बोली मात्र या नियमास अपवाद ठरते. मराठी भाषेच्या स्वाभाविक विकासक्रमाच्या प्रक्रियेपासून ही बोली अलिप्त राहिली आहे. ही बोली तेलुगू भाषेच्या वर्तुळात कित्येक शतके नांदत आहे. तिचे सामाजिक संदर्भ तेलुगूभाषिकांच्या समाजजीवनाशी निगडित झालेले आहेत. मूळ स्थलांतराच्या काळातील सांस्कृतिक बंध व सामाजिक अनुबंध काळाच्या ओघात सारेच्या सारे कायम राहिले असतील असे मानणे अशास्त्रीय ठरेल. तथापि, परंपरा तशा चिवट असतात त्या सहजासहजी नामशेष होत नाहीत. हे लक्षात ठेवून या बोलीने मूळ परंपरेतले काय टिकविले व कोणते नव्याने जोडले याचा विवेक आवश्यक ठरतो. याचा अर्थ असा की मराठी भाषेच्या इतर प्रादेशिक बोलींच्या धर्तीवर अरे बोलीचा अभ्यास अपुरा ठरेल. या बोलीच्या अध्ययनात कालाचे अंतर तोडावे लागणार आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र आणि तेलंगण या भागांतील सांस्कृतिक जीवनाचाही तुलनात्मक विचार टाळता येणार नाही.

ही अडचण लक्षात घेऊनच अरे समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा विचार प्रथम सादर करण्यात आला आहे. भाषा समाजाचे हृद्‌गत व्यक्त करते त्याचप्रमाणे सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंबही भाषेवर उमटलेले असते ही बोली कोणत्या स्वरूपाच्या वातावरणात नांदली, वाढली हे समजून घेतल्याविना या बोलीत आढळणाऱ्या

विशेषांचा योग्य तो उलगडा होणार नाही. बोलीच्या अभ्यासासाठी जी साधनसामग्री गोळा करण्यात आली तिच्याच आधाराने सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेण्यात आला आहे.

याच साधन-सामग्रीच्या आधाराने अरे बोलीच्या स्वरूप-विशेषांचे विवेचन पुढच्या खंडात करावयाचे आहे.

∫∫∫

अनुक्रमणिका

# प रि शि ष्टे

अरे-मराठा समाजाच्या समाज रचनेची आणि सामाजिक जीवनाची कल्पना यावी या हेतूने निरनिराळ्या थरांतील आणि वयोगटांतील व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतीत जवळपास प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या घराण्यातील मूळ पुरुषाच्या स्थलांतरासंबंधाने प्रश्न केला असताना समाधानकारक उत्तरे मिळू शकली नाहीत. लष्करातील कामगिरीच्या निमित्ताने काही घराणी या भागात आली असावीत असे काहीचे म्हणणे. जंगले तोडून नव्या वसाहती करण्याच्या महत्त्वाकांक्षेनेही काही घराणी या भागात आली असावीत. देवकाच्या विधीतील काही आचारावरून नव्या वसाहतीच्या निमित्ताने महाराष्ट्रातून या जमातीने स्थलांतर केले असावे या समजुतीस दुजोरा मिळतो.

**परिशिष्ट क्र. १ मध्ये या समाजात रूढ असलेली काही आडनावे दिली आहेत. त्यावरून निदान काही घराण्यांच्या तरी महाराष्ट्रातील शहाण्णवकुळी जमातींशी संबंध पोचतो असे निश्चित विधान करता येते.**

**परिशिष्ट क्र. २ मधील मुलाखतींतून पुढील विषयांसंबंधाने माहिती मिळते :**

**(१) वसाहत आणि कुलपरंपरा; (२) वतन, वतनदार आणि गावगाडा; (३) शेती आणि शेतकरी; (४) ग्रामीण नेतृत्व; (५) सुशिक्षित समाज; (६) स्त्रियांच्या मुलाखतीवरून स्त्रीजीवनाची थोडीफार कल्पना येते तर (७) मऱ्हाटी बाणा अद्यापही या समाजात कसा जागृत आहे याची कल्पना एका मुलाखतीवरून येईल.**

**परिशिष्ट क्र. ३ सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. तेलंगण प्रांताच्या सरहद्दीवर आढळणाऱ्या मराठी लोकगीतांत आंध्रप्रदेशाचे दैवत तिरुपतीचा व्यंकटेश याचे वर्णन आढळेल. ते देण्याचा हेतू हा की, अरे-मराठी बोलीत व्यंकटेशाचा उल्लेख आढळत नाही; त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे कुलदैवत विठोबाचाही निर्देश नाही. वसाहत काळाच्या दृष्टीने व्यंकटेश व विठ्ठल यांचे अभाव सूचक ठरतात.**

**परिशिष्ट क्र. ४ मध्ये परप्रांतात असूनही नाटकाचे वेड या समाजात कसे कायम राहिले याची माहिती 'सुरभी नाटकमंडळी'च्या निमित्ताने मिळते. याच परिशिष्टाच्या उत्तरार्धात स्थानिक कवींनी रचलेली काही नाट्यगीते दिली आहेत.**

**अरे-मराठा जमातीच्या सामाजिक जीवनाशी संबंधित असलेली पूरक माहिती या परिशिष्टांतून मिळावी.**

अनुक्रमणिका

## अरे-मराठा समाजात रूढ असलेली काही आडनावे

आडनावांची ही यादी संपूर्ण नाही. मला भेटलेल्या व्यक्तींचीच आडनावे तेवढी मी नोंदविली आहेत. काही नावे गावांच्या नावावरून आलेली दिसतात. काही नावे महाराष्ट्रातल्या शहाण्णव-कुळी मराठ्यांच्या आडनावांच्या नामावलीत आढळतात. अशी नावे नक्षत्र चिन्हांकित केली आहेत.

अडकने, अनगांये†, अंबरडे, अंबीरे, अमदापुरम्, आंग्रे†, आंगरके (आंग्रे?), आसरे, इंगोले (इंगळे)†, इटकला, इवरे (हिवरे)†, उसरीपल्ली,

कदम†, कलवारे, कवडे†, कॅवलपुरे, कारले, कुसुंबे, कोले (कोल्हे?)†, कोल्लुरे, कोडगाने;

खवले, खातबांडे, गाजलपारी, गायकवाड†, गुजले, गुंड, गुवरे, गुजरे (गुर्जर-गुजर)†, गुवाडे, गोवाडे, धुबिरे;

चल्लनगारी, चव्हान†, चेटपल्ले, चेन्नूर, चेलके (शेळके, सोलंखे)†, चौगुले†, जगताप†, जाधव†, जंबलपुरे, जोनकले,

टिवाले, टेंकाले, डुकरे†, डेंग, डोंगले, ढवले†, तिम्मापुरे, तुमरपल्ले, थोडगामे, दुंबाळा, दुर्गनाल, देवकार, धाबाडे (दाभाडे)†, धोने, नखाते, नागलान, नागुरले, नायकोट, निकम, निटूर,

पकडे, पॅमार (पवार†), पॅमार (परमार), पुलीमारी (वाघमारे), पेटमिंदे, पेन्तूर, पोरावरम् (पवार?†) फेरारे, बडे, बालापूर, बॉंसले (भोसले?)†, बॉंसरे, बास्वल, बासलपट्टी, बुरगुले, बेंबरे, बोरगाये, भलेराव, भालेराव†, भुताला, भुस्सार, मचलपाडे, मर्जे, मदनपेटे, मॉंसपल्ले मोकडे, मोकिले, मोगडे, मोगे, मोताला, मोरताल, मोरे†, मोर्तले, येरवल, येस्के, रनपिसे, रामपूरे, लकडे, लडे, लासने, लिंगम्पल्ली, वडवे, वज्रेपल्ले, वज्रे, व्हलगे, सिर्ले (शिरोळे), सांडेसारे, सिकलमने, सिंदे (शिंदे)†, सुकने, सुराव (सुर्वे)†, सेलार (शेलार)†, हनमकुंडे, हवदापूर, हंबीरे, हंगीरजे, हिंगे,

२

## सामाजिक जीवन

### (१) वसाहत आणि कुलपरंपरा

तेलंगणात मराठ्यांच्या वसाहती नक्की केव्हा झाल्या याची माहिती मिळविण्याचा प्रयत्न अनेकांकडून करण्यात आला. समाजातील शिष्टवर्ग, वतनदार, आणि वृद्धमंडळी यांच्या मुलाखती यासंबंधात घेण्यात आल्या. फारसे निर्णायक असे हाती लागले नाही. जे हाती लागले त्यात दोन धारा आढळतात :

१. डोंगरात वसाहती करण्याच्या निमित्ताने मराठे या भागात आले. जंगल तोडून त्यांनी वसाहती केल्या. त्यांची भरभराट पाहून मूळ स्थानी असलेले त्यांचे आप्तेष्ट या भागात आले अथवा स्थायी झालेल्यांनी त्यांना बोलावून आणले व आपापली गावे वसविली.

२. लष्कराच्यासमवेत मराठेलोक वेळोवेळी या भागात आले. लष्करी कामगिरी संपल्यावर त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी जंगलाच्या भागात घरे-दारे बांधून शेती करण्यास या शिपायांना उत्तेजन दिले.

मराठ्यांच्या वसाहती या दोन्ही कारणांनी या भागात झाल्या असाव्या. लग्नाच्या प्रसंगी देवकाचे जे गीत या समाजात रूढ आहे त्यावरून या जमातीचे क्षत्रियत्व जसे स्पष्ट होते त्याचप्रमाणे डोंगर तोडून नगर वसविण्याची परंपराही या गीतात आढळते.

अरेपल्ली या गावचे ८० वर्षे वयाचे इरन्ना, येलकुर्ती येथील नव्वदीच्या घरात असलेले रामय्या आणि नरसक्कापल्ली येथील सत्तरीच्या घरात असलेले पिरोजी यांच्या मुलाखती या दृष्टीने महत्त्वाच्या वाटतील.

इरन्ना कॅमलपुरे (वय वर्षे ८०)

आमी इरन्ना कॅमलपुऱ्यांचे. आट धा वर्स वयसु. आमी कन्दी आल्ते मन्ता? आमी गेल्तो कुट्टं? इत्तंच हातु. आमचा बापु इत्तंचु. दादा इत्तंचु. सरे इत्तं ऱ्हातं. मजा आज्ञा मुत्तोजी. मऱ्हाट कुल. पूर्व सटवाजी नु संबाजी पुंजवाट करित्तं. इतंचु ऱ्हातं. शिल्र्यांचे कुडा इत्तं आल्ते. तेला होइना मनुनु शिल्र्यानं आमांसु वतनवाडी देलं. शिल्र्याचं पाटिलपन आमी करतं. तुमच्यानं काय होइलं ते करावं मुनु कौलास कोटातुनु लेवून आणलं.

अनुक्रमणिका

सटवाजीच पोराला संबरू, लिंबाला दोनु संबरू, अस्सं केल्तं. ऱ्हावं, फावं मुनु देल्तं. भुई वठीतु घालुनु देल्तं. पटवारी भुई केल्तं. भुई इनागु लेहून देल्तं. शिर्ल्याचे काय की पलीकडं गेलं. तित्तंचु गावु बांदुनु घेंटलं सेतकरी यावं जावं मुनु सनदु करूनु देलं. डुंगरू काडुनु इकडं भरा गालुनु आठ काटी रान तय्यार केल्तं. इकडं पुंजवाट करावं मुनु सेतकरी बलविलं. इत्तं धा वाय डंगरू. कल्पं कल्पं गाई-पाड्या होइळ्ळं. ढोराकडं अंबुस पाड्याचं पोर ऱ्हातं. दिवस निगाया ढोरं निगायचं, दिसू जाता यायाचं. वान्सरं गाई कल्पं कल्पं येयाचं. तम्मा डुंगरान्तु वाग आलं. पोराइनं मनुनु घेंटलं अरे डुंगरान्तु वाग हाय मनुनु गेलं. तित्तं आमचं पूर्व उपदेस केलं. पूर्व मनुजे मागले मानसं. आन्की गावु वाडावं मुनु बोल्ळं. तम्मापुन आमी बसतु बसतु होइळ्ळं. गावु थोल्ळं जालं. सारं गावु चौकोटु केलं. आमचं गाव नाव-निसान जालं.

मागलं वडिलु मानुस केलं. कुट्टं होऊनु मऱ्हाट मानलं गोला केलं. सिवारानं भाइर निगाल्यानं मानस आनायचं. ये संबाजी, लिंबावी मोतं मऱ्हाट मानूस इत्तं आनायचं. डालु, तेल्वारू घेउनु भाइर निगायचं. जंगल हिंडून फायाचं. सिकार करायाचं. ढोर खाऊ न्हाई मनुनु सिकार. सिकारू खायाचा न्हाई. आमी मऱ्हाट लोक मांसं खाऊ न्हाई. ये मुलखातलं खाइना. आमच अरेपल्लीचं मऱ्हाट खाइना. मांसु खाइना, कल्लू पीना. ये कलालू लमडीचं म्हारांसु मांगासु सिउनु घेंटं. आमी चौकट ऱ्हातं. तुर्कासु येऊ दीना, कलालांसु सिऊ दीना. आमी मऱ्हाट आमीच ऱ्हावं.

मऱ्हाट कराचं सनु मन्ता? आखाडी पुनिव, तर्वाता नागरपंचमी, तित्तुनु बद्दलाचा सनु, बइलाला अंगुल घालाया, बोटु लावाया, मैशाचं घूर लावाया, सारं काम न करू, बदकाम्मा, दसरा, दिवली, संक्राती, सिवरात्री, कालामस्या, येसनु कुडा करतुमु.

आमचं रोजचं कामु. उजियेडतांचु बइलु नेतामु. कंचातु नेवुनु पोटभर चारितामु. घरी खाया घेतामु. आऊतु धरितामु. दोन पारा पत्तोर उरकितामु. दोन पारा घरी जाऊन स्नानालु करूनु भाकरी डोइवरे घेउनु जातुम्. अदगुरू काय की दोन पारा जालेवरी बइलू बांदितामु, ते गवत खातं. आमी भाकरी खातुम्. तर्वाता दीसु जाइपोत्तोरू आऊतु धरितामु. आतर्वाता मशीला चारा घेउनु घरी येतुम्. घरी बाइकांसु भकरी करित्तं. आमी खाउनु घेटुम्.

पाउसान्तु बी पेरनं कसाया मन्ता? आउतु धरतामु, तासु वडितामु. टिपन धरितामु, टिपनीसु तीनु पनी लावतामु तास वडितामु. गंगाकडं वडितामु. पुडं काय ते टिपन जातं. आउताला वंटी बांदुनु घेउनु दानं घेतामु. पुडं टिपन, मागं पेराया जागी बी. बी पडतं. पेरा आखर जाला का की. पास घालुनु दोम्मं पाय गालुनु उब्बं राइल्यानं राशिस्तामु. तेनं कीड ऱ्हाइना. बी जाइना. मदलं घस्कुटं काढुनु चौकट करतामु. गवताचं काडी भुइवरे ऱ्हाईना. सवानु ऱ्हातं ० या. कोने घालुनु गाइच बइलानं फिरूनु ये कोन शेव ऱ्हातं, ते कोन शेव ऱ्हातं. भुई चौकटु केल्यानं मानसांसु भाकरी बइलांसु कडबा चौकट होतुया. मस्त तुरीच वरन खात गेलं. फोकु बइलांसु भाकरी मानसांसु, कडबा बइलांसु. सम्दं इत्तं मिलत्तं इत्तं निगत्त.

अन्ता भाकरी गपा गपा खातु मन्ताया? अन्ता कस्सं? तम्मा काकी येकु भकरी खातुम् अनशापोटी आउताला लागतुम्. आनकी दोनु भाकरी, तीनु भाकरी खायाचं खातुम्. तुरीचं वरन खातुम्. अनकी उज्ञेलु

देकत असतं. तम्मा भूक लागं बापू. अज्ञेक देकत भूक लागं. अन्की खिचडा मना, येमैना मना खातुम्. खाल्ल्यानं भूक न्हाईना. अन्ता चुलीवरलं भाकरी येकदाचु खाल्ल्यानं भूक लागेना. फुटानं वरवड खाल्ल्यानं भूक न्हाइना. अत्ता खायाचं भातु. इकडं खाइचं, तिकडं भूक लागाइचं. भाकरी चौकटु. जल्दी भूक लागेना.

अन्ता का हाय? सिवार गेलं, सेत गेलं. सारं गेलं. बसल्याजागी न्हातुम् सेवटासु बोलुनु घेयावं. वडिल मानसानं अुपदेस केलं. आइकावं, बोलुनु घेतुम्. लमडीचं आइकत न्हाई.

खल्लं कस्सं करतुया मन्ता? अदगुरू म्होतर कराचं. कस्सं म्हटलं की तीन फन ताकुनु माती ताकुनु म्होतर करतामु;, खल्ल्यान्तु कनिसु ताकिल्यानं मेडी देवाचं पुंजा कराचं. चऱ्हांटु बांदुनु बइलु चौकोर फिराचं. चालुनु चालुनु बइलु दसा येउनु मलनी चालतं. दीस गेलं सिदोरे खाल्ल्यापासं आनायचं. मेडीदेवाला उनु बरं नोको मनुनु घोंगडी घालुनु मेडीदेवाला पांगरायचं. मंदी बसुनु सिदोऱ्या खाचं. बद्याला पांडरं पूलू कनिसु अडकाचं. त्या देवाला उगडा पांघरून मलनी घराच. सांच्यापारी मल्नी धराचं. धरतापुडं देवा महाराजा मुनु पाय पडुनु पुन्ना मल्नी धराचं. खल्ल्यापासी गुडसी न्हाचं. गाडगं राहायाचं. सिदोऱ्या राहायाचं. लोटक्यांतु पानी भरूनु मेडीदेवापासी टिवाचं. सांच्यापारी चौकट तेल गालुनु दिवा लावाचं. दिवा लाउनु लोटक्याला घा बोटं कुकाचं, मेडीदेवाला धा बोटं कुकाचं लाउनु पुंजाचं. तित्तं पुस्ना मैशाचं धूरू लाउनु इकडं वारं आलं इकडं तिकडं वारं आलं तिकडे टेऊनु दानं काडाचं. मेडीदेवाला मगु पाय पडावं मगु मदनु काडाचं.

रामय्या माचलपांडे (वय ९० वर्षे)

माजं नावुं रामय्या. इत्तं न्हातं येलकुर्ती. घरचं नावु माचलपाड्याचे वयसु असनं दादापु नऊ धा. आमी ये गावान्तुचु. कुट्टुनु आलं का पुसत्तं? धंदा कुनबाऊ. सालवन पेरून घ्यालो. आमचं कुलान्तु दसरा करून घ्यालो. दिवलीला बौनं वाउनु घेउनु देवाला पाय पडतामु खातुमु. बोनालु वाइमानस करतं. मल्लन्ना बोनालु कुडा न्हातं. घरचं देव नरसिम्मसामी. मंदिर कोम्मालु. वडिल मानसे कुट्ट्नु आलं सय न्हाई. आमचा बापु आलं. कस्सं आलं मन्ता मुसाऱ्यासाटी आलं. या गावान्तु येकु पोरगी देल्तं. तेन काय की डुंगर तोडाया देल्तं. आमी वी डुंगर तोडाया आल्त. डुंगर तोडुनु जालेन कुनबाऊ काम करू लागलं. वराड ये गावान्तुचु जालं बाइकु येगावन्तुचु होती अन्ता निगून गेली. लेन्करं : तिन्गी लेन्की, दोग्गं लेन्कु. दोग लेन्काला दोगं नातु हातं.

पिरोजी थोडगामे (वय ७० वर्षे)

मला पिरोजी मन्तेत. घरचं नांवु थोडगामे. वयसु सात धा. आमी कुनबाऊ करित्तं. आमांसु दोगं लेन्कु, तिग्गी लेन्की. पिरोजी कता आइकुनु माजं नांवु टिवलं न टिवलं ठाव न्हाई.

आमी आमचं कुलान्तुचू वराड करूनु घेतं. तेलंगी लोकान्तु न्हाइ करित्तं थोल्ले लोकान्सु बलउनु आमची लेन्की तुमचा लेन्कु लगन लाऊन घेयावं मुनुनु सांगतं. दोही कडचं वर्तमान घेतं. आमी जाउनु पोराला बलउनु आनतं. पोरीकडलं मानसं न्हातं. पोरीकडलं पोरगं फाउनु घेतं. पोराकडचं पोरगी फाउनु घेतं. तर्वाता पोरीला काय की वस्ता घालतं, वराड काय की ठरतं. मुंजाजी पुंजाजी मनु गीत गावितं. तेला निश्चित ताम्बुलम् मनितं.

लगीनु व्हावा अदगुरू काय की पोराचं हातामंदे खड्ग देतं. गोंदल काडतं. मराट कुलान्तु बाईलेन्कीचं दोनु येलला लगीनु होत न्हाइ. सोडुनु देलेलं कोनु वराडु लाविलं त चोकटु मानुनु घेत न्हाइ. थोल्लं लोकांसु वराडान्तु बोटु लावतं या गावान्तु थोल्लं कुल सुराव. लगीनु जालेवरे जामई-लेन्कीला कम्मा कम्मा बलऊन आनतं.

## (२) वतन, वतनदार आणि गावगाडा

तेलंगणात स्थायी झालेल्या मराठे घराण्यांपैकी कित्येकांना वंशपरंपरेने चालणारे पाटीलकीचे वतन होते. माली आणि पोलीस या दोन्ही प्रकारच्या पाटीलकीची वतने परवापर्यन्त या समाजात चालत आलेली होती. तुलनेने पाहता पोलीस-पाटीलकीची वतने सांभाळणारी घराणी अधिक परप्रांतात स्थायी होऊन वतनदारी संपादन करण्यात प्रारंभीच्या वसाहत करणारांच्या कर्तबगारीचा वाटा फार मोठा होता यात शंका नाही. याचाच अर्थ असा होती की प्रारंभी वसाहतीसाठी आलेले मराठे शूर होते त्याचप्रमाणे राजनैतिक पातळीवर देखील त्यांचे कर्तृत्व लक्षात घेण्यासारखे होते. मुसलमानी राज्यात परप्रांतीय आणि सर्वस्वी अनोळखी वातावरणात वतनदाऱ्या मिळविणारे अरे समाजाचे पूर्वज अनेक कारणांनी राज्यकर्त्यांना महत्त्वाचे वाटले असावेत. म्हणूनच त्यांना या भागात वतनदाऱ्या लाभल्या.

कालप्रवाहात या वतनदारांची वतने इतिहासजमा झाली असली तरी पीळ मात्र अद्याप कायम आहे. गावात प्राप्त होणारा मान-सन्मानही कमी झालेला नाही. याच वतनदारांच्या घराण्यापैकीं काही लोक आता सरकारच्या वतीने पाटील आणि पांडे हे हुद्दे सांभाळतांना दिसतात. अरेपल्ली या गावचे मालीपाटील, रामय्या शिंदे, येलकुर्ती येथील पटवारी शंकरराव शिंदे आणि जनगावच्या आसपासच्या काही गावाचे पांडेपण करणारे गाजलपाटी रामलु यांच्या मुलाखती पुढे देण्यात येत आहेत :

रामय्या शिंदे (वय वर्षे ७०)

माजं नावु रामय्या. घरचं नावु सिंदे. कुल मऱ्हाट. कुनबाऊ धंदा करित्तं. अरेपल्लीचं पाटील कुडा करतं. तीन धावर तीन वर्स होइल्ला मालीपाटीलकी करतुमु. आमचं गॉमु अरेपल्ली. इत्तं आमचं कुल अद्दिकु. वरकड कुडा कुल हातं. लईकरूनु आमचं कुल. आमी अरेकुल इत्त ऱ्हातुम् मनुनु गॉमाचं नॉवु अरेपल्ली. आमचं पूर्व मऱ्हाटे येगावाला आल्ते. दोन संबर वर्स गाव वसविलं तम्मा जालं. तम्मा कोनु कोनु आल्तं ठाव न्हाई. थोल्लं लोकु बोलुनु घेंटलं : आंगल्यांचं, शिरल्यांचं, कमलपु-याचं येतिग्गं मिलुनु इत्तं आले. ये गॉमु वसईले. वसीलं तम्मा मऱ्हाट्याचा कलाल हाय, धनगर हाय, पिरकी हाय. अन्ता मऱ्हाटे मुनु अरेपल्ली नावु पल्डं. भुई जागिरदाराची. तम्मा हैदराबादला तुर्कु राजा राहिल्लं. तेचं जागिरदार सरदार अल्ली खान बाद्दर. तेनं सांगला : गॉमु वसुनु घेयावं बोल्ला. गॉमु वसलं, मऱ्हाट कुलाचं घरं काय की चार धावर ऱ्हातं.

अनुक्रमणिका

आमचं अरेपल्लीसु काय की हनुमान देव हाय. येकदा येकु बावन आलं ये गावाला. सिद्धांती बामनु. सिद्दा देला. महाराज जेवन करा मुनु सांगला. खाईनं मन्ला. का खाइनं मन्ता गावान्तु हनुमान न्हाई खाईनं मन्ला. तम्मा काय की गावामाहरी लिंबाचं थोल्लं जाडु, तितं गेलं. इत्तं हनुमानु विग्रहम् करा मन्लं. ते जाडु अजुक हाय. ते जाडासु आमी हनुमानु मनुनु पाय पडतोमु. नवरा-नवरी तित जातं. विग्रहमु काय की तर्वांता केलं. आमी सनावरी पुंजा करतुमु. कालामस्याला देउल चौकट करतामु. उगादीला काय की पतितं बसुनु पंचांगु-विचांगु सांगुनु घेतुम्. वर्सा येकदा. वराड कुनाचं हाइ तम्मा नवरा-नवरी पानपुडा घेउनु पाय पडतुम्. बट्टे बिट्टे नेसनु घेउनु पोरॉसु गोंदल दिवट्या लाउनु काडतुम्. पोराले बसा लाउनु घोंगडं गिंगडं पांगरूनु असाडिले तुज पिसाडिले मुन गावितं. गोंदुलु काडितं. गोंदुलु आई भवानीचं. हर मऱ्हाटे गोंदलु भवानीचं काडतं.

गावान्तु थोल्ले कुलीचं मानसं हातं. सिंद्यांचे सिरल्याचं बोटु लाउनु घेतं. असलदार सिरल्यांचे. तेचं बाइलेन्कीला आमचं लेन्कु देल्तं. तम्मापुन आमाकडं बोटू आलं. ये गावाला आमचंचु घरु पुडं. खोब्बरकाय देउनु बोटु लावतु. पोचामायला कुडा पूंजतं. इन्तजामु आमीचु करतुमु. ये मानु गावचं आमचु चु. निवद आमी करतुमु अदगुरु निवद आमचं ऱ्हातं.

माली पटेलु, पोलीस पटेलु, पांडे तिग्ग अजूक कुलीचं. कानि ये जागिरदार मला देल्तं. पोलीस ॲक्शन जालं तम्मा पोलीस पाटील अजु येक केलं. पांड्या काय की रिकार्डु खाली-वरे केलं. तू अरेपल्ली कर मुनु सांगलं. ये गावासु पेटपल्ली काय की मौजा अरेपल्ली मजरा. आमचं येगलं गावु होइल्ला.

आमी दोगं भाऊ. येक भाऊ काय की मरून गेला. येकदम मरून गेला. भावाला येक लेन्की, येकु लेन्कु. लेन्की काय की वराड होउनु तित्तं गेली. लेन्कु काय की इत्तंचुं हाय. चुलतभाऊ न्हाई. मज्या बापूला दोग्गंचु आमी.

गावान्तु आखाडी पुनिव, नागरपंचमी, बइलाचं पोला सनु करतामु. वरकड सनु काय की सर्वेचॅ येकुचु. आमचं कुलीचं मनलं तर काय की येगलं मानलं त आखाडी पुनिव, बइलाचा पोला, नागरपंचमी, भवानीचं सनु दसऱ्याला. आमी का करतामु? पान बांद लावतामु, दोऱ्या बांदतामु, जाडून गिडून गेतामु, कुंबाराला बलवितामु, येक बोपला अन्तुम्, तेला खोब्बरकाय बांदतामु. बोपला आमचं वडिल मानसांसु फोडा लावतामु.

लेन्कीला जॉमयाला दिवलीला तप्पगा बलवितामु. बदकम्मा सनासु कुडा वराड जालं ते साली तप्पगा बलवितुम्. नाय बलविलं ते रुसतं. पयले साली चौकटु करतुम्. जॉमई काय त देल्यानं येतं. नदेल्यानं येइनं. काय तरी मनुनु पाय पडतुम्. देल्यानं येतुम्. बट्टे गिट्ठे देउनु वाट लावतामु.

आमच्यान्तु पंच ऱ्हातं कुलान्तु चौकटु वाईटु पेद्दं मानसाकडं जातुम्. सांगतुम्. पिरकी आलं त, कलाल आलं त. अज्रू कुनी आलं तर घरान्तु सांगुनु घेतुम्. भंडन घरान्तु ऱ्हावं. आमी खंड होईलं. ये पंचाइत करतु आमाला येकु नंबरु देल्तं. आमी सऱ्यांना धनगरांसु कुडा घेउनु चालतं. धीरु करुनु आलं त सारं सांतुम्.

अनुक्रमणिका

आमच्याँतु जत्रा लई. कोत्तुकुंडी इरन्ना, येमलाडी राजन्ना, कुम्माल नरसिम्म जत्रंला जातं. कोत्तकुंडी जत्रा आमचुचु हाय. इरन्ना जत्राला अद्दिकु मऱ्हाट जातं. म्हागुनु लंबाडी. कुम्माल नरसिंम जात्राला अद्दिकु मराटे. म्हागुनु लंबाडी. येम्लाडीला कुडा सारे मराटे अद्दिकु. तित्तं राजन्नाच जत्रा होईल्लं करीमनगर जिला, निजामबाद जिला, ये वरंगल जिला कुट्टुनु कुट्टुनु सारं अद्दिकु मऱ्हाटी येतं. म्हागुनु अडजातु. सारं जातु. येम्लाडीला पुंजा पायला बांदुनु घेतं. थोल्ली पोचम्मागुडी तित्तं हाय. तित्त पूंजा करतं. अनकी काय की काय की करतं. पाय पडतं. मागुनु घेंटलं ते करतं. पाडा सोडतं. इरन्नाला कुडा सोडतं. पाडा तित्तंचु ऱ्हातं. हातं. इक्कुन तिक्कुन फिरुनु तित्तंचु सोडुनु देतं. पूर्व गाडीला पाडा बांदुनु घेउनु आट रोजु, धा रोजु लागायचं. अन्ता तरसं न्हाई. लहंजन अस्सचु करितं. तम्माच्याला आत्ताच्याला लई मेदु.

शंकरराव शिंदे (वय सुमारे ४० वर्षे)

मी शंकररावु. पांडे कामु करितुम्. घरचं नावु सिंद्यांचे. आमचे आज्रे पंजे कुट्टुनु आले मला तर ठाव न्हाई. कानि आमचं बापुच बापु मराटवाड्यान्तु इत्तं आलं मनुनु घ्यालं. मी पनु आइकुनु घेंटलं. मी पन तस्संचु मनुनु घेंटलं. काय की कुट्ट ऱ्हाइलंनं मऱ्हाट लोकु कालं मोय कुट्टं ऱ्हाइलंन हाय तित्तचु ऱ्हातं. त्या अपुटकी आमी मनुनु घ्याला आमी मराटवाड्यान्तुनु आलं. तिकडं कुडा सिंदे हातं.

आमी पांडेचं काम करतं. पांडेचं काम काय असतं मन्ताया? या गावान्तु तीन हजार भुई हातं. या भुईचं सरकारी जे रक्कम ऱ्हातं ते वसूल करूनु सरकारातु बांदावं. त्यावरे धावरे पांचु वर्स कामा करितु. मला धा येकर भुई हाय. दोन हीरी हातं. मोटर करंट ऱ्हातं. मी जर काम करितु न्हाई पर पर मुसारदार कामु करित्तं हाय. आमचंकडं मिच्चे नु कापुसु लई पिकत्तं. हीरीवरं कापुसु, मिच्ची, मक्का सालवनु अन्ता पिकं घेतुम्.

तेलंगी लोकान्तु आमी सरजन मिलनुचु हाव. येक्या मऱ्हाट्याला कोन तरी काय तरी मन्लेनं तर सारजन येक होतुम्. येक मऱ्हाट सारं हाट मन्ता काय की येक मऱ्हा पुडं आलं की वरकड मानूस हटून जातं असं मनवा. तर्वाता अरं हट्टु बले पट्टू अर्स कुडा मानव हाय. काय मनुनु की मऱ्हाट हट घरलेनं सोडीनं. काम पूर्ती गा जाले त करितं.

रामलू गाजलपाटी (वय सुमारे ३५ वर्षे)

मियां गाजलपाठी रामलू. पटवारी कामु करितं. भुई पाँचु येकरू ऱ्हातं. पटवारी चौडपुरी, अपरेडपल्ली, कालवेंडी, शंकरपल्ली, रगुनातपल्ली, निजगुंडा, नारायेनपुरम्, सीतारामपुरम्, ये गावु. या गावान्तु अपले कुलं लई हातं. येकेक गावान्तु पन्नास लोकु अद्दिकु ऱ्हातं. सबजन खेती करतं. सबजना भोइ हा, नक्करू नक्करू. कोरडं बी ऱ्हातं, पान्याचं बी ऱ्हातं. सास्त्रें त्यानं भोई हात धा येकरू. आमच्या आईसु मी येकलं. जल्मलं. जलमताचु आमची आई मरूनु गेली या. आमचं आईचं भइन बाबाला केली या. तेला दोग्गं लेन्कं, दोगी लेन्की. मला तिग्गी लेन्की, लेन्कु न्हाई. आमचं मामा गावान्तु. आईचं भाऊ. डाक्तर रामनरसमय्या ते आमचे म्हेवनं. म्हेवनं कां की मामाचं लेन्कु, मियां धावर दोनु वरीस जालं पटवारीगिरीचं कामु करितं.

अनुक्रमणिका

आमी थोल्ला. सनु बइलाचं करितु. ये दिसी आमचं बइलांसु, गाईसु वान्सरांसु मसीसु चोक्कोट धूनु, पाय धूनु, बोटेटू लाउनु बानं घालुनु दाकउनु ते गाय हादी खाल्ली की माहागाउनु आमी खातुम्. ये बइलाचं सनु पोला. दसरा करतुम्. दिवाले करतुम्. उगादी कुडा करतुम्. उगादी होइनं ते दिसी कुन्नाला काइ देइनं. मांत्रं करतुम्. पाटे उटतामु, उटुनु आउत चौकट धूनु कुराडी घेउनु सेतान्तु जाउनु नक्करू चिरून घेउनु घरा येउनु नक्करू नारेल घेउनु चिरून घेउनु. त्या दी कोन्तं कामु नोको. बोलनं नोको. त्या दिसी कांतं चांगलं बोलनं न्हाई केलं न्हाई मन्ता वरसभर तस्सचु ऱ्हातं. मनुनु तस्सचु ऱ्हातुम्.

देऊ वराडांसु भवानी. तर्वाता हनुमानु. तर्वाता इष्टमैना कोन्तं बी देऊ. कानि भवानी मात्रमें श्रेष्ठ्म. तर्वाता आंजनेस स्वामी. इरन्नाचं सनु कुडा करतामु. इरन्नाले पारनं ऱ्हातं. दिवस मालवल्यावरे दिवा लावतामु. ते दिवा तस्सचु ऱ्हावावं. ते दिवा गेलेनं आमांसु चौकट होइना. ते दिवा उजडतांचु पारनं सोडतामु. बोनं दावतामु. आमी खातुम्. येम्लाडीला कुडा जातुम्. लई लोन्कं जाइनं. सनु घरीचु करून घेतं. कानि कोत्तकुंडी जातुम्. कोत्तकुंडी इरन्ना. कोत्तकुंडं आमांसु जवलु ऱ्हातं. आमचं आई-बाबा गारे बांदुनु जातं. आमी गारे बांदुनु जाइना.

अरे मराटा संगमु नव्यानं लावलं. आमचं कुलीचं लई लोक ऱ्हातं. चिमने चिमने दो येकर तीनु येकरू भुईघर हातं. कोने बी नक्करू नक्करू ऱ्हातं. कोनेबी गावान्तु पटवारी कानि, मालीपटेल कानि, पोलीस पटेलु कानि ऱ्हातंच ऱ्हातं आमचं कुलीचं. आमचं कुलीचं मुसारदार लई हातं. घरी काइ न्हाइ, येकु येकरू भुई हा तेनं कां करावं? मुसारदार ऱ्हातं.

आमचं लोकु कुट्ट्नु आल्तं की आमांसु आमंच्या बासु दादांसु ठाव न्हाई. वराडु आपल्या आपल्या कुलान्तु करून घेतु. भाइरी न्हाई. सिरालू, सिंदे, वरकलु, गाजलमाटी, भुस्सारू अस्से घरचं नांवु ऱ्हातं. आमी आमचं गोटी बोलून घेतं कानि लिवा येतु न्हाई. लिंबाला पार ऱ्हातं तस्सं संगमु जालेवरे आमचं गोस्ट बोलून घेतं पोराहीला लिवा लावातूम्. हास्टलकुडा काडतुम्. लईं कामं हातं. संगमु टेवल्यानं काम होइलं. अरे मऱ्हाट बॅकवर्ड लिस्ट मनुनु आमचं नांवु ऱ्हावावं.

**(३) शेती आणि शेतकरी**

अरे मराठा समाज हा प्रामुख्याने शेती करणारा समाज आहे. या समाजात सामान्यपणे शेतीवर उपजीविका करणाऱ्यांत दोन वर्ग आढळतात : एक : भुईघर म्हणजे जमीनमालक आणि दुसरा : मुसारदार म्हणजे शेतमजूर. भुईघर शेतकऱ्यांमध्ये फार मोठी जमीन असणाऱ्यांची संख्या बेताचीच. म्हणजे धनिक शेतकरी हा संख्येने अल्पच. दोन ते सहा एकर जमीन असणाऱ्यांची संख्या अधिक. ही मंडळी बहुतेक आपल्या वाड्या करून रहात असल्याकारणाने अरे जमीनमालक शक्यतो अरे शेतमजूरच कामावर ठेवतो. इतर तेलुगु शेतकरी सुद्धा अरे शेतमजूर पसंत करतात : त्याचे कारण म्हणजे मराठा मजूर शेतमालाची अफरातफर करीत नाही याविषयी आढळून येणारा सार्वत्रिक विश्वास. दुसरे कारण त्याची नीतिमत्ता, विशेषतः स्त्रियांच्या

बाबतीत असलेली त्याची आदर्श वागणूक. सामाजिक व्यवहारात अरे मंडळीत मालक-मजूर असा भेदभाव आढळला नाही. सर्व घरातील मंडळी अगदी समान भूमिकेवर येऊन आपले सामाजिक व्यवहार पाळताना दिसतात. एके काळचे वतनदार व परंपरेने गावातले थोरपण ज्या घराण्यांतून चालत आले आहे अशा मंडळींना आदराचे झुकते माप मात्र मिळते. म्हणजे सामाजिकदृष्ट्या विचार केला तर तीन सामाजिक स्तरावर अरे समाजाचा व्यवहार चालतो असे म्हणता येईल :

१. वतनदार व शिष्ट गणलेली घराणी. २. भुईघर : जमीनमालक ३ मुसारदार शेतमजूर.
ग्रामीण भागात नेतेगिरी करणारा आणि शहरातून राहणारा सुशिक्षितांचा आणखी एक वर्ग आढळतो. तो संख्येने फारच अल्प आहे.

पुढे देण्यात आलेल्या मुलाखतीत क्र. २ आणि ३ यांच्या मुलाखती एकत्र देण्यात आलेल्या आहेत. क्र. १ चे प्रतिनिधित्व करणारे अगोदरच आले आहेत. शेवटी ग्रामीण भागात पुढारीपण करणारे आणि सुशिक्षित यांच्या मुलाखती आलेल्या आहेत.

अयलय्या (येलकुर्ती हवेली, ता. वरंगल)

मी अय्लय्या. बाप मल्लय्या. घरचं नावु गोवाड्यांचं. धंदा कुनबाऊ घऊ, पिल्ल जोन्ले, थोल्लं जोन्नले, मक्के हरभरे, मूगू, बबरे, कापूसु, तीलु, तूरू, सालपनु पीकितामु. फर्ल काय की वाल्कं, जांबू, आंबे होतेत. आऊताला का असतं मुन पुसता? बाबलाचं जाड तोडल्यानं आउतु. वाडवी तासिल्यानं भरल्यानं आउतु घेउनु जातं. आउताला जूऱ्हातं. नाडं लावतं. हरबुडे लावतं. नाडा, हरबुडे लाविल्यावरि बइलांसु लावतं. तेला साप्ता लाउनु आउतु घेउनु जातं. आउतु नेमा दिसी चौखटु दीस फाउनु नांगरितुम्. पानी आल्यावरि टिफनु चाडा घेउनु जातुम्. पेले मूगु, कापूसु, पिल्ले जोन्नले पेरितामु. तर्वाता थाल्ले जोन्नले, हरबरे पेरतामु. पेराया हातातु मुल्कीची काटी घेउनु जातुम.

जोन्नले निसवल्यावरि खल्लं लावितामु. खल्लं करूनु तुडउनु भयाचं जाड फाउनु मेडी लाउनु येकु मिच्ची, कांदा, हल्दी हलदी-कुंकू लावितामु. पूजितामु. पूजूनु मल्ली बांदतामु. खल्ल्यान्तु कनसं टाकुनु बइलु लाउनु तुडवितामु. मदन होते. मदन उद्दलुनु घेउनु रास मोजतामु. रास मोजनं : येकु, दोनु, असं धा पत्तुर मोजतामु. इत्तुनु धावरे येकु, धावरे दोनु, असं ईसपत्तोर. तर्वाता तीन धा, चार धा, असं शंबर होतं. आट धा मापं मोजावं खंडी होतं. जोकुनु घेंटलं तरू मनु. मनु भराला जाट धा जालं की खंडी. मापुनु बदलाचं गाडी लाऊनु घरी अन्तुम्.

बइलाचं गाडीला तीन धुरं ऱ्हातं. हरबुडे ऱ्हातं. नाडा ऱ्हातं. चाकाला बाक लाउनु येरडेल लावतं. तेला फिराला ऱ्हातं. थोल्लं चऱ्हाटु काय की भरल्या गाड्यावरून बांदुनु घेंतुम्. धाकलं चऱ्हांटु काय की मागं बांदुनु

घेतुमु. थोल्ले जोन्नले घरे नेल्यावरिं कनिंग ऱ्हातं घरी. धई-भातु टाकुनु, हलद कुंकु लाउनु कनिंगु चौकट पूजितामु. लिंबाचा पाला वरे टाकुनु लिपूनु घेतुमु.

वाडव्याचं आमाला लइ कामु. ते सालमरू कामं करितु. आमी तेला भीकु देतुमु. आउताला आट पायला: दोनु मापं पायली. धा वर सामापं आट पायल्या. वट्ट्याला आट पायल्या. वारकाला आट पायल्या भीकु देतुमु. पायाच्याला कुडा भीकु देतुमु. तेचं कामु व्हाना करनं. इतकं तितकं येट करनं. इतकं तितकं देतं. खडीभर पिकलं, मनभरू देतं. दिन सेरभर देतं. त्यानं सोंडू कापूनु आनतं. व्हाना सिवुनु आनतं हुरबुडे करूनु आनतं. सालवनातु धुरे ताकतं. पायाचं तर्वाता कोली, कोस्टी, मुसारदार कुडा कामाला येतं. कुंबारू उरकल्यानं येतं. ऱ्हाइ उरकल्यानं येइना. लगीनाचं दिसी बावनु येतं. त्यादिसी देइल तितकं घेतं. खल्ल्यावरे बावनु येइना.

आमचं थोल्लं सनु बइलाचा पोला. बइलांसु अंग धुत. अंग धुउनु तरवडाचं पाला, गूलू, वाट्या पोटान्तु घालुनु घंट्यावर घागऱ्या घालुनु चराया नेतुम्. पुंजा करूनु चराया नेतुम्. घागऱ्या मन्ता काय की गोलू. घंट्या मन्त काय की देवलात ऱ्हातं तस्सं. त्या दिसी काम काइ ऱ्हाइ. दुसरा थोल्ला सनु पांडवाचं. सेतु निसुवाइचं येलंला जाउनु काइ खाइनं अदगुरू उसू वाल्कं खाइनं अदगुरू सेतातु जाउनु रांदन करूनु. तित्तचु बोनं रांदुनु पांडवासू दाकउनु आगारा घालुनु पाय पडतामु. पांचु दगुडू मांडुनु पांडव होते. तित्तंचु घरबार सेतातु जाचं खाउनु येतुमु.

आमच्या मऱ्हाट्यांतु मांसु ऱ्हाइ, सिंदी ऱ्हाइ, काइ ऱ्हाइ. आमच्या अज्ज्या-पंज्ज्यापुन कुडा ठाव ऱ्हाइ. काटे मऱ्हाट जाल्यानं सिंदी खाते, मांसु खाते, पानसेंगा कुडा खाते. कोंबरू खाते. ते अक्करमासे. आमी बारमासे. आमी खाचे दुद्दु, धइ, माखनु, भोपला. आमचं घरी दो मसी हातं. दो पायली दुद्दु देतं. मसीला बाइ वघारू तर्वाता हलगटु होते. मुसारदार चराला ऱ्हातं. मइन्याला चार पायल्या ऱ्हातं. आट पायल्या कुडा ऱ्हातं. चिमन्या पोरांसु फउनु टेवुनु घेतं.

जोंदला निसवल्यावरे मला घालुनु राकतामु. गोंपन, घेतुम्. धोंडे हुंबाडितामु. पांकरांसु पाडियेतामु! गिर गिर उ.... मनुनु पाडितामु.

वराडाचं येलंला पयले जू आनुनु पानी गालुनु अंबील मांडउ करूनु ते वाटांसु.

असाडिले तुज पिसाडिले : आईभवानीचं येगोंदलुः ईर हनुमंताचं ये. गोंदलु : असं गाइचं हनुमंताचं पारी जातं. सुपारं चडउनु हातांतु तल्वार घेउनु पुंजा करुनु बइलावरि बसूनि जातं. नवऱ्या पोराच्या हातांतु तल्वारू, पायातु व्हाना डोस्कीला रूमालु ऱ्हात. बासिंगं अदगुरू हनुमंताला दाउनु येतं. पुडं बासिंग बांदितुम्. देवकु बाईलेन्की बांदितं. देवकांतु इतकं इतकं जेवनु मन्ता धई-भातु, कुराडी, मुसलु, जंबी, सौंदरिचं पालं आनुनु बांदुनु देवक बांदतुम्. बाइलेन्की देवक बांदलेनि नउ जन सव्वासिनी गीतु गाइतु वारले घेउनु चार मांडवाचं डिलींसु मुसलानं तोबितुमु गीत गाउन्शेनी. तम्मा घरा लगीनु. लगीन बावन लावतं. अक्षता जोंदलेचं, थोल्ले जोंदलेचं ऱ्हात. आमच्यांतु तांदलाचं अक्षता ऱ्हाई. थोल्ले जोंदले तूपू हलदु लाउनु पीले करूनु अक्षता

करित्तं. लगीनात ये पीले दाने अक्षता ताकितं. ये पीले दानचं वाटी, दुद्दु, तूपू हळदी गालुनु हलदीचं गौरम्म करूनु पूंजितं. दाने ताकितामु.

धया भाताचं सिदोरे : छत्री गेला डुंगरा :
त्यानं तोडिले मोगर : त्यानं बांदिलं नगर

असं गावितं वराड होतं.

राजन्ना हिंगे (दामेरा, ता. वरंग)

मजं नावु राजन्ना. घरचं नावु हिंगे. आमी इत्तं कोनत्या गावातुनु आलं आमाला काय ठावं? आमचे बापु, दादा, कोन की इत्तं आलं. वर्स किती जालं नाय ठावं. आमी कुनबाऊ करतं. आमच्यात पाटील ऱ्हातं. कानि आमाला ऱ्हाइ. आमी कंपारे. आमचं थोल्लं घर मनायचं. हिंगे थोल्ले, तर्वाता कारल्या शिरल्यांचे, मोट्याचे. गावचं कारबार कंपाऱ्याचं आपल्यान्तु सांगतामु. तित्तून आइकलं न त थोल्ल्या पंचाइतीत जातुमु.

आमी मक्के, तूरी, मूंगू, मिच्चे, घऊ पिकत्तं. पानी हीरीचं. करंट मोटार लाउनु. शतीला मानसं आपलं ऱ्हातं. दुसरे कुडा ऱ्हातं. कांदे, लोसूनु, थोल्ले जोन्नले कुडा पिकत्त. भुई काय की नांगरितुमु. निन्नाला जातुम. इल्यानं गवत काडितमु. जोन्नले थोल्ले ऱ्हातं तम्मा खल्लं करितुमु. अदगुरू मेडीदेवाची पूजा. घोंगडं टाकुनु कनसं बांदितुम्. चुन्नं पुसितुमु. देव मुनु पुंजितुम्. कस्सं पुंजितमु मन्ता : पांच दगोडु आपनतुम्, तेला चुन्न पुसितुम्, बोटू लावतामु. मैशाचं धूर घालितामु. पाय पडत्तं. तर्वाता कनिस तुडवितम्. आज्ञु ताकुनु अज्ञु तुडवितुम्. मलनी धरित्तं. तय्यार होइला तर मदन करित्तं. मंदी दोनु लाकडं ताकितुम्, जवल्करितुम्. मापानं मोजतं. मोबु घेउनु दाने भरित्तं. मोज तेलंगीतू. आपल्या गोटीत मोजा येना. अकरा-बारा वरि येतं. वरकड येना. लइ लइ यीसवर येत्तं. दाने घरी आल्यावरे पूजांबिजा काय नाय. कनगीतु घालितुम्. पूंजाबिजा काय नाय. पांडवाचं सनु मुन रानाँतुचु सारं करून घेंतुम्.

दासराव फेरारे

आमी दासरावु. घरचं नांदू फेराऱ्याचे. कुनबाऊ काम करित्तं. आमी कुट्टुन आलं ठाव ऱ्हाइ. बाप-आजे तिक्कून वराडातून आले मनुन घेंटलं. गावचा नाव ठाव ऱ्हाई. आज्ञा, पंजा इत्तचु. आमचं आज्ञाचा बा आला की कोन धम्मा. भुईत सारं पिकितुम्. मक्का, कांकडा, मिच्च्या, धन्ने, लोसनु, घऊ, थोल्ले जोंदले, पिल्ल जोंदले हरबरे. पानी हीरीचं. मोट बांदतामु. मोटला बोकना ऱ्हातं. खोंडव, सोंडू, जू ऱ्हातं. बरीक चऱ्हांटू तेला सौंदर मनतुम्. मोट्या चऱ्हांटाला धांडू मोटचं पानी बरदमंदी पडतं. तित्तून कालवा. कालव्यानं मडीमंदी जातं. मडी काय की भिजवायची भुई.

आउतु नांगरू काय की वडिवा करित्तं. मांग व्हाना देतं, साप्ता देते. हुरबुडे देते. आउतासु आलीसु, कुलवांसु पासु, लांगुराचा काय कीकारू. बइलाला काय की कासरा ऱ्हातं, घंटी-घागऱ्या ऱ्हात. जुत्तलं कुडा असतं. बद्दलाचा सनु पोला. बइलासु धूनु चौक्कट धूनु तरवडचं पालं आनुनु, पाला खांडुनु तेल मीलुनु गूल

ताकुनु घोट्याला लावतुम्. लाउनु चौक्कटु पूजितुम्. पाय धूनु मैशाचं धूरू दामतुमु. पाय पडतोम् पुंजताम् येक येक बइल काय की रूसून बसतं. त्या दिसी आउत बांदनं, कुट्टं काय बांदनं. घंटा-घागऱ्या लाउनु बइलु भिर्वितम्.

शिवराव भलेराव (परकाला, ता. वरंगल)

शिवरावु मन्तेत मला. घरचं नावु काय की भलेराव, भलेरावु नांवु कस्सं पडलं मन्ता काय की आमचं पूर्व आज्ञा, पंजा, ताता काय की सइन्यामंदी होतं. त्यानं काय की आमने सामने वागू मारला. तम्मा काय की सरेजनु भले, 'भले, भले' मनित्तं. तम्मापुन काय की भलेरावु नांवु पल्डं.

आमी रातच्या भातु खातुम्. नित्य भकरी. चौक्कटु हातावरे भकरी करित्तं ते सूनु फातुम्. घुगरी कुडा खातुम्. ईल्या गाईला घुगरे घालतुम्. हिरवं दुद्दं खाइना. हिरवं दुद्दं मन्ता धा रोज गाय इल्याला धा रोजु दुद्द हिरवं ऱ्हातं. तेचं खरवस होतं मुन सोडून देतं. दुद्द मडक्यांतु तावतामु. तेसु दुदानं मनित्तं. बुडी दुदान्याचं ऱ्हातं तेला खरवड मनित्तं.

सनु कालामास्या, उगादी, पोल्याचा, नागरपंचमी करित्तं. आमचं देव तुलजाभवानी. वरकड हाय ते देव, मल्लिकार्जुन, नरसिम्म स्वामी, येम्लडीचं राजन्ना. पोचमाई कुडा पूंजतुम्. अदगुरू पूंजा भवानीचं.

सेताला पानी हीरीचं सऱ्याचं कुड. पानी कालव्यानं जातं. कट्टे बांदतामु. सामान गाड्यानं जातं. गाडीला बइलु. बइलाचं डोईवरे जू, तेचं गल्यामंदी साप्ते, जुवाला बांदाया वारना, गाडीला घूरचिर ऱ्हात. साटा ताठी ऱ्हातं. थोल्लं चऱ्हांटु धाकलं चऱ्हांटु ऱ्हातं.

राजन्ना शिंदे (वय : वर्षे ५०; येलकुर्ती ता. वरंगल)

मी राजन्ना सिंदे. आमचं सूर्य गोत्र. वयसु पाच धा. वर्स होइललं. आमचं ताता इत्तं आलं. आमी कुनबाऊ करित्तं. थोल्ले जोंदले, मिच्चे ताटलु साल वन, तूरी, अन्ता करितुम्. आउताला दोनी बइलू. कानी लाउनु चऱ्हांटु बांदित चऱ्हांटु दोनी : जुवाला येकु, सऱ्याला येकु. बइलाचं पोल्याला बइलाचं सनु. बइलाचं अंग धुवत्तं. चोक्कट तेल पाजतं, वाट्या खाऊ घालतं. ते दिसी बइलाला काम ऱ्हाई. बदकम्मा सनु बाइकाहीचं. सरे सनु समद्याचे. बइलाचा पोला आमाला अद्दिकु. नागपंचमी कुडा जामाला अद्दिकु. जे सनु दुसरे लोकं करित्तं ऱ्हाई.

राजय्या (बिज्ञकी, ता. करीमनगर)

राजय्या घरचं नावु लोने. पापनपल्ली ऱ्हातं. कुनबाऊ करित्तं. आउतु आखाडीला लाउनु उन्नाला सरेस्तो करितं. आडताचा जू, साप्ते, कारु, आलीसु ऱ्हातं. नांगरतुम्, तास नागरतुम्. टिपनला जोन्नले पेरितुम्. तर्वाता कुलव लाउनु मोय सवानर तुम्. खुरपीनं गवत्तं काडतामु. थोल्ले जोन्नले टिपनीनं पेरितुमु. कापूसु अवतामागं पेरतं. करडी, तूरू अवतामागं ताकतुमु. टिपनीला तीन जिले ऱ्हातं. तीनु सरे टेवितामु. मागं येकू,

अनुक्रमणिका

पुडे दोनु. नीट जावावं. इकडं तिकडे जाउ न्हाइ. तेच मागं कुलवू. भोय सवान करावं. ते जालं की सेवटु. मक्का, हरबरे, तूरू, येरंड, तीलु हातानं पेरित जातं. चिमनं कुलव न्हातं. तीन तास न्हातं. बइलू दोनु. मानसं तिग्गं. तास इतुकुचु. जाडामद्दुनु जातं. पीक थोल्लं जालया आडवं नांगरतुमु. गवत्तं खुरपीनं काडतुमु. पीकु पंटा आल्यावरे इलानं कापतुमु. खातु शेनाचं पक्क्यांसु गालतामु. कापुसाला, थोल्ल्या जोंदल्यांसु खात न्हाई. चिमनं शती. आमडाव की? भोई टोकु दोनु येकरू. खातु कस्सं आमडतया? पंटा मोटा जाल्यावरे पांकराला होकारतुमु. गोपन घेउनु, दगोडु टेवुनु माला गातलेवरि हांकारावं. माल्याला चारू डिलीला चारू मुंडासं बांदतामु. पांकरं आलं की बुजुनु जातं. मिच्ची लावाला खेटी घालतामु. वाडा बांदतामु. पंटा आलं की इल्यानं जोन्नले कापतामु. अदगुरू मेडी देवाचं पूजा बांदतामु.

कनिसु घालुनु मल्नी धरतामु, कनिसाचं मदनु होते. तर्वाता टिपनीवरे उब्बं न्हाउनु सूपु धरून उद्दलितामु. मदन होतं. मापानं मोजतामु.

नरसय्या

आमी नरसय्या. घरचं. नांवु काय की थोडगामे. येलमपुरी न्हातं. भोई शंबर येकरू. खल्लं कस्सं होतं सांगाया, थोल्ले जोन्नले कापितामु. खल्ल्यांतु ताकितामु. कस्सं मन्लं तर भोंडं भर आलं तर कापितामु. पानी लिपूनु खल्लं चौकटु करतामु. मल्नी धरूनु चौकटु उद्दलितामु. पूंजा सेतातु. मला बांदितं तम्मा. करतामु. पांचु पांडव मांडुनु पूलू हळदी कुंकुमु लावूनू पूंजा बांदतामू. त्या दिसी येकु धांडू कापुनू घरी जातुम्. देवाला दावतामू. ये पांडवाचं पूंजा मला घालायचं तम्मा. अदगुरू न्हाई.

मिच्चया आल्यानं तोडल्या की तोपल्यांतुनू, गाड्यातूनू बोरे लाउनू घरॉंसु आन्तामू. वाल्लेवरे बोरे बांदुनू शारात धाडतामू. कापुसु बोरे ताकुनु बलदं आनुनु घरी ताकतामु. भरून शारात धाडतामु. तुरीचं खल्लं घरी करतामू. सेतांतु न्हाई. वाल्लेवरी काटीनं बडइतामु. आद्दिकु न्हाइल्यानं सेतांतु खल्लं. नक्कारू न्हाइल्यानं घरी. कस्सं कस्सं न्हाइल्यानं तस्सं करतामू.

राजन्ना

मियां राजन्ना. घरचं नांवु, मोकिल्यांचे. वावरान्तु हीरू हाय. पानी करंटनं येतं. करन्ट न्हाई तम्मा मोटू. मोटला बईलू, दांडालू, बोकनं, सोंडू, जू, मुल्कीचं काटी, कोसरा न्हावावं. बइलू म्हागं-पुडं होतं ते जागा बारी मनावं. हीरीतुनु पानी बोकन्यॉंतु येतं. बोकन्यॉंतुनु ते पडतं तेला बोजरू मनावं. बसायचं लाकूडु तेला सात मनितं. दांडालु, धाकलं चऱ्हांटु न्हातं. नांगराला पालू, जू, चऱ्हाटु, साप्ता, वारना, रूम्नं न्हातं. थोल्लं कुलवं धाकलं कुलव न्हातं. धाकलं कुलव घास काडतं.

हिरामन नागर्ले (नरसक्कापल्ली)

आमी हिरामन नागूल्र्याचे. धंदा : आउत हानितुम्, टिपन धरितुम्. हरकाम करताम्. कडबा कापितुम्. ढोरं बांदतामु, योक काम हाय सांगाया? सारं काम करतामू. वराड जालं तम्मा मिया सऱ्या वस्ता केल्या : गुंडलू, तोडलू, कोपऱ्या, पंइंजनू. तीन तील्याचं नालू कुडा केल्तं.

मल्लय्या लकडे

आमचं नाँवू मल्लय्या. घरचं नाँवू काय की लकड्यांचे. मला दोगं लेन्कु, दोगी लेन्की. लेन्कु आउत धरितं. आउताला गानं मनितं. आखाडी पुनिवु सनु करितं. ईरहनूमान, राजन्ना पुंजितं. बइलाचा पोला थोल्ला सनु. तम्मा पोल्या करितुमु. बोनं दावितामू. तेलु पाजितामु. पोल्या बइलांसु दावितामु. बइल रूसूनू बसतं. तम्मा चौखट तेलु पाजितामु. वाट्या खाऊ घालतामू. बइलाचा सनू तर्वाता दिवले. दिवलीला मशीची पूंजा बांदतामू. दिवटी वराडाला काडितामू. दिवलीला दिवटी न्हाई. मला धंदा न्हाई. पोरं सांबालतामु.

शिवराव कवडे

मी शिवरावु कवडे. बी. अेस्. सी. जालं. तम्मापुन नवकरी चाकरी करा वाटंना. मिया भुईधार हाय. मनसी धा येकरू भुई हाय. आमचं कुलांत लिवा घाटला. येकला काय की टीचरू कामु करतुया. येकला काय की एल्. एल्. बी करतया. येकला काय की सुपरवायजर ऱ्हातं. या गावांतु काय की मौतं आमचं कुल पाच धा हातं. आमचं येकलं काय की थोल्लं कुल.

आमच्या कुनबाऊ मंदी मक्का, थोल्ले जोंदले, मिच्ची, मूंगु अंता होतं. पानी हीरीचं. हीरीवरे मोटु हाय. मोठला बाकना ऱ्हातं, सौंदर लावितं. सोंडू असतं. कालवा करूनु पानी सोडितं. थोल्ले जोंदेले खल्लं करितुम्. बइलांसु बांदी पेटित्तामु. मलनी करितामु. भवताल फिरवितामु. वाऱ्याला धरितामु. दाने पडतं. रास होतं तेलाचु मदनु मनितामु. दाने घरी कनिंग घालुनु लिंब पेटतामु. लिपूनु घेतामु. गाई हातं. पाडे हातं. वान्सरू हातं. पाडा घरचा. बइलु घरचा. येकुचु बद्दल साऱ्या कामांसु लावितामु. खास मोटला बइलु नसतं. मजूरला बलवून निन्नं करतं.

खल्यावरे काय की मेडीदेवाची पूंजा. मेडीला कनसं बांदतामु. खोब्बकाय बांदतामु. कंकन बांदतामु. अदगुरू काय की पांचु मडके चुन्ना लावुनु पंडगा करतामु. पांचु दगूडवरे लिंबाचा पाला घालुनु पांडव घालतामु. तेचु पंडगा. दाने घरी आल्यावरे पंडगा न्हाइ.

**(४) ग्रामीण नेतृत्व**

भाषिक आणि मर्यादित अर्थाने सांस्कृतिकही अल्पसंख्य जमात या नात्याने तेलुगूभाषिक समाजात वावरत असताना देखील आपल्या कर्तबगारीने पुढे आलेल्या

आणि आपल्या ग्रामाची व तशीच आपल्या समाजाचीही सेवा करणाऱ्या ग्रामीण नेतृत्वाची वाण अरे समाजात नाही. येलकुर्ती हवली या गावचे गेली पंधरा वर्षे सरपंच असलेले नायकोट यांची गणना अशाच नेतृत्वात करता येईल. गेली तीस वर्षे ते सार्वजनिक कार्य करीत आहेत. आपल्या गावच्या पाटील व पांडे या हुद्यावर असतानाच ते सार्वजनिक कार्यात ओढले गेले. प्रथम काँग्रेस आणि आता जनतापक्ष या राजकीय संघटनांतून त्यांनी कामगिरी बजावली आहे. परंतु आपले कार्यक्षेत्र आपल्या गावाच्या सीमेपलीकडे जाणार नाही याची ते सतत दक्षता घेत राहिले आहेत. त्याला अपवाद आहे अरे मऱ्हाट संघ या संघटनेचा. तेलंगण भागात संघटनेला मूर्त स्वरूप देणाऱ्या प्रभावी नेत्यांत त्यांची गणना होते.

जेमतेम सातवी-आठवीपर्यन्त शिक्षण घेतलेल्या या माणसाने आपला गाव मात्र आदर्श करून दाखविला आहे. या गावाला आदर्श ग्रामपंचायतीचे बक्षीस दोन वेळा मिळाले आहे. या दोन्ही वेळेस शंकरराव हेच सरपंच होते. गाव लहान असला तरी शिक्षणाची सोय माध्यमिक शाळेपर्यन्त या ठिकाणी आहे. ग्रामोद्योगाच्या अनेक योजना त्यांनी हाती घेतल्या आहेत, काही कार्यान्वित झाल्या आहेत. काहींची वाटचाल चालू आहे. आपल्या गावात स्त्री आणि पुरुष या दोघांनाही भरीव रोजगार मिळावा यासाठी बरेच प्रयत्न करण्यात येत आहेत. गावातील महिलांना फावल्या वेळात काही तरी उद्योग देता यावा यासाठी महिलामंडळाची एक मोठी इमारत बांधण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे.

घरची आर्थिक परिस्थिती अगदीच बेताची असूनही हा माणूस सदैव गावाच्या कोठल्यातरी कामासाठी झपाटल्यासारखा धडपडत असतो.

असाही एक मऱ्हाटी माणूस.....

शंकरराव नायकोट

मी शंकरराव नायकोट. लेहनं लई जालं न्हाई. सात आठ तरगती पस्तीर लिवलं. तर्वाता पोटपानी फावं लागलं. पाटीलकी केली, पांडेपन कुडा केलं. जीव लागंना. हमी मऱ्हाटे सिवाजीचं कुल मनुनु घेतं. चौकट ऱ्हातं कसं नाई? सिवाजीचं अबिमान ऱ्हावं तर चौकट ऱ्हावावं सऱ्यांना चौकट फावं. चौगाँतु चौकट मानूस मनुनु घेयावं. आज तीन धा वर्स जाली साऱ्यास्नी चौकट फाउनु घेतं. आमचं मऱ्हाट कुल हाय. सिंदी खाइनं, मांसु खाइनं साऱ्यास्नी सांगुनु घेंटुम : आपन मऱ्हाटे. सिवाजीवानी ऱ्हावं. कोनु वाकडं केलं तर चौघान्तु बोलुनु घेतं.

घराची लइ चिंता न्हाई. भौय जागा हाय. आउत, नांगर न करसकं. मुसारदार हात ते काम करतं. मी सरपंच करतं. आमचं पंचाइत चौकट फातुम्. पंचाइतीचं सिल्वर जुबली जालं तम्माकुडा फस्ट आलं.

पंचाइतीला खास मेडल देलं. तम्मा सरीन आलं होत. एच्. सी. सरीन गवर्नरचं अडवाइजर. थोल्ले थोल्ले लोक लई आल्ले. पंचाइतीनं कवतिक तेहीनं केलं. वेंगलराव चीपमिनिस्टर ऱ्हातं तम्मा तेनं हैदराबादला बलवून माजं सन्मान केलं. मोतम् जिल्यातु आमचं पंचाइत मॉडेल पंचाइत ऱ्हातं.

सा वर्साखाली घराचं पन्नु बराबर येइनं जालं. मिया साऱ्यांना सांगल. पांचु रोजु उपास ऱ्हाइलं. सरे मानसं आले, तू उपासु ऱ्हाइ नोको. नासरे आमी देतुम्. खाना खाय म्हंटलं. मिया एकू न्हाई दोन न्हाई सुनलं. पूर्तीगा नासरे आलं. तम्मा मियां देवलं. सरीन आलं तम्मा तेनं माजं बहुमान केलं. हार घांटलं तर्वाता ते हाराचं हरास जालं. दोन हजार नासरं कोमट्यानं देलं. पंचाइत समितीत करंट अकाउंटला जमा केलं. तेचु कल्यानकामावरे घेटलं.

आमचं ग्रामपंचाइतीनं कल्यानकामु लई केलं या. बडी खोल्लं. तेच हल्लू हल्लू हायइस्कूल जालं. वावराइला बांदु घांटलं. फिशरीचं कुंड अंड गालायचं केलं. फिशटॅक कुडा बांदल. तेनं लई लोकांसु धंदा मिलतं. ग्रामपंचाइतीचं घर बांदलं. पांचू धा हज्जारानं ते बांदलं. पशुवैद्यशाला सोबतं बांदा लावलं. महिलांचं दवाखाना जालं. अन्ता महिलामंडलीचं घर बांदतुमु. ये घर जालेनी गावचे बाइकाहीले कुटीर परिश्रम मिलते. ये घरू बाइकाहींचं हवाली करतुमु. कुटीर परिश्रम करून घेतुम्.

आमी सरे गावान्तु चौकटु मिलुनु ऱ्हातुम्. ये तेलंगी, ये हरिजनु ये महारू मेदु न्हाई. तेच कस्ट गावचं कस्ट ऱ्हात. येंगलरावु सी. यम्, ऱ्हातं तम्मा हैदराबादला बलऊन नेल्तं. दोन हजार बहुमानु देलं. ये बडीलो धावरे येक कलासपत्तो लेहून घेतं. पंचाइत राज जाल्यावरे येबडं केलं. पंचाइतीनं बडीला दो येकरू भुई देलं. बाइल पोरं कुडा लिवा घातलं. तेच बडी कुडा बांदतुम्. सेंट्रल बँक या गावांसु धा लाक कर्जू देत. सात धा लोकांसु बँकु कर्ज देलं.

गावान्तु हमी सारे चौकटु ऱ्हातुम्. हरिजन हमचं भंडन न्हाई. दौजन्य न्हाई, मेव न्हाई. सारं चौकटु मिलुनु ऱ्हातुम्. हरिजन रिकामं ऱ्हातं तम्मा आमी नासरे देतं. कास्तवरे वर्सा धावरे पांचु शंबर देतं. आमी देतं. मंडन होतं कुटुंब? वाहकांसु रोजु पाँचु रुपिये देतं. आमचं मऱ्हाट लोकाचं कुनबाऊ धंदा अद्धिकु. आनकी ते म्हागुनु बट्टे इनायचं. त्या म्हागुनु चिम्नं चिम्नं वरकड धंदे ऱ्हातं.

मला फाइल्यानं चौकटु थोल्ला मानुसु मन्नु प्रेमभर सरे घेतं गावाला चौकटु ऱ्हाइचं सांगतुम्. तेच लेन्करावनी फातुम्. तेला कस्ट ते मलाचु. लेन्करावनी फातुम्. अस्सं फाइल्यानं सारं चोकटु. चोकटु प्रजासेवा करावं मनुनु घेंटलं. कशानं म्हंटलं तर करूनु दाकवावं. आमी सिवाजीचं कुलीचं. कुछ कर दिखाना.

अज्ञु लई कामु ऱ्हाइलं. वेटरनरी दवाखाना घरू बांदायचं. कुटीर परिश्रमु आनुनु देयाचं. प्रजा सुकी कराचं. थोल्लं होउनु प्रजाचं सुक-दुक न्हाई फाइल्यानं कस्स?

अनुक्रमणिका

सुभाषचंद्र सुराव

साठीच्या घरात असलेले सुभाषचंद्र सुराव (सुर्वे?) हे अरे समाजाचे अेका विशिष्ट संस्काराचे प्रतिनिधी. शिक्षण बेताचे. शिक्षण चालू असतानाच आर्यसमाजाच्या चळवळीचे संस्कार झाले. त्यातून प्रथम धर्माभिमान आणि नंतर राजकीय जागृती. राजकीय चळवळीत भाग घेतलेला असल्याने आणि आर्यसमाजी मंडळीत सतत ऊठबैस असल्याकारणाने वाणीवर हिंदी-उर्दूचे संस्कार मोठ्या प्रमाणावर. मराठी भाषा सफाईदारपणे बोलण्याची सवय मोडलेली. तेलुगू बोलताना देखील हिंदी-उर्दूचे मिश्रण अधिक प्रमाणात. उर्दू मात्र सफाईदार बोलतात. ग्रामीण भागात सहसा असे आढळत नाही. अपवादात्मक वातावरणात वाढलेली ही माणसे. यांची भाषाही अपवादात्मक नसेल तरच आश्चर्य.

माजं नाव सुभाषचंद्रराव. घरचं नाव सुराव. इत्तं (नरसकवापल्ली) मऱ्हाट कुल चार शंबर हातं. आमचा कामधंदा काय नाय. १९४७ में स्वातंत्र्यउद्यमलो काम केलामु. आगस्ट १६, १९४७ ला मी जेल गेला. धावर चार मइने जेलमंदे होतं. जमलापूर केशवरावु वरंगल सेंट्रलजेलमदे संगटु ऱ्हातु. आमी सात जन ऱ्हातु. तम्मा कास्टिजम लइ. आमांसु खादगीला बराबर देत न्हाइ. भकरी नु वरन, दुसरं काय न्हाइ. कस्ट अजू काय न्हाइ. निजामबाद जेलमदे मारपिटी जाळं पर वरंगलली काय जालं न्हाइ.

राजकारणाँतु कां जावं म्हटलं तर निजाम सरकारच्या खिलापु सत्याग्रह केलं. सत्याग्रह कां केलं मन्लं तर अन्याय लइ जालं. ये सरकार हमको नही चाहिये बोलके सत्याग्रह केलं. स्टेट कॉंग्रेस के अध्वर्यू में तम्मा स्वामी रामानंदतीर्थ, बुरगुलु रामकिशनरावु, चन्नारेड्डी कुडा ऱ्हातं थोडं थोडं. हयग्रीवाचारी आमचं कोवर्करू. ते जेलमदे न्हवतं वो अंडरग्राऊंड बॉर्डर मे था. आपल्या गावाचं लइ अंडरग्राऊंड में थे. तम्मा रजाकारचं कस्ट लइ. परकाल तालुक्यात कम्युनिस्ट न्हाइ. मी कॉंग्रेस में हूं. इंद्राकॉंग्रेस. आता दोनो कॉंग्रेस येकु होइला. निवडणूकामंदी इंद्रा कॉंग्रेसमंदी काम केलं. मऱ्हाटु कुलाचं कामु आजवरू न्हाइ केलं. ते कामु करायासु थोल्ले लोकु हातं. करतेत. रजाकाराचं काल तम्मा लइ येगलं ऱ्हातं. मिटने की खाहिश हो तो सेवा करना. आजकल मिटने की खाहिश बच्चो में नही है. सेवा कहॉं से करेंगे? मज १९७२ आगस्टपुन दोन शंबर पेन्शन मिलतं. इत्तं आपल्या कुलातलं घोगं पेन्शन घेतं. वरकडु घोगं ऱ्हातं.

मुच्चम्राव भलेरावु

अरे जमातीत शिक्षणाचे प्रमाण कमी. परकाल या तालुक्याचे गावी थोडं फार शिक्षण घेतलेले मुच्चम्राव हे तेथील भूविकास बँकेत नोकरीस आहेत. कर्जवाटपाच्या निमित्ताने त्यांना खेडोपाडी हिंडावे लागते. त्यांची बोली बरीच संमिश्र आहे. शेतकऱ्यांच्या तुलनेने शिक्षितांच्या मराठी बोलीवर तेलुगू भाषेचे संस्कार अधिक आढळून येतात.

मच्चमरावु मजं नावु. मुच्चमरावु कस्सं पडलं मन्ता तर काय की मच्चालम्मा पाय पडुनु मुच्चमरावु नांवुं टिवलं. घरचं नावु भलेरावु. गामु नारायनपेटु. शिक्षन डिप्लोमा कोर्सु. बँकत कामु करतं. कामु काइ मन्जे जेला बारा साल पट्टा ऱ्हातं, तीन येकरू, चार येकरू जेला खंड ऱ्हातु तेला उस्तवारी करायासाटी मही इकडं तिकडं ताकायासाठी लोन देतुम्. बारा सालचं पट्टा फाउनु तीन हज्जारू, चार हज्जारू लोन देतुम्. डेव्हेलेप करावं मुन लोन देतुम्. कर्ज आदाई किस्तु बांदावं. घा वर्स बांदावं. किस्त वायदा कुडा मन्ते. वायदा चकल्यानं शंबराला दोन तीन जुर्माना घेतं. अदगुरू नोटीसु देतं. वायदा चुकलं फलानं तांरीक पावतो देयावं मन्तो ते न आल्यानं बँकच जपत घेउनु जातं. भांडे, बइलु तर्वाता घरू, असल ते इकुनु पक्का वसूल करतामु. डबा सांगुनु हराज करतामु. हमचं किस्त घेतामु. अद्दिकु ऱ्हाइल्यानं पोलीस पटेलु यानं हँडओवर करतामु. भुई न्हाइ घेत. अग्रीमेंट बारा सालचं ऱ्हात. मुन भुइ घेत न्हाइ. वायदा तेवडं कसूल करतं. बारा साल भरलं न्हाइ त भुई कुडा हराज करतं. नासरं भरतं.

आपल्या कुलातु शिकलेलं लोक धातु येकु, घोगं, लइ न्हाइ. या तालक्यांतु मज्या सकटु धा जन हा तं. क्लार्कु, सुपरवाइजरू, बसुडिपु कामु करतं. परकाल गावान्तु आमचं कुलीचं घावरे पांचु घर हातं. मोत्तं तालुक्यान्तु आमचं कुल शंबराला धा जन हात : टेन परसेन्टु. सर्वे कुनबाऊ काम करित्तं मुसारदार हातं. मुसारदारांसु चारू, पांचु रोजु देतं, आडमनुसु काय की तीनु, दोनु देतं. निन्नाला काय की दीडु, दोनु देतं. कापायला काय की उत्तं देतं. आमचं लोकांतु काय की शिकायचं, लिवायचं इंटरस्टु न्हाइ. गाय आन, बदलू फा. शेताला जारे इकडं जा रे तिकडं जा रे, दूद्दं काड रे श्येनु आन हेचु कामु भारी. गावाभाइरी जाचं इंटरस्टचु न्हाई. आमी संगम् लावुनु इंटरस्टु करावं मनुनु घेंटलं. आपलं कुलाले दुसरं कोनु करनार? इत्तं संगम् लाउनु घेंटलाय्. कामु करूनु घेतुम्.

नायकराव सुराव

> इतर समाजाच्या मानाने अरे जमात मागासलेली. सार्वजनिक नेतृत्व करणाऱ्यांची संख्याही त्यामुळे अगदी हाताच्या बोटावर मोजण्याजोगी. अशाच थोड्या लोकांत नायकराव सुराव (सुर्वे) या तरुणाची गणना करता येईल. वरंगल जिल्ह्यातील परकाल तालुक्यात असलेल्या मिरकुली गावाचा हा सरपंच राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या वराच जागरूक वाटला.

माजं नाव नायकरावु. तेलंगी लोकं नागेस्वरराव मनतेत मला. घरचं नावु काय की सुराव. ऱ्हातो मिरकुली. त्या गावचा सरपंच हाय. पटवारी अजुक येक कुलीचं. पांड्या अजु येक कुलीचं. मऱ्हाट मी येकला. आमी कुनबाऊ करितं. बापु, मी, अजू येकु भाऊ कुडा कुनबाऊ करितं. राजनीतिमंदी मी काय की काँग्रेसमंदी कामु करितं. अन्ता काय कीं इंद्रा गांदीचं पार्टीत हाय अदगुरू कुडा इंद्रा गांदी मन्ता मला लइ चोकटु. लइजन मऱ्हाट अत्ता इंद्रागांद्री पार्टीत हातं.

परकाल तालुक्यांतु आपलं मऱ्हाट लइ बॅकवर्ड हात. लइजन पाडे हातं. पटवारी कुडा हातं. भुइघर मन्ता येकेक घा येकर हातं उनकुंडा हातं. मुसारदार अद्दिक करूनु हातं घाइसजनु थोल्ल्या गावान्तु ऱ्हातं ते बरे

अनुक्रमणिका

हातं. कोनी सुपरवाइजर करित्तं, दुसरं जाब करितं. पंतुलु कुडा हातं. पन लिवनं कमी. अद्दिक करूनु कुनबाऊ मुसारदार ऱ्हातं.

सरकार अरे क्षत्रिय मनुनु बॅकवर्डक्लासलो बी गूपमंदी गातलो. तेच आमचं लोक फाइदा घेतु न्हाइतं. का मनुनु की हामी अरे मऱ्हाट हाउ, अरे क्षत्रिय काय की कमजातु. येकु कोन की अरे क्षत्रियलु, आमी आर्यलु. खत्री मनुनु घेंटलं तर रे खातेत, पेत्येतकुडा. आमी आर्यलु खात. (मांस...) पेतु (मद्य...) न्हाइतं खानारे, पिनारे कमजातु. अन्दुवल्ला बॅकवर्ड ऱ्हाउनशनी कुडा खत्री कस्सं मनुनु घेयाचं? अनुमानम्. खत्री मनुनु घेउनु बॅकवर्ड जाउ न्हाइ असं आमचं कुलीचं मनुनु घेटेत. आमी काय की जावा मनुनु सांगटुम्. अरे क्षत्रिय लिवा मनुनु बोलतं. पर या लोकान्सु ध्यान येत न्हाइ. अन्ता हमी संगम् घाटलाया. ये कामु करलामु. ये रजिस्टरकुडा केला या. होइल्ला. लिवनाऱ्या पारांसाटी हास्टलु करावं असं हाय. सरकार देतं. बॅकवर्डक्लाससाटी देतं. आमी पुन धा ईसु हज्ञार जमइतुम्. तीसु हज्ञारू कुडा.

चिमन्या गावान्तु हास्टल काडुनु काइ होतं न्हाइ. अदगुरू वरंगलला करूनु घेयावं मनुनु घेंटलाया. आमचं लोक समावेश घ्यावं मन्ता लइ लोक येत न्हाइ. जत्रला अद्दिकु जातं. कोत्ताकुंडी, बोम्मारी, इरन्ना जत्रला लइ जातं. वराड जालं त लइजन येतं. तित्तंचु समावेश घेटलं तर काम बनतं. अजू करूनु घेटुम्. टेक्निकल येज्युकेशनल आमचं लोक लइजन न्हाइतं. येक घोगं हातं. आर. टी. सी. लो येकु-धोगु. इंडस्ट्रीयल ट्रेनिंगलो वरंगलमंदे येकु हाय. तित्तं कामु शिकून घेतं. कानीयेम्प्लायमेंट मिळत न्हाइ. कुटीरउद्यमम्लो येकयेक हातं. कानी लोन येलंला मिलत न्हाइ. सेंट्रल गवर्मेंटचे वरंगलमदे येकु सेंटर हाय. सब्सिडिरी येरिया मुन ऱ्हातं. त्यान्तु कोन बी इंडस्ट्री ऱ्हाउ दे त्यावरे रूपियाला धावेर पांचु नासरे देतं. आमचं कुलीचं कोन तर म्होरं येयावं?

हमी लीडरू मोप कोसिस करतामु. आपले कुलीचं न्हाइ येत. आमची लाइन कुनबाऊ हाय. भुइ इकून इंडस्ट्री काडावं मुनु काम होतं न्हाई. मागं फुडं फांत को आपरेटिव कुडा होइला कानी ते संगमु बांदुनु का करता की का न्हाइ की अनुसानम्. संगालु बंदीचु, सोसायटी टाकुनु तित्तं घाजन येकल्याला येकु पातेजांव की. कुनबाऊ करतामु बोल्ल्या मऱ्हाटा घटु. अजू येक धा येकरू घे मन्ल्या घेतुम्. आजू दो बइलंघे म्हंटल्या घेतुम्. लिवाला लाव मन्ता नकरू नकरू. तर आमाला लिवाला कशाला मनितं. मुशारदार मुन ऱ्हातं. अजू धा वर्स होआव.

**(५) सुशिक्षित समाज**

प्रा. जगन्नाथम् पौर्वारम् (पवार?...)

> आपली भाषा आणि कुलपरंपरा यांच्या विषयीचा अभिमान उच्च शिक्षण घेतलेल्या वर्गात आता आता जागृत होऊ लागला आहे. मराठ्यांच्या इतिहासाचे उशीराने झालेले ज्ञान या अभिमानाच्या मुळाशी नसेलच असे नाही. मराठी भाषिकांच्या सहवासात मात्र ही मंडळी मराठी बोलण्याचे टाळतात. आपली भाषा

अनुक्रमणिका

इतकी साफ नाही हा न्यूनगंड त्यांच्या ठिकाणी जाणवला. तथापि घरांत मात्र मराठी भाषा वापरली जावी यावर आता त्यांचा कटाक्ष आहे.

प्रा. जगन्नाथम् हे तेलुगू भाषेचे बऱ्यापैकी कवी असून साहित्यशास्त्र हा त्यांच्या आवडीचा विषय आहे. अरे जमातीची संघटना व्हावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले आहेत. अरेबोलीतील लोकगीते गोळा करून ती तेलुगू लिपीत प्रसिद्ध करण्याचा पहिला प्रयत्न त्यांचा. आपल्या तीर्थरूपाकडून या कार्याची प्रेरणा त्यांना मिळाली असे ते सांगतात. प्रा. जगन्नाथम् यांचे वडील संताजी हे लोकमान्य टिळकांचे अनन्य भक्त होते. स्वराज्याच्या महामंत्राबरोबरच मराठे आणि मराठी भाषा यांच्या विषयीचा अभिमान त्यांनी आत्मसात् केला. मराठी भाषा आपल्याला उत्तम रीतीने बोलता यावी यासाठी त्यांनी त्याकालात रूढ असलेल्या बऱ्याच मऱ्हाठी क्रमिक पुस्तकांचा संग्रह केला. मराठ्यांच्या इतिहासाविषयीचे इंग्रजी साहित्य देखील त्यांनी जमविले होते.

हे घराणे मूळचे पवार या आडनावाचे. तेलुगू परंपरेस संवादी असावे या हेतूने पावाराचे पौर्वारम् असे परिवर्तन करण्यात आले.

माजं नाव जगन्नातम्, घरचं नावु पौर्वारम्. आमी इत्तं येउनु लइ वर्स जाली. आमचे बापू, पडदादा इत्तंच लइ वर्स वर्स ऱ्हातं. हामचं सोइरपनु पनु इत्तंचु. आमांसु इत्तं इत्तं सोइरे हातु. कां मनुसान येकेक गावांतु लइ सोहरे हातु. शंबर शंबर तक घरं हातु. त्यांतुचु वराड करूनु घेतं. आमांतु सार जन कुनबाऊ करित्तं. वरकड जातु आमातुनु ऱ्हाइ. गोंदली हातं. ग्यारा मासे, बार मासे कुडा हातं. आमी कुनबी करित्तं. ग्यारा मासं हातं त्यान्नी मांसु खातु. आमी बारा मासु मांसु खाइना. आमी मांसाहारू न करू. कसं म्हटलं की न करू. कसाला की न करू सांगांनं.

आमचं कुली मंडन जालं आमचं आमी सांगुनु घेन्तु. ट्रॅडिशनल गा ऱ्हातं. कुलपेद्दा मनित्तु. थोल्ला पुरूसु वराड ऱ्हातं तम्मा बलवितु. अदगुरू तेला बोट्टू लावतु. आमचं पुराहित अन्ताकोइ ऱ्हाइ. इत्तल्ले बावण येउनु सारं सांगुनु जातं. वराड त्यानंचु करिते. सरे करिते. आमचं खास पुरोहित न ऱ्हातं. आमचं कुली भवानी पूजा. तुलजा भवानी पूजा लइ. पर आमचं बाबा सारजन वैष्णव थे. अइसा हम वी वैष्णव होइल्ला. सासरडी काय की वीरसैव हातं. आमी काय की वैष्णव हाय.

आमच्या वराडान्तु लइ करूगु गीतु गावित्तं. तर्वाता ढव्वालं गीतु जो गालाचं गीतु, रकारकालु गीतु गावित्तं. इसले गीतु गावित्तं. गोंदले सारं घरान्तु कुडा गाइत्तं. गोंदली कन्दी कन्दी येतं. गाव गाव फिरून कतालु सांगुनु आमपुनु भीक मांगुनु घेतं. गीतु सांगतं. आमचं बापुसु गीतु मन्ता लइ खुसी. तेनं गीतु मिलं लेवूनु घेंटलं. पंदरा वरसु जालेतु तम्मापुनु मी कुडा गीतु कुट्ट गावित्तं लेवूनु घेतं. येकु पब्लिकेशन कुडा केल. अजु येकु पब्लिकेशन कुडा होतं. कागी गाम गाम फिरनं हाइना. अन्ता अन्ता ऱ्हाउनु गेलं. आमचं भास गीतु चोवकटु.

अनुक्रमणिका

सौ. अमृताबाई

> प्रा. जगन्नाथम् यांच्या पत्नी सौ. अमृताबाई. शिक्षण त्या कालाच्या मानाने बरेच म्हणजे चौथ्या इयत्तेपर्यन्त झालेले. सासर सुधारकात मोडणारे. तर माहेर सनातनी वीरशैव परंपरा पाळणारे, लिंगधारक. असे सांगतात की, वरंगल भागात मराठ्यांच्या ज्या वसाहती झाल्या त्यांचे नेतृत्व अमृताबाईंच्या माहेरच्या मूळ पुरुषाने केले होते. पहिली वसाहत महालिंगम्पल्ली येथे झाली. आज देखील अरेजमात आपले मूळ स्थान महालिंगम्पल्ली हेच मानते आणि अमृताबाईंचे माहेर हे आज देखील मानाच्या टिळ्याचे पहिले मानकरी मानले जाते. जाती-जमातीतील तंटे या घराण्याच्या अध्यक्षतेखाली सोडविले जातात.

अमृताबाई माजं नावु. माहेर काय की महालिंगम्पल्ली. बापू काय की कुनबाऊ फातात. ल्हान होत्तं तम्मा वराडु जालं. श्यानी न होई, तम्मापावत संसारू प्रपंचु अट्ला चाल्लं आमचे कुली सनु लइ न्हाइतं. तेलंग्याचे सनु आमी करतामु आमचुं कुडा आमी करूनु घेटामु. थोल्ली पुनिव, आखाडी पुनिव तर्वाता बदकम्मा गोकुलु अष्टमी. ते हूनु गेलं का दसरा, दीपवलि संक्राती. नाइ म्हंटलं तर कालामस्या, उगादी, जाले सनु. चैतीला सनु करनु घेंटुम्. नागपंचमीला देवाचं पूजा करूनु काय तरी गोडु खाउनु सनु करूनु घेटुम् नागाचं पूंजा मनिजे नागाला घालाचं दुद्दं नु ल्हाया. पुंजा कराच जाल. पयल नागपचमीला भावाला बलवाचं अन्ता न्हाइ न्हाल. नागपचमींसु जोक्याबरे बसुनु गानं गावित्तं आमाकडे न्हाइ. उरके नागलकता सांगतामु, पाटल पाडतामु, अन्ते.

गोकुल अष्टमीसु असोडी फलस्कार करेतामु. रेगड मटीचं काय की गोकुलु बसउनु पूजा बांदतामु. दिवलीला न्हाउनु घेतामु. चौक्कटु सनु करतामु. लेन्कीला बलविनं दिवलीला आमाकडं न्हाई. संक्रातीला आमी लेन्कीला नु जामईला बलवितुम्. बट्टे वस्ता देतामु. सनु चौकट होते. सुखांसु सनु करावं, सुखासारखं करुनु घेयावं. इष्ट असन ते करूनु घेटुम्.

मी गीतु गाविच्चं? कसलं गीतु? कोनच्च गीतु? सारं गीतुचु न्हव्वं या?

प्रा. सांबाशिवराव बॉंसरे

> अरे समाज आणि मराठी भाषा यांच्या विकासाची तळमळ असलेले प्रा. सांबाशिवराव हे मूळचे वरंगल जिल्ह्यातील मुप्पारम् या गावचे, सध्या ते करीमनगर जिल्ह्यातील जमिकुंटा या गावी असलेल्या सरकारी महाविद्यालयात तेलुगू भाषेचे प्राध्यापक आहेत. अरे जमातीची बोलीविषयक सामग्री गोळा करण्यासाठी त्यांनी फारच मोलाचे सहाय्य केले आहे.

माजं नावु सांबासिवरावु. हमी मुप्पारम् वरंगल जिल्ह्यातले. जमीकुंटी न्हातं. लेक्चरर काम करितं. आमचं कुलीला अरे का मन्ते? सारे जन अरे मनित्तं. सारं सोंचून घेंटलं मनुनु अरे मनित्तं. आमी पनु अरे, आर्य

अनुक्रमणिका

मनुनु घेंटुम्. आमचं घरचं नावु बाँसले. बाँसरे कुडा मनुनु घेतुम् बाँसले नावु कस्सं आलं? बाँसरे नावांतुनु बाँसले आला? अजु येकु बाँसरे मनुनु गाँवु. तित्तं सरस्वतीपूजा हातं. तित्तूनु आलं मनुनु बाँसरे नांमु. बोंसले शिवाजी म्हाराजाचं घरचं नावु हतं. ते कुडा होउ सकतं. बोंसले, भोंसले, बाँसले होइल्लं. आमी कुडा शत्तीय मुन मी मनुनु घेयासाटी म्हंटलं. ते बी होऊ सकतं. आमचे कुलांतु कुनबाऊ लई. ड्राय लँडु, वेटलँडु कुडा कुनबाऊ करित्तं. आमचे कुलामंदी पुजावं मन्ता आमी भवानीचं पूजा बांदतं. सिवमहाराजाचं कुडा पूंजा बांदतं. उछव सनवार मन्ता इत्तं तेलंगनातलं करतं तसंचु करूनु घेंटुम्. कुनबाऊचा मोटा सनु बइलाचं पोला करूनु घेतुम्. दसऱ्यानं नवरात्र केल्यानं सय न्हाइ. आगले बी काय करल्यानं मुन आइकिलं नाइ. मागलेन मी फाइलान् नाइ. दिवलीला इत्तं सारे करूनु घेतुम्. तस्सं हमी बी करूनु घेतुम्. जामई ऱ्हाइल्यान् ते बलऊन घेतुम्. बट्टे नवे घेतुम् वांट लावतामु. भाऊबीज मन्ता कलंना आमाकडं न्हाइ. संक्रांतीला भइन ऱ्हाइल्यानं बलवितुम्. लेन्कीला लेन्कीचं दाल्ल्याला कुडा बलवितुम्. नवे बट्टे देउनु वाँटु लावतामु.

राजन्ना अंगरके (आंग्रे?..)

अरे मराठा संघाच्या संघटनेचे कार्य करीमनगर जिल्ह्यात जोमाने करणारे राजन्ना हे व्यवसायाने सरकारी शाळेतील शिक्षक आहेत. जवळपासच्या खेड्यातुन फिरून ते समाजाच्या जागृतीचे कार्य करीत असतात. मूळचे हे शेतकरी कुटुंब आता तालुक्याच्या गावी हुजुराबादला स्थायी झाले आहे.

मी राजन्ना. घरचं नावु आंगरक्यांचे. धंदा : टिचुरू, सरकारी इस्कुलांतु हेडमाष्टरू. अरे मराठा संगम् टेवुनु घेंटलं. काम कां करावं, कस्सं करावं, सब् जना मिलुनु कस्सं ऱ्हावावं ये संगमु उतरलेनं ठावं होतं. करीमनगर जिल्ह्यान्तु आमचं लइ लोन्कु ऱ्हातं. लेवूतले लोन्कु आमचं कुली हातं लइ न्हाइतं. तेनं नवकरी करूनु घेतं. बॅकवर्ड लिस्टलो ऱ्हाइल्यानं फाइदा होतं. सारे जनांसु बुलवावं बुलुनु येकले येकु मिलुनु घेयावं. कस्सं लिवा टाकावं, मराट भास येइना ते सिकनवं. पाटसाला टाकुनु ये करावं मनुनु घेंटलंया.

आमचं कुलांचं प्रधान व्यवसाय कुनबाऊ ऱ्हातं. कुलाचं पंचात सिस्टम हा. कानी अत्ता अन्ताचु मिलुनु घेंटलं. आमचं कुलीचं माली पाटील, पुलीस पाटील, पांडे कुडा हातं. ये वतनदार कस्सं जालं ठाव न्हाई. लडाईचं दिसांतु आमचं लोकु आलं असल मनुनु मिया मनुनु घेंटलं. आमचं लोकु बिजनस करतं, गवर्मेंट कंट्राट कुडा करतं. कानी लईकरून कुनबाऊ करतं. धनवंत लइ न्हाइतं. लकपती न्हाइतं. हजारपती हातं. भुई धा, बारा येकरू न्हातं. येकु, दोन येकर वाले लई हातं.

या सऱ्याच येकी करावं मुन हाय. कस्सं करावं, अभी सोंच रहे हैं. अदगुरू बच्चे पढना. ते कस्सं करावं, का करावं अभी समझ होइना. आमचं येजिटेशन न्हाइ. खेड्यान्तु लोन्कु लई. शारान्तु ऱ्हाइना. लईकरून मुसारदार हातं. तेहीचं पोरं तित्तचु मुसारदार ऱ्हातं. आमाला लीडरू कोनु न्हाइ. आंद्रातु लीडरू हातं, कामु चोक्कटु होतं. आमी केल्यानं गवर्मेंट करित्तं. न्हाइ केल्यानं तेबी का करितं न्हाई.

अनुक्रमणिका

## (६) स्त्रियांच्या मुलाखती

अरे समाजातील स्त्रियांना बोलते करणे हे मोठेच दिव्य. आगोदर त्या समोरच येत नाहीत. परक्या माणसापुढेच काय पण गावातल्या शिष्ट आणि वतनदार माणसासमोर येऊन बोलणं ही मोठीच अवमर्यादा स्त्रियांच्या दृष्टीने मानली जाते. बहुतेक ठिकाणी वतनदार मंडळीसमवेतच फिरावे लागत असल्याने त्यांच्या उपस्थितीत कोणतीही स्त्री बोलत नसे. या समाजातल्या वेगवेगळ्या घरातल्या स्त्रियांची मुलाखत घेऊन त्यांनी जोपासलेल्या मराठी भाषेचे नमूने गोळा करण्याच्या प्रयत्नात त्यामुळे फारसे यश आले नाही. स्त्रियांच्या तोंडी असलेली गाणीच फार मिनतवारीनं गोळा करता आली. साठी ओलांडलेल्या काही महिलांनी अगदी तोटक्या दिलेल्या मुलाखती पुढे देण्यात येत आहेत :

मल्लक्का (वय : ८० वर्षे)

मजं नाव मल्लक्का. सासुरडी नारायनपूर. म्हाअेर काय की येलकुर्ती माजं लेन्की इत्तं ऱ्हात्तं. लेन्कु न्हाइ. लेन्कीपसं न्हाउनु खातं. वयसु से न्हाइ. असन आट धा. आमी सनु लइ करतुम्. कालामास, आखाडी पुनिव, नागरपंचमी, दिवली, संक्रांती. दिवलीला देवाला बोनं घालतुम्. देवु आमीच पुंजुन घेतुम्. आमचं घरी येम्लडीचं राजन्ना पुंजतम्. नरसिमस्वामी पनु हा. नाय मन्लं तर गट्टू मल्लाना बी हा. भवानीला बी पुंजुन घेतुम् गोंदल काहुन घेतुम्. वराडान्तु अंबीलमांडव करित्तं. हलद दलित्तं. हळदीचं गानं व्हय? मला सय न्हाइ बाबा. दाल्ला मरून धा वर्स जाली. हलदीचं गानं मनू कसं बाबा?

आमक्का (वय : ६० वर्षे)

नाव मजं आमक्का. वयसु असन सा धा. इत्तं लेन्कीचं घरी ऱ्हातं. जामई कुनबाऊ करित्तं. देव येम्लाडी हा. कट्टा मल्लन्ना हा. सनु नागरपंचमी, पोला, बइलाचा पोला. दिवली नागरपंचमीला लेन्की बलवितं. जाँभईला बट्टे देतं.

कनकम्मा (वय : ६० वर्षे)

कनकम्मा मन्तेत मला. दाल्ल्याचं नावु इरय्या. घरचं नावु डुकरे. आज्ञोल काय की सिंद्याचे. आमचं गामु काय की धाने गामु. वयसु सा धा. पांजन लेन्की मला. लेन्कु काय की येकु. आमच्यान्तु वराड जालं मन्ता पेले हलदी दलित्तं. तर्वाता कायकी देवक बंदायचं. देवकासु पानी गालतुम्. नये बट्टे नेसवितुम्. धई-भात कट्यार सिदोर बांदतुम्. ये जालंनु पांजनु सव्वासिनी वारल्यास जातुम्. वारल्याचं गीत गाइत्त येतुम्. वरे चांदावा असतं. नवऱ्याचं भइन काय की हात हातवा घेतं. देवक नवऱ्याचं भइन बांदतुम्.

अनुक्रमणिका

शेताचं गानं मला येइना. तम्मा काय की बदकस्मा गायचं. आमचं थोह्लं सनु संक्रांती. संक्रांतीला लेन्कीला बलवितं, टेऊन घेतं. बट्टे देत, वंटी बरतं. कालामासला काय की पुरनपोली करतं. खीर रांदून घेतं. बदकम्माचं सनाला फुलगीर करतं. बोटवलं बइलाचं सनाला. सींर रांदून घेतं. फुलगीर कैरीचं ऱ्हातं.

मल्लाक्का (वय : सुमारे ७० वर्षे)

मी व्हय? मी मल्लाक्का. घरचं नांवु सुराव्याचे. म्हाइर गोविंदपूर. वयसु असंग सा धा न्हाइ तर सात धा. अद्दिकु न्हाइ. आमी येम्लडीचं राजन्ना पुंजतुम्. इरन्नाला कुडा जातुम्. गौरम्मा बी पुंजतं. आखाडी पुनिवु, बइलाचं सनु, संक्रांती थोह्ले सनु ऱ्हातं. सिवरात्रीला कुडा देवांसु पुंजतुम्. बोनं वाऊन घेतं. आखाडी पुनिवेला पोल्या करतुम्. पाय पडतुम्. नागरपंचमीला नये बट्टे घेतुम्. दुदु देवाला तुपु मनुनु गावितं. आमाला माय-बापु गीत गावित्तं.

**स्त्री पुरुषांचे अलंकार**

बिज्ञंकी येथे एका वृद्धेकडून अलंकारांची बरीच माहिती मिळाली. काही अलंकारांची नांवे अशी :

गळ्याचे कानान्तु बिगबाली, हातान्तु पोची, दाल्ल्याच्या पायाला काइ न्हाई. आडमानसाँसु पाइ पइंजनु, तर्कांता गूंडू, गुंडलू, कॉकनु, बिंदलु, मासपटा, तोडे लागतोडे, पुन्नाळु, बुगड्यॉ मोट्याचं, सरपारे मोत्याचं, बेसर, बुचडीचं पूलू,गळ्यांतु चितांगु, सरी सोन्याचं, मोत्याचं चुडा, सोन्याचं सांकळं. गोपु, सरपु सरपु मनुनु दंडच येला. चितांग सरीवानं ऱ्हातं. कालपोत, मंगलसुतर, बोटाला मुंद्या सांकल्या कुडा ऱ्हातं.

**(७) मऱ्हाटी बाणा**

> महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्या विषयीचा अभिमान ही केवळ सुशिक्षित समाजाची मिरास आहे असा गैरसमज सार्वत्रिक आढळतो. निरक्षर माणसात देखील अशा प्रकारचा अभिमान किती प्रखर असतो याची कल्पना श्री. बाबय्या नागलाने या शेतमजूराच्या पुढील मुलाखतीवरून येईल. बाबय्या हा पंकडपल्ली, जिल्हा करीमनगर या गावी राहतो. त्याने साठी ओलांडली आहे. तरीही मजूराचे काम तरुणाच्या तडफेने तो करीत असतो. शिक्षणाचा गंध नसताही तो तासन्तास अस्खलित बोलू शकतो. इतकेच नव्हे तर आपल्या समाजाचे मार्गदर्शन करू शकणारे. विचारही आंतरिक तळमळीने व प्रभावीपणाने मांडू शकतो. त्याच्या राहत्या घरी अरे समाजाच्या संघटनेसंबंधाने चर्चा झाली असता त्याने प्रकट केलेले विचार पुढे दिले आहेत.

मजं नांवु बाबय्या नागलाने. कुनब्याचं कामु करितं. यीस वर्स कोतवाली केलं. माली पाटील केलं. अन्ता काइ न्हाई. सोडून देलं. का मन्ता ये कामामंदी चौकटू ऱ्हाय यीना. अंजुमनचं रूपय आननं देनं लेनं ते

राजकीयम् गा कामु ऱ्हातं. भारी खट ऱ्हातं. अन्ता कां केलनं मन्तं. अन्ता करिनं. इत्तं आता चौकटु नांगरून घेतं. धंदा करतुमु. नांदू चौक्कटु ऱ्हातं. चारा अन्तामु, बइलू सोडतामु, नांगरतामु.

ये अरे मराटा संगमु टिवलं. फाउजे. आमचं कुळीच तेनं तेनं मंडन करूनु घेतं. कानि ये संगमवारू कम्मा कम्मा येजितु. तू का की गुड्यावरनु येतं, मी का की गुड्यावरनु येतं. येउन्शानं कुनाचं कुनाला सोबतु मिलनं. यान्तु आबू काइ? आब काइ की घेउन्शान आमचं कामु काइ की नीट करून घेयाचं. मऱ्हाट हाव, मऱ्हाट काम नीट करूनशानी घेयावं. अज्ञु येकु कामु करूनु घेयावं. नोको म्हटलं. दुनियाभर का की आमचं गोतु. आइकिलं मानसान्तु काय की घेउनु काम करितं. ये काय की चिम्नं, थोल्लं राजन्ना. त्यानी त्यानी मिलुनु संगमु बांदुनु घेंटलं. संगम् बांदुनु घेतल्यावरे चौक्कटु वाटलं. हुजुराबादचं कुडा चांगटु वाटलं.

मी इत्तं कुडा लेक्चर देली. तित्ते कुडा लेक्चर देली. सांगिटलं थोल्ले कुलीचं आपन लोकु. नीट लिवं सिकू न घेयावं. माजं मनुनं हेचु. मला कुडा उद्देशमात्र्म. माजं नावु बुडालं त काय होइल्लं. ये मऱ्हाट जल्मु कशाला? ये मऱ्हाटकुल मले येकट्याले मिळालं त का होतं? ये चोग्गं मिलुनु ऱ्हावावं. ऱ्हाइल्यानं का की नांवु होतं मन्नु. कानि ये चोग्गं मिलुनु ऱ्हाइनं. येकलेवरेचु येतं. ये चोग्गं मिलुनु ऱ्हावं मऱ्हाट्याचं साउमं येतं. साउमं ऱ्हावावं. पांडरे बट्टे येउन्दे काळे बट्टे येउन्दे तेला मानिलं. खालेकरावं मन्लं खाले केलं. वरे करावं मन्लं वरे केलं. कानि यानं मागं-पुडं जालं तर कस्सं? ये कस्सं करुनु येउ मनिल्यानं कस्सं? माजं घोंडा लागलं जावं. कस्सं करुनुं घेंटलं मन्ता कस्सं का करावं? सगले मिलुनु कामु करावं तम्मा कामु होतं होइल्तं.

परमा संगमु बांदनु घेंटलं तम्मा मियां का म्हंटलनु : ये पुरानंचु पुरानं वडिल मानसं येइनातु. कामा येइनातु. जे निम्मेशिम्मे पोरं हातं ते पोराहीला पुडं टेउन्शानी का की आमी वडिल मानसं कां करावं? आमी वडिल मानसं का की या पोराहीला वाँटंला आनावं. मनुनु घेंटलं. पोरं का करते मनु न्हाई. आमीच सरं करतं मनु न्हाइ. ये पोरं खानेवाले पीनेवाले ऱ्हाइनातु. कानि येचु का करितं तेचु कां करितं आमी मनुनु घेइना. जानं, बोसनं बसनं ये वडिल मानसांसु कामु. कां होतं?

येलकुर्ती संकरराव मनुनु माजं भाऊ हाय. तेला उब्ब करूनु आडवं पाडनारं आमीचु हाय. मऱ्हाटाला मऱ्हाटा कामा येइना. मऱ्हाट वऱ्हे कस्सं येइलु? येउ द्या जाल. माजं कामु करता तुमी करा मनावं. मऱ्हाटान्तु बल ऱ्हावावं. ये मऱ्हाट पकं ऱ्हावावं मनुनु मी सांगतु. चांगलं कामु कराइसु धा ईस पोर हातं. नक्कर मन्ले तरी धा हात. तेन करालं कामु तेवडं करूनु घेयावं. माजंचु नांवु थोल्ल कस्सं? होइल्लं मनुनु घेऊ न्हाइ : मऱ्हाट कुल थोल्लं कस्स होइलु फावावं. चोर आलं. येकल्याने बगुनं उचलून नेलं मन्ता चोग्गानं फावावं. ये कस्सं कामु करावं? तेच गेलं मला काइ अस्सं मनुनु घेऊ न्हाई. आज तेचं गेल उन्द्या आपलं ऱ्हातं? अस्सं मनुनु घेयावं.

ये दुद्दचं दुद्दुं कस्सं होतं ये भगवान नारायेन कुस्ट परमात्मांसु ठावं आमांसु तेनं बुद देयावं. येकाचं वाटं जाचं न्हाई, येकाघं घाट जाचं न्हाई. केलं सगल्यांचं बोजाचं कामु मांडु घेयावं. गुरूपासी जाइ तित्तं संगटु तित्तं जावावं. सरकारपासी जाइ संगटु तित्त जावावं. नांवु येऊनु जावावं. नांवु करूनु येवावं. चौक्कोटु मागुनु घेई. कोना संगटू गेलं मेव न्हाई. यान कां केलं? याचं यानं गाबरून गेलं. जे देवाला फाउजे ते कामु करित्तं. राजाला

अनुक्रमणिका

फाउजे ते चौक्कोटु नसल्यानं करिनं. आमचं लोक का करित्तं? आडाऊ पांडेपन करित्तं. आडाऊपनानं कामु होतु न्हाई. आमच्यातु जे चौक्कोटु न्हावावं ते कामु करावं. संगटु घेउनु करावं सर चौक्कोटु न्हातं.

या गावान्तु दीड संबरू घरं हातं. ये दीड शंबर घराहीनं का होइनं? सुम्मं मांजरासकं पलुनु गेलंना कामु होतु या? मी येकलं पलुनु गेलंनं का होतं? मी येकलं घट न्हाइलेन का होतं? लोकाहीला येनं गुलाम कराचं, गुलाम न्हातं. चार नासरे देले, खाल्ले पिल्ले येनं गुलाम न्हावावं? मऱ्हाट मानसानं काहून गुलाम न्हावावं? आज न्हाई त उन्द्या नांवु होतं मनुनु चौक्कोटु न्हावावं. इतं बसुनु न्हाउनु कामु होइना. देस फिरावं, फाउनु घेयावं. संगमु बांदुनु घेंटलं. वडिल मानसं चौक्कोटु का करूनु घेयावं. पोराहीला पुडं करुन्शान कामु करूनु घेयावं.

वाँटु चालाया सिकत्तं. काम कराया सिकत्तं. सरेला सूक पडावं ये माजं मनान्तु. कोन्नी काय संगट घेउनु जाइनं. तिचं येमाचं हातान्तु जाइनं, इत्तं पोलीसाचं हातान्तु जाइनं असं कामु करावं. धर्माचं वडी न्हावावं. कर्माचं वडी न्हाऊ न्हाई. धर्माचं वाँटंजा तुजं वाँटं चौक्कोटु व्हीलु. तुला वम्साला अब्बिमानु न्हाया. कामाचा कुडा अब्बिमानु न्हावा. माजं कामु मी करून्शान घेउनु मनुनु अब्बिमानु न्हावा. अब्बिमानु न्हाइन ते मानूस न्हाई.

**३**

## तेलंगणाच्या सरहद्दीवरील मराठी गीते

[उस्मानिया विद्यापिठाच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या मराठी स्वाध्याय-संशोधन पत्रिकेच्या ७त्या अंकातून पुढील लेख उद्धृत करण्यात आला आहे.]

ही गीते नांदेड येथील प्राध्यापिका सौ. ताराबाई परांजपे यांच्या संग्रहातून निवडलेली आहेत. सौ. परांजपे मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध लिहीत असून त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे : "मराठवाड्याच्या पूर्वसरहद्दीवरील लोक साहित्याचा अभ्यास." सरहदीवरच्या भागात गावोगाव फिरून अत्यंत परिश्रमपूर्वक जमविलेल्या लोकगीतांपैकी काही गीते पत्रिकेसाठी दिल्याबद्दल आम्ही सौ. परांजपे यांचे अत्यंत आभारी आहोत.

देशाच्या भाषिक, राजकीय आणि प्रादेशिक सीमा कोणत्याहीं प्रकारच्या असल्या तरी सांस्कृतिक सीमारेषा आखण्याचे कार्य साधारण जनतेकडूनच घडत असते. दोन भाषिक विभाग जेथे मिळतात तेथे तर अक्षरशः भाषिक व सांस्कृतिक संमेलन घडलेले आढळून येते. मराठवाडा आणि तेलंगण यांच्या सरहद्दीवर अशाच प्रकारचा संस्कृतिसंगम झालेला दिसतो. तिरुपतीचा व्यंकटेश हे आंध्रप्रदेशातले लोकदैवत. मराठी मुलखात पंढरीचा विठोबा आहे त्याचप्रमाणे. या दैवताचे लोकरूढ नाव गिरीचा बालाजी. महाराष्ट्रात स्थायी झालेल्या पण मूळ आंध्रप्रदेशातून आलेल्या वैश्य समाजात गिरचा बालाजी हे कुलदैवत आजही मानले जाते. काही नैमित्तिक कारणांमुळे अन्य समाजांतही गिरीचा

अनुक्रमणिका

व्यंकोबा कुलदैवत म्हणून पुजिला जातो. परंतु, मराठवाडा व तैलंगण यांच्या सरहद्दीवर मराठी भाषिकांनी देखील या दैवताचा सामान्यपणे स्वीकार केला आहे. या दैवतासंबंधी रूढ असलेल्या गीतांत बालाजी हा "तेलंग-राजा" असल्याची जाणीव स्पष्टपणे दिसून येते.

पुढे दिलेल्या गीतांत गिरीच्या बालाजीचे केलेले वर्णन आले आहे स्त्रियांनी आपल्या लौकिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर बालाजीला आळविले आहे. बालाजीच्या गिरीचे, त्याच्या वैभवाचे वर्णन करताना काही स्त्रियांनी पंढरीच्या विठोबाशीही त्याची तुलना केली आहे. भोळ्या भावातही असलेला मार्मिकपणा या तुलनेत दिसून येतो.

### १. तेलंगा राजा

**तेलंग्या देशामध्ये : साळीचं पीक फार**
**भाताचा जेवनार : देव बालाजी ।।१।।**

**आठा दिवसा शिक्कुरवारी** [शुक्रवारी] **: धया-दुधाची मोरी वाहे**
**तेलंगा राजा नाहे : देव बालाजी ।।२।।**

**बारीक तांदुळ : सडीते जिऱ्यावानी** [जिऱ्यासारखा]
**तेलंग्याला मेजवानी : देवा गं बालाजीला ।।३।।**

**तेलंग्या रानामध्ये** [विभागात या अर्थाने] **: हालकीचा** [हलकी : ग्रामीण वाद्य; हे वाद्य हरिजन जमातीतील लोक वाजवीत असतात. देवाला समारंभपूर्वक नैवेद्य नेत असतांना वाद्य वाजविण्याचा प्रघात आहे. हे वाद्य नौबदीच्या तोडीचे असल्याचा ग्रामीण स्त्रीचा समज.] **परिपाठ**
**आला नौबद वाजवीत : देव बालाजी ।।४।।**

**लांब लांब बाई बाल** [केस] **: यंकोबा तेलंग्याचे**
**चारी गात** [चौकट] **पलंगाचे : बाई गं सोनियाचे ।।५।।**

**आठवडा शिक्कुरवारी : लवंगाचं राहतं**
**तेलंग्याला शाकाव्रत** [चातुर्मासातील प्रत्येक महिन्यात खाद्य पदार्थातील एकेक वस्तु वर्ज्य करावयाची असते. उदाहरणार्थ, द्विदल धान्य, कडधान्य इ. या व्रतास शाकाव्रत म्हणतात. मोहरी वर्ज्य असल्याने लवंगाचे रायते केले हा भाव.] **: देवा की बालाजीला ।।६।।**

**साळीच्या तांदळाला : येतो कापराचा वास**
**तेलंगण तूजा देस : देवा बालाजी ।।७।।**

अनुक्रमणिका

बारीक तांदूळ : गंगेचं घाला पानी
तेलंग्याला मेजवानी : देवा गं बालाजीला ।।८।।

गिरीचा यंकटवास : तेलंगणी रहीवास
झेंडा जातो आषाडात : चढतो गिरी घाट ।।९।।

## २. गिरीचा आनंद

गिरी चढताना : क्रमरी बांधला शेला
पुत्रासाठी नवस केला : देवा गं बालाजीला ।।१।।

गिरी गं चढताना : गोविंद गोविंद मनावं
लक्ष नारेळ फोडावं : गरुडखांबापाशी ।।२।।

नऊ लाकाची [लक्षाची] पायरी : चडता आलाय् शीन
कवा होईल दरशेन : देवा बालाजी ।।३।।

चल गं जाऊ पाहू : गिरीच्या आवारात
नंदादीप जळत : देवा गं बालाजीचा ।।४।।

आठा दिवसा शिक्कुरवारी : नैवेद्य खिरीचा
राजा जेवतो गिरीचा : देव बालाजी ।।५।।

वाजंत्री वाजती : वाजती थोर थोर
झेंडा जातो गिरीवर : देवा या बालाजीचा ।।६।।

चला गं फाया [पाहण्यासाठी] जाऊ : यंकोबाची गिरी
नऊ लक्ष की पायरी : देवा या बालाजीची ।।७।।

चला गं फाया जाऊ : गिरीचा परवत [पर्वत]
चंदनाच्या डोंगरात : देव बालाजी ।।८।।

घरा पाव्हणा आला : हालक्याचा परीपाठ
उतरला गिरीघाट : देव बालाजी ।।९।।

अनुक्रमणिका

आठ दिवसा शिक्रुरवारी : निवेद खिरी-खिचडीचा
घरी पाहुणा गिरीचा : देव बालाजी ।।१०।।

गिरीच्या पायऱ्या : चढते दमानं
कडेला बाळ तान्हं : देवाच्या नवसाचं ।।११।।

घरा पाव्हणा ग आला : गिरीचा गवळी
भोजनाला तूप-पोळी : देवा या बालाजीला ।।१२।।

गिरी ये चढताना : पायाला आले फोड
नवस हाये अवगड [अवघड] : देवा या बालाजीचा ।।१३।।

चला फायाला जाऊ : गिरिवरला यंकटी
सोन्याचा चवकटी : त्याचिया देवळाला ।।१४।।

चला जाऊत फायाला : गिरीचा गोविंद
सोट्या उगळितो गंद : मला वाटतो आनंद ।।१५।।

यंकोबाच्या गिरीवरी : मोठे मोठे सावकार
सवाखंडी मनुहार [जाड पुरीच्या आकाराचा गोड पदार्थ तिरुपतीला देवाचा प्रसाद म्हणून वाटण्यात येतो.] : देवाच्या निवेदाला ।।१६।।

यंकोबाच्या गिरीवरी : चारोळीचं पुरन
पिठीसाखर घोळण : देवाच्या निवेदाला ।।१७।।

यंकोबाच्या गिरीवरी : रथ गाड्या मिरविती
लक्ष नारेळ फोडिती : देवा या बालाजीला ।।१८।।

चला ग फाया जाऊ : गिरीवरला आनंद
घंटा बोलतो गोविंद : देवाच्या महाद्वारी ।।१९।।

### ३. आधी जेवा माझ्या घरी

बारीक तांदूळ : गंगाळी भिजू घाला
सखा पारण्याला आला : देव बालाजी ।।१।।

अनुक्रमणिका

बारीक तांदूळ : जिऱ्याच्या बरोबरी
आधी जेव माझ्या घरी : देव बालाजी ।।२।।

लक्ष्मुमीबाईचा : सैपाक तातडीचा
जेवनार खिचडीचा : देव बालाजी ।।३।।

बारीक तांदूळ : आधानी आले मोती
कारागीर तूजा पती : देव बालाजी ।।४।।

बारीक तांदूळ : सडीते शंखापुरी
आधी जेवा माझ्या घरी : देवा बालाजी ।।१५।।

बारीक तांदळाचा : हंडा शिजतो भाताचा
वामन जेवतो गिरीचा : देव बालाजी ।।६।।

शाखा ग पदरी शाखा : पापड तातडीचा
निवेद खिचडीचा : देवा या बालाजीचा ।।७।।

बारीक तांदूळ : आधानी किती ठेवू
पंगतीला दोघं भाऊ : बालाजी गोविंदराव ।।८।।

बारीक तांदूळ : आधानी बातड
माज्या सख्याची तातड : देवा या बालाजीची ।।९।।

बारीक तांदूळ : आधानी झाला खवा
गरबड जव्हा तव्हा : देवा या बालाजीची ।।१०।।

गहू ग ओलवीते : तांदूळ सडवीते
पारण्याला बोलावीते : देवा या बालाजीला ।।११।।

साली कुटूनी भात : गहू दळूनी शिरा
आला गिरीना सोयरा : देव बालाजी ।।१२।।

अनुक्रमणिका

### ४. बालाजी आणि विठोबा

**बाई गिरीचा यंकोबा : हाये पैशाचा लालची**
**माळ बुक्क्यात संतोषी : पंढरीचा पांडुरंग ।।१।।**

**गिरीचा बालाजी द्रव्याचा आहे लोभी**
**वर्षा मागतो कानगी** [देवीच्या नवसा प्रित्यर्थ ठेवलेली रोख रक्कम. तिरुपतीदेवस्थानात कणगीच्या आकाराच्या पात्रात ही रक्कम भक्त मंडळी ठेवत असतात. त्यावरून "कानगी" असे नवसाच्या रकमेला नाव पडले आहे.] **: .......**

- मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिकेच्या सौजन्याने

## ४

## [अ] सुरभी नाटकमंडळीसंबंधी

सुरभी नाटक मंडळ्यांसंबंधी बरीच माहिती दुसऱ्या अध्यायात आली आहे. या नाटकमंडळ्यांशी संबंधित असलेल्या नटनटींच्या मुलाखतीतून ही माहिती गोळा केलेली आहे. या ठिकाणी गोविंदराव बनारसे यांची वृद्ध कन्या शांताबाई यांची मुलाखत देत आहे. शांताबाई आता नाट्यव्यवसायातून निवृत्त झाल्या आहेत. ही मुलाखत १-४-८१ ला घेतली. संभाषण मराठी-तेलुगू अशा मिश्र भाषांतून झाले. वाक्यरचना शक्य तो शांताबाईची देऊन माझ्या शब्दांत माहिती संकलित केली आहे.

गोविंदराव माझे वडील. बापाच्या घरातून लहान असताना पळून गेले. गेले झालं पळून. एका पारशी कंपनीत गेले. पडेल ते काम करू लागले. मला घरी कोणी नाही म्हणाले. पडेल ते काम करीन म्हणाले. कंपनीत त्यांना रोज दोन आणे देत. एकवेळ जेवीत. तोंडाला रंग कसा लावीत हे पाहून घेतलं. थोडा थोडा रंग लपवून ठेवू लागले. त्यांचे बाप काय की पत्ता घेत कंपनीत आले. हा माझा मुलगा म्हणू लागले. याला कोणी नाही कंपनी म्हणे. हा माझा मुलगा. बापाचं म्हणणं. मुलगा तुमचा तर घेऊन जा म्हणाले कंपनीवाले. येत नाही म्हणाले गोविंदराव. बाप ये सांगू लागला. नाटकाचं काम शिकविलं तर येतो, गोविंदराव बोलले. शिकवितो बोलले बाप. दोघं माघारी आले.

नाटक करायचं तर गानं पाहिजे ना? गानं काय? शिकतो की म्हणाले गोविंदराव. पोषाख पैदा केले. गड्याची बायकांची कापडं गोळा झाली. बाप माझे रोज डोंगरावर जाऊ लागले. आवाज कमावला. आवाज मोठा काढायचा. उंचीवर सारखा टिकवायचा. दुसऱ्यांना तेच शिक्षक मिळालं. मग गाणं शिकणं सुरू झाल. आपण शिकले. दुसरे शिकले. नाटक खेळलं. एक सरकारी अमलदार नाटक पाहिला. खुष झाला. नाटक आवडलं म्हणाला. मोठ्या गावात नाटक खेळा म्हणाला. नाटक खेळले. दोन-तीन नाटकं खेळले कंपनी झाली. पुढं गोविदरावाचं लग्न झालं. लेक-जावई झाले. साऱ्यांना हेच शिक्षण. कुटुंब कबिल्यासह गावा गावाला नाटक खेळू लागले.

अनुक्रमणिका

माझ्या बापूला साठ वर्षे झाली. लोकांनी समारंभ केला मला आया दोन. दोघींचा पण सत्कार झाला. सात नद्यांचं पाणी आणलं. दोन आया गोविंदराव यांना मंगलस्नान झालं. गोविंदरावाचा स्वभाव उदार-दानधर्म बरा केला. येलूरला देऊळ बांधलं.

लंकादहन नाटकात मारुतीचं काम करायचे. मारुतीची भक्ती फार. शनिवारी उपास कडकडीत. एकदा लंकादहनाचा खेळ झाला. शनिवार होता. लंकादहन सीन झाला. शेपटीला चिंध्या गुंडाळल्या. पेटवल्या, बापूला लथ लागली. अंगावरचे कपडे पेटले. बापूला शूध नाही. पाहणारे समजले अभिनय करतो. त्या सीनमध्ये एकटा हनुमान दुसरं कोणी नाही काय करावं? थोरल्या आईनं पाहिलं. बापूला शुद्ध नाही. रामनामाचा जप चालू. आई पटात गेली. घागरीनं पाणी ओतलं. आग विझली. अंगाला भारी भाजलं. भक्तिभावानं जोडलेले हात इतके घट्ट सुटेनात. मोठ्या आईनं जात्याच्या पालूला दोर बांधून ओढलं. हात सुटले, पण उजवा हात कामातून गेला. आईनं नरसम्मा पेटच्या मारुतीला नवस बोलली. काणगी वाहील म्हणाली. हात बरा होऊ दे. देव पावले. सहा महिल्यानं लेखनी धरता येऊ लागली. त्या काळात कुठले दावाखाने नि कुठली दवा, खोबरेल, लोणी चोळत होते झालं.

एका जागी बसून पोटाचं भागणार कसं. तीन महिन्यानं मुक्काम हलला. पडावावर प्रवास. पडावातच आई बाळंत झाली. बापूनं विचारलं काय झालं? मुलगी म्हणालं कोणी तरी. तोंड लहान झालं. आम्ही दहा बहिणी. आम्हाला भाऊ नाही. कष्टी झाले. किनाऱ्याला लागल्यावर पायीच तीन मैल चालले. माझी बाळंत झालेली आई देखील. बाळानं विचार केला. मोठा खटला. पोसणं कठीण. आम्ही चार बहिणी एकाच घरात दिलेल्या. आमची मुलंबाळं. कर्त्यांनी वेगळं व्हावं म्हणाले.

आम्ही वेगळे झालो तेव्हा बाबाकडून ५०० रु. घेतले. त्रास झाला. सावरलो. आपल्या पायावर उभे राहिलो. बापूंनी नाट्यपरिषद केली (१९२९). मी ६-७ परिषदेला गेले होते. नाटकाचे काही प्रवेश करून दाखवी. परिषद उभारली बापूंनी. पण, त्यांचं नाव आता कोणी घेत नाही. सिनेमात सुद्धा कामे केली. जीव लागला नाही. आमचं मूळ घर नाटक. तेच आमचं विश्व. कला नाटकातून प्रकट होते ही आमची श्रद्धा. या श्रद्धेवर टिकून आहोत. नाटकात सर्व भूमिका सारख्याच. लहान-मोठा असा भाव नसतो. भूमिका समजून उभी केली की ब्रह्मानंदच.''

## तेलुगू नाटकात मराठी चाली

रघुनाथपल्ली येथे 'वीरब्रह्मदेवनि चरित्रमु' हे नाटक १० मे १९८१ ला पाहिले. रोजनिशीत त्या दिवशी केलेली नोंद पुढे उद्धृत करीत आहे.

नाटक रात्री ९-३० ला सुरू झाले सकाळी ३.६ ० ला संपले. नाटकाला प्रारंभ नांदीने झाला. नांदी पडद्यात झाली. 'नमन नटवरा विस्मयकारा' या या चालीवर नांदी होती. संपूर्ण नाटकात पुढील राग व मराठी नाटकातील पुढील पदांच्या चाली होत्या :

**राग :** भैरव, वसंत, केदार, आणि भैरवी

**चाली मराठी नाटकाच्या :** (१) नंदनवन फुलले (२) धनी मी कशी वरीन अधना (३) मी अधना न च हे प्रीती मना... (४) हे काय विघ्न... या नाटकात पुढील पुरुष भूमिका स्त्रियांनी केल्या होत्या.

नारद, ब्रह्मदेव, ब्रह्मदेवाचा धाकटा मुलगा.

श्रीशारदाविजय नाटक मंडळी या संस्थेतर्फे या नाटकाचा प्रयोग झाला. या मंडळीची स्थापना १८८७ साली झाली असली तरी इ. स. १८८२ पासून या मंडळींनी स्वतंत्रपणे नाट्यप्रयोग करण्यास प्रारंभ केला होता. सुरभी कुटुंबांपैकी बाबाराव अवटी हे ही नाटकमंडळी सध्या चालवतात. बाबाराव अवटी (अवेटी) यांची आजी (वडिलांची आई) पापाबाई ही तेलुगू रंगभूमीवरील पहिली स्त्री-नायिका आणि श्रेष्ठ गायिका. त्यांच्या गायनाच्या ध्वनिमुद्रिका H M V ने घेतल्या होत्या. नटाच्या ध्वनिमुद्रिका बाजारात येण्याचा तो पहिलाच प्रसंग. बाबारावांचे वडील पुलय्या हे देखील नावाजलेले नट. त्यांची पत्नि (बाबारावांची आई) धनलक्ष्मी श्रेष्ठ गायिका म्हणून ख्याती पावली. धनलक्ष्मी गोविंदराव बनारसे यांच्या दहा कन्यांपैकी एक. या दांपत्याला चार मुले : बाबाराव, प्रकाशराव, चंदरराव आणि लीला पापाराव. लीला पापाराव यांचे गुंतूरला नाट्यवस्तुभांडार आहे. चंदरराव स्वतःची कंपनी चालवितात. प्रकाशराव आणि बाबाराव या पुरातन नाटक मंडळींचा व्यवहार पाहतात.

प्रकाशराव उत्तमपैकी गायकनट, त्यांची पत्नी शकुंतलादेवी हीही गायिका. आता निवृत्त झालेली. प्रकाशरावांच्या मुलींपैकी दोघी आईवडिलांची गायन-अभिनय-परंपरा याच कंपनीत चालवितात. या दोघींपैकी जयश्रीने या नाटकात नारद आणि कैकाडीण व वसंत हिने वनकन्या आणि दासी अशा परस्पर-विरोधी भूमिका केल्या.

नटशेखर, नटमार्तंड अशा पदव्या काही संस्थांनी प्रकाशरावांना दिल्या आहेत. चिन्नरामय्या बनारसे हे प्रकाशरावांचे मामा. त्यांनी संगीताची तालीम आणि अभिनयाचे धडे प्रकाशरावांना दिले. गेली ५० वर्षे ते रंगभूमीवर वावरत आहेत (१९३० ते १९८१). त्यांनी आपल्या भूमिकांची अगदी बारकाव्यासह आपण तयारी कशी करतो हे मोकळेपणाने सांगितले. हरिश्चंद्राची भूमिका करताना त्यांनी पुराणांतील राजधर्म निरुपणाचा अभ्यास केला होता. राज्याचे दान देताना, मुकुट विश्वामित्राला सोपविताना केलेला अभिनय राजधर्म निरुपणातील वर्णनास अनुसरून केला असे त्यांचे म्हणणे. वीरब्रह्मचरित्रात नायकाची भूमिका त्यांनी केली होती. हा माणूस वृत्तीने सात्विक असला तरी तापट होता हे त्याच्या चरित्रग्रंथांत नमूद असल्याने ही भूमिका करताना प्रकाशरावांचा आवाज सदैव अरेरावी सम्राटासारखा राहिला. सात्विक पात्राची भूमिका असेल त्या दिवशी प्रकाशराव उपवास करतात. उपवासाने सात्विक भावाची जागृती सुलभ होते व अभिनय सहज व प्रभावी होतो असे त्यांचे म्हणणे.

प्रकाशराव फोटोग्राफर व चित्रकारही आहेत. या कलादेखील मामापासूनच ते शिकले. कंपनीचे पडदे ते हौसेने रंगवीत असतात. बनारसे, रेखनदार, शिंदे आणि अवटी अशा चार कुटुंबातील मंडळी या कंपनीत काम करते. प्रॉम्प्टिंग या कंपनीत अगदी वर्ज्य आहे.

याच नाटकाच्या वेळी श्यामसुंदर अवटी (गोविंदराव बनारसे यांच्या मुलीचा मुलगा) भेटले. त्यांच्याशी व्यावहारिक अंगाबद्दल माहिती घेतली. ते स्वतंत्र कंपनी चालवितात. सुरभी नाटक मंडळ्यांचे एक फेडरेशन आहे त्याचे श्यामसुंदरराव चिटणीस आहेत. व्यावसायिक बाबतीत सरकारकडे प्रतिनिधित्व करण्याचे काम त्यांच्याकडे असते. लाच, गुंडगिरी इत्यादी सामाजिक दुर्गुणांचा नाटक कंपन्यांना बराच उपद्रव होतो असे त्यांनी सांगितले. धंदा करायचा म्हणजे साऱ्या गोष्टीची तयारी ठेवावी लागते ही त्यांची भूमिका.

> ‘या धंद्यात बरे-वाईट अनुभव बरेच येतात. काही गावे खूपच कौतुक करतात. आम्हाला देणग्याही देतात. कित्येक गावांत मात्र बरेच वाईट अनुभव येतात’ असे सांगून त्यांनी आपल्या जीवनातला एक संस्मरणीय अनुभव सांगितला. ‘हरिश्चंद्र नाटक लागलं होतं. माझे वडील हरिश्चंद्राचे काम करित होते. माझे आजोबा थोडे आजारीच होते. पण फार नव्हते. नाटक चालू असतानाच त्यांना मृत्यू आला. आम्ही शव झाकून ठेवले. प्रेक्षक आमचा देव. त्याचा रसभंग कसा करायचा? नाटक संपल्यावरच आम्ही पुढच्या तयारीस लागलो नाटकात हरिश्चंद्राची सत्त्वपरीक्षा झाली. पडद्याआड भगवंत आमच्या सत्त्वपरिक्षेचं नाटक खेळत होता!”

## [आ] नाटकातील गाणी

अरे-मराठा समाजाला नाटकाचे वेड आहे. या बाबतीत मऱ्हाटी पिंड समाजाने दक्षतापूर्वक जोपासला आहे. इतकेच नव्हे तर आधुनिक तेलुगू रंगभूमीचे प्रवर्तन करून या समाजाने आंध्र प्रदेशाच्या सांस्कृतिक जीवनात मानाचे स्थान मिळविले आहे.

महाराष्ट्रातून स्थलांतर करताना ज्या जाती जमाती मराठ्यांबरोबर तेलंगणात आल्या त्यात गुंदली (गोंधळी) ही जमातही होती. कथा-कथन हा या जमातीचा मूळ व्यवसाय. लोककथा व पौराणिक आख्याने यांवर आधारलेल्या नाटकांचे प्रयोगही ही जमात करीत असे. कालमानाप्रमाणे या मूळ व्यवसायावर उदरनिर्वाह होत नसल्या कारणाने ही जमात आता शेतमजूरी करीत असते तथापि, परंपरागत कुळाचार म्हणून चैत्र महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात नाट्यप्रयोगही या जमातीचे लोक सादर करतात. गोंधळी समाजातील बहुश्रुत कथानिवेदक, नाटककार आणि नट श्री. उपेंद्र यांनी सादर केलेल्या काही नाटकांतील पदे पुढे देण्यात येत आहेत :

१

हे आणि पुढचे पद **बालावंती** या नाटकातले आहे. अंबरसिंग राजाच्या कथेवर (ही कथा परिशिष्टात दिली आहे) नाटक आधारलेले आहे. पहिल्या पदात नाटकातील खलनायिका आपल्या मंत्रसामर्थ्याने आपल्या पतीला नागाच्या रूपात परिवर्तित करते व त्याला राजाला दंश करण्याची आज्ञा करते. राजाच्या मृत्यूनंतर राज्य आपल्याला मिळावे या दुष्ट हेतूने –

**हलकं हलकं ये रे नागाचं देवा। हलकं हलकं येरे नागाचं देवा**
**तुला चिमने होऊनु मनान्तु चिंतिलं । न्हव्वं या नागा**
**बारा सिर तुला क्रिस्नाचं पाया । न्हव्वं या नागा**
**सिरावरे जोतीचे उजेडू । न्हव्वं या नागा**
**राजाचं माडीला जाऊनु येवावं । ये राजाचं घरू आमी सारा घेवावं**

२

खलनायिकेच्या आज्ञेप्रमाणे नाग आपली कामगिरी पार पाडतो. राजाचा मृत्यू झाल्यानंतर राणी शोक करते :

**कुटून आता सरपु येउर तुला चावला माजा राजा**
**कोनते देवाला पापु केलं तू कोनते देवाला पूनु केलं तू**
**लेन्की लेन्कु न्हाइतु आमाला कस्सं चावलं पायाचं सरपु।**
**अय्यो माजं राजा कस्सं होईल वो**
**पुडं काइल्यानं हीरु न्हाइलं मागं पाहिल्यानं तलूं न्हाइलं**
**कोनु दिकु माजं राजा ।**

३

या गीताची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. एक दुर्दैवी स्त्री दैवाच्या वक्रगतीमुळे अरण्यात भ्रमण करीत असताना शिकारीस आलेल्या राजाच्या दृष्टीस पडते. तिच्या सौंदर्याचे वर्णन राजा आपल्या प्रधानाजवळ करतो. ही हंसमुखी पृथ्वीवर जन्माला आलीच कशी? असा राजाला प्रश्न पडतो [न प्रभातरलं ज्योति रुदेनि वसुधातलात्——या कालिदासवचनाचे स्मरण या ठिकाणी व्हावे!] ती बोलत नाही त्यावरून परमेश्वराने तिला तोंडच दिले नाही की काय अशी शंका या राजाला येते.

**कोनु परदानी हितं कोनु ये हंसतोंडीची नारी**
**उद्र फाइल्यानं संगडीचं बडरं** [भ्रमर] **। केंसु फाइल्यानं घुंगरु घुंगरु**
**होटं फाइल्यानं तंबोलीचं । दान्तु फाइल्यानं दान्तोजीचं**

**डोले फाइल्यानं काजालीचं**
**गंसं** [कंठ] **फाइल्यानं मोहन गंगिरे ।। कोनु ०।।**
**बेगी बेगी येते मुसी मुसी हंसते । भुईवर इनं कस्स जल्मली** [ही पृथ्वीवर जन्माला आली कशी?]
**इला फाताचु मला हस्सु आलं । हिला फाताचु मला बोलू आलं**
**सुर्व्या चंद्राँसु बांकु** [सूर्य-चंद्राला कलंक (वांकु) आहे. हिच्या ठिकाणी मात्र कोणताच दोन (वांक) दिसत नाही.] **हाय । इला फाइल्यानुं बांकु न्हाइ**
**मुलु मुलु फाते गलंगलं रडते । देऊ इला तोंडू दे न्हाइ** [देवाने हिला वाणी दिली नाही काय?] **।। कोनु ।। ०**

४

रात्र चांदणी असूनही प्रियकर जवळ नसल्याने विराहिणीची तळमळ व्यक्त करणारे हरिश्चंद्रावती नाटकातले हे पद.

**अस्टमीचं चंद्रगडे सिग्रु** [शीघ्र] **निगालं । सत्तीपुत्र** [पति/प्रियकर] **फांकूनु** [रुसून गेला/वियोग झाला] **गेलं काय मी करू**
**नसुनु सक्रिया हार मनुनु हातु हिरं चाललं**
**भऊला** [हार] **गुंपिला मनुनु हातु हिरं चाललं**

५

'आत्मरानी' नाटकातील हे गीत म्हणजे संकटात सापडलेल्या नायिकेने केलेली चंद्राची विनवणी आहे:

**ये हिंवसं** [शीतल] **राजा ये चंदामामा । मा** ['हे चंद्रा महादेवाच्या केशकलपातील तू एक सुंदर फूल आहेस'.] **देवाचं बुचडीचं तू येकु पूलू**
**डग मेगान्तु जलकाइचं : मी येकु ईजू**
**आमाँस पुनिव दोनी मिळून आर्ले** [अरण्य (अडवी रानांतु-एकार्थी दोन शब्द)] **। आडवी राजान्तु ये मला कोनु दिकू** [आधार]
**सान्रे** [चांदणे] **सारे येकू होइल्ले । आबाले** [आभाळ दुभंगले] **दोनी होइल्ले**
**या अडवी रानान्तु** [अंधार समावला] **अंदारू माला । मला फाउनु दया करुनु**
**मी चिमनी बाला** [लहान] **।।**

६

हे संपूर्ण गीत म्हणीवजा आहे : दिवस उजाडल्यावर दिव्याचा काय उपयोग? थंडी गेल्यावर शालीचा काय फायदा? भूक मरून गेल्यावर घरात अन्न असून काय उपयोग? आई बापाचे कष्ट कमी होत नसतील पुत्र असूनही काय करावयाचे?

अनुक्रमणिका

**उजडुनु दिवस निगाल्या का । घरान्तु दिवा न्हाउनु काऽला**
**हिंवसा रे निगुनु गेल्यातं । पंगराया झालु न्हाउनु काऽला**
**भूक सारे निगुनु गेल्यातं । घरान्तु जेवनु न्हाउनु काऽला मा**
**माईबापाचं कस्टु उरविनं ते लेन्कु । धरनींतु न्हाउनु दगडुपखानं** [दगडाप्रमाणे]

७

**ये रे क्रिस्ना ये रे क्रिस्ना**
**खेल खेलतामु ये रे क्रिस्ना**
**ये क्रिस्ना तुजं चांगलपनु**
**तुला सोडुनी मी येउ जाइनं**
**रादा मीचु किस्ना तूचु**
**खेल खेलाय ये रे क्रिस्ना**
**रादा तूचु क्रिस्ना मीचु**
**खेल खेलतामु ये ग रादा**
**ये रादा तुजं चांगलपन**
**तुला सोडून मी येउ जाइनं**
**ये रे क्रिस्ना ये ग रादा**
**रादा मीचु क्रिस्ना मीचु**
**रादा मीचु क्रिस्ना तूचु**
**ये रे क्रिस्ना.....**
**फइलं मीचु माज्या डोलेनं**
**मला सोडुनु तू जाइ नोको**
**कोन फाइनं ते लाल बागा या**
**ये ग रादा य ग रादा**
**कोन फाइन ते लाल बागा या**
**ये ग रादा ये ग रादा**
**फाइलं ग मी माज्या डोलेनं**
**मला सोडून तू येउ जाउ नको**
**खेल खेलतामु ये ग ये**
**ये ग रादा ये रे क्रिस्ना**

‘‘राधा कृष्ण म्हणजे दुसरे कोणी नसून तू आणि मीच आहोत’’ हा भाव प्रेयसी आपल्या प्रियकराला सांगत आहे. या भाव दर्शनाबरोबरच ‘लालबाग’ या संकेतस्थळी भेटण्याची सूचनाही ती देत आहे.

८

एक संकटग्रस्त नायिका आपले तान्हे मूल अरण्यात सोडून देते. तिच्या भावना.

**खेला खेलू माजे बाबा । खेला खेलू माजे बाबा**
**खेलुनु दाउनु माजे बाबा खेला०**
**माइ न्हाई तुला फायारे । खेला ०**
**येवडे येवडे उजेडू दिवसीनं उजेडू । गाँमुसारा उजेडू दे** [एवढासा सूर्य दिवस उगवितो; तुझ्या प्रकाशाने गाव उजळून निघू दे.] **।।**
**माई न्हाई ते बाबा माजं चिमनेबाबा । खेला ०**
**तुला** [तुला कोणाचाच आधार नाही. मागे-पुढे पाहणारे कोणी नाही.] **कोनु दिकु हातं रे । मागे कोनू न्हाइतं । पुडं कोनी न्हाइतं**

अनुक्रमणिका

**रानान्तु रान होइलं रे । दुदु कोनु देतु, जेवनु कोनु देतु**

**माई** [आई नसलेला असा पुत्र तू झालास. कोणत्या देवाचं असं कोणतं पाप केलंस?] **न्हाइ ते लेन्कु होइलाचा । कोनते देवाला का पापु केलासु ।। खेला ०**

९

## कथागीत

[लोककथेत आलेली राजा अंबरसिंगाची कथा कधी कधी गीतरूप धारण करते. या कथागीताचा थोडा भाग]

**आइकू मी राजा मी गोटी सांगितं कानी घालू ।। आइकू ।।**
**आमचं गामय नामय सांगतं मियाँ ।। आइकू ।।**
**परदानु दादाला ते बोलु दाडावं, परदानुदादाला**
**लिंबोजी दादाला ते बोलु दाडावं, लिंबोजी दादाला**
**मान्‌कावतीला ते बोलू दाडावं, मान्‌कात्रतीला**
**आमचं राजपनु ते न्हाउनु कोनाला, आमचं राजपनु**
**आमचं दाऽनमु** [मुत्यूनंतर शवाला अग्नि देण्यासाठी पोटी पुत्र नाही (दाऽन-दहन).] **ते दाऽनमु न्हाइनं कोनाला**
**येवडा माडीयु ते माडीयु न्हाउनं कोनाला**
**येकु मी नारी ते मावरी सांगावं, येकू मी नारी**
**लेंकु लेंकीयू ते लेंकू-लेंकीयु न्हाइतं आमाला**
**बावनु** [ब्राह्मण] **बोलाया ते लेंकु-लेंकीयु न्हाइतं तुला**
**बापाचं व्हानुं** [वहाण] **ते लेंकु लेवाया न्हाई, बापाचे व्हानुं**
**मायीचे सोले** [सवले]**, ते लेंकी लेवाया न्हाई, मायीचे सोले**
**सोन्याचे पाल्ला ते न्हाउनु कोनाला राजा, सोन्याचं पाल्ला**
**डोलगिरीला** [रेशमी साडी] **तू जावय्‌ राजा तू डौलगिरीला**
**आनावं तूयू ते लेंकी-लेंकाचं डाऽनु** [धवलगिरी. वरदान (डाऽनु=दान)] **आनावं तू यू**
**जावावं माजं राजा डौलगिरीला तू जावावं माजं राजा**
**लेंकी-लेंकाचं डाऽन आनावं, आनावं माज राजा**

∫∫∫

अनुक्रमणिका

# द्वितीय खंड

## अरे-मराठी बोली : भाषा शास्त्रीय अभ्यास

### अनुक्रमणिका

## ३

# बोलीच्या अभ्यासाची दिशा

**१. बोलीच्या अभ्यासाची उपेक्षा; २. भाषा : बोलींचा समूह; ३. बोलींनाही व्याकरण असते; ४. बोलींच्या अभ्यासाचे महत्व; ५. अरे बोलीनी असाधारण पार्श्वभूमी ६. अभ्यासाची दिशा.**

### १. बोलीच्या अभ्यासाची उपेक्षा

मराठी भाषेचा अभ्यास अद्यापही ग्रांथिक मराठीच्या परिसरात आणि व्युत्पत्ती व व्याकरण यांच्या परिधात रेंगाळत आहे. आधुनिक भाषाविज्ञानाच्या दृष्टिकोनातून काही लेखन गेल्या पावशतकात झाले आहे. हे लेखन एकतर प्रमाणतः अल्प आहे आणि दुसरे म्हणजे भाषाविज्ञानाच्या अनेक शाखांपैकी प्रामुख्याने वर्णनात्मक (Descriptive Linguistics) भाषाविज्ञानावर आधारलेले आहे. मराठी भाषेचे क्षेत्र आणि तिचा वाङ्मयीन व्याप लक्षात घेता हे लेखन अपर्याप्त वाटते. वर्णनात्मक भाषाशास्त्र हे भाषाविज्ञानाचे एक अंग आहे समग्र भाषाविज्ञान नव्हे. ऐतिहासिक आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून मराठी भाषेच्या उत्पत्ति-विकासाचे व तिच्या भिन्नकालीन स्वरूप-वैशिष्ट्यांचे विवेचन आजही प्राथमिक अवस्थेत आहे. मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण अद्याप सिद्ध झालेले नाही. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी या दृष्टीने अगदीच श्रीगणेशा केला. इतिहासाचार्य राजवाडे यांनी ज्ञानेश्वरीच्या मराठी भावेच्या संदर्भात एक महत्त्वाचा मानदंड निर्माण केला. राजवाड्यांच्या कालानंतर मराठी भाषेच्या इतिहासासंबंधी आणि विकासाच्या अनुसंधाने बरीच सामग्री प्रकाशात आली आहे. भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात देखील उल्लेखनीय प्रगती झाली आहे. तरीही मराठी भाषेचा पिंड आणि तिची प्रकृती लक्षात ठेवून लिहिलेले मराठी भाषेचे ऐतिहासिक व्याकरण अद्यापही सिद्ध व्हावयाचे आहे. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अनेक संहिता गेल्या अर्ध्या शतकात संपादित, प्रकाशित झाल्या आहेत. त्या त्या संहितेतील भाषेचा वर्णनात्मक पद्धतीचा अभ्यास काही संपादकांनी केला आहेही. या संपादनातही ऐतिहासिक विकासक्रम आणि तुलनात्मक अध्ययन यांच्याकडे पुरेसे लक्ष पुरविण्यांत आले आहे असे म्हणता येणार नाही.

ग्रांथिक मराठी भाषेच्या अभ्यासाची ही अवस्था. या भाषेला सातत्याने जीवनाचा पुरवठा करणाऱ्या मराठीच्या विविध बोलींचा अभ्यास अधिकच उपेक्षित राहिला आहे. वस्तुतः बोलींचा अभ्यास प्रमाण ग्रांथिक भाषेच्या अध्ययनास कितीतरी पूरक ठरतो. परंतु काही अपवाद वगळले तर मराठी भाषा पंडितांनी बोलींच्या स्वरूप-विशेषांच्या अध्ययनाकडे दुर्लक्षच केले आहे असे म्हणता येईल. प्रमाण वा ग्रांथिक भाषा ही समाजातल्या फारच थोड्यांची खऱ्या अर्थाने मातृभाषा असते, एखाद्या वर्गात रूढ असलेल्या बोलीस सामाजिक व राजकीय कारणांमुळे प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यामुळे ग्रांथिक व्यवहारासाठी ही बोली योजली जाते. ग्रंथातील भाषेच्या स्वरूपात स्थिरावलेल्या अशा बोलीचे कालेकरून व्याकरण सिद्ध होते. ग्रांथिक व्यवहारात स्थिरावलेल्या बोलीचे व्याकरण झाले की अशा बोलीत एक प्रकारचा कृत्रिमपणा येऊ लागतो. व्याकरणाच्या नियमांनी बद्ध झालेली प्रमाण भाषा कालांतराने मुळातला लवचिकपणा व नवोन्मेष हरवून बसते. शिष्टांच्या व्यवहाराची आणि ग्रंथाच्या लेखनाची प्रमाण भाषा अस्तित्वात असतांनाही समाजाच्या भिन्न थरात भिन्न बोलींतून

भाषाव्यवहार चालतच असतो. त्याचप्रमाणे एकाच भाषिक क्षेत्रातील वेगवेगळ्या प्रदेशात त्याच भाषेच्या निरनिराळ्या प्रादेशिक केली भाषाव्यवहाराची गरज भागवीत असतात. प्रमाण भाषेला जीवनस्रोत पुरविण्याचे कार्य या बोलींच्या द्वारे सातत्याने पण अप्रत्यक्षरीत्या घडत असते.

मराठी भाषा ही संज्ञा आपण योजतो तेव्हा केवळ ग्रांथिक वा प्रमाण भाषा आपल्या डोळ्यासमोर नसते, नसावीही. मराठी मुलखातील भिन्न प्रदेशांत आणि समाजातील विभिन्न घरांत रूढ असलेल्या बोली आणि ग्रंथव्यवहाराची मराठी या सर्वांचा समावेश 'मराठी भाषा' या धारणेत होत असतो. हे लक्षात घेतले म्हणजे ग्रांथिक मराठीचा अभ्यास एकंदरीत भाषाभ्यासाचा अंशमात्र असतो ह निराळे सांगण्याची आवश्यकता नसावी. ग्रांथिक मराठीच्या कक्षेबाहेर असलेल्या बोलींचे स्वरूप लक्षात घेतल्याविना आपले मराठी भाषेचे ज्ञान अपूर्णच गणले पाहिजे.

## २. भाषा : बोलींचा समूह

भाषा ही शेवटी निरनिराळ्या बोलींचाच एक समूह असतो हे विसरता येत नाही. [Jean Malmstrem, **Language in Society**, P. 52] प्रादेशिक, वांशिक, धार्मिक, व्यावसायिक यांपैकी कोणत्या ना कोणत्या कारणाने एकरस झालेले, एकच भाषा बोलणारे समाजाचे घटक समान बोलीतून नित्याचे व्यवहार करीत असतात. त्या त्या समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचे व सामाजिक आकांक्षांचे प्रतिबिंब अशा बोलीत पडत असते. समान बोली असलेला गट अधिक सुसंघटित राहतो तो यामुळे. या बोली मौखिक परंपरेने चालत आलेल्या असल्या व लेखनाच्या योगाने त्यांना स्थैर्य आल्याचे प्रत्ययास येत नसले तरी अशा बोलींना अंतर्गत शिस्त अवश्य असते. म्हणूनच मर्यादित का होईना सामाजिक व्यवहाराची क्षमता त्यांना असते. अशा बोलींच्या अभ्यासाने एकूण भाषेच्या समग्र ज्ञानास आवश्यक असलेल्या किती तरी बाबींचा उलगडा सहजगत्या होऊ शकतो. अनेक शब्दांच्या विकासक्रमातून लुप्त झालेल्या अवस्था कोणत्या तरी बोलीने जपून ठेवलेल्या असतात. शब्दांच्या अर्थात होणाऱ्या परिवर्तनाचे काही धागेदोरे बोलीत गवसण्याची शक्यता असते. प्राचीन वाङ्मयात आढळणारे आणि वर्तमान व्यवहारातून लुप्त झालेले कितीतरी शब्द बोलींच्या झाडाझुडपांखाली विश्रांती घेतांना आढळतील. निरनिराळ्या बोलीत रूढ असलेल्या वाक्प्रचारांच्या आधाराने भाषेच्या काही परंपरांचा भाग काढणे सुलभ होते. सारांश, एकभाषिक समाजाचे सांस्कृतिक जीवन आणि भाषेचा विकास यांच्या अभ्यासास पूरक असलेली महत्त्वाची सामग्री बोलींच्या अभ्यासातून उपलब्ध होऊ शकते.

दुर्दैवाने भाषाव्यवहाराच्या क्षेत्रांत बोलींना अकारण गौण लेखण्यात येते. प्रमाण भाषेचा वापर करणाऱ्या शिष्ट समाजाला बोली ही 'अशुद्ध', 'मागासलेली' अथवा अपक्व वाटत असते. ["The incorrect forms can not be the result of ignorance or carelessness, for they are by no means haphazard but on the contrary are Stable... 'Mistakes' in a language are simply dialect forms carried into the standard language." Bloomfield, Literature and literary speech (An article in **Language in Culture and Society** Ed. by Dell Hymes) p. 391] त्यामुळे जाणतेपणाने बोलीचे स्वरूपवैशिष्ट्य आणि सौंदर्य समजून घेण्याचा प्रयत्न शिष्ट समाज करीत नाही. त्या त्या बोलीचा वापर करणाऱ्यांना देखील शिष्ट समाजात स्वतःच्या बोलीतून व्यवहार करण्यास कमीपणा वाटतो. अशी माणसे न झेपणारी शिष्ट भाषा बोलण्याचा प्रयत्न करतात आणि स्वतःस हास्यास्पद करून घेतात. अशा रीतीने बोलीचा नित्य वापर करणारे व बोलींपासून अंतरावर असलेले

समाजाचे भिन्न वर्ग बोलींना कमी लेखण्याच्या पातळीवर मात्र एकच येतात. याबाबत 'जाणते' आणि 'नेणते' सारखेच 'अज्ञानी' असतात. भाषा हा शेवटी बोलींचा समूह असतो याचा जाणत्यांनाही विसर पडतो.

सागराच्या तळाशी आणि वसुंधरेच्या गर्भात रत्ने असतात त्याचप्रमाणे बोलीच्या गर्भातही जुन्या परंपरा, सामाजिक जाणीवा, ऐतिहासिक विकासाच्या खुणा नांदत असतात. भाषा ही सतत बदलणारी पण लोकव्यवहाराचे अखंडत्व जपणारी समाजनिष्ठ जिवंत धारा आहे. या धारेने कालपरत्वे वेगळे वळण घेतले, व्यवसायपरत्वे नवी सोंगे धारण केली अथवा प्रदेशपरत्वे न्यारा भेस अंगावर चढविला म्हणून तिच्या अखंडत्वात बाध येतो थोडाच! बदल हा भाषेचा स्थायीभावच आहे. ['The only permanance is change' - Jean Malmstrem **Language in Society**. P.26] तसे पाहिले तर प्रत्येक व्यक्तीची बोलण्याची लकब वेगळी असते. व्यक्ति तितक्या प्रकृती मानल्या तरी व्यक्ति तेवढ्या बोली असे मात्र गृहीत धरता येत नाही. म्हणूनच व्यक्तिनिष्ठ बदल या लकब याची दखल भाषाव्यवहारात घ्यावयाची नसते. ही लकब सामाजिक असली की तिला बोली हे नाव पडते. मूळ प्रवाहाशी सुसंगत राहूनही बोलींना वेगळेपणा असतो. तो भाषाव्यवहाराच्या दृष्टीने सामूहिक असतो आणि स्वयंपूर्ण देखील. [Noem Chomsky **Reflections on Language**, p.43] अशा प्रवाहांना त्या त्या भाषेची बोली असे आपण नाव देतो. या बोलींना देखील स्वतःचे व्याकरण असते - मूळ प्रवाहाशी संगती साधणारे भाषेच्या पातळीवर हक्क नोंदविणारे.

### ३. बोलींनाही व्याकरण असते

मूळ भाषिक प्रवाहाचा वारसा बोली आपल्या परीने चालवीत असतात. स्वतःच्या कमाईची भरही या पैतृकात पडत असते. ग्रांथिक भाषेत असलेली नियमबद्धता बोलींच्या गावीही नसते. म्हणून ती 'स्वैर' असते असे नव्हे. प्रमाण भाषेच्या व्याकरणांत आलेल्या नियमांचे उल्लंघन तिच्या हातून घडत असेलही. म्हणून ती नियमरहित असते असे समजण्याचे कारण नाही. तिच्या व्यापारात स्वतःपुरती एक अंतर्गत सुसंगती अवश्य असते. बोलीचे व्याकरण लिहिण्यात आलेले नसते म्हणून बोलीला मुळी व्याकरणच नसते असे मानणे धाडसाचे ठरेल. अभ्यासांती तिच्या व्याकरणाचा शोध लागतो त्याप्रमाणेच तिच्या अंगभूत सौंदर्याचा आणि सामर्थ्याचाही प्रत्यय येतो. कळत नकळत विशिष्ट मर्यादेत बसू शकणारी सांस्कृतिक वीणही बोलीच्या सभोवती गुंफली जाते. समाजाच्या विशिष्ट वर्गाची वा विशिष्ट क्षेत्राची 'मातृभाषा' असली तरी भाषाव्यवहाराच्या दृष्टीने बोलीला व्यवहारक्षमता असते ही बाब लक्षात घेऊन बोलींच्या अभ्यासास आवश्यक ते महत्त्व दिले पाहिजे. ग्रांथिक भाषेच्याही काही विशेषांचा उकल बोलीच्या अभ्यासातून होऊ शकतो हेही विसरता येत नाही.

बोली 'स्वैर' असते, तिच्या व्यवहाराला कोणतेच नियम नसतात अथवा तिला मुळी व्याकरणच नसते या गैर-समजूतीच्या धुक्यातून आपण बाहेर पडलो तरच ते शक्य आहे. अरे बोलीत रूढ असलेल्या काही शब्दांची उदाहरणे घेऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल.

> **तंबं :** हा तांबे शब्दासाठी योजला जाणारा अरेबोलीतील प्रतिशब्द आहे. या शब्दाची व्युत्पत्ती ताम्र या संस्कृत शब्दापासून झालेली आहे यात वाद नाही. परंतु प्रमाण मराठीत येणारा तांबे हाच शब्द 'शुद्ध' असून 'तंब' अशुद्ध आहे असा जर

अनुक्रमणिका

निष्कर्ष काढण्यात आला तर तो मात्र चुकीचा ठरेल. ताम्र या संस्कृत शब्दाचा 'तंबं' होणे व्याकरणास धरून आहे. मरांठी व्याकरणात त्याचा निर्देश नसला तरी हे रूप प्राकृत व्याकरणाच्या नियमानुसार झालले आहे या शब्दात 'अकारण' ह्रसत्व आले आहे असे म्हणता येणार नाही. कसे ते पहा :

'आम्रताम्रयोर्ब:' (३.५३) असे सूत्र वररूचीच्या प्राकृत प्रकाशात आले आहे. तदनुसार ताम्र या शब्दाचे 'तांब' हे रूप होते. हेमचंद्राच्या शब्दानुशासनातील ८-१-८४ या सूत्रात 'ह्रस्व संयोगे' असा नियम दिला आहे तदनुसार तांब याचे 'तंब' होते. 'सोर्बिन्दुर्नपुंसके' या वररूचीच्या (प्राकृत प्रकाश ५-३०) सूत्रानुसार "तंब" हे या शब्दाचे अंतिम रूप होते. प्राकृत व्याकरणाचे एवढे पाठबळ असताना 'तंबं' हा शब्द ग्रांथिक भाषेत रूढ नसला तरी तो अशुद्ध आहे, नियमरहित आहे असे म्हणता येईल काय?

**अछेर :** आश्चर्य या शब्दाचे अछेर हे रूप अरे बोलीत रूढ आहे. ते सर्वसामान्य मराठी भाषिकास अपभ्रष्ट वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. यादवकाळीन वाङ्मयात देश्य व तद्भव शब्दांच्या जोडीला प्राकृतात असलेल्या तत्सम शब्दाचा वापर मराठीत होता. लीलाचरित्रापेक्षा ज्ञानेश्वरीत तत्सम शब्दांचे प्रमाण अधिक आहे. एकनाथकालीन वाङ्मयात देश्य व तद्भव शब्द बरेच मागे पडले आणि मूळ संस्कृत शब्दांचा अधिक भरणा मराठीत झाला. तथापि, 'आश्चर्य' हा नंतर रूढ झालेला शब्द असून प्रथम अछेर/अचेर या रूपात तो मराठीत रूढ होता. तो अशुद्ध नाही किंवा गांवढळ लोकांनी 'अपभ्रष्ट' केलेलाही नाही :

आश्चर्य या संस्कृत शब्दाचे शौरसेनीत (प्रा. प्र. १२-३०) 'अच्चरिअं' असे रूप होते. महाराष्ट्रीत अच्छेरं (प्रा. प. ४-१) या रूपात तो शब्द येतो. हेमचंद्राच्या ८-१-८४ या सूत्रानुसार आ या अ होऊन अच्छेर असे त्याचे रूप होते. मातबर व्याकरणकारांनी शुद्ध ठरविलेला अछेर/अचेर हा अरे बोलीतील शब्द म्हणूनच 'अशुद्ध' ठरत नाही. मराठी व्याकरणाने त्याची दखल घेतली नाही याचे कारण तो ग्रांथिक व्यवहारात रूढ नाही. प्रचलित मराठीचे व्याकरण हे समग्र मराठी भाषेचे विवरण करीत नाही असाही ध्वनी या स्पष्टीकरणातून सहजच निघतो.

**वंकं :** वाकडा, दोष, या अर्थाने अरे बोलीत रूढ आहे. संस्कृत वक्रचे ते उत्तरकालीन स्वरूप आहे यात शंका नाही. वाकडा आणि वंक हे वक्र या संस्कृत शब्दाचे वंशज आहेत. पहिला प्रमाण भाषेत व दुसरा अरे बोलीत रूढ आहे. बोलीत रूढ आहे म्हणून तो अप्रमाण ठरत नाही. त्याची जातकुळी अगदी 'शुद्ध' आहे.

अनुक्रमणिका

प्राकृत प्रकाशाच्या ‘वक्रादिषु’ (४-१५) या सूत्राप्रमाणे वक्रचे प्राकृत वक्क हे रूप झाल्यावर ‘व’ वर अनुस्वार येतो. ५-३० या सूत्रानुसार ‘क’ वरही तो येतो. अशा रीतीने वंक हे रूप सिद्ध होते. शुद्धलेखनाच्या जुन्या नियमाप्रमाणे ‘वांकडा’ या शब्दांतील ‘वा’ वर अनुस्वार का देण्यात येत होता याचाही उलगडा या स्पष्टीकरणावरून होईल.

**भईरऊ :** शिष्ट मराठीत हा शब्द भैरव असा रूढ आहे. संस्कृतातही तो याच स्वरूपात रूढ आहे. तथापि, ‘भइरउ’ हे रूप अ-संस्कृत असले तरी ‘अशुद्ध’ मात्र नाही. ‘दैत्यादिष्कई’ (१-३६) या वररूची सूत्राप्रमाणे दैत्य व इतर शब्दात येणाऱ्या ‘ए’ चे ‘अई’त रूपांतर होते. तदनुसार प्राकृत भाषेच्या दृष्टीने तरी ‘भइरऊ’ हे रूप व्याकरण दुष्ट ठरत नाही.

### ४. बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व

आणखी कितीतरी उदाहरणे देता येतील. अरे बोलीचा अधिक अभ्यास पुढील अध्यायांतून येणार आहेच. बोली अनियमीत असते, तिला व्याकरण नसते यांसारखे गैरसमज दूर व्हावेत तेवढ्यापुरती उदाहरणे या ठिकाणी दिली आहेत. प्रत्येक बोली तशी संघटित व नियमबद्ध असतेच. भाषाव्यवहाराची क्षमता तिच्या ठिकाणी येते ती या नियमबद्धतेमुळेच. या नियमबद्धतेचा शोध लावल्यानंतर बोलीचे स्वरूपवैशिष्ट्य लक्षात भरते. बोली ज्या भाषेची असते त्या भाषेचेही सर्वांगीण आकलन होण्याच्या दृष्टीने बोलीच्या स्वरूपवैशिष्ट्यांचा शोध उपकारक ठरतो.

काळाच्या ओघात भाषेचे स्वरूप बदलत जाते. नागरी वातावरणात आणि ग्रामीण परिसरात वेगवेगळ्या दिशेने बदल घडत असतो. नागरी वातावरणातल्या बोलींवर झपाट्याने बदलणाऱ्या समाजजीवनाचे संस्कार होतात. त्यामानाने ग्रामीण भागातील सामाजिक परिवर्तन मंदगतीने वाटचाल करीत असते. भाषेचे आधुनिकीकरण नागरी भागात घडत असताना ग्रामीण भागातील बोलींचा ओढा मात्र जुने ते जपून ठेवण्याकडे असतो. भाषेच्या विकासातील प्राचीन अवस्था समजून घेण्यास ग्रामीण बोली साहाय्यभूत होतात त्या यामुळेच. भाषाविकासाची दिशा दर्शविणारी सामग्री प्राचीन ग्रंथांवरून गोळा होऊ शकते. या सामग्रीस पूरक आणि पोषक अशा प्रकारची माहिती देण्याची क्षमता ग्रामीण बोलीत वास करीत असते.

या बाबी लक्षात घेता अरे बोलीच्या अभ्यासाचे आगळे महत्त्व लक्षात येऊ शकेल. ही बोली ग्रामीण भागात आढळते एवढेच तिचे वैशिष्ट्य नाही. अनेक शतकांपूर्वी मराठी भाषिक प्रदेशातून स्थलांतर केलेल्या मराठ्यांची ही बोली आहे. तेलुगू भाषिक समाजात अनेक शतके वावरणाऱ्या समाजाने निष्ठेने राखलेले हे पितृधन आहे. मराठी भाषिक टापूंशी संबंध तुटल्याने महाराष्ट्रात ज्या गतीने बदलत्या काळाचे परिणाम मराठी भाषेवर झाले ते या बोलीवर होऊ शकले नाहीत. आपली जातकुळी श्रेष्ठ असल्याच्या जाणीवेतून ज्या कुलपरंपरांचे रक्षण या समाजाने केले त्यातच मराठी भाषा ही अंतर्भूत झाली आहे. म्हणूनही असेल कदाचित् मराठीच्या जुन्या रूपांचे संरक्षण या बोलीत झाले आहे [भाषा शास्त्राचा असा नियम आहे की, ‘भाषेचे मूळ स्वरूप निर्वासितांमध्ये

अनुक्रमणिका

जितके अढळ असते तितके ते मुळ लोकांमध्ये रहात नाही' तुळपुळे शं. गो.-''यादवकालीन मराठी भाषा'' पृ. ९३.]. हे लक्षात घेतले म्हणजे अरे बोलीच्या अभ्यासाचे महत्त्व अधिक विशद करण्याची आवश्यकता नसावी. मराठी भाषेच्या कितीतरी पुरातन खाणाखुणा या बोलीने जपून ठेवलेल्या असल्याने अरे बोलीच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे

या बोलीच्या वैशिष्ट्यांचे विवेचन पुढे विस्ताराने करण्यात आले आहेच. अभ्यासाची महती ध्यानात यावी या हेतूने एकाच विशेषाचा निर्देश या ठिकाणी करतो : मराठी भाषेची उत्पत्ती महाराष्ट्री प्राकृतापासून झाल्याचा सिद्धांत अनेक विद्वानांनी प्रथम मांडला. डॉ. भांडारकरांच्या काळापूर्वी तो मान्यता पावलाही. परंतु, डॉ. भांडारकरांनी मात्र आधुनिक देशी भाषांच्या उदयासंबंधी वेगळा सिद्धांत प्रतिपादिला. त्यांच्या मते संस्कृत भाषेपासून उदयाला आलेल्या वेगवेगळ्या प्राकृत भाषांच्या काळानंतर प्रत्येक प्राकृत भाषेतून अपभ्रंश भाषा उदयास आली. ती साहित्यात देखील सुप्रतिष्ठित झाली. अपभ्रंश भाषेच्या प्रादेशिक रूपांपासून आधुनिक देशीभाषा उदयास आल्या [Gumperz, **Language In Special Groups**, P. 251-267]. महाराष्ट्री अपभ्रंशापासून मराठी भाषा उद्‌भवली हा सिद्धांत या प्रतिपादनातून निष्पन्न होतो. हा सिद्धांत पुढे अनेक विद्वानांनी मान्य केला. तथापि, संस्कृत आणि प्राकृत व प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांच्या संधिकालातील स्वरूप वाङ्मयाच्या आधाराने जसे स्पष्ट करता येते तसे अपभ्रंश आणि मराठी यांचा संधिकाळ वाङ्मयरूपाने स्पष्ट करता येत नाही. प्राचीन मराठीचे जे पुरातन स्वरूप उपलब्ध आहे ते प्रौढ वाङ्मयाच्या रूपात. मराठीची ही प्रगत अवस्था आहे. प्राकृत भाषांवर नसलेले संस्कृताचे संस्कार या भाषेत आढळतात. प्राकृत-अपभ्रंशात मूळ संस्कृत शब्द आढळत नाहीत. यादवकालीन मराठीत मात्र तत्सम शब्द विपुल आहेत. अपभ्रंश प्राकृतातून विकसित झालेली मराठी यादवकालीन वाङ्मयात आढळत नाही. तरीही सिद्धांत या नात्याने अपभ्रंशातून मराठीचा उद्‌भव झाला हे आपण मानतो, या उद्‌भवाची अवस्था सिद्ध करणारी सामग्री नसतानाही अपभ्रंशातून मराठी भाषा पृथगात्म होत असताना तिची अवस्था कोणत्या प्रकारची असेल यासंबंधीची अगदी मोलाची सामग्री अरे मराठी बोलीत आढळते. वानगीदाखल काही शब्दांची रूपे पुढे देण्यात येत आहेत. महाराष्ट्री, अपभ्रंश आणि यादवकालीन मराठी वाङ्मयातील प्रौढ व प्रगत मराठी भाषा यांच्या दरम्यान असलेली भाषेची अवस्था या शब्दांवरून ध्यानांत यावी :

[अधोरेखित शब्द अरे बोलीतला कंसात त्याचे अपभ्रंश भाषेतील रूप असून पुढे शब्दाचा अर्थ दिला आहे.]

१. **अम्मनु** (अम्मणु) = अमळ
२. **असू** (अंसू) = अश्रू
३. **उज्ञालु** (उज्ञल) = उजळ
४. **काऊनु** (काऊण) = का म्हणून
५. **गांमु** (गाम) = गाव, ग्राम
६. **जळ्ळकु** (जळ्ळक) = उन्हाची झळ
७. **जमाँय** (जामाइ) = जावई
८. **तळ्ळं** (तळ्ळ) = तळे
९. **रोली** (रोल) = गोंधळ
१०. **विज्जु** (विज्जु) = वीज
११. **विटल** (विट्टल) = विटाळ
१२. **पइलारु** (पहिलारउ) = प्रथम गरोदर राहिलेली स्त्री

'शब्दसंग्रहात' अशा प्रकारच्या शब्दांची नोंद साक्षेपाने दिली आहे. ती साकल्याने लक्षात घेतली असताना अपभ्रंश भाषेपासून मराठी भाषेचा उद्‌भव कशा रीतीने झाला, संक्रमण कालातील मराठी भाषेची

अवस्था कोणत्या प्रकारची होती याचा सहज बोध होतो. अपभ्रंश आणि मराठी भाषा यांचे जनकजन्य संबंध साधार प्रस्थापित होऊ शकतात ते अरे बोलीत आढळणाऱ्या शब्दाच्या रूपावरून व या बोलीत रूढ असलेल्या ध्वनिव्यवस्थेच्या आधाराने.

शब्दांचे अर्थ निश्चित करण्यासही बोलींच्या अभ्यासाचा उपयोग होतो. विदर्भ-मराठवाडा भागात प्राचीन काळात लिहिण्यात आलेल्या मराठी ग्रंथांतील काही शब्दांचे काही अर्थ विवाद्य ठरले आहेत. अशा अनेक शब्दांच्या अर्थसंबंधाने अधून-मधून चर्चा होत असते. या भागातील बोलींत वर्तमान काळात रूढ असलेल्या शब्दांचा मागोवा घेतला तर विवाद्य गणलेल्या व इतरही शब्दांचे अर्थ निश्चित होण्यास साहाय्य होते. एकच उदाहरण देतो : लीळाचरित्रात आलेल्या 'आवगळा', या शब्दाच्या अर्थावर अगदी अलिकडे अनेक विद्वानांनी चर्चा केली आहे. चर्चा मला मनोरंजक वाटली. एका विद्वानाने तर कुठल्यातरी सुत्ताच्या (सूत्राच्या) आधाराने स्वर्गातील अप्परांशी 'आवगळा' या शब्दाचा सबंध जोडला. 'पोकळी' हा मराठवाड्यातील बोलीत रूढ असलेला 'अवगळा' या शब्दाचा अर्थ आहे. इतर प्रमाणांच्या आधाराने डॉ. कोलते यांनी या अर्थाला जवळपासचा अर्थ दिला आहे हा भाग वेगळा!

प्रत्येक शब्दाला अर्थ असतो तसाच इतिहास देखील. शब्दाचे बाह्यांग पूर्ववर्ती भाषापिंडापासून आकार धारण करीत असते. त्याच्या अर्थरूप अंतरास सांस्कृतिक जीवनाचे भरण-पोषण लाभलेले असते. बोलीत रुढ असलेले शब्द एकीकडे पूर्ववर्ती भाषांशी असलेले नाते सूचित करतात तर या शब्दांना असलेले अर्थ सांस्कृतिक जीवनाशी निगडित झालेले असतात. सांस्कृतिक संदर्भ बदलले की असे अर्थ लुप्त होतात. ग्रांथिक भाषेत अशा 'निरर्थक' शब्दांना स्थानही मिळत नाही. बोलीतून मात्र असे शब्द सहजासहजी जात नाहीत. कारण, 'शिष्ट समाजाने अर्थहीन ठरविलेल्या सांस्कृतिक संदर्भाची जोपासना बोली आपल्या परीने करीत असते व तदनुषंगाने 'निरर्थक' ठरणारे शब्दही बोलीत जीव धरून राहतात. याही अंगाने बोलीच्या अभ्यासाचे महत्त्व वादातीत ठरते. अरे बोलीचा अभ्यास सादर करण्यापूर्वी सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा आढावा पहिल्या खंडात घेण्यात आला तो याच हेतूने.

भाषेच्या विकासाचा इतिहास आणि भाषिक गटाचे सांस्कृतिक व सामाजिक जीवन यांच्या दृष्टीने बोलीच्या अभ्यासास महत्त्व तर असतेच. वर्तमान काळाच्या संदर्भात आणखी एका कारणामुळे हे महत्त्व वाढले आहे. या युगात प्रसार-माध्यमात झपाट्याने वाढ आणि सुधारणा होत आहेत. दूरदर्शन, नभोवाणी, चित्रपट आणि वर्तमानपत्रे यांचा प्रसार आता नागरी क्षेत्रांपुरता मर्यादित राहिलेला नाही. राजकीय पक्षाचे पुढारी आणि कार्यकर्ते यांचा 'जनसंपर्क' देखील समाजाच्या तळागाळापर्यंत पोचत आहे. या जनसंपर्कात वर्तमानपत्री भाषेचा म्हणजेच प्रमाण भाषेचा उपयोग प्रामुख्याने होत असतो. प्रादेशिक बोलींवर या प्रसार माध्यमांचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाही. या युगधर्मामुळे स्थूलमानाने प्रादेशिक बोलींत एक प्रकारची एकविधता येत चालली आहे. बोलींच्या क्षेत्रांचा संकोच होऊन ती फारतर कुटुंबाच्या सीमेतच बंदिस्त होण्याच्या मार्गावर आहे. बोलींचे व्यक्तिमत्व पूर्णपणे लुप्त होण्यापूर्वीच या मोलाच्या धनाचा संग्रह आवश्यक आहे. विविध बोलींचे अभ्यास आता झाले नाही तर काही वर्षांत अभ्यासासाठी सुद्धा बोलींचे अस्तित्व उरेल किंवा नाही याची शंका आहे.

अनुक्रमणिका

### ५. अरे बोलीची असाधारण पार्श्वभूमी

मराठी भाषेच्या बोलींचा सर्वांगीण व शास्त्रशुद्ध अभ्यास ही आजच्या काळाची महत्त्वाची निकड आहे. अरे बोलीच्या बाबतीत देखील ही निकड अधिक तीव्र आहे. मराठी भाषेची एक बोली एवढेच या बोलीचे स्थान नाही. मराठी भाषेच्या इतर बोली मराठी भाषिक मुलखात वाढल्या आहेत. काही दोन भाषांच्या सरहद्दीवर नांदत आहेत. महाराष्ट्राबाहेर चोहोंबाजूंनी तेलुगू भाषिकांनी वेढलेल्या वर्तुळात अरे-मराठी कित्येक शतके तग धरून आहे. मराठी भाषिक प्रदेशाशी या बोलीचा संबंध उरला नाही. अरे-समाज तसा एकविधच असल्याने शिष्टांची व इतरांची बोली असा भेदभावही या बोलीच्या बाबतीत संभवत नाही. एखाद्या चिरेबंदी गढीच्या भिंतीत पिंपळाचे रोप एकाकी वाढावे तशी भाषिक अभिवृद्धीस प्रतिकूल असलेल्या परिस्थितीत ही बोली किमान नऊ-दहा शतके तरी आपल्या अंगभूत सामर्थ्याच्या बळावर आपली जीवितयात्रा क्रमीत आहे.

अरे बोलीची ही मर्मस्थाने भाषिक वैशिष्ट्यांच्या दृष्टीने बलस्थाने ठरतात. भाषेवर बदलत्या युगाचे संस्कार होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक प्रगती, ग्रांथिक भाषेचे संस्कार, शिष्टाशिष्ट संपर्क, अन्य प्रदेशातील मराठी भाषिकांशी संबंध, वर्तमान शिष्ट भाषेशी संपर्क यांपैकी काहीही या बोलीच्या वाट्यास आले नाही. शतकांच्या वाऱ्या-वादळात आपले व्यक्तिमत्व कायम ठेवणारी ही बोली असाधारण वातावरणात वाढत असल्याने तिच्या अभ्यासाचे महत्त्वही असाधारण आहे.

दोन भाषांच्या सरहद्दीवर प्रचलित असलेली बोली या पातळीवर अरे मराठीचा विचार करता येणार नाही. सीमा प्रदेशात उभय भाषांत देवाणघेवाण होत असते. भाषाव्यवहारात एकच एक भाषा प्रभावी ठरते असे नाही. सीमाभागातील रहिवाशी सभोवतालच्या दोन्ही भाषांशी कमी अधिक प्रमाणात परिचित असतात. भाषाव्यवहार देखील मिश्रभाषेतून चालतो. सांगली नजिक कूपवाड भागातील बोलींची पाहणी एका पाश्चिमात्य पंडिताने केली आहे. मराठी, कानडी आणि उर्दू या तीन भाषा या भागात परस्पर संपर्कात वावरतात. या बोलींच्या संबंधाने या पंडिताचे असे म्हणणे आहे की, तिन्ही भाषांच्या बोलींत एक समिश्र प्रकारची वाक्यरचना रूढ आहे, काही बाबतीत मराठीचे, काहीत कानडी व उर्दू या भाषांचे अनुकरण करणारी. या टापूत मराठी ही प्रभावी भाषा नाही. भाषा व्यवहार कोणत्याही एका भाषेतून चालत असला तरी ती भाषा सर्वांना समजते. [Gumperz, **Language In Social Groups'**, P. 251-267.]

अरे बोलीच्या बाबतीत असाही प्रकार आढळत नाही. म्हणून या बोलीचा अभ्यास अगदी वेगळ्या पातळीवर करावा लागतो.

### ६. अभ्यासाची दिशा

अरे मराठा तेलुगू भाषिक समाजात वावरत असला तरी तेलुगू भाषेवर प्रभाव पडावा एवढी सामर्थ्यवान बोली त्याची नाही. तेलुगू भाषेची बोलीवर गडद छाया पडावी अशा वातावरणात अरे मराठा वावरत असून देखील तेव्हाचे फारच मर्यादित संस्कार त्याच्या बोलीवर झाले आहेत हे आश्चर्यकारक सत्य आहे. काही शब्द काही वाक्प्रचार व अगदी नगण्य असे प्रत्यय एवढ्यापुरताच तेलुगू भाषेचा प्रभाव मर्यादित राहिला आहे. तेलुगू भाषेच्या व्याकरणाचा स्वीकार अरे बोलीने केलेला नाही. अरे मराठा. तेलुगू-मराठी-मिश्र अशी भाषा बोलत

अनुक्रमणिका

नाही. तो कोणती ही एक भाषा एका वेळी बोलतो. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन अरे बोलीच्या अभ्यासाची दिशा निश्चित केली पाहिजे.

काही अपवाद वगळता मराठी बोलींचे अभ्यास वर्णनात्मक (Descriptive) स्वरूपाचे आहेत. साहित्य संस्कृति मंडळाने प्रकाशित केलेल्या मराठी बोलींच्या आठ खंडात वर्णनात्मक पद्धतीच अवलंबिली आहे. एकाच माहितगाराकडून गोळा केलेल्या साधनांवर हे विवेचन आधारले आहे. या अभ्यासातून वाचकाला भाषेचे स्वरूपविशेष समजतात. परंतु, मराठी भाषा आणि परंपरा यांच्या गोतावळ्यात ऐतिहासिक व सामाजिक दृष्ट्या ती बोली नेमकी कुठे बसते याचा बोध होत नाही. केवळ वर्णनात्मक अभ्यासाने या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. एखादी बोली 'अशी' आहे हे कळले तरी ती अशी का? या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. अर्वाचीन प्राचीन मराठीशी तिचे नाते कोणते? काही प्राचीन अवशेष तिच्या ठिकाणी आढळतात का? या आणि अशाच प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे बोलीच्या अभ्यासातून मिळाली तरच बोलींचे अभ्यास भाषा व समाजजीवन यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील.

पुढील पृष्ठांतून सादर केलेला अरे बोलीचा अभ्यास केवळ वर्णनात्मक स्वरूपाचा नाही. वर्णनात्मक पद्धतीने अरे बोलीत आढळणारे विशेष नोंदविण्यात येत असतांना त्या त्या विशेषांचा ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या (Historical Linguistics) सूत्रानुसार मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. आवश्यक त्या ठिकाणी समाजनिष्ठ भाषाविज्ञानाचा (Sociolinguistics) आधार घेण्यात आला आहे. वेगवेगळ्या थरातील व्यक्तींच्या मुलाखती, लोककथा, लोकगीते आणि त्यातून संकलित केलेला शब्दसंग्रह या साधनांच्या आधाराने केलेला अभ्यास सादर करताना मराठी भाषा आणि परंपरा यांचे सर्वांगीण आकलन व्हावे ही दृष्टी बाळगली आहे. निरनिराळ्या गावांतून आणि भिन्न सामाजिक थरांतील व्यक्तींच्या द्वारे संपादन केलेल्या सामग्रीपैकी समाजजीवन समजून घेण्यास उपयुक्त ठरणाऱ्या मुलाखती प्रथम खंडाच्या शेवटी दिल्या आहेत. या मुलाखतींना भाषिक अध्ययनाच्या दृष्टीनेही महत्त्व आहे. अभ्यासाची अन्य मूळ साधने तृतीय खंडात समाविष्ट करण्यात आली आहेत. ही सामग्री पुढील क्रमाने दिली आहे.

(१) **शब्द-संग्रह :** मूळ अरे बोलीतील शब्द, त्याचा मराठी अर्थ आणि प्राचीन मराठी व प्राकृत-अपभ्रंशाशी असलेले त्याचे नाते, काही सामाजिक संकेत (असल्यास) या सर्वांची नोंद संग्रहात झाली आहे.

(२) **लोकगीते :** सांस्कृतिक जीवन आणि भाषाभ्यास या दोहोंना उपयुक्त ठरणारी सामग्री.

(३) **लोककथा :** सामाजिक सातत्य आणि भाषेची अखंड परंपरा यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे साधन.

(४) **क्षेत्राबाहेरील बोली :** तुलनात्मक अध्ययनास उपयुक्त ठरणारी. या सर्व साधनांच्या आधाराने अरे मराठी बोलीच्या स्वरूपविशेषांचा अभ्यास पुढील प्रकरणांतून करावयाचा आहे.

∫∫∫

अनुक्रमणिका

४

## शब्द-संग्रहाचे विश्लेषण

**१. शब्दसंग्रहाचे महत्त्व; २. तेलुगू भाषेचे संस्कार; ३. इतर भांषांचा परिणाम; ४. 'उकारबहुला' भाषा; ५. यादव कालापूर्वी; ६. प्राकृत-अपभ्रंशाचे गाढ संस्कार; प्राचीनऋणानुबंधाच्या अर्वाचीन गाठी.**

### १. शब्दसंग्रहाचे महत्त्व

भाषेचा अभ्यास करताना साधारणपणे पुढील पद्धतीचा अवलंब करण्यात येत असतो.

(१) ध्वनि-व्यवस्था (२) शब्दसिद्धी (३) रूपसिद्धी (४) वाक्यरचना आणि (५) परभाषासंपर्क.

अरे बोलीची विशिष्ट पार्श्वभूमी लक्षात घेता या पद्धतीत थोडा बदल करून पुढील पद्धतीने या बोलीचा अभ्यास देण्यात येत आहे :

(१) शब्द-संग्रहाचे विश्लेषण : या विश्लेषणात परभाषा संपर्काचाही परामर्श घेण्यात आला आहे.

(२) ध्वनिव्यवस्था (३) रूपव्यवस्था आणि (४) वाक्यरचना.

वस्तुतः ध्वनिव्यवस्थेनंतर शब्दांचा विचार करावयाचा असतो. परंतु या बोलीच्या बाबतीत हा क्रम हेतुतः बदलला आहे. बोलीची जातकुळी लक्षात यावी या हेतूने प्रथम शब्दसंग्रहाचे विश्लेषण करण्यात आले आहे. या विश्लेषणाच्या प्रारंभीच पर-भाषा संपर्काचा परामर्श घेण्यात आला आहे. हेतु हा की तेलुगू भाषेच्या वर्तुळात वाढलेल्या या बोलीच्या विशेषांचे स्वरूप विशद करतांना 'तेलुगू भाषेचा तर हा विशेष नसेल?' असा प्रश्न उपस्थित होऊ नये. प्रारंभीच शब्दसंग्रहाच्या विश्लेषणाचे दुसरेही एक उद्दीष्ट आहे ते म्हणजे या बोलीची कुलपरंपरा अगोदर स्पष्ट व्हावी. शब्दसंग्रहाच्या आधाराने अपभ्रंश भाषा आणि यादवकालीन मराठी यांच्या आसपास ही बोली कुठे तरी बसते असे निदर्शनास आले. अपभ्रंश (महाराष्ट्री) आणि यादवकालीन मराठी या दोन भाषांत अस्तित्वात असलेले शब्दसिद्धीचे नियम या बोलीने गरजेप्रमाणे पाळले आहेत. शब्दसिद्धीचा स्वतंत्रपणे विचार त्यायोगे बराच गुंतागुंतीचा होऊन बसला आहे. त्यामुळे शब्दांच्या विश्लेषणाच्या आधाराने निघणाऱ्या निष्कर्षांतून पुढे ध्वनिव्यवस्था व रूप-व्यवस्था यांचा विचार करण्यात आला आहे.

बोलीत रूढ असलेल्या शब्दसंग्रहास बोलीच्या स्वभाव-विशेषांच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान असते. उच्चारप्रक्रियेइतकेच शब्दसंग्रह आणि वाक्प्रचार यांच्या योगाने बोलीला स्वतःचे असे व्यक्तिमत्व प्राप्त होत असते. भाषा-व्यवहाराची व्याप्ती आणि मर्यादा यांचा बोध शब्दसंग्रहाच्या द्वारे होतो तसाच सांस्कृतिक जीवनाचा शोधही या सामग्रीच्या आधाराने घेता येतो. प्रादेशिक वातावरणाचे प्रतिबिंब शब्दसामग्रीत पडणे

अपरिहार्य असते. परभाषिक प्रभावाच्या खुणा देखील शब्दसामग्रीच्या आधाराने शोधता येतात. निरनिराळ्या परभाषांच्या संपर्कात आल्याने एकाच भाषेच्या बोलींना निराळे स्वरूप येत असते.

मराठवाड्याचे उदाहरण यासंबंधात उद्बोधक ठरणारे आहे. विदर्भ-नागपूर, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र हे देशावरचे तीन विभाग. प्रत्येक विभागात प्रादेशिक गुणविशेष असलेल्या बोली अस्तित्वात आहेत. मराठवाडा एका बाजूने तेलंगणाच्या सरहद्दीस लागून आहे. काही भागास कन्नड भाषी टापू लगत आहे. मराठवाड्यात एक बोली असल्याचे गृहीत धरण्यात येत असले तरी परभाषा संपर्काच्या अनुसंधानाने या भागातील बोलीत तीन पोटप्रकार आढळतील. (१) तेलुगू भाषेस निकट असलेला (२) कन्नड सीमेस लागून असलेला व (३) पश्चिम महाराष्ट्राच्या लगतचा, अथवा उर्वरित. पहिल्या दोन भागांतील बोलींवर अनुक्रमे तेलुगू व कन्नड या भाषांचे संस्कार आढळतील. शब्दसंग्रह, वाक्प्रचार, वाक्यरचना आदी सर्वांवर या परभाषांचा प्रभाव या दोन भागांतील बोलीवर आढळेल.

दोन भाषा परस्परांच्या संपर्कात आल्यानंतर परस्पर देवाण-घेवाण अपरिहार्य असते. अरे बोली तर चोहोबाजूंनी तेलुगू भाषेने वेढलेली. या बोलीवर तेलुगूचा परिणाम झालेला असणार असे वाटणे स्वाभाविक आहे. या कार्यास प्रारंभ करण्यापूर्वी माझी देखील हीच धारणा होती. शब्दसंग्रह वाढत गेला तसतसा अपेक्षाभंग होत राहिला. सभोवतालची भाषा असल्याने तेलुगू भाषेचे संस्कार अरे बोलीवर झाले आहेत. पण एकंदरीत वातावरणाच्या तुलनेने हा परिणाम फारच सीमित राहिला याचे आश्चर्य वाटते.

### २. तेलुगू भाषेचे संस्कार

अरे समाजाच्या कोणत्याही वसाहतीत डोकावून पाहिले तर त्या भागात दोन भिन्न भाषिक समाज आढळतात हे सहजी लक्षात येत नाही. राहणीत, वेशभूषेत, सामाजिक व्यवहारात मराठी भाषिक माणूस वेगळा पडलेला दिसला नाही. रक्ताचे नाते नसूनही एखादी व्यक्ती कुटुंबात सामावून जाते त्याप्रमाणे हा मराठी भाषिक तेलुगू भाषेच्या समाजात एकरूप झालेला दिसेल. घरी मराठी आणि दारी तेलंगी अशा या माणसाची द्विविध पण एकात्म रूपे आहेत. अशा समाजाने आपल्या बोलीत तेलुगू भाषेची उसणवारी केली तर ती आश्चर्यकारक ठरणार नाही. पण, खरे कोडे आहे ते वेगळेच : अपेक्षेच्या मर्यादेत उसणवारी होत नाही हे. याची मीमांसा अन्यत्र केली आहे. या ठिकाणी विचार करावयाचा आहे तो तेलुगू भाषेचा अरे बोलीवर परिणाम कोणत्या स्वरूपाचा व किती मर्यादेपर्यंत झाला याचा.

शब्दसंग्रह आणि भाषाव्यवहार यांचा साकल्याने विचार केला असता अरेबोलींवर झालेल्या तेलुगू भाषेच्या परिणामाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**मूळ तेलुगू शब्दांचा संग्रह :** अरे बोलीत रूढ असलेली अधिकांश शब्दसंपत्ती प्राकृत—अपभ्रंश—प्राचीन मराठी अशा परंपरेत बसणारी आहे. केवळ तेलुगू शब्द आणि वाक्प्रचार यांचे प्रमाण अवघे पाच टक्के भरते. या 'परकीय' शब्दात नाम, सर्वनाम, विशेषण आणि अव्यय या शब्दांच्या जातीत मोडणारे शब्द आहेत. क्रियावाचक तेलुगु शब्द अरे बोलीत रूढ नाहीत हे विशेषेकरून नमुद करण्यासारखे आहे. कोणत्याही बोलीची जातकुळी

ठरवितांना क्रियावाचक रूढ शब्द कोणत्या भाषेतून आले आहेत हे पाहणे महत्त्वाचे असते. म्हणून अरे बोलीत तेलुगू क्रियावाचक शब्दांचा अभाव या बोलीचा भाषिक पिंड निर्धारित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो. बोलीत रूढ असलेले तेलुगु शब्द पुढील वर्गात मोडणारे आहेत :

**नाम :** इष्बंदी (नियम, व्यवस्था), कंपारा (कुणबी), खोघरकाथ (नारळ), गुडशी (झोपडी), गुडी (देऊळ), तिप्पलु (खटाटोप, परिश्रम), पंडगा (सण), बडी (शाळा), बिंदी (कळदी, विदंग) इ.

**सार्वनामिक विशेषण :** अंता (सर्व), इंता (एवढे), यंता (केवढे), अन्ते (एवढेच? झालं?), तकीन (उरलेले) इ.

**अव्यय :** अनी (म्हणून), कानी (परंतु), कुडा (सुद्धा), तप्पणा (अवश्य) मल्ली (पुन्हा), अंडी (अहो!)

**तेलुगू-मराठी मिश्र :** काही मराठी शब्दांना तेलुगू प्रत्यय लावून त्यांचा वापर होत असतो तर कित्येकदा एकपद मराठी व दुसरे तेलुगू असा सामासिक शब्द योजण्यात येतो. मराठी शब्दांना तेलुगू अव्यय जोडल्याची उदाहरणे देखील आढळली.

**दंडालु** (दंडा = काठी. ‘लु’ तेलुगू भाषेतील अनेकवचनाचा प्रत्यय).

**जुत्तलु** (जुत्तं = जोते ‘लु’ तेलुगू भाषेतील अनेकवचनाचा प्रत्यय).

**वट्टेवस्त्र** (बट्टे = (तेलुगू) वस्त्र - पूर्वपद तेलुगू, उत्तरपद मराठी).

**जायामुंदू** (जाण्यापूर्वी : मुंदू हे अव्यय तेलुगू भाषेतील)

**येयासरी** (येताक्षणी; सरी हे तेलुगू भाषेतील अव्यय)

**भाषेतील शब्दांचा व वाक्प्रचारांचा अनुवाद असलेले :**

**ऑंन :** भात : (ते. अन्नमु)

**घरचं नॉंऊ :** आडनाव (ते. इंटी पेरूचा अनुवाद).

**अवतार उचलुनु :** अवतार धारण करून. (धरिंची या तेलुगू शब्दाचा शब्दशः मराठी अनुवाद. ‘उचलुनु.)

अनुक्रमणिका

**उचलुनु घेयावं :** लहान मुलांना (कडेवर) घेणे. 'एत्कोआले' या तेलुगू शब्दाचा अनुवाद.

**जाऊनं येतं :** निरोप घेतांना 'जातो' म्हणणे अशुभ समजले जाते. 'येतो' असे म्हणण्याचा प्रघात आहे. तेलुगू भाषेत वेहिद वस्तानु : (जाऊन येतो) असा वाक्प्रचार रूढ आहे.

**जीव सोडतुया :** जीव टाकणे हा मराठी वाक्प्रचार; 'प्राणालु तिस्तारू' = जीव सोडतो हा तेलुगू वाक्प्रचार.

**संगमु टिवलं :** संघ स्थापन केला. 'संगमु येशारूं' या तेलुगू शब्दाचा अनुवाद.

### ३. इतर भाषांचा परिणाम

अरे बोलीवर तेलुगू खेरीज अन्य भाषांचे परिणाम झालेले नाहीत हे खरे असले तरी या बोलीत आढळणाऱ्या संस्कृत व अरबी-फारसी शब्दांचा समावेश 'परभाषेत'च करावा लागतो. या परभाषांचा प्रत्यक्ष असा संस्कार या बोलीवर झाला नाही. संस्कृत आणि अरबी-फारसी भाषांतील शब्द तेलुगू भाषेच्या द्वारे या बोलीत आले आहेत. अरे बोली ही अपभ्रंश भाषेतून उत्क्रांत झालेली असल्याने प्राकृत-अपभ्रंशा प्रमाणेच या बोलीने तत्सम शब्दांचा स्वीकार केला नाही. शिक्षणाचा प्रसारही या समाजात झालेला नसल्याने प्रत्यक्ष संस्कृत भाषेशी या समाजाचा संबंध येत नाही. बोलीत आढळणारे तुरळक संस्कृत शब्द तेलुगू भाषेच्या माध्यमातून आले आहेत. हे संस्कृत शब्द तेलुगू भाषेत रूढ असलेल्या अर्थाने योजले जातात. त्यावरूनही या निष्कर्षास पुष्टी मिळते. हे तेलुगू शब्द आहेत याच भावनेने ते अरे बोलीत रूढ झालेले दिसतात. काही उदाहरणांवरून हे विधान अधिक स्पष्ट होईल.

**आलोचना :** चिंता, विचार.

**उत्तरमु :** पत्र (तेलुगू भाषेत रूढ)

**उद्यम :** चळवळ

**जाति :** राष्ट्र

**राष्ट्र :** प्रांत, प्रदेश

**जीवितमु :** जीवन चरित्र (हिंदी-जीवनी)

**वेसु, पात्रमु :** नाटकातील भूमिका.

अनुक्रमणिका

**शिल्पी :** कलावंत

**निश्चित तांबुलम् :** साखरपुडा

या संस्कृत शब्दांचे जे अर्थ दिले आहेत त्याच अर्थाने तेलुगू भाषेत या शब्दांचा प्रयोग होत असतो. या संस्कृत शब्दांचा जो कोशगत अर्थ आहे तो वक्त्यास मुळीच अभिप्रेत नसतो.

तेलुगू भाषेच्या वर्तुळात राहून आणि मराठी इतक्याच सहजतेने स्वतःही तेलुगू भाषा बोलत असतांनाही अरे मराठ्याच्या मराठीवर तेलुगू भाषेचे संस्कार मर्यादित झाले आहे हे आश्चर्यकारक असले तरी सत्य आहे. विचाराच्या अभिव्यक्तीसाठी आपली मराठी अपुरी पडते असे त्याला जाणवते तेव्हा तो सरळ तेलुगू भाषेत बोलतो, मराठी-तेलुगू संमिश्र शब्दयोजना करीत नाही. यामुळ दोन्ही भाषांचा घनिष्ठ संबंध असूनही अरे बोलीवर तेलुगूचा संस्कार मर्यादित प्रमाणात झाला आहे.

संस्कृत शब्दांप्रमाणेच अरबी-फारसी भाषेतील शब्द देखील तेलुगू भाषेच्याच द्वारे या बोलीत रूढ झाले आहेत. अशा शब्दांचे प्रमाण अत्यल्प असले तरी परभाषा-संपर्काच्या संदर्भात त्यांची नोंद घेतली पाहिजे. तेलुगू भाषिकांच्या नित्याच्या व्यवहारात असलेलेच असे शब्द अरे बोलीत आढळतात.

**वायदा :** कोर्टाची तारीख या अर्थाने हा शब्द तेलुगूत रूढ आहे. त्याच अर्थाने अरे बोलीत तो वापरला जातो.

**सिरनामा :** पत्ता; **जाब-जवाबः** कोर्टात दिलेली जबानी; **पट्टेदार**, हक्कदार, ताबेदार, **मासूल** (महसुल), **तासील** (तहसिल = शेतसारा), **गिरवी** (गहाण), **हाजिर, रवाना** यासारखे शब्द संभाषणात आढळले.

शब्द संस्कृत भाषेतला असो अथवा अरबी वा फारसी भाषेतला, तेलुगू भाषेत रूढ असलेल्या अर्थानेच तो या बोलीत वापरला जात असल्याने वस्तुतः संस्कृत, अरबी, फारसी या तिन्ही भाषा अरे बोलीच्या संदर्भात परभाषा म्हणून उल्लेखणे तितकेसे समर्पक ठरणार नाही. तेलुगू (भाषेच्या संपर्काचाच तो एक भाग आहे. म्हणूनच परभाषा संपर्काचा विचार करतांना अरे बोलीच्या बाबतीत केवळ तेलुगू भाषेचाच निर्देश करणे वस्तुस्थितीस धरून होईल.

**४. 'उकार-बहुला भाषा'**

अरे बोलीचा शब्दसंग्रह स्वतंत्रपणे तिसऱ्या खंडाच्या शेवटी दिला आहे. या संग्रहातील शब्द नोंदवितांना शब्दाची जात, प्रचलित मराठीत शब्दांचा अर्थ, प्राचीन मराठी/अपभ्रंश/प्राकृत या भाषांत असलेले त्या शब्दाचे रूप आणि वाङ्मयीन संदर्भात (आढळले तेवढे) नोंदविण्यात आले आहत. हा संग्रह अगदी वरवर

अनुक्रमणिका

पाहिला तरी शब्दाच्या अंती असलेल्या उकाराचे बाहुल्य नजरेत भरल्यावाचून रहात नाही. तेलुगू शब्दांच्या अंतीदेखील उकार आढळतो. त्यामुळे हा तेलुगूचा संस्कार आहे असा समज सकृद्दर्शनी होतो. परंतु या दोहोंमधील फरक समजून घेतल्यानंतर मात्र उकारबहुलत्व शब्दांती असणे हा या बोलीचा अंगभूत स्वभाव आहे हे प्रत्ययास येते. तेलुगू भाषेच्या संस्काराशी त्याचा संबंध पोचत नाही. पुढील उदाहरणांवरून अधिक स्पष्टीकरण होईल.

जीवितमु, चरित्रमु, पात्रमु, जगतमु, राष्ट्रमु, अधिकारमु, स्थैर्यमु, धैर्यमु असे तेलुगू भाषेत शब्द येतात. मूळ रूपात किंवा प्रत्ययविरहित अवस्थेत वाक्यात त्यांचा उपयोग होतो. या शब्दांना विभक्तिप्रत्यय लागल्यावर मात्र अन्त्य उकाराचाच लोप होतो असे नाही तर शेवटचा 'मु' लोप पावतो.

जीविताlu, चरित्रालु, पात्रालु, जगतलो, राष्ट्रानिकी, स्थैर्यालु, धैर्यालु अशी उपरोक्त शब्दांची रूपे विभक्तिप्रत्यय लागल्यानंतर होतात. या रूपांच्या तुलनेने अरे बोलीतील शब्दांची उदाहरणे तपासून पाहू :

जीवितु, चरितु, पात्रु, जगतु, अद्दिकारू, दीसु, कलसु, शारू (शहर) या शब्दांचा मूळ रूपात व प्रत्ययविरहित विभक्तीत उकारांत प्रयोग होतो विभक्तींचे प्रत्यय अथवा अव्यय लागण्यावर या शब्दाची रूपे पुढील प्रमाणे होतात :

जीविताँसु, चरिताचं, पात्रावरे, जगतचं, अद्दिकार वरे, दिसाचं/दीसचं, कलसवरे, शाराँतु——

या रूपात अंती असलेल्या उकाराचा लोप होऊन विभक्तीचा प्रत्यय अथवा शब्दयोगी अव्यय लागलेले दिसेल. तेलगू आणि अरे बोलीतील शब्दांचा तुलनात्मक दृष्ट्या विचार केला असता असे निदर्शनास येईल की, तेलुगू शब्द उकारांत नसून मुकारांत आहेत. विभक्तीचा प्रत्यय लागण्यापूर्वी 'उ' चा लोप न होता 'मु' चा होतो. उलट अरे बोलीतील शब्द उकारांत असून विभक्तिप्रत्ययापूर्वी 'उ' चा लोप होतो.

वरील उदाहरणावरून असे स्पष्ट होते की, तेलुगू भाषेतील शब्दांती 'मु'काराचे बाहुल्य आहे तर या बोलीतील शब्द प्रामुख्याने उकारांत आहेत. शब्दांती असलेला हा उकार तेलुगू भाषेच्या प्रभावातून आला आहे असे म्हणणे चुकीचे ठरते. शब्दांती असलेले उकारबाहुल्य हा अरे बोलीचा अंगभूत स्वभावधर्म आहे असाच निष्कर्ष या विवेचनातून निघतो. भरताच्या नाट्यशास्त्रात गीतांचे विवेचन करताना प्राकृत-भाषेतील 'उकार बहुल' भाषेतल्या गीतांचा समावेश करण्यात आला आहे. अपभ्रंश भाषा तर 'उकारबहुला' या विशेषणाने ख्यात आहेच. यादवकालीन मराठीत देखील शब्दांतीचा उकार सहजपणे आढळतो. अरे बोलीत शब्दांच्या शेवटी येणारा 'उ'कार हा प्राकृत, अपभ्रंश या पूर्ववर्ती भाषांपासून व यादवकालीन मराठीपासून चालत आलेला वारसा अरे बोलीने चालू ठेवला आहे असे सिद्ध करतो.

अनुक्रमणिका

### ५. यादवकाळापूर्वी

शब्दांती येणाऱ्या उकारबाहुल्याप्रमाणेच इतरही अनेक बाबतीत अरे बोलीचे यादवकालीन मराठीशी नाते प्रस्थापित करता येते. पुढील विवेचनात त्याचा विचार होईलच. शब्दसंग्रहाच्याच केवळ संदर्भात या एका विशेषाचा या ठिकाणी उल्लेख केला आहे. शब्दसंग्रहात आलेल्या शब्दांच्या बाबतीत प्राचीन मराठी वाङ्मयाचे जे संदर्भ दिले आहेत ते लक्षात घेता असे दिसून येते की, 'लीळाचरित्र' आणि 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात आलेले व सध्या प्रचारात नसलेले कितीतरी शब्द आजच्या अरे बोलीत रूढ आहेत. 'सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात संकलित करण्यात आलेले' दोन शब्दकोश या संग्रहाच्या निमित्ताने अभ्यासले असताना अरे बोलीत रूढ असलेले फार थोडे शब्द या दोन कोशांत आढळले [तुळपुळे शं. गो. (खं) 'मराठी भाषेचा तंजावरी कोश' आणि रामकविकृत 'भाषा प्रकाश']. तंजावर भागात सतराव्या शतकात रूढ असलेल्या भावेच्या तुलनेने अरे बोली अधिक प्राचीन वाटते. म्हणून काळाच्या ओघात लुप्त झालेले शब्द तंजावरी कोशांत आले नसावेत. प्राकृत-अपभ्रंश भाषांतील वाङ्मयात आढळणारे बरेचसे शब्द आपल्या मूळ रूपात अरे बोलीत रूढ आहेत. तंजावरी कोशात मात्र त्यांना स्थान मिळाले नाही. सतराव्या शतकातील तंजावरी ग्रांथिक मराठी अरे बोलीपासून बरीच दुरावलेली होती असा निष्कर्ष काढण्यात आला तर तो निराधार ठरू नये. प्राचीन मराठी वाङ्मयातील लीळाचरित्र ते पंचोपाख्यान या ग्रंथातील बरीच शब्दसंपत्ती अरे बोलीच्या भांडारात दिसून येते. डॉ. कोलते यांनी "स्थूल मानाने शके १२०० हा लीळाचरित्राचा काळ निश्चित करण्यास हरकत नाही" असा निर्वाळा दिला आहे [लीळाचरित्र (कोलते प्रत), प्रस्तावना, पृ. ६५.]. पंचोपाख्यानाचा काल निश्चित करताना डॉ. कोलते यांनी इतर बाबींबरोबर या ग्रंथातील भाषेचे स्वरूप देखील लक्षात घेऊन चौदावे शतक हा पंचोपाख्यानाचा काळ निश्चित केला आहे :

> 'दंतीलु, अंतु, आतंकु, प्रधानु, सन्मानु, प्रणिपातु इत्यादी **उकारांत नाम** व विदारीतु असे, करीमे असे झाडीतु असे, खातू असे इत्यादी **उकरांत धातुरूपे**; पुरुषा होऊनि (हून), आजी होउनी, दूर होउनी, अशी पंचमीविभक्तीची रूपे, त्याचप्रमाणे करौनि, टाकौनि. भविष्यकालीन प्रथमपुरुषी अनेकवचनी रूपे, 'मी विश्वासला' हे प्रथमपुरुषी एकवचनी रूप, व गर्जितला, जागीतला, उपनली, मेदी, नेघे, नोहे इत्यादी रूपे पाहिली म्हणजे हा मूळ ग्रंथ फार प्राचीन काळी, सर्वसाधारण चौदाव्या शतकात लिहिला गेला असला पाहिजे असे अनुमान करण्यास हरकत नाही. [पंचोपाख्यान, (कोलते प्रत), प्रस्तावना, पृ. ७०.]

भाषेत आढळणाऱ्या ज्या विशेषांच्या आधाराने पंचोपाख्यानाचे प्राचीनत्व प्रस्थापित करण्यात आले आहे त्यांपैकी 'करौनि, टाकौनि अशी प्रथम पुरुषी अनेकवचनी रूपे' वगळता अन्य विशेष अरे बोलीत आढळतात हे पुढील विवेचनात सप्रमाण मांडण्यात आले आहे. ऐ व औ हे संयुक्त स्वर अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेत बसत नाहीत. अगदी अपवादात्मक शब्दांत (गाडौ, टौळा, पोळा) 'औ' हा स्वर आढळतो. 'हो'कार कोठेच दिसून आला नाही. या दोन संयुक्त स्वरांसंबंधी डॉ. तुळपुळे यांनी केलेले विवेचन या ठिकाणी ध्यानात घेणे आवश्यक श्यक आहे :

अनुक्रमणिका

**"यादव मराठीतील ध्वनिव्यवस्था म्हणजे अपभ्रंशातील ध्वनिव्यवस्थेची उत्क्रांत अवस्था होय.** अपभ्रंशातील सर्व ध्वनी यादव मराठीत उतरले असून त्याशिवाय तिने ऐ आणि औ हे दोन संयुक्त स्वर संस्कृतमधील द्विस्वरांतर्गत व्यंजनलोपामुळे निकट आलेल्या स्वरांचा संयोग करून **नव्याने निर्माण केले आहेत."** [यादवकालीन मराठी भाषा]

[जाड ठसा लेखकाचा]

या उताऱ्यात पुढील मुद्दे आहेत. (१) अपभ्रंशातील सर्व ध्वनि यादवकालीन मराठीत उतरले आणि (२) यादवकालीन मराठीने (अपभ्रंशात नसलेले) ऐ व औ हे दोन ध्वनी नव्याने निर्माण केले. तेरावे शतक हा यादवकाल गृहीत धरला तर ऐ व औ हे संयुक्त स्वर या काळात मराठी भाषेत रूढ होते असे निष्पन्न होते. ऐ व औ हे संयुक्त स्वर ज्या काळात मराठी भाषेत नव्हते तो काळ अर्थात् तेराव्या शतकापूर्वीचा मानावा लागतो. अरे बोलीत हे संयुक्त स्वर नसल्याने ती **तेराव्या शतकापूर्वी** उत्क्रांत झाली असा अर्थ होतो. या अनुमानास पोषक अशी सामग्री अरे बोलीच्या शब्दसंग्रहात आढळते काय?

'लीळाचरित्र' हा ग्रंथ प्रचलित लोकभाषेतून मिळालेल्या कथांच्या द्वारे संकलित करण्यात आला आहे. अरे बोलीतील शब्दसंग्रहात लीळाचरित्रातील शब्द मोठ्या प्रमाणात का आढळतात हे शोधले पाहिजे. काळाचे सुमारे सात शतकांचे अंतर ओलांडून एखादी भाषा मूळ रूपात टिकू शकते हे या समान शब्दांनी प्रस्थापित केले आहे. अरे बोलीत असलेला शब्दसंग्रह केवळ लिळाचरित्राच्या काळाइतकाच प्राचीन आहे की तत्पूर्वीच्या काळाचाही तो निदर्शक आहे याचा देखील शोध घेतला पाहिजे. 'सलदु' हा शब्द मला फक्त लीळाचरित्रात आढळला हे या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

अरे बोलीत रूढ असलेली बरीच शब्दसंपत्ती यादवकालातली आहे. परंतु, यादवकाळात नव्याने आलेले ऐ व औ हे संयुक्त स्वर या बोलीत नसल्याने शब्दसंग्रहाच्या आधाराने यादवपूर्वकालातील काही विशेष या बोलीत आढळतात का असा प्रश्न पडतो. यादवपूर्वकालातील मराठी भाषेचे स्वरूप आढळते ते केवळ शिलालेख-ताम्रपट या साधनात. दहाव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंतच्या शिलालेख ताम्रपटातही अरे बोलीतील शब्द आढळून आले. शब्दसंग्रहात त्याच्या शब्दापुढे शिलालेख, ताम्रपट आणि यादवकालीन वाङ्मय यांचे संदर्भ देण्यात आलेले असले तरी अरे बोलीतील शब्दसंग्रहाचे पुरातनत्व ध्यानी यावे या हेतूने या अध्यायास जोडलेल्या परिशिष्टात वेगळी शब्दसूची दिली आहे. अधिक संशोधन करण्यास ही सूची साहाय्यभूत ठरेल असा विश्वास वाटतो.

या बोलीच्या शब्दसंग्रहात आलेले यादवकालीन शब्द व शिलालेख-ताम्रपटातील शब्द शोधून काढले तरीही पूर्वेतिहास शोधण्याजोगे बरेच शब्द शेवटी उरलेच. हे शब्द द्राविड परंपरेतले नसल्यामुळे तेलुगू भाषेच्या वाङ्मयात त्याचा शोध निरर्थक ठरतो. संस्कृत भाषेच्या वाङ्मयातही या शब्दांचा शोध व्यर्थ ठरतो. त्यामुळे प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांतील ग्रंथांचे आलोकन अपरिहार्य ठरले. हेमचंद्राच्या देशीनाममालेपासून म्हणजे, अकराव्या शतकात गोळा केलेल्या शब्दसामग्रीपासून या प्रवासाला प्रारंभ केला आणि शब्दांच्या सांगडीवर बसून पैलतीर लागले ते गोदाकाठी पहिल्या शतकात रचलेल्या गाथासप्तशतीच्या मुक्कामावर. या प्रवासात आश्चर्याचे

धक्के वारंवार बसत गेले. लोकपरंपरा किती कणखर आणि चिरजीवी असते याचा अनुभव आला. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीच्या उगमस्थानी असलेल्या गाथासप्तशतीचे शब्दवैभव अरे बोलीसारख्या उपेक्षित बोलीने आपल्या गर्भात जपून ठेवावे हा थोर चमत्कारच म्हणावा लागेल. हे सत्य जेवढे अभिमानास्पद तेवढेच भाषेच्या पुरातनत्वाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. समग्र मराठी भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीने देखील नवी क्षितिजे निर्माण करणारा प्रांत या बोलीच्या योगाने खुला व्हावा हाही एक अभिमानास्पद योग म्हटला पाहिजे.

अरे बोलीत सुरक्षित राहिलेल्या या पूर्वसंचिताची यथार्थ कल्पना यावी या हेतूने या अध्यायाच्या परिशिष्टात प्राकृत-अपभ्रंश भाषांतील समान शब्दांची सूचि जोडण्यात आली आहे. या सूचीवरून अरे बोलीचे प्राकृत-अपभ्रंशांशी असलेले नाते किती जिव्हाळ्याचे आणि अंगभूत आहे याची कल्पना अभ्यासकांस येईल.

**६. प्राकृत-अपभ्रंशाचे गाढ संस्कार**

अरे बोलीच्या शब्दसंग्रहाचे विश्लेषण करताना आतापर्यंत दोन गोष्टी स्पष्ट झाल्या : (१) यादवकालीन ग्रांथिक मराठीतील बरीच शब्दसामग्री अरे बोलीत आढळते. तथापि शब्दसंग्रहातील काही विशेष यादवपूर्वकालीन अवशेष सूचित करणारे आहेत. (२) या अवशेषांचा शोध प्राकृत-अपभ्रंशापर्यंत घ्यावा लागतो. या शोधात प्राकृत-अपभ्रंश या भाषांना अरे बोली अधिक निकट असल्याचे निदर्शनास येते. [या दोन्ही विशेषांना दृढ करणारी सामग्री याच अध्यायाच्या परिशिष्ट (अ) आणि (आ) या भागात दिली आहे.]

सुमारे अकराशे शब्द असलेल्या अरे बोलीच्या संग्रहाचे परीक्षण केले असताना भाषाशास्त्राच्या सिद्धांतास धक्के देणारे विशेष या बोलीत असल्याचे निदर्शनास येईल.

> १. काळ थांबत नसतो त्याचप्रमाणे कालमानानुसार भाषेत होणारा बदल देखील कधीच कुंठित होत नसतो बदल हा मुळातच भाषेचा स्थायी भाव असतो. फरक एवढाच की ग्रंथनिविष्ट असलेल्या भाषेला स्थैर्य अधिक असते बोलीत मात्र ही प्रक्रिया मंदगतीने होत असते. अरे बोली या सर्वसामान्य नियमास अपवाद ठरते. किमान दहाव्या शतकात अपभ्रंश ग्रंथांत आढळणारे शब्द आजच्या अरे बोलीत रूढ आहेत. तत्पूर्वीचेही शब्द या बोलीत आढळतात. इ. स. च्या पहिल्या शतकातील गाथासप्तशतीपासून ते चौदाव्या शतकातील पंचतंत्रापर्यंत भाषेचे सातत्य दाखविता येईल एवढी अत्यंत मोलाची सामग्री अरे बोलीत आढळून येते. जगातल्या कोणत्याही भाषेने एवढी प्रदीर्घ सातत्याची परंपरा सुरक्षित ठेवल्याचे उदाहरण मला तरी आढळले नाही.
>
> २. एकूण टक्केवारीचा हिशेब केला असताना या बोलीत निरनिराळ्या कालातील शब्दाचे प्रमाण पुढीलप्रमाणे आढळले :

(अ) प्राकृत-अपभ्रंश वाङ्मयात आढळणारे व अरे बोलीत जवळपास त्याच स्वरूपात रूढ असलेले शब्द **२० टक्के**

(आ) वर्तमान मराठीत रूढ नसलेले पण, प्राकृत-अपभ्रंश आणि चौदाव्या शतकापूर्वीचे मराठवाङ्मय यांत समान असलेले व अरे बोलीत प्रचलित असलेले शब्द **२५ टक्के.**

(इ) प्राचीन मराठी वाङ्मय आणि मराठवाड्यातील ग्रामीण बोली यांतच आढळणारे व अरे बोलीत रूढ असलेले शब्द **४० टक्के.**

(ई) सर्वसाधारण मराठीत रूढ असलेल्या शब्दांचे अरे बोलीतील प्रमाण केवळ **१० टक्के** आढळते.

(उ) अवघे **५ टक्के** शब्द तेलुगू भाषेतून उसणवारीने आलेले आहेत. संस्कृत, अरबी-फारसी या पर भाषांतील शब्दांचा समावेश देखील या पाच टक्क्यात होतो. तेलुगू भाषेतील शब्दांचे हे अत्यल्प प्रमाण भाषाशास्त्राच्या प्रचलित सिद्धांतांस धक्का देणारे आहे.

भाषेतला शब्द-संग्रह हे भाषाविषयक अभ्यासाचे एक अंग असते. भाषेचा स्वभावधर्म थोड्या फार प्रमाणात शब्द-संग्रहात प्रतिबिंबित झालेला असतो. केवळ शब्दसंग्रह भाषेची जातकळी. निर्णायक रीत्या निश्चित करण्यास अपुरा ठरतो. अरे बोलीतील शब्दसंग्रहास मात्र आगळे महत्त्व आहे. या बोलीच्या स्वभावधर्माशी शब्दसंग्रहाचे असलेले नाते पुढील विवेचनात अधिक स्पष्ट होणार आहेच. हा संबंध स्पष्ट होण्यापूर्वी या बोलीवर असलेल्या प्राकृत-अपभ्रंशाच्या गाढ प्रभावाचा अधिक उलगडा आवश्यक वाटतो.

प्राकृत-अपभ्रंश वाङ्मयातील शब्दांचे प्रमाण अरे बोलीत २० टक्के आहे एवढ्या विधानाने प्राकृत-अपभ्रंश आणि अरे बोली यांच्या नात्यावर संपूर्ण प्रकाश पडत नाही. अरे बोलीत प्राकृत-अपभ्रंशातील अनेक शब्द अविकृत रूपात रूढ झाले आहेत. शब्दांच्या सर्वच जातीतून ही संपदा आलेली आहे. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियावाचक शब्द, अव्यय या सर्व प्रकारातून हे शब्द आले आहेत. वाणगी दाखल काही उदाहरणे पुढे देता येतील :

[अधोरेखित शब्द अरे बोलीचा, चौकटी कंसात प्राकृत-अप- भ्रंशातील त्याचे मूळ रूप; पुढे ग्रंथांचे संदर्भ व प्रचलित अर्थ]

अनुक्रमणिका

(१) **नाम**

**मेरा :** [मेरा] **महापुराण**, ८- १-१३; सीमा, मर्यादा.
**हलदाई** [हलिद्दा] : गाथासप्तशती, १-५८-१-८०; हळद.
**चिक्खोलु** [चिक्खोलु] : गाथासप्तशती, १-६७.
**वदलु** [वद्दलु] : **करकण्डुचरिउ**, ७-१६-८५ वादळ.

**सर्वनाम-विशेषण**

**ये** [ए] : **सावयधम्मदोहा**, १८ हा.
**येकलं** [एकल्ल] : **गाथासप्तशती**, ७-१८; एकटा.
**येवडू** [एवडु] : **सावयम्मदोहा**, १७९; एवढा.
**दोग्गं** [दोग्ग] : **देशीनाममाला**, ५-४९; दोघे.
**तीनी** [तिण्णि] : **लीलावईकहा**, २४८; तीन.

**अव्यय**

**घरघर** [घरघर] : **गाथासप्तशती**, २-१४; घरोघर.
**भींतरु** [भितरू] : **करकण्डुचरिउ**, ९-११-४; आत
**दडमनुनु** [दडति] : **करकण्डुचरिउ**, ९-१३-२; धाडकन् (धड असे म्हणून).
**अम्मो** [अम्मो] : **कुमारपालचरिउ** ४-५३; आश्चर्योद्‌गार.

**क्रियावाचक शब्द**

**जानसु** [जानसु] **: गाथासप्तशती**, १-५२; जाणावे
**धुई** [धुवई] : **गाथासप्तशती**, ५-३३; धुतो.
**फुक्कन्तं** [फुक्कन्तो] : **गाथासप्तशती**, २-७६; फुंकतो.
**बिज्ञन्तं** [भिज्ञन्त] : **गाथासप्तशती**, ३-१६; भिजतो.
**येतं** [एत्तो] : **गाथासप्तशती**, १-८५; येतो.

नाम-सर्वनामांपेक्षाही क्रियावाचक शब्दांचे साधर्म्य भाषेच्या पिंड-प्रकृतीच्या दृष्टीने निर्णायक असते. कोणतीही भाषा परभाषेतील शब्दांची उसणवारी करताना अपरिहार्य असेल तरच क्रियावाचक शब्द परभाषेतून उचलत असते. [“Crober in his presidential address to the Linguistic Society in 1940 calls at a ‘usual dictum’ that ‘words can be borrowed freely between distinct languages but grammer with difficulty if at all’ ”-Prider Holmes (Ed) **Sociolinguistics** (Reprint 1976) P. 643.] तेलुगू भाषिकांत दीर्घकाल नांदूनही तेलुगू क्रियापदाची उसणवारी न करणारी ही बोली अपभ्रंशातील क्रियापदाचा मुक्तपणे वापर करते हे विशेषेकरून ध्यानात ठेवण्यासारखे आहे. वर दिलेल्या उदाहरणांत नाम, सर्वनाम, विशेषण, अव्यय या वर्गांत मोडणारे शब्द उच्चाराच्या दृष्टीने बरेच अविकृत राहिलेले दिसतील.

अनुक्रमणिका

क्रियावाचक शब्द उच्चाराच्या दृष्टीने बरेच अविकृत तर राहिले आहेतच पण, क्रियावाचक शब्दांची प्रत्ययपरंपराही अरे बोलीने अपभ्रंशापासून उचलली आहे असे दिसून येईल. एकूण शब्दसंग्रहात प्राकृत-अपभ्रंशातील-क्रियावाचक शब्दांचे प्रमाण अरे बोलीत अधिक असून धातूस लागणारे बरेच प्रत्यय अपभ्रंशातील प्रत्ययावरून उचललेले दिसतात. याचा अर्थ एवढाच होतो की, अरे बोलीच्या दृष्टीने अपभ्रंश ही परकी भाषा न राहता, एकपरीने अपभ्रंशाचेच उत्क्रांतरूप अरे बोलीत आढळते असे म्हटले पाहिजे. भाषेच्या इतर अंगांच्या विवेचनातून याच निष्कर्षास पुष्टी मिळते. वरील उदाहरणांत गाथासप्तशतीतील शब्दांचा समावेश हेतुतः करण्यात आला आहे. पहिल्या शतकापासून ते वर्तमानकाळापर्यंत मऱ्हाटी परंपरेने आपली अखंडता कशी कायम राखली आहे हे देखील त्यावरून प्रत्ययास येईल.

**७. प्राचीन ऋणानुबंधांच्या अर्वाचीन गाठी**

मराठी भाषेची उत्पत्ती सातव्या आठव्या शतकात झाली असून साधारण मराठी वळणाचे शब्द पांचव्या-सातव्या शतकापासून शिलालेखांत आढळतात असा विद्वानांचा निर्वाळा आहे. मराठी भाषा चौथ्या शतकात उदयास आली हे इतिहासाचार्य राजवाडे यांचे मत आता मागे पडले आहे. तथापि, 'शके १५० ते ४०० या काळात मराठी गर्भावस्थेत होती' हे ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत त्यांनी मांडलेले मत गंभीरपणे दखल घेण्यासारखे आहे असे मला वाटते. गाथासप्तशतीतील शब्दांच्या रूपांचा विशेषतः क्रियापदांचा अरे बोलीतील अविकृत आढळ या दिशेने विचार करण्यास प्रवृत्त करतो.

अरे बोलीचा यादवकालीन मराठीशी मुळीच संबंध नाही असा निष्कर्ष त्यावरून काढता येत नाही. वर्तमान मराठीत रूढ नसलेले व यादवकालीन मराठीत आढळणारे अरे बोलीतील शब्द सुमारे ४० टक्के भरतील एवढे आहेत. या बोलीत प्राकृत-अपभ्रंशातील शब्दांची अविकृत रूपे आढळतात. त्यावरून या बोलीची मूळ अवस्था यादवकालीन ग्रांथिक मराठीच्या अगोदरची असावी असे अनुमान निघते. अरे बोलीतील शब्दांचा प्राचीन मराठी वाङ्मयात धांडोळा घेत असतांना एक विशेष आढळून आला. 'ज्योतिषरत्नमाला', 'विवेकसिंधू' अशा पंडिती वळणाच्या प्राचीन ग्रंथांतून अरे बोलीत असलेले शब्द कमी प्रमाणात आढळले. उलट, "लीळाचरित्रात" मात्र अरे बोलीत रूढ असलेले बरेच शब्द अगदी सहजगत्या आढळले. म्हाइंभट हा स्वतः थोर पंडित असला तरी लीळाचरित्राचे संकलन करतांना त्याने जनसामान्यात रूढ असलेल्या कथा-गाथांचा संग्रह केला आहे. साहजिकच जनसामान्यांच्या बोलीस या संग्रहात स्थान मिळाले त्यामुळे कदाचित अरे बोलीतील अनेक शब्द लीलाचरित्रात आढळून आले असावेत. लीळाचरित्राच्या खालोखाल क्रम लागतो पंचोपाख्यानाचा. संस्कृत भाषेतील पंचतंत्र पंचोपाख्यान आधारलेले असत्ये तरी लोकरूढ कथांची भाषा या ग्रंथात आल्याने या बोलीतील बरेच शब्द पंचतंत्रात गवसले.

ही कथा-गाथा परंपराच प्राकृत-अपभ्रंशाशी अरे बोलीचे ऋणानुबंध प्रस्थापित करणारी आहे. साक्षात् प्राकृत-अपभ्रंशातील शब्दांचे प्रमाण अरे बोलीत २० टक्के एवढेच असले [वर्तमान मराठी भाषेत हे प्रमाण बरेच कमी झालेले आहे हे लक्षात घेता अरे बोलीत आढळून येणारे साक्षात् प्राकृत-अपभ्रंश शब्दांचे २० टक्के प्रमाण बरेच महत्त्वपूर्ण ठरते. मराठी भाषेच्या उत्क्रांतीच्या अवस्थेतील प्रारंभकाळाचे ते निदर्शक आहे.] तरी उर्वरीत शब्दांपैकी बहुसंख्य शब्दांचा व्युत्पत्तिदृष्ट्या संबंध अपभ्रंशापर्यंत पोचतो. इतकेच नव्हे तर ही बोली यादवकालीन मराठीपेक्षा अपभ्रंशाला अधिक जवळची असल्याचा निष्कर्ष या

बोलीच्या इतर अंगाच्या अभ्यासातूनही निघतो. अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेच्या अभ्यासात या मुद्यांचे अधिक स्पष्टीकरण करता येईल.

∫∫∫

अनुक्रमणिका

## प रि शि ष्टे

### [अ] **अरे बोलीत आढळणारे प्राकृत-अपभ्रंश वाङ्मयातील काही निवडक शब्द**

अधोरेखित शब्द अरे बोलीचा, चौकटी कंसात प्राकृत-अपभ्रंशरूप, संदर्भ आणि अर्थ या क्रमाने पुढील सूची देण्यात आली आहे. ग्रंथसंक्षेप असा :

करकण्डचरिउ = कच; गाथासप्तशती = गास; देशीनाममाला = देना; वज्जलग=व.; सावयधम्मदोहा = सादो; महापुराण = मपु.

**अक्का** [अक्का] कच ८३५ **मोठी बहीण.**
**अडवी** [अडवी] कच ७-३-३ **अरण्य.**
**अम्मनु** [अम्मणु] मपु. २५-२-५ **अमळ.**
**अरोलि** [ओरोलि] मपु. ५-१७ **आरोळी.**
**अँसु** [अँसु] गास ७-२१, ४४ **अश्रू.**
**इत्तं** [एत्य] व. २-५५ **येथे.**
**उकंडा** [उक्कण्डो] देता १-९२ **उकीरडा.**
**उग्गड** [उग्घाड] कच १०-१३-८ **उघड.**
**उसर** [ऊसर] सादो ८३ **नापीक जमीन.**
**उंबी** [उंबी] देना १-८६ **ओंबी.**
**कंत** [कंत] कच ५-५-२ **पति.**
**काऊनु** [काऊण] गास ३-२६ **का म्हणून**?
**कुडऊ** [कुडवं] देना २-६३ **धान्य मोजण्याचे टोपले.**
**कोड्डु** [कोड्डु] मपु. १३-६-१ **कौतुक.**
**खुज्जं** [खुज्जं] व. ५-९९ **खुजा.**
**खोल्लं** [खोल्लं] मपु. २-१-७ **खोल.**
**गाइ** [गाइ] गास. **(गायात गातो).**
**गॉमु** [गाम] गास. १-८ **गाव.**
**चोजु** [चोर्ज्ज] मपु. ८-७-२३ **आश्चर्य.**
**छिंक** [छिंक] मपु. २६-४-२; **शिंक.**
**जॉमाई** [जामाइ] गास. ७-८३; **जावाई.**
**जाला** [जाला] कच. २-१४-७; **जाळ.**
**जुज्जं** [जुज्ज] गास. ७-८४ **युद्ध.**
**टुटा** [टुंटा=छिन्नकर] देना. ४-११; **तुंडा.**
**डेन्कुनु** [ढेन्कुणो] देना. ४-११; **ढेकूण.**
**तल्लं** [तल्ल] मपु. २५-२-८; **तळे.**

अनुक्रमणिका

**तंबोलु** [तंबोल] सदो. ३७; **तांबूल, विडा.**
**दइउ** [दइउ] कच ७-११-११; **दैव.**
**दुद्दं** [दुद्ध] गास. ४-८८; **दुध.**
**देइ** [देइ] गास. ७-३; **देतो.**
**देंटु** [देंट] मपु. ४-११-११; **देठ.**
**दोग्गं** [दोग्गं] देना. ५-४९; **दोघे.**
**धंडं** [ठंडो] देना. ४-६; **निरुपयोगी.**
**पडवा** [पडवा] देना. **तंबू**
**पल्ली** [पल्ली] गास. ६-९७; **गाव, वसाहत.**
**पइलारु** [पहिलारउ] कच. ३-८-११; **पहिल्यांदा गरोदर असलेली.**
**पंगरुनु** [पंगुरण] मपु. ७-२३-९; **पांघरुण.**
**बइलु** [बइलू] गास. ३-७५; **बैल.**
**भंडनु** [भण्डण] गास. ७-९९ **भांडण.**
**भोंडी** [भोण्डी] गास. ५-२; **गर्हणीय स्त्री.**
**मंजरु** [मंजर] सादो. ४-७; **मांजर.**
**रोजी** [रोल] मपु. १४-५-१९; **गोंधळ.**
**वावरु** [वावार] गास. २-७८; **शेत.**
**विटलु** [विट्टल] मपु. ७-१२-८; **विटाळ.**
**सिंबाडी** [सिबाडिं] देना. ८-२९; **शेंबूड.**

**[आ] अरे बोलीत आढळणारे शिलालेख, ताम्रपट व प्राचीन मराठी वाङ्मयातील निवडक शब्द**

अधोरेखित शब्द अरे बोलीचा; चौकटी कंसातील प्राचीन मराठी वाङ्मयातला, वाङ्मयीन संदर्भ, अर्थ या क्रमाने पुढील नोंद करण्यात आली आहे.

संक्षेप शि-शिलालेख; ता-ताम्रपट; ज्ञा-ज्ञानेश्वरी; लीच-लीळाचरित्र; उखा-उखाहरण; पं-पंचोपाख्यान, वि-विवेकसिंधु.

**अइसं** [अइस] शि. **ऐसे.**
**अइलाडु** [ऐलाडि] लीच पू. २६; ज्ञा. ६-१९१; **अलिकडे.**
**अद्दिकु** [अद्दिकु] शि. (मडगाव शके १६१७) लीच उ. ३२६; **अधिक.**
**अयगत** [अयगत] शि. (फुलंवरी श. ११६४); **उत्पन्न.**
**अंगी** [अंगी] लीच पू. १४५; **आंगरखा.**
**उजियेडु** [उजिएड] ज्ञा. १२-१४७ उखा. ९९७ **उजेड.**
**कइसं** [कइस] शि. **कैसे.**
**कल्लाई** [कळावी] लीच पू. २४८; उखा १७१; **मनगटावरील बांगडी सोन्याची.**

अनुक्रमणिका

**कँसारु** [कंसार] उखा १०५१; **कासार.**
**कुडं** [कुडे] शि. ज्ञा. २-२६; उखा. ५०८; **खोटे, वाईट.**
**गुंडतं** [गुंडत] लीच. पू. ७९; **गुंडाळतो.**
**जोन्नले** [जोन्हले] लीच. पू. ५३७; **जोंधळे.**
**डंबु** [डंब] लीच. उ. ५०५; **दंभ.**
**डाइ** [डाई] लीच. उ. ३६०; **पराभव.**
**दलिदर** [दलीद्र] लीच. पू. ४७७ **दारिद्र्य.**
**दिठी** [दिठी] शि; लीच. उ. ३१५; ज्ञा. १५-१७०; **दृष्टि.**
**दुकलु** [दुकलु] ज्ञा. १३-१७०; **दुष्काळ.**
**नइ** [नइ] लीच. पू. ३६०; **नदी.**
**नोको** [नोको] लीच. उ. १००; **नको.**
**न्हव्वं** [न्हव्वं] लीच. पू. ५६५; **नव्हे.**
**भरु** [भरु] उखा. ३१३; **भरभराट.**
**भुई** [भुई] लीच. पू. ९८; ज्ञा. ९-३९ **जमीन.**
**माज** [माज] लीच. पू. ४९९; ज्ञा . ३-६४५; **मध्य, कमर.**
**माहियेर** [माहिएर] लीच. उ. ७६; **माहेर.**
**मोगरु** [मोगर] उखा. १०९९; **पायदळ.**
**वाडिवा** [वाढै] लीच. पू. ५७; **सुतार.**
**सरि** [सरि] शि. (चिकुर्डे श. १०७६) ज्ञा. २-४८ **झरा.**
**सलदु** [सलद] लीच. पू. ४१८; **पेटारा.**
**सातरी** [सातरिया] लीच. उ. ६२८; ज्ञा. १७-९७ **अंथरुण.**
**सुभर** [सुभर] लीच. पू. ४३; **बहरलेले झाड.**
**से** [से] ज्ञा. १-१७१; **आठवण.**
**सोंदरि** [सोंदरा] ज्ञा. १ ८- १६५१; **सुंदरी.**

∫∫∫

# ५

## ध्वनि-व्यवस्था

**१. भाषा व्यवहार आणि ध्वनि-व्यवस्था; २. बोलीची स्वयंपूर्ण उच्चार-प्रक्रिया; ३. प्रमाण मराठीची वर्णव्यवस्था; ४. अरे बोलीची वर्ण-व्यवस्था; ५. काही ध्वनींचा अभाव; ६. अरे बोलीतील ध्वनिलोपाची मीमांसा; ७. बोली मराठीची की अपभ्रंशाची? ८. ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया; ९. प्रमाण भाषेतील संयुक्त वर्णांचे उच्चार; १०. ध्वनिपरिवर्तनाशी संबंधित अन्य समाज विशेष; ११. महाप्राण व्यंजने आणि 'ह'; १२. तालव्य आणि दन्ततालव्य वर्णांचे उच्चार; १३. नासिक्य वर्ण; १४. आणखी काही उच्चार विशेष १५. मराठी भाषेची प्राचीनतम अवस्था; अरे बोली; १६. ध्वनि-व्यवस्थेचा शोध आणि बोध.**

### १. भाषा व्यवहार आणि ध्वनि व्यवस्था

कोणत्याही भाषेचा (त्यात बोली आलीच) प्रकृतिधर्म समजून घेण्यासाठी त्या भाषेची ध्वनिव्यवस्था लक्षात घेणे अगत्याचे असते. शब्दांच्या द्वारे झालेल्या भाषाव्यवहाराने समाजातल्या व्यक्तींशी संवाद साधता येतो. वक्त्याच्या अंतरीचा भाव तसा निराकार असतो. शब्द या भावांना साकार करतात. शब्दांना व्यक्त रूप मिळते ते मुखावयवातून निर्माण होणाऱ्या ध्वनींच्या योगाने. शब्द घडविणाऱ्या ध्वनींची सुसंगत, संघटित आणि स्वयंपूर्ण व्यवस्था प्रत्येक भाषेत असते. वक्ता आणि श्रोता यांचा 'संवाद' त्यामुळे होतो व भाषाव्यवहार 'अर्थपूर्ण' ठरतो. भाषाव्यवहाराने व्यापलेल्या क्षेत्राला तशी मर्यादा नसते. परंतु, भाषाव्यवहाराचे माध्यम असलेल्या शब्दांना घडविणाऱ्या ध्वनींचा समूह मात्र मर्यादित असतो. त्या त्या भाषेचा समाज आपल्या भाषेच्या मर्यादित ध्वनिसमूहाच्या परिघातच भाषाव्यवहार करीत असतो. ही ध्वनिव्यवस्था प्रत्येक भाषेच्या प्रकृतिधर्माचा मूळाधार असतो. भाषेत कालांतराने घडणारे परिवर्तन मूलभूत ध्वनिव्यवस्थेच्या मर्यादेतच घडते. या परिवर्तनास निश्चित दिशा असते तशीच अंतर्गत संघटनादेखील.

संस्कृत भाषेपासून उद्‌भवलेल्या प्राकृतांचे उदाहरण या संदर्भात देता येण्यासारखे आहे. संस्कृत शब्द प्राकृतांत येताना त्या शब्दांतील कठोर वर्ण विशिष्ट परिस्थितीत मृदु वर्णात रूपांतरित होतात. हे एखाद्याच शब्दांच्या बाबतीत घडते असे नव्हे. समान परिस्थितीत असलेल्या सर्वच कठोर वर्णांच्या बाबतीत निरपवादपणे असेच परिवर्तन घडत असते. तेही प्राकृत भाषेने स्वीकारलेल्या वर्णव्यवस्थेच्या मर्यादेत. परिवर्तनाच्या प्रक्रियेत भाषेच्या ध्वनिव्यवस्थेत नसलेला कोणताही नवा वर्ण भाषेत रूढ होत नाही. किंबहुना, रूढ ध्वनिव्यवस्थेशी संवाद साधण्यासाठीच ध्वनिपरिवर्तन घडत असते. परभाषेतील शब्दांच्या उच्चारात होणारा बदल याच तत्त्वाचा निदर्शक असतो.

अनुक्रमणिका

## २. बोलीची स्वयंपूर्ण उच्चार-प्रक्रिया

इंग्रजी अथवा अरबी-फारसी शब्द मराठीत उच्चाराच्या दृष्टीने जसेच्या तसे रूढ होत नाहीत, लेखनातही काही तडजोड करावी लागते. परभाषा अवगत नसणाऱ्या मराठी भाषिकांचे मुखावयव सदोष असते अथवा आपली लिपीमाला अपुरी असते ही त्याची कारणे नव्हेत. मातृभाषेतील ध्वनींचा उच्चार करण्याची सवय जडल्यामुळे परभाषेतील शब्दोच्चार आपल्या ध्वनिसंकेतानुसार आपोआप होतात. मराठी भाषेतील ध्वनिसंकेत दर्शविण्यासाठी अस्तित्वात आलेल्या आपल्या लिपिमालेत परभाषेतील शब्दोच्चार जसेच्या तसे संक्रांत होत नाहीत. 'वख्त' आणि 'तख्त' हे शब्द उदाहरणादाखल घेऊ. या दोन्ही शब्दांतील 'ख' चा उच्चार मूळ भाषेत सारखा नाही. पहिल्या शब्दातील 'क' हा कंठ्य असून घर्पकासारखा उच्चारला जातो व 'ख' च्या जवळपास त्याचा उच्चार येतो. 'तख्त' मधील 'ख' हा कंठ व जिव्हामूलीय स्थान या दोहोंच्या संयोगातून उच्चारला जातो. हे दोन्ही भिन्न उच्चार 'ख' या एकाच वर्णाने दर्शविले जातात. म्हणजे काय तर, मराठी भाषेच्या ध्वनिव्यवस्थेत परिभाषेतले 'क' व 'ख' हे ध्वनि बसत नाहीत. म्हणून मराठी माणूस हे उच्चार स्वतःच्या ध्वनिव्यवस्थेस जवळ असलेल्या 'ख' या ध्वनीने सूचित करतो व त्याप्रमाणे लिहितोही. इंग्रजी भाषेतल्या 'एफ्' या वर्णाचा उच्चार व लेखन करतानाही आपल्या ध्वनिव्यवस्थेस अनुरूप असलेला 'फ' आपण निवडतो. 'महल' या शब्दातील 'ह' च्या उच्चाराला 'य' ची नकळत धार आहे. मराठी माणसाच्या उच्चारात व लेखनात ही धार येत नाही. कारण, मूळ मराठी 'ह' ला ती नसते.

परभाषेतील ध्वनींच्या दृष्टीने स्वभाषेतील ध्वनिव्यवस्था अपर्याप्त ठरते त्याचप्रमाणे शिष्टांची भाषा सामान्यांच्या तोंडी आली की, जनसामान्यांच्या सवयीप्रमाणे त्या भाषेतील शब्दांचे उच्चार परिवर्तन पावतात, काही ध्वनी लुप्तही होतात. विशिष्ट प्रदेशातील अथवा भू-भागातील समाजाची उच्चार प्रक्रिया विशिष्ट पद्धतीने घडत असल्याकारणाने एकाच भाषेतील प्रादेशिक भेदांत उच्चार-भेद दिसून येतात. एकाच भाषेच्या प्रादेशिक भेदात देखील त्या त्या प्रमाणात निश्चित अशी ध्वनिव्यवस्था असते. या व्यवस्थेत न बसणारा ध्वनि मराठी भाषेतला असला तरी बोली आपल्या परीने या ध्वनीत बदल घडवून आणते. खानदेशी. ही मराठी भाषेचीच बोली. परंतु या बोलीत 'ळ' हा वर्णोच्चार नाही. ज्या शब्दांत हा वर्ण आढळेल त्या ठिकाणी या बोलीत 'य' हा उच्चार होतो. डोळा, काळा, हे शब्द डोया, काया असे खानदेशीत उच्चारले जातात. जोडाक्षरे ग्रामीण माणसाच्या उच्चारास पेलत नाहीत. त्यांचे उच्चार सुलभ करण्यासाठी मूळ शब्दात बदल घडतो. भगत, रघत या शब्दांच्या निमित्ताने आढळणारी स्वरभक्ती या सुलभीकरणाच्या प्रवृत्तीतूनच निर्माण झाली आहे. हे सारे बदल केवळ वैयक्तिक नसतात. त्या त्या बोलीपुरते ते सार्वत्रिक असतात. महाप्राण वर्णांचा विश्लेष आणि संश्लेषही याच प्रक्रियेतून घडतो. कहाड (काढ), वहाड (वाढ), फाट (पहाट), धा (दहा) ही उदाहरणे त्याचीच द्योतक आहेत.

शब्दोच्चाराच्या संदर्भात आढळून येणाऱ्या या वैशिष्ट्यामुळे एखाद्या बोलीच्या अभ्यासाचा प्रारंभ तिच्या ध्वनि व्यवस्थेपासून करावा लागतो. प्रमाण भाषेहून वेगळी राहिलेली बोली स्वतःच्या ध्वनिव्यवस्थेच्या परिघात वावरत असते. हा परीघ ध्यानात आला म्हणजे बोलीचे उच्चारविशेष आपोआप उलगडत जातात. प्रमाण भाषेहून आलेले वेगळेपण बोलीत निर्माण होते ते प्रामुख्याने ध्वनिव्यवस्थेमुळे.

अनुक्रमणिका

### ३. प्रमाण मराठीची वर्ण व्यवस्था

अरे बोलीचे वैशिष्ट्य समजून घेण्यासाठी प्रथम या बोलीची वर्णव्यवस्था तपासली पाहिजे. या बोलीत लिखितवाङ्मय उपलब्ध नसल्यामुळे लोककथा, लोकगीते आणि व्यक्तींच्या मुलाखती यांच्या आधारानेच हा शोध घ्यावा लागतो. बदल नेमका कुठे झाला, वेगळेपण कोणत्या बाबतीत आढळते ते ध्यानी यावे या हेतूने प्रमाण मराठी भाषेची वर्णव्यवस्था डोळ्यासमोर असणे आवश्यक आहे. ग्रांथिक मराठीने अगदी यादवकाळापासून संस्कृत भाषेतील वर्णमाला जशीच्या तशी स्वीकारली आहे. प्राकृत-अपभ्रंश या पूर्ववर्ती संस्कृतोद्भव भाषांनी संस्कृताची वर्णव्यवस्था पूर्णपणे स्वीकारलेली नव्हती. म्हणूनच तत्सम संस्कृत शब्द प्राकृत-अपभ्रंशात आढळत नाही. मराठी भाषा अपभ्रंशातून उत्क्रांत झाली. त्यामुळे अपभ्रंशातील ध्वनिव्यवस्थेचा वारसा तिला लाभला. पण, तेवढ्यावरच समाधान न मानता मराठीने प्रत्यक्ष संस्कृत भाषेचेही ऋण घेतले. या ऋणाबरोबरच प्राकृत-अपभ्रंशात लुप्त झालेल्या वर्णांना मराठी. वर्णमालेत स्थान मिळाले. अशा रीतीने मराठी भाषेने जन्मतः प्राकृत-अप- भ्रंशाचा व प्रौढ अवस्थेत संस्कृताचा वारसा चालविला असे ग्रांथिक मराठीच्या परिशीलनातून निष्पन्न होते. प्राकृत वर्णमालेत नसलेले ऋ, ऌ, ऐ, औ हे स्वर आणि ङ्, श्, ष्, ही व्यंजने प्राचीन ग्रांथिक मराठी प्रमाणेच वर्तमान प्रमाण मराठीत आढळतात. ग्रांथिक मराठीने संस्कृत भाषेतील वर्णमाला जशीच्या तशी स्वीकारली याचा हा अर्थ होतो. ही वर्णव्यवस्था ५२ वर्णावर आधारलेली आहे :

**स्वर** : (१२) अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ आणि ऋ व ऌ.
**स्वरादि** : (२) अनुसार व विसर्ग.
**व्यंजने** : (३८) (i) वर्गीय २९ क वर्ग ते प वर्ग नासिक्यासह.
(ii) **दन्त्यतालव्य ४** च्, छ, ज्, झ्
(iii) **अर्धस्वर ४** य्, र्, ल्, व
(iv) **उष्मे ३** श्, ष्, स्
(v) महाप्राण ह व मूर्धन्य ळ्

[क्ष् आणि ज्ञ यांचा समावेश संयुक्त वर्णांत होतो.]

प्राचीन काळापासून ते वर्तमान काळापर्यंत चालत आलेल्या ग्रांथिक मराठी भाषेत उपरोक्त ५२ वर्ण आढळतात. मराठी भाषेच्या बोलींत हीच व्यवस्था आढळेल याची शाश्वती देता येणार नाही. दन्त्यतालव्य वर्गातील ‘च’ वर्ग वगळता बाकीची वर्णव्यवस्था संस्कृत भाषेप्रमाणेच आहे. संस्कृत भाषेची समग्र वर्णव्यवस्था प्राकृत-अपभ्रंशात सक्रात झालेली नसली तरी ग्रांथिक मराठीत मात्र ती रूढ आहे. ग्रांथिक भाषा ही शिष्ठ-समाजाची भाषा असते. शिष्ठ-समाजात रूढ असलेले सर्वच वर्णोच्चार ‘प्राकृतांना’ पेलतात असे नाही. सामान्य माणूस जमतील तसे उच्चार करीत असतो. शिष्टांच्या उच्चारांशी विसंगत असलेले उच्चार ‘अशुद्ध’ गणले जातात. या ‘अशुद्धा’ला सामाजिक पाठबळ लाभले की ती बोली होते. अशा बोलीत न पेलणाऱ्या उच्चारांचा लोप होतो. संस्कृत भाषेच्या तुलनेने प्राकृतांत काही ध्वनींचा लोप झाला तसाच प्रमाण मराठीच्या तुलनेने मराठीच्या बोलींत देखील कित्येक ध्वनींचा अभाव आढळेल. अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेचे परीक्षण या दृष्टीने केले पाहिजे.

अनुक्रमणिका

## ४. अरे बोलीची ध्वनिव्यवस्था

बोलीच्या अभ्यासासाठी गोळा केलेल्या साधनांच्या आधाराने अरे मराठीची ध्वनिव्यवस्था पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**स्वर** : आ आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ, (केवळ अपवादात्मक शब्दांत औ)

**व्यंजने** : (१) **वर्गीय व्यंजने** [व्यंजनांची यादी स्वरयुक्तच दिली आहे. 'प्राकृतात स्वरविरहित व्यंजन नसते' असे हेमचंद्राचे सूत्र आहे (८-१.१ वरील संस्कृत वृत्ति).] (नासिक्य विरहित)
क, ख, ग, घ, च, छ, ज, ट, ठ, ड, ढ, त, थ, द, ध, प, फ, ब, भ.
**दन्त्यतालव्य** च, ज.

(२) **अनुस्वार आणि नासिक्यवर्ण :** अनुस्वार दोन प्रकारचे अर्ध चंद्राकृती (ं) आणि ओझरता (ँ)

(३) नासिक्य वर्ण दोन : म आणि न

(४) **अर्धस्वर :** य, र, ल, व.

(५) **उष्मवर्ण :** स (अगदी अपवादात्मक शब्दांत श)
**महाप्राण :** ह.

वर दिल्याप्रमाणे एकूण ४१ ध्वनींवर या बोलीची वर्णव्यवस्था आधारलेली आहे. या वर्णोच्चाराबाहेरचा एकही वर्ण या बोलीत आढळला नाही. या यादीत औ आणि 'श' हे दोन वर्ण अपवादात्मक म्हणून नोंदविले आहेत. त्याचे स्पष्टीकरण केले पाहिजे. 'औ' हा स्वरोच्चार अपभ्रंशात नाही तसाच तो या बोलीत सहसा आढळत नाही. संस्कृतातील 'औ' चे प्राकृतात 'ओ'. वा 'अउ' मध्ये परिवर्तन घडते. तोच नियम या बोलीसही लागू पडतो. क्वचित् प्रसंगी मूळ शब्दातील 'अव' चा उच्चार 'औ' सारखा होतो गाडौ (गाढव), ढौला (ढवळा), पौला (पवला) म्हणून 'औ' अपवादात्मक नोंदविला आहे. तीच गोष्ट 'श' ची. प्रमाण मराठी शब्दातील ष् व श् चा या बोलीत 'स' असाच उच्चार होतो. परंतु कित्येकदा शिष्टाच्या बोलींचे अनुकरण करण्याच्या आहारी जाऊन मूळ स चाच हा उच्चारण्याकडे प्रवृत्ती होते. उदा. शापु (साफ), शावकारु (सावकार), शेवा (सेवा) म्हणून अपवादात्मक म्हणून 'श' ची गणना या बोलीच्या वर्णव्यवस्थेत केली आहे. हे दोन्ही वर्ण या बोलीच्या ध्वनि-व्यवस्थेत वस्तुतः बसणारे नाहीत. कारण, वर दिलेल्या अपवादाखेरीज अन्यत्र हे दोन्ही वर्णोच्चार आढळले नाहीत.

अरे बोलीत एकूण मूळ ध्वनि ३९ व अपवादात्मक २ असे ४१ वर्ण आहेत. या बोलीचा व्यवहार या ४१ वर्णांच्याच आधाराने होतो.

## ५. काही ध्वनींचा अभाव

प्रमाण मराठी ५२ वर्णांची आणि अरे बोली ४१ वर्णोच्चारांवर आधारलेली. या बोलीत प्रमाण मराठीतील ११ वर्णोच्चारांचा लोप झाला आहे. प्रमाण मराठीच्या तुलनेने अरे बोलीत न आढळणारे वर्णोच्चार असे आहेत.

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| **स्वर** | : | ऋ, लृ, ऐ (औ देखील जवळपास नाही असे मानावे लागते.) |
| **स्वरादि** | : | विसर्ग. |
| **वर्गीय** | : | तालव्य 'झ' आणि दंत्यतालव्य 'झ' |
| **नासिक्य व्यंजने** | : | ङ्, ञ, ण् |
| **उष्मवर्ण** | : | ष् (हा अपवादात्मक शब्दांत) |
| **मूर्धन्य** | : | ळ्. |

प्रमाण मराठीतील शब्दांत असलेले वरील वर्ण बोलीच्या ध्वनिव्यवस्थेत रूढ असलेल्या कोणत्या तरी वर्णात रूपांतरित झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ ङ्, ञ्, ण् या नासिक्य व्यंजनांच्या ऐवजी सर्वत्र 'न' योजला जातो. ष (आणि श् देखील) सर्वत्र 'स' च्या रूपात येतो. 'ळ' हा उच्चारच नसल्याने सार्वत्रिक 'ळ' चे 'ल' मध्ये रूपांतर घडते. ऐ एकतर ए रूपात येतो (प्राकृताप्रमाणे) अथवा त्याचे 'अउ' असे परिवर्तन होते. या समाजाच्या उच्चार पद्धतीची ही सामूहिक सवय असल्यामुळे या सवयीत जे उच्चार बसत नाहीत त्यांची सोय विद्यमान ध्वनिव्यवस्थेत कोठे ना कोठे तरी होत असते.

या ध्वनिलोपाचे कारण शोधले पाहिजे. समाधानकारक कारण आढळले नाहीच तर या बोलीत तो नव्याने निर्माण झालेला विशेष आहे असे गृहीत धरता येईल.

मराठी वाङ्मयाचा इतिहास किमान यादवकालाइतका पुरातन आहे. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात साहित्य-निर्मितीस प्रारंभ झाला असे आज उपलब्ध असलेल्या साहित्याच्या आधाराने निश्चित करता येते. तेव्हापासून ते वर्तमान काळातील वाङ्मयाच्या कालावधीपर्यंत म्हणजे गेली सातशे वर्षे तरी या भाषेत ग्रंथनिर्मिती होत आहे. या कालावधीत भाषेच्या स्वरूपात अनेक परीनी बदल झाले आहेत. असा बदल कोणत्याही जिवंत भाषेत घडत असतो परंतु या कालावधीत ध्वनिव्यवस्था बदलल्याचे निदर्शनास येत नाही. अगदी प्रारंभीच्या काळातही संस्कृत भाषेत रूढ असलेली वर्णमाला मराठी वाङ्मयाने स्वीकारलेली होती, तीच व्यवस्था आजतागायत चालू आहे. त्यामुळे अरे बोलीतील ध्वनिलोपाचा शोध मराठी वाङ्मयाच्या इतिहासात घेता येईल असे वाटत नाही. या कालावधीतील मराठी बोलींची ध्वनिव्यवस्था कोणत्या प्रकारची होती हे समजण्यास मार्ग नाही. प्राचीनबोलींसंबंधाने लिखित असा पुरावा आढळत नाही. अर्वाचीन काळातील काही बोलींचे जे अभ्यास प्रसिद्ध झाले आहेत त्यात काही वर्णांचे अभाव असल्याची केवळ नोंद आहे. या अभावाची मीमांसा अशा अभ्यासात आढळत नाही.

प्रमाण मराठी (यादवकालीन आणि वर्तमानकालीनही) भाषेच्या तुलनेने अरे बोलीत काही वर्णोच्चारांचा जो लोप आढळून येतो याची कारणे एक तर यादवकालाच्या पूर्वीच्या भाषिक परंपरेत आढळतील अथवा तेलुगू भाषेच्या ध्वनि-व्यवस्थेत या अभावाचे मूळ आढळण्याची शक्यता दृष्टिआड करता येणार नाही. बहुसंख्य तेलुगू भाषेच्या परिसरात तग धरून राहिलेली ही बोली तेलुगू भाषिकांच्या उच्चारविषयक संस्कारापासून अलिप्त राहिली असेल असे मानणे भाषांच्या प्रकृति धर्माच्या दृष्टीने अस्वाभाविक ठरेल.

अरे बोलीवर तेलुगू भाषेचे काही संस्कार झाले आहेत हे अगोदर सांगितले आहेच. हे संस्कार शब्दांची मर्यादित उसणवारी व काही प्रत्यय विशेषतः नामांचे अनेकवचनी प्रत्यय यांच्यापुरते मर्यादित आहेत. तेलुगू भावेच्या व्याकरणाचा स्वीकार अरे बोलीने केला नाही त्यामुळे ध्वनिव्यवस्थेच्या बाबतीत तेलुगू आणि अरे बोली यांचा तुलनात्मक विचार करण्यापूर्वी यादवकालीन मराठीच्या पूर्ववर्ती भाषांचा प्राकृत आणि अपभ्रंश यांचा मागोवा घेणे श्रेयस्कर ठरेल. शब्दसंग्रहाचे परिशीलन करतांना पहिल्या शतकातील गाथासप्तशतीपासून ते अकराव्या शतकातील अपभ्रंश भाषेतील ग्रंथांपर्यंतचा विपुल शब्दसंग्रह अरे बोलीत आढळतो हे आपण पाहिले आहे. हे शब्द एकूण शब्दसंग्रहात सुमारे वीस टक्के असल्याची नोंदही करण्यात आली आहे. भाषा वैज्ञानिकांच्या मते एखाद्या भाषेत अन्य भाषेतील शब्दांचे विपुल प्रमाण ऐतिहासिक दृष्ट्या निश्चितच विचार करावयास लावणारे आहे [Greenberg, **Language Culture and Communication** P. 19.].

## ६. अरे बोलीतील ध्वनिलोपाची मीमांसा

म्हणूनच अरे बोलीची उच्चार-प्रक्रिया समजून घेताना प्राकृत भाषेतील उच्चार-प्रक्रियेशी तिचे नाते आहे किंवा नाही हे तपासून पाहिले पाहिजे. उच्चार प्रक्रिया ही भाषेची स्वतंत्र, स्वयंपूर्ण आणि अंगभूत अशी प्रकृती असते. अन्य भाषांच्या संस्कारांनी वाक्यरचना बदलेल, शब्दसंग्रहात देखील भर पडेल. परंतु एखाद्या भाषेच्या उच्चाराच्या सवयी इतर भाषांच्या प्रभावामुळे सहसा बदलत नाहीत. असे असताना मराठी भाषेच्या वर्णव्यवस्थेतील काही वर्णांचा लोप अरे बोलीत का व्हावा हा प्रश्न पडतो. यादवकालीन ग्रांथिक मराठीपासून. ते वर्तमानकालीन प्रमाण भाषेपर्यंत मराठी भाषेच्या वर्णमालेत बदल झाला नाही. अरे बोलीत हा विशेष उत्पन्न होण्याची दोन कारणे संभवतात : अरे मराठी समाजाच्या उच्चाराच्या सवयी अन्य मराठी भाषिकांच्यापेक्षा निराळ्या असाव्यात अथवा ध्वनिलोपाची परंपरा वारसा-हक्काने प्राकृतापासून या बोलीत चालत आली असावी.

या दोन कारणांपैकी दुसरे म्हणजे प्राकृत-अपभ्रंश परंपरेचे कारण समर्थनीय ठरते काय? प्राकृत भाषेची ध्वनिव्यवस्थाच या प्रश्नाचे उत्तर देऊ शकेल.

चण्ड हा प्राकृत भाषेतला प्राचीनतम व्याकरणकार समजला जात असला तरी वररूचि या दुसऱ्या शतकातील ग्रंथकाराचा प्राकृत-प्रकाश हा ग्रंथ प्राकृतच्या व्याकरणाचे सविस्तर विवेचन करणारा आहे. अकराव्या शतकातील हेमचंद्राने प्राकृत भाषांचे व्याकरण विस्ताराने लिहिले आहे. (आठवा अध्याय). तेराव्या वा सोळाव्या शतकाच्या कालावधीत होऊन गेलेल्या रामशर्माने 'प्राकृत कल्पतरू' या ग्रंथात प्राकृत भाषांच्या प्रकृतिधर्माचा विचार केला आहे. भिन्न काळात होऊन गेलेल्या या तिन्ही ग्रंथकारांनी प्राकृत भाषांत नसलेल्या वर्णाची जी यादी दिली आहे ती सारखी आहे. आणि विशेष आश्चर्य म्हणजे संस्कृत भाषेतील ज्या वर्णांचा लोप प्राकृतांत झाला नेमके तेच वर्ण अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेत आढळत नाहीत!

हेमचंद्राच्या शब्दानुशासनातील आठव्या अध्यायाच्या प्रारंभी पहिल्याच सूत्रावर लिहिलेल्या संस्कृत वृत्तीत ऋ, ॠ, ऌ, ॡ, ऐ, औ, ङ्, ग्, श, ष हे वर्ण प्राकृतात विसर्जनीय आहेत असे नमूद करण्यात आले आहे. 'प्राकृत कल्पतरू' देखील प्राकृतात पुढील वर्ण नसल्याचे सांगण्यात आले आहे :

ऋ ॠ ऌ ऐङ् तथा ञऔ च । शषौ विसर्गश्च न सन्त्यमुषाम् ॥ १-५-१६ संस्कृत आणि ग्रांथिक मराठी या दोन्ही भाषांत असलेल्या वर्णांपैकी ऋ, ऌ, ऐ, (औ देखील), विसर्ग, ङ्, ञ, ष्, (आणि श् देखील) यांचा लोप अरे बोलीत आणि प्राकृतांत होतो. आंध्रप्रदेशात रूढ असलेल्या भाण्डीर भाषेचे व्याकरण तेराव्या शतकात संस्कृत भाषेत लिहिण्यात आले आहे. हे समग्र व्याकरण प्रसिद्ध झालेले नाही. या व्याकरणाचा जो भाग प्रकाशित झाला आहे त्यात उच्चार प्रक्रियेचे विवेचन आले आहे. या व्याकरणात देखील उपरोक्त वर्णच भाण्डीर भाषेत वर्ज्य असल्याचे सांगण्यात आले आहे. ही भाण्डीर भाषा 'म्हणजे जुनी मराठीच आहे' असे या व्याकरणाच्या संपादकांचे मत असून 'ज्ञानेश्वर कालीन मराठीशी तुलना करण्याला या ग्रंथात विपुल भाषासामग्री मिळते' असाही संपादकांचा दावा आहे. [या व्याकरणाचा भाग परिशिष्टात दिला आहे.]

गाथासप्तशतीपासून ते भाण्डीर भाषेपर्यंत (इ. स. चे १ले ते १३वे शतक) प्राकृत, अपभ्रंश आणि बोलीच्या स्वरूपात नांदत असलेली मराठी देखील या भाषा समान ध्वनिव्यवस्थेनुसार भाषा-व्यवहार करीत होत्या हे वरील विवेचनावरून सिद्ध होते. ग्रांथिक मराठीने यादवकाळातच संस्कृत वर्णमालेचा स्वीकार केल्यामुळे या काळापासूनच ग्रांथिक व बोली अशा मराठी भाषेच्या दोन धारा रूढ झालेल्या दिसतात. यांपैकी बोलीच्या रूपात रूढ असलेल्या मराठीने प्राकृत-अपभ्रंशाची उच्चारप्रक्रिया पुढे चालविली हे स्पष्ट आहे. अरे बोलीतील ध्वनिलोप याच सातत्यास पुष्टी देणारा आहे. उच्चार प्रक्रियेच्या दृष्टीने अरे बोली ही ग्रांथिक मराठीपेक्षा प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांना अधिक जवळची आहे असाच निष्कर्ष या विवेचनातून निघतो.

प्राकृत व्याकरणकारांनी दिलेल्या वर्ज्य वर्णांव्यतिरिक्त अन्य तीन वर्ण अरे बोलीत आढळत नाहीत : 'झ' (तालव्य आणि दन्त्यतालव्य), 'ण्' आणि 'ळ्' यांपैकी 'झ' (तालव्य आणि दन्त्य तालव्य) यांचा लोप का व्हावा हे नीटसे उलगडत नाही राजवाडे ज्ञानेश्वरीत 'जाले', 'जालेनि', 'जालियावरि' अशी रूपे येत असली तरी या प्रतीत 'झ' हा वर्ण आढळतो. तेलुगू भाषेतील देश्य शब्दांच्या उच्चार-पद्धतीचा हा परिणाम असावा असे वाटते. तेलुगूत देश्य शब्दांत 'झ' हा वर्ण येत असला, तत्सम महाप्राण वर्णाचा उच्चार होत असला तरी देश्य शब्दांत मात्र महाप्राण व्यंजनांचा अभाव सार्वत्रिक आहे. वर्गीय व्यंजनांपैकी दुसरे व चौथे (ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ, भ) देश्य शब्दांत आढळत नाहीत. या वर्णोच्चाराच्या ऐवजी अनुक्रमे पहिले व तिसरे वर्ण उच्चारले जातात (ख - क, घ - ग; छ - च; झ - ज इ) या सवयीमुळे तत्सम शब्दांतील महाप्राण वर्णांचे उच्चार देखील ओझरते होतात. रंगनाथ मधील थ 'द' च्या आसपास उच्चारला जातो. कंठ मधील 'ठ' चा उच्चार 'ट' च्या आसपास होतो. सभोवतालच्या उच्चारपद्धतीचा झ च्या उच्चारावर परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. कारण तितकेसे समाधानकारक वाटत नाही. कारण, इतर महाप्राण वर्णांचे उच्चार पूर्णपणे होत असतात. कारण काही असले तरी अरे बोलीत 'झ' हा वर्णोच्चार आढळत नाही हे एक सत्य आहे. झालं हे क्रियापद जालं असे उच्चारले जाते. त्याचप्रमाणे जोंप (झोप) जलुकलं (झळकलं) असे शब्दोच्चार आढळतात.

'णो नं' : असे पैशाची भाषेसंबंधी हेमचंद्रांचे सूत्र (८-४-३०६). मूळ संस्कृत शब्दांतील 'ण्' च्या जागी पैशाचीत 'न्' येतो असा या सूत्राचा अर्थ होतो. पैशाची प्राकृताचा प्रदेश महाराष्ट्रापासून बराच दूर आहे. गुणाढ्याची बृहत्कथा पैशाची प्राकृतात होती. ती त्याने आपल्या प्रदेशात रचली की महाराष्ट्रात हे स्पष्ट नाही. पण, या कथेचा बराचसा भाग गुणाढ्याने वैतागून अग्नीच्या स्वाधीन केला तो महाराष्ट्रात अशी दंतकथा आहे. पैशाचीच्या संसर्गाने अरे बोलीत ण् चा न् रूढ झाला असे मानणे अनैतिहासिक ठरेल. तसेच शास्त्राच्या

कसोटीवरही ते उतरणार नाही. महाराष्ट्रीत 'ण' चे प्राबल्य अधिक. प्राकृत ग्रंथात ण-न ची अदलाबदल आढळते. नदी हा शब्द णई व नई या दोन्ही स्वरूपांत आढळेल. ग्रामीण भागात विशेषतः मराठवाड्यात 'ण' चा उच्चार टाळण्याची प्रवृत्ती सार्वत्रिक आहे. पानी, लोनो, शेनी असे उच्चार करणारे मराठवाड्यातले पांढरपेशा वर्गातील नागरिक एके काळी चेष्टेचा विषय झाले होते. मराठवाड्यातील बोलीत असलेला 'ण्' चा अभाव अरे बोलीच्या विशेषास जुळणारा आहे.

अरे बोलीत 'ळ' चा अभाव का असावा याची समाधानकारक उपपत्ती सापडत नाही. ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतीत 'ळ' नाही हे इतिहासाचार्य राजवाडे यांनी आग्रहाने प्रतिपादिलेले मत आता मागे पडले आहे. द्रविड भाषांत 'ळ' हा वर्ण असल्याने तेलुगू भाषेच्या संसर्गाने तो अरे बोलीत लुप्त झाला असे म्हणता येणार नाही. नागपूर भागात व खानदेशाच्या परिसरात प्रचलित असलेल्या बोलीत मात्र 'ळ' आढळत नाही. त्याऐवजी 'य' हा वर्णोच्चार येतो. ज्या प्रादेशिक बोलीचा वारसा या बोलीस लाभला. त्या बोलीत 'ळ' हा वर्णोच्चार नसावा. अरे बोलीत सार्वत्रिक 'ल' हा वर्णोच्चार आढळतो. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच यादवकालात 'ळ' नसेल काय?

१९६४ साली प्रकाशित झालेल्या 'A Grammar of Old Marathi' या अल्फ्रेड मास्टर यांच्या ग्रंथात 'ळ' या वर्णाच्या इतिहासासंबंधाने बरीच चर्चा झाली आहे. त्यांच्या मताचा सारांश थोडक्यात असा :

> 'इस. १२९० पर्यंत मराठी भाषेत 'ळ' हा वर्ण नव्हता. शिलालेखात केवळ 'ल' आढळतो असे ब्लोक म्हणतो. तेलुगू-कानडी शिलालेखांत देखील दहाव्या शतकापर्यंत 'ळ' वापरात होता असे दिसेत नाही. १० व्या शतकांपासून 'ळ' हळुहळू वापरात येत चालला. इ. स. १२९९ च्या ताम्रपटात (भाषा मराठी, लिपी कानडी) 'ळ' निश्चितपणे कोरलेला आढळतो. गुजराती भाषेत अठराव्या शतकापर्यंत 'ळ' चा उच्चार नव्हता १८०८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ड्रमनच्या गुजराती भाषेच्या व्याकरणात 'मराठीत 'ळ' असला तरी गुजरातीत तो नाही' असे मत मांडले आहे. इ.स. १३६७ च्या नागावच्या शिलालेखात 'ळ' प्रथम आढळतो. ज्ञानेश्वरीच्या रचनाकाळात नागरीत 'ळ' नव्हता. सकळी लिपीत 'ल' साठी 'त्र' आणि 'ळ' साठी 'ल' ही चिन्हे आहेत. लीळाचरित्राचे प्राचीनतम हस्तलिखित इ. स. १५५४ चे आहे. या हस्तलिखितात 'ळ' चा वापर मोठ्या प्रमाणात आहे.' [A Grammar of Old Marathi, P. 27 to 29]

अल्फ्रेड मास्टर यांचे मत ग्राह्य धरल्यास अरे बोलीस आधारभूत असलेल्या मूळ मराठी बोलीच्या काळासंबंधाने (आणि अरे समाजाच्या स्थलांतराच्या काळाबाबतीतही) एक महत्त्वाचे गमक उपलब्ध होते. दहाव्या शतकापर्यंत 'ळ' चे अस्तित्व नव्हते, ज्ञानेश्वरीच्या रचनाकाळी देखील 'ळ' प्रचारात नव्हता हे मत स्वीकारल्यास अरे समाजाचे स्थलांतर दहाव्या शतकाच्या आसपास निदान ज्ञानेश्वर काळात तरी महाराष्ट्रातून तेलंगणात झाले असावे असे मानावे लागते. या बोलीच्या ध्वनिव्यवस्थेत आढळणाऱ्या अन्य विशेषांच्या योगाने या अनुमानास पुष्टीच मिळते.

अनुक्रमणिका

## ७. बोली मराठीची की अपभ्रंशाची?

आतापर्यंत केलेल्या विवेचनाच्या आधारे अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेसंबंधाने पुढील निष्कर्ष निघतात :

(१) प्रमाण मराठी भाषेने आपली वर्णव्यवस्था संस्कृत भाषेतील वर्णव्यवस्थेवरून उचलली असून यादवकालापासून ते वर्तमानकाळापर्यंत या व्यवस्थेत कोणताही बदल झालेला नाही (भाषेच्या स्वरूपात बदल झालेला असला तरीही).

(२) प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांनी प्राकृतांच्या बोलीच्या अवस्थेपासून ग्रांथिक प्रमाण भाषेपर्यंत प्रगती केली तरी या भाषांनी संस्कृत भाषेतील वर्णव्यवस्था कोणत्याही अवस्थेत स्वीकारली नाही. शिष्ट समाजाची व ग्रंथलेखनाची भाषा या दृष्टीने संस्कृत भाषा विकास पावत असतांनाच सामान्य जनतेच्या बोली उदयास आल्या. प्रदेशभेदाने या बोलींनी थोडीफार वेगवेगळी रूपे धारण केली असली तरी त्यांचा मूळ पिंड तसा एकात्म होता बोलीच्या अवस्थेतून साहित्य निर्मिती करण्याइतक्या त्या प्रौढ झाल्या तरी त्यांची ध्वनिव्यवस्था फारशी बदलली नाही. या प्रक्रियेत संस्कृत भाषेतील पुढील वर्णाचा लोप झाला. ॠ, ऌ, ऐ, औ, ङ्, ञ्, श्, ष् आणि विसर्ग.

(३) यादवकालीन मराठीत (वाङ्मयरूपात उपलब्ध असलेल्या) या ध्वनींचा लोप झाला नाही. अरे बोलीत मात्र प्राकृत-अपभ्रंशाप्रमाणेच उपरोक्त ध्ननींचा अभाव दिसून येतो. ध्वनिव्यवस्थेच्या दृष्टीने अरे बोली यादवकालीन आणि उत्तरकालीनही प्रमाण भाषेचे अनुकरण न करता प्राकृत-अपभ्रंशाचे अनुसरण करते. याचा अर्थ असा की अपभ्रंश भाषेपासून पृथगात्म झालेल्या मराठी भाषेला साहित्यिक रूप लाभण्यापूर्वी मूळ मराठी बोलीत जी ध्वनिव्यवस्था होती तिचा वारसा अरे बोलीने चालविला. एकीकडे सामान्यांची बोली पूर्ववर्ती लोकभाषेची वर्णव्यवस्था सांभाळत विकास पावत होती तर वाङ्मयाच्या क्षेत्रात संस्कृत वर्णमालेचा स्वीकार करून यादवकालीन मराठी प्रौढ अवस्थेच्या दिशेने पावले टाकत होती. अशा परिस्थितीत मराठी भाषेच्या प्रारंभ काळाचे रूप अरे बोलीच्या रूपाने सुरक्षित राहिले.

(४) त्यामुळेच या बोलीचे शब्दसंग्रह आणि ध्वनिव्यवस्था या दोहोंच्याही दृष्टीने अपभ्रंशाशी अगदी जिव्हाळ्याचे नातेसंबंध असल्याचे निदर्शनास येते. **अरे बोली अपभ्रंश भाषेची उत्तरकालीन अवस्था दर्शविते तर यादवकालीन वाङ्मयीन मराठी ही अपभ्रंशाच्या उत्क्रांत अवस्थेची निदर्शक आहे.**

(५) म्हणूनच आजच्या अरे बोलीच्या संदर्भात यादवकालीन मराठी ही प्रमाणभाषा न ठरता महाराष्ट्री अपभ्रंश हीच प्रमाण भाषा मानावी लागते**. अरे बोली ही**

**महाराष्ट्री अपभ्रंशाची बोली मानली तरी ते अशास्त्रीय ठरणार नाही.** या बोलीतील ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेचा अभ्यास केला असता हा निष्कर्ष अधिकच दृढ होतो.

ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेचे परीक्षण करण्यापूर्वी यादवकालीन ग्रांथिक मराठीने संस्कृत वर्णमाला स्वीकारली म्हणजे नक्की काय केले याचे अधिक स्पष्टीकरण आवश्यक वाटते.

यादवकालीन ग्रांथिक मराठीत आढळणाऱ्या शब्दांत. तीन प्रकार दिसून येतील : (१) देश्य : द्रविड भाषांतून उचललेले, लोकरूढ असलेले व संस्कृतभाषेशी व्युत्पत्तीच्या दृष्टीने फारसे संबंधित नसलेले शब्द (२): तद्भव : मूळ संस्कृत शब्दांत परिवर्तन होऊन प्राकृत व अपभ्रंश या भाषांच्या द्वारे मराठीत आलेले आणि (३) तत्सम : संस्कृत भाषेतील शब्दांत कोणताही विकार न घडता जसेच्या तसे मराठीत रूढ झालेले.

या तीन वर्गापैकी पहिले दोन वर्ग अपभ्रंश भाषेत आढळतात. तसे अरे बोलीत देखील. तिसरा तत्सम वर्ग हा अपभ्रंशात नाही तसाच तो अरे बोलीतही नाही (फार थोडे संस्कृत शब्द या बोलीत रूढ आहेत ते तेलुगू भाषेच्या द्वारे आलेले आहेत हे पूर्वी नमूद केले आहे). यादवकालीन मराठीने तत्सम शब्दांना स्थान देऊन अपभ्रंशातील शब्दसंग्रहात एका नव्या वर्गाची भर घातली. त्यामुळे संस्कृत वर्णमालेचा स्वीकार ध्वनिव्यवस्थेच्या दृष्टीने यादव मराठीस करावा लागला. कसा तो राहा :

(१) ऋ, ऌ, ऐ, औ, विसर्ग, ङ्, त्र्, श् आणि ष् हे प्राकृतात आणि अपभ्रंशातही "वर्ज्य" वर्ण या सदरात येतात. मूळ संस्कृत शब्दांत असलेल्या या वर्णांचा प्राकृताच्या ध्वनिव्यवस्थेस अनुसरून बदल होतो. हा बदल घडल्याने झालेला "तद्भव" शब्द प्राकृत-अपभ्रंशात रूढ होतो. वृक्ष चा रूक्ख, तैल चे तेल्ल, ओदुंबर चे औदुंबर, श्वशुर चे ससूरा, सौंदर्य चे सोंदर, दुःख चे दुक्ख असे बदल घडून "तद्भव" झालेले शब्द प्राकृत-अपभ्रंशात येतात. यादवकालीन मराठीनेही अशा तद्भवांचा समावेश आपल्या शब्दसंग्रहात केला आहेच. त्या बरोबरच मूळ संस्कृत शब्द जसेच्या तसेही रूढ केले आहेत :

**ऋषि :** रूषि आणि ऋषि; **ऋण :** रीण आणि ऋण; **वृक्ष :** रूख आणि वृक्ष; **सौंदर्य :** सोंदर आणि सौंदर्य.

तत्सम शब्दांचा अंतर्भाव झाल्याने प्राकृतात वर्ज्य असलेले सारे वर्ण नव्या रूपात (अविकृत रूपात) यादव मराठीच्या वर्णव्यवस्थेत रूढ झाले. संस्कृत वर्णाचे परिवर्तन तद्भव शब्दांपुरतेच मर्यादित राहिले.

(२) अपभ्रंश आणि अरे बोली यांत नसलेली आणखी एक प्रवृत्ती यादव-मराठीत आढळते : अपभ्रंशात एकापेक्षा अधिक स्वर एकाच शब्दांत अधिक जवळजवळ आले तरी त्यांचा संधी होत नाही. यादव मराठीत मात्र अशा स्वरांचा संधी होऊन शब्दोच्चार बदलतो. उदा. : अइस, कइस, वइस, अइलाड, पइलाड, चउरंग, चउत्थ हे अपभ्रंशात (अरे बोलीतही) रूढ असलेले शब्द यादव- मराठीत ऐसे, कैसे, बैस, ऐलाड, पैलाड, चौरंग, चौथ या रूपात येतात. संयुक्त स्वरांची एक नवी प्रणाली त्यातून उद्भवते.

अनुक्रमणिका

हे-सारे घडण्यास मराठी भाषेचा उद्भव झाल्यापासून बराच कालावधी लागलेला असणार. कारण वर दिलेली लक्षणे ही विकासाची निदर्शक आहेत. स्वाभाविक क्रमाने भाषेला विकसित अवस्था प्राप्त होण्यास बराच कालावधी लागतो. विकसित अवस्थेची चिन्हे नसलेली अरे बोली म्हणूनच यादवकालीन ग्रांथिक मराठीपेक्षा पुरातन आहे हे सिद्ध होते.

ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेत हाच सिद्धांत दृढ करणारी लक्षणे आढळून येतात.

## ८. ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया

कोणत्याही भाषेत / बोलीत होणारे ध्वनिपरिवर्तन हा त्या त्या भाषेतील / बोलीतील ध्वनिव्यवस्थेचाच एक आविष्कार असतो. वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना वळसा घालून वाहत्या पाण्याचा प्रभाव वाट काढत असतो त्याचप्रमाणे प्रमाण वा अन्य भाषेतले शब्द सामावून घेताना त्या त्या शब्दांचे उच्चार आपल्या ध्वनिव्यवस्थेत बसविण्याचा प्रयत्न भाषेत वा बोलीत होत असतो. या प्रक्रियेतून ध्वनिपरिवर्तन घडत असते. हे परिवर्तन स्वैर मात्र नसते. त्याला दिशा असते त्याचप्रमाणे नियमबद्धता देखील. ध्वनिपरिवर्तनाच्या स्वरूपावरून एखाद्या बोलीच्या स्वभावधर्माचे विशेषही शोधता येतात. दोन भाषांत वा बोलींत परभाषेतील शब्द रूढ होताना ध्वनिपरिवर्तन जवळपास सारखेच होत असेल तर अशा भाषांचे संबंध रक्ता-मांसा इतके निकटचे आहेत असा निष्कर्ष निघतो.

प्राकृत-अपभ्रंश आणि अरे बोली यांत होणाऱ्या ध्वनिपरिवर्तनाच्या तुलनात्मक अभ्यासातून असा निष्कर्ष निघू शकतो काय? शोध घेतला पाहिजे.

शोधाचा प्रारंभ अपभ्रंश आणि अरे केली यांत समान असलेल्या वर्णलोपांचे स्थित्यंतर कोणत्या स्वरूपात घडते येथूनच करता येईल. ऋ, ऌ, ऐ, औ, विसर्ग ङ्, ञ, श्, ष् हे दोन्ही ठिकाणी वर्ज्य असलेले वर्ण. यांपैकी ऌ थोड्याच शब्दांत येत असल्याने महत्त्वाचा ठरत नाही. ङ् ञ् हे अनुस्वारांत अथवा म/न मध्ये परिवर्तित होतात. श्, ष् चे स् मध्ये रूपांतर होते. उरतो प्रश्न ऋ, ऐ, औ आणि विसर्ग यांचा. या वर्णांत परिवर्तन कोणत्या प्रकारे होते हे पाहिले पाहिजे.

संस्कृत शब्दांत येणाऱ्या 'ऋ' या स्वराचे प्राकृतात अ, इ, उ आणि रि, या स्वरूपात परिवर्तन घडते असे प्राकृत भाषेचे व्याकरणकार सांगतात. [प्राकृत प्रकाश : १-२७ ते ३०; हेमचंद्र ८-१-१२६ ते १४४.] भाण्डीरभाषा व्याकरणात 'रु' आणि 'अरू' असे परिवर्तनाचे दोन अधिक पर्याय दिले आहेत. या नियमाची पुढील उदाहरणे अनुक्रमाने देता येतील :

तृण——तण (तन); दृष्टि——दिट्ठि (दिठी); जामातृ——जामाउ (जाँमाई); ऋण——रीण; वृक्ष——रूख; भर्तृ——भर्तारू.

अनुक्रमणिका

प्राचीन आणि अर्वाचीन वाङ्मयीन मराठीत तत्सम शब्द रूढ असल्याने 'ऋ' युक्त मूळ शब्द आणि अपभ्रंशाद्वारे परिवर्तन होऊन आलेले असे दोन्ही प्रचलित आहेत. ऋणाबरोबर रीण हा शब्द प्रचलित आहे. प्राचीन वाङ्मयात रुख आणि वृक्ष दोन्हीही येतात. अरे बोलीत 'ऋ' चा लोप झाल्याने केवळ अपभ्रंशात होणारी 'ऋ' ची परिवर्तने तेवढी रूढ आहेत.

ऐ या संयुक्त स्वराचे प्राकृतात ए, इ, अइ असे परिवर्तन होते [प्राकृत कल्पतरू १-३६ "दैत्यादिष्वई"; हेमचंद्र; "अइर्दैत्यादौच" ८-१-१५१.]. अरे बोलीत प्राकृत व्याकरणांनी दिलेल्या नियमांचे पालन होते. फरक एवढाच की संस्कृत शब्दांतील ऐ चे ए व इ क्वचित होते. 'अइ' मात्र सार्वत्रिक होते. अर्थात् हे परिवर्तित उच्चार अपभ्रंशातूनच अरे बोलीने उचलले आहेत. उदाहरणार्थ :

बहिरउ / भइरउ (भैरव), दइतु (दैत्य), दइउ (दैव), चइत्तु (चैत्र)

**औ** हा संयुक्त स्वर अपभ्रंशा प्रमाणेच अरे बोलीत देखील वर्ज्य आहे. प्राचीन व अर्वाचीन प्रमाण मराठीत तो आढळतो. प्राकृत व्याकरणाच्या नियमाप्रमाणे संस्कृत शब्दांतील औ या संयुक्तवर्णाचे प्राकृतात ओ, उ व अऊ, असे बदल होतात [प्राकृत कल्पतरू १-२३; हेमचंद्र ८-१-१५९ ते १६४; प्राकृत प्रकाश १-४१ ते ४४.]. अरे बोलीत 'ओ' हा बदल फारच कमी आढळतो. गोरी (गौरी), सोंदरू (सौंदर्य) 'उ' फारसा आढळला नाही. 'अउ' मात्र सार्वत्रिक आहे. उदा. चउरंगु (चौरंग), चउक्क (चौक), चउत्त (चौथ) इ.

'औ' अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेत अपवादात्मक असल्याचे पूर्वी निर्दिष्ट केले आहे. मूळ संस्कृत शब्दातील 'औ' तशाच्या तसा या अपवादात बसत नाही. शब्दांतर्गत 'अव' या क्वचित् औ होतो तेव्हाच हा अपवादात्मक 'औ' अरे बोलीतील शब्दांत आढळतो.

प्राकृत शब्दांत श् व ष् चा झोप होतो हे प्राकृत व्याकरणाचे सूत्र आहे [प्राकृत प्रकाश, शेषो : स : २-४३.]. मराठी प्रमाण भाषेत या सूत्राचे परिपालन होत नाही. अरे बोली मात्र या सूत्राप्रमाणेच सार्वत्रिक 'स' चा प्रयोग करते. शिष्टांचे अनुकरण करण्याच्या भूमिकेतून क्वचित् स् चा श् हा उच्चार होत असला तरी अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेत श् व ष् हे वर्ण बसत नाहीत. प्राकृता प्रमाणेच अरे बोलीत विसर्ग वर्ज्य आहे. विसर्गाचा लोप करून उरलेल्या शब्दांत कोणत्याही प्रकारचा बदल अरे बोलीत घडत नाही. उदा. दूकू (दुःख), अंतकरनु (अंतःकरण).

### ९. प्रमाण भाषेतील संयुक्त-व्यंजनांचे उच्चार

संस्कृत भाषेतील वर्णमालेतील काही ध्वनींचा लोप प्राकृत-अपभ्रंशात झाला तसाच तो अरे बोलीतही झाला. प्राचीन मराठीने मात्र आपल्या प्रौढ अवस्थेत हे लुप्त पावलेले ध्वनी नव्याने रूढ केले. अरे बोलीत तसे काही घडले नाही. इतकेच नव्हे तर प्राकृतात लोप पावलेल्या ध्वनींचे परिवर्तन या भाषांत ज्या पद्धतीने. होते तीच प्रक्रिया अरे बोलीत कायम राहिली आहे. यादवकालीन मराठीपेक्षा अपभ्रंश भाषेशी अरे बोलीचे नाते

अधिक जिव्हाळ्याचे आहे हे वरील विवेचनात स्पष्ट झाले आहे. ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेत देखील अरे बोली अपभ्रंशाचेच अनुसरण करते हेही विशद करण्यात आले आहे.

ध्वनिपरिवर्तनाशी संबंधित असलेल्या आणखी एका बाबीचा विचार या ठिकाणी केला पाहिजे. तो म्हणजे प्रमाण भाषेतील संयुक्त व्यंजनांच्या उच्चाराचा.

शब्दांत उच्चार सुलभ फेरबदल करणे ही कोणत्याही भाषेची सहज प्रवृत्ती असते. या प्रवृत्तीचा पहिला आघात पोचतो तो संयुक्त व्यंजन असलेल्या शब्दांना. लहान मुलांप्रमाणेच बाल्यावस्थेत असलेल्या भाषेला देखील जोडाक्षरांचे उच्चार पेलता येत नाहीत. ते सोपे करून उच्चारताना नकळत एक प्रकारची सुसंगती उत्पन्न होते. संयुक्त स्वर आणि संयुक्त-व्यंजने यांचे विश्लेषण या प्रक्रियेत घडते. ते घडताना विशिष्ट परिस्थितीत कठोर वर्णाचे मृदुव्यंजनांत आणि मृदुव्यंजनाचे स्वरांत रूपांतर होते. स्वरांचे शब्दातील प्रमाण वाढले म्हणजे उच्चारात दृढता येण्यासाठी स्वरांची जागा अर्धस्वर घेतात. कित्येकदा स्वरसंश्लेषही घडतो. यादव मराठीत हा स्वरसंश्लेष आढळतो. उदा. बइस–बैस, मइस–म्हैस, गउल–गौळी, कइस–कैसे, म्हणउनि–म्हणौनि, आइक-ऐक.

अरे बोलीत स्वरसंश्लेषाची प्रवृत्ती आढळली नाही. प्रमाण भाषेतील ऐ व औ या संयुक्त स्वरांचे उच्चार या बोलीत कसे परिवर्तित होतात याचे दिग्दर्शन अगोदर करण्यात आले आहे. एकंदरीत संयुक्त व्यंजनांच्या उच्चार पद्धतीत घडणाऱ्या परिवर्तनाचा विचार करताना प्राकृत भाषेतील संयुक्त वर्णांच्या उच्चारात जी व्यवस्था आढळते तीच आधारभूत धरावी लागेल. ध्वनिव्यवस्थेसंबंधाने आतापर्यंत जे विवेचन झाले आहे त्यावरून अरे बोलीच्या बाबतीत ग्रांथिक मराठी (यादवकालीन वा वर्तमान) ही प्रमाण भाषा मानता येत नाही हे स्पष्ट झाले असेलच. ध्वनिव्यवस्थेत या बोलीने प्राकृत-अपभ्रंशाचीच परंपरा पुढे चालविली असल्याने संयुक्त व्यंजनांचा विचार करताना संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश-अरे बोली अशा परंपरेनेच तो करावा लागणार आहे. या विचारात संस्कृत भाषेतील संयुक्त व्यंजन प्राकृताने कोणत्या स्वरूपात स्वीकारला, आणि प्राकृताने स्वीकारलेल्या संयुक्त व्यंजनात अरे बोलीने कोणत्या स्वरूपाचा बदल केला याचे परीक्षण करावे लागेल. संयुक्त स्वरांचा विचार ध्वनि लोपाच्या मीमांसेच्या संदर्भात आला आहे. पुढील विवेचनात संयुक्त व्यंजनावर लक्ष केंद्रित करणे इष्ट ठरेल.

**(१) क्ष आणि ज्ञ :**

**क्ष :** पारंपरिक वर्णमालेत क्ष आणि ज्ञ यांची -नोंद होत असते. वस्तुतः हे दोन्ही संयुक्त वर्ण आहेत. संस्कृत भाषेतून प्राकृतात व प्राकृतातून अरे बोलीत येताना क्ष व ज्ञ असलेले शब्द अविकृत राहात नाहीत. अरे बोलीत 'क्ष' चे 'स' अथवा 'छ' मध्ये रूपांतर घडते. 'श्च' हा संयुक्त वर्ण देखील या बोलीने 'क्ष' च्याच मालिकेत बसविला आहे. पुढील उदाहरणांवरून त्याची कल्पना येईल :

क्षत्रिय : छेत्री, दक्षिणा–दसीना

आश्चर्य : अचेरु / अछेरु, पश्चिम–पसिमु / पछिमु.

क्ष आणि श्च हे संयुक्त वर्ण या बोलीने समान का गणले याचा शोध घेत असताना 'प्राकृत-कल्पतरू' या व्याकरणात त्याचे उत्तर सापडले. या ग्रंथाच्या ३-१-५ या सूत्रात श्च चा छ प्राकृतात होतो असे सांगून पुढच्या सूत्रात (३-१-६) ध चाही छ होतो असे नमूद केले आहे. वररूचीच्या प्राकृत प्रकाशातही (३-३० व ३-४०) हेच नियम आढळून आले. या उच्चाराच्या बाबतीत देखील अरे बोली प्राकृतातील ध्वनिव्यवस्थेचे अनुसरण करताना दिसते [यादवकालीन मराठीत 'छ' चा 'स' झाल्याची उदाहरणे आढळतात : सत्र (छत्र), सळ (छळ) उसासा (उच्छ्वास), पुंस (पुच्छ), वांसरू (वच्छ) पूस (पूच्छ=विचार).].

**ज्ञ :** ज्ञ हे संयुक्त व्यंजन उत्तर भारतात 'ग्यँ' असे उच्चारण्यात येते. अरे बोलीत संस्कृत शब्दातील 'ज्ञ' एकतर 'ग्य' या स्वरूपात उच्चारला जातो. अथवा 'ज' असेही मूळ ज्ञ चे परिवर्तन होते : उदाहरणार्थ ग्यानीवंतु (ज्ञानवंत) जानु, (ज्ञान).

(२) **सजातीय वर्णसंयोग :** संयुक्त व्यंजन असलेले संस्कृत शब्द प्राकृत भाषेत येतांना अपरिहार्यपणे बदलत असतात. हा बदल देखील विशिष्ट दिशेने व विशिष्ट नियमानुसार घडत असतो. प्राकृत व्याकरणकारांनी दिलेल्या नियमानुसार संयुक्त व्यंजनात परिवर्तन पुढीलप्रमाणे घडते :

(अ) विजातीय वर्णसंयोगाचे सजातीय वर्णसंयोगात रूपांतर, उदाहरणार्थ : दुग्ध – दुद्ध; चक्र – चक्क; कर्ण – कन्न; दृष्टि – दिट्टि.

(आ) संयुक्त व्यंजनातील प्रभावी व्यंजन महाप्राणयुक्त (वर्गीय व्यंजनांती दुसरे व चौथे) असेल तर त्याचे द्वित्त न होता त्याच वर्गातील पहिल्या वा. तिसऱ्या व्यंजनात द्वित्त होते. उत्तिष्ठ – उट्ठत; उद्घाट्य – उग्घड;

(इ) संयुक्त वर्णाचे सुलभीकरण होऊन दोहोंपैकी एकच वर्ण राहिल्यास अगोदरचा स्वर दीर्घ होतो; पत्त – पात; द्वार – दार

यादवकालीन ग्रांथिक मराठीत संयुक्त व्यंजन असलेले जे शब्द प्राकृतांच्या द्वारे मराठीत आले त्यांत उपरोक्त तिसऱ्या नियमांप्रमाणे झालेले परिवर्तन आढळते. पहिल्या दोहोंची उदाहरणे मात्र आढळत नाहीत. अरे बोलीत वरील तिन्ही नियमानुसार झालेली परिवर्तने रूढ आहेत :

दुग्ध – दुद्ध – **दूद**; चक्र – चक्क – **चक्कर**; उत्तिष्ठ – उट्ठत – **उट्ठतं**; उद्घाट्य – उग्घड – **उग्गडा**; मर्कट – मक्कड – **मक्कड**; – सपत्नि – सपत्ति – **सवत्ति** इ.

या तिन्ही नियमांनुसार घडणाऱ्या ध्वनिपरिवर्तनाच्या अवस्थांचा तुलनात्मक अभ्यास केला तर तिसऱ्या नियमानुसार घडणारे स्थित्यंतर उत्तरकालीन आहे हे सहज निदर्शनास येईल. यादवकालीन मराठी भाषेत आढळणारे स्थित्यंतर त्यामानाने नंतरच्या काळातले आहे हे उघड आहे. या बोलीने बऱ्याच अगोदरच्या

काळातले स्थित्यंतर स्वीकारलेले दिसते. यादवकालीन ग्रांथिक मराठी अरे बोलीच्या मानाने अर्वाचीन असल्याचेही यायोगे सूचित होते.

(३) **स्वरभक्ती :** जोडाक्षराशी संबंधित असलेली दुसरी प्रक्रिया विकर्षाची व स्वरभक्तीची. सिरी (श्री), रगतु (रक्त), युगतु (युक्ती), भगतु (भक्त) अशी रुपे अरे बोलीत रूढ आहेत. या रूपांना अपभ्रंशाची परंपरा आहे. यादवकालीन मराठी वाङ्मयात अशी रूपे थोड्याफार प्रमाणात आढळतात. आजच्या ग्रामीण मराठीत ती रूढ आहेत. परंतु आजच्या प्रमाण भाषेत मात्र त्यांचा अभावच जाणवतो. [हेमचंद्राच्या व्याकरणात (८-२-११० ते ११५) या विषयाचा ऊहापोह करण्यात आला आहे. तो अभ्यासला असता वर्णसंयोगाच्या बाबतीत अरे बोली पूर्णपणे प्राकृताचे अनुसरण करते हे प्रत्ययास येते.]

## १०. ध्वनिपरिवर्तनाशी संबंधित अन्य समान विशेष

अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेचे निरुपण करताना प्राकृत-अपभ्रंश या भाषांत वर्ज्य गणलेले संस्कृत भाषेतील वर्ण अरे बोलीतही वर्ज्य गणले जातात हा शोध लागला. या दोन्ही भाषांत अभावाने आढळणाऱ्या संस्कृत भाषेतील वर्णाचे जे परिवर्तन घडते त्याचा तुलनात्मक अभ्यास केला असताना अरे बोली प्राकृत व्याकरणाचेच अनुसरण याबाबतीत करते हे प्रस्थापित झाले. संयुक्त व्यंजनात घडणारे परिवर्तन देखील प्राकृत व्याकरणकारांनी दिलेल्या नियमानुसार या बोलीत घडते हेही निदर्शनास आले. संयुक्तवर्णा-व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात जे परिवर्तन घडते त्याचाही तुलनात्मक विचार केला असतांना अपभ्रंश भाषा आणि अरे बोली यांचे संबंध रक्ता-मांसा इतके निकटचे होते हा निष्कर्ष परिपुष्ट होतो. यांपैकी काही विशेष पुढे देण्यात येत आहेत.

(१) **कठोर व्यंजनाचे मृदु व्यंजनात रूपांतर :** उच्चार अधिकाधिक सुलभ करण्याची प्रवृत्ती मनुष्यमात्रात असते. या प्रवृत्तीनुसार कठोर वर्णाचे मृदु व्यंजनात आणि मृदु व्यंजनाचे स्वरांत परिवर्तन होत असते. ही प्रवृत्ती सर्व भाषांच्या विकासात आढळते. तशी ती अरे बोलीतही आहे. ही बोली या बाबतीत प्राकृत-अपभ्रंशांच्या नियमांचे अनुसरण करतांना दिसते.[हेमचंद्र, ८-१-१८२] अडवी (अटवी) कडेलु (कटिवस्त्र), घड (घट) मृदुव्यंजनाचे कित्येक स्थळी स्वरातही रूपांतर घडते. नई (नदी), देवई (देवकी), वई (पति) आजच्या प्रमाण मराठीत ही प्रवृत्ती थांबलेली आहे. अरे बोलींत मात्र ती कायम आहे.

(२) **दन्त्य वर्णाचे मूर्धन्यात परिवर्तन :** हा विशेष देखील अरे बोलीने प्राकृतापासून उचलला आहे. [हेमचंद्र, ८-१-२०५,०६,१७; ८-२-२९ व ३१ ते ३९] टिपनु (तिफण), टुंटा (थोटा), डंबु (दंभ) टांबू (स्तंभ), टेलु (तेल). फार थोड्या शब्दांत हे परिवर्तन विरुद्ध दिशेनेही होते : ताकलं (टाकलं), ताकताकनी (टाकता क्षणी) अशी उदाहरणे एकंदरीत कमीच आढळली तरी ती अपभ्रंशाच्या स्वभावाची निदर्शके आहेत. [हेमचंद्र, ८-१-२०५] भाण्डीर भाषेच्या व्याकरणातही अशा परिवर्तनाचा उल्लेख आला आहे.

(३) **'ड' आणि 'ल' यांची परिवृत्ती :** अरे बोलीत 'ळ' नाही. त्यासाठी 'ल' सर्वत्र येतो. या 'ल' चे क्वचित प्रसंगी 'ड' होते, कित्येकदा 'ड' च्या जागी रही येतो. जरकलं (झळकलं) येडंला / येरंला (वेळेला), अवकारी (अवकाळी), जुडलं (जुळलं) याही परिवर्तनास प्राकृत व्याकरणाचा आधार सापडतो. [हेमचंद्र, ८-१-२०५, २०७]

अनुक्रमणिका

## ११. महाप्राण व्यंजने आणि ‘ह’

या बोलीत महाप्राण व्यंजने (वर्गीय व्यंजनांपैकी प्रत्येक वर्गातले २रे व ४थे) जवळपास अल्पप्राणांसारखी उच्चारण्याची प्रवृत्ती आढळली. नासिक्य उच्चार जेवढे स्पष्ट होतात तेवढा स्पष्ट उच्चार महाप्राण वर्णांचा होत नाही. यादवकालीन मराठीत हीच प्रवृत्ती असावी असे आल्फ्रेड मास्टर [The Grammer of Old Marathi, P.32] यांचे मत आहे. ज-झ; त-थ; द-ध अशी यमके प्राचीन मराठीत आढळत असल्याने महाप्राण वर्णाचा उच्चार अगदीच ओझरता होत असावा असा त्यांचा तर्क आहे. अरे बोलीत असलेल्या या विशेषाला प्राकृतांच्या उच्चारप्रक्रियेचा आधार नाही. देश्य शब्दांच्या उच्चार-पद्धतीत तेलुगू भाषेत महाप्राण वर्ण नाही. शेजारधर्माचा हा संस्कार असणे असंभवनीय नाही : आटू (आठ), उट्टतं (उठतो), गोंदळु (गोंधळ), सापु (साफ), गोपु (गोफ) या शब्दांत तर उघडच महाप्राण टाळलेला दिसतो. अन्यत्र महाप्राण युक्त शब्दांतील महाप्राण व्यंजन निसटते उच्चारलेले आढळले.

**‘ह’ च्या उच्चारांत** अनेक दिशांनी बदल झालेला दिसतो.

(१) **लोप :** मादेव (महादेव), पाट (पहाट), माराजा (महाराजा), सा (सहा), तुमी (तुम्ही). तह्मातु (तलहातु).
(२) **स्थलांतर :** ऱ्हा (रहा), म्हेउना (मेहुणा), म्हायेर माहेंर; न्हाइ (नाही).
(३) **संश्लेष :** धा (दहा), धई (दही), भारू (बाहेर), फाउजे (पाहिजे).
(४) **विश्लेष :** हुबा (उभा), हूटला (उठला).
(५) **अकारण आगम :** हारती (आरती), हइकावं (आयिकावं)
(६) **य/ इ मध्ये परिवर्तन :** ये (सर्वनाम - हा), ई (ही, सर्वनाम- ही), तेइचं (तेहीचं), येईचं (येहीचं - यांचे)

## १२. तालव्य आणि दन्ततालव्य उच्चार

‘च’ आणि ‘ज’ या दोन वर्णांचे तालव्य आणि दन्ततालव्य अशा दोन प्रकारांनी उच्चार होतात. अगदी मोजक्या शब्दात येणारा ‘छ’ तालव्यच उच्चारला जातो. ‘झ’ चा लोप झाला आहे त्यामुळे ‘च’ आणि ‘ज’ हे दोनच वर्ण उरतात. या वर्षांचा उच्चार तालव्य आणि दन्ततालव्य केव्हा करावयाचा या संबंधी विशिष्ट प्रकारची नियमबद्धता आढळून आली. हे नियम तेलुगू भाषेतील ‘च’ वर्णाच्या उच्चारासंबंधी असलेल्या नियमांशी सुसंगत आहेत. तेलुगू भाषेत यासंबंधी स्थूलमानाने पुढील नियम आहेत.

(१) तत्सम शब्दांत येणाऱ्या च वर्गातील व्यंजनांचा उच्चार तालव्यच होतो.

(२) देश्य शब्दात येणारा च आणि ज (छ व झ देश्य शब्दांत नसतात) साधारणपणे दन्त्यतालव्यच उच्चारला जातो.

या नियमास पुढील अपवाद आहेत :

(३) अ, आ, उ, ऊ आणि जो स्वरांसह च/ज हे वर्ण आले तर त्यांचा उच्चार दन्ततालव्यच होतो. चली, चापा, चूपू तथापि, चारू आणि जडा या शब्दांतील अनुक्रमे च व ज चा उच्चार तालव्यच होतो.

(४) उपरोक्त स्वरांव्यतिरिक्त अन्य स्वरांसह येणारे च आणि ज देश्य शब्दांत असले तरी त्यांचे उच्चार तालव्यच होतात.

(५) शब्दारंभी येणारा 'च' ग्रामिण भागात 'स' सारखा उच्चारला जातो. साला (चाला), सापा (चापा).

(६) क्वचित् शब्दारंभीचा 'स' च सारखा उच्चारला जातो : चमे (समे = समई) या नियमाचा परिणाम मराठी शब्दोच्चारात देखील आढळतो.

बंदायिसु (बांधायचं), गाइसु (गावयाच), मासपट्टा (माजपट्टा), सान्ने (चांदणे).

## १३. नासिक्य उच्चार

देशावरच्या मराठी बोलीत नासिक्य उच्चाराचा एकंदरीत कंटाळाच फार. ग्रामीण भागात कितीतरी शब्द अनुस्वार टाळूनच उच्चारण्याची सवय आहे. कटाळा, भित्त, चिच, सुठ, पिपळ असे निरनुनासिक शब्द सहजगत्या कानावर पडतात. त्यामानाने अरे बोलीत नासिक्य उच्चाराचे प्राबल्य फार. कित्येक शब्दांत मुळात नसलेले अनुस्वार येतात. आदरार्थी बहुवचनी शब्दांवरचे अनुस्वार देखील अगदी ओझरते न उच्चारता अगदी खणखणित उच्चारले जातात. शुद्धलेखनाच्या जुन्या नियमांप्रमाणे शब्दांवर येणारे अनुस्वार या बोलींत अनुच्चारित न राहता ठसठशीतपणे उच्चारले जातात. ढेंकूनु (ढेकूण), लेन्कु हिम्माला (हिवाळा), तुर्मांसु (तुम्हांस), तुमचे, आमचे ही षष्ठी प्रत्ययांत नामे तुमन्चं, अमन्चं अशी उच्चारली जातात. प्रथम पुरुषी वर्तमानकाळी क्रियापदांवर अनुस्वार देण्याचा नियम शुद्धलेखनाच्या जुन्या नियमांत होता. हा अनुस्वार अनुच्चारित गणला जात असे. अरे बोलीत हा अनुस्वार अनुच्चारित न राहता पूर्णपणे उच्चारला जातो हे विशेष. उदा. घेतुं (घेतो), करतुं (करतो), जा (जातो). एकंदरीत नासिक्य उच्चार न टाळता ते अधिक स्पष्ट उच्चारण्याकडे या बोलीची प्रवृत्ती आहे.

अरे बोलीच्या उच्चारप्रक्रियेत ङ्, ञ्, आणि ण् ही नासिक्य वर्णे नाहीत. खणखणित आणि ओझरता असे दोन प्रकारचे नासिक्य उच्चार या बोलीत रूढ आहेत हे अगोदरच्या विवेचनात नमूद करण्यात आले आहे. पहिला उच्चार संस्कृत भाषेतील परसवर्णाच्या उच्चाराच्या तोडीचा तर दुसरा पूर्णपणे नासिक्य आहे. प्रमाण मराठीत देखील अनुस्वाराचे चिन्ह दोन प्रकारचे उच्चार सुचविते. नामांतर आणि नामांचा. परसवर्ण सदृश असलेले अरे बोलीतील नासिक्य उच्चार एकतर 'न्' क्वचित म् यांच्या योगाने दर्शविले आहेत. ते शक्य नसेल

तेव्हा शब्दावर चंद्राकृती अनुस्वार ( ँ) दिले आहेत. हे उच्चार नासिक्य व्यंजनाच्या (स्वरविरहित) उच्चारांसारखे होतात. केवळ टिंब देऊन दर्शविलेले अनुस्वार ओझरते वाटले तरी त्यांना नासिक्याचा खणखणित उच्चार अभिप्रेत आहे.

या बोलीतील नासिक्य उच्चारांचे विश्लेषण केले असता पुढील गोष्टी लक्षात येतात :

(१) **अकारण नासिक्य :** शब्दाची व्युत्पत्ति अथवा व्याकरणाचे नियम यांपैकी कोणतेच कारण देता येणार नाही असे अनुस्वार काही शब्दात आले आहेत. देंटु, लेंकु, लेंकरु जोंपु, दात (जाते) वाँटेदारु (भागीदार), बंक (वाकड, अथवा दोष) कँदी, अँसू (अश्रू) ही या प्रकारातली उदाहरणे. या शब्दातील अनुस्वाराशी व्युत्पत्ति वा व्याकरण नियम यांपैकी एकाचाही संबंधा पोचत नाही. प्राकृत भाषेतही हा विशेष आढळतो. हेमचंद्राने आपल्या व्याकरणात या विशेषाची दखल घेतली असून ८- १-२६ आणि ८- १-२९ या सूत्रात या विशेषाचा परामर्श घेतला आहे. घालून प्रकाश (४-१५) प्राकृत कल्पतरू (१-५-१७) या ग्रंथात या आगंतुक अनुस्वाराची दखल घेण्यात आली आहे.

(२) **'स' प्रा वर्णांवर येणारे अनुस्वार :** आजच्याही प्रमाण भाषेत वेगळ्या पद्धतीने उच्चारले जातात : संचार, संसार आणि सिंह या शब्दात आलेल्या अनुस्वारात हा फरक लक्षात येईल. अरे बोलीत देखील 'स' या वर्णावरील अनुस्वारांच्या उच्चारात असाच वेगळेपणा दिसून येतो सँम्मसारु (संसार) सिँम्मासनु सिम्मु या शब्दांत म् या नासिक्य व्यंजनास द्वित्व आल्याचे दिसून येईल.

(३) **व्युत्पत्तिसिद्ध पण प्रमाण भाषेतील 'अनुच्चारित' अनुस्वार :** मराठी शुद्धलेखनाच्या दीर्घकालीन वादात 'उच्चारित' आणि 'अनुच्चारित' असे अनुस्वारांने भेद बरेच गाजले होते. निदान व्युत्पत्तिसिद्ध अनुस्वार तरी लेखनात कायम असावेत असे मत बरेच प्रभावीपणे मांडण्यात आले होते. तरीही त्यास मान्यता मिळाली नाही. सर्व अनुच्चारित अनुस्वार वगळण्यात यावेत असाच नियम नव्या शुद्धलेखनात समाविष्ट झाला. शुद्धलेखनाच्या जुन्या नियमांप्रमाणे काही शब्दांवर येणारे अनुस्वार उच्चारले जात नसल्याने ते नियमात नसावेत या सबबीवर आजच्या लेखनपद्धतीतून त्यांना अर्धचंद्र मिळाला व अनुच्चारित तारांगण मराठी लेखनातून लुप्त झाले. प्राचीन मराठी संहिता मात्र आजही शुद्धलेखनाच्या जुन्या नियमानुसारच संपादित होत असते.

आजच्या मराठीने 'अपंक्त' गणलेले हे 'अनुच्चारित' अनुस्वार कधीकाळी उच्चारले जात असावेत. निदान अरे बोलीत तरी ते उच्चारले जातात. नाँऊ (नाव), हिम्माला (हिवाळा), केसु (केस), पाँचु (पाच), ढेंकुनु (ढेकूण). जुन्या नियमांप्रमाणे हे शब्द नांव, हिवाळा, केस, पांच, ढेंकूण असे लिहिण्यात येत असत. यापैकी पहिल्या चारांना व्युत्पत्तीचा आधार आहे. शेवटच्या शब्दाला प्राकृत भाषेपासूनची परंपरा आहे. या परंपरा या बोलीत स्पष्ट व उच्चारित स्वरूपात कायम आहेत.

(४) **वर्तमानकाळी प्रथम पुरुषी क्रियापद :** वर्तमान काळाच्या प्रथम पुरुषी (दोन्ही वचनी) क्रियापदांवर अनुस्वार देण्याची परंपरा प्राचीन मराठीत होती. 'अनुच्चारित' या मालिकेत याही अनुस्वाराची नोंद झाल्याने वर्तमानलेखनात हा अनुस्वार वगळलेला आहे. याही अनुस्वाराला स्पष्ट उच्चाराची पूर्वपरंपरा असावी असे अरे

अनुक्रमणिका

बोलीतील नासिक्य उच्चारांवरून निश्चित होते. करतुं (आम्ही करतों), जातु (आम्ही जातों), गेतुं (आम्ही घेतों), देतुं (आम्ही देतों) इ.

**(५) अनेकवचनी नामांवरील अनुस्वार :** प्रमाण भाषेत लेखनात आणि बोलण्यात अनेकवचनी नामांचा सानुस्वार उच्चार होतो. अरे बोलीत हा उच्चार अगदी ओझरता होत नाही, खणखणीत होतो. लोकाँसु, बइलाँचं, गाँमाँहोउनु इ.

तुमचे आणि आमचे ही षठ्यन्त सर्वनामे तुमचं, अमन्चं अशी उच्चारली जातात. या उच्चारांची परंपरा अपभ्रंश भाषेइतकी पुरातन आहे हे या ठिकाणी नमूद करावेसे वाटते

**१४. आणखी काही उच्चार-विशेष**

आतापर्यंतच्या विवेचनात न आलेले आणखी काही उच्चार-विशेष पुढ देण्यात येत आहेत. यांपैकी कित्येकांना प्राकृत व्याकरणाचा आधार आहे.

(१) **अकारण र्‌हस्वत्व :** अकारण अनुस्वाराप्रमाणेच अकारण ऱ्हस्वत्व हा देखील या बोलीचा विशेष असून प्राकृत भाषांच्या उच्चारपद्धतीशी तो संवादी आहे. हा विशेष लक्षात यावा यासाठी काही उदाहरणे पुढे देण्यात येत आहेत. हेमचंद्राच्या व्याकरणात (सूत्रेः ८-१-८४, ८-२-५६, ८-२- १३२) या विशेषांना आधार सापडतो.

**तंम्बोलु** (तांबुल) सादो. ३७
**दुकलु** (दुकाल)
**पंगरुनु** (पांघारुण) वज्ज. ६०५, मपु ७-६१२ (पंगरुण)
**भंडनु** (भांडण) गास. ७-९९, देना ६-१०१ (भण्डणं)
**मंजरु** (मांजर) सादो. ४७
**कंतु** (कांत) कच. ५-५-२

हे शब्द याच स्वरूपात प्राकृत-अपभ्रंशातील ग्रंथात आले असून त्या त्या ग्रंथाचे संदर्भ शब्दाच्या पुढे दिले आहेत.

(२) **अकारण द्वित्त :** ऱ्हस्व उच्चाराप्रमाणेच कित्येक शब्दातील व्यंजनांचे द्वित्त हाही या बोलीला लाभलेला प्राकृताचा वारसा आहे. भाषाशास्त्रीय नियमांप्रमाणे या विशेषाचे काहीच स्पष्टीकरण देता येत नाही. हेमचंद्राने (८-२-९८) आपल्या व्याकरणात हा विशेष नोंदविला आहे.

**खोळ्ळं** (खोल) मपु. २-१३९ (खोळ्ळं)
**तळ्ळं** (तळे) मपु. २५-२-८ (तळ्ळं)
**वळ्ळं** (ओले) गास. ६-९९ (ओलं)

दुद्दं, सवत्ति, जुन्नं या शब्दांतही व्यंजनाचे द्वित्त आहे. परंतु ते ध्वनिपरिवर्तनाच्या नियमात बसते. अगोदर दिलेल्या शब्दांचे द्वित्त त्या प्रकारात बसत नसल्याने ते अकारण ठरते.

(३) **शब्दांती उकारबाहुल्य :** उकारबाहुल्य या बोलीत नांदते. अकारांत नामे आणि विशेषणेच तेवढी उकारांत असतात असे नव्हे. धातुसाधितांची रूपेही उकारांत असतात. दीसु, भगतु, जाउनु, फाउनु, तित्तु इ.

शब्दांतीचा उकार हा ज्ञानेश्वरकालीन मराठीचा विशेष गणला जातो. संत एकनाथांच्या कालापासून शब्दांतीच्या उकाराचे प्रमाण कमी होत गेले आहे. 'उकारबहुला भाषा' अशी प्राकृतांची प्रसिद्धी आहे. हेमचंद्राने अपभ्रंश भाषेतील विभक्तिप्रत्ययाचा विचार करताना दोन नियम दिले आहेत : (१) प्रथमा आणि द्वितीया या दोन विभक्तींना प्रत्यय नसतात (२) प्रथमा-द्वितीयेतील अकारांत नामांच्या शेवटी उकार येतो (८-४-३४४ आणि ८-४-३३१). अव्यय आणि धातुसाधित यांच्या अन्त्य उकाराचा संदर्भ या नियमांत नसला तरी अकारांत नामांचे उकारांत रूप होणे हा प्राकृताचा स्वभावधर्म अरे बोलीने एखादा वारसा सांभाळावा त्याप्रमाणे आजतागायत चालू ठेवला आहे. ज्ञानेश्वरोत्तर काळापासून अन्त्य उकार अपवादात्मक आढळतो हे लक्षात घेता समानध्वनि लोपाच्या संदर्भात काढण्यात आलेला निष्कर्ष या वैशिष्ट्याने दृढ होतो असेच म्हणावे लागेल. तो म्हणजे प्राचीन मराठी शब्दांची उकारांत परंपरा लुप्त होण्याच्या मार्गावर असताना अथवा तत्पूर्वी अरे बोलीस आधारभूत असलेली मूळ भाषा मराठी भाषेच्या मध्यवर्ती प्रवाहापासून वेगळी झालेली दिसते. अरे समाजाचे स्थलांतर यादवकालापूर्वी झाले असाच निष्कर्ष या वैशिष्ट्याच्या आधाराने निघतो.

शब्दांतीचा उकार सभोवतालच्या तेलुगू भाषेच्या संस्कारातून आलेला असण्याची शक्यता निर्दिष्ट करता येण्यासारखी आहे. याचाही थोडा विचार केला पाहिजे. पापमु, गोत्रमु, अन्नमु, गजमु या तेलगू शब्दांच्या शेवटी उकार दिसतो परंतु वस्तुतः तो आहे मुकार. या शब्दांचे वचनांतर होत असताना किंवा या या शब्दांना विभक्तिप्रत्यय लागताना अंतीचा उकार न जाता मुकार गळतो. उदा. पोपालु, गोत्रालु, अन्नानिकी.

अरे बोलीत असलेले शब्दांतीचे उकार प्राकृत-अपभ्रंशाची परंपरा दर्शविणारे आहेत असेच शेवटी मानावे लागते. अल्पप्रमाणात असेल, परंतु यादवकालीन मराठीत देखील हा विशेष आढळतो. [तुळपुळे, यादवकालीन मराठी पृ. २२४ राजवाडे, ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण पृ. १२९.]

(४) **स्वर आणि अर्धस्वर यांची परिवृत्ती** : मराठी भाषेच्या इतर ग्रामीण बोलींप्रमाणे या बोलीत देखील स्वर आणि अर्धस्वर यांची परिवृत्ती झालेली दिसून येते. ए-य, ओ-व, इ-वि, इ-य याची अदलाबदल या बोलीतील कित्येक शब्दांत झाली आहे. इ, ए, ओ हे स्वर व्यंजनांसह आले तर सहसा बदलत नाहीत. स्वतंत्रपणे आले असताना मात्र काही शब्दांत ते बदलतात :

येकु (एक), येवडु (एवढा), सोकाशी (सावकास), इद्या (विद्या), काई (काय), येलु (वेळ/वेल), भे (भय), से (सय), वढ (ओढ), इ.

(५) **ऱ्हस्व-दीर्घासंबंधी अनियमितता** : 'दीर्घ-ऱ्हस्वौ मिथो वृत्तौ' असे सूत्र हेमचंद्राने (८-१-४) प्राकृत भाषेतील समासांच्या निमित्ताने दिले आहे. अरे बोलीत साधारणपणे समास रूढ नसल्याकारणाने शब्दांच्या उच्चाराच्या बाबतीत देखील ते लागू पडते. पदांचा संधी प्राकृतात होत नाही. तसाच तो या बोलीतही. तथापि, यीना, बोलना, करना (येणार नाही, बोलणार नाही, करणार नाही) असे संधी क्वचित् आढळतात. स्थूलमानाने संधी न करण्याकडेच या बोलीचा (आणि प्राकृतांचाही) ओढा आहे. प्रमाण मराठीत निदान संस्कृत सामासिक शब्दांत तरी संधी होतो. उदा. वयोमान मनोरंजन, भावानुभाव इ. या बोलीचे मात्र तसे नाही. संधी न करण्याचीच या बोलीची प्रवृत्ती आहे. त्यामुळे सामासिक शब्द अपवादात्मकच. मोकळे शब्द उच्चाराच्या दृष्टीने कधी ऱ्हस्व उच्चारले जातील तर कधी दीर्घ. या अनियमिततेत देखील ही बोली प्राकृत-अपभ्रंशाचे अनुकरण करते हे विशेष.

## १५. मराठी भाषेची प्राचीनतम अवस्था : अरे बोली

अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेशी संबंधित असलेल्या विविध अंगाचा विचार आतापर्यंत आपण केला. या बोलीतील मूळ ध्वनी, प्रमाण मराठी भाषेच्या तुलनेने या बोलीत असलेला काही वर्णाचा अभाव, या अभावाची मीमांसा, ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया, संयुक्त वर्णांचे उच्चार, नासिक्योच्चार आणि या बोलीत आढळणारे उच्चार-पद्धतीचे अन्य विशेष इत्यादि विषयांचे तुलनात्मक विवेचन वर करण्यात आले आहे. या विवेचनातून सप्रमाण सिद्ध झालेला एक सिद्धांत या बोलीच्या स्वभावदर्शनाच्या दृष्टीने ध्यानात ठेवण्यासारखा आहे :

> अरे बोलीने ध्वनिव्यवस्थेच्या अंगोपांगात प्राकृत-अपभ्रंश भाषांच्या व्यवस्थेचे संपूर्णपणे अनुसरण केले आहे. म्हणूनच अरे बोलीच्या बहुतेक सर्व उच्चार-विशेषांना प्राकृत व्याकरणाचा आधार सापडतो. प्राचीन मराठी (ग्रांथिक) भाषेने प्रारंभ काळात प्राकृत-अपभ्रंशांची ध्वनिव्यवस्था स्वीकारली असली तरी कालांतराने झालेल्या विकासात ग्रांथिक मराठीने प्रारंभीच्या ध्वनिव्यवस्थेत सुधारणा करून संस्कृत भाषेत रूढ असलेली ध्वनिव्यवस्थाही दत्तक घेतली. अरे बोली मात्र प्राकृत-अपभ्रंश या भांषांच्या ध्वनिव्यवस्थेच्या कक्षेत आज देखील नांदत आहे.

प्राकृतभाषेतून अपभ्रंशाचा उदय व विकास झाल्यानंतर अपभ्रंशातून मराठी भाषेचा उद्‌भव होत असताना भाषेचे जे संक्रमणावस्थेतले रूप पुढे मराठी या नावाने ख्यातीस पोचले त्या रूपाचा वारसा अरे बोलीने चालविला आहे हे वर दिलेल्या अभ्यासात सप्रमाण प्रस्थापित झाले .आहे. भाषाशास्त्राचा असा सिद्धांत आहे की एकाच वेळी समाजाच्या शिष्ट व कनिष्ठ वर्गांत रूढ असलेल्या भाषेत शब्दसंग्रह आणि शब्दांची रूपे भिन्न आढळली तरी ध्वनिव्यवस्थेत मात्र फरक पडत नसतो ['High and low styles tend to vary in Lanicow, morphonemies and almorphy but not in phonology'. Gumpez. **Language in Social Groups**, P. 106.]. या सिद्धांताच्या अनुसंधानाने विचार केला असता असे दिसून येईल की प्राकृत-अपभ्रंशाची ध्वनिव्यवस्था अरे बोलीने स्वीकारली एवढेच नव्हे तर कित्येक

शतके ती कायम ठेवली आहे. प्राकृत-अपभ्रंशाच्या ध्वनिव्यवस्थेचे उल्लंघन करणारा एकही विशेष अरे बोलीत आढळणार नाही.

वर्तमान प्रमाण मराठी भाषा तर सोडून द्या, परंतु यादवकालीन मराठी भाषेच्या बाबतीत असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्री अपभ्रंशाची ध्वनिव्यवस्था आत्मसात करूनही यादवकालीन मराठीने विकासाचा पुढचा मुक्काम गाठला आणि अपभ्रंश भाषेत नसलेले संस्कृत भाषेतील वर्णव्यवस्थेचे विशेषही रूढ केले. म्हणूनच यादवकालीन मराठीचे स्वरूप विशद करताना डॉ. तुळपुळे यांनी पुढील निर्वाळा दिला आहे.

> "यादव मराठीची काही वैशिष्ट्ये लक्षात घेता यादव मराठीला अपभ्रंशाचा अपभ्रंश न म्हणता संस्कृतीकरणाचा संस्कार झालेला उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश म्हणणे अधिक योग्य होईल."
> [यादवकालीन मराठी भाषा, पृ.११९.].

डॉ तुळपुळे यांचे वरील मत जमेस धरून पुढे असेही म्हणता येईल की, मराठी भाषेला यादवकाळात उत्क्रांत अवस्था प्राप्त होण्यापूर्वी या भाषेची जी मूळची पिंड प्रकृती होती तिचे रूप अरे मराठी बोलीने सुरक्षित ठेवले आहे म्हणूनच तिची ध्वनिव्यवस्था अपभ्रंशापासून फार वेगळी राहिली नाही. एका परीने ती अपभ्रंशाचीच उत्तर अवस्था ठरते. जनसामान्यात रूढ असलेली बोली कालांतराने उत्क्रांत होऊन यादवकालीन मराठी वाङ्मयाची प्रौढ भाषा बनली. हा विकास घडत असताना सामान्य जनतेच्या तोंडी असलेली बोली लोकपरंपरेने वाढत राहिली. लोकपरंपरेचा हा वारसा अरे बोलीच्या मूळस्थानी असल्याने यादवकालीन मराठीपेक्षा या बोलीचे अपभ्रंशाशी जवळचे नाते ध्वनिव्यवस्थेत दिसून येते.

अरे बोलीची ध्वनिव्यवस्था आणि उच्चारविशेष यांचा अभ्यास करताना या बोलीचे प्राकृत-अपभ्रंशाशी असलेले नाते अत्यंत जवळचे व जिव्हाळ्याचे असल्याचा प्रत्यय पदोपदी येतो. प्राकृत-अपभ्रंशातून पृथगात्म होण्याची प्रक्रिया यादवकालीन मराठीने स्वीकारलेली असली तरी ती तेवढ्यावरच थांबली नाही. या परंपरेने आलेल्या व्यवस्थेत यादव-मराठीने नवीन भर घातली.

प्राकृत अपभ्रंशाचे वर्ज्य गणलेले ध्वनि यादव मराठीने तत्सम शब्दांचा संग्रह करून स्वतःच्या ध्वनिव्यवस्थेत समाविष्ट केले व प्राकृताच्या द्वारे सुरू झालेली ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया पुढे नेली. संयुक्त व्यंजनांच्या उच्चाराचेच उदाहरण घेऊ या : चतुर्थ या संस्कृत शब्दाचे प्राकृतात चउत्य असे रूप होते (अरे बोलीत चऊत्त). यादव मराठीने पुढची अवस्था गाठून चौथा असा या शब्दाचा उच्चार रूढ केला. चक्र हा शब्द चक्क (अरे बोलीत चक्कर) असा होतो. यादव मराठीच्या ध्वनिपरिवर्तनात 'चाक' हे त्याचे विकसित रूप बनले.

अरे बोली मात्र अपभ्रंशाच्या ध्वनिव्यवस्थेच्या कक्षेतून बाहेर पडली नाही. यादवकालीन ग्रांथिक भाषेचा विकास होण्याच्या अगोदरच्या काळातच अरे समाजाचे महाराष्ट्रातून स्थलांतर झाले असावे. स्थलांतरित समाजाने मूळ वारसा फारसा बदल न होऊ देता जसाच्या तसाच कायम ठेवला. त्यामुळेच मराठी भाषेच्या विकासातली प्राचीनतम अवस्था या बोलीच्या रूपाने वर्तमान काळापर्यंत टिकून राहिली. श्रुतिविशारदांनी मौखिक परंपरेने वेदविद्या स्वराचाही फरक न पडू देता जतन करून ठेवली त्याचप्रमाणे अरे समाजानेही

मौखिक परंपरेने आपले मूलधन सुरक्षित ठेवले असे म्हणता येईल. परिशिष्टात दिलेल्या निवडक शब्दांवरून अरे बोलीचे अपभ्रंशाशी असलेले नाते किती निकटचे होते याची कल्पना येईल.

### १६. ध्वनिव्यवस्थेचा शोध आणि बोध

एखाद्या भाषेचा (आणि बोलीचाही) स्वभावधर्म निश्चित करण्यास त्या त्या भाषेतील ध्वनिव्यवस्थेस निर्णायक महत्त्व असते. म्हणूनच या बोलीच्या ध्वनिव्यवस्थेसंबंधाने विस्ताराने विवेचन करावे लागले. ध्वनिव्यवस्थेच्या या शोधातून जे फलित प्राप्त झाले त्याची संकलित नोंद घेण्यापूर्वी तुलनात्मक अभ्यासातील एक अपरिहार्यता या ठिकाणी नमूद केली पाहिजे.

प्राकृत, अपभ्रंश आणि यादवकालीन मराठी आणि अरे बोली यांचा तुलनात्मक अभ्यास करत असताना प्राकृत, अपभ्रंश आणि यादवकालीन मराठी या भाषांतील वाङ्‌मयात आढळणारे स्वरूप प्रमाण मानले आहे. अरे बोलीची सामग्री मात्र वर्तमान काळात मौखिक परंपरेने गोळा केली असून ती 'बोली'ची सामग्री आहे. तुलनात्मक अभ्यासात त्यामुळे एक प्रकारची विषमता आढळेल. दोन किंवा अधिक बोलींच्या सामग्रीचे तुलनात्मक अध्ययन न होता येथे ग्रांथिक प्राकृत, अपभ्रंश आणि यादवकालीन मराठीचे स्वरूप-विशेष अरे बोलीच्या तुलनेने विचारात घेतले आहेत. ही विषमता अपरिहार्य होती. वर्तमान प्रमाण मराठी भाषेपासून अरे बोली बरीच दूर (काल आणि भाषेचे स्वरूप यांच्या दृष्टीने) असल्याने यादवकालीन मराठी खेरीज अन्यत्र या बोलीला समानधर्म आढळला नाही. या वाङ्‌मयातही अरे बोलीचे समग्र स्वभावधर्म सापडले नाहीत त्यामुळे तुलनेसाठी पूर्ववर्ति अपभ्रंश आणि प्राकृत यांच्याकडे धाव घ्यावी लागली. ती सामग्री देखील ग्रांथिक स्वरूपातच होती.

> या शोधात गाथासप्तशती (इ. स. १ ले शतक) ते दहाव्या अकराव्या शतकातले अपभ्रंश ग्रंथ यांच्यापर्यंत दिसून येणारे भाषेतील महत्त्वाचे विशेष अरे बोलीत अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले. शब्दसंग्रह आणि ध्वनिव्यवस्था या दोहोंच्या दृष्टीने सुमारे दहा शतकांची परंपरा अरे बोलीत सुरक्षित राहिल्याचा शोध तुलनात्मक अभ्यासातून लागला.

तुलनात्मक विवेचनाच्या संदर्भात प्राकृत-अपभ्रंश असा सामासिक शब्द जवळपास सर्वत्र योजण्यात आला आहे. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे व्याकरणांनी प्राकृत भाषांचे व्याकरण लिहिले असून आवश्यक तेवढा अपभ्रंश भाषेचा उल्लेख केला आहे. व्याकरणाच्या नियमांचा आधार देताना म्हणूनच प्राकृत-अपभ्रंश असा संयुक्त प्रयोग करावा लागला. शिवाय, ध्वनिव्यवस्थेच्या दृष्टीने प्राकृत आणि अपभ्रंश या दोन्ही भाषांत फारसा भेद नाही. ध्वनिपरिवर्तनाच्या काही प्रक्रिया अपभ्रंशात भिन्न आहेत. प्रत्ययांच्या बाबतीत थोडाफार वेगळेपणा आहे. परंतु एकंदरीत ध्वनिव्यवस्थेचा विचार करता प्राकृत-अपभ्रंश आणि अरे बोली यांत अभेद आढळला : 'लीलावई कहा' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. उपाध्ये यांनी काढलेला निष्कर्ष (पृ. ८६) या दृष्टीने लक्षात ठेवण्याजोगा आहे :

“अपभ्रंशाचे मराठीशी पारंपरिक नाते आहे....
(लीलावई) या ग्रंथातील बरेच धात्वादेश मराठीत रूढ आहेत.”

ध्वनिव्यवस्थेच्या शोधातून निष्पन्न होणारे फलित एका दृष्टीने अगोदरच्या अध्यायात शब्दसंग्रहाच्या विश्लेषणातून निघणाऱ्या निष्कर्षास पूरक आहे हे निराळे सांगण्याची आवश्यकता नसावी. दोन्ही अध्यायांच्या विवेचनातून पुढील निष्कर्ष सप्रमाण प्रस्थापित होतात :

१. अरे-मराठी बोलीत प्राकृत-अपभ्रंश या भाषांची ध्वनिव्यवस्था अस्तित्वात आहे. वर्णव्यवस्थाच नव्हे तर ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया आणि उच्चारविषयक अन्य विशेष प्राकृत-अपभ्रंश आणि अरे-मराठी यांत समान आहेत. या साधर्म्यामुळे ही बोली भाषेच्या विकास क्रमातील प्राकृत-अपभ्रंशाची उत्तरावस्था असल्याचे सिद्ध होते.

२. या वैशिष्ट्यांचा परिणाम अरे बोलीतील शब्दसंग्रहावर घडलेला दिसून येतो. प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांतील कितीतरी शब्द जवळपास अविकृत स्वरूपात या बोलीत आज आढळतात. त्याचे कारण समान ध्वनिव्यवस्था हे देता येईल.

३. अपभ्रंशापासून उदयास आलेल्या मराठी भाषेत काळाच्या ओघात बरीच स्थित्यंतरे घडली. उच्चारप्रक्रियेच्या विकासाबरोबरच शब्दसंग्रहात देखील सुधारणा झाली. तथापि, या विकासाचा फारसा परिणाम या बोलीच्या आजच्या स्वरूपावर झालेला दिसून येत नाही. ही बोली प्राकृत-अपभ्रंशाच्या उच्चार प्रक्रियेच्या परिघातच आज नांदत आहे.

४. यादवकालीन मराठी वाङ्मयात मराठी भाषेचे प्राचीनतम लिखित रूप आढळते. या वाङ्मयीन भाषेशी अरे बोलीची तुलना केली असताना उच्चारप्रक्रिया आणि शब्दसंग्रह यांचे बरेच आधुनिकीकरण यादव-मराठीत झाल्याचे निदर्शनास येते. यादवमराठीने भाषेच्या विकासक्रमात संपादन केलेल्या पुढील अवस्थांचा आढळ अरे बोलीत होत नाही.

५. मराठी भाषेने यादवकाळात प्रौढ वाङ्मयीन स्वरूप धारण करण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या मराठी बोलीचे लोकपरंपरेतील स्वरूप निश्चित करणारी मोलाची साधन-सामग्री अरे बोलीत सुरक्षित राहिली आहे. एका परीने ही बोली मराठी भाषेचे प्राचीनतम स्वरूप निर्दिष्ट करणारी असल्याने भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीने तिचे महत्त्व असाधारण ठरते.

६. तेलुगू भाषिकांच्या वर्तुळात कित्येक शतके नांदत असतानाही या बोलीने आपले पुरातन स्वरूप कायम ठेवले हाही या दोस्तीचा एक असाधारण विशेष आहे.

अनुक्रमणिका

७. भाषेच्या स्वरूपावरून काळाचे अनुमान बांधावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, यादवकाळा पूर्वीच्या मराठीचे स्वरूप या बोलीत सुरक्षित राहिले त्या अर्थी अरे समाजाने निदान अकराव्या-बाराव्या शतकात महाराष्ट्रातून तेलंगणात वसाहती केल्या असाव्यात.

ध्वनिव्यवस्थेच्या अंगाने विचार केला असता उपरोक्त निष्कर्ष निघतात. रुपसिद्धी आणि वाक्यरचना या दोन अंगांचा विचार केला असतानाही या निष्कर्षास पुष्टीच मिळते.

∫∫∫

अनुक्रमणिका

## प रि शि ष्टे

### [अ] भाण्डीरभाषा व्याकरणम्

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या तीन अंकांतून [वर्ष १ ले, (मार्च १९२८) अंक १ ला, वर्ष २ रे (सप्टेंबर १९२८) अंक २ रा आणि वर्ष ३ रे (मार्च १९३०) अंक १ ला] भाण्डीरभाषा-व्याकरण या शीर्षकाखाली श्री. वा. गो. परांजपे यांनी भाण्डीरभाषेच्या व्याकरणावरील संस्कृत ग्रंथाची संहिता आणि तिचा मराठी अनुवाद प्रस्तावनेसह प्रसिद्ध केला आहे. हा विषय क्रमशः प्रसिद्ध व्हावयाचा होता. परंतु तीन हप्त्यानंतर पुढचा भाग मात्र प्रसिद्ध झाला नाही. प्रसिद्ध झालेल्या भागात भाण्डीरभाषेच्या उच्चार-प्रक्रियेसंबंधाने विवेचन आले आहे. या उच्चार-प्रक्रियेचा अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेशी निकटचा संबंध पोचतो.

या व्याकरणास आधारभूत असलेल्या भाषेसंबंधी श्री. परांजपे लिहितात :

> “दैव योगाने असे झाले आहे की, प्राकृत व अपभ्रंशाचा विचार [या ग्रंथात] फारच त्रोटक रीतीने करून सूत्रकार देशीभाषांकडे वळला आहे व जरी एकंदर पुष्कळ देशांच्या भाषांचा तो निर्देष करितो तरी मुख्यत्वे करून एका भाषेचीच रूपे देत आहेसे दिसते....... त्या एका भाषेचे गीत-भाषा म्हणून महत्त्व असेल. टीकाकार आंध्रदेशीय आहे. कारण, तो आंध्र पर्याय सांगतो. म्हणून जरी सूत्रकारासंबंधाने काही माहिती नसली तरी टीकाकाराचे वेळी तरी या भाषेला आंध्रप्रदेशात महत्त्व होते हे निर्विवाद आहे. **ही मुख्य भाषा म्हणजे जुनी मराठीच आहे. हे पुढील ग्रंथावरून दिसेल व ज्ञानेश्वर कालीन मराठीशी तुलना करण्याला या ग्रंथात पुष्कळ सामग्री मिळते.....**”
>
> [जाड ठसा प्रस्तुत लेखकाचा]

श्री. परांजपे यांनी दिलेल्या माहितीवरून पुढील मुद्दे निश्चित होतात :

(१) भाण्डीरभाषा-व्याकरणम् या ग्रंथात प्रामुख्याने मराठी भाषेचे व्याकरण आले आहे.

(२) ही भाषा मूळ सूत्रकाराच्या आणि नंतरच्या भाष्यकाराच्या काळातही आंध्र प्रदेशात महत्त्वाची गणली जात होती. (गीतभाषा या नात्याने ती लोकप्रिय देखील असली पाहिजे.)

(३) या मराठी भाषेचे ज्ञानेश्वरकाळीन मराठीशी साम्य आहे.

(४) सूत्रकार तेलगूभाषिक असावा. कारण, काही ठिकाणी तो शब्दांचे तेलुगू पर्याय देतो.

अनुक्रमणिका

श्री. परांजपे यांनी समग्र ग्रंथ संपादिला असला तरी या व्याकरण ग्रंथाचा काही भागच प्रकाशित झाला आहे. त्यामुळे या भाषेचे समग्र स्वरूप नेमके कसे होते ते सांगता येत नाही. तंजाऊरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात या ग्रंथाची प्रत असल्याची नोंद आहे. परंतु ती पोथी उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे प्रकाशित भागावरच निर्वाह करावा लागतो.

**आंध्र प्रांतात मराठी गीतांना लोकप्रियता आणि प्रतिष्ठाही**

गीतभाषा या नात्याने महत्व पावलेली ही मराठी भाषा अर्थातच या भागात विखुरलेल्या मराठी भाषिकांची होती. संस्कृत भाषेत या भाषेचे व्याकरण सूत्रबद्ध व्हावे व या सूत्रांवर संस्कृत भाषेत भाष्यही लिहिले जावे यावरून मराठी भाषिकांना संगीताच्या क्षेत्रात एकेकाळी केवढी प्रतिष्ठा होती याची कल्पना येते. तेलुगू रंगभूमीवर गेली शंभरवर्षे नाट्यप्रयोग करणारे कलावंत मराठी भाषिक आहेत हे पहिल्या खंडात विस्ताराने सांगण्यात आले आहेच. या कलावंतांच्या पूर्वजांची भाषा या संस्कृत व्याकरणांचा विषय झाली असेल असे मानणे निराधार ठरू नये. ज्या अरे समाजाच्या बोलीचा व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास प्रस्तुत करण्यात येत आहे त्याच समाजातील काही गटांनी मराठी गीतांच्या द्वारे आंध्र प्रांतात प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली असावी. 'भाण्डीर' म्हणजे गीत गाणाऱ्या भाण्ड लोकांची भाषा असे एक स्पष्टीकरण भाष्यकाराने दिले आहे. 'भाण' हा वीथि नाटकाचा (Street Drama) विशेषतः शृंगारप्रधान नाटकाचा एक प्रकार नाट्यशास्त्रात नमूद आहे. या भाणाचे प्रयोग करणारे ते भाण्ड वा भाण्डीर असा अर्थ लावला तर तो आंध्र प्रांताच्या सांस्कृतिक परंपरेच्या दृष्टीने दूरान्वित ठरू नये. खेडोपाडी प्रवासी रंगभूमीवर आजही पौराणिक व शृंगारप्रधान पण तेलुगू भाषेतील नाटकांचे प्रयोग करून दाखविणारे कलावंत मराठी भाषिक आहेत. स्थलांतरित झालेल्या मराठी भाषिकांपैकी काहींनी शेतीचा व्यवसाय स्वीकारला तर कित्येकांनी वीथिनाटकांत प्राविण्यसंपादन करून आपल्या समाजाला आणि मराठी गीतांना परभाषिक प्रदेशात प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली असे गृहीत धरणे अनैतिहासिक व निराधार ठरू नये. आंध्र प्रदेशाच्या सांस्कृतिक इतिहासात मराठी भाषिकांचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे देखील या भाषेच्या व्याकरणावरून निष्पन्न होते. [पहिल्या खंडाच्या उत्तरार्धात सुरभीनाटक मंडळ्यांसंबंधी दिलेली माहिती या निष्कर्षास पुष्टी देणारी ठरते.]

**अरे बोलीशी साधर्म्य**

उपलब्ध असलेल्या भाण्डीरभाषा व्याकरणाच्या भागात प्रामुख्याने उच्चारप्रक्रियेचा भाग आला आहे. ''प्रत्यहार सूत्रे'' या नावाने संबोधण्यात आलेली ८ सूत्रे उच्चारप्रक्रियेचे स्वरूप विशद करणारी आहेत. या सूत्रांचे विषय असे :

१. आ इ, उ (ऱ्हस्व आणि दीर्घ).
२. ऋ व ऌ यांसबंधी.
३-४. ए, ओ, ऐ व औ या संयुक्त स्वरांसंबंधी.
५. अर्धस्वरांचा विचार.
६. अनुनासिकांचा विचार.

७. वर्गीय व्यंजनांचा विचार, आणि
८. श्, ष् व स् यांसंबंधी.

(१) **कोणते वर्ण नाहीत**? भाण्डीर भाषेत पुढील वर्ण नाहीत असे सूत्रकार सांगतो :

ऋ, ऌ, ऐ, औ, श्, ष्, विसर्ग आणि—ज्ञ, अरे बोलीत देखील हे वर्ण आढळत नाहीत.

(२) **ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया :** ध्वनिपरिवर्तनाचा विचार तद्भव सूत्रांत आलेला असून ही सूत्रे ९ आहेत. सूत्रांचे विषय असे :

१. आदेश; २. लोप; ३. विकर्ष (श्री-सिरी);
४. परिवृत्ती (वर्णाची अदलाबदल); ५. द्वित्त;
६. अनुस्वार (चंद्राकृती अनुस्वारांचे विवेचन विशेषेकरून आले आहे).
७. ऱ्हस्व; ८. दीर्घ; ९. आगम.

या सूत्रात नमूद केलेल्या ध्वनिपरिवर्तनाच्या दिशा अरे बोलीत रूढ असलेल्या ध्वनिपरिवर्तनाच्या स्वभावधर्माशी संवादी आहेत.

(३) **व्यंजनांचे आदेश :** व्यंजनांच्या आदेशांत पुढील आदेशांचा समावेश होतो :

१. ण्, न् परस्परांचे आदेश होतात. (अरे बोलीत फक्त न् व रूढ असल्याने या आदेशाचा प्रश्न उद्भवत नाही)

२. ड्-ल व ल्-र हे परस्परांचे आदेश होतात. हा नियम अरे बोलीस लागू पडतो.

३. म् चा व् व व् चा म् होतो [अरे बोलीत या आदेशाची उदाहरणे तुरळक सापडतात. उदा. परमाँ (परवा), पुरँभी (पुरवी), गाँमु (गांव)].

४. प्रारंभीच्या द् चे ड् त रूपांतर [अरे बोलीत तालव्य आणि मूर्धन्य यांची परिवृत्ती होत असल्याचे विवरण पूर्वी आले आहेच : घेंटलं, (घेतलं), टुंटा (थोटा).].

५. त वर्ग आणि ट वर्ग यांची परिवृत्ती.

६. विकर्ष (सिरी, श्री), परियेंतु (पर्यंत) भर्तारू (भर्तृ)

समग्र व्याकरण उपलब्ध नसले तरी उपलब्ध भागावरून ते अरे बोलीचेच असावे या विषयी शंका उरत नाही. तेरावे शतक हा या व्याकरणाचा काळ आहे. या काळात संस्कृत पंडितांनी व्याकरण लिहावे एवढी प्रतिष्ठा या भागात मराठीस लाभली होती. हे एक अभिमानास्पद सत्य आहे.

अनुक्रमणिका

## [आ] ध्वनि-व्यवस्था

### प्राकृत-अरे बोली-प्राचीन मराठी

प्राकृत-अरे बोली आणि प्राचीन मराठी या भाषांतील ध्वनिव्यवस्थेचा अधिक सूक्ष्म व तुलनात्मक अभ्यास करता यावा या हेतूने ही शब्दावली देण्यात येत आहे. अधोरेखित शब्द प्राकृत भाषेतील (अपभ्रंशासह) असून प्राचीन मराठी वाङ्मयातील (यादवकाळ) त्याच शब्दाचे रूप चौकटी कौंसात दिले आहे. मध्यभागी असलेला शब्द अरे बोलीतला. शब्दसंग्रहात हे शब्द अकारविल्हेने आले आहेत. ग्रंथसंदर्भ त्या ठिकाणी आढळतील.

| | | |
|---|---|---|
| **अइलाडु** | अइलाडु | [एलाड] |
| **अइसद्य** | अइसं | [ऐसे] |
| **अडवी** | अडवी | [अडवी] |
| **अच्छेरू** } | अचेरू<br>अच्छेरू | [आश्चर्य] |
| **अमुंचं** | अमुंचं | [आमचे] |
| **अम्मणु** | अम्मनु | [अंमळ] |
| **अंसू** | अँसू | [अश्रू/आसू] |
| **अट्ठ** | अट्टु | [आठ] |
| **इत्थ** | इत्तं | [येथे, इथे] |
| **उग्घाड** | उग्गडि | [उघड] |
| **उच्छऊ** | उसक/<br>उचवु | [उच्छव] |
| **उज्झलु** | उज्झलु | [उजळ] |
| **उट्ठन्त** | उट्टत | [उठतो] |
| **उत्ताणअ** | उत्तानं | [उताणा] |
| **कइस** | कइसं/कस्सं | [कैसे] |
| **केत्तिअ** | केत्ति | [किती] |
| **केवडु** | केवडु | [केव्हडे] |
| **खुज्ज़ं** | खुज्ज़ं | [खुजा] |
| **खोल्लं** | खोल्लं | [खोल] |
| **गामु** | गाँमु | [गाव, ग्राम] |
| **घड** | घड | [घट, घडा] |
| **चक्खई** | चक्खतं | [चाखतो] |
| **चक्खुड्डणं** | चक्खटु | [चोखट] |
| **चिक्खलो** | चिक्कोलु | [चिखल] |

| | | |
|---|---|---|
| **चोंभल** | चिंबोली | [चुंबळ] |
| **छिंक** | छिंकु | [शिक] |
| **जइसो** | जइसं | [जैसे] |
| **जमाय** } | जामाँय<br>जमाँय | [जांवई] |
| **जाडी** | जाडी | [झाडी] |
| **जुत्तं** | जुत्तं | [जुंपले] |
| **जुण्णं** | जुन्नं | [जुनें] |
| **जेवडु** | जेवडु | [जेव्हडें] |
| **जोण्णालिआ** | जोन्नले | [जोन्हळे/<br>जोंधळे] |
| **टुंटो** | टुंटा | [थोटा] |
| **टेण्टु** | टेंटु | [देंठ] |
| **ढेंकुणो** | ढेंकुनु | [ढेंकूण] |
| **तडमडी** | तडमडी | [तळमळी] |
| **तम्बं** | तंबं | [तांबे] |
| **तम्बोलु** | तंबोलु | [तांबूल] |
| **तल्लं** | तल्लं | [तळें] |
| **तिण्णि** | तीनी | [तीन] |
| **तेत्थु** | तेत्तं | [तेथें/तिथे] |
| **दइउ** | दइउ | [दैव] |
| **दलिद्द** | दलिद्दर | [दलिद्र] |
| **दुद्ध** | दुद्दं | [दुध] |
| **देंटु** | देंटु | [देंठ] |
| **दोग्गं** | दोग्गं | [दोघे] |
| **दोण्णि** | दोनी | [दोन] |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| **पंगरुण** | पंगरुनु | [पांघरुण] |
| **पल्ली** | पल्ली | |
| **पाडिव्व** | पाडा | [पाडा] |
| **बइल्लं** | बईलु | [बैल] |
| **बइसइ** | बइसु | [बैस] |
| **भल्ल** | भल्लं | [भला] |
| **भण्डणं** | भंडनु | [भांडण] |
| **भोण्डी** | भोंडी | [ ] |
| **मक्कडु** | मक्कडु | [माकड] |
| **मंजरू** | मंजारू | [मांजरा] |
| **मंट** | मंटु | [मठ्ठ] |
| **रंजनो** | रंजनु | [रांजण] |
| **रोल** | रोली<br>लोली } | [कोलाहल] |

| | | |
|---|---|---|
| **लिंकु** | लेंकु | [लेंक] |
| **लिंकरू** | लेंकरू | [लेंकरू] |
| **वइरी** | वइरी | [वैरी] |
| **वावार** | वावरू | [वावर] |
| **विट्टलु** | विट्टलु | [विटाळ] |
| **विज्जु** | वीज्जु | [वीज] |
| **ओरालि** | वोरालि | [आरोळी] |
| **सइन्नमु** | सइन्नमु | [सैन्य] |
| **सवत्ति** | सवत्ति | [सवत] |
| **सिंबाडि** | सिंबाडी | [शेंबूड] |
| **सिरि** | सिरी | [श्री] |
| **सुण्णं** | सुन्नं | [शून्य] |
| **हलिद्दा** | हलदाई | [हळद] |
| **हल्लइ** | हल्लिलं | [हलले] |
| **होइ** | होइ | [होइ] |

∫∫∫

६

## रूप-व्यवस्था

**१. भाषेचे ऐतिहासिक व्याकरण; २. अविकारी आणि विकारी शब्द; ३. विकारी शब्दाचे प्रकार आणि विकार; ४. अरे बोलीतील विभक्ति-व्यवस्था; ५. 'होउनि' या अव्ययाची साक्ष; ६. सर्वनाम नामांची विभक्ती; ७. विशेषण अविकारी; ८. आख्यात विभक्ती; ९. आख्यात-रूपांवर प्राकृताचा प्रभाव; १०. कालवाचक 'ऊन प्रत्ययांत धातुसाधिते; ११. भुतकालवाचक अन्य धातु-साधिते; १२. अकरणरूप व संयुक्त क्रियापद; १३. रूपसिद्धीत सुरक्षित राहिलेली पुरातन परंपरा; १४ निष्कर्ष.**

### १. भाषेचे ऐतिहासिक व्याकरण

अरे बोलीच्या स्वरूप विशेषांचा मागोवा घेताना आतापर्यंत या बोलीतील शब्दसंग्रहाचे विश्लेषण आणि ध्वनिव्यवस्था यांचा विचार झाला. वस्तुतः वर्णांचा विचार झाल्यानंतर शब्दांचा विचार व्हावयास पाहिजे. तथापि, या बोलीची जातकुळी निर्धारित करण्याच्या दृष्टीने शब्दसंग्रहाचे विश्लेषण प्रथम करावे लागले. या विश्लेषणातून एक सत्य निदर्शनास आले. या बोलीने पूर्ववर्ती भाषांचा विशेषतः अपभ्रंश भाषेत रूढ असलेला बराचसा शब्दसंग्रह अविकृत स्वरूपात कायम ठेवला आहे. शतके लोटली तरी शब्दांच्या रूपात बदल झाला नाही. या निष्कार्षाने अरे बोलीची वर्णव्यवस्था शोधण्यास दिशा मिळाली. अरे बोलीच्या वर्णव्यवस्थेचे मूळ वर्तमान प्रमाण मराठीत अथवा यादवकालीन मराठी भाषेत शोधण्याचा प्रयत्न न करता प्राकृत-अपभ्रंशात या व्यवस्थेचे मूळ असण्याची संभावना शब्दसंग्रहाच्या विश्लेषणाने सूचित केली. तदनुसार अरे बोलीच्या ध्वनिव्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासातून एक आश्चर्यकारक शोध लागला. तो म्हणजे अरे बोलीची ध्वनिव्यवस्था संपूर्णपणे प्राकृतांच्या वर्णव्यवस्थेवर आधारलेली आहे. इतकेच नव्हे तर यादवकालीन ग्रांथिक मराठी भाषेत जी वर्णव्यवस्था आढळते त्या मानाने अरे बोलीची ध्वनिव्यवस्था पुरातन अवस्थेची निदर्शक ठरते.

वर्ण हे शब्दाचे शरीर असले तरी अर्थ हा त्याचा आत्मा असतो. भाषाव्यवहार शेवटी शब्दांच्या माध्यमातून होणारा विचारांचा व भावभावनांचा आविष्कार असतो. शब्दांना आकार देणाऱ्या ध्वनींचे नियमन करणारे आंतरिक सूत्र असते त्याचप्रमाणे भाषाव्यवहार देखील विशिष्ट नियमांनी निबद्ध झालेला असतो. भाषेचे स्वरूप समजून घेणे म्हणजे हे नियमन समजून घेणे होय. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, "भाषा म्हटली की तिचे खालील अवयव सर्वमान्य असतात. (१) उच्चार, (२) उच्चाराच्या खुणा, (३) शब्द, (४) वाक्य, (५) आगम, आदेश, प्रत्यय आदी (६) स्वर व आघात. हे सहा अवयव मातृभाषेतून अपत्यभाषेत कोणत्या रूपांतरांनी उतरले व अपत्यभाषेच्या जन्मापासून आद्यतन हयातीपर्यंत या रूपांतरात कोणकोणते फेरफार झाले या बाबींची नियमबद्ध हकीकत सांगणे म्हणजे भाषेचा इतिहास लिहिणे." [राजवाडे लेखसंग्रह पृ. १०१.]

यालाच आजच्या परिभाषेत भाषेचे ऐतिहासिक व्याकरण म्हणतात. या घटकांच्या आधाराने भाषेचे स्वरूप समजून घेता येते. भाषेच्या उपरोक्त घटकांतूनच भाषेचे व्याकरण आकाराला येते. इतिहासाचार्य राजवाडे यांची व्याकरणविषयक कल्पना मात्र बरीच व्यापक असून आजच्या भाषाविज्ञानात रूढ असलेल्या संकल्पनांशी संवादी अशी आहे. ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेच्या व्याकरणाच्या प्रारंभीच त्यांनी व्याकरणाची व्याख्या दिली आहे :

> "विवक्षित लोक विवक्षित भाषा विवक्षित स्थळी व विवक्षित काळी कोणत्या पद्धतीने बोलतात व (लिहिणे माहित असल्यास) लिहितात, हे ज्या नियम-सरणीने, म्हणजे शास्त्राने स्पष्ट केलेले असते त्यास त्या भाषेचे तत्कालीन, तत्स्थलीन व तल्लोकीय **व्याकरण** म्हणतात. या वाक्यात व्याकरण या शब्दाला स्थळ, काळ व लोक या उपाधींनी मुद्दाम विशिष्ट केले आहे. कां की या तीन उपाधींचा स्पर्श जिला नाही अशी भाषा मागे झाली नाही व पुढे होणार नाही" [राजवाडे (सं) ज्ञानेश्वरी, प्रस्तावना, पृ. १].

भाषा एकच असली तरी स्थल, काल आणि लोक म्हणजे समाज यांच्या भेदाने भाषेचे व्याकरण भिन्न होऊ शकते असा राजवाड्यांचा अभिप्राय आहे. म्हणूनच पोटभाषेसंबंधी लिहितात :

> "कोणत्याही भाषेचे प्रांतपरत्वे जे भेद होतात त्यांना प्रांतिक पोटभेद अथवा पोटभाषा म्हणतात. ह्या प्रांतिक पोटभाषा त्या त्या प्रांतातील ब्राह्मणादि सर्व जाती बोलतात. **शुद्धाशुद्ध आणि भ्रष्टाभ्रष्ट ही विशेषणे या प्रांतिक पोटभाषांना लावता येत नाहीत कारण, नमुनेवजा जी मुख्य भाषा तिच्या इतकीच थोर परंपरा या प्रांतिक पोटभाषांची बहुतेक असते.** इतकेच की या प्रांतिक भाषांना नमुनेवजा मुख्य भाषेचे सर्व राष्ट्रमान्यत्व नसते"[तत्रैव, पृ. २]. [जाड ठसा लेखकाचा]

पोटभाषा असो वा बोली प्रमाण भाषेइतक्या व्यापक क्षेत्रात रूढ नसली तरी ती भ्रष्ट वा अशुद्ध नसते, तिलाही प्रमाण भाषेप्रमाणेच परंपरा असते हे राजवाड्यांचे मत लक्षात ठेवण्यासारखे आहे. अरे बोलीच्या स्वरुपासंबंधी आतापर्यंत जे विवेचन झाले ते राजवाड्यांनी वर उल्लेखिलेल्या सिद्धांतास किती पोषक आहे याची ही कल्पना या विवेचनातून यावी. राजवाड्यांनी उल्लेखिलेल्या भावेच्या सहा घटकांपैकी दोहोंचा विचार अगोदरच्या अध्यायांतून झालेला आहे. शब्द आणि ध्वनिव्यवस्था यांचा अभ्यास करताना यादवकालीन मराठीपेक्षा अधिक पुरातन परंपरा या बोलीस लाभल्या होत्या हे सिद्ध झाले आहेच. या बोलीच्या ध्वनिव्यवस्थेने निर्धारित केलेला भाषाव्यवहार कोणत्या पद्धतीने चालतो याचे विवेचन या पुढे करावयाचे आहे, ऐतिहासिक परंपरेच्या प्रकाशात.

### २. अविकारी आणि विकारी शब्द

वाक्य हा भाषाव्यवहाराचा किमान घटक असतो. वाक्य घडते ते शब्दांच्या अर्थपूर्ण संघटनेतून. काही शब्द कोणताही विकार न घडता वाक्यात जसेच्या तसे योजता येतात. काही शब्दांना मात्र वाक्यात स्थान मिळण्यापूर्वी काही विकार घडतात. या विकारानंतरच तो शब्द वाक्यातील अन्य शब्दांच्या पंक्तीस बसण्याच्या

अनुक्रमणिका

योग्यतेचा ठरतो. विकारयुक्त अशा शब्दांना पद म्हणतात. नामाचे पद होण्यापूर्वी त्याला लिंग, वचन आणि विभक्ती यांचे विकार जडतात. तर क्रियावाचक शब्दांचे क्रियापद होण्यापूर्वी त्या शब्दाला लिंग, वचन, पुरुष आणि आख्यात यांचे प्रत्यय लागतात या अंगभूत वैशिष्ट्यावरून शब्दांचे स्थूल मानाने दोन वर्ग होतात : अविकारी आणि विकारी. पहिल्या वर्गात क्रियाविशेषणादी अव्ययांचा समावेश होतो. नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियावाचक शब्द या शब्दाच्या चार जाती "विकारी" या वर्गात मोडतात. या वर्गीकरणात काही शब्दांच्या जातीविषयी वाद असला तरी या वादात न शिरता, काही शब्द वाक्यात जसेच्या तसे योजले जातात व काही शब्दांची वाक्यात योजना होण्यापूर्वी रूपसिद्धी होते एवढाच भेद तूर्त लक्षात ठेवलेला बरा.

क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी आणि केवलप्रयोगी अव्यय यांची गणना अविकारी शब्दांत होते. केवलप्रयोगी अव्ययांपैकी 'अब्बो!', 'अम्मो!' हे या बोलीत रूढ असलेले शब्द प्राकृत ग्रंथांत देखील आढळतात. मराठीत मात्र त्यांचा प्रयोग होत नाही. 'पापम् (गरीब बिचारा! अरेरे! या अर्थी) हे अव्यय मात्र तेलुगू भाषेतून आलेले आहे. तेलुगू भाषेत रूढ असलेली इतर काही अव्यये देखील अरे बोलींत प्रचलित आहेत : कानी (परंतु) कुडा (—सुद्धां), तर्वाता (नंतर), मळ्ळी (पुन्हा) इ. हे शब्द आपल्या भाषेतले नाहीत याचे भानही बोलणारांस (आणि ऐकणारास देखील) नसते इतक्या सहजतेने या अव्ययांचा वापर या बोलीत होत असतो. इतर काही अव्यये अशी :

अन्की (आणखी, अद्याप या अर्थाने), की खाले, जँव (जोवर), त (तर) पुन (पुन्हा), पुनू (पण), पुन्ना (पुन्हा), भीतरू, महागं (मागे) सँबूरू (समोर)

रूढ असलेली काही तेलुगू क्रिया विशेषणे : निदानं गाऱ्हाई (शांत रहा), त्वरगा (लवकर) समाधानं गा (आनंदाने)

**३. विकारी शब्दांचे प्रकार आणि विकार**

नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियावाचक शब्द या शब्दांच्या चार जाती विकारक्षम गणलेल्या आहेत. यांपैकी विशेषण हे मर्यादित अर्थाने विकारी आहे. विशेषणाचा उपयोग नामासारखा होतो तेव्हा नामाचे लिंग वचन आणि विभक्ती हे तिन्ही विकार विशेषणास होतात. परंतु केवळ विशेषण या नात्यानेच ते वाक्यात उपयोजिले जाते तेव्हा आकारांत विशेषणांसच विकार घडतात, केवळ लिंगभेदाचे विभक्तीचे प्रत्यय आकारांत विशेषणास लागत नाहीत. त्या ऐवजी केवळ सामान्यरूप होते. आकारांतेर विशेषणांत मात्र कोणताच विकार घडत नाही. थोडक्यात आकारांतेर विशेषणे अविकारीच असतात प्रमाण भाषेतला हा नियम या बोलीतही आढळतो.

नाम, सर्वनाम आणि क्रियावाचक शब्द यांना लिंग, वचन हे समान विकार असतात. नाम-सर्वनाम यांना पदसिद्धीसाठी विभक्तीचे प्रत्यय लागतात तर क्रियावाचक शब्दांना आख्यात प्रत्यय.

अरे बोलीत या विकारांची व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे याचे विवेचन आता करावयाचे आहे.

(१) **लिंग विचार** : प्रमाण मराठी भाषेत पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग अशी तीन लिंगे असून नामांच्या रूपावरून अथवा नामाशी अन्वित असलेल्या क्रियापदावरून लिंगभेद सामान्यपणे लक्षात येतो. क्रियावाचक शब्दांचे वर्तमान व भूत या दोन काळांचे प्रत्यय अन्वित नामाचे लिंग निदर्शक असतात. प्रमाण मराठीत कर्तरि, कर्मणि या प्रयोगांत अनुक्रमे कर्ता व कर्म यांचे लिंगवचननिदर्शक विकार क्रियापदास घडतात. भावे प्रयोगात क्रियापद नेहमीच तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी असते. अरे बोलीत केवळ कर्तरि प्रयोगच आढळतो. त्यामुळे सर्व क्रियापदांवरून कर्त्याच्या लिंग-वचनांचा बोध होतो.

या बोलीत तत्त्वतः पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग अशी तीन लिंगे आहेत. परंतु लिंगभेदाप्रमाणे क्रियापदांत होणाऱ्या बदलाचा विचार केला असताना असे दिसून येते की, क्रियापदांची स्त्रीलिंगी रूपे जेवढी कटाक्षाने योजण्यात येतात तेवढा विवेक व तारतम्य कर्ता पुल्लिंगी वा नपुंसकलिंगी असताना क्रियापदाच्या बाबतीत दाखविण्यात येत नाही. नपुंसकलिंगी व पुल्लिंगी रूपांची अदलाबदल मोठ्या प्रमाणात होते.

काही उदाहरणांवरून याची कल्पना येईल : (१) रामु कामु कराला. (२) सीता कामु करली (३) कुत्रं आन खातं. या तीन वाक्यात क्रियापद कर्त्याच्या लिंगभेदाप्रमाणे—अनुक्रमे पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंसकलिगी—होते. परंतु बोलण्याच्या ओघात (१) तिनं आली (२) कुत्रं आलं (३) तेनं आलं असे वाक्यप्रयोग नेहमी होतात. शेवटच्या वाक्यात कर्ता पुल्लिंगी असूनही क्रियापद मात्र नपुंसकलिंगी आहे. असाच प्रकार षष्ठ्यंत नामांच्या अनुबंधी शब्दांच्या बाबतीत घडतो. रामाचा घोडा, रामाची गाडी, रामाचं घर हे शब्दप्रयोग अरे बोलीत सरसहा रामाचं गोडु, रामाचं बंडी, रामाचे घरू अशी नपुंसंकलिंगी रूपे आढळतील. तो आणि हा या सर्वनामाच्या बाबतीत असेच घडते. ते (तो) ये (हा) ही रूपे ते व हे या नपुंसकलिंगी सर्वनामांसाठीही योजली जातात. त्यामुळे क्रियापदाच्या रूपांवरून कर्त्यांच्या पुल्लिंग व नपुंसकलिंग यांचा बोध अचूक होईलच याची शाश्वती देता येत नाही.

वर्तमान कालीन प्रमाण मराठी व प्राचीन मराठी वाङ्मय यांत लिंगभेदासंबंधी अशी धरसोड आढळत नाही. तिरस्कार दर्शविण्यासाठी पुल्लिंगी शब्द नपुंसकलिंगी योजल्यामुळे क्रियापद नपुंसकलिंगी होते हा भाग वेगळा. 'म्हातारा आला' या ऐवजी 'थेरडं आलं' असा प्रयोग होतो. 'कुत्रा आला' आणि 'कुत्रं आलं' या दोन वाक्यांत हेच तारतम्य आहे. पण नामाचे नपुंसकलिंगी रूप झाल्यावर क्रियापद नपुंसकलिंगी योजणे हा भाग वेगळा. परंतु नामाचे पुल्लिंगी रूप कायम ठेवूनही क्रियापद नपुंसकलिंगी योजण्याची प्रवृत्ती या बोलीत आहे. सरहद्दीवरच्या मराठी बोलीत देखील लिंगभेदाची सरमिसळ आढळते. याचे कारण संपर्कात येणाऱ्या अन्य भाषेचा/भाषांचा प्रवाह एखादे नाम मराठीत पुल्लिंगी असूनही कानडी / तेलुगू भाषेत ते भिन्न लिंगी असू शकते अशा वेळी मराठी बोलीत पुल्लिंगी-स्त्रीलिंगी यासंबंधी संशय उत्पन्न होऊन चुकीचे प्रयोग होण्याची शक्यता असते. कित्येकदा वक्त्याच्या मनातच संशय उभा राहिल्याने विसंगत प्रयोग होतात.

अरे बोलीत लिंगभेदाच्या संबंधात आढळणारी धरसोड वक्त्याच्या निष्काळजीपणातून निर्माण झाली अथवा तेलुगू भावेच्या संस्काराचा तो परिणाम आहे, किंवा या बोलीच्या स्वभावधर्माचा तो एक भाग आहे याचा शोध घेतला पाहिजे.

अनुक्रमणिका

या बोलीत आढळणारी लिंगभेदाची सरमिसळ वक्त्याच्या निष्काळजीपणातून निर्माण झाली असती तर तिचे स्वरूप सार्वत्रिक राहिले नसते. नमुन्यासाठी दिलेल्या वाक्यांत धरसोड टाळलेली असली तरी निरनिराळ्या मुलाखतीत पुल्लिंगी नामासाठी नपुंसकलिंगी क्रियापदाचा उपयोग सार्वत्रिक आढळला. त्या अर्थी या बोलीचा तो स्थायी विशेष आहे असे मानावे लागते. हा विशेष या बोलीत आला कसा? तेलुगू भाषेत लिंगे दोनच : पुल्लिंग आणि स्त्रीलिंग. पुल्लिंगेतर नामांसाठी क्रियापद स्त्रिलिंगी योजले जाते. या बोलीत तिन्ही लिंगे असून पुल्लिंगी व नपुंसकलिंगी क्रियापदाची सरमिसळ हा तेलुगू भावेचा प्रभाव आहे असे म्हणता येणार नाही.

प्राकृत-अपभ्रंशात या विशेषाचे मूळ असेल काय? ध्वनिव्यवस्थेच्या बाबतीत या बोलीने प्राकृत-अपभ्रंशाचे अनुसरण केले आहेच. म्हणूनच या विशेषास या भाषांच्या व्याकरणात आधार सापडतो काय? व्याकरणकारांनी यासंबंधी निःसंदिग्ध विधाने केली नाहीत. अपभ्रंश भाषेच्या विद्वानांनी मात्र यासंबंधात आपले निष्कर्ष नोंदविले आहेत. ‘प्राकृताच्या काळापासून लिंगभेदाच्या बाबतीत अनिश्चिततेस प्रारंभ झाला होता’ असे एक मत आहे. [परममित्र शास्त्री, सूत्रशैलि और अपभ्रंश व्याकरण, पृ, १३८] इतकेच नव्हे तर ‘नपुंसकलिंगाचे रूप पुल्लिंगाप्रमाणे होत गेले’ असाही या विद्वानाचा अभिप्राय आहे. [तत्रैव, पृ. १५३.] ‘एकंदरीत अपभ्रंशात लिंगभेदच नष्ट होण्याच्या मार्गावर होते’ असे काही विद्वानांचे मत आहे. [नामवर सिंह, हिंदी के विकास में अपभ्रंश का योग, पृ. ६४—डॉ उपाध्ये (सं), ‘लीलावई कहा’, प्रस्तावना, पृ. ८० ते ८६.] अपभ्रंशापासून उद्‌भवलेल्या सिद्धांच्या वाणीत नपुंसकलिंगाचा अभाव असल्याचाही विद्वानांचा अभिप्राय आहे. [मंगल बिहारी शरण सिन्हा सिद्धोंकी संघाभाषा, पृ-१८४]

नामाच्या रूपावरून व क्रियापदांच्या अन्वयाच्या स्वरूपावरून लिंगभेदाचा निर्णय करण्याची प्रवृत्ती प्राकृतांच्या काळातच लोप पावत असलेली दिसून येते. लिंगभेद संकीर्ण होत होत त्याचे अस्तित्व लोप पावण्याच्या मार्गावर होते असे विद्वानांच्या अभिप्रायांवरून निदर्शनास येते. अरे बोलीने या संकीर्णतेची पुढची अवस्था गाठली होती असा निष्कर्ष निघतो.

(२) **वचन विचार :** भाषा व्यवहारात आलेला एकंदरीत अनुभव जमेस धरता वचन-भेदाच्या बाबतीत विशेष जागरूकता असते असे आढळले नाही. विशेषतः नामांच्या संदर्भात. क्रियापदांच्या बाबतीत मात्र अनेकवचनी रूपे अगदी नियमितपणे योजली जातात. एकवचनी नामांचा वापरच प्रामुख्याने होतो. बोलणाराच्या संदर्भावरून तर कधी क्रियापदाच्या रूपावरून योजलेले नाम एकवचनी आहे की अनेकवचनी याचा बोध होतो. कित्येकदा पुल्लिंगी/स्त्रीलिंगी नामाचे नपुंसकलिंग योजून अनेकवचन दर्शविले जाते.

**मानुसु** (पु.ए.व.); मानसं [रूप नपुंसक लिंगी, अभिप्रेत अर्थ अ.व.चा].
**बईलु** (पु.ए.व.); बईलं [रूप नपुंसक लिंगी, अभिप्रेत अर्थ अ.व.चा].
**भकरी** (स्त्री.ए.व.); भकरं [रूप नपुंसक लिंगी, अभिप्रेत अर्थ अ.व.चा].
**पोली** (स्त्री.ए.व.); पोलं [रूप नपुंसक लिंगी, अभिप्रेत अर्थ अ.व.चा].
**सिदोरे** (न.पु.ए.व); सिदोरं [रूप नपुंसक लिंगी, अभिप्रेत अर्थ अ.व.चा].

कित्येकदा क्रियापदाच्या रूपावरूनच एकवचन वा अनेकवचन यांचा बोध होतो.

अनुक्रमणिका

**उदाहरणार्थ :** गाय यीली (ए. व.)
गाइ यीह्याती (अनेकवचन).

एवंच नामाच्या केवळ रूपावरून वचन भेद लक्षात येत नाही. क्रियापदाच्या रूपांवरूनच नामाच्या वचनाचा निर्णय करावा लागतो.

(३) **विभक्ति व्यवस्था :** संस्कृत भाषेत विभक्ति व्यवस्था अगदी स्थिर अशा पायावर उभी आहे. प्राकृतभाषांचे तसे नाही. प्राकृत भाषांच्या उद्‌भवाच्या प्रारंभकाळात प्रथम चतुर्थीचा लोप झाला. चतुर्थ्याः षष्ठी' (हेम. ८-३-१३१) या सूत्रानुसार संस्कृत भाषेत ज्या ज्या स्थळी चतुर्थी विभक्ती योजली जाते त्या त्या ठिकाणी प्राकृतात षष्ठीचा प्रयोग होतो. हा बदल एवढ्यावरच थांबला नाही. चतुर्थीच्या जागी षष्ठी आली त्याप्रमाणे द्वितीये साठीही षष्ठीचा उपयोग होऊ लागला [मराठी भाषेतील द्वितीया/चतुर्थी विभक्तीचा 'स' हा प्रत्यय संस्कृतातील षष्ठी विभक्तीच्या 'स्य' या प्रत्ययापासून आला आहे हे या ठिकाणी लक्षात ठेवावे.]. कधी द्वितीया ही तृतीया व सप्तमीसाठी योजली जाऊ लागली तर पंचमी आणि तृतीया परस्परांसाठी योजण्यात येऊ लागल्या. [हेमचंद्र ८-३-१३२ ते १३७.] चण्ड आणि वररूचि यांनी प्राकृतांत केवळ चतुर्थीचा अभाव असल्याची नोंद केली आहे. परंतु हेमचंद्राच्या काळापर्यंत प्राकृताच्या आणि अपभ्रंशाच्याही विभक्ति व्यवस्थेत बरीच शिथिलता आल्याचे आढळते. 'लीलावई कहा' या अपभ्रंश भाषेतील ग्रंथात (इ. स. ८०० सुमारे) विभक्ति व्यवस्थेसंबंधाने पुढील विशेष आढळले :

(१) प्रत्ययविरहित नाम-सर्वनाम यांचा वाक्यात उपयोग.
(२) प्रथमा व द्वितीया या विभक्तीच्या रूपांत एकविधता. (अप्रत्ययत्व)
(३) तृतीयेच्या ऐवजी पंचमी वा पंचमीच्या अर्थाने तृतीयेचा उपयोग.
(४) सप्तमीनिदर्शक तृतीयेच्या प्रत्ययांचा उपयोग.

अपभ्रंश आणि वर्तमान भारतीय भाषा यांच्या संधिकाळात रूढ असलेल्या सिद्धांच्या भाषेत तर प्रत्ययविरहित नामांचा उपयोग वाढत्या प्रमाणात होऊ लागला. या भाषेत प्रत्ययाच्या दृष्टीने चारच विभक्ती आढळतात :

(१) द्वितीया/चतुर्थी (२) तृतीया/पंचमी (३) षष्ठी आणि (४) सप्तमी.

विभक्ती व्यवस्था संस्कृत भाषेत कितीही स्थिर असली तरी प्राकृत-अपभ्रंशांनी संस्कृत भाषेची समग्र ध्वनिव्यवस्था जशी पुढे चालविली नाही त्याचप्रमाणे संस्कृतातील विभक्ति व्यवस्थेचाही समग्रपणे स्वीकार केला नाही. प्रत्ययांचा अभाव, एकापेक्षा अधिक विभक्तींसाठी समान प्रत्यय आणि एकाच प्रत्ययास भिन्न विभक्त्यर्थ सुचविण्याची क्षमता यांमुळे प्राकृत-अपभ्रंशाची विभक्ति व्यवस्था सर्व परीने 'स्वतंत्र' राहिली. महाराष्ट्री अपभ्रंशापासून उद्‌भवलेल्या मराठीनेही प्राकृतांचाच वारसा या बाबतीत चालविला. यादवकालीन ग्रांथिक मराठीने मात्र संस्कृत भाषेची ध्वनिव्यवस्था दत्तक घेताना विभक्तिव्यवस्थेतही संस्कृताचा वारसा चालविण्याचा प्रयत्न केला. आठ विभक्तींना भाषाव्यवहारात स्थान देताना या विभक्तींचे बरेच प्रत्यय यादवकालीन मराठीने अपभ्रंश भाषेतील प्रत्ययापासून उचलले. प्रत्ययविरहित नामांचा वाक्यात प्रयोग करण्याची प्राकृताची परंपरा प्रथमा आणि द्वितीया या दोन विभक्तींच्याच बाबतीत मर्यादित राहिली असे दृश्य

अनुक्रमणिका

दिसत असले तरी भिन्न विभक्तिप्रत्ययांच्या बाबतीत एकविधता यादवकालीन मराठीत आढळते. शब्दयोगी अव्ययांची योजना करून या एकविधतेतून मार्ग काढण्याचा प्रयत्न यादवमराठीत स्पष्टपणे दिसून येतो. विभक्ति प्रत्यय लागण्यापूर्वी नामाचे सामान्य रूप करण्याची प्रवृत्ती प्रत्ययांच्या वाढत्या एकविधतेचा परिपाक आहे असे म्हणता येईल.

(४) **सामान्यरूप :** विभक्ति प्रत्यय वा विभक्ति निदर्शक अव्यय नामांस लागण्यापूर्वी नामाचे सामान्यरूप होणे हा संस्कृत व प्राकृत भाषांत नसलेला विशेष मराठी भाषेत आढळतो. सामान्य रूपांच्या उपपत्तीसंबधाने विद्वानांत मतभेद आहेत. ज्ञानेश्वरकालीन विभक्तीवरून पुढच्या काळात सामान्यरूप रूढ झाले असे राजवाड्यांचे मत आहे ['ज्ञानेश्वरी मराठीतील विभक्ति प्रत्ययावरून वर्तमान मराठीतील सामान्यरूप निपजले आहे''— ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, पृ. १९१.]. ज्ञानेश्वरकालीन मराठीत सामान्यरूप होत नसे असा निर्वाळाही त्यांनी दिला आहे [तत्रैव, पृ. १४६]. डॉ. तुळपुळे मात्र यादवकाळात सामान्यरूप अस्तित्वात होते असे सांगतात. पण, सामान्यरूपांच्या बाबतीत यादवकाळात अनियमितपणा दिसून येतो असेही ते नमूद करतात [यादवकालीन मराठी, पृ. २४०-४३]. यादवोत्तर काळात विभक्ति प्रत्यय/अव्यय नामास लागण्यापूर्वी सामान्यरूप अपरिहार्यपणे होत असे. स्मृतिस्थळात केवळ ओकारांत नामे सामान्यरूप न होता प्रत्ययान्वित झालेली दिसतात (उदाहरणार्थ, गोल्होते (पृ. ३३), नाथोते (पृ. १४१) सुमारे चौदाव्या शतकातील पंचोपाख्यानात सामान्यरूपाच्या अभावाची अपवादात्मक उदाहरणे आढळतात. [राजसेवा वाचौनि (पृ. ५) घोडा सांगाते, घोडांसि मैत्रि घडे (पृ. १४१)].

## ४. अरे बोलीतील विभक्ति व्यवस्था

ज्ञानेश्वर काळी सामान्यरूप होत नसले तरी सामान्य रूपाची प्रक्रिया सुरू झालेली दिसते. तत्पूर्वीच्या व समकालीन बोलींत सामान्यरूपाचा अभाव अथवा अनियमितपणा असण्याची संभावना आहे. अरे बोलीच्या विभक्ति-व्यवस्थेचा विचार करताना सामान्य रूपाच्या बाबतीत असलेली अनियमितता लगेच नजरेत भरते. चतुर्थी विभक्तीचे 'ला' व 'सु' आणि क्वचित् षष्ठीचा 'च' हे प्रत्यय वगळले तर अन्य कोणत्याही विभक्तीचे प्रत्यय व शब्दयोगी अव्यय लागताना अरे बोलीत सामान्यरूप होत नाही. माताचं, सोनाचं, पदरनं जाडी (पदराने झाडते), पाय पडतुं (पाया पडतों) अशी विपुल उदाहरणे देता येतील. सामान्यरूपाचा वापर यादवकाळात अपवादात्मक व उत्तरकाळात नियमित होत असे हे लक्षात घेतल्यानंतर अरे बोलीत केवळ चतुर्थी विभक्तीशी संलग्न असलेले सामान्यरूप या बोलीचे पुरातनत्व निश्चितपणे प्रस्थापित करते.

## ५. 'होउनि' या अव्ययाची साक्ष

'होउनि' हे पंचमी विभक्तीसाठी येणारे अव्यय या बोलीचे प्राचीनत्व प्रस्थापित करणारा आणखी एक पुरावा विभक्ति व्यवस्थेच्या संदर्भात आढळतो. प्रत्ययावरून विभक्तीची संख्या निश्चित करावी असा सिद्धांत मांडून दामल्यांनी द्वितीया (अप्रत्यय व सप्रत्यय) वगळून सात विभक्ती मानल्या आहेत. त्यांनी अप्रत्यय द्वितीयेचा प्रथमेत व सप्रत्यय द्वितीयेचा चतुर्थीत समावेश केला आहे. अरे बोलीत वाक्यार्थाच्या संदर्भात या सातही विभक्ति आढळतात. प्रत्यय विरहित नाम कर्तृवाचक (प्रथमा), कर्मवाचक (प्रथमा/अप्रत्यय द्वितीया) आणि संबोधनसूचक असते. सप्तमी विभक्तीस प्रत्यय नाहीत या विभक्तीचे कार्य अपरिहार्यपणे शब्दयोगी

अव्यये करतात. षष्ठी विभक्तीचा ‘च’ प्रत्यय रूढ आहे. पण, अनेकवचनी नामांना हा प्रत्यय लागताना प्रथम तृतीयेचा निदर्शक ही प्रत्यय लागून च प्रत्यय लागतो. रामचं—लोकांहीचं; मानसाचं-मानसाहींचं, इ. तृतीया विभक्तीत अनेकवचनाचा हीं प्रत्यय पुरातन प्रत्ययाचा अवशेष आहे.

पंचमीच्या बाबतीत तर ही पुरातन परंपरा अधिक नजरेत भरते. ‘तुनु’ हा पंचमीचा प्रत्यय असला तरी होउनि या अव्ययाचा प्रयोग पंचमी विभक्ती दर्शविण्यासाठी प्रामुख्याने होत असते. वर्तमान मराठीतील ‘ऊन’ ‘हून’ या पंचमीच्या प्रत्ययाची व्युत्पत्ती प्राकृत प्रत्ययापासून साधण्याचा प्रयत्न विद्वानांनी केला आहे. ही व्युत्पत्ती मान्यता पावली नाही. डॉ. भांडारकरांनी मात्र ‘होउनि’ या अव्ययात या प्रत्ययांचे मूळ रूप असल्याचे प्रतिपादन केले आहे. राजवाडे यांना भांडारकरांचे मत मान्य नसले तरी ऐतिहासिक दृष्ट्या भांडारकरांचेच मत संयुक्तिक ठरते हे अरे बोलीतील होउनि या अव्ययाच्या पंचमीवाचक प्रयोगाने सिद्ध केले आहे.

या बोलीत होउनि, होउनु या अव्ययाचा उपयोग पंचमीवाचक होतो. ‘तुनु’ हाही प्रत्यय पंचमी विभक्तिवाचक असला तरी त्याचा वापर प्रमाणतः कमी आहे. यादवकाळात आणि तदुत्तरही या अव्ययाचा उपयोग पंचमी विभक्तीच्या प्रत्ययाऐवजी होत असे. सोळाव्या शतकानंतर मात्र हा उपयोग कमी झाला व पूर्वीपासून अस्तित्वात असलेला औनि हा प्रत्यय ऊनि या रूपात रूढ झाला. तेराव्या-चौदाव्या शतकातील वाङ्मयातच ‘होउनि’ पंचमीवाचक असल्याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे

(१) गुंडोचा माथा **होउनि** प्रकासु निगतु असे (ग्रो. प्र. च. ४).
(२) मी हाटवटीए **होउनि** आलां (गोप्रच २७).
(३) न्यायुभारथी वारानसी **होउनि** खेडासि आले, (गोप्रच २७९)
(४) पुरुषा **होऊनि** (पं. १४); (५) आफडे **होउनि** (पं. ५२); (६) मुखी **होउनि** (पं. १५८)

अशा रीतीने यादवकाळात आणि संभवतः पूर्वकाळातील बोलीतही रूढ असलेले होउनि/होउनु हे पंचमी विभक्तिदर्शक अव्यय वर्तमान मराठीत इतिहासजमा झाले तरी प्राचीन काळातल्या अनेक अवशेषांप्रमाणे हा विशेषदेखील अरे बोलीने जपून ठेवला आहे. हे या संदर्भात नमूद करण्यासारखे आहे.

या बोलीत विभक्त्यांत नामांचा प्रयोग सैलपणाने होत असला तरी आदर्श अवस्था लक्षात घेऊन विभक्ति प्रत्यय पुढीलप्रमाणे देता येतील :

| **विभक्ति** | **एक वचन** | **अनेक वचन** |
|---|---|---|
| **प्रथमा** | | |
| (कर्तृवाचक आणि कर्मवाचक) | प्रत्यय | नाहीत |
| **तृतीया** | नं | ँहीन, हीं |
| **चतुर्थी** | ला, सुं | ँहीला’ ँसु |
| **पंचमी** | तुनु [क्वचित् होऊनु या अव्ययाचा प्रयोग अधिक] | |
| **षष्ठी** | चं | ँहीचं, हींचं |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| **सप्तमी** | [प्रत्यय नाही. आँतु, भींतरीं, वरे आदी अव्ययांचा प्रयोग] | |
| **संबोधन** | प्र त्य य | ना ही. |

या प्रत्ययांच्या अनुरोधाने काही नामे सर्व विभक्तीत चालवून दाखविण्यात येत आहेत.

| **पुल्लिंगी नाम रामु :** | | | |
|---|---|---|---|
| | **प्रथमा** | रामु | रामु |
| | **तृतीया** | रामनं | रामाँहीनं, रामाहीं |
| | **चतुर्थी** | रामाला, रामाँसु | रामाँहीला, रामाँसु |
| | **पंचमी** | रामा होउनु | |
| | **षष्ठी** | रामचं(क्वचित् रामाचं) | रामाहींच/रामाइचं |
| | **सप्तमी** | रामाँतु | रामाँतु |
| | **संबोधन** | रामु | रामु |

| **स्त्रीलिंगी नाम नई (नदी)** | **ए.व** | **अ.व** |
|---|---|---|
| **प्रथमा** | नई | नई |
| **तृतीया** | नईनं | नईंहीनं, नईहीं |
| **चतुर्थी** | नईला, नईसु | नईंसु |
| **पंचमी** | नई होऊ नु | |
| **षष्ठी** | नईचं | नईहींचं |
| **सप्तमी** | नई भींतरी | नई भींतरी |
| **संबोधन** | नई | नई |

| **नपुंसकलिंगी नाम घरू** | | |
|---|---|---|
| **प्रथमा** | घरू | घरू |
| **तृतीया** | घरनं | घराँहीन, घरांहीं |
| **चतुर्थी** | घरला, धरासु | घराँसु |
| **पंचमी** | घराँतुनु/घर होउनु | घराँतुनु, घर होउनु |
| **षष्ठी** | घरचं/धराचं | घराँहींचं/घराइचं |
| **सप्तमी** | घरभींतरी | घरभींतरी |
| **संबोधन** | घर | घर |

पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी या दोन्ही लिंगी नामांची विभक्ति प्रत्यय/अव्यय युक्त रूपे वर दिली आहेत. प्रत्यय तिन्ही लिंगी समान आहेत. अनेक वचनांच्या रूपांत तृतीया, चतुर्थी व षष्ठी यां विभक्तीत प्रत्यय भिन्न आहेत. अन्य विभक्तीत उभयवचनी प्रत्यय सारखे आहेत. चतुर्थी आणि षष्ठी या दोन विभक्ती वगळल्या तर अन्य विभक्तींत प्रत्ययापूर्वी अथवा शब्दयोगी अव्यय लागताना सामान्यरूप होत नाही. आख्यात विभक्तीत कर्तृवाचक पुल्लिंगी व नपुंसकलिंगी नामांशी अन्वित अशा क्रियापदांची रूपे सारखीच म्हणजे नपुंसकलिंगी होत

अनुक्रमणिका

असल्याचे पूर्वी सांगितले आहे. तरी तत्त्वतः तिन्ही लिंगी नामे अस्तित्वात असल्याचे गृहीत धरून वर तीन नामे चालवून दाखविली आहेत.

**६. सर्वनामांची विभक्ती**

प्रमाण भाषेत नामविभक्तीच्या पोटात सर्वनामांचाही विचार येऊन जातो. या बोलीच्या बाबतीत सर्वनामांचा वेगळा विचार करणे आवश्यक ठरते.

अरे बोलींत पुढील सर्वनामे आहेत :

| | | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|---|
| **पुरुषवाचक** | : | मी, तू, ते (उभय लिंगी), ती. | आमी, तुमी, ते (तिन्ही लिंगी) |
| **दर्शक** | : | ई (ही) ये (हा/हें) | ये (तिन्ही लिंगी समान) |
| **संबंधी** | : | जे (तिन्ही लिंगी उभयवचनी समान) | |
| **प्रश्नार्थक** | : | कोनु, काई, काते (काय) | |
| **आत्मवाचक** | : | आपण आणि स्वतः ही आत्मवाचक सर्वनामे या बोलीत नाही. आत्मवाचकाचा अर्थ ''ते चं ते नं' या शब्दांनी व्यक्त होतो : उदा. माजं मीचु ये कामु कराला (मी स्वतः हे काम करतो), तिचं तिनं ये कामु केली (तिने स्वतः हे काम केले); तेच तेन इत्तं आलं (तो स्वतः इथे आला.) | |

काही सर्वनामांची विभक्त्यंत रूपे पुढील प्रमाणे होतात :

| | मी | | तू | |
|---|---|---|---|---|
| | **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
| **प्रथमा** | मियाँ [मी] | आमी | तू | तुमी |
| **तृतीया** | मियाँ | आमाँही | तुवाँ | तुमाँही |
| **चतुर्थी** | मले (क्वचित्) | आमाँसु | तुले (क्वचित्) | तुमाँसु |
| **पंचमी** | मियाँ होउनु | आमातुनु | तुवा होउनु | तुमातुनु |
| **षष्ठी** | मज्जं, महाजं | आमँचं | तुज्जं, तुहं | तुमँचं |
| **सप्तमी** | मजभींतरी | आमाभींतरी | तुजभींतरी | तुमाँतु |

| | तो (तो) | | ती | |
|---|---|---|---|---|
| **प्रथमा** | तेनं | तेनी, तेहींनं | तिनं | तेहीनं |
| **तृतीया** | तेनं | तेहीनं, तेनी | तिनं | तेहीनं |
| **चतुर्थी** | त्याँसु, त्याले | तेहाँसु, तेहीले | तीसु, तिले | तेहींले, तेहींसु |
| **पंचमी** | तेयाँतुनु | तेहाँतुनु | तीउन्नु, तेयातुनु | तेयाँतुनु |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **षष्ठी** | तेचं | तेहीचं/तेइचं | तिच्यं, तियेचं | तेहींचं/तेइचं |
| **सप्तमी** | तेयाँतु | तेयाँतु | तेयाँतु | तेयाँतु |

ते हे नपुंसकलिंगी सर्वनाम अस्तित्वात नाही असे म्हणावे लागेल. पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी सर्वनामाचे रूप ते सारखेच असल्याने विभक्तिरूपे सारखीच होतात असे गृहीत धरावे लागते.

वर दिलेल्या विभक्त्यंत रूपांवरून या बोलीतील सर्वनामांसंबंधी पुढील विशेष आढळतात :

१. पुरुष वाचक (आणि काही प्रमाणात दर्शकही) सर्वनामे सहसा मूळ रूपात योजली जात नाहीत. वाक्यार्थाच्या दृष्टीने प्रथमा अभिप्रेत असूनही सर्वनाम मात्र तृतीयांत असते. उदाहरणार्थ :

**मियाँ** कामु कराला (मी काम करतो)
**तिनं** शाराला गेली (ती शहरात गेली)
**तिनं** काम कराली (ती काम करते)
**इनं** अँता आली (ही आता आली)
**तेनं** घराँसु आलं (तो घरी आला)
**येनं** भावाचं लेंकु (हा भावाचा मुलगा)

२. प्रथम आणि द्वितीय पुरुषवाचक सर्वनामांची षष्ठीची अनेकवचनी रूपे अमँचं, तुमँचं अशी होतात. गोविंदप्रभुचरित्रात देखील अशी रूपे आली आहेत.

(अ) राउळ आपुला वाटा नेजवीति : आमुंचाचि जेवीताति (५-२).
(आ) राउळाचा प्रसादु : परि अन्न अमुचे (६-३).
(इ) राउळो घरीं होउनि आमुचे लेकरू आणुनि देवा कां (२८-१०).
(ई) आगा! आगा तुमंचें काइसें जागरण (३१-११).

या उदाहरणांवरून तुमंच, आमंचं ही रूपे यादवकाली कमी होत चालली होती तरी अपवादात्मक का असेनात रूढ होती. अरे बोलीने यादवपूर्वकाळातील काही लक्षणे राखली आहेत त्यात षष्ठ्यंत अनेकवचनाची ही रूपे समाविष्ट करता येतात.

३. ‘भींतरी’ हे सप्तमीवाचक अव्यय तेराव्या शतकात वैपुल्याने आढळते. पुढच्या काळात मात्र या अव्ययाचा उपयोग मागे पडलेला दिसतो.

### ७. विशेषण अविकारी

विशेषणांचा अंतर्भाव विकारी शब्दांत होत असल्याने विभक्तीच्या संदर्भात विशेषणांचाही विचार आवश्यक ठरतो. प्रमाण मराठीत विशेषणाचा उपयोग नामासारखा झाला तरच त्याला विभक्ति प्रत्यय लागतो. अर्थात् अशावेळी ते विशेषण रहात नसून नामच असते. आकारांतेर विशेषणे तर वाक्यात जशीच्या तशीच योजली जातात. आकारांत विशेषणांसही विभक्ति प्रत्यय न लागता त्याचे सामान्यरूप होते. प्रमाण मराठी प्रमाणेच या बोलीतही विभक्तीच्या संदर्भात विशेषणांचा विचार करण्याचे कारण नाही.

क्रमवाचक विशेषणांना लागणारा 'जो' हा प्रत्यय आज गुजराती भाषेत रूढ आहे. या बोलीत तो कसा आला हे एक गूढ आहे. एक ते दहा पर्यंतच्या आकड्यांना क्रमवाचक 'जो' प्रत्यय लागतो : एकजो, चारजो, धाजो इ. दहा नंतर तो का लागत नाही याचे कारण स्पष्ट आहे. या समाजात एक ते दहा व शंभर एवढेच आकडे रूढ आहेत. पुढचा हिशेब दहाच्या व शंभराच्या पटीने होतो. दो धा चारू (२४), तीन संबरा पाँचु (३०५) [याच्या उलट दखनी भाषा बोलणाऱ्या विजापूरच्या मुसलमान समाजाचा अनुभव आहे. हा समाज कानडी मुलखात नांदतो. मातृभाषा दखनी (वर्तमान उर्दूचे प्राचीन रूप). परंतु या समाजाच्या तोंडी आकडे आहेत मराठी. 'मेरेकु ना पंचावन बरस' (मला ना ५५ वे वर्ष!) छेत्तालीस साल में अकाल पड्या (१९४६ साली दुष्काळ पडला). 'एकोनीससे छपन म्याने मैसूर इलाका हुवा (१९५६ साली म्हैसूर प्रांत बनला).].

### ८. आख्यात विभक्ती

अरे बोलीत आढळणाऱ्या रूपसिद्धीचा शोध घेत असताना आतापर्यंत लिंग, वचन आणि विभक्ती यांचा मागोवा घेतला. क्रियावाचक शब्दांना घडणाऱ्या विकारांचा परामर्श घेतला म्हणजे शब्दविचारांशी संबंधित असलेला अभ्यास पूर्ण होऊ शकेल व वाक्य—विचाराकडे लक्ष पुरविता येईल. वाक्याला क्रियापदाच्या योगाने पूर्णता येत असल्याकारणाने क्रियापदांना होणाऱ्या विकारांचा संबंध पुष्कळ अंशाने वाक्यविचाराशी पोचतोच. तथापि, स्वतंत्रपणे प्रथम आख्यातविभक्तीचा विचार करून वाक्यविचाराकडे वळणे इष्ट ठरेल.

इतिहासाच्या प्रकाशात आख्यात विभक्तीकडे पाहिले असताना असे दिसून येते की, वैदिक, संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश या अवस्थांतून भाषेचा प्रवास चालू असताना आख्यातांची संख्या आणि विविधता उत्तरोत्तर कमी होत गेली आहे. मूळच्या दहा 'लकरां' पैकी ज्ञानेश्वर काळापर्यंत आठच 'लकार' उरले हे राजवाडे यांचे मत [ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, पृ. २०२.] डॉ. तुळपुळे यांना मान्य नाही. त्यांच्या मते यादवकाळात फक्त तीनच लकाराची रूपे शिल्लक राहिली [यादवकालीन मराठी पृ. ६१.]. यादवकाळात आख्यात विभक्तीचे किती प्रकार अस्तित्वात होते याविषयीच्या मतभेदांची चर्चा न करता मराठी भाषेच्या उद्‌भवाच्या काळापर्यंत आख्यात विभक्तीच्या क्षेत्रात झालेली उत्क्रांती प्रथम लक्षात घेतली पाहिजे. प्राकृत भाषांनी आपले वेगळे संसार थाटले तेव्हाच मूळ आख्यात प्रत्ययाऐवजी धातुसाधितांच्या योगाने कार्य भागविण्याची प्रथा रूढ झालेली होती. परस्मैपदी आणि आत्मनेपदी या धातूंच्या दोन वर्गांपैकी आत्मनेपद जवळपास लुप्त झाले होते [हेमचंद्र ८-३-१३८ ते १८२; प्राकृत कल्पतरू ३-१-२९ व ३०.]. वर्तमान कालवाचक धातुसाधितांचा उपयोग विविध कालवाचक अर्थ निघेल अशा स्वरूपात होऊ लागला [सुत्रशैली और अपभ्रंश व्याकरण. पृ. १८५.]. भूतकाळाचा अर्थ भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांच्या योगाने प्रकट करण्याची पद्धती संस्कृत भाषेतच रूढ झाली होती. या उत्क्रांतीचे पुढील परिणाम आख्यात व्यवस्थेवर झाले.

१. मूळ आख्यात विभक्तींची संख्या आणि विविधता कमी झाली.

२. मूळ आख्यात विभक्तीस केवळ वचन आणि पुरुष यांचेच विकार असत. धातुसाधितांच्या रूपांच्या योगाने आख्यातांचे कार्य साधले जाऊ लागल्यामुळे व धातुसाधितांना विशेषणांचे स्वरूप असल्याने क्रियापदांचे धातूरूपेशांच्या लिंगभेदाप्रमाणे परिवर्तन होऊ लागले. आख्यातात मूळ नसलेला लिंगविकार आख्यात विभक्तीच्या क्षेत्रात या मार्गाने आला. धातुरूपेशाच्या लिंगभेदाप्रमाणे बदलणारे आख्यात प्रत्यय आणि न बदलणारे असे द्विविध प्रवाह आख्यात विभक्तीच्या क्षेत्रात रूढ झाले.

३. आत्मनेपदाचा लोप प्राकृतात झाल्याने क्रियापद कर्तृगामी बनले. कर्तृवाच्यतेच्या ऐवजी कर्मवाच्यता क्रियापदाच्या द्वारे सूचित करण्यासाठी एक तर कर्मणिप्रत्ययांचा उपयोग करणे आवश्यक झाले अथवा वाक्याच्या रचनेत बदल करून कर्मणि प्रयोगास अनुकूल अशी वाक्यरचना करणे क्रमप्राप्त ठरले.

प्रमाण मराठीत आख्याताचे सात प्रकार मानण्यात येतात. वर्तमान, भूत, भविष्य आणि रीतिभूत हे चारकाळ आणि आज्ञार्थ, विध्यर्थ आणि संकेतार्थ हे तीन अर्थ अशी ही सातांची वर्गवारी. अरे बोलीत यांपैकी किती रूढ आहेत याचा शोध घेतला पाहिजे.

बोलीच्या अभ्यासासाठी गोळा केलेल्या मुलाखती, लोककथा आणि लोकगीते यांचे परिशीलन केले असताना पुढील निष्कर्ष निघतात.

१. या बोलीत वर्तमान, भूत आणि भविष्य हे तीन काळ आहेत. रीतीभूतकालाचा उपयोग स्पष्टपणे आढळला नाही. कधी भूतकाळवाचक क्रियापदाने तर कधी संनिहित वर्तमानाचा अर्थ निघू शकेल अशा भविष्य काळवाचक क्रियापदाने रीतिभूतकाळाचा भाव प्रकट झालेला आढळतो. उदाहरणार्थ :

गाई रानान्तु **जाली** (जाते); गाई रानान्तु **गेलीया** (गेली); गाई रानान्तु जाउनु (गेली/जात असे); गाई रानान्तु जातं (जाईल/जाइ).

२. तीन अर्थांपैकी संकेतार्थाची उदाहरणे माझ्या संग्रहात नाहीत. विध्यर्थ आणि आज्ञार्थ मात्र स्पष्टपणे आढळले.

३. प्रमाण मराठीतील सात आसयातांपैकी रीतिभूतकाळ व संकेतार्थ वगळता अन्य पाच आख्यात अरे बोलीत रूढ आहेत.

अनुक्रमणिका

४. या पाचही आख्यातांत क्रियापद कर्तृनिघ्न असते हे विशेष. याचा दुसरा अर्थ असा होतो की, या बोलीत कर्मणि व भावे प्रयोग यांचा अभाव आहे.

५. उपरोक्त विशेषाचा परिणाम असेल वा अन्य कारणांचा प्रभावही असू शकेल, या बोलीत सर्व आख्यातात प्रथमपुरुषी एकवचनी व तृतीय पुरुषी एकवचनी रूपे सारखीच असतात.

| | |
|---|---|
| सीता वावराँतु **गेली**; | मियाँ (स्त्री) वावराँतु **गेली** (भूत) |
| सोमय्या शवरु **नांगरितं**; | मियाँ (पु) वावरु **नांगरित्तं** (भवि.) |
| चंद्रोजी कामु **कराला**; | मियाँ (पु) कामु **कराला** (वर्तमान) |
| तेनं घरासु **जाला**. | मियाँ (पु) घराँसु **जाला** (वर्तमान) |

अपवादात्मक का होइना अशा प्रकारचे प्रयोग तेराव्या शतकातील ग्रांथिक मराठीत आढळतात. यादवकालीन मराठीत सरसहा असे प्रयोग होत नाहीत. त्याचा अर्थ एक तर असा होतो की, अशा प्रकारची रूपे प्रचारातून कमी होत होती. दुसरे असेही म्हणता येईल की ग्रांथिक भाषेत अशा रूपांना प्रतिष्ठा असल्याने यादवकालीन बोलीत ती रूढ असावीत. लीळाचरित्रातच अशी रूपे अधिक आढळतात. त्यामुळे दुसरे अनुमान वस्तुस्थितीत धरून असावे. कारण, लीळाचारित्राचे संकलन समकालीन बोलीत प्रामुख्याने झाले आहे. काही उदाहरणे अशी :

(१) मी भीती आहे बाबा (लीच पृ. १२५); (२) बाई [मी] आतांचि आलां (लीच. पृ. २६०).
(३) मी मागां राहिलां (लीच पृ. १८८) (४) मी भिक्षे गेला होता (ग्रोप्रच २२२).

लीळा चरित्रांप्रमाणेच पंचोपाख्यान, गोविंदप्रभुचरित्र या ग्रंथातही अशी उदाहरणे आढळतात. वर्तमान मराठीत प्रथम पुरुषी एकवचनी व तृतीय पुरुषी एकवचनी क्रियापदाची रूपे भिन्न होतात. या बाबतीत अरे बोलीने किमान यादवकालाइतकी पुरातन परंपरा आजतागायत सांभाळीली आहे.

अरे बोलीत रूढ असलेल्या पाच आख्यातांच्या प्रत्ययांचे निरूपण करण्यापेक्षा एक अकर्मक आणि एक सकर्मक धातू सर्व आख्याती चालवून दाखविणेच श्रेयस्कर ठरेल.

**अकर्मक धातु हो**

| **वर्तमानकाळ** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्र. पु. | मियाँ होयाला (पु)<br>मियाँ होयाली (स्त्री) } | आमी होयलामु |
| द्वि. पु. | तू होइलाचु (पु)<br>तू होइलीचु (स्त्री) } | तुमी होयालतांडी |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| तृ.पु. | तेनं होयलं (पु)<br>तिनं होयाली (स्त्री) | } | त्याहीनं होयल्यातु |

**भूतकाळ**

| | |
|---|---|
| मियाँ होइला/होइली | आमी होइलामु |
| तू होइलाचु/होइलीचु | तुमी होइलत्यांडी |
| तेन होइलं/तिनं होइली | तेहीनं होइल्यातु |

**भविष्यकाळ**

| | |
|---|---|
| मियाँ होतं/होती | आमी होतमु |
| तू होतचु/होतीचु | तुमी होतांडी/तुमी होत्यांडी |
| तेनं होत्तं/ तिनं होत्ती | त्याहीनं होत्तं |

**विध्यर्थ**

| | |
|---|---|
| मियाँ होआवं | आमी होआवं |
| तू होआचु | तुमी होवांडी |
| तेनं/तिनं होआवं | तेहीनं होआवं |

**आज्ञार्थ**

[फक्त द्वितीय पुरुषाची रूपे]

| | |
|---|---|
| तू होई | तुमी होआ अंडी |

धातु सकर्मक असो वा अकर्मक या बोलीत आज्ञार्थाची रूपे प्रमाण मराठीपेक्षा वेगळी होतात. उ. जाई, करी, सांगी नेई.पंचोपाख्यानात अशीच रूपे आढळली : आइकी (पृ. ८१), सांधी (पृ. १५१) इ.

**सकर्मक कर धातु**

**वर्तमान काळ**

| | |
|---|---|
| मियाँ कामु कराला/कराली | आमी कामु करालामु |
| तू कामु करालाचु/करालीचु | तुमी कामु करलत्यांडी |
| तेनं कामु कराला/तिनं कामु कराली | तेहीनं कामु करल्यातु |

**भूतकाळ**

| | |
|---|---|
| मियाँ कामु केला-करला/केली-करली | आमी कामु केलामु-करलामु |
| तू कामु केल्याचु/केलीचु | तुमी काम केलत्यांडी |
| तेन कामु केला/तिनं कामु केली | तेहीनं कामु केल्यातु |

अनुक्रमणिका

**भविष्यकाळ**

| | |
|---|---|
| मियाँ कामु करित्तं | आमी कापू करित्तमु |
| तू कामु करिंचु | तुमी कामु करित्तांडी |
| तेनं कामु करित्तं<br>तिनं कामु करित्ती } | त्याहीनं कामु करित्त्यातु |

**विध्यर्थ**

| | |
|---|---|
| मियाँ कामु करावं | आमी कामु करावमु |
| तू काम कराच | तुमी काम करावंडी |
| तेन/तिनं कामु करावं | तेहीनं कामु करावं |

[फक्त द्वितीय पुरुषी]

**आज्ञार्थ**

| | |
|---|---|
| तू कामु करी | तुमी कामु करावं अंडी |

वर चालवून दाखविलेल्या धातूंवरून काही गोष्टी लक्षात येतील :

१. पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपे वेगवेगळी दिलेली असली तरी नपुसकलिंगाची निराळी रूपे देण्यात आली नाहीत. याचं कारण, व्यवहारात तृतीय पुरुषी पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी रूपे सारखीच होतात. आख्यातांच्या संदर्भात तरी या बोलीत नपुंसकलिंग नाही असे गृहीत धरण्यास हरकत नसावी.
२. विध्यर्थी पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपे सारखीच होतात.
३. आज्ञार्थी फक्त द्वितीय पुरुषांचीच रूपे रूढ आहेत.

**९. आख्यात रूपांवर प्राकृताचा प्रभाव**

अरे बोलीतील क्रियापदांच्या भिन्न काळांतील रूपांचा अभ्यास केला असताना असे दिसून येते की, या रूपांवर प्राकृतांतील क्रियापदांच्या रूपांचा फार मोठा प्रभाव पडला आहे. ध्वनिव्यवस्था आणि शब्दसंग्रह यांबाबत अरे बोलीने प्राकृत-अपभ्रंशांशी जे जिव्हाळ्याचे नाते प्रस्थापित केले आहे त्याच्याशी सुसंगत असाच हा प्रभाव आढळेल. तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून या ठिकाणी काही रूपे प्राकृत-अपभ्रंशातून आढळलेली देत आहे. इ. स. च्या. पहिल्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत निर्माण झालेल्या वाङ्मयातून ही रूपे निवडली आहेत.

[अधोरेखित शब्द अरे बोलीतला, पुढचा शब्द प्राकृत-अपभ्रंश पंथातला, तदनंतर ग्रंथसंदर्भ—]

अनुक्रमणिका

**जानसु :** जानसु, गास १-५२ (सं. जानीहि)
**धुई :** धवई, गास ५-३३
**देई :** देइ, गास ७-३
**फुक्कन्त :** फुक्कन्तो, गास २-७३ (फुंकतो.)
**बइसई :** बइसइ, मपु. ४-१-११
**बिज्ञतं :** भिज्ञन्त, गास ३-१६ (भिजते)
**येत्तं :** एत्तो, गास १-८५ (येतो, येईल).
**होइ :** होइ, सादो ६, कच १-१३-४.
**बोल्ली :** बोल्लि, सादो ८८ (बोलली)
**रंगतं :** रंगतं, कच ४-१-११, (रांगतो).
**सँपडल :** संपडिअं, देना ८-१४.
**जेमतं :** जेमइ, कच १८-७-११.

कोणतीही बोली ग्रांथिक भाषेइतकी नियमबद्ध नसते. तथापि, बोलीचा लवचिकपणा जमेस धरूनही आख्यात व्यवस्थेत जी शिस्त या बोलीत आढळते त्याची कल्पना अगोदर केलेल्या विवेचनावरून येईल. आख्यातरूपांवर प्राकृत-अपभ्रंशांचा बराच प्रभाव असल्याचे देखील वाणगीदाखल वर दिलेल्या उदाहरणांवरून लक्षात येईल. आख्यात व्यवस्थेच्या विवेचनात न आलेले इतरही काही विशेष या बोलींत आढळतात. त्यांची नोंद घेतली पाहिजे.

### १०. कालवाचक ऊन प्रत्ययांत धातुसाधिते

व्याकरणाच्या आजच्या परिभाषेत ऊन प्रत्ययांत धातुसाधितांची अव्ययांत गणना होते. या बोलीत मात्र ऊन प्रत्ययांत धातुसाधितांचा प्रसंग विशेषी भविष्य व भूतकाळ याचे वाचक असलेल्या क्रियापदासारखा उपयोग होतो.

उदा. मियाँ घराँसु **जाउनु** याला (मी घरी जाऊन आलो) -अव्यय
मियाँ घराँसु **जाउनु** (मी घरी जाईन/गेलो) -क्रियापद भूत./भविष्य
मियाँ कामु **करुनु** (मी काम केले/करीन)-क्रियापद भूत/भविष्य

अपूर्ण क्रियावाचक असूनही विशिष्ट कालाच्या पूर्ण क्रियापदाचा अर्थ या धातुसाधितांस का यावा हा प्रश्नच आहे. प्रमाण मराठीत असा प्रयोग अपवादात्मकसुद्धा आढळत नाही. काही प्राचीन गद्य ग्रंथांत मात्र ऊन प्रत्ययांत धातुसाधिते भविष्य कालवाचक क्रियापदासारखी योजलेली आढळली.

(१)आम्ही तुमतें **नेऊनु** (लीच. ५)
(२)रामयाते **जाउनु :** मग **आरोगुनि** (लीच. १५)
(३)विवीचा भिक्षा करुनि **येउनि** (लीच. ४२)

(४)ना आम्ही आपुलिया **राखौनि** (लीच. ५५)
(५)आम्ही तेयातें **बोलाउनि** (लीच. ४६)
(६)आम्हीचि **सोडुनु** आम्हीचि दोहोनु (लीच. ५५)
(७)आम्ही **विचारूनि** मग **येउनि** (गोप्रच २७९)
(८)आम्ही उडुळ राजा **करौनि** (पं. ८३)
(९)ऐसें आम्ही **करौनि** हास्तियाचे डोळे टोचुनि (पं. ५२)

लीळाचरित्र, गोंविदप्रभुचरित्र, आणि पंचोपाख्यान या तीन ग्रंथातून उद्‌धृत करण्यात आलेली ही वाक्ये मुळातील संदर्भाचा शोध घेऊनच निवडण्यात आली आहेत. प्रत्येक ठिकाणी धातुसाधिताचा उपयोग भविष्यकाळी क्रियापदासारखा करण्यात आला आहे हे संदर्भावरून स्पष्ट होते. या तिन्ही ग्रंथांतून आणखीही विपुल उदाहरणे सापडतील. हे प्रयोग या ग्रंथांत तरी अपवादात्मक आहेत असे त्यामुळे म्हणता येत नाही. उत्तरकाळात केव्हा तरी अशा स्वरूपातले प्रयोग बंद झाले असावेत-निदान ग्रांथिक भाषेत. बखर वाङ्‌मयात ऊन प्रत्ययांत धातुसाधिताचा भूतकाळवाचक क्रियापदासारखा प्रयोग झालेला आढळतो. असे प्रयोग अपवादात्मक आहेत हे खरे असले तरी ते बोलीत रूढ असल्याविना वाङ्‌मयात येण्याची शक्यता नाही. पद्यवाङ्‌मयांत मात्र असे प्रयोग आढळले नाहीत.

ऊन प्रत्ययांत धातुसाधितांचे प्राचीन पद्य व गद्य वाङ्‌मयात असे निरनिराळे उपयोग का आढळावेत हा प्रश्नच आहे. लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र हे सामान्य माणसाच्या तोंडी असलेल्या बोलीत संकलित करण्यात आले आहेत. पंचोपाख्यान देखील कथात्मक आहे. या ग्रंथावर बोलीचे संस्कार झाले नसतील असे म्हणता येणार नाही. याचा अर्थ असा की यादवकाळात या धातुसाधिताचे द्विविध प्रयोग होत असत: पूर्ण क्रियापद आणि अव्यय. पूर्णक्रियावाचक अर्थ बोलीत रूढ असला तरी शिष्टांच्या तोंडी असलेल्या भाषेत तो वर्ज्य गणला गेल्याने पद्यात मात्र या धातुसाधितास क्रियापदाचा अर्थ आला नाही. अरे बोलीत रूढ असलेल्या ऊन प्रत्ययांत धातुसाधिताचा दुहेरी उपयोग यादवकालीन मराठी बोलीच्या विशेषाचा निदर्शक आहे. आजच्या प्रमाण भाषेत क्रियापदाचा अर्थ या अव्ययांना नाही. या बाबतीत किमान यादवकाळाइतकी पुरातन परंपरा अरे बोलीने राखून ठेवली आहे असा निष्कर्ष काढल्यास तो निराधार ठरू नये.

### ११. भूतकालवाचक अन्य धातुसाधिते

ऊन प्रत्ययांत धातुसाधितांप्रमाणेच आलीया, केलीया, जालीया यांसारख्या धातुसाधितांचा उपयोग अरेबोलीत भूतकाळवाचक क्रियापदाच्या अर्थाने होतो. प्राचीन मराठीत मात्र ती अपूर्ण क्रियावाचकाप्रमाणे रुढ होती :

तू जेउनु केलाया? (तू जेवलास?)
सूनु म्हाइयेरा गेलीया (सून माहेरी गेली)
मियाँ घरा गेलीया (मी घरी गेलो)
तू का केलाया? (तू काय केलेस?)

अनुक्रमणिका

यादवकालीन मराठी बोलीत याच अर्थाने या धातुसाधिताचा उपयोग होत असला पाहिजे. गोविंदप्रभुचरित्रात असे प्रयोग आढळले : वीसरलीये राउलो (गोप्रच १५०), जी जी आलीयेजी (गोप्रच २०३). लीळाचरित्रात देखील ही धातुसाधिते क्रियापदासारखी योजलेली आढळली. परंतु या क्रियापदांना भूतकाळाचा अर्थ नसून विध्यर्थाचा आहे.

कन्हणाचि सेतीं रिंगो नेदाविया
कन्हणाचिया मेरे चारावीया ना
बरव्या रानावरी घालावीया

स्मृतिस्थळ, श्रीकृष्णचरित्र, विवेकदर्पण या तेराव्या-चौदाव्या शतकातील ग्रंथांतही हा विशेष आढळून येतो.

अवघेया दृष्टांता लापिका लावलीया (स्मृस्थ-६); दोनी वोव्या म्हणलीया (स्मृस्थ ९) मग अतिक विचित्रा लीला केलीया (श्रीकृच. ५२); मग अघवेया सत्थभामेचिया राउळा आलीया (श्रीकृच. ८६); कर्णपुटी होउनि घालीया (विवेक ९६) पयस्विनी निघालीया (विवेक-पृ. ९६)

यादवकालीन मराठी बोलीचा हाही विशेष या बोलीत सुरक्षित राहिलेला आहे.

### १२ अकरणरूप आणि संयुक्त क्रियापद

क्रियापदाच्या अकरणरूपाच्या अनेक परी या बोलीत निदर्शनास आल्या. 'नाइ' न्हाई (नाही), नव्वं, न्हव्वं (नव्हे) या परिचित रूपांचा वापर विपुल आहे. तथापि काही अपरिचित प्रयोग ही नोंदविण्यासारखे आहेत.

**नोको :** हे निषेधात्मक रूप वर्तमान मराठीतल्या 'नको' चे समान अर्थक आहे. यादवकालीन मराठी वाङ्मयात हे रूप आढळते. (उदाहरणार्थ लीच. १००; ज्ञा. १२-१२९), भावार्थरामायण या ग्रंथाची अनेक जुनी हस्तलिखिते अभ्यासत असताना कित्येक पोथ्यांतून 'नोको' हे रूप आढळले. साधारणपणे सोळाव्यासतराव्या शतकातील पोथ्यांत या रूपांचे प्रमाण अधिक होते. शिष्ट भाषेत नसला तरी बोलीत या रूपाचा प्रयोग तेराव्या शतकापासून सोळाव्या सतराव्या शतकापर्यंत रूढ असण्याची शक्यता आहे. या बोलीतील 'नोको' हे रूप देखील मराठीतील प्राचीन परंपरेचे निदर्शक समजण्यास प्रत्यवाय नसावा. आजच्या मराठीत ऊकृदन्तासह नको हे अकरण रूप येते : जाऊ नको, येऊ नको, बोलू नको, इत्यादी. या बोलीत मात्र तसे घडत नाही. तू जा नोको, तू जाइ नोको, तू तू भिया नोको, तू भी नोको. 'नाही' या सामान्य अर्थानेही 'नोको' या प्रयोग क्वचित होतो: मला बरं नोको (मला बरे नाही); तित्तं ऱ्हानं बरं चोको (तिथे राहणे बरे नाही). 'भिया नको' असा प्रयोग लीळाचरित्रातही आढळतो (पृ. १३०)

**इतर प्रकार :** येईना, जाईना, बोलेना, करमेना, या प्रमाण मराठीतील अकरण रूपाप्रमाणे अरे बोलीत अकरणात्मक क्रियापदे येतातः यीना (येईना), समजना (समजेना), बोलना (बोलत नाही). कित्येकदा

नामांच्या बरोबर देखील हो या धातूची अकरणात्मक रूपे योजली जातात : समजु होइना (समजत नाही). देकू होईना (दिसत नाही) लिवा होइना (लिहिता येत नाही).

**संयुक्त क्रियापद :** संयुक्त क्रियापदाचा मुक्त उपयोग हाही या बोलीत आढळणारा एक विशेष आहे. दोन व्यक्तींची संभाषणे सहज ऐकली तरी करुनु घेंटलं, बोलुनु घेंटलं, अशी कितीतरी क्रियापदे कानावर पडतील 'बसुनु घेयावं' हे संयुक्त क्रियापद केवळ 'बसा' या क्रियापदासाठी योजले जाते. 'मला असे वाटते' या वाक्याचा आशय 'मियाँ मनुनु घेंटलं' अशा स्वरूपात दर्शविला जातो.

आजच्या काही प्रादेशिक बोलीत 'येऊन राहिला', 'जाऊन राहिला', 'बोलून राहिला' अशी संयुक्त क्रियापदे अनुक्रमे येतो, जातो, बोलतो या अर्थाने रूढ आहेत. त्या त्या बोलीचा विशेष म्हणून असे प्रयोग नोंदविले जातात. या बोलीचा संयुक्त क्रियापदांच्या बाबतीतला हाही एक विशेष म्हणून नोंदविण्यास प्रत्यवाय नसावा.

## १३. रूपसिद्धीत सुरक्षित राहिलेली पुरातन परंपरा

नाम, सर्वनाम, आणि क्रियावाचक शब्द यांना घडणाऱ्या विकारांचा साकल्याने विचार केला असताना असे दिसून येते की या बोलीत प्राचीन मराठी वाङ्मयात रूढ असलेले बरेच रूपविशेष आढळतात. कित्येक विशेषांना तर प्राकृत-अपभ्रंशांचा पुरातन वारसा आहे.

(१) **सामान्यरूपांचा अभाव** हा असाच एक पुरातन वारसा आहे. विभक्ती प्रत्यय अथवा विभक्ती निदर्शक अव्यय नामाला/सर्वनामाला लागण्यापूर्वी नामाचे/सर्वनामाचे सामान्यरूप होणे हा प्रमाण मराठीचा स्वभावधर्म यादवकालापासून स्थिरावण्याच्या मार्गावर दिसतो. या बोलीत चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय वगळता अन्य विभक्तीचे प्रत्यय अथवा विभक्तिनिदर्शक अव्यय लागण्यापूर्वी नामाचे सामान्यरूप होत नाही. यादवकालात सामान्यरूपासंबंधीची थोडी फार धरसोड ध्यानात घेतली तर नामाचे सामान्यरूप न करण्याची प्रवृत्ती ही मराठी बोलीला साहित्यरूप प्राप्त होण्याच्या संधिकाळातली असावी असे अनुमान निराधार ठरू नये. या अनुमानाच्या आधाराने अरे बोलीतील सामान्यरूपांचा अभाव हा मराठी भाषेतल्या एका पुरातन परंपरेचा अवशेष ठरतो.

(२) **'होउनि' : प्राचीन परंपरेचे निदर्शक :** पंचमी विभक्तीसाठी योजले जाणारे होउनि हे अव्यय देखील अशाच जुन्या विशेषाचे निदर्शक आहे. 'ऊन' 'हून' हे आजच्या मराठीत रूढ असलेले पंचमीचे प्रत्यय. प्राचीन मराठीत 'ऊनि', 'औनि' या रूपात ते आढळतात. या रूपांची व्युत्पत्ति 'होउनि' या अव्ययापासून समाधानकारकरीत्या लावता येते. याचा अर्थ असा की, होउनि हे रूप प्रचलित झाल्यानंतरच त्याचे 'ऊनि', 'औनि' असे स्थित्यंतर झाले. पंचमीच्या अव्ययास प्रत्ययाचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीची अवस्था अरे बोलीत अशा रीतीने कायम राहिली आहे. आज 'होउनि' अपूर्ण क्रियावाचक कृदंत या नात्याने भाषेत रूढ आहे. पंचमीचा अर्थ दाखविण्याची क्षमता त्यात नाही. ध्वनिव्यवस्थेत अरे बोलीने प्राचीन ध्वनिव्यवस्था कायम ठेवली. त्याप्रमाणेच 'होउनि'चे पंचमीविभक्तीचे निदर्शकत्व देखील भाषेच्या प्राचीन अवस्थेचा पुरावा देणारे आहे.

(३) **सप्तमीचे अव्यय भींतरी :** पंचमीचे 'होउनि' हे अव्यय आज प्रचलित नाही त्याप्रमाणेच भींतरी हे अव्यय सप्तमीच्या अर्थाने आज प्रयुक्त होत नाही. प्राचीन मराठीत रूढ असलेले ई, आं हे सप्तमीचे प्रत्यय अरे बोलीत नाहीत. या विभक्तीचे कार्य देखील अव्ययाच्या योगाने साधले जाते. आंतु, बरे, (वर, खाली) या अव्ययाबरोबरच भींतरी या अव्ययाचाही उपयोग सप्तमीसाठी होतो.

(४) **ऊन प्रत्ययांत क्रियापदे :** आख्यात विभक्तीच्या संदर्भात आणखी एका विशेषाची नोंद या ठिकाणी केली पाहिजे : ऊन प्रत्ययांत धातुसाधिताचा भविष्यकाळी व क्वचित् भूतकाळी क्रियापदासारखा उपयोग या बोलीत होतो. हा उपयोग तेराव्या-चौदाव्या शतकाइतका पुरातन आहे. आलीया, गेलीया या धातुसाधितांचा भूतकाळी क्रियापदासारखा उपयोगही असाच प्राचीन आहे.

(५) प्रथम पुरुषी क्रियापदाची तिन्ही काळातील एकवचनी रूपे या बोलीत वेगळी नाहीत. प्रथम आणि तृतीय या दोन्ही पुरुषातील एकवचनी रूपे सारखी आहेत. तेराव्या शतकातील लीळाचरित्र आणि चौदाव्या शतकातील पंचोपाख्यान या ग्रंथात अशी रूपे अपवादात्मक स्वरूपात आढळतात.

(६) प्रथम पुरुषी आणि द्वितीय पुरुषी सर्वनामाची षठ्यन्त रूपे—तुमँचं, आमँचं—देखील तेराव्या शतकातील मराठीच्या खुणांची निदर्शक आहेत.

## १४. निष्कर्ष

ध्वनिव्यवस्थेच्या विचारातून रूपव्यवस्थेचा मागोवा घेत असताना या बोलीच्या विकासासंबंधाने एक निराळे चित्र उभे राहते. या बोलीची समग्र ध्वनिव्यवस्था अपभ्रंश प्राकृताच्या ध्वनिव्यवस्थेवर आधारलेली आहे याचे सविस्तर आणि सप्रमाण विवरण मागील प्रकरणी करण्यात आले आहे. ध्वनिपरिवर्तनाच्या बाबतीत देखील अपभ्रंश व्याकरणात आढळणाऱ्या नियमांचे अनुसरण या बोलीने अगदी कटाक्षाने केले आहे हेही या पूर्वी विशद करण्यात आले आहे. ध्वनिव्यवस्थेचे हे अपभ्रंशावलंबित्व लक्षात घेऊनच अरे बोली ही मराठीची बोली मानावयाची की अपभ्रंशाची उत्तरावस्था अशी शंकाही या विवेचनाच्या ओघात उपस्थित केलेली होती.

रूपप्रक्रियेच्या क्षेत्रात मात्र निराळे अनुभव येतात. अरे बोलीची उच्चारप्रक्रिया ही अपभ्रंशाची उत्तरावस्था तर रूप प्रक्रिया ही यादवकालीन मराठीची पूर्वावस्था ठरते. लीळाचरित्रासारख्या लोकपरंपरेने चालत आलेल्या ग्रंथात अपवादात्मक स्वरूपात आढळणारी काही वैशिष्ट्यपूर्ण रूपे अरे बोलीत निरपवादपणे रूढ आहेत. यादवकालातील मराठी बोलीचे काही विशेष लीळाचरित्रात सहजगत्या संगृहीत झाले आहेत. या बोलीतच अरे बोलीचे मूळ स्वरूप असावे असा तुलनात्मक अभ्यासातून निष्कर्ष निघतो. मराठी भाषेने यादवकाळात प्रौढ ग्रांथिक रूप धारण केले. त्याबरोबरच तत्सम शब्द आणि संस्कृत भाषेची वर्णमालाही आत्मसात केली. त्यामुळे ग्रांथिक भाषा आणि बोली यांत अंतर निर्माण होणे अपरिहार्य होते. ग्रांथिक परंपरेने चालत आलेल्या मराठीने यादवकालीन ग्रांथिक मराठीचा वसा चालविला. कालांतराने बोलींवरही या परंपरेचे संस्कार झाले. प्राकृतातून पुथगात्म झालेली मराठी बोली सुरक्षित राहिली ती अरे समाजाच्या भाषाव्यवहारात.

अनुक्रमणिका

**तेलंगणातील अरे समाजाची बोली यादवपूर्वकालीन मराठी बोलीची वारस ठरते ती या आधारांवर.**

वाक्यरचनेच्या विश्लेषणातून हाच निष्कर्ष दृढ होतो.

∫∫∫

अनुक्रमणिका

७

# वाक्य-रचना

**१. वाक्य-रचनेचे घटक; २. अरे बोलीतील वाक्यरचना; ३. कर्तृप्रधान वाक्य; ४. आणखी एक प्रमाण; ५. विकृती नव्हे प्रकृतीच; ६. माधुर्य आणि लयबद्धता.**

## १. वाक्यरचनेचे घटक

अरे बोलीच्या रूपव्यवस्थेच्या विचारातच वाक्यरचनेसंबंधीचा बराचसा भाग अप्रत्यक्षरीत्या येऊन गेला आहे. शब्दांना घडणारे विकार हे वाक्यसिद्धीच्याच अनुसंधानाने होत असतात. लिंग-वचन आणि विभक्ती-आख्यात या विकारांचे उद्दिष्ट वाक्यरचनेस अनुरूप अशी पदसिद्धी हेच असते. म्हणून वाक्यविचाराचा प्रारंभ तसा रूपव्यवस्थेच्या विवेचनाने झालेला आहे. तरीही सामग्र्याने वाक्यरचनेचे विशेष नमूद करणे आवश्यक असतेच. एक विशिष्ट भाव अथवा विचार सलगपणे व्यक्त करण्याच्या दृष्टीने शब्दांची जी अर्थपूर्ण संघटना होते तीस आपण वाक्य म्हणतो. शब्दांना स्वतंत्रपणे अर्थ नसतो असे नाही. परंतु वाक्याच्या मनीचा भाव व्यक्त करण्याच्या निमित्ताने शब्दांची जी संघटना होते त्या संघटनेतून एक सलग भाव व्यक्त होतो. या अभिव्यक्तीत शब्दांना स्वतंत्रपणे असणाऱ्या अर्थाचा भाग असतोच. पण, शब्दांचा परस्परांशी जो अन्वय घडतो त्यातून एक संघटित अर्थ ध्वनित होत असतो. वाक्यरचनेत शब्दांच्या परस्परांशी घडणाऱ्या अन्वयातून अर्थाला एक विशिष्ट परीघ लाभते. वक्त्याच्या मनीचा भाव त्यामुळे अधिक समर्थपणे अभिव्यक्त होतो.

प्रत्येक भाषेचीच नव्हे तर बोलीची देखील विशिष्ट वाक्यरचनापद्धती असते. वाक्त्याच्या मनात विशिष्ट शब्दावर भर द्यावयाचा असल्यास अथवा एखाद्या भावाची तीव्रता व्यक्त करणे अभिप्रेत असल्यास रूढ रचनापद्धतीत तेवढ्यापुरता बदल घडतो. अन्यथा प्रत्येक भाषा वा बोली आपल्या पद्धतीने वाक्यरचनेची परंपरा चालवीत असते. वाक्यरचनेत प्रामुख्याने दोन अंगे महत्त्वाची असतात. वाक्यातील शब्दांचा परस्परांशी अन्वय आणि अभिप्रेतार्थास अनुलक्षून निश्चित केलेला पदक्रम. इंग्रजी भाषेत कर्ता-क्रियापद-कर्म (असल्यास) -इतर शब्द असा पदक्रम सामान्यपणे असतो. संस्कृत भाषेत पदक्रमास विशेष महत्त्व नसते. प्राकृतात साधारणपणे कर्ता-कर्म (असल्यास)- क्रियापद असा क्रम दिसतो. या तीन पदांच्या अनुसंधानाने त्या त्या पदाशी अन्विय असलेले अन्य शब्द येतात. कर्ता व क्रियापद या दोन टोकांत इतर पदांचा समावेश करण्याची प्राकृताची वाक्यरचनापद्धती मराठीने प्रारंभकाळापासून उचलली आहे. कर्ता आणि कर्म यांचा क्रियापदाशी असलेला अन्वय वाक्यार्थाच्या दृष्टीने प्रधान असतो. इतर शब्दांचा परस्परांशी असलेला अन्वय या नंतर महत्त्वाचा ठरतो. अन्वयनिदर्शक असे शब्दांना घडणारे विकार आणि वाक्यातील पदक्रम यांच्या योगाने वाक्याला परिपूर्णता येते व ‘सार्थकता’ ही प्राप्त होते.

मराठी वाक्यात कर्ता, कर्म (असल्यास) व क्रियापद असा सर्वसाधारण क्रम आढळतो. या तिन्ही पदांना जवळचे असलेले इतर शब्द आपापल्या योग्यतेप्रमाणे त्या त्या पदाच्या जवळपास स्थानापन्न होत असतात. विशेषण (कर्त्याचे व कर्माचेही) विशेष्याजवळ असते व क्रियापदाच्या आसपास क्रियाविशेषणाचे स्थान असते.

अर्थव्यक्तीच्या दृष्टीने या सर्वसाधारण पदक्रमात प्रसंगविशेषी बदल होत असतो. वाक्याचा मूलाधार असतो कर्त्याचा व कर्माचा क्रियापदाशी असलेल्या अन्वयातून निघणारा अर्थ. या अर्थाच्या अनुसंधानानेच कर्ता/कर्म यांची विभक्ती आणि क्रियावाचक शब्दाचे आख्यात निश्चित होत असते. कर्त्याचा प्रभार धातूच्या रूपावर असल्यास प्रयोग कर्तरी होतो; कर्म धातूरूपाच्या दृष्टीने प्रभावी ठरते तेव्हा कर्मणी प्रयोग आणि धातूरूपांवर दोहोंचाही प्रभाव नसेल तेव्हा भावे प्रयोग अशी आपली एकंदरीत प्रयोग व्यवस्था आहे.

मराठी भाषेच्या वाक्यरचनेचे हे स्वरूप लक्षात घेऊन अरे बोलीतील वाक्यरचना कोणत्या प्रकारची असते याचा शोध आता घ्यावयाचा आहे. हा शोध घेण्यापूर्वी काही नमुनेदार वाक्ये उदाहरणादाखल घेऊ :

१. ये रामराउचं धरू (हे रामरावाचे घर)
२. रामक्का अन्ता पुऊ देली (रामक्काने आता फूल दिले).
३. तेनं मज्जं कामु कराला (तो माझे काम करतो).
४. मियाँ भकरी देला (मी भाकरी दिली).
५. भद्रय्या शाराला उन्द्या जात्तं (भद्रय्या उद्या शहराला जाईल).
[श्रद्रय्यानं असा प्रयोग अधिक प्रचलित]
६. तुमी घराँसु जावा (तुम्ही घरी जा/जावे).
७. तुमचं गोटु समजु होइना (तुमची भाषा समजत नाही).
८. तू घराँसु जाइनोको (तू घरी जाऊ नको).
९. संकरराउ सरपंचु होइला (शंकरराव सरपंच झाला).
[संकररावनं. असे रूप अधिक प्रचलित].
१०. नरसय्यानं अन्ता येत (नरसय्या आता येतो/येईल).
११. भीमक्का वावरान्तु जाली (भीमक्का वावरात गेली) [कर्त्याची तृतीया अधिक प्रचलित]
१२. रादा भवानीचं परसादु घेंटली (राधेने भवानीचा प्रसाद घेतला).
१३. परमाँ उगादो ऱ्हातं (पुरवा पाडवा आहे).
१४. अमुंचं गाँमु अरेपल्ली (अरेपल्ली आमचे गाव)
१५. हीरीवरे जाउनु मोटु काडी (विहिरीवर जाऊन मोट सोड). [तू हा कर्ता अध्याहृत]

## २. अरे बोलीतील वाक्य-रचना

या पंधरा वाक्यांबरोबरच त्या त्या वाक्याचा प्रमाण मराठी भाषेतला अनुवाद कौंसात दिला आहे. अनुवाद शब्दशः असला तरी वाक्य-रचना अनुवादात जशीच्या तशी करणे शक्य नव्हते. मूळ वाक्य आणि अनुवाद वाचताना काही वेगळेपण दोही वाक्यांत सहजगत्या लक्षात येईल.

१. १ ल्या आणि १४ व्या वाक्यात क्रियापद अध्याहृत आहे. असा प्रयोग प्रमाण मराठीत देखील होतो.
२. दुसऱ्या वाक्यातील क्रियापद भूतकाळी आहे. तसेच स्त्रीलिंगी कारण कर्ता स्त्रीलिंगी आहे.

वर्तमान मराठीत फल हे कर्म नपुंसकलिंगी असल्याने क्रियापद नपुंसकलिंगी राहिले असते.

३. तिसऱ्या वाक्यात कर्ता तृतीया विभक्तीत आहे. प्रमाणभाषेत तो प्रथमांत येतो.
४. या वाक्यात कर्ता प्रथम पुरुषी असूनही क्रियापद मात्र तृतीय पुरुषी आहे.
५. कर्ता पुल्लिंगी असून क्रियापद मात्र नपुंसकलिंगी आहे.
६. घर या शब्दाची प्रमाण भाषेत सप्तमी झाली असती. या वाक्यात चतुर्थी आहे.
७. या वाक्यात गोष्ट हा शब्द स्त्रीलिंगी असला तरी अनुबंधी सर्वनामाचे षट्यंत रूप मात्र स्त्रीलिंगी न होतो नपुसकलिंगी आहे.
८. या वाक्यातील नोको व ७ व्या वाक्यातील होइना ही अकरणात्मक रूपे लक्षात ठेवण्याजोगी आहेत.
९. प्रमाण मराठीत हो या धातूचे झाला हे भूतकाळी रूप होते. येथे 'होइला' आहे.
१०. प्रमाण भाषेत कर्ता प्रथमांत येतो. येथे तो तृतीयांत आहे. कर्ता पुल्लिंगी असूनही क्रियापद मात्र नपुंसकलिंगी आहे.
११. जाते/जात आहे या अर्थाने 'जाती' या क्रियापदाचा उपयोग.
१२. प्रमाण भाषेत कर्मणि प्रयोग झाला असता या वाक्यात तो कर्तरि आहे. असते, आहे, या अर्थाने
१३. ऱ्हातं या क्रियापदाचा उपयोग.
१४. या वाक्यात आज्ञार्थ द्वितीयपुरुषी 'काडी' असे क्रियापद आले आहे प्रमाण भाषेत 'काढ' असे आले असते. [पंचोपाख्यानात देखील आज्ञार्थी द्वितीय पुरुषी एकवचनी अशीच रूपे येतात. तरि मज उदक सांधी (पृ. १५१); आइकी (पृ. ८१); सांधी (पृ. १०६)

या पंधरा वाक्यात कर्मणी व भावे प्रयोग यांचे एकही उदाहरण नाही हे या ठिकाणी तूर्त लक्षात ठेवावे.

### ३. कर्तृप्रधान वाक्य

उदाहरणादाखल घेतलेल्या वाक्यांत काही ठळक विशेष आढळतात ते प्रथम लक्षात घेऊ :

(१) **पदक्रम :** प्रमाण भाषेत आढळून येणाऱ्या पदक्रमापेक्षा निराळा पदक्रम या बोलीने स्वीकारला आहे असे म्हणता येत नाही. सध्या रूढ असलेला वाक्यातील पदक्रम मराठी भाषेत दीर्घकाळ चालत आलेला दिसतो. तिसऱ्या खंडात दिलेल्या लोककथांत मात्र थोडा फार निराळा क्रम आढळतो. तो निवेदनपद्धतीचा परिणाम असण्याचीही शक्यता आहे. प्रमाण भाषेतही निवेदन पद्धतीच्या भेदानुसार वाक्य-रचनेतील पदक्रम बदललेला दिसून येतो. अरे बोलीचेच ते वैशिष्ट्य आहे असे म्हणता येणार नाही.

(२) **पदान्वय :** पदांच्या अन्वयाच्या संबंधात मात्र ही बोली प्रमाण मराठी पेक्षा निराळ्या पद्धतीचा अवलंब करताना दिसून येते. वाक्याची रचना कर्तृप्रधान आहे. क्रियापदाचा नेहमीच कर्तृपदाशी अन्वय आलेला दिसून येतो. परिणामस्वरूप या बोलीत कर्मणि व भावे हे दोन्ही प्रयोग आढळत नाहीत. प्राकृत-अपभ्रंशात भावे प्रयोग नाही. यादवकालीन मराठीत मात्र प्रारंभ काळापासून कर्तरि, कर्मणि व भावे हे तिन्ही प्रयोग आढळतात. [तुळपुळे, यादवकालीन मराठी (पहिली आवृत्ती) पृ. ४२,१९३, २०२.]

पदान्वयाच्या संबंधातला दुसरा विशेष म्हणजे कर्ता पुल्लिंगी असतानाही क्रियापद मात्र नपुंसकलिंगी योजण्यात येते. प्रथम पुरुषी एकवचनी क्रियापदाचा अभाव हाही या बोलीचा एक विशेष सांगता येण्यासारखा आहे.

कर्तृप्रधान वाक्यरचना हा या बोलीत आढळणारा विशेष अधिक विचार करावयास लावणारा आहे. प्रमाण मराठीत अगदी यादवकालापासून तिन्ही प्रयोग रूढ असताना या बोलीत फक्त कर्तरि प्रयोगच का आढळावा याचे कारण शोधले पाहिजे. अपभ्रंश भाषेत भावे प्रयोग आढळत नसला व कर्तरि प्रयोग प्राधान्याने होत असला तरी कर्मणि प्रयोगाचा लोप झाला नाही. [परमशिवशास्त्री, सूत्रशैलि और अपभ्रंश व्याकरण, पृ. १८८.] या बोलीत भावे प्रयोगाचा अभाव हा अपभ्रंश भाषेचा वारसा म्हणता येईल. परंतु कर्मणिप्रयोगाचा लोप हे मात्र तिचे स्वतःचेच वैशिष्ट्य आहे असे मानावे लागते. प्रारंभी दिलेल्या १५ वाक्यांत म्हणूनच कर्मणि प्रयोगाचे एकही उदाहरण आढळत नाही. प्रमाण मराठीत सकर्म धातूचा भूतकाळी कर्मणि वा भावे प्रयोग होतो. तसा प्रकार या बोलीत घडत नाही. या बोलीत सर्व आख्यातांत कर्तरि प्रयोगच होतो. संस्कृत भाषेत क्रियापदास 'य' हा प्रत्यय लागून सर्व आख्याती सकर्मक धातूचा कर्मणि प्रयोग होतो. प्राचीन मराठीत कर्मणि प्रयोगी 'ज' हा प्रत्यय लागत असे. वर्तमान मराठीत इंग्रजी भाषेच्या धर्तीवरचा. कर्मणि प्रयोग रूढ असून तो नवीन कर्मणि या नावाने ओळखला जातो. अरे बोलीत मात्र हा प्रयोग होत नाही.

भाषेच्या अविकसित अवस्थेत वाक्यरचना केवळ कर्तृप्रधान असते असा सर्वसाधारण सिद्धांत आहे. तो प्रमाण मानला तर अरे बोली ही मराठी भाषेच्या प्राथमिक अवस्थेची निदर्शक ठरते. ध्वनिव्यवस्था आणि रूपव्यवस्था यांच्या आधाराने ही बोली यादवपूर्वकालीन मराठी बोलीची वारसदार असल्याचा निष्कर्ष अगोदरच प्रस्थापित करण्यात आला आहे. या बोलीतील केवळ कर्तरि प्रयागाचे अस्तित्व अगोदरच्या निष्कर्षास दृढ करणारे आहे.

### ४. आणखी एक प्रमाण

अरे बोलीत प्रथम पुरुषी एकवचनी व तृतीय पुरुषी एकवचनी क्रियापदाची रूपे समान असल्याचा उल्लेख पूर्वी केला आहे. हा विशेष देखील बोलीच्या पुरातनत्वाचा निदर्शक आहे. या विशेषाचे थोडे अधिक स्पष्टीकरण या ठिकाणी काही उदाहरणे देऊन केले पाहिजे :

**वर्तमान**

| | | |
|---|---|---|
| मियाँ | **जातं** | (मी **जातो**) |
| मियाँ | जाती | (मी **जाते**) |
| तेन | **जातं** | (तो जातो) |
| तिनं | जाती | (ती जाते) |

**भूतकाळ**

| | | |
|---|---|---|
| मियाँ | कामु केला | (मी काम केले) |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| मियाँ | कामु केली | ,, |
| तेन | कामु केला | (त्याने काम केले) |
| तिनं | कामु केली | (तिने काम केले) |

**भविष्यकाळ**

| | | |
|---|---|---|
| मियाँ | कामु **करित्तं** | (मी काम करीन) |
| तेन | कामु **करित्तं** | (तो काम करील) |
| तिनं | कामुं **करित्ती** | (ती काम करील) |

महानुभाव वाङ्मयात अशाच प्रकारचे प्रयोग आढळतात.

बाई [मी] आताची आला; मी गेली, मी तेलंग देसासि गेला होता.
मी मागां राहिलां (**लीळाचरित्र,** अनुक्रमे पृ. २६०, १२६,१८८, १८८)
म्हणोनि यथ टाकुनि आलां; मी भिक्षे गेलां होतां;
मी सरलां होउनि आला. (**गोविंपप्रभुचरित्र**, अनुक्रमे पृ. १६, २२२, ९७.)
मी घरासि येत होतां; मी तृषाकांतु जाला; (**पंचोपाख्यान**, पृ. १२६, १५०.)

प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी क्रियापदाचे समान रूप हा प्रारंभ काळातील मराठी बोलीचा विशेष असावा. प्रौढ अवस्थेत ग्रांथिक भाषेतून या विशेषास स्थान मिळाले नाही. तथापि, लोकपरंपरेने चालत आलेल्या प्रवाहात रूढ असल्यामुळे तत्कालीन बोलीत व कथात्मक वाङ्मयात अपवादात्मक का होईना या विशेषाचा आढळ होतो. प्रारंभकाली असलेल्या या बोलीचे हे वैशिष्ट्य अरे बोलीने आजतागायत कायम ठेवले आहे.

यादवकालीन मराठीचे केवळ ग्रांथिक रूपच डोळ्यासमोर असल्याकारणाने डॉ. तुळपुळे यांनी या विशेषांची गणना "विकृतीत" केली आहे. ते लिहितात :

"धातूची रूपे जात जात कृदन्ते जसजसी प्रचारात वाढू लागली तसतशी नामिक पद्धतीही दिसू लागली. तरीही काही ठिकाणी कर्ता प्रथमेत तर क्रियापदे कर्मण्यर्थी व कर्ता तृतीयांत तर क्रियापद कर्तरि असा **विकृत प्रकार** दिसतो. उदा.

भटोवासां (तृ.) झोळिया दृष्टिपूत करिती. स्मृ. १०७
मग तिहीं (तृ.) कुदळी फावडे घेउनि आले. लीळा. १-११

असेच लिंग व वचन यांचेही **घोटाळे** क्वचित् आढळतात- उदा.

तेचि आमुचे गोसावी होए. लीळा. १-५. कर्ता अ. व. क्रि. ए. व.
ते (पु.) [बिंदू] पन्हरेयावरी मानकुलीं तैसी मिरवतीं नपुं. लीळा. १-८

अनुक्रमणिका

तुम्ही (अ. व.) आदि नको (ए. व.) होंगा स्मृति १४.
जे वस्तु (स्त्री) अगाध अलेख/ते कलियुगी-सुलभजाळा (पु.) ऋव. २४६

[**यादवकालीन मराठी** (पहिली आवृत्ती) पृ. ३०४]
जाड ठसा लेखकाचा.

**५. विकृती नव्हे प्रकृतीच**

यादवकालीन मराठी भाषेतल्या ज्या प्रवृत्तीचा उल्लेख "विकृती" या नावाने डॉ. तुळपुळे यांनी केला आहे, ती अरे बोलीत आज रूढ आहे. लीळाचरित्र आणि स्मृतिस्थळ या यादवकालीन ग्रंथातही या "विकृतीचे" अस्तित्व होते. भाषाशास्त्राच्या आधुनिक संकेताप्रमाणे ग्रांथिक भाषेच्या व्याकरणात न बसणाऱ्या बाबींची गणना 'विकृतीत' करणे योग्य होणार नाही. कोणतीही भाषा प्रथम बोलीच्या स्वरूपात रूढ होते. तिला स्थैर्य प्राप्त झाल्यावर ती शिष्टांची बोली म्हणून प्रतिष्ठा पावते. वाङ्मयास आधारभूत असते ती हीच शिष्टांची बोली. बोलीत रूढ असलेले काही प्रयोग शिष्ट संमत ठरतात तर कित्येकांना शिष्टांच्या दरबारात स्थान मिळत नाही. परंतु त्यामुळे अशा प्रयोगांना अस्तित्वच नसते असे मानता येत नाही. व्याकरण शिष्टांच्या बोलीचे होत असते. तथापि, या व्याकरणात न बसणारे प्रयोगही वाङ्मयात कधी कधी डोकावतात. संस्कृत भाषेतील 'आर्ष प्रयोग' याच जातीचे आहेत. डॉ. तुळपुळे यांनी गणलेली 'विकृती' देखील याच सदरात बसते. या 'विकृती'च्या निदर्शनार्थ डॉ. तुळपुळे यांनी उदाहरणे दिली आहेत ती लीळाचरित्र आणि स्मृतिस्थळ या ग्रंथातील. या रचनांना आज ग्रंथनिविष्ट स्वरूप प्राप्त झालेले असले तरी या ग्रंथांचे संकलन लोकरूढ दंतकथा-आख्यायिका यांच्या द्वारे झाले आहे. अशा संकलनात प्रादेशिक बोलींचा प्रभाव पडणे स्वाभाविक आहे. वरील उदाहरणे ग्रांथिक भाषेच्या व्याकरणाशी विसंगत असली तरी बोलीत रूढ असल्यानेच या संकलनात त्यांना प्रवेश मिळाला.

'भटोवासां झोळिया दृष्टिपूत करिती' यावर उद्‌धृत केलेल्या वाक्यात कर्ता तृतीयांत असून कर या सकर्मक धातूचे रूप एकवचनी आहे. यादवकालीन मराठीच्या दृष्टिने तृतीयांत कर्ता आणि धातु सकर्मक असल्यास तो भूतकाळी आणि कर्मनिघ्न असणे ही 'प्रकृती' ठरते. या उदाहरणात क्रियापद वर्तमानकाळी व कर्तृगामी आहे. म्हणून डॉ. तुळपुळे यांना ही विकृती वाटली. वस्तुत यादवकालीन बोलीची ती प्रकृतीच असली पाहिजे. अरे बोलीत असे प्रयोग निरपवादपणे होतात. परिशिष्टातील वाक्यसंग्रहात याची अनेक उदाहरणे आढळतील. या बोलीत कर्तृवाचक सर्वनाम प्रथमांत कधीच येत नाही. ते तृतीयांतच असते. कर्तृवाचक नाम मात्र विकल्पाने प्रथमांत वा तृतीयांत असते.

उदाहरणार्थ : **मियाँ** येतं; **तेनं** आला; **तेनं** परसाद घेतं, **तिनं** कामु केली.
**पांड्यानं/पांड्या** पैसं घेंटलं; **चंद्रोजी/चंद्रोजीनं** उत्तरमु लिवाला;

डॉ. तुळपुळे यांना लिंगवचनाचा जो घोटाळा वाटला तसा प्रकार नसून तो सरळ सरळ नित्य रूढीचा भाग आहे अशी अरे बोलीची साक्ष आहे. एक तर या बोलीत पुल्लिंग आणि नपुंसकलिंग यांची सरमिसळ आहे. दुसरे, आदरार्थी बहुवचन अरे माणसाच्या तर गावीच नसते. सौजन्य दाखवावयाचे मनात असलेच तर तो एकवचनी क्रियापदाला 'अंडी' हे तेलुगू उपपद आदरार्थी लावील. बहुवचनी क्रियापदाचा तो उपयोग करीत

नाही. एकवचनाकडेच त्याचा ओढा अधिक असतो. सावधगिरीने तोलून-मापून बोलताना मात्र तो एकवचन अनेकवचन यांचे तारतम्य पाळतो. डॉ. तुळपुळे मानतात त्याप्रमाणे अरे बोलीत असे 'घोटाळे' भरपूर आहेत. बोलीच्या स्वभावधर्माचे ते निदर्शक आहेत. शिष्टांच्या भाषेत ते 'अपंक्त' ठरल्याने ते विसंगत वाटतात एवढेच.

याही विवेचनातून एकच निष्कर्ष निघतो.

**अरे बोलीत यादवकालीन मराठी बोलीचे बरेच विशेष आजही आढळून येतात.**

### ६. माधुर्य आणि लयबद्धता

अरे बोलीच्या प्रकृतिगत स्वरूपाचे विश्लेषण केले असतांना या बोलीने यादवपूर्वकाळात रूढ असलेल्या बोलीतील अनेक परंपरा कायम ठेवल्या आहेत हे सप्रमाण प्रस्थापित झाले आहे. या व्यतिरिक्त माधुर्य आणि लयबद्धता हे देखील या बोलीचे लक्षणीय विशेष म्हणून नोंदविता येण्यासारखे आहे व अरे माणसांचे संभाषण अर्थबोध नाही झाला तरी ऐकत रहावेसे वाटावे एवढे कर्णमधुर असते. रागदारीत ह्या चिजांतील आरोह-अवरोहासारखी वाक्यरचनेत एक प्रकारची लयबद्धता असल्याचा प्रत्यय ऐकणाऱ्यास येतो. नासिक्याचे प्रमाण शब्दोच्चारांत विपुल असल्याकारणाने या लयबद्धतेत तंतुवाद्यांच्या झंकाराची साथ असल्याचा अनुभव येतो. कविकुलगुरू कालिदासाने आपल्या नाटकात अपभ्रंशा तील गीतांना स्थान का दिले असावे, उकार बहुल भाषा ही नाटकातील गीतांना प्रशस्त असते असा दंडक नाट्यशास्त्रकार भरताने का घातला असावा, संस्कृत भाषेत व्याकरण लिहावे एवढी या बोलीची मातब्बरी तेलुगू पंडिताला का वाटली असावी या साऱ्या प्रश्नांची उत्तुरे अरे माणसांचे संभाषण ऐकताना विशेषतः गोंधळ्यांनी सादर केलेल्या कथांचे श्रवण करताना सापडतात. पल्लेदार वाक्ये या बोलीत सहसा आढळत नाहीत. चार-पाच शब्दांच्या सुटसुटित वाक्यांचाच वापर अधिक. अपभ्रंश ग्रंथांतील कथनशैली आणि लीळाचरित्रातील लीळानिरूपण यांचा सुवर्णमध्य या बोलीतल्या वाक्यरचनेत दिसून येईल. पुढे दिलेल्या तीन उताऱ्यांवरून याची कल्पना यावी. या उताऱ्यांपैकी पहिला 'कुवलयमाला' या आठव्या शतकातील ग्रंथातून उद्‌धृत केला आहे. दुसरा तेराव्या शतकातील लीळाचरित्रातला असून शेवटचा उतारा अरे बोलीतल्या एका लोककथेतला आहे.

(१) तावच उद्‌हाइसो सामुद्द-सद्द-गंभीरो कलयलारावो जनस्स रायंगणम्मि । किंच जायं । पलयन्ति कुत्र्जरा । पाहवन्ति तुरंगमा । ओसरन्ति नरवइणो । पलायन्ति बामण या । णिवडंति खुज्ञया । वित्थक्कंति धीरा । वलंती वीरा । कंपन्ति कायरा । सव्यहा पलय-सम एव्व खुमिओ सव्यो रायंगण जाणवओत्ति । चिंतिय च कुमारेण । 'को एसो अयंडे चेय संभमो' त्ति । - कुवलयमाला, पृ. २४८-१५४.

(२) गांवां गेले : पेवं काढीले : अर्ध वरो तेयां घातली : अर्ध वरो घरी घातली : दुभतें वांटिलें : सेनीचा कालवडू होता तो सरिसा लीपिला : तेयांवरि इलरें घातिले : मग पिंपळ गांवि चिनि वेसदा रेंहुनि आले : गोसावियांसि दंडवत केलें : श्रीचरणा लागले. सर्वज्ञे म्हणितलें : 'काई गा घर केले? परि कळसाचे केलें?' बाइसी पुसिलें : "बाबा कळसाचे म्हणिजे काइ"? -

लीळाचरित्र, पृ. १६४-३३ ये पिरोजी सुगदाजी काय की मन्लं : नोको रे बाळा, ते चुहतं हाय : बापु मन्ल्यानं बापु होतु न्हाइ : ते देक न सकं आमाला पोसीनं. जवळु धरीनं. आमाकारतु न्हाइ ते कस्टु दाकवा लागलाय् ते अन्साबाय कां म्हटलं? ये कुडा नोको म्हंटलं. तम्मा सोमाजी आइकनं....

— सिद्दोजी-पिरोजी कता.

वाक्य-रचनेचे विशेष अधिक विस्ताराने अभ्यासता यावेत या हेतूने परिशिष्टात विविध वाक्यसंग्रह दिला आहे.

∫∫∫

अनुक्रमणिका

# फलश्रुती

**१. मराठी भाषेच्या उत्पत्तीशी संबंधित महत्त्वाची सामग्री; २. यादवपूर्वकालीन मराठीचे रूपदर्शन ३. सामाजिक एकात्मतेचा आदर्श.**

संशोधनाचे क्षेत्र एका परीने विलक्षणच असते. परिश्रमावाचून तर कोणतेच संशोधन सिद्धीस जात नाही. पण परिश्रमाचे डोंगर उपसूनदेखील अपेक्षित यश हाती लागेल याची मात्र शाश्वती नसते. अनेकदा डोंगर पोखरून उंदीरदेखील हाती येत नाही. या प्रक्रियेत कित्येकदा डोंगराच्या एखाद्या कपारीत एखाद्या झरोक्याचे अस्तित्व जाणवते. गडद अंधःकाराच्या पलीकडे काही गवसेल असेही वाटत नाही. अशा अंधःकारात एखादी क्षीण प्रकाशरेखा संशोधकाच्या अंतःप्रवृत्तीस जाणवते. काळोखातून पायवाट काढण्याचे ते एक आवाहन आणि क्वचित् आव्हानही असते. अशी अंधारयात्रा क्वचित एखाद्या अज्ञात पण मनोहर शिल्पाच्या पायथ्याशी संशोधकास नेऊन सोडते——

—आणि सारे आसमंत प्रकाशाने उजळून निघते!

अरे बोलीच्या प्रस्तुत संशोधनात असाच सुखद अनुभव प्रत्ययास आला!

एका उपेक्षित अल्पसंख्य जमातीची बोली अभ्यासता यावी म्हणून आवश्यक सामग्री गोळा करण्याच्या उद्योगास लागलो. या बोलीचे फार तर वर्णनात्मक स्वरूप विशद करता येईल एवढीच माफक अपेक्षा प्रारंभी होती. भरपूर परिभ्रमण आणि परिश्रम झाल्यावरही काही मोठे घबाड हाती लागेल असा विचार स्वप्नात देखील आला नाही. तरीही भ्रमण आणि परिश्रम यांत खंड पडलेला नव्हता.

आणि कोणा एका उदात्त क्षणी लाभलेल्या प्रकाशझोताने जमलेले सामग्रीतील सुवर्णकण झळाळून निघाले व घडलेल्या परिश्रमाचे सोने झाले!

अरे बोलीत आढळणाऱ्या काही विशेषांनी मराठी भाषेच्या उगमस्थानापर्यंतचा प्रवास करण्यास भाग पाडले. या अंधारयात्रेतच मराठी भाषेच्या प्राचीनतम शिल्पाचे दर्शन घडले. काळाच्या उदरात दडलेले शिल्प प्रकाशात आले ते असे.

## १. मराठी भाषेच्या उत्पत्तीशी संबंधित महत्त्वाची सामग्री

मराठी भाषेचे प्राचीनतम स्वरूप आज उपलब्ध आहे ते यादवकालीन वाङ्मयाच्या स्वरूपात. या वाङ्मयाचा रचनाकाळ तेराव्या शतकातला असला तरी ज्या साधनांच्या आधाराने हे वाङ्मय वर्तमान काळाला लाभले ती साधने अर्थातच उत्तरकालीन होती. मुकुंदराजांचा ‘विवेकसिंधू’, श्रीपतिभट्टाची ‘ज्योतिषरत्नमाला,’

म्हाइभट्टाचे ‘लीळाचरित्र’ अथवा ज्ञानेश्वरांची ‘ज्ञानदेवी’ ही सर्वसामग्री समकालीन हस्तलिखितांच्या आधाराने प्रकाशित झालेली नाही. सध्याच्या संस्करणांना आधार आहे, उत्तरकालीन लेखकांनी लिहून ठेवलेल्या प्रतींचा. तरीही या ग्रंथांचा समावेश आपण यादवकालीन वाङ्मयात करतो. यादवकालीन मराठी भाषेचे स्वरूप निश्चित करताना याच साधनांना शरण. जाण्याखेरीज अन्य पर्याय नसतो.

मराठी भाषेच्या उत्पत्तिकाळाचा शोध घेताना मराठी वळणाची शब्द-सामग्री सातव्या-आठव्या शतकापासून आढळते असे संशोधक सांगतात. या भाषेच्या उत्पत्तीच्या संदर्भात, संस्कृत-महाराष्ट्री प्राकृत-महाराष्ट्री अपभ्रंश, अशी पूर्वपरंपरा सांगण्यात येते. हे दोन्ही सिद्धांत अग्राह्य समजण्याचे कारण नाही. ते संभाव्यतेवर आधारलेले आहेत एवढेच! या दोन्ही सिद्धांतांस आधारभूत असलेली अस्सल साधन-सामग्री एवढ्या विपुल प्रमाणात आतापर्यंत उपलब्ध नव्हती. इतर अनुषंगिक साधनांचा आधार घेऊन मराठी भाषेचा उत्पत्तिकाळ इ. स. चे ७ वे शतक आणि महाराष्ट्री अपभ्रंश ही मराठी भाषेची साक्षात् जननी असे मत प्रस्थापित झाले एवढेच.

या महत्त्वाच्या सिद्धांतांस आधारभूत असलेली अस्सल सामग्री अरे बोलीच्या स्वरूप विशेषांच्या अभ्यासातून उपलब्ध व्हावी हा एक विलक्षण योगच म्हटला पाहिजे. अगोदरच्या अध्यायांतून या संबंधी सविस्तर विवेचन आले आहे. या संशोधनाची ही महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे याविषयी शंका नसावी.

मराठी भाषेच्या उत्क्रांतीच्या विविध अवस्था अरे बोलीत कशा व्यक्त झाल्या आहेत याचे विवेचन शब्दसंग्रहाचे विश्लेषण करताना आले आहेच. या विवेचनातून निष्पन्न झालेल्या निष्कर्षांचे दृढीकरण होईल एवढी विपुल शब्दसंपत्ती ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या शब्दसंग्रहात आढळेल. अगदी पहिल्या शतकातील महाराष्ट्री प्राकृतातील ‘गाथासप्तशती’ या ग्रंथापासून ते तेराव्या शतकातील मराठी वाङमयापर्यंत भाषा-प्रवाह कसकसा उत्क्रांत होत गेला याचे मनोज्ञ दर्शन या शब्दसंग्रहात घडेल. निमित्त अरे बोलीचे झाले असले तरी महाराष्ट्री प्राकृतापासून ते तेराव्या शतकातील मराठी वाङमयापर्यंतचे सुमारे हजार-बाराशे वर्षांचे भाषिक सातत्य दर्शविणारी सामग्री आणि भाषिक प्रवाहाची अखंडता प्रस्थापित करणारी सामग्री उपलब्ध झाली हेही या संशोधनाचे एक महत्त्वाचे फलित मानण्यास प्रत्यवाय नसावा.

## २. यादवपूर्वकालीन मराठीचे रूपदर्शन

अरे बोलीची ध्वनिव्यवस्था आणि रूपप्रक्रिया यांनी तर मराठी व तिच्या पूर्ववर्ती भाषांच्या प्रकृति-पिंडावर निराळाच प्रकाशझोत टाकला आहे. या बोलीच्या उच्चार-प्रक्रियेत आणि रूपव्यवस्थेत एक निश्चित अशी शिस्त आढळून आली. या उपेक्षित बोलीने महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश यांचे उच्चारविशेष आश्चर्यकारक रीत्या जपून ठेवले आहेत. या बोलींच्या तुलनेने यादवकालीन मराठी भाषा निराळ्या दिशेने प्रगत झालेली दिसून येते. अरे बोलीने मात्र महाराष्ट्री प्राकृताची ध्वनिव्यवस्था कायम ठेवली आहे. हे वैशिष्ट्य लक्षात घेतले म्हणजे अरे बोली ही यादवकालीन मराठी पेक्षा महाराष्ट्री प्राकृत यांना अधिक जवळची असल्याचा प्रत्यय येतो. ती इतकी की या बोलीस मराठी भाषेची बोली मानावयाची की प्राकृत-अपभ्रंशाची उत्तरावस्था हा संभ्रम पडतो. अरे बोली ही प्राकृत-अपभ्रंशाच्या व्याकरणाचेच अनुसरण प्राधान्याने करते. **प्राकृत-अपभ्रंशापासून पृथगात्म**

**होऊ लागलेली व वाङ्मयीन भाषेचे प्रौढ स्वरूप धारण करण्यापूर्वीची मराठी भाषेची अवस्था अरे बोलीने वर्तमान काळापर्यंत जतन करून ठेवली आहे.** म्हणूनच मराठी भाषेच्या विकासात अरे बोलीच्या स्वरूपविशेषांचे स्थान अत्यंत मोलाचे ठरते.

अरे बोली व्याकरणाच्या-प्राकृत व्याकरणाच्या-नियमांनी निबद्ध असल्याचे सिद्ध झाल्यामुळे बोली स्वैर व नियमरहित असते हा गैरसमज देखील आपोआप दूर होतो. अरे बोलीला निश्चित असे व्याकरण आहे. प्राकृत-अपभ्रंशांच्या व्याकरणाची किती तरी सूत्रे या बोलीच्या भाषाव्यवहारात अनुस्युत असल्याचे साधार विवरण अगोदरच्या अध्यायांतून येऊन गेले आहे.

> एका उपेक्षित बोलीच्या स्वरूपाविषयीच्या जिज्ञासेतून सुरू झालेल्या या अभ्यासाच्या योगाने अरे बोलीच्या स्वरूपाचा उलगडा तर झालाच. त्याबरोबरच महाराष्ट्री प्राकृतापासून ते मराठी भाषेच्या उदयापर्यंतच्या निरनिराळ्या अवस्थाही या निमित्ताने प्रथमच प्रकाशात आल्या.

मूळ मराठी भाषिक टापूत वस्ती करणारे मराठे तेलंगणाच्या भागात वसाहतीच्या निमित्ताने कोणत्या काळात आले असावेत याचा शोध घेताना आंध्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक संबंध आणि त्यांची परस्पर देवाणघेवाण यांचा ही मागोवा घेणे क्रमप्राप्त ठरले. अगदी शेजारी असलेले हे दोन भिन्नभाषिक विभाग आज एकमेकापासून जेवढे दुरावलेले दिसतात तेवढे, दळण-वळणाची साधने प्रगत नसलेल्या काळात, ते अलिप्त नव्हते हे मराठी भाषिकांच्या स्थलांतराची पार्श्वभूमी शोधताना निदर्शनास आले. प्रारंभीच्या अध्यायांतून आंध्र-महाराष्ट्राच्या इतिहासकालीन संबंधांचे विवेचन करण्यात बारने आहे.

कर्तृत्वास नवी क्षितिजे लाभावीत आणि क्षात्रवृत्तीस अनुकूल अशी संधी प्राप्त व्हावी या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन मराठ्यांनी तेलंगणात स्थलांतर केले. या समाजाने स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर निर्जन प्रदेशात नव्या वसाहती वसविल्या, गावगाडा उभा केला, वतनदाऱ्या संपादन केल्या आणि संमिश्र समाजात स्वतःसाठी मानाचे स्थान निर्माण केले. क्षात्रवृत्ती आणि वंशश्रेष्ठत्वाची प्रखर जाणीव या कर्तृत्वास प्रेरक ठरली. मराठी भाषा आणि मराठी परंपरा यांची जोपासनाही शतकानुशतके या समाजाने केली ती या प्रखर जाणीवेतूनच. मूळ भूमीशी कित्येक शतके संबंध उरलेला नसताही या समाजाने आपले मराठीपण उध्वस्त होऊ दिले नाही.

बहुसंख्य तेलुगू भाषिकांच्या वर्तुळात एखाद्या बेटासारखा विखुरलेला अरे मराठा समाज मराठी भाषा व मराठी परंपरा टिकवून आहे तो आत्मसंमानाच्या प्रखर बळावर. आपले कुल आणि भाषा व परंपरा यांचा रास्त अभिमान बाळगूनही अरे मराठा दुरभिमानी बनला नाही याचे श्रेय सामंजस्याच्या दणकट पायावर उभ्या असलेल्या नेतृत्वास दिले पाहिजे. या संमजसपणाचा उगम क्षात्रधर्माच्या परिपालनाच्या व्यापक जाणीवेत असण्याची शक्यता आहे. पुढे व्यापक समाजहिताची जोड लाभल्याने मराठी भाषा आणि मराठी परंपरा कौटुंबिक परिसरात कायम ठेवूनही अरे मराठा समग्र समाजजीवनाशी एकरूप झाला. तेलंगणात तो स्वतःला परका मानत नाही त्याचप्रमाणे तेलुगू समाजही त्याला परका लेखत नाही. या व्यापक सामाजिकतेचाच

परिपाक म्हणजे अरे मराठा समाजाचे द्वैभाषिकत्व. या समाजाची ‘मऱ्हाटी’ ही ‘कुलभाषा’ आहे तर तेलुगू ही ‘‘स्वभाषा’’.

**३. सामाजिक एकात्मतेचा आदर्श**

या पुरातन राष्ट्रात कोणे एके काळी धनधान्यादिकांची समृद्धी होती अशा गौरवगाथा अनेकांनी लिहून ठेवल्या आहेत. वर्तमानकाळी या राष्ट्राला पुरातन समृद्धीचा वारसा लाभला नाही. या राष्ट्राला वारसादाखल मिळाली ती जाती-जमातीच्या भेदांची विपुलता. स्वातंत्र्यपूर्व काळात जातीभेदांचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न अत्यंत कसोशीने झाले. हेच प्रयत्न तेवढ्याच निष्ठेने स्वातंत्र्योत्तर काळात चालू राहिले असते तर वारशादाखल आलेली जातिभेदांची विपुलता बरीच सीमित करता आली असती. दुर्देवाने स्वराज्यात सत्ता काबीज करण्याचे राजकीय पक्षोपपक्षांचे जे राजकारण उसळले त्यात जातिभेदांना अप्रत्यक्षपणे जीवदानच मिळत गेले. सामाजिक विषमतेचा नायनाट करण्याच्या घोषणा सर्वच पक्ष करतात. परंतु निवडणुकांच्या राजकारणात घोषणा आणि कृती यांचा मेळ बसतोच असे नाही.

असलेले भेद कमी होते म्हणून की काय भाषावर प्रांतरचनेनंतर दोन नव्या जमाती समाज जीवनात उदयास आल्या भाषिक बहुसंख्य आणि प्रादेशिक समाज. या दोन्ही जमाती प्रच्छन्न राष्ट्रवादाचे स्वरूप धारण करतील की काय अशी परिस्थिति निर्माण होऊ पहात आहे. या दोन नव्या जमाती राष्ट्राच्या अखंडतेस बाधक ठरण्याची संभाव्यता दृष्टिआड करता येत नाही. राष्ट्रीयत्वाचे संगोपन करण्याच्या दृष्टीने सर्वच जाति-जमातींची-नव्या जमातीसह-धडक रोखण्याची आवश्यकता आहे.

वर्तमान परिस्थितीच्या या पार्श्वभूमीवर अरे-मराठा समाजाच्या भाषिक आणि सांस्कृतिक जीवनातून एक नवा आदर्श उपलब्ध होऊ शकतो असे नमूद करावेसे वाटते. तेलंगणातील मागास वर्गात आणि एका दृष्टीने भाषिक अल्पसंख्यांक जमातीत मोडणाऱ्या अरे मराठा समाजाने आपल्या पृथागात्मतेस बाध न येऊ देता सामाजिक एकात्मतेचा वस्तुपाठ घालून दिला आहे. या समाजाचे द्वैभाषिकत्व आणि तेलुगू समाजजीवनाशी असलेली एकरूपता राष्ट्रीय जीवनाच्या प्रचलित विसंवादात संवादित्वाचा, एकात्मतेचा आशावाद दृढ करण्यास साहाय्यभूत ठरतात.

—प्रस्तुत अभ्यासाची हीही एक अप्रत्यक्ष फलश्रुती नमूद करण्यास प्रत्यवाय नसावा.

∫∫∫

अनुक्रमणिका

## प रि शि ष्टे

### [अ] आख्यात विभक्ती

आख्यात विभक्तीचे विवेचन ६ व्या अध्यायात आले आहे. तत्त्वतः पाच आख्याते या बोलीत असली तरी (वर्तमान, भूत आणि भविष्य हे तीन काळ व विध्यर्थ आणि आज्ञार्थ हे दोन अर्थ) वर्तमान, भूत आणि भविष्य या तीन काळांचीच रूपे अधिक प्रचारात आहेत. अभ्यासाच्या अधिक सोयीसाठी प्रत्येकी १५ वाक्ये पुढे देण्यात येत आहेत. आख्याताच्या निमित्ताने वाक्यातील इतर घटकांचाही अभ्यास करता येईल.

#### वर्तमान काळ

१. **गायी दुद्दु देतो** (गाय दुध देते).
२. **मइसी कुडा दुद्दु देती** (म्हैस देखील दुध देते).
३. **दुद्दातुनु धइ होतं** (दुधातून दही होते).
४. **ताकु अंगाला बरं (ऱ्हातं)** (ताक आरोग्याला चांगले असते).
५. **लोनी कडल्यानं तूपु होतं** (लोणी कढविल्याने तूप होते).
६. **गाईच्या लेंकराँसु वाँसरू मनित्तं** (गाईच्या बछड्यास वासरू म्हणतात).
७. **कालवडु थोल्ली होइल्यानं तेला गाई मनित्तं** (कालवड मोठी झाल्यावर तिला गाय म्हणतात).
८. **पाडा थोल्ला होइल्यानं बइलु** (पाडा मोठा झाल्यावर तो बैल होतो).
९. **गाइचं सेनचं गवरू करतं** (गाईच्या शेणाच्या गवऱ्या करतात).
१०. **सेनाचं गवरू भिन्तीला बडितं** (शेणाच्या गवऱ्या भिंतीला थापतात).
११. **आमेंच घरासु रंदनासु गवरे ऱ्हातं** (आमच्या घरी स्वयंपाकाला गवऱ्या असतात).
१२. **दुद्दु मनल्यानु मियाँ जीउ सोडित** (दुधावर माझा फार जीव. मला दुध फार आवडते).
१३. **भुञ्जीसु ताकु पीडसं वाटनं** (मुलीला ताक प्यावेसे वाटत नाही).
१४. **मँजरू दुद् लइ पीतीया** (मांजर दुध फार पिते).
१५. **कुस्टासु लोनी भले इष्टमु** (कृष्णाला लोणी फार आवडते).

#### भूतकाळ

१. **बइलाहीनं वावरू लांगरलं** (बैलांनी वावर नांगरले).
२. **वावरू लांगरल्यावरे पाऊसु पल्डा** (शेत नांगरल्यावर पाऊस पडला).
३. **पाऊसु पडल्यावरे बी पेरल्यातं (लोकाँहीन)** (पाऊस पडल्यावर बी पेरले).
४. **माजं सेताँतु जोन्नले पेरल्यातु** (माझ्या शेतात जोंधळे पेरले).
५. **तेच रानाँतु तुरी पेरूनि** (त्याच्या शेतात तुरी पेरल्या).
६. **अवंदा देवाचं धरमानं पाऊसु भर पल्ड या** (या वर्षी देवाच्या दयेने पाऊस खूप पडला).

अनुक्रमणिका

७. **पाऊसु पडल्यानं कुनब्याँसु कवतिक होइला** (पाऊस पडल्याने शेतकऱ्यास आनंद झाला).
८. **येलंला पाऊसु पडल्यानं पीकु चोक्कटु पिकला** (वेळेवर पाऊस पडल्याने पिके चांगली पिकली).
९. **काल लोपु होइनं त दुकलु येउनि** ([वर्षा] काळाचा लोप झाला तर दुष्काळ पडेल).
१०. **कनकम्मा जुन्दल्याचं भकरी करली/केलीया** (कनकम्माने जोंधळ्याची भाकरी केली).
११. **रामोजी कापुसु बाजारांतु इकला** (रामोजीने कापूस बाजारात विकला).
१२. **संकरराऊ जुंदल्याचं रासु भरला** (शंकररावाने जोंधळ्याची रास भरली).
१३. **नागोजी तुरीचं खल्लं केला** (नागोजीने तुरीचे खळे केले).
१४. **याही दुद्दॉसु गाइ देला** (व्याह्याने दुधासाठी गाय दिली).
१५. **सौंदरी अन्ता गावाँसु जाउनु** (सुंदरी आता गावाला गेली).

**भविष्यकाळ**

१. **येयाचं धारू पाऊसु पडत्तं** (येत्या वारी पाऊस पडेल).
२. **रामय्या उन्द्या वावराँसु जाऊनु** (रामय्या उद्या शेताला जाईल).
३. **तू सेतावरे कन्दी जाचू?** (तू शेताला कधी जाणार?).
४. **मियाँ परमाँ सेताला जान्तं** (मी परवा शेताला जाईन).
५. **तुमी अमँचा गावाँसु येशा?** (तुम्ही आमच्या गावाला याल?).
६. **नरसम्मा परमाँ न्हाइ कालु शारासु गेली असुचे** (नरसम्मा परवा नाही काल शहराला गेली असेल).
७. **आंब्याचं जाडु कम्मा फुलाला येतं** (आंब्याच्या झाडाला मोहोर कधी येईल?).
८. **गोविंदराऊ अंता गावाँतु न्हाउचे** (गोविंदराव आता गावात असतील).
९. **रामराऊ येन्याँतु आलसु होतं** (रामरावाला येण्यास उशीर लागेल).
१०. **रामक्का येम्लडीस कव्या जातीया** (रामक्का बेमलवाड्यास कधी जाणार?).
११. **कँदीबी कुनयबंसु दइवं येत्तं** (कुणब्याला कधी तरी भाग्य येईल).
१२. **या देसाँतु मऱ्हाट कुळाचं नाँऊ ऱ्हात** (या देशात मराठी कुळाचं नाव राहील).
१३. **माधुरी चक्कोटु गीतु गावितचं?** (माधुरी चांगले गीत गाईल?).
१४. **खल्लं तम्मा तुमी सेतावरे-हाउशे?** (खळ्याच्या वेळी तुम्ही शेतावर असाल?).
१५. **ये गावचं सरपंचु परमाँ येत्तं** (या गावाचा सरपंच परवा येईल).

अनुक्रमणिका

## [आ] प्रयोग व्यवस्था

अरे बोलीत फक्त कर्तरि प्रयोगच आढळतो हे पूर्वी नमूद केले आहेच. या विशेषाची अधिक कल्पना यावी या हेतूने सकर्म व अकर्मक क्रियापदांनी युक्त असलेली काही वाक्ये देण्यात येत आहेत :

**अकर्मक धातु 'जा'**

| **पुल्लिंगी कर्ता** | | **स्त्रीलिंगी कर्ता** |
|---|---|---|
| | **वर्तमानकाळ** | |
| **मियाँ घरासु जाला/जातं** | | **मियाँ घरासु जाली/जाती** |
| **तेन घरासु जाला/जातं** | | **तिनं घरासु जाली/जाती** |
| | **भूतकाळ** | |
| **मियाँ घरासु जाइला** | | **मियाँ घरासु जाइली** |
| **तेन घरासु जाइला** | | **तेनं घरासु जाइली** |
| | **भविष्यकाळ** | |
| **मियाँ घरासु जात्तं** | | **मियाँ घरासु जात्ती** |
| **तेनं घरासु जात्तं** | | **तिनं घरासु जात्ती** |

**सकर्मक धातू 'कर'**

| | | |
|---|---|---|
| | **वर्तमान काळ** | |
| **मियाँ कामु कराला/करितं** | | **मियाँ कामु कराली/करिती** |
| **तेनं कामु कराला/करितं** | | **तिनं कामु कराली/करिती** |
| | **भूतकाळ** | |
| **मियाँ कामु करिला** | | **मियाँ कामू करली** |
| **तेन कामु करलं** | | **तिनं कामु करली** |
| | **भविष्यकाळ** | |
| **मियाँ कामु करित्तं** | | **मियाँ कामु करित्ती** |
| **तेन कामु करित्तं** | | **तिनं कामु करित्ती** |

**प्रयोग व्यवस्था : काही अधिक उदाहरणे**

१. **लोकु गाँमाँसु जाल्यातु** (लोक गावला जातात)
२. **लोकु गाँमाँसु गेल्तं** (लोक गावाला गेले)
३. **लोकु गाँमाँसु जात्तं** (लोक गावाला जातील)
४. **रामु आमँचं भावाचं लेंकु हा** (राम आमच्या भावचा मुलगा आहे)

अनुक्रमणिका

५. **येनी आमँचं भावाचं लेंकु हातं** (ही आमच्या भावाची मुले आहेत)
६. **बाइलेंकी शाराला गेल्यातु** (मुली शहराला गेल्या)
७. **सीता सुइनं बट्टं सिवली** (सीतेने सुईने कपडे शिवले)
८. **मियाँ नई होउनु आला** (मी नदीहून आलो)
९. **अमी तल्लयान्तु उतरलामु** (आम्ही तळ्यात उतरलो)
१०. **तू तर ऱ्हाइल्यानं मियाँ नासरे देतं** (तू राहिलास तर मी पैसे देतो)
११. **हनुमन्तु ओखदु अनित्तं** (हनुमंत औषध आणील)
१२. **मन्दोदरी रावणाँसु उपदेसु करली** (मंदोदरीने रावणास उपदेश केला)
१३. **लक्शुमी इस्नूचं बाइकु ऱ्हाती** (लक्ष्मी विष्णूची बायको आहे)
१४. **जोन्नलं भर पंटा आलं** (ज्वारीचे पीक भरले)
१५. **आमी शारापुनु आल्यामु** (आम्ही शहराहून आलो)

## [इ] संकीर्ण वाक्य-संग्रह

वेगवेगळ्या सात स्तरांवरील आणि भिन्न विषयाशी संबंधित अशी काही वाक्ये पुढे देण्यात येत आहेत. वाक्य-रचनेबरोबरच अरे समाजाच्या जीवनाच्या काही अंगांचा परिचय ही त्यायोगे होईल.

### गट १

१. **ये मज्ञं बापु** (हा माझा बाप)
२. **ये मज्ञं माय** (ही माझी आई)
३. **ये माजं लेंकु** (हा माझा मुलगा)
४. **ये मज्ञं लेंकी** (ही माझी मुलगी)
५. **मज्ञं तीन लेंकी हाती** (मला तीन मुली आहेत)
६. **तुजं लेंकु आलं** (तुझा मुलगा आला)
७. **तुजं लेंकी आलीया** (तुझी मुलगी आली)
८. **तेचं पाँचु लेंकी हाती** (त्याला पाच मुली आहेत)
९. **मज्ञं दोनु बायलेंकी हाती** (मला दोन मुली आहेत)
१०. **तेचं लेंकी कम्माँ येत्ती** (त्याची मुलगी कधी येईल)
११. **तिनं घराँसु आली** (ती घरी आली)
१२. **तेन गामाँसू गेलं** (तो गावाला गेला)
१३. **त्याहीन अन्ता आलं/आल्याती** (ते आता आले)
१४. **आमी देवळात जातुत** (आम्ही देवळात जातो)
१५. **तित्तं पूंजा बांदनामु** (तिथे [आम्ही] पूजा करतो)

अनुक्रमणिका

### गट २

१. **ये कुत्रं हाय** (हा कुत्रा आहे)
२. **तित्तं दोन कुत्रं हाती** (तिथे दोन कुत्रे आहेत)
३. **तित्त दोनु कुत्रंनु येकु मंजरू हा** (तेथे दोन कुत्रे व एक मांजर आहे)
४. **कुत्रं भुक्कंतं** (कुत्रा भुंकतो)
५. **कुत्रं मंजरावरे भुक्कंतं** (कुत्रा मांजराला भुंकतो)
६. **ये चिम्न घरू माजं ऱ्हात** (हे लहान घर माझे आहे)
७. **ये थोल्लं घरू शावकाराचं** (हे मोठे घर सावकाराचे)
८. **ये पीलं हवेली पाटलाचं ऱ्हातं** (हा पिवळा वाडा पाटलाचा आहे)
९. **ये बंगलाभीतर्री नेता ऱ्हातं** (या बंगल्यात पुढारी राहतो)
१०. **त्याहीचं घरू खपरीचं** (त्याचं घर कौलारूचं)
११. **तिचं घर जवळि गुडी हा** (तिच्या घराजवळ देऊळ आहे)
१२. **आमँच घर सम्बोरू हाटु ऱ्हातं** (आमच्या घरासमोर बाजार आहे)
१३. **मजं मामानं ये घरू बांदला** (माझ्या मामाने हे घर बांधले)
१४. **तेला सासुरडीचं घरू अंदनु आला** (त्याला सासुरवाडीचे घर आंदन आले)
१५. **रामक्का थोल्ल्या घरीचं सूनु** (रामक्का मोठ्या घरची सून)

### गट ३

या गटातील वाक्ये प्रश्नोत्तरात्मक आहेत हे लक्षात येईलच.

| | | |
|---|---|---|
| १. | तुजं नाँऊ? | **महाचं नाँऊ रामय्या.** |
| २. | बापुचं नाँऊ? | **बापुचं नाँऊ राजन्ना** |
| ३. | घरचं नाँऊ? | **घरचं नऊ सिंद्यांचे** |
| ४. | ऱ्हातं कुट्टं? | **येम्लडी ऱ्हातं.** |
| ५. | तुज्नं भाऊ केत्ति? | **दोग्गं.** |
| ६. | भइनी कित्ते हातं? | **तिग्गी.** |
| ७. | तुज्नं चुलतं केत्ती? | **पाँचु.** |
| ८. | तुज्नं आज्नीली कुट्टं? | **नरसक्कापल्ली** |
| ९. | मामा हातं? | **हातं साजनु.** |
| १०. | मामॉसु लेंकरं? | **दोनी लेंकु, येकु बायलेंकी.** |
| ११. | भावाचं वराड जालया? | **येक्याचं जालं** |
| १२. | भाऊजाई कुट्टलं? | **अरेपल्लीचं.** |
| १३. | तुजं माऊसी कुट्टं ऱ्हातं? | **हुजूराबादी.** |
| १४. | तुजं अत्याचं गॉमु कोनु? | **बिज्नंकी.** |
| १५. | तू कां करतं? | **कुणबाऊ.** |

अनुक्रमणिका

**गट ४**

१. **मज्ञं धा येकरू भुई हा** (मला दहा एकर जमीन आहे)
२. **वावराँतु हीर हा** ([माझ्या] शेतात विहीर आहे)
३. **हीरीवरे मोटु हा** (विहिरीवर मोट आहे)
४. **मोटंसु बोकनु नु सोंडू ऱ्हातं** (मोटेला बोकना आणि सोंड असते)
५. **मोटंचं दांडालू जुवॉसु बांदितुम्** (मोटेचा नाडा जुवासबांधतो [आम्ही])
६. **तेला धाकलं चऱ्हॉटु कुडा ऱ्हात** (त्याला सौदड देखील असतो)
७. **दोनी बइलु मोटु वडितं** (दोन बैल मोट ओढतात)
८. **बइलॉसु साप्ते लाउनु जुंपितं** (बैलाला जोते लावून जुंपतो [आम्ही])
९. **बइलु बारीवरे मागं फुडं पडत्तं** (बैल धावेवर मागेपुढे फिरतात)
१०. **मोटचं पानी बोजरी ऑतु पडत्तं** (मोटेचे पानी थारोळ्यात पडते)
११. **तित्तनु कालव्या वॉट पानी जातं** (तेथून दांडाने पाणी जाते)
१२. **अन्ता अन्ता मोटचं लइ काम ऱ्हाइनं** (आता आता मोटेचे काम पडत नाही)
१३. **पानी कायकी करंटु लाऊनु देत्तं** (विजेच्या योगाने पाणी देतो [आम्ही])
१४. **मजं वावरॉतु मुसारदारू काम करित्तं** (माझ्या शेतात मजूर काम करतात)
१५. **मला का की वावरॉतु राबायीना** (मला शेतात राबता येत नाही)

**गट ५**

१. **अँता उन्नाला हा** (आता उन्हाला आहे)
२. **अदगुरू हिम्माला ऱ्हाइलं** (अगोदर हिवाळा होता)
३. **उन्नाला होईलवरे वर्सा येतं** (उन्हाळा झाल्यावर पावसाळा येतो)
४. **वर्सा व्हाया मुन्दु अव्वालु येतं** (पावसाळा होण्यापूर्वी ढग येतात)
५. **मिरूत्र पडिल्यावरे कापूस पेरितं** (मृगाचा पाऊस पडल्यावर कापूस पेरतात)
६. **वाडिवा टिपुनु भरितं** (सुतार तिकण भरतो [तयार करतो])
७. **पायाचं मोटु सिवतं** (चांभार मोट शिवतो)
८. **आमी वाडियॉसु भीकु देतुमु** (आम्ही सुताराला बलुते देतो)
९. **वट्टी कुडा भीकु नेइतं** (वरठी [परीट] देखील बलुते नेतो)
१०. **कापूसचं जाडॉसु पऱ्हॉटी मानत्तं** (कपाशीच्या रोपास पऱ्हाटी म्हणतात)
११. **तुरीचं जाडॉसु तुऱ्हॉटी बोलित्तं** (तुरीच्या रोपाला तुऱ्हाटी म्हणतात)
१२. **आमी कापुसु येचुनु काडतुमु** (आम्ही कापूस वेचतो)
१३. **तूरू काइकी इलेनं कोसितुम्** (तूर मात्र विळ्याने कापतो)
१४. **कानि कॉकडा खंटी करूनु गेतुम्** (परंतु शेंगदाणे मात्र खोदून काढतो)
१५. **आमँचु रानु एकवार फावावं** (आमचे शेत एकदा पहा)

अनुक्रमणिका

**गट ६**

१. **ये बइलबंडी ऱ्हातं** (ही बैलगाडी आहे)
२. **धाकल्या बंडीसु खासरु मनित्तं** (लहान बैलगाडीस खासर म्हणतात)
३. **बइलबंडीसु येकु जू, येकु हुरबुडे ऱ्हातं** (बैलगाडीस एक जू आणि एक वेठण [चामड्याचे] असते)
४. **बइलासु काँसरा ऱ्हातं** (बैलाला कासरा [लावलेला] असतो)
५. **अडताँसु अलीसु ऱ्हातं** (औताला पास असते)
६. **ते दी चक्कोटु ऱ्हावं, चक्कोटु बोलावं** (त्या दिवशी चांगले रहावे, चांगले बोलावे)
७. **टिपनीसु तीन सरे टेविताम्** (तिफणीला तीन मोगे ठेवतो)
८. **धाकल्या कुलवावरे तीन मानसं ऱ्हातं** (कोळप्यावर तीन माणसे असतात)
९. **सिंद्याचं रानाँतु घऊ पिकतं** (शिंद्यांच्या शेतात गहू पिकतो)
१०. **आमॉच वावराँतु सालोन हाय** (आमच्या शेतात साळवण आहे)
११. **जोन्नले पंटा आले हाती** (जोंधळे पिकास [कापणी] आले आहेत)
१२. **आमॅच रानाँतु खल्लं लागलंया** (आमच्या शेतात खळे लागले आहे)
१३. **रामराऊनं/रामराऊ मदनु उद्दलितं** (रामराव मंदन उधळतो.)
१४. **उद्दलिनं तम्मा रासु होइल्तं** (उधळणे झाल्यावर रास होईल)
१५. **रासु मेजुनु बइलबंडीतु भरित्तं** (रास मोजून बैलगाडीत भरतात)

**गट ७**

१. **उगादी आमँचु थोल्लं सनु** (पाडवा आमचा मोठा सण)
२. **ते दि नव्वं बट्टे नेसतुम्** (त्या दिवशी [आम्ही] नवे कपडे घालतो)
३. **नव्वं बट्ट वस्त्रं नेसुनु देवाचं पाय पडतुम्** (नवे कपडे घालून [आम्ही] देवाच्या पाया पडतो)
४. **तर्वाता देवाँसु बोनं वातुम्** (नंतर आम्ही देवाला नैवेद्य दाखवितो)
५. **ते जालियावरे घराँसु येउनु पोली जेवतृम्** (ते झाल्यावर घरी येऊन [पुरण] पोळीचे जेवण करतो)
६. **ते दी चक्कोटु ऱ्हावं, चक्कोटु बोलावं** (त्या दिवशी चांगले रहावे, चांगले बोलावे)
७. **उगादी होइन ते दिसी कुन्नाला काइ देइनं** (पाडवा असेल त्या दिवशी कोणाला काहीही देऊ नये)
८. **बइलाचं पोळा अञ्जू येकू थोल्ला पंडगा** (बैलाचा पोळा आणखी एक मोठा सण)
९. **ते दी बइलॉसु चक्कोट अंगू धुइत्तं** (त्या दिवशी बैलाला चांगले स्वच्छ स्नान घालतात)
१०. **घँटा घागरू गालुनु पूंजा बॉदितुम्** (घागरमाला घालून [बैलाची] पूजा आम्ही करतो)
११. **ते दिमी बैइलॉसु काइ कामु न्हाई** (त्या दिवशी बैलास काही काम नसते)
१२. **वावराँतु थोल्ला सनु पांडवाचं** (शेतातला मोठा सण पांडवांचा)
१३. **रानॉतु पॉचु दगोड्डु बांडिताम्** (शेतात पाच दगड [आम्ही] मांडतो)
१४. **तेला बोट्टु लावुनु बोनं दावताम्** (त्याला कुंकू लावून नैवेद्य दाखवितो [आम्ही])
१५. **मऱ्हाट कुलॉतु दसरा ऱ्हाइनं तम्मा भवानी पूंजा ऱ्हातं** (मराठे कुळात दसरा असतो त्यादिवशी भवानीची पूजा असते)

∫∫∫

# तृतीय खंड

# अभ्यासाची मूळ साधने

अनुक्रमणिका

## मूळ साधनांचा अभ्यास

पहिल्या दोन बंडांत करण्यात आलेल्या विवेचनाचे दृढीकरण व्हावे आणि जिज्ञासूंना अधिक अभ्यास करण्यास चालना मिळावी या दुहेरी हेतूंनी या तिसऱ्या बंडांत अभ्यासाच्या मूळ साधनांचा समावेश करण्यात आला आहे. या साधनांच्या आधाराने अभ्यासकास मूळ ग्रंथातील विवेचन पडताळून पाहता येईल. बाल्यावस्थेत असलेल्या मराठी बोलींच्या अभ्यासास देखील या साधनांच्या योगे मार्गदर्शन मिळण्याची शक्यता आहे.

**१. शब्दसंग्रह :** शब्दकोश ग्रंथाच्या शेवटी देण्याची प्रथा आहे. परंतु तसे न करता साधनांच्या संकलनात शब्द-संग्रह प्रथम देण्यात आला आहे. अरे बोलीतील शब्दांचे अर्थ देणे एवढे मर्यादित स्वरूप या संग्रहास नाही. या बोलीतील शब्द मराठी भाषेच्या प्रारंभकाळातील काही जन्मखुणा अंगावर धारण करताना दिसेल-प्राकृत-अपभ्रंशाची त्याची जवळीक, प्रकृति–प्रत्यय आणि उच्चार यांच्या दृष्टीने त्याचे वेगळेपणा, इत्यादी अनेक बाबींच्यामुळे अरे बोलीतील शब्दसंग्रह देखील स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. म्हणूनच मूळ साधनांच्या संकलनात त्याला अग्रस्थान दिले आहे. चौथ्या प्रकरणाच्या संदर्भात शब्दसंग्रहाचा अभ्यास विशेष लाभदायक ठरावा.

**२. लोकगीते :** कोणत्याही भाषेचे–म्हणूनच बोलीचेही–अक्षय्य भांडार या नात्याने लोकगीतांस महत्त्वाचे स्थान असते. प्रथम खंडात आलेल्या सांस्कृतिक जीवनाच्या संदर्भात लोकगीतांचे अध्ययन पूरक ठरेल. भाषेच्या अंगानेही लोकगीतांचे महत्त्व वादातीत असतेच.

**३. लोककथा :** लोकधारणा, सामाजिक आकांक्षा आणि पुरातन परंपरा यांचा आलेख लोककथांत प्रतिबिंबित होत असतो. भाषेचे अकृत्रिम पण ढंगदार स्वरूप लोककथांत सहजगत्या आढळते. अरे बोलीतील दोन कथा त्या दृष्टीने उद्‌बोधक ठरतील.

**४. अरे बोलीच्या क्षेत्राबाहेरील मराठी बोली :** महाराष्ट्रापासून दूर परंतु अरे बोलीच्या क्षेत्राबाहेर असलेल्या मराठी बोलीचे नमुने तुलनात्मक. अध्ययनास उपयुक्त ठरावेत या हेतूने दिले आहेत.

अनुक्रमणिका

# अरे-मराठी बोलीतील शब्दसंग्रह

**१. शब्दसंग्रहाचे स्वरूप; २. भाषेच्या क्रमविकासाची सामग्री; ३. भाषा : एक अखंड प्रक्रिया; ४. शब्दनोंदणीची पद्धती; ५. शब्द-संग्रहातील ग्रंथ संक्षेप.**

अरे-मराठी बोलीचा हा शब्दसंग्रह केवळ शब्दार्थ देण्याच्या हेतूने संगृहीत करण्यात आलेला नाही. भाषाशास्त्रीय अभ्यासास आवश्यक असलेली सामग्री उपलब्ध करून देणे हेही उद्दिष्ट हे संकलन करताना दृष्टीपुढे ठेवण्यात आले आहे. या संग्रहात केवळ मूळ शब्दांचाच अंतर्भाव केलेला नाही. शब्दांची निरनिराळी रूपे आवश्यक त्या स्पष्टीकरणासह देण्यात आली आहेत. बोलीत रूढ असलेले वाक्प्रचार निराळे न देता अन्य शब्द/रूप संग्रहाबरोबरच अकारविल्हेने दिले आहेत.

## १. शब्दसंग्रहाचे स्वरूप

अरे-मराठी बोलीचा हा संपूर्ण शब्दकोश नाही हे प्रथमच नमूद केले पाहिजे. आंध्रप्रदेशातील तेलंगण विभागात मोडणाऱ्या वरंगल आणि करीमनगर या दोन जिल्ह्यांतून गोळा केलेली ही शब्दसामग्री आहे. शहरांपासून बऱ्याच अंतरावर असलेल्या व दळणवळणाच्या आधुनिक साधनांचा अभाव असलेल्या वाड्यांची-वसाहतींची निवड हेतुपूर्वक करण्यात आली. अशा भागात आढळलेली ही सामग्री आहे. शहरांतून व मोठ्या गावांतून वसाहती करणारा अरे मराठा समाज आपल्या मातृभाषेला दुरावत चाललेला दिसून येतो. शहरांत स्थायी झालेली व चाळिशीच्या आसपास असलेली पुरुषमंडळी आपली मातृभाषा अस्खलित बोलण्यास असमर्थ असलेली आढळली. इतरांनी बोललेले त्यांना चांगल्या रीतीने समजते. आज विशीत असलेल्या पिढीला मात्र आपण मराठी. भाषिक आहोत एवढाच काय तो अभिमान! तदनंतरच्या पिढीचा, शहरात सातत्याने निवास असल्याने, मराठी बोलीशी परिचय अगदीच बेताचा आहे.

ग्रामीण भागात मात्र तसे नाही. सभोवतालचे वातावरण पूर्णपणे तेलुगूमय असले तरी, घरा-दारांतून, वाड्या-वस्त्यांतून मराठीचा वापर भरपूर आहे. आडवळणीच्या गावातून तर तो अधिक मुबलक प्रमाणात आढळतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वरंगल जिल्ह्याच्या एका टोकाला असलेले अपरेउपल्ली हे सुमारे दोन-अडीचशे घरांचे खेडे आणि करीमनगर जिल्ह्यातील दुसऱ्या टोकाला असलेली विज्ञंकी ही वाडी मराठवाड्यातील ग्रामीण माणसाची बोली बोलते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शक्यतो आडवळणाच्या गावांची निवड शब्दसामग्री गोळा करण्यासाठी केली. अशा सुमारे ४६ स्थळांतील तीनशे-साडेतीनशे स्त्री-पुरुषांच्या भेटी-गाठीतून, सामाजिक व धार्मिक व्यवहारातून व शेतीसारख्या व्यवसायाच्या द्वारे जी शब्द-सामग्री एकत्रित करण्यात आली तिचा संग्रह या ठिकाणी देण्यात येत आहे.

या शब्दसामग्रीनेच बोलीच्या अभ्यासाच्या नवनवीन दिशा पुरविल्या. मराठी भाषेच्या व्युत्पत्तीच्या दृष्टीने दूरगामी स्वरूपाचा सिद्धांत प्रस्थापित करता आला तोही या सामग्रीच्या बळावर. वैदिक-संस्कृत-महाराष्ट्री

प्राकृत आणि अपभ्रंश अशी मराठी भाषेची पूर्ववर्ती परंपरा विद्वानांनी मानली आहे. तथापि, प्राकृत आणि मराठी अथवा अपभ्रंश आणि मराठी यांचे परस्पर संबंध उलगडून दाखविण्यासाठी काही शब्द व प्रत्यय यांच्या पलिकडे फारसे संशोधन झालेले नाही. अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकताही विद्वानांना जाणवली नसावी. कारण, भाषेच्या व्युत्पत्तीचा विचार करणाऱ्या विद्वानांचे लक्ष वर्तमान प्रमाण मराठी भाषेवर केंद्रित झालेले होते. मराठी भाषेच्या कालिक भेदांचाही अभ्यास थोड्याफार प्रमाणात झाला आहे. या अभ्यासात वर्तमान प्रमाण मराठी भाषेच्या तुलनेने आढळून येणारे विशेषच प्रामुख्याने चर्चिण्यात आले आहेत.

काही अपवादात्मक प्रयत्न वगळल्यास मराठीच्या बोलींचा अभ्यास देखील बाल्यावस्थेत आहे असे म्हणावे लागेल. साहित्य-संस्कृति-मंडळाच्या पुरस्काराने प्रकाशित झालेले आठ खंड या दिशेने झालेला उल्लेखनीय प्रयत्न म्हणता येईल. या खंडातील भाषिक सामग्री एका व्यक्तीकडून मिळालेल्या माहितीवर आधारलेली आहे. भाषाविज्ञानाच्या दृष्टीने वर्णनात्मक पद्धतीचा (Discriptive Linguistics) अवलंब या खंडांतून करण्यात आला आहे. ऐतिहासिक व तुलनात्मक अभ्यास या खंडात अभिप्रेत नसल्याने ऐतिहासिक दृष्टीने या बोलींचे नाते मराठी भाषेच्या कोणत्या काळाशी निगडित होऊ शकते याचा विचार या खंडांतून आलेला नाही. जेथे काहीच नव्हते. तेथे मर्यादित का होईना सामग्री उपलब्ध झाली ही बाब समाधानकारक असली तरी तृप्तीची निश्चित नाही. अशा परिस्थितीत प्राकृत-अपभ्रंशापासून ते वर्तमान काळापर्यंत मराठी भाषेचा क्रमविकास कसा झाला याचे दिग्दर्शन करणाऱ्या अभ्यासाची अपेक्षा अवास्तव वाटणे स्वाभाविक आहे. या दिशेने केलेला एक अल्प प्रयत्न या शब्दसंग्रहात केलेला दिसेल.

### २. भाषेच्या क्रमविकासाची सामग्री

संस्कृत-महाराष्ट्री प्राकृत-अपभ्रंश आणि मराठी यांचा क्रमविकास उलगडून दाखविणे हे कार्य फार व्यापक स्वरूपाचे आहे. विद्या आणि धन यांच्या सामूहिक पाठबळावर ते पूर्णतेला जाऊ शकेल. एका पिढीत पूर्ण होणारे हे कार्य नाही. 'राजहंसाचे चालणें आदर्श असेल, म्हणून इतरांनी चालणेच सोडून द्यावे असे थोडेच आहे?' असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. मराठी भाषेच्या क्रमविकासाचा महार्णव पोहून जाणे अनेक मर्यादांचे ओझे डोक्यावर बाळगणाऱ्या माझ्या सारख्या प्रवाशाच्या शक्तिबाहेरचे असले तरी अरे-मराठी बोलीच्या अभ्यासाच्या निमित्ताने अत्यंत मर्यादित पाऊल मी टाकले आहे. या बोलीने महाराष्ट्री-प्राकृत व अपभ्रंश या भाषांतली जी रूपसंपदा जतन करून ठेवली आहे ती या शब्दसंग्रहात त्या त्या स्थळी कटाक्षाने नोंदविली आहे. भाषाभ्यासाचा महार्णव तरुन जाण्याची महात्त्वाकांक्षा बाळगणारा साक्षेपी अभ्यासक भविष्यकाळात प्रवासास प्रस्थान ठेवील त्यावेळी एक वीतभर तरी वाट झाडलेली त्याला आढळेल ही सीमित दृष्टी या खटाटोपाच्या मुळाशी आहे. चार पावलांची वाट झाडून ठेवल्याचे समाधान ही या प्रयत्नांतील माझी कमाई.

हा शब्दसंग्रह संकलित करताना महाराष्ट्री प्राकृत-अपभ्रंश व प्राचीन मराठी या अवस्थांतील जे जे धागेदोरे आढळले ते ते शब्दांच्या निमित्ताने संग्रहीत करण्यात आले आहेत.

—म्हणूनच हा केवळ शब्दार्थ-संग्रह नाही असे विधान प्रारंभी केले.

अनुक्रमणिका

अरे-मराठी बोलीच्या पाठीशी असलेली पूर्वपरंपरा स्पष्ट करण्यासाठी पुढील प्राकृत-अपभ्रंश ग्रंथांचा उपयोग तुलनात्मक अध्ययनांच्या दृष्टीने प्रामुख्याने करण्यात आला आहे.

१. हाल सातवाहन विरचित **गाथासप्तशती**- इ. स. चे १ ले शतक. [महाराष्ट्री प्राकृत]
२. जयवल्लभकृत **वज्जलग्गा**- इ. स. ७५० (सुमारे) [महाराष्ट्री प्राकृत]
३. कोऊहल विरचित **लीलावइकहा**- इ. स. ८०० [अपभ्रंश]
४. **सावयधम्मदोहा**- इ. स. १० वे शतक [अपभ्रंश]
५. महाकवि पुष्पदंत **महापुराण** विरचित- इ. स. ९५९-९६५ [अपभ्रंश]
६. मुनिकनकामर विरचित **करकण्डुचरिउ**- इ. स. १०६५ [अपभ्रंश]
७. हेमचंद्रकृत **देशीनाममाला**- इ. स. १०८८-११७२
८. हेमचंद्रकृत **कुमारपाल चरित** - इ. स. १०८८-११७२

या बोलीचे पुरातनकाळाशी असलेले नाते निश्चित करण्यासाठी प्राकृत-अपभ्रंश ग्रंथांचा मागोवा घेणे जेवढे आवश्यक होते तेवढेच प्राचीन मराठी वाङ्मयातील शब्दसंपत्तीचा शोध घेणे देखील अगत्याचे होते. त्यासाठी प्राचीन मराठी भाषेतील पुढील साधनांचा उपयोग शब्दसंग्रहाचे संकलन करताना करण्यात आला आहे.

१. शिलालेख-ताम्रपट [इ.स. च्या १० व्या शतकापासून ते १४ व्या शतकापर्यंतचे.]
२. श्रीपतिभट्ट विरचित **ज्योतिषरत्नमाला** [इ. स. चे १० शतक]
३. **लीळाचरित्र** [इ. स. चे १३ वे शतक].
४. **नामदेवगाथा** [इ. स. चे १३ वे शतक].
५. **ज्ञानेश्वरी** [इ. स. चे १३ वे शतक].
६. चोंभाकृत **उखाहरण** [इ. स. चे १४ वे शतक.]
७. **पंचोपाख्यान** [इ. स. चे १४ वे शतक]

**३. भाषा : एक अखंड प्रक्रिया**

सारांश, इ. स. च्या पहिल्या शतकापासून ते १४ व्या शतकापर्यंतच्या भाषिक प्रवाहातले जे जे विशेष अरे-मराठी बोलीत रूढ असलेल्या शब्दसामग्रीत आढळले ते ते योग्य स्थळी नोंदविले आहेत. हेतु हा की, मराठी भाषेच्या क्रमविकासात ही बोली नेमकी कोठे बसते हे लक्षात यावे. त्याच बरोबर त्या विकासाचे स्वरूप अरे बोलीच्या संदर्भात ध्यानात यावे. (सविस्तर विवेचन अन्यत्र केले आहे.)

ही बोली तेलंगणात रूढ असल्याने बहुसंख्य तेलुगू भाषिकांच्या वाणीचे संस्कार तिच्यावर झाले आहेत. या संस्काराचे विवेचन अन्यत्र केले आहे. तथापि, शब्दसंग्रहाच्या दृष्टीने पुढील बाबी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. या बोलीत तेलुगू शब्द एक तर जसेच्या तसे आले आहेत किंवा उच्चार व प्रत्ययभेदाने. काही तेलुगू प्रत्ययही या बोलीत आढळतात. तेलुगू वाक्प्रचाराचे अनुवादही रूढ असलेले आढळले. या सर्वांची नोंद त्या त्या स्थळी केली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कित्येक शतके नांदूनही या बोलीने उच्चारपद्धती आणि शब्दसंग्रह

अनुक्रमणिका

यांच्या बाबतीत तेलुगू भाषेची कमीत कमी उसणवारी केली आहे. या बोलीच्या प्रकृतिधर्माच्या दृष्टीने ही विलक्षण अलिप्तता सूचक वाटते –

भाषा ही एक अखंड प्रक्रिया आहे. प्रदेशपरत्वे व कालपरत्वे तिचे स्वरूप बदलते तसेच कालांतराने भाषा प्रवाहाचे नामांतरही होत असते. तरीही या प्रक्रियेच्या अखंडत्वात बाध येत नाही. भूतकाळात उगम पावलेला भाषाप्रवाह वर्तमान समृद्ध करतो तशीच भविष्याची धारणाही करीत असतो. इ. स. च्या सातव्या शतकात पृथगात्म होऊ लागलेला व मराठी भाषा या नावाने नावारूपास आलेला हा प्रवाह संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश यांच्या भूमीतून वहात आलेला आहे. त्या त्या भूमीचा वाण आणि गुण या प्रवाहाला लागला. हा प्रवाह आजतागायत चालू आहे. अरे बोलीचे या प्रवाहाशी असलेले नाते शब्दसंग्रहावरून स्पष्ट व्हावे.

भाषा आणि संस्कृती भिन्न मानावयाच्या की परस्परावलंबी व परस्परपूर्वक हा अलिकडच्या विद्वानांत रूढ असलेला वाद मला महत्त्वाचा वाटत नाही. शरीर आणि आत्मा यापैकी अधिक महत्त्व कोणत्या तत्त्वाचे अशा सारखाच हा वाद आहे. शब्द हे भाषेचे शरीर असले तरी शब्दांना अर्थ प्राप्त होतो सांस्कृतिक जीवनातून. कोणत्याही भाषेला प्राप्त झालेला सांस्कृतिक वारसा हा नेहमी त्या भाषेपेक्षा अधिक पुरातन असतो. अशा प्रकारचे सांस्कृतिक संकेत ज्या ज्या शब्दांच्या द्वारे सूचित झाले आहेत त्या त्या ठिकाणी केवळ शब्दार्थ न देता या संकेतांचे स्पष्टीकरणही करण्यात आले आहे.

अरे बोलीचा समग्र शब्दकोश या संग्रहात समाविष्ट नाही हे प्रारंभीच सांगितले आहे. सर्वसाधारण मराठी भाषिकांना सहज समजणारे व भाषिक वा सांस्कृतिक वैशिष्ट्य फारसे नसलेले शब्द या संग्रहात देण्यात आले नाहीत. मी घेतलेल्या मुलाखती, ऐकलेली गीते आणि श्रवण केलेल्या कथा या सामग्रीतून वैशिष्ट्यपूर्ण अशा शब्दांची/रूपांची निवड या शब्दसंग्रहासाठी केली आहे. अरे बोलीची शब्दमर्यादा या संग्रहात असलेल्या हजार-बाराशे शब्दांचीच आहे असा गैरसमज होऊ नये यासाठी मुद्दामहून निर्देश करणे आवश्यक वाटते.

**४. शब्द-नोंदणीची पद्धती**

या संग्रहात शब्दांची/शब्दरूपांची नोंद पुढीलप्रमाणे केली आहे.

१. अरे मराठी बोलीतील मूळ शब्द; २. व्याकरणदृष्ट्या शब्दाची जात- (पु. पुल्लिंग; स्त्री. स्त्रीलिंग; न नपुंसकलिंग; क्रि. क्रियापद, अ. अव्यय, वाप्र. वाक्प्रचार) ३. शब्दाचा अर्थ, आवश्यक त्यास्थळी स्पष्टीकरण; ४. शब्दाचे/ रूपाचे व्युत्पत्तिदृष्ट्या मूळ पूर्ववती प्राकृतात वा प्राचीन मराठी वाङमयात आढळत असल्यास त्या त्या ग्रंथाचा संक्षेप देऊन शब्द वा रूप कोठे आढळते याचे संदर्भ दिले आहे. (ग्रंथसंक्षेपाची अकारविल्हे यादी पुढे दिली आहे). या ग्रंथात आढळणारे रूप चौकटी कंसात दिले आहे [ ]. भाषाशास्त्रीय अभ्यासास ही नोंद उपयुक्त ठरावी. ५. शब्द, वाक्प्रचार वा शब्दरूप अन्य भाषा/बोलीत रूढ असल्यास शेवटी चौकटी कंसात संक्षेप देऊन नोंद केली आहे [ते: तेलुगू; क: कसरगोड; को: कोचीन].

## ५. शब्दसंग्रहातील ग्रंथसंक्षेप

**उखा :** चोंभाकृत **उखाहरण.**
**कच :** मुनिकनकामर विरचित **कररण्डचरिउ.**
**कर्फ :** राजशेखरकृत **कर्पूरमञ्जिरी.**
**कुमा :** हेमचंद्र विरचित **कुमारपाल चरित.**
**गास :** हालसातवाहन विरचित **गाथासप्तशती.**
**गोच :** **गोविंदप्रभुचरित्र.**
**ज्योर :** श्रीपतिभट्ट विरचित **ज्योतिषरत्नमाला.**
**ज्ञा :** राजवाडे संपादित **ज्ञानेश्वरी.**
**पं :** **मराठीभाषेचा तंजावरी कोश.**
**नाम :** **नामदेवगाथा** (महाराष्ट्र शासन प्रत)
**पं :** **पंचोपाख्यान** (कोलते संपादित)
**भाप्र :** **रामकविकृत भाषाप्रकाश.**
**मपु :** महाकवि पुष्पदंत विरचित **महापुराण**
**लीच :** लीळाचरित्र (कोलते प्रत).
**लीला:** कौउहलविरचित **लीलावईकहा**
**वज्ज :** जयवल्लभकृत **वज्जलग्गा**.
**सादो :** **सावयधम्मदोहा.**
**हेम :** हेमचंद्रकृत **देशीनाममाला.**

या व्यतिरिक्त इतरही अनेक ग्रंथांचा उपयोग झाला आहे. तथापि, अशा ग्रंथांचे संक्षेप न करता त्या त्या स्थळी समग्र ग्रंथनामांचा उल्लेख केला आहे.

# शब्द-संग्रह

**अइलाडु** अ. **अलीकडे;** लीच. २६, २९; ज्ञा. ६-१९१[ऐलाडि]
**अइसं** वि. **असा;** कुमा. १-५; [अइसअ] हेम. ४-४०३[अइसओ] शि. राउ.
**अक्का** स्त्री. **(१) थोरली बहीण (२) स्त्रियांच्या नावास जोडण्यात येणारे उत्तरपद उ. रामक्का, जरसक्का;** कच. ८-३-५ [अक्का]
**अक्कुडु** वि. **आखुड** [क]
**अगन** पु. **अग्नि** [क]

**अछेरु** / **अचेरु** } पु. **आश्चर्य.** कुमा. १-४१; ३-२४ [अच्छेर]; हेम. १-५८ [अच्छारिअं; अच्छेर]

**अज्जं** पु. **आजा;** हेम. १-६ [अज्ज= आर्य] [क]
**अज्जी** स्त्री. **आजी;** हेम. ३-४१ [अज्जि=आयी] [क]
**अज्जु** अ. (१) **अद्याप;** (२) **आणखी;** ज्ञा. १८-११८७[आझू= अद्याप]
**अंटी** स्त्री. **अंगठी**
**अटो करी** स्त्री. **आठव;** [क]
**अडवी** स्त्री. अरण्य; कच ७-३-३
**अडावुपण** न. **आडमुठेपणा.**
**अडावडी** स्त्री. (१) **आवेश** (२) **संघर्ष;** [ते]
**अत्तां** स्त्री. **सासू;** गास १-८; ७-२४.
**अडकु** न. **हाड** [क]
**अदगुरु** अ. **आगोदर.**
**अद्दिकु** वि. **अधिक;** लीच ३२६ [अदीकु; भाप्र. १६-२[अदीक]
**अद्दीचं** वि. **अगोदरचा** [क. को]
**अंदुवल्ला** अ. **म्हणून** [ते]
**अनसूटु** वि. **अनाघ्रात;** न विटाळलेले. ना. क्र-१५६.
**अनायसं आणावयाचे;** ('च'चे 'स'मध्ये रूपांतर)
**अन्ता** (१) अ **आता.** [क] (२) स **सर्व** [ते]
**आब्बीमानु** पु. **अभिमान.**
**अब्बो** अ. **आश्चर्यवाचक उद्गार.** कुमा. ४-१४(अपराधे आश्चर्येच)
**अमडावे** क्रि. **(१) परवडावे; (२) सापडावे.**
**अमी** स. **आम्ही**
**अमँचु** स. **आमचे;** कुव. ५८-२५ (आमुंच) [क, को]
**अमँसु** स्त्री. **आमावस्या** तं. ३५ [अवांस]; भाप्र. ८-२२[अवस]
**अम्मनु** अ. **अमळ;** मपु. २५-२-५ [अम्मणु]
**अम्मो** अ. **आश्चर्यवाचक उद्गार**. कुमा. ४-५३. [अम्मो- आश्चर्य]

अनुक्रमणिका

**अयगत** न. **वार्षिक उत्पन्न;** शि (यादव कुलंश्री श-११६४)
**अरेन्य** न. **अरण्य;** पं. ४२-१२ [अरेन्य]
**अरंबि** क्रि. **आरंभ कर;** [को]
**अरसि** स्त्री (१) **आरसा;** (२) **चष्मा**
**अर्द** वि **अर्धे;** [य; को]
**अली** स्त्री. **आली; गल्ली;**
**अलस करतं** वाप्र. **उशीर करतो;** गास. ६-११[अलसाअइ]
**अलीसु** स्त्री. **औताची पास.**
**अवकारी** अ. **अकाली** (पाऊस); (सामान्यतः 'ळ' च्या जागी 'ल' येतो. क्वचित् 'ड' वाणि'र' ही येतात) पं. ९८-१२ [अवकारी]
**अवग्गे** सं. **अवघे.** [क]
**अवतारु उचलुनु वाप्र. (१) अवतार धारण करून(२) अवतार धारण केला. / करील**(ऊन प्रत्ययांत धातुसाधिताचा भुतकाळी/ भविष्यकाळी क्रियापदासारखा उपयोग होतो)
**अवंदा** अ. **या वर्षी;** पं. १९-३९ [अवॅदा] (फारसी- आयंदा)
**अँवँसु** स्त्री. **आमावस्या;** ज्योर. १२ [अंवंस = New Moon Day]
**असुदु** न. (१) **अशुद्ध** (२) **रक्त;** लीच. १८; [असुध = रक्त] पं. २१-१५. (असुध = रक्त); पं. १३१-१० [असुध्य = अपविम]
**असोली** स्त्री. **अस्वल.**
**अस्सी** वि. **अशीः**
**अस्त्रोरि** स्त्री. **स्त्री,**
**अहेवपनु** न. **सौभाग्य.**
**अंकुडे** पु. **आकोडे** लीच १४५. आंकुडी
**अंग** न. **शरीर** शि (राउल)
**अंगी** स्त्री. **आंगरखा;** लीच १४५, गोप्रच. ३०५ [अंगी]
**अंगोटी** स्त्री. (१) **आंगठा** (२) **अंगोठी.**
**अंगोल** स्त्री. **आंघोळ.**
**अंगोली** स्त्री. **बोट** ना. क्र १३०७, पं. १२५. [अंगोळी ये]
**अन्ते** अ. **बस्स? एवढेच?** [ते]
**अंदारु** पु. **अंधार;**
**अंबटी वि. अंबट;** भाप्र १५-१८ [अंबटी]
**अंबडूनु घे** क्रि (१) **नांगरुन घे** (२) धुवून टाक [क]
**अंबीलु** स्त्री. **ज्वारीच्या पिठाचे पेय.** लीच. १०१[अंबिलि]; गोप्रच. २४५ [आंबील]
**अंबुसु** वि. **अंबूस** [को]
**अँसू** पु. **अश्रू.** गास ७-२१, २४; [अंसु]; कुमा. १.१५[असूअ]
**आई** स्त्री. (१) **माता;** (२) **आईची आई,** [को-आईची आई]
**आऊडु** पु. **एकराचा तिसरा भाग.**

अनुक्रमणिका

**आगलु** पु. **दाराला लावावयाचा लोखंडी/लाकडी अडसर** हेम. ४-४४४ [अग्गलु] गोप्रच. २८०; पं. ११०-१८ [आगल]
**आगारी** पु. **अंकुर**. ज्ञा. ६-४४२ [आगारि]
**आगी** स्त्री. **आग.** [क]
**आगीपेटी** स्त्री. **आगपेटी** [ते]
**आगीया** पु. **काजवा** पं. ५६-१६.
**आंगोलि** स्त्री. **बोट** पं. १२५-२० [अंगोळी]
**आग्रो** पु. **आग्रह;** लीच १०२; प. ११४-१७; [आग्रो] भाप्र. १६-९०
**आज्जं** पु. **आजा;** (नाते निश्चितपणे समजावे यासाठी माय-आज्जं; बाप-आज्जं असे प्रयोग रूढ)
**आज्जी** स्त्री. **आजी**
**आजोली** स्त्री. **आजोळ**
**आटु** वि. **आठ**. सादो. २० [अट्ट]
**आटजो** वि. **आठवा.**
**आटो** क्रि. **आठव, स्मरण कर**. ज्ञा. ३-२१३[आठौ=सारण]
**आड आलं** वाप्र. **मध्यस्थि केली; लुडबुड केली**
**आडजातु** स्त्री. **निम्न जाती**
**आडपडलं** वाप्र. **(१) विघ्न निर्माण केले; (२) क्षमा मागितली; (३)मध्यस्थी केली.** लीच २८(आड पडिले = शरणगेले, क्षमा मागितली) ज्ञा. १३-३७५; गोप्रच २७८; पं. १०९-२४,
**आड मानूसु** न. स्त्री. (बाईमाणूस; आड = स्त्री) [ते]
**आंदनु** न. **अंदण**. पं ७३-१६
**आदीकु** वि. **अधिक;** शि. (मडगाव श. १३१७); भाप्र. १६-२ [अदीकु]
**आद्रुष्टु** न. **दैव.** पं. ७०-७
**आनकी** अ. **आणखी;** पुन्हा; अद्याप; आणि.
**आनी** स्त्री. **विळा** [क]
**आनु** न. (१) **अन्न** (२) **भात** (ते = अन्नमु) पं. ६९-१५
**आबु** स्त्री. **प्रतिष्ठा.**
**आबालु** न. (१) **आकाश,** (२) **ढग** गोप्रच ७१ [अभाळ = ढग]
**आमी** स. **आम्ही;** शि [खाटेग्राम, श. १२७१]
**आयिकी** क्रि. **ऐक** [क]
**आयुध्य** न. **शस्त्र** (सं. आयुध)
**आरंब** पु. **प्रारंभ** [को]
**आरसं** न. **आरसा.**
**आली** स्त्री. **आळी.** लीच. ४९;
**आलोचना** स्त्री. (१) **विचार;** (२) **चिंता;** (तेलुगू भाषेत रूढ असलेले अर्थ).
**आलौ** क्रि. **आलो.**
**आवतनं** न. **आमंत्रण;** पं. १४६- २६ (अवतणे).

अनुक्रमणिका

**आवा** पु. (१) **मडकी भाजण्याची भट्टी;** (२) **कुंभाराघरी असलेली लहान-मोठ्या मडक्यांची रास;** गोप्रच १५३; पं १२६-९.

**आसु** स्त्री. **आशा** [क]

**आस्त्रनी** वि. **अशरीरी वाणी** पं.- १३१-२४.

**आस्त्रीवादु** पु. **आशीर्वाद**

**इ**/ई स. **ही.** शि (राउल), ज्योर G 428, R 53 [इयाचा]; ज्ञा. ३-१८०; उखा. १२९७ (इ ए); तं ३८.

**इंगलु** पु. (१) **जळता कोळसा;** (२) **अग्नि;** [को]; कुमा. १-३५ [इङ्ल] हेम. १४७ [इङ्लो]

**इंचरनं** न. **विंचरणे.**

**इंचरलं** स्त्री. **विंचरले**

**इंचू** पु. **विंचू**

**इच्यारु** पु. **विचार.**

**इच्यारि** स्त्री. **विचार कर;** विचार

**इज्रु** स्त्री. **वीज**

**इट्टिका** स्त्री. **वीट**

**इंतजाम** पु. **व्यवथा** [फा]

**इत्का** वि. **इतका;** ज्योर. R 19 [इत्का]; भाप्र. १६२ [इत्के]

**इत्तं** अ. येथे; गास. २५४ इत्थ; वज्ज- २-५४ [एत्थ] होय ४-३२३ [इत्थ]

**इद्या** स्त्री. **विद्या**

**इष्बंदी** स्त्री. (१) **अडचण** (२) **नियंत्रण** [ते]

**इबीत** स्त्री. (विभूती) **भस्म**

**इर्जनी** स्त्री. **विरजण.** [क]

**इलं** न. **विळा**

**इवाई** } पु. **व्याही**
**इव्वाई**

**ईकी** } न. **विष**
**ईकु**

**ईजनु** पु. **विजन, पंखा**

**ईजी** स्त्री. **विझव**

**ईसरी** स्त्री. **विसर**

**ईरु** पू. **वीर.**

**ईली** स्त्री. **विळी;** गोप्रच. १८०

**उकंडा** पु. **उकीरडा;** हेम. १-९५ [उक्कडा] १-१४६ [उक्खण्डो] १-१२५ [उक्खुंडो].

**उगा** वि. (१) **शांत;** (२) **व्यर्थ;** (३) **खोटे;** पं. ११-१४ (शांत) १०८-२१ (व्यर्थ)

**उगादि** स्त्री. (युगादि)**चैत्री पाडवा** [ते]

**उग्गमु** न. **शिंकाळी** [ते]

**उग्गाडी** क्रि. **उघड;** कच १०- १३८ [उग्घाडु].

अनुक्रमणिका

**उचलुनु घेयावं** वाप्र. (मुलाला) **कडेवर घ्यावे** (ते. येत्कुआले चा अनुवाद)
**उचीतु** वि. (१) **विनामूल्य** (२) **बक्षीस.** लिज उ.७०. पं १९३-१४.
**उजं** वि. **उजवे, चांगले.**
**उजलु** वि. **तेजस्वी, गोरा;** गास ३.१३.
**उजरलं** क्रि. (१) **सुधारले** (२) **सरळ झाले.** पं. १६१-५ (सरळ झाले या अर्थाने).
**उजियेडु** पु. **प्रकाश;** ज्ञा. १२-१४७; उखा ९६७ [उजिएड.]
**उज्ञलु** वि. **उजळ;** गास. ३-१३ [उज्ञलु] शि (राउ) [ऊजल], ज्ञा. ८-२२७ उजल
**उजु** वि. **सरळ;** पं १११-२५.
**उट्टत** क्रि. **उठतो;** गास. ४-८२ E [उट्टन्त]; सादो. २१७ [उट्टवई]
**उटानि** पु. **आधार;** पं. १०१-३.
**उतावला** अ. **लवकर;** पं. १५०

| | | |
|---|---|---|
| **उतती**<br>**उततिया**<br>**उतते**<br>**उत्तुते**<br>**उतुते** | } | पु. **खारीक;** तं. ४० खजूर मणिज उत्तती |

**उत्तं** वि. **संपूर्ण.**
**उतानं** वि. **उताणा;** गास. २-१०, ५-९० [उत्ताणअ].
**उत्तरमु** न. **पत्र;** [ते] (उत्तर हा शब्द पत्र या अर्थाने तेलुगू भाषेत रूढ असून त्याच अर्थाने तो या बोलीत प्रचलीत आहे).
**उत्तरीलं** क्रि. **चित्रित केले;**
**ऊदकाडी** स्त्री. **उदबत्ती;** तं. ४१
**उदो** पु. **जयजयकार;** ज्योर R5; ज्ञा. २-१९२.
**उद्यम** पु. **चळवळ** [ते] (तेलुगू भाषेत रूढ असलेल्या अर्थाने प्रचलित)
**उद्दलितं** कि. **उधळतो.**
**उद्येपन** न. **उद्यापन.**
**उन्द्या** अ. **उद्या.**
**उन्नं** न. **पाप.**
**उन्नाला** पु. **उन्हाळा.**
**उपजि** क्रि. **उपजला, जन्माला आला.** [क]
**उपरमाडी** स्त्री. **गच्ची; वरचा मजला**. पं. ७६-१३
**उपेग** पु. **उपयोग;** पं १६१-१५.
**उबडा** वि. **उताणा**. ज्योर. G449
**उंबरा** पु. **दारवंठा;** हेम. १-९५ [उम्मरो] [क.]
**उब्बा** वि. **उभा.** भाप्र. १६-६९.
**उब्बी गालंत** स्त्री. (१) **जमिनीची आखणी करतो** (Mark out). (२) **जमिनीचे मोजमाप करतो**

अनुक्रमणिका

**उरकलं** स्त्री. **पूर्ण केले**
**उरकु** पु. (१) **रिकामा वेळ** (उरक ऱ्हाइन तम्मा = रिकामा वेळ असेल तेव्हा). (२) काम करण्याची चतुराई.
**उरक** स्त्री. **शिल्लक ठेव;** शि (उनकदेव, श. १२०१).
**ऊरके** अ. **उगीचच** [ते].
**ऊल्तनी** स्त्री. **उलथणे**.
**ऊंबी** स्त्री. **ओंबी;** हेम. १-८३ [उंबी].
**ऊसरु** स्त्री. **नापिक जमीन,** सादो. ८३, [ऊसर] ता. (शिलाहार, श. १०४९).
**ऊसरुकाय** पु. **आवला** [ते].
**ऊसऊ** पु. उत्सव. कच ३-३-१०; E कुमा. ३-१, १९ (उसव) हेम. १-८४ (उसवो).
**ओप देतं** क्रि. **शोभून दिसते**.
**ओरपडि** क्रि. (१) **वरपडा झाला** (२) आक्रमण केले.
**कइरं** पु. **कचरा;** मपु. २८-२-१५ [कयर.]
**कइस्सं** } वि. **कसे;** हेम.४-४०३ [कइसो] भाप्र. १९-८२ [कइसे].
**कस्सं**
**कऊलु** पु. **शेतसारा.**
**कइने** स्त्री. **ज्वारीच्या कण्या.**
**ककलासु** वि. **कसला.**
**कंचु** न. **बैलाच्या चाऱ्यासाठी राखून ठेवलेला शेताचा भाग.**
**कंचं** स. **कोणते.**
**कटकु** न. (१) सैन्य (२) हल्ला. पं. ८१-८२.
**कटाला** पु. **कंटाला** (लोकगीतांत कटवालु हे रूप येते).
**कडेलु** न. **कटिवस्त्र,** लीला. १०९७; वज्ञ. ६०५; कर्फ. ३३ [कडिल्लं].
**कडरोलु** न. **कडदोरा**.
**कंतु** पु. **प्रियकर;** हेम. ४-३४६; कुमा.१-१९; कच. ५-५-२ [कंतु]; लिला उ. ४८७ [कंथु]
**कंपारे** पु. **शेतकरी.**
**कम्मा** अ. **केव्हा.**
**करकसु** वि. **कर्कश;** पं. ६६-२३
**कराइसु** अ. **करावयाचे** [‘च’ ‘चे’ ‘स’ मध्ये रूपांतर]
**करीना** क्रि. **करीत नाही**.
**कलकलालु** पु. **शाप; तलतलाट**
**कलपु** } पु. **समूह;** वि. **असंख्य.**
**कल्प**
**कल्लाई** स्त्री. **मनगटावरील सोन्याची / अन्य धातुची बांगडी;** लीच पु-२४८; लीचड ४३६; उखा. १७१.
(कळावी = मनगटापासून हाताच्यापंज्या पर्यंतचा भाग).
**कल्लु** स्त्री. **ताडी** [ते]
**कवतिकु** न. **कौतुक;** ज्ञा. ३-४९; उखा. १७८३ [कवतिक].

**कव्वाडु** न. **दार** [को] लीला. १०५६ [कवाड]
**कसटं** पु. **कष्ट** हेम. ४-३१४ [कसटं].
**कस्सं कस्सं**
**राहिल्यानं तस्सं** } वाप्र. **जशी परिस्थिती असेल त्याप्रमाणे मार्ग काढून कार्य करतो.**
**तस्सं करुन घेते**
**कँसारु**
**कँचारु** } पु. **कासार.**
**काइ** स. **काय.**
**काउनु** अ. **का म्हणून** गास.३-२६ [काऊण].
**कां** स **काय.**
**काकु** स्त्री. **काख.**
**काँकडा** पु. **भुईमूग.**
**काँकनु** न. **बांगडी**
**काकलूतु** वि. **दीन**; नाम.क्र.१५६; उखा ५८०; पं. ९४-२२ भाप्र. ५-२० [काकूलती]
**काँटी** स्त्री. **काठी.**
**काँटे** (मऱ्हाटे) वि. **हीन कुळीचे** (मराठे)
**काट** स्त्री. **काठवट लाकडी परात.**
**काड** क्रि. **काढ.** [को] भाप्र., १२-१० [काडला]
**कानि** अ. **परंतु** [ते]
**कानी** स्त्री. (१) **कहाणी**; कथा; तं. ४७; [को] (२) **कान्ही**, गाईच्या गळ्यात बांधावयाचा दोर.
**कारयंजं** न. **कारंजे.**
**कारु** स्त्री. **पास औताची**.
**कालपोतु** स्त्री. **काळी पोत** (सौभाग्यसूचक काळ्या मण्याची पोत)
**कालामांसु** स्त्री. **कालामावस्या**; फाल्गुण व. अमावस्या. (चैत्री पाडवा व अगोदरची आमावस्या हे दोन्ही या भागातले सण आहेत)
**कालु जालं** क्रि. **निधन झाले.**
**काली रेगडु** स्त्री. **काळी माती** (Black Cotton Soil)
**कावलं** न. **कावळा.**
**कास्तु** स्त्री. **शेती** (फा - काष्त)
**काँसरी** पु. **तांबट** (कासार ज्योर G415 (कासार)
**किली** स्त्री. कुलूप (चावी असा या शब्दाचा मूळ अर्थ असला तरी हा शब्द कुलूप या अर्थाचे रूढ आहे)
**किलीचा हातु** पु. **चावी**
**कुंचे** न. **कुंचा.**
**कुँटं**
**कुँट्ट** } अ. **कोठे.**
**कुटीर उद्यमु** पु. **ग्रामोद्योग** (तेलगू भाषेत रूढ असलेल्या अर्थाने)

अनुक्रमणिका

**कुडा** अ. **सुद्धा.** [ते]
**कुंड** वि. (१) **खोटे.** (२) **वाईट;** शि - (राउल) ज्ञा.२-२६ गोप्रच. २१५, पं. ५८-२ [कुडे]
**कुडौ** पु. **कुडव**-धान्य मापण्याचे परिमाण, टोपले. हेम २-६३ [कुडयं=लघुभाणुम्]
**कुन्नावरे** स. **कोणावर.**
**कुंबारु** पु. **कुंभार.**
**कुराडी** स्त्री. **कुऱ्हाड.**
**कुलकीचं कॉंटी** स्त्री. **कळकाची काठी, पराणी.**
**कुलऊ** पु. **कुळव.**
**कुस्टु** पु. **कृष्ण.**
**कुस्सं** न. **कुदळ.**
**केति** वि. **किती;** कुमा. ३-८२ [केतीअ]
**केवडु** वि. **केवढे;** कुमा. ८-५६ [केवडअ]
**कँसु** पु. **केस.**
**कोटु** न. (१) **नगर** (२) **किल्ला,** मपु. २४-९-११ [कोट्टं]; हेम. २-४५ [कोटं=नगर]
**कोटे** पु. **भांडार** (अ. व.)
**कोडु** न. (१) **सवय खोड** (२) **कौतुक;** मपु.- १३-६-१ [कोडु = कौतुक]
**कोन्तं** वि. **कोणते.**
**कोनी निगाली** क्रि. **प्रसूत झाली.** गोप्रच. ७२
**कोपऱ्या** स्त्री. **अलंकार विशेष.**
**कोंबरू** न. **कोंबडे** (र आणि ड यांची अदलाबदल)
**कोमलीतु** वि. **कोमेजलेली.**
**कोरडा** पु. **चाबूक.**
**खंडीभर** वि. **पुष्कळ.**
**खंदिले** क्रि. **कांडले.** सादो २१९ [खंडिल]
**खननु** न. (१) **खोदणे.** (२) **प्रेत पुरणे** (दफन) (या समाजातील काही घराण्यात प्रेताचे दफन करण्याची प्रथा असून कित्येक घराण्यातून प्रेताचे दफन करण्याची चाल आहे, दहन या शब्दास समांतर असा खनन हा शब्द आहे)
**खपरी** स्त्री. **कौलारु;** हेम. १-१८१ [खप्पर]
**खरवडु** स्त्री. **मडक्यात दुध तापविल्यानंतर बुडाला लागलेला करपट भाग.**
**खरवसु** }
**खरसु** } न. **गाय/म्हैस व्याल्यानंतर पहिल्या दहा दिवसातल्या दुधाचा आटवून केलेला पदार्थ.**
**खाउचे पिउचे खाण्यापिण्याचे**
**खाउसं खावेसे** (वाटणे)
**खांडु** न. **खड्ग;** ज्ञा. १८-१०७२ [खांडे]
**खाती** पु. **लोहार** गोप्रच ३०३.
**खादगी** स्त्री. **आहार.**

**खांदी** स्त्री. **फांदी** (झाडाची)[को]
**खाल्लाकडं** अ. **पूर्वेस.**
**खासरं** न. **लहान आकाराची बैलगाडी.**
**खिलाफ** अ. **विरूद्ध**
**खुंकला** पु. **खोकला**
**खुज्जं** वि. **खुजा.** वज्र. १.९९ [खुज्जं]
**खुराचं पूलू** न. **झेंडूचे फूल**
**खेंऊ** न **आलिंगण;** मप; २९-९-२ [खेउं], १३-८-७ [खेव] ज्ञा. १०-१०७ [खेव] ६-१७० [खेओ]
**खेंवी** अ. **क्षणी** (देकत खेवी= देखता क्षणी) लीला-१९९ [खेओ] ज्योर G 463; [खेवी= Immediately] ज्ञा. ६-३६६ [देखत खेओ]
**खोटी** पु. **कोष्टी.**
**खोपा** न. **घरटे.** पं. १०१-५
**खोब्बरकाया** न. **नारळ** [ते]
**खोरं** न. **फावडे.** [को]
**खोरंबलं** क्रि. **खोळंबला**
**खोल्लं** अ. **खोल;** मपु. २-३७ [खोल्लं]
**गडगिडं** (होइलं) क्रि. **काकुळती येणे, दीन होणे** (हिंदी -गिडगिडाना)
**गडु** पु. **किल्ला.** हेम. २-८. [गढी - दुर्गम]
**गरबु** पु. **गर्भ.**
**गंगीरे** पु. **शंख.**
**गंदु** पु. **सुवास गंध**
**गव्वानु** स्त्री. **गव्हाणी** (गुरे खुटाला बांधल्यावर खुंटाला लागून लांब लाकूड ठेवतात. त्यामुळे चारा टाकण्यासाठी मोकळी जागा राहते) नाम. क्र. १२७५ [गव्हाणी]
**गंसु** स्त्री. **गळा.**
**गस्तु** स्त्री. **फिरता पाहरा.** [फा-गष्त]
**गाइ** क्रि. गा, **गातो,** गास. ७. ७९ [गाइ = गायती] हेम. ४-६ ज्ञा. १८-१२५०
**गाइच्चं** क्रि. **गाणार**?
**गाइसं गाण्यासाठी, गावयाचे.**
**गाडौ** न. **गाढव** शि. [वेळस श १३२४- गाडौ]
**गाँमु** न. **गाव.** गास. १-८ हेम. ३-१४२ गाम
**गुडगा** पु. **गुडघा.**
**गुडशी** स्त्री. **झोपडी** [ते]
**गुडी** स्त्री. (१) **देऊळ.** (२) गुढी; ध्वज [को]
**गुड्यावरचं** न. **परगावचा, उपरा.**
**गुंडितं** क्रि. **गुंडाळतो** लीच. पू. ७९, १८७ [गुंडतु] गोप्रच. २२० [गुंडगुंडु] पं. १४-१८.
**गुन्नाला** पु. **अलंकार विशेष.** [ते]

**गूलू** पु. **गूळ.** गास ६-५४ हेम. १-२०२ [गुलु]
**गेलौ** क्रि. **गेलो.** पं. ५-५.
**गोटू** स्त्री. (१) **गोष्ट** (२) **भाषा** (३) **शब्द.**
**गोंदलू** } पु. (१) **गोंधळ** (२). **संघर्ष** (३) **देवीच्या आराधनेचा उत्सव.**
**गोदुलु**
मपु. ११-१६-९. [गोंदुलु] लीचपू.-२४०. [गोंदल]
**गीन्याँही** त. **पोत्यांतून** [गोनी= गोणपाट]
**गोपु** पु. **गोफ.**
**गोषनु** स्त्री. **गोफण.**
**गोरा** पु. **गोऱ्हा;** पं. ७५- १२ [गोरा]
**गोरी** स्त्री. (१) **गौरी** (२) **नवविवाहित स्त्री** (३) **गौरवर्णीय स्त्री.** गास. १-१; ७-१००
[गोरी = पार्वती] लीला. २८५ कुमा. १-७५ [गोरी=गौरवर्णी] शि (राउल.) कर्पु. १०१ [गोरए]
**गोही** स्त्री. **साक्ष.** भाप्र. १८-१०९
**ग्यानु** न. **ज्ञान.**
**घऊ** पु. **गहू.**
**घऊले** पु. **गव्हले; वळवट.**
**घंटा-घागरा** पु. **बैलांच्या गळ्यात बांधावयाची घुंगरांची माळ** (घंटा = देवळातल्या घंटीच्या आकाराचे घुंगरु; घागरा = वांग्याच्या आकाराचे घुंगरु)
**घड** पु. **घट.** हेम. ४-३५७ [घड]
**घरघर** अ. **घरोघर;** गास. २-३४. [घरघर]
**घरचं नाँऊ** म. **आडनाव** ते-इंटी पेरू = घरचे नाव
**घरान्तु** न. **घरात.**
**घवाचं भकरी** स्त्री. **चपाती** (पोळी हा शब्द केवळ पुरणपोळीसाठी योजला जातो)
**घागरु** स्त्री. **घागर.** हेम. २-१०७ [घग्गरं]
**घाय** पु. **घाव, आघात;** सादो-७ हेम. ४-३४६ [घाड]
**घासतेल** न. **घासलेट.**
**घेवा** क्रि **घ्यावे.**
**घोड्याचं पिलू** न. **शिंगरू.**
**चडकं रूंदती** वाप्र. (गरोदर अवस्थेत) **ओटीपोट रूंदावणे.**
**चउ** वि. **चार;** लीला. ४३ [चउ] हेम. १७१
**चडक्कं** पु. **चौक,** लीला १२८६ [चडक्क].
**चउरंगु** पु. **चौरंग** कच ४-१-१४ [चउरंग]
**चकत्तं** क्रि. **चाखतो;** वज्ञ. २२३ [चक्ख]; मपु. २-११-४ [चक्खंड्]
**चक्करु** न. **चक्र, चाक.**
**चक्कोटु** } वि. (१) **चांगले;**
**चकोटु** (२) **निर्मळ;**

अनुक्रमणिका

(३) **रास्त; हेम** [चक्खुड्डणं]; ज्ञा. २-१३, उखा. २०२ [चोखट]; भाप्र. ७-३ [चक्खोट] तं. ६७ [चखोट]

**चम्मारू** पु. **चांभार** (पायाचं हा शब्द अधिक रूढ आहे).

**चमे** स्त्री. **समई** ['च'चा उच्चार 'स' सारखा (विशेषतः शब्दारंभी येणाऱ्या च चा) करण्याची तेलुगू बोलीची लकब या बोलीतही आढळते उ. सान्ने = चांदणे].

**चंदोवा** पु. **चांदवा;** सादो. १९८ [चंदोव.] कच. १०-७-९ [चंदोवा] लीच.
उ -५९०! ज्ञा. ६-१२३; [चंदोवा]

**चऱ्हॉटु** पु. **दोर** तं-६७.

**चरवी** न. **भांडे.** पं. ५७-५.

**चांग** वि. **चांगले.** मधु. २-४-१४ [चंग]

**चांगटु** वि. **चांगले; सुंदर.** ज्ञा ४-१५४, [चांग] तं. ६९ [चांगट]

**चाडी** स्त्री. **चाहाडी;** तं ६९

**चाडू** स्त्री. **प्रतिष्ठा;** ज्योर. G.24, 449, ज्ञा. ७-१४०.

**चान्ने** (सान्ने) न. **चांदणे.** भाप्र. ८-९०

**चारोजो** वि. **चवथा.** [क्रमवाचक 'जो' प्रत्यय गुजराती भाषेत आढळतो].

**चिक्कलु**
**चिक्कोलु** } पु. **चिखल.** मधु. २-१३-९
[चिक्खलो], हेम. ३-११. (कासरगोडच्या बोलीत 'चिक्कलि' व कोचीनच्या बोलीत 'चिक्कोलु' अशी रूपे आढळतात).

**चिंचनी** न. **चिंचेचा ठेंचा;** हेम-३-१० [चिंचणी = वरवंटा]

**चिंचोनी** न. **चिंचेचा सार,** भाप्र. १५-१२ चिंचोणी; तं. ७० [चिंचवणी].

**चितांग** पु. **स्त्रियांचा एक अलंकार चिंबोलि** स्त्री.

**चुंभळ;** मपु. २७-३७१ [चोंभाल]; हेम. ३-१६ [चुंभलो].

**चिम्नं न. लहान, धाकटा;** तं. ७ [चिमणे].

**चिरून घेतं** क्रि. (लाकूड) **फोडतो** (हिंदी-लकडी फाडना; ते. कोसुटा = चिरणे, कापणे, फोडणे).

**चुडा** पु. **बांगड्या;** हेम. ४-३९५ [चुड्डुलऊ] पं. १५८-२१; तं ७१.

**चूलता** पु. **बापाचा धाकटा भाऊ** (बापाच्या थोरल्या भावास मात्र 'थोल्ला बापु' ही संज्ञा आहे).

**चुलती** स्त्री. **बापाची धाकटी भावजय** (बापाच्या वडील भावाच्या पत्नीस 'थोल्ली माय' या नावाने संबोधण्यात येते).

**चेतुर** वि. **चतुर.**

**चोकटु** वि. **चांगले.**

**चोकटु तेलु** न. **गोडे तेल.**

**चोकटु-वाईटु** वि. **बरे-वाईट.**

**चोजु** न. (१) **आश्चर्य;** (२) **कौतुक;** मपु. ८-७-२३; वज्ञ. ८-७-६३ [चोज्ज] हेम.३-१४ [चुज्ज], लीच उ ५९०; ज्ञा. ६-१२३; तं. ७२ [चोज].

**चोले** स्त्री. **चोळी.**

अनुक्रमणिका

**चोललेनी** स्त्री. **चोळीवर काढलेला कशीदा.**
**छतछतु** अ. **थोडेथोडे.**
**छिंकु** स्त्री. **शिंक;** मपु. २६-४-२ [छिंक] ('श' चे 'छ' मध्ये रूपांतर ध्वनिव्यवस्थेच्या दृष्टीने लक्षात ठेवण्याजोगे)
**छेत्री** पु. **क्षत्रिय,** गास. ७-९३ [छेत्र-क्षेत्र]; हेम. २-१७ [छेतं = क्षेत्रं] ('क्ष' चे 'छ' मध्ये होणारे रूपांतर लक्षात ठेवण्याजोगे).
**जइसं** वि. **जसा;** शि [राउल-जइस]
**जटामांसी** स्त्री. **नागरमोथा.** ज्योर G. 209.
**जत्तयेनु** न. **जतन.**
**जत्ता** स्त्री. **जत्रा;** कर्पु- ७६ [जत्ता]
**जलकुनु** अ. **झळकून.**
**जलक्कु** स्त्री. **झळ** (उन्हाची) मपु-३४-२-११. [झलक्क].
**जलमु** पु. **जन्म.**
**जँऊ**, **जाँऊ**, **जावँ** } अ. **जोवर** हेम. ४-४०६ [जाउँ] ४-३९५. [जावँ] ज्योर. G. 328.
**जवलि** अ. **जवळ** ज्योर R 97 [जवलि]
**जँमाइ**, **जॅमाय** } पु. **जावाई** गांस. ७-८३ [जमाऊ]; ७-८३ [जमाऊ]; मपु १३-४-१६ [जांवाय], कच. ७-८-५. [जमाय]; हेम ३-४८ [जामाया].
**जरकलं** क्रि. **झळकले.**
**जलाली** वि. **झळाळी;** गास. ६-८८ [जलालि].
**जंबे** पु. **पेरू, जांब.**
**जाई** क्रि. **जातो/जा;** गास. ७-१८ [जाइ = जातो]
**जाऊन येतं** वाप्र. **निरोप घेताना 'येतो' असे न म्हणता 'जाऊन येतो' असे म्हणतात.** [तेलुगू भाषेतील वाक्प्रचाराचा अनुवाद.]
**जाडी** स्त्री. **झाडी;** हेम. ३-४५ [जाडी].
**जाँतं** न. **जाते** (दळण्याचे); तं. ७६
**जान** न. **ज्ञान;** ('ज्ञ' चे रूपातर 'ज' मध्ये)
**जानसु**, **जानिजसु** } क्रि. **जाणावे;** गास, १-५२[जानासु. सं-जानीहि].
**जाय** स्त्री. **जाई, जातिपुष्प.**
**जायामुंदु** अ. **जाण्यापूर्वी.** (उत्तरार्थं ते अव्यय मुंदु = अगोदर)
**जालरू.** स्त्री. **झालर.**
**जाला** स्त्री. **ज्वाला,** कच. २-१४-७ [जाला], ज्ञा. १४-३७२.
**जालं** क्रि. **झाले.** ज्ञा. १-१३५; उखा. १८२, ३७२.
**जीबु** स्त्री. **जीभ.**

**जीऊ सोडतुया** वाप्र. **जीव टाकतो** (तेलुगु वाक्प्रचारात प्राण सोडतो असा शब्दशः अर्थ आहे : प्राणालु तिस्ताडू).

**जुजु** स्त्री. **झुंज,** हेम. ४-२१७ [जुज्झई = क्रियापद]. गास. ७-८४ [जुज्झ]; लीला. ११६५, कुमा. ६-५३; लीचपु. ३४३ [जुझ]. ज्ञा.२.२१ [जुजे-क्रियापद] उखा. १२९ [जुंझ]. पं. १४१-२१ [जुझ]; तं. ७८.

**जुतलं** क्रि. **जुंपले** (बैल औताला वा गाडीस) लीला. ४९० [जुत्ता = जुंपली]; हेम-१-४२ [जुत्तं].

**जुत्तलु** न. **जोते.** [अनेक वचनार्थी 'लु' हा तेलुगू प्रत्यय.]

**जुन्नं** वि. **जीर्ण, पुरातन;** गास. २-९९-३-८३; लीला १२६६; कच. १०-८-९. [जुण्णं]; हेम. १-१०२ [जुण्णं].

**जेटा** पु. **नवऱ्याचा मोठा भाऊ.** (सं.ज्येष्ठ). उखा १२८७ [जेटात्थु].

**जेत्तु** अ. **जेथे.** हेम-४-४२२ [जेत्थु].

**जेवडु** वि. **जेवढा.** हेम. ४-४७० [जेवडु]

**जेवनु** न. (१) **जेवण** (२) **भात.** (तेलुगू भाषेत अन्नं हा शब्द देखील असाच दोन अर्थांनी रूढ आहे).

**जोडी** स्त्री. **जोडवे** (सौभाग्य-सूचक पायाच्या बोटातील अलंकार).

**जोन्ले** पु. **जोंधळे, ज्वारी** (खरीफाची : धाकले जोन्ले; रबीची : थोल्ले जोन्ले). हेम. ३-५०; लीचपू. ४३७; गोप्रच. १५० [जोहिले]

**जोंपडी** स्त्री. **झोपडी.**

**जोंपु** न. **झोप.** (क्रि. जोंपी गेलं).

**जौगालासं गीतु पाळण्यातले गाणे** (मुलाला प्रथम पाळण्यात घालतात त्यावेळी गावयाचे गाणे).

**ज्याजा** वि. **अधिक.**

**टांबू** पु. **ध्वजस्तंभ** (देवालयापुढील)

**टिपनु** स्त्री. **तिफण**

**टिवलं** क्रि. **ठेवले.**

**टुंटा** वि. **थोटा;** हेम. ४-३ [टुंटा=छिन्नकर].

**टेलु** न. **तेल** [तालव्यं आणि मूर्धन्य वर्णाची आदलाबदल].

**टेंटु** न **देठ;** मपु. १२-९१८ [देंटु]

**टोलेपोले** पु. **ढवळे-पवळे.**

**ठुशी** स्त्री. **गळ्यात** (स्त्रियांच्या) घालावयाचा सुवर्णालंकार.

**ठेंगा** पु**. हातात धरण्याची जाड काठी**. पं. १४७-१, २.

**ठेंसा** पु. **हिरव्या मिरच्यांची ओबड-धोबड कुटलेली चटणी.** तं. २५ [ठेंचा].

**डगु** न. **ढग.**

**डबा सांगून सांगलं** वाप्र. **दवंडी पिटून घोषणा केली.**

**डंबु** पु. **दंभ.** हेम. १-२१७ [डम्भो]; लीचउ. ५०५; तं. ८८; भाप्र. १६-४० [डंभ]

**डाइ** पु. **पराभव,** डाव; लीचउ ३६०.

**डालु** स्त्री. **ढाल.**

**डीली** स्त्री. **डिळी** मांडवाला लावावयाचे दुफाटी लाकूड.

**डीवायाचं** अ. **दिवसाचं.**

अनुक्रमणिका

**डुंगरू** पु. **डोंगर.** हेम ४-११ [डुंगरो].
**ढेंकुनू** पु. **ढेकूण;** हेम ४-१४ [ढेंकुणो].
डोइचं मुंडासं गेलं,<br>डोस्कं सीर गेलं } वाप्र.
**डोक्यावरचे मुंडासे जाणे आणि शिर तुटणे सारखेच** (भांडणात डोक्यावरचे मुंडासे खाली पडणे मरणप्राय दुःख देणारे असते हा भाव).
डोच्कं<br>डोस्कं } न. **डोके**. भाप्र. १०-१. [डोचके].
**ढव्वाले** पु. **डोहाळे;** कुव. १७ [डोहलो]
**ढौलतु** अ. **डौलाने.**
**ढौला** वि. **पांढरा;** लीला. ११ [धावला]
**त** अ. **तर;** शि (राउल). ओळ २७, [त].
**तइसं** वि. **तैसे;** कमा. ८.५१ [तइसअ]; भाप्र. १६-४.
**तकीनं उरलेले** [ते].
**तगतु** न. **तख्त, सिंहासन.**
**तगारी** स्त्री. **परात.**
**तडमडि तळमळ/तळमळतो;** हेम. ५.७ [तडमडि].
**तप्पगा** अ. **अवश्य** [ते]
**तम्बं/तम्बु** पु. **खांब;** (सं.-स्तंभ); -कुमा. ३-१४; [तम्ब;] हेम. २.४५;
**तम्बोलु** न. **तांबूल विड्याचे पान** लीला. ९१३, कुमा. १-७६, सादो. ३७, शि- (राउल) [तंबोल].
**तम्मा** अ. **तेव्हा.**
**तरगती** स्त्री. **इयत्ता** [तो].
**तरनं** पु. **तरुण.**
**तर्वाता** अ. **नंतर** [ते]
**तलतलु** वि. **निखळ**
**तल्लं** न. **तळे;** मपु २५-२-८ [तल्ल]
**तल्लातु** पु. **तळहात;** लीचपू. २१९ [तल्हातु] ज्ञा. ७-१४७ [तल्हाताचेनि].
**ताकताकनी** अ. **टाकताक्षणी**
**तांचं** स. **त्यांचे.**
**ताटू केलं** वाप्र. **जेवण वाढले;** गोप्रच-१०७.
**तानसु** न. **मकाच्या कण्याचे ताक घालून तैय्यार केलेले पेय.**
**ताओ** पु. (१) **उष्णता;** (२) **राग;** (३) **ज्वर** गास. ३-८८ [ताव]; गोप्रच. ८ [तावो]; लीला; ११७; भाप्र. ९-१६८.
**तासील** स्त्री. **शेतसारा** (तहसील).
**तिग्गं** वि. **तिघे.**
**तित्तं** अ. **तेथे** कुमा. ८.५२ [तेत्थु].

अनुक्रमणिका

**तिनी** दि. **तीन**; लीला. ११४० [तिण्णि]; ज्योर. G 420.
**तिप्पलु दगदग** [ते].
**तिमुनि** (१) अ-(कपडे)धुवून-लीच.पू-१८ [तीमुनि] (२) क्रि. धुवू (भविष्यकाळ)
**तीनजी** वि**. तिसरी.**
**तुमँचु** स**. तुमचे**
**तुरँतु** अ. **ताबडतोब**; कच. २-१५-३ [तुरंत].
**तुर्कु** पु. **मुसलमान**
**तेवडु** वि. **तेवढे**; हेम. ४-३९५ [तेवडु].
**तेही** स. **त्यांनी**; गास. १-१६ लीला. १२५२ [तेहिं ८ संतैः].
**तेहीला** स. **त्यांना**.
**थानु** न. **स्तन**, भाप्र. ९१७८.
**थीरू** वि. **स्थिर**, लीला. १३३४; सादो. २०८ [थिर]; पं. ८५-२२.
**थोल्लं कुलऊ** न. **मोगडा.**
**थोल्ला** वि. **वडील**; मोठा, थोरला; भाप्र ७-१६ [थोर्ले].
**थोल्ला बापु** पु. **चुलता**-बापाचा **मोठा भाऊ**
**थोल्ली माई** स्त्री. **चुलती**-वडिलांची थोरली भावजय.
**थोल्ली गाडी** स्त्री. **बैलगाडी**.
**दइऊ** न. (१) **दैव**; (२) **भाग्य**; (३) **द्रव्य**; कच. ७-११-११. [दइउ] कुमा. २-५ [दइव].
**दगूडु** पु. **दगड**.
**दगूडाचं नातू होइला** वाप्र. मुलगी प्रथम ऋतुमती झाली असताना तिच्या आईला 'मुका नातु झाला' असे म्हणण्याचा प्रघात आहे. त्याच धर्तीवर हा वाक्प्रचार.
**दडकरि** अ. **एकदम**; लीच. पृ- २५, [दडैकरि]; पृ. ३१ [दडकरि]; गोप्रच. २१३ [धडकारी]; पं. ९.
**दाऽनु** न. **दहन**. (प्रेताच्या दहनासाठीच हा शब्द योजला जातो).
**दबदबा** अ. **वेगाने** [ते].
**दऽमु** पु. (१) **शक्ति, सामर्थ्य** (२) **दमा**
**दंडंचं येलु** पु. **दंडावर घालावयाची वाकी साखळीसह.**
**दंडा** पु. **दांडा.**
**दंडालु** पु. **मोटेचा नाडा.**
**दँतं** न. (१) **दात**; (२) **जाते** (दळण्याचे).
**दंदी** पु. **वैरी**; लीच उ. २५८, ज्ञा. १६-३८२.
**दलिदर** न. **दारिद्र्य**; हेम. १-२५४ [दलिद्दं]; लीचपू. ४७७ [दलिद्र].
**दादापु** अ. **जवळ जवळ, सुमारे** [ते].
**दान मागला** वाप्र. **वर मागितला**
**दाने** पु. **दाणे - ज्वारी.**
**दाबनु** न. **दाभण**
**दारवंटा** पु. **उमरा**. पं. १४-१६ [दारवंठा].

अनुक्रमणिका

**दारकाडा** वाप्र. **दार उघडा** (तेलुगू ‘तलपुती’ चा अनुवाद).
**दाह्ला** पु. **नवरा** लीच.पू.२५, २३८; ज्ञा. १८-१७११. [दादुला = श्रष्ठ].
**दावं** वि. (१) **डावा** (२) **कनिष्ठदिक्क्** पु. **आधार** [ते].
**दिठी** स्त्री. **दृष्टी;** लीला. ४०१ [दिठ्ठि]; लीचउ. ३१५; ज्ञा ५-१७० [दिठी]
**दिवली** स्त्री. **दिवाळी.**
**दिवलीनु** स्त्री. **पणती.**
**दिडा दिसाचं गर्बारू** वाप्र. (१) **उतावळा,** (२) **अर्ध्या हळकुंडात पिवळा.**(३) **अंगी पात्रता नसताना दुसऱ्याला शहाणपण सांगणारा.**
**दी** पु. **दिवस;** ज्योर G 130 [दि].
**दीपतंबु** पु. **दीपमाळ** (दिपस्तंभ).
**दीस्टु जालं** वाप्र **दृष्ट लागली.**
**दीसु** पु. **दिवस,** गोप्रच ७२; ज्ञा. ७.१४४; उखा १६५१.
**दीसु पिरायचं पूलू** न. **सूर्यफूल**.
**दुकलु** पु. **दुष्काळ;** लीचउ ५०२ [दुकाळ], ज्ञा. १३-१७० [दुकलु]; तं. ९८ [दुकळ]
**दुकवानु** न. **दुकान**.
**दूकू** न. **दुःख;** गास.१-७१ [दुक्ख]
**दुद्दं** } न. **दुध;** गास. ४-८८;
**दुद्द** सदो. ६५ [दुध्द]
**दुद्दानं** न. **दुधाणे** (दुध तापवण्यासाठी जमिनीत चर खोदून खाली व सभोवती गोवऱ्या लावून मडक्यात दुध तापविले जाते. या चरास आणि आतल्या मडक्यासही, दुधाणे म्हणतात).
**दुद्दाचं दुद्दं कस्सं होतं** वाप्र. **‘कधीही दुधाचे दुध आणि पाण्याचे पाणी होत असते’ ही जुनी म्हण.** असत्य सत्याच्या आधाराने काही काळ नांदले तरी कधी काळी ते सत्यापासून पडतेच हा भाव.
**देइ** क्रि. **दे/देतो,** गास. ७-३.[देइ = देतो].
**दुरडी** स्त्री. **वेळूचे टोपले,** लीचपू. १९१ [दुरडी].
**देक न सकं** वाप्र. **देखले नाही** (असूया वाटली).
**देंटु** पु. **देठ;** मपु. ४-११-११ [देंटु].
**देरू** पु. **दीर** (नवऱ्याचा धाकटा भाऊ). पं. १०५-२५;
**देवई** स्त्री. **देवकी**.
**देवकु** न. **देवप्रतिष्ठा** (विवाहादि मंगलकार्यारंभी देवतांना आवाहन करून त्यांची प्रतिष्ठापना करणे).
**देवकु बंदाइसं गीतु** देवक बाधणे हा लग्नसमारंभाच्या प्रारंभीचा एक विधि असतो, त्या प्रसंगी गाण्यात येणारे गीत. (नवरा मुलगा मिरवणुकीने मारुतीच्या पाराकडे निघाला असताना त्याच्या खांद्यावरील उपरण्यात नवऱ्याची बहीण दहीभाताची शिदोरी बांधते).
**देउली** स्त्री. **देऊळ**. कुमा. २-५ [देवउल].
**देवली** पु. **कोनाडा**.
**देवारं** न. **देव्हारा**.
**दोग्गं** वि. **दोघे** हेम. ५-४९. [दोग्गं = युग्मम्].

**दोंडीनं काँकडं** न. **तोंडले.**
**दोडु** वि. **द्वाड.**
**दोन्नी** वि. **दोन**; लीला. २८३; [दोण्णि]; ११७२ [दोन्नि] कच. २-१८.३ [दोण्णि].
**धनका** पु. **दणका, मार.**
**धयी** स्त्री. **दही.** भाप्र. १५-१५ [धई]
**धरूशे** क्रि **धरीन,** धरशील.
**धंड** न. (१) **धड** (२) **निरुपयोगी**; हेम ५-११ [तंड = Headless] हेम. ४-६ [ठंडो = निरुपयोगी].
**धरमकामाला** अ. **कर्मधर्मसंयोगाने.**
**धरिँचु** क्रि. **धर, धरतो.**
**धस** न. **धसकट**; गोप्रच. २२०.
**धा** वि. **दहा.** तं. १०२;
**धाकला** वि. **धाकटा.**
**धाजो** वि. **दहावा.**
**धांडु** स्त्री. **मोठा दोर, नाडा**
**धुर** पु. **स्वामी,** श्रेष्ठ पुरुष, पुढारी; लीच पृ-२८, ६०, २१०,पं. ९१-२१.
**धोगं** वि. **दोघे.**
**धोंडा** पु. **दगड.** पं. १५३-२३
**धोत्रं** न. **धोतर**; भाप्र. १७-९;
**धोंतरु** न. **धोतर.**
**नइ** स्त्री. **नदी**; गास. १-३७; ७-६९ [नइ]; लीला-२४३ [णइ]; लीचपू. ३५, ८६, ३६० [नइ], गोप्रच. १९३ [नै]; ज्ञा. १८-१६०; १२-१२९; भाप्र. १३-४ [नइ/नई].
**नकं** न (१) **नखे** (२) **थोडे.**
**नक्करू वि. थोडे** (नखभर?) तं. १०४ [नक= थोडे]
**नकी** स्त्री. **किनार** (धोतराची वा साडीची).
**नँतं**
**नाऽतु** } स्त्री. **नथ.**
**नरेली** स्त्री. **नारळ** (फळ वा झाड)
**नवजो** वि. **नवरा.**
**नंबरू**
**लंबरू** } न. (१) **शेत** (२) **क्रम**
**नाऊ** स्त्री. **नाव** (पाण्यावर चालणारी).
**नान** स्त्री. **गळ्यात घालावयाची सोन्याची साखळी**- [ते]
**नानपनातन** अ. **लहानपणापासून.**
**नासरे** पु. **पैसे.**
**नाँउ करुनु** वाप्र. **कीर्ती संपादन करून** / केली / करु / करील.
**नाँउ निसान जालं** वाप्र **(वसाहतीला) शासनाची मान्यता मिळाली** (घरांवर नंबर पडले).

अनुक्रमणिका

**निग्गुनु गेलं** वाप्र. **मरण पावला**
**निन्न** न. **खुरपणे**.
**निवाळी** क्रि. **ओवाळते**.
**निश्चित तांबुलम्** वाप्र. **साखरपुडा**. (मूळ शब्द संस्कृत असूनही तेलुगूत रूढ असलेल्या अर्थाने उपयोग).
**निसलं** क्रि **निवडले** तं. १०७.
**निस्ते** वि. (१) **निखळ** (२) **धनहीन**. पं. ६५.
**नुगडं** न. **लुगडे.**
**नेनंती** वि. **अजाण.**
**नेस** न. **नेसते वस्त्र.**
**नेहावा** क्रि. **न्यावा.**
**नोको** क्रि. **नको**. लीचउ. २७ १००; ज्ञा. १२-१२९.
**नौरीया** स्त्री. **नवरीला.**
**न्हव्वं** क्रि. **नव्हे** लीचपू. ५६५.
**न्हउचे** क्रि. **नसेल ना**?
**न्हाइ** क्रि. **नाही.**
**पइका** पु. **पैसा;** लीचउ ३३१ [पइका]
**पइंजनु** पु. **पैंजण**
**पइजंच इडा पैजेचा विडा.**
**पईनु** स्त्री. (१) **पेटलेली चूल;** मपु. ७-१६-१२ [पडलण = प्रज्वलन]. (२) **फराळाचे पदार्थ**.
**पईलारू** स्त्री. **प्रथम गरोदर असलेली स्त्री** / गाय / म्हैस; मपु. ६-७-६ [पहिलारड].
कच. ३-८-११ [पहिलार = प्रथमतर]
**पंकरू** न. **पाखरू.**
**पंगरूनु** पु. **पांघरूण,** मपु.७-२३-९ [पंगुरूण]; कुमा. २-२० [पङगुरणं].
**पटकारू** पु. **पटबेगर** (रेशमी वस्त्र विणणारी जमात).
**पटाऊ** न. **भरजरी वस्त्र**.
**पंडगा** पु. **सण** [ते]
**पडवा** / **पडाऊ** } पु. (१) **तंबू;** (२) **मुक्काम;** हेम. ६-६-[पाडवा].
**पडोलि** न. **पडवळ**.
**पड्डया** क्रि. **पडल्या**.
**पत्तलु** वि. **सडपातळ** शि. (राउल)
**पत्तोरू** अ. **पावेतो** (घरापत्तोर = घरापर्यंत).
**पत्रोली** (स्त्री). **पत्रावळ** भाप्र. १८-२.
**पनगडी** स्त्री. **पाणंद**
**पनपन** क्रि. (तापाने) **फणफणणे**.

**पन्नीरू**
**पन्नेरू** } स्त्री. (१) **फळाहार** (२) **प्रसाद**.

**पन्नु** पु. **सरकारी कर** [ते].

**पय्येनी** वि. **पहिली.**

**परतपालु** पु. **प्रतिपाळ**

**परमाँ** अ. **परवा.**

**परण्या गेला लग्न करण्यासाठी,** गेला [सं. परिणय]; लीला. ८१०. १२१६ [परिणीया = लग्न केले]

**परदान** पु. **प्रधान.**

**परवंट्यानं पऱ्हाटीतून** (कापूस पेरलेल्या रानातून).

**परवड** स्त्री. **आवड.**

**परवानं** अ. **प्रमाणे.**

**पल्ला** वि. **पहिला.**

**पल्लारू** पु. **फळाहार.**

**पल्याडु** पु. **पलीकडे.**

**पल्ली** स्त्री. **वाडी, वसाहत;** गास. ६-९७-१-३१ [पल्ली/पल्ली].

**पल्लौ** पु. **पालव, पदर.**

**परिसम** स्त्री. **पश्चिम.** लीच. पृ. ३७, गोप्रच ३७, ६२ [पसिम].

**पाँचुजो** वि. **पाचवा.**

**पाँजनु पाचजणी.**

**पाटालु** न. **गीत** (अ. व.) [ते].

**पाट बांदुलं** वाप्र. विवाह समारंभास आवश्यक असलेला एक विधी. वराने विवाह-समारंभाच्या आदल्या दिवशी शेतात जाऊन आपट्याचे वा सौंदडीचे खोड तोडून आणावयाचे. या खोडाचा तिवई वा चौरंगासारखा पाट तयार करण्यात येतो. या "पाटावर" पुढचे सर्व समारंभ करण्यात येतात. या पूर्व तयारीस 'पाटु बाधनं' (पाट बांधणे = तयार करणे) म्हणतात.

**पाटे** अ. **पहाटे.**

**पाडा** पु. **गायी/म्हशीचा बच्छडा;** गास. १-६५ [पाडिव्व = महीषवत्सा] भाप्र. २३-४, तं. १११.

**पांडू** वि. **पांढरे.**

**पातलि** स्त्री. (१) **पाटल्या,** वछाहरण, ७९ (२)

**पत्रावळ,** लीचउ. २१५ [पातली]; गोप्रच २२ [पातली].

**पातीले** क्रि. **पाहतील.**

**पातेजलं** क्रि. **विश्वास ठेवला,** नलदमयंती स्वयंवराख्यान [पातेजू].

**पातेजू** वि. **विश्वासू.**

**पानपुडा** पु. लग्नापूर्वी नवरदेव मारुतीच्या पारावर मिरवणुकीने जातो. त्यावेळी नेलेले पूजासाहित्य.

**पानं बांदतामु** वाप्र. (आम्ही) **तोरण बांधतो.**

**पानवंदु** स्त्री. **पाणंद.**

**पानसेंगु** स्त्री. **मासळी.**

अनुक्रमणिका

**पायाचं** स्त्री. **वहाणा तयार करणारा-चांभार.**
**पारा प्रहर.**
**पालाणु** न. **खोगीर,** ज्योर G 83 [पालाण = Saddle]
**पाली** स्त्री. **पाळू; तळ्याचा कांठ;** झाडाला केलेल्या आळ्याचा काठ. लीचपू. ३८. ४५ [पाली]; गोप्रच- ६२.
**पाल्ला** पु. **पाळणा.**
**पावनी** क्रि. **पाव.**
**पासानु** पु. **पाषान.** पं १३३-११
**पितलु** न. **पितळ**
**पिरकी** पु. **लोहार.**
**पीटु** न. **पीठ**
**पीलं** पु. **पिवळे.**
**पीलं जोन्नले** पु. **पिवळे** (ज्वारीचा एक प्रकार).
**पुंजवाटु** स्त्री. (१) **वहिवाट** (२) **वसाहत.**
**पुँजाला पूजेसाठी.** (विभक्ति प्रत्यय लागण्यापूर्वी सामान्य रूप झाले नाही).
**पुजा बांदलं** वाप्र. **पूजा केली.** गोप्रच ६५.
**पुडं फाइल्यानं हीरू** } वाप्र.
**महागं फाइल्यानं तल्लं** } पुढे
विहीर मागे तळे; इकडे आड तिकडे विहीर या म्हणीच्या धर्तीवर.
**पुन** अ. (१) **पासून** [तम्मापुन = तेव्हापासून]. (२) **पुण्य.**
**पुनिव** स्त्री. **पौर्णिमा.** गोप्रच. पृ-३५,११९ [पुनिव].
**पुनु** अ. (१) **पण;** लीला. ४८६; कुमा- १-२४; सादो ५; ज्योर G 433 [पुणु] (२) **पुन्हा.**
**पुन्ना** अ. **पुन्हा.**
**पुरमी** क्रि. **पुरवीन; परवी.**
**पुली** न. वाघ. मपु २५-६-४ [पुल्लि]. (तेलुगू भाषेत हाच शब्द याच अर्थाने रूढ आहे).
**पुंसं** (१) क्रि. **विचार** (सं. पृच्छ) (२) स्त्री. **शेपटी** (पुच्छ).
**पुतनं** पु. **पुतण्या.**
**पूर्त मनाजोगे; परिपूर्ण** तं. १११;
**पूर्व** (१) पु. **पुर्वज** (२) अ. **प्राचीन काळी.**
**पेहेरलं** क्रि. (वस्त्र) **धारण केले.**
**पेंटु** स्त्री. **पेठ, नगर;** गोप्रच. पृ. २८ [पेठ].
**पोची** स्त्री. **मनगटी.** [ते].
**पोला** पु. **पोळा.** ज्योर R. 26.
**पोली स्त्री. पुरणपोळी.** (साध्या पोळीला ‘घवाची भकरी’ अथवा ‘पंडर (पाढरी)पोली’ म्हणतात).
**पोसून घेंटलं** वाप्र. (१) **दत्तक घेतला;** (२) (मुलगा लहानपणापासून) पाळला.
उखा. १७६१ समानार्थी तेलुगु). (पोसणा = आश्रित); तं-११८.
**प्रसनु** वि. **प्रसन्न.** पं-१४७-१०;

अनुक्रमणिका

**फउदा** पु. **लाभ** (फायदा).
**फेटं/फाँटा** न. **फांदी** (झाडाची); भाप्र-५-५४-१४-५०.
**फडकेला** क्रि. (१) **उडी मारुन** पुढे गेला; (२) **दूर गेला**, पं. ७८-१८.
**फाउजे पाहिजे**.
**फाउनु** (१) अ **पाहून** पाहिले
(२) क्रि. **पाहू;**
उन प्रत्ययांत धातुसाधिताचा उपयोग अपूर्ण क्रियावाचकाप्रमाणेच भूतकाळ व भविष्यकाळ दर्शविण्यासाठी होतो.
**फाँकून गेलं** वाप्र. (१) **रागाऊन गेला** (२) **ताटातूट झाली**.
**फाँट** अ. **पहाटे**.
**फाटीचं पाठचा.**
**फायाचं पहावयाचे.**
**फावा** क्रि (१) **पाव** (२) **पहावे**.
**फिर्तिमी** स्त्री. **पृथ्वी**.
**फुका** अ. (१) **फुकट**; (२) **मिथ्या**; हेम. ६-८४. [फुक्का].
**फुडं** अ. **पुढे**.
**फुडं महागं फातं** वाप्र. **मागे पुढे पाहतो**.
**बईलु** पु. **बैल**. गास. ३-७५; लीला. ११०९; हेम-४-४१२ [बइल्लं].
**बईसु** क्रि. **बैस**.
**बईससई** क्रि. **बसारे**; मपु. ४-१-११. [बइसइ = बसतो].
**बईसकु** स्त्री **बैठक**, नाम. क्र. ९७५, (तंव निवृत्तोसि उन्मनी। **बैसका** होती सत्पदिनी).
**बउरं** न **भ्रमर**.
**बउलं** न. **बोहले**; लीच पु. ६३ [बउलें]; गोप्रच - ९७; २२४ [बौलें].
**बजारु** पु. **बाजार**.
**बट्टेवस्त्रु** पु. **वस्त्रप्रावरण** (समाहार द्वंद प्रथमपद समानार्थी तेलुगु)
**बउइत्तं** क्रि. (१) (तूर-हरभर) **धोपटतो** (२) मारतो, शिक्षा करतो.
**बडी** स्त्री. **शाळा** [ते].
**बदरु** न. **थारोळे** [मोटेतून येणारे पाणी जेथे पडते].
**बंदकस्त** वि. **उंच, धिप्पाड**, [फा. बुलदकद].
**बरं नोको** वाप्र. **इष्ट नाही, अनुकूल नाही.**
**बरम घाँटु** स्त्री. **ब्रह्म गाठ**, [सं. ब्रह्मग्रंथी = ब्रह्मदेवाने बांधलेली गाठ].
**बलदु** पु. (१) **भोद**. (कापूस भरतात तो). (२) **बैलगाडीस चोहोंबाजूंनी लावण्यात येणारा गोणपाट.**
**बलिस्टु** } वि. **बलवान**; ज्योर.
**बलीवंतु** G 275. [लिस्ट].
पं. ७३-२१ [बलीवंत].
**बसूंचे** वि. **बसून असलेला**.

अनुक्रमणिका

**बहीरउ** पु. **भैरव;** लीचपू. ४८. [बहिरव]
**बहुताक** वि. **पुष्कळसे.**
**बाइकु** स्त्री. **बायको.**
**बाटु** पु. **लुच्चा** [ते].
**बाडा** पु. **रोपांची पुन्हा लावणी करण्यासाठी तयार केलेला वाफा.**
**बापु** पु. **बाप** (मुले आपल्या वडिलांना याच नावाने संबोधतात).
**बाबलु** न. **बाभळ वृक्ष.**
**बाय लेन्की** } स्त्री. **मुलगी**
**बाइ लेन्की**
(तेलुगू 'आडपिल्ला' चा अनुवाद).
**बावनु** पु. **ब्राह्मण.**
**बास्वदेव** पु. **बसव देव. बैल** (सं. ऋषभ = बसव).
**बिज्ञतं** क्रि. **भिजते,** गास. ३-१६ [भिज्ञन्त]; लीला. ४६८, शि (राउ). [भिज्ञ].
**बिंदगं** न. **कळशी;** [ते-बिंदी].
**बीदी** स्त्री. **वाट** [सं. वीथि], गोप्रच. पृ ३१ [बीदी].
**बीला** पु. **बिबा** [हिंदी-भिलाँवा].
**बुगडी** स्त्री. **स्त्रियांचा कर्णालंकार.**
**बुदे** स्त्री. **बुद्धि.**
**बेडी** स्त्री. **वाळा** (पायातला).
**बेतव्वाचं** पु. **बेताची** (काठी).
**बेल्लं** न. **बेल,** हेम-१-८५ [बेल्ल].
**बेसरू** न. **अलंकार विशेष.**
**बोटु** न. (१) **कुंकू.** (२) **मानाचा टिळा.** [ते].
**बोटवलं** न. **वळवट.**
**बोंडू** न. **स्तनाग्र.** हेम. ६-९६ [बोंडं].
**बोनं** न. **नैवेद्य.** शि. (श. ११९४, १२०१); लीचपू- ८, ६५; लीचउ. ४४५, गोप्रच. १११, १२९ [बोणें]; ज्ञा. ९-३८९ [बोनीं] पं. १०९-२०, भाप्र. १५-२.
**बोरे** न. **चटई.**
**बोल्ली** क्रि. **बोलली.** मपु. ४-४९; [बोल्लविअ]; हेम. ४-२ [बोल्लइ];
**बोलायाले** क्रि. **बोलावाया आले; घेऊन जाण्यासाठी आले.**
**भइनु** स्त्री. **बहीण.** लीला. ९८४ [भइणि], कुमा. ३-३३.
**भइरउ** पु. **भैरव.** हेम. १-१५१, [भइरउ].
**भउला** पु. **हार** (फुलांचा).
**भकरी** स्त्री. **भाकरी.**
**भगती** स्त्री. **भक्ति.** लीचपू ३१;. ज्ञा. १८-८३४.
**भगतु** पु. **भक्त;** लीचपू. २९ [भगत]; ज्ञा. १३-८२१ [भगतु].

अनुक्रमणिका

**भरू** पु. **प्रकर्ष, उत्कर्ष;** उखा. ३१३.

**भरूलं** क्रि **भरले.**

**भल्लं** वि. **भला;** मपु. ४-५-७ [भल्लं].

**भंडन** न. **भांडण;** गास. ७-९९; [भण्डन].

**भंडी** क्रि. **भांडतो;** मपु. १५-८-७ [भण्डइ].

**भाऊजई** स्त्री. **भावजय** (थोरल्या-भावाची बायको; धाकट्याची मेहुणी [म्हेऊनी]). हेम. ६-१०३ [भाउज्या].

**भाओ**
**भाया**
**भावा**
**भावो** } पु. (१) **नवऱ्याचा मोठा भाऊ;** हेम. ६-१०२ [भाओ]; लीच. पृ. १७२ [भावा].

(२) **बहिणीचा नवरा;** (३) आतेभाऊ; (४) **आदरार्थी संबोधन;** कर्पु. ८१ [भावो = भाव इति उच्यते विद्वान्].

**भाँकाँ** स्त्री. **भांगात.**

**भाग्याचं** पु. **श्रीमंत.**

**भासा** पु. **भाचा;** पं. २४-७ [भासा]

**भासी** स्त्री. **भाची.**

**भाबी** स्त्री. **बहिणी.**

**भासिंग** न. **बाशिंग.**

**भिवत्तं** क्रि. **भितो.**

**भित्रिलं** क्रि. **भ्याला.**

**भीकुबाली** स्त्री. **विकबाळी.**

**भीकु** स्त्री. (१) **भिक्षा** (२) **बलुते.** (प्रमाण मराठीत या शब्दाशी निगडीत असलेला कुत्सित अर्थ या बोलीत नाही. दान या शब्दाशी संबंधित असलेल्या गौरवार्थाने हा शब्द योजला जातो).

**भींतरू** अ. **आत;** कच. ९-११-९ [भिन्तर]; उखा. [भीतरि]

**भीतलं** क्रि. **भ्याला.**

**भ्यायाचं मानूस** वि. **भित्रा.**

**भुइ** स्त्री. **भूमी.**लीचपू. ९८; ज्ञा. ९-३९, उखा २१९ [भुइं]

**भुज्जी** स्त्री. **मुलगी;** कच. ६-१२-८. [भज्जा = भार्या] (या बोलीत सर्वसाधारणपणे मुली बाई, अशा जवळीच्या अर्थाने हा शब्द योजला जातो).

**भे** न. **भय.** लीचउ ११, भाप्र. १६-४९; तं. १६१ [भे]

**भेंडकुली** स्त्री. **बेंडकुली.**

**भेंऊ** न. **भय.**

**भोंपलं** न. **भोपला.**

**भोरूलं** क्रि. **भरले.**

**भोलं** वि. **भोळा.** मपु. २-२०-७ [भोलं].

**भोंडी** स्त्री. (१) **विधवा** (२) **गर्हणीय** स्त्री. गास. ५-२ [भोण्डी = सूकरी]

अनुक्रमणिका

**मइसरू** न. **म्हैस,** (तिरस्कारार्थ) लीचपू ३७२.
**मक्कडु** न. **माकड;** हेम. ४-४२३ [मक्कडु]
**मंगुसु** न. **मुंगूस;** हेव. ६.११८ [मंगुसो].
**मंजरु** न. **मांजर,** सादो. ४७; कुमा;. ३-६६ [मञ्जर].
**मंटपु** पु. **मंडप;** भाप्र. १८-३६.
**मँटु** वि. **मट्ठ;** मपु. १-८-११ [मंट = निरुद्यम].
**मडे** पु. **वाफा.** [ते].
**मद्देलु** पु. **मृदंग** [ते].
**मनकटु** न. **मनगट.**
**मनुन** } अ. **म्हणून.**
**मन्नु**
**मनुनु घेंटलं** वाप्र. **वाटले.** हेम. ४-७ [मणइ = सं. मन्यते].
**मर्जाई** क्रि. **मर्दन करवी** (वाटावी)
**मला** पु. (१) **मळा.** (२) **पिकावर येणारी पाखरे पिटाळण्यासाठी बांधलेले मचाण.**
**मद्धनी** स्त्री. **मर्दन.**
**महाजं** स. **माझे.**
**माइहेरू** न. **माहेर;** हेम १-१३५ [माइहर]
**माउसी** स्त्री. **मावशी.**
**मागुनु घेंटलं** वाप्र. **नवस केला** (देवाला).
**मागला** क्रि. **मागितले.**
**माघेर** न. **माहेर.**
**माजु** } स्त्री. **कमर** लीचपू. ४९९; ज्ञा. ३-४५, पं. ४१-२६ [माज].
**मासु**
**माजरू** न. **मांजर.**
**माताचं** स्त्री. **देवीचे** [सामान्यरूपाचा लोप].
**मात्रमु केवळ.**
**मादेऊ** पु. **महादेव** (शंकर).
**मानु पडुनु गेला.** वाप्र. (१) (औषधाचा) **गुण आला** (२) **प्रभाव पडला.**
**मामा** पु. (१) **आईचा भाऊ;** (३) **आत्याचा नवरा.** (३) **सोयरा.**
**मामी** स्त्री. (१) **मामाची बायको** (२) **सासु.** (पुरुषांच्या दृष्टीने; मुलीची सासू आत्या).
**माय** } स्त्री. **आई** गास १-४३; ज्ञा. १२-१२; [माए].
**माइ**
**माव** स्त्री. **माया;** ज्ञा. १३-१७०६.
**मावलनु** स्त्री. **आत्या अथवा आजोळचे इतर गणगोत** (स्त्री.)
**मावला** पु. **मामा** अथवा आजोळचे इतर आप्त (पुरुष).
**मावल्याचं घरू** न. **आजोळ,**

**मासकं** स्त्री. (१) **माझ्या सारखी** (२) **माझी सखी**.
**मासपटा** पु. **कमरपट्टा**.
**माही येरू** न. **माहेर**. हेम.१-१३५; लीचउ. ७६ [माहीएर] ज्ञा. ९-३ [माह्येरें]
**मिच्चू** पु. (१) **मिरच्यांचा ठेचा**; (२) **मिरची** अ. व. मिच्चे.
**मिर्वनं** न. **मानाची साडी**. वच्छाहरण, ३६० [मिरवणी].
**मीयाँ** स. **'मी' या सर्वनामाचे तृतीया विभक्तीचे ए. व.** (उभय लिंगी)
**मुग्गु** पु. **रांगोळी** [ते].
**मुंडासं** न. **पागोटे**.
**मुदे** न. **आंगठी** (मुदी)
**मुसलमानाँतु पिंजारी**<br>**मऱ्हाट्याँतु वंजारी** } वाप्र.
**हीन कुलीचा असूनही वरिष्ठवर्णीयांत मिसळू पाहणारा.**
**मुसारदार** पु. **शेतमजूर** [फा.मुशाइरा = मोबदला).
**मेजी** क्रि **मोज माप**. गोप्रच. २५४ [मेजलीया].
**मेरू** पु. (१) **सीमा** (२) **काठ**; मपु. ८-१-१३; कुमा. १-५७ [मेरा]. शि (मठगाव, श १३१७), ज्ञा १३-१०६८ [मेरा].
**मोगरु** न. (१) **मेढी**. (२) **पायदळ**, उखा १०९९ [मोगर = पायदळ].
**मोत्त** वि **संमग्र** [ते].
**मोत्रं** न. **मुहूर्त**.
**मोंत्रमु** पु. **मत्र**.
**मोव्वु** वि. **मऊ**.
**म्हागुनु** अ. **मागाहून**.
**म्हेउना** पु. **मेहुणा**. (१) बायकोचा भाऊ; (२) मामाचा मुलगा; (३) आत्याचा मुलगा.
**म्हेउनी** स्त्री. **मेहुणी** (१) बायकोची बहिण (२) मामाची/आत्याची मुलगी (३) धाकटी भावजय; हेम. ६-१४८. [मेहुणिया].
**म्हैसा** न. (म्हैशा) **गुग्गल**.
**म्होतुरू केलं** क्रि. **मुहूर्त केला**. (मराठवाड्यात पाटाच्या लग्नाला 'म्होतुरं' म्हणतात. अरे समाजात पुनर्विवाह नसल्याने तो अर्थ या शब्दातून निघत नाही).
**म्होरं** अ. **समोर**.
**यंता** वि. **किती** [ते].
**यांहीं** स. **यांनी** (तृ.अ.ब.) गास. २-७७ [इहिं > सं यैः]
**यीली** क्रि. **व्याली**.
**युध**<br>**युयुद्दु** } न. युद्ध.
**ये** स. **हा, ही, हे**; सदो. १८ [ए]; शि (राउल), ज्योर 177 उखा. १९४३.

**येईजो**
**येजेतो** } अ. **येईपर्यंत.**

**येऊनु (१) क्रि. आला** (२) अ. **येऊन.**

**येकलं**
**येकटु** } वि. **एकटा;** गास. ७-१८; कच. ७-१०-१०; [एकल्लं]; भाप्र. ६-३

**येकु मऱ्हाट, संर हटं** वाप्र. **एक मराठा पुढे आला की (इतर जमातीचे) सारे (मागे) हटतात.**

**येजिल** क्रि. **येईल.**

**येडं** वि. **वेडा.**

**येटु** स्त्री. **वेठ, बिगार.**

**येडंला** अ. **वेळेला** ('ळ' च्या जागी 'ल' येतोच. पण, कधी कधी 'ड' ही)

**येत्तं** क्रि. **येतो.** गास. १-८५ [एत्तो]

**येनी** स्त्री. **वेणी** [ते]

**येमैना काहीतरी** [ते]

**येयातु** क्रि. **येतो, येताहे.**

**येयासरी** अ. **येईपर्यत** [ते. सरी = पर्यंत].

**येरीतातु** अ. (१) (तांदुळ) **वैरीत असताना;** (२) **स्वयंपाकाची सामुग्री काढून देत असताना.**

**येरंड्याचं सरपु** न. **कवड्या साप.**

**येवडुं** वि **एवढे.** सादो १७९ [एवडु].

**येसं** (१) न. **जाळे कोळ्याचे.** (२) वि. **असा**

**येसु** पु. (१) **वेस** (गावाची) (२) **वेष** = नाटकातील भूमिका. (तेलुगू भाषेत रूढ असलेल्या अर्थाने)

**रकरकालु** वि. **विविध प्रकारचे** [ते]

**रंजनु** पु. **रांजण;** मपु. ५-१९-११ [रंजण]; हेम. ७-३ [रंजणो].

**रडभेरी** स्त्री. **रणभेरी.**

**रत्तयेनं** न. **रत्न.**

**रहाटु;** पु. **राहाट;** मपु. २७-१-४ [रहट्ट].

**रंगीले** क्रि. **रंगविले.**

**रागान रूद होउनु** वाप्र. **रागाने लाल** (रूद्र) **होऊन/झाला.**

**राजकीयमुगा (१) शासनाशी संबंधित; (२) मुत्सद्देगिरीने; (३) बोलणे एक करणे दुसरे अशा मार्गाने जाणारा.** [ते].

**रानु** न. **(१) शेतजमीन (२) वन.** कच. ७-१-११. [रण्ण].

**रासकर** क्रि. **ढीग कर.**

**रांडवपनु** न. **वैधव्य.**

**रांदइली** क्रि. (१) **स्वयंपाक केला** (२) **वाढले;** उखा. १८३० [रांधन = स्वयंपाक]; पं. १०९-१५; नाम क्र. १०६९ [रांधण्या = स्वयंपाकासाठी].

**रांदन घरू**
**रंदाइचं घरू** } न. **स्वयंपाकघर.**

**रूमालु** पु. **रेशमी फेटा.**

**रूपियाचं** न. **चांदीचे.**

**रेगड भुई** स्त्री. **काळी जमीन;** तं १४७ [रेगडि].

**रोडाला जातं** क्रि. **रडु लागला.**

**रोडू** क्रि. **रडते.**

**रोली** स्त्री. **कोलाहल, गोंधळ;** मपु. १४-५-९ [रोल]; विवेकसिंधु १-८८ [रोल = गोंधळ]

**ऱ्हाउनु** क्रि. **राहिला, राहील (अ) राहून.**

**ऱ्हात** क्रि. **राहतो.**

**ऱ्हाय** क्रि. **रहा.** ज्ञा. १५-४२३ [ऱ्हाए].

**ऱ्हाटु** पु. (१) **राहाट** (विहिरीवरचा) (२) जगराहटी.

**लइ** वि. **खूप; अधिक;** मपु .५-१६-१४ [लइ = अतीव].

**लगाडिलो** क्रि. **लावले.**

**लग्गी** अ. **जवळ, लागून.** [को].

**लग्गीचु** अ. **लगेच** [को].

**लंबाडगं** वि. **थापाड्या.**

**लांगुलु** पु. **नांगर;** ज्योर G121.

**लानु**
**लान्हु** } वि. **लहान;** शि (राउल) [लान्ह].

**लाइतलं** क्रि. **लावले.**

**लाहे** पु. **चुरमुरे.**

**लिवं** न. **लिहिणे; शिक्षण;** ज्ञा. [ली = लिहिलेले].

**लेंकुं** पु. **पुत्र;** लीला. ११०९ [लिंक]; तं. १५१ [ल्योंक].

**लेंकरू** न. **मूल;** लीला. ११०९ [लिंकरूम्].

**लेंकी** स्त्री. **कन्या.** पं. १५० [लेंके].

**लेमडी** स्त्री. **रेवडी.**

**लेहनं** न. **लिहिणे;** शिक्षण.

**लेविलं** क्र. (वस्त्र) **धारण केले;** हेम ७-१८ [लाइअं].

**लोकंडु** न. **लोखंड.**

**लोली** स्त्री. **गोंधळ** [ते].

**ल्हाया** स्त्री. **लाह्या.**

**वइरी** पु. **वैरी,** लीला. १०५३ [वइर]; कुमा. २-४; ता. [श. ८३२. वइरी].

**वई** पु. **पति;** गास. १-६९ [वइ]; लीला. ३५४.

**वघार** स्त्री. **वाघार, महीषवत्सा.**

**वजंतर** न. **वाजंत्री;** कच. ३-१५-२ [वज्ज. सं. वाघ].

अनुक्रमणिका

**वट** पु. **वड**.
**वडी** स्त्री. **ओढ, जिव्हाळा**.
**वँकु** पु. **दोष**; कुमा. १-१२ [वंका सं. वक्र].
**वंकारू** न. **ओकारी**
**वंटाला** पु. **वरवंट्याला**; (सामान्य रूपाचा अभाव).
**वट्टी** पु. **वरठी, परीट**.
**वट्टीनु** स्त्री. **परटीण**.
**वडिवा** } पु. **सुतार** (हिंदी - बढाई);
**वाडवी** } लीचपू ५७. [वाडै]; पं २९-१९ [बाढी]; पं. ४.२१ [वाढै].
**वंटी** स्त्री. **ओटी**, तं. १६१.
**वद्दलू** न. **वादळ**, मपु. ७-१६-८ [वद्दल].
**वन्‌जी** स्त्री. (१) **आतेबहिण**; (२) **नणंद**.
**वन्नी** स्त्री. **वहिणी**; [को].
**वय्या** स्त्री. **ओव्या**.
**वरकड** पु. **इतर** (जाती) **निम्न जाती**; भाप्र. १६-१२० [बर्कड].
**वरवंटं न. वरवंटा.**
**वराड** न. **विवाह**, लीच. पृ. ३० [वऱ्हाड = लग्न] तं. १५३.
**वराडचं दानं** पु. **लग्नाच्या अक्षता** (अक्षता ज्वारीच्याच असतात)
**वरनु** न. **वरण**.
**वरनु-चिंचोनी** स्त्री. **आमटी**.
**वरलाकडं** अ. **पश्चिमेस.**
**वरीलु** अ. **वरचा**; लीला. ११०७. [वरिल्लं]
**वल्लं** वि. **ओले**. गास. ३-९९ [ओल्लं].
**वसरी** स्त्री. **ओसरी**.
**वस्ता** स्त्री. **अलंकार**; तं. १५२
**वहीले** क्रि. **ठेवले**.
**वंसु** पु. **वंश**.
**वाकु** पु. **वाख, ताग**.
**वाँकु** पु. **कलंक**; कुमा. १.१२ [वंक-सं वक्र]
**वागीला** पु. **पेरणी.**
**वागु** पु. **वाघ**; कुव. २, [वग्घु].
**वाँटं लावतामु** वाप्र. (आम्ही) **वाटी लावतो, निरोप देतो.**
**वाँटु** सी. **वाट, मार्ग**
**वाँटा** पु. **भाग, हिस्सा**, तं. १५४. [क].
**वाटी** स्त्री. **खोबरे**.
**वाँटेदारू** पु. **भाऊबंद**.

अनुक्रमणिका

**वाड** क्रि. **वाढ** [को]
**वानु** पु. **वर्ण**.
**वानु कोइला** स्त्री. पावशा [ते-वानु = पाऊस].
**वानु मऱ्हा ट्याँचु** } वाप्र. **जन्म**
**गुनु पिंजाऱ्याचु** **उच्च**
**कुळातला पण, गुण मात्र हीनकुळीच्या माणसाचे**
**वाँसरु** न. **वासरु**
**वायदा** पु. **कोर्टाची तारीख** (तेलुगू भाषेत रूढ असलेल्या अर्थाने)
**वारना** स्त्री. **जुवाला बांधावयाचे कातड्याचे वेठण**.
**वारधी** पु. **समुद्र** (सं. वारिधी).
**वारीकु**; पु. **न्हावी**
**वारूले** पु. **वारले; मातीचे घट**.
**वाल्कं** न. **वाळूक** (अ. व.)
**वावरू** न. **शेत**; गाम २-७८ [वावार]; ता. (शि-श १०४९). ग्रोप्रच १२४.
**वावधानु** न. **वादळ** (वारावावधान असा सामासिक प्रयोग होतो).
**विगरूनु** क्रि. **विरघळला**.
**विग्रहमु** पु. **देवळाच्या गर्भागारात प्रतिष्ठापिलेली मूर्ती**; गोप्रच. ३१९ [विग्रहो = देवतेने घेतलेला अवतार].
**विट्टलु** वि. **विटाळ**, हेम. ४-४२२ [विट्टालु]; मपु. ७-१२-८ [विट्टल].
**विप्रीतु** वि. **विपरीत**. पं. ९९-१४.
**वीकु** न. **विष**; लीचपू २०३ [वीखु].
**वीज्रु** स्त्री. **वीज**. कच. ८-१७-११ [विज्जु]; उखा २१० [वीजू].
**विश्रांतीनं** अ. **शांतपणे; आरामात** नाम.क्र.९६० [विठो म्हणे नाम देवा । तुम्ही **विश्रांती** मन ठेवा]
**वूगलं** क्रि. **उगवला**
**वेल्लालु** स्त्री. } **वेल्हाळ, सुंदर;**
वि. वि. गास. ६-९८
[वेल्लहलं]; वज्र. ९६; मपु ३-१-११; कच. ७-२-८; हेम. ७-९६; [वेल्लहलो]
**वेव्हारू** पु. **व्यवहार**; ज्योर. G 433 [वेव्हारी]; G 433 [वेव्हारी]
**वोडी** क्रि. **ओढ**. [को]
**वोप देती** क्रि. **शोभा देतात; शोभतात**.
**वोरे** अ. **वर.**
**वोरोलि** स्त्री. **आरोळी**, मपु! ५-१-७ [ओरालि].
**व्हानु** स्त्री. **वहाण**.
**व्हइला** क्रि. **झाला**.
**वेरि** पु. **वैरी**, लीलावइ ११८९ [वेरि].
**शापु करतु** क्रि. **वध करतो** [फा-साफ]
**शानं** वि. **शाहणा**.

अनुक्रमणिका

**शार** न. **शहर**.
**शाहुकार** पु **सावकार**.
**शिद्दं** पु. **शिधा**.
**शिल्पी** पु. **कलावंत** (तेलुगू भाषेत याच अर्थाने रूढ).
**शेरनी** स्त्री. **नवसाची मिठाई**.
**शेरी** स्त्री. **शेत**.
**शेवा** स्त्री. **सेवा**.
**श्येनु** न. **शेण**.
**सइन्नमु** न. **सैन्य,** कुमा. २-४; हेम. १-१५१ [सइन्नं]; हेम १-१५० [सेन्नं].
**सई** स्त्री. **सखी**.
**सइअम्मा** स्त्री. **सखीबाई**.
**सक्काले** अ. **सकाळी**.
**सगलेका सर्वजण**.
**सग्गे** वि. **सर्व** [को].
**सग्गटु** वि. **सर्व** [को].
**संगटु** अ. **सांगाती** [क].
**संगमु** पु. **संघ**.
**संगमु टिवलं** वाप्र. **संघ स्थापन केला**.
**संगती** स्त्री. **वार्ता** [ते].
**संचकारी** स्त्री. **बयाणा, आगाऊ रक्कम;** [ते].
**सज्ञड** न. **ताजे, गरम** (अन्न) [ते].
**सदं** क्रि. **साजे; साजते**.
**सँदगं** न. **पेटी** (फा- संदूक)
**सद्गुरे** पु. **बाजरी** (सजगुरे).
**संदडु** पु. **सौंदड** मोट ओढण्यासाठी बांधलेल्या दोन दोरांपैकी खालच्या बाजूस असलेला लहान दोर.
**संदी** स्त्री. **गल्ली**. [ते].
**समजु होइना** क्रि. **समजेना**.
**समावेशमु** न **सभा** संमेलन. [ते].
**समी** स्त्री. **समई**.
**समस्तानु** न. **संस्थान**.
**सम्बोरू** अ. **समोर**.
**सँम्शय** पु. **संशय** [को].
**सँकाडी** स्त्री. (१) **अंबाडीचे धांडे भिजवून ताग काढल्यानंतर राहीलेला भाग=सनकाडी.**
पेटवणीसाठी प्रामुख्याने उपयोगात आणतात. (२) सडपातळ स्त्री. (लक्षणेने).
**सरनु** न. **चिता;** लीचउ २७१.
**सरयेना** क्रि. **संपत नाही**. वज्र २१७ [सर = संपणे].

अनुक्रमणिका

**सरा**
**सरी** } पु. (१) **तळे** (२) **झरा**. ता (चिकुर्डे), ता. (मिरज श १०७६); ज्ञा. २-४८ [सरीं].

**सरिंसं** अ. **बरोबर**; गास. १-१२, २-१३ (सरिस; शि. राउल), लीचउ १६३, ज्ञा. १-५७; गोप्रच ३७ [सरिसें/सरीसें].

**सरे** अ. **ठीक**! [ते]

**सलदु** न. **पेटी**; लीचपू. ४१८ [सलदु]

**सवत माई** स्त्री. **सावत्र आई**

**सवत्ती** स्त्री. **सवत**. गास. १-७९; ६-९७ सवत्ती.

**सवं** स्त्री. **सवय**.

**सवनं** न. **झरोका**.

**सवान** वि. **सपाट**.

**सव्वासीनु** सी. **सवाष्ण**.

**ससुरा** पु. **सासरा**. कर्पू. १८ [ससुरो] लीचउ. ४२७ [ससुरा]

**सस्कुलं** न **ससा**.

**सा** वि. **सहा**. लीचउ ६०, ज्ञा. १६-१८२; पं. १२५-२४;

**साई** स्त्री. **साय**.

**साउमं** अ., **समोर आघाडीवर**; पं. ३६-४.

**साउली** स्त्री. **सावली**.

**साकर** स्त्री. **साखर**.

**साँकल्या** अ. **साखळ्या** (चांदी/सोन्याचा अलंकार).

**सांगलं** क्रि. **सांगितले**.

**साजं** क्रि. **शोभते**. लीचउ १५३.

**साजो** वि. **सहावा**.

**सातजो** वि. **सातवा**

**सातरी** स्त्री. **अंथरूण**; लीचउ. ६३८; गोप्रच. १६ [सातरा]; ज्ञा. १७-९७ [सातरिया].

**सात्रे** न. **चाँदणे**.

**साप्ता** पु. **जोते** (बैलाच्या गळघात बांधण्यासाठी केलेले चामड्याचे).

**सारिल्यातु** क्रि. **सारविल्या**.

**सालवन**
**सालोन** } न. **साळवण**.

**सासं** स्त्री. **सासु**.

**सारत्रा** पु. **सासरा**.

**सासुर्डी सासुरवाडी**.

**सिद्दा** (१) स्त्री. **शिडी** (२) पु. शिधा.

**सिदोरे** न. **शिदोरी**; लीचपू. २९-१४७ [सदोरि].

**सिंपवाचं** पु. **शिंप्याचे**.

अनुक्रमणिका

**सिंबाडि** पु. **शेंबूड;** हेम. ८-२९ [सिंबाडि].
**सिरा** स्त्री. **शाई** [ते].
**सिवारू** न. **शिवार**.
**सीरू** न. **शिर;** लीचपू. ४३६.
**सीरिमुक** पु. **श्रीमुख** (थोर पुरुष या अर्थाने). गास. १-७५ [सिरी > श्री]
**सुक्यानं** न. **सुखाने**.
**सुतलं** क्रि. **सुटले**
**सुतारू** पु. **गवंडी;** सूत्र लावून काम करणारा.
**सुतुनु** अ. **सुतवून**.
**सदाम चक्ररू** पु. **सुदर्शन चक्र**.
**सुने** न. **कुत्रे** (श्वान). [को, क] लीचउ ५१९; गोप्रच. ५१ [सुने]
**सुन्नं** न. **शून्य**. गास. १-२६ [सुण्णं].
**सुपारे** स्त्री. **सुपारी**.
**सुबरू** वि. **बहराला आलेली शेती** झाड. लीचपू. ४३
**सुम्बु** न. **सुंभ**.
**सुम्मं** अ. **थोडे** [ते]
**सून** स्त्री. **सून**.
**सूरजिंती** पु. **सूर्याला** [तेजाने] **जिंकणारा,**
**तेजस्वी पुरुष**.
**से** स्त्री. **सय, स्मरण**. ज्ञा १-१७१; २-३६ [से].
**सोइरा** पु. **सोयरा**.
**सोकासी** अ. **सावकाश**.
**सोंगु** न. **नाटकातील भूमिका**.
**सोन्नारू** पु. **सोनार**. (सं. सुवर्णकार, प्रा. सोण्णार).
**सोनाचं** न. **सोन्याचे** (सामान्य रूपाचा अभाव)
**सोमनी** स्त्री. **झरोका** (ग्रा. सवने)
**सोले** न. **सवळे**.
**सोवतं** न. **सवळे**.
**सोवतं** न. **स्वतःचे; स्वतंत्र**.
**सोंदरि** स्त्री. **सौंदर्यवती;** लिच. पू. ४४, ४५; ज्ञा. १८-१६५१ [सौंदरा]; ज्ञा. १८.१६६९ [सोंदरिये].
**हंकाति** क्रि. **हाक देतो**.
**हटु** पु **हट्ट;** पं. ५२-२४
**हलगट** न. **रेडा**
**हलदाई** स्त्री. **हळद**. गास. १-८० [हलिद्दा]; हेम. १-२५४ [हलिद्दी].
**हाट** पु. **बाजार**- तं. १७५.
**हातु** पु. **हातवा** (लग्नाच्या वेळी वधूवरांच्या मागे करवलीने धरावयाचा कणकीचा दिवा).

अनुक्रमणिका

**हादी** अ. **आधी**.
**हारती** स्त्री. **आरती**.
**हारी** स्त्री. **हार, पराभव**.
**हाल्लिला** क्रि. **हलविला**- मपु. १४-५-१२ [हल्लइ]
**हाव** क्रि. (आम्ही) **आहोत**.
**हासु** क्रि. **आहेस**.
**हिंडकोरू** पु. **उनाड**.
**हिनी** स्त्री. **विहीण**.
**हिम्माला** पु. **हिवाळा**.
**हिंवसा** वि. **शांत, थंड**.
**हीरू** स्त्री. **विहीर**.
**हीनिलं** क्रि. **विणले**.
**हीरवा** वि. **अपक्व** 1 लीचपू ५५८; लीचउ ५९०
**हईनु** अ. (१) **झाल्यावर**. (२) पंचमी विभक्तीसाठी येणारे अव्यय [होउनु]
**हत्तं/हुतु** न. **वारुळ**; तं. १५५
**हुलं न्हाइ** क्रि. **झाले नाही.**
**हुडवा** पु **इरले**.
**हुत्ती** क्रि. **होते**. सादो. १८, [हुन्ति]
**हुरबुडं न. वेठण (बैलगाडीच्या जुवाला वेष्टून असलेला चामड्याचा दोर).**
**हुल्लडु** स्त्री. **ओरड**.
**हुबा** वि. **उभा**.
**हूटली** क्रि. **उठली**.
**हैकावं** क्रि. **ऐकावे**.
**होई** क्रि. (१) **होते** (२) **झाले** (३) **पाहीजे**; गास. १-४२; १-७९ [होइ] सादो. ६, १८; कच. १-१३-४ [होइ].
**होइली** क्रि. **झाली**.
**होइल्तं** क्रि. **झाले, झाले होते**.
**होऊनु यीना** क्रि. **अनुकूल नाही, धार्जिण नाही**.
**होऊनु** (१) क्रि. **झाले**; अ. होऊन; मपु. २७-८-२ [होउण].
**होटं** पु. **ओठ** भाप्र. १०१२.
**होड** स्त्री. **पैज**. भाप्र. ५-१६.
**व्हइलु** क्रि. होईल.

∫∫∫

अनुक्रमणिका

## २

# लोक-गीते

भाषा आणि संस्कृती या दोहोंच्याही अभ्यासात लोकगीतांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. ते लक्षात घेऊन निरनिराळ्या स्थळी आणि वेगवेगळ्या व्यक्तींकडून मिळविलेल्या लोकगीतांपैकी निवडक ४० गीते या ठिकाणी संगृहीत केली आहेत. पुरुष-वर्गाकडून फारच थोडी गीते मिळाली. 'बरस रे मेघोबा','दान पावले,' 'देवक बंदाइसुगीत' ही गीते वगळता बाकीची सारी गीते स्त्रियांच्या गायनातून ध्वनिमुद्रित केलेली आहेत. केवळ सोयीसाठी या गीतांचे पुढील वर्ग कल्पिले आहेत :

> १. देवताविषयक, २. शेतीविषयक, ३. विवाहाशी संबंधीत, ४. वैवाहिक जीवनाचे साफल्य प्रतिबिंबित झालेली आणि ५. स्त्रीजीवनविषयक.

वस्तुतः सर्वच गीतांतून स्त्रीजीवनाचे निरनिराळे पैलू व्यक्त झाले आहेत. त्यामुळे हा सारा गीत-संग्रहच स्त्रीजीवनविषयकच म्हणावा लागेल. तरीही गीतांचा तो एक वर्ग निराळा दिला आहे. डोहाळेविषयक गीते काव्याच्या दृष्टीने लक्ष वेधून घेणारे आहेत. हिंदी काव्यातील ''बारह मासा'' सारख्या किंवा 'रासक' काव्याचे स्मरण व्हावे अशी ही रचना आहे.

विवाह हे सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. विवाहविषयक गीते देऊनही शेवटी विवाहविधीचे गीतासह केलेले वर्णन या संग्रहात मुद्दामच दिले आहे. अरे-मराठा समांजाच्या चालीरीतींची कल्पना त्या योगे येईल.

भाषेच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाब या लोकगीतांनी कायम ठेवलेली आढळेल. संस्कृत ग्रंथात मराठी ओवीची जी लक्षणे आढळतात त्यावरून प्राचीन ओवी मुळात तीनचरणी असावी असे अनुमान करता येते. उपलब्ध मराठी लोकगीतांत ही तीन-चरणी ओवी दुर्मिळ होत चाललेली दिसून येते. पुढे दिलेल्या गीतांतील काही गाणी तीन-चरणी ओवीत ग्रंथित झालेली आढळतील. भाषेच्या पुरातन परंपरेचा हाही एक अवशेष या बोलीने जपून ठेवला आहे. अरे लोकगीतांचे हे एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणता येईल.

### १. देवताविषयक गीते

देवताविषयक गीतांचे प्रमाण लोकगीतांत कमीच दिसून आले. या समाजाची प्रधान देवता तुळजा भवानी. परंतु या देवतेचे एक आवाहन गीत आणि आरती तेवढी उपलब्ध आहे. स्फुट गीतांतून मोठ्या प्रमाणात राजन्ना (राजराजेश्ववर) या वेमलवाड्याच्या महादेवाचा उल्लेख आढळतो. आंध्रप्रदेशात नागरी व ग्रामीण भागातही तिरुपतीचा बालाजी ही आराध्य देवता पूजिली जाते. तिरुपतीचा व्यंकटेश हा तेलुगू समाजात सर्व थरांवरील जनतेचा भक्तिविषय आहे. मराठवाडा आणि तेलंगण यांच्या सरहद्दीवर जी मराठी लोकगीते आढळली त्यांतही तिरुपतीच्या दैवतावर आधारलेली बरीच गीते आढळतात. [प्रथमखंडाच्या परिशिष्टात काही निवडक

गीते दिली आहेत.] अशा व्यंकटेशमय वातावरणात कित्येक शतके राहूनही अरे-समाजात प्रचलित असलेल्या लोकगीतांत तिरुपती व्यंकटेशाचे एकही गीत आढळू नये याचे आश्चर्य वाटते.

वेमलवाड्याचा राजराजेश्वर (राजन्ना) हे अत्यंत पुरातन असे शिवाचे स्थान आहे. एकादशी, शिवरात्रीसारख्या दिवशी तेथे मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. महाशिवरात्रीच्या सुमारास भरणाऱ्या यात्रेस तर लाखाच्या घरात भरतील एवढे यात्रेकरू जमतात. या यात्रेकरूंत तेलुगू भक्तांच्या तुलनेने अरे-मराठी व लमाणी यांचीच संख्या अधिक असते. दूर दूरचे लभाण-तांडे महाशिवरात्रीस वेमलवाड्यास मुक्काम करून असतात. या देवस्थानची व्यवस्था शासनाकडे जाण्यापूर्वी महाराष्ट्रीय ब्राह्मण या स्थानाचे वहिवाटदार होते असे सांगतात. मराठ्यांच्या परंपरागत आराध्य देवताचे वहिवाटदार मराठेच असावेत हा योगही विलक्षण वाटतो.

'येमलाडी'च्या राजन्नानंतर महत्त्व आहे ते याच परिसरातील कोत्ताकुंडा येथील विरन्नाचे. (ईरन्ना) विरन्ना हे प्राचीन काळातले एखाद्या वीराचे स्मारक असावे. (कर्नाटकातल्या वीरगळु सारखे). वीर हनुमंतासही काही गीतातून आवाहन करण्यात आले आहे. या भागात हनुमंताची उपासना फारशी पुरातन दिसत नाही. महाराष्ट्रात प्रत्येक गावात किमान एक तरी मारुतीचे देऊळ असते तसा प्रकार तेलंगणात (निजामाबाद आणि आदिलाबाद हे सरहद्दीवरचे जिल्हे वगळता) दिसून आला नाही. तथापि, अरे समाजाची वसाहत असलेल्या भागात मात्र मारुतीचे स्थान हामखास असतेच. लिंब किंवा वटवृक्ष यांच्या सावलीत उघड्यावर पार बांधलेली मारुतीची देवालये आढळतात. लग्नाचे सीमांतपूजन या पारावरच होत असते. समर्थ रामदासांनी मारुतीची स्थापना गावोगावी केल्यानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण विभागात मारुती उपासना दृढमूल झाली असा समज आहे. अरे-मराठ्यांचे या भागातील स्थलांतर रामदासांच्या पूर्वीच्या काळातले आहे. स्थलांतर करताना मारुती आणि तूळजाभवानी या दोन देवतांची उपासना घेऊन ही जमात या भागात आली असावी. समर्थांनी याच उपासनेला नव्याने चालना दिली की काय याचा शोध महाराष्ट्रात लावला पाहिजे.

पोचामाई (पोचम्मा) ही तेलुगू प्रांतातील ग्रामदेवता. तेलुगू समाजाप्रमाणेच अरे समाजही या देवतेचा उपासक आहे. स्फुटगीतांत आणि विवाहपूर्व आवाहित देवतांत पोचामायीचा उल्लेख असतोच.

या भागातले आराध्य दैवत तिरुपती व्यंकटेश जसे लोकगीतांतून आढळत नाही त्याचप्रमाणे महाराष्ट्रात ग्रामीण जीवनाशी एकरूप झालेला पंढरीचा विठोबा देखील लोकगीतांत गवसला नाही. विठ्ठलाचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध लक्षात घेता अरे-समाजाच्या लोकगीतांत असलेला विठ्ठलाचा अभाव बराच सूचक वाटतो. तेराव्या शतकात विठ्ठलभक्ती महाराष्ट्रात सर्वत्र रूढ होण्यापूर्वीच अरे समाजाचे महाराष्ट्रातून स्थलांतर झाले असा निष्कर्ष लोकगीतातील विठ्ठलभक्तीच्या अभावातून निघतो.

अरे-मराठी बोलीचे स्वरूप देखील या निष्कर्षास पुष्टी देणारे आहे.

## १ बापू राजन्ना माजा

१

येइनं ग ऽ माजे मनं, माजे मनं ।। ध्रु. ।।

डूबला ग ऽ समसारु [संसार] समसारु
देव माजे राजन्ना ग ऽ राजन्ना
देव माजे राजन्ना ग ऽ राजन्ना
येमुलडीचं की ग ऽ टांबु [स्तंभ] की ग टांबु
इत्तूनं ग दिसं [दिसते] येतं ग दिसं येतं
टंबूवरे लिंबू लावीयेलं ग लावीयेलं

मज आला [कटाळा] करवालू ग ऽ करवालू
मज आला करवालू ग ऽ करवालू
आये मोटा शावकारु शावकारु
टांबूवरे लागे लिंबू [सुवर्णकळस लिंबाच्या गोलाईचा] ग लिंबू
येमुलाडीचं टंबू की ग टंबू
देवा राजन्नाचं लिंब लावीयेलं।

❖ ❖ ❖

बइलायरे की ग मोटू ये ग मोटू
सिदोरे [शिदोरी] ग बांदू ऊटू की ग हूटू
येमलाडीला जातं की ग जातं

येमुलाडीला जाया हुटू [उठू] की हुटू
वरे मोत्याचं [मोत्यासारखे पांढरे पीठ] पीटू की ग पीटू
पुंजिले ग कुडवाँतु [राजेश्वराच्या यात्रेला पूर्वी बैलगाड्यांतून जावे लागे. देवाला नैवेद्य दाखविण्यासाठी जो स्वयंपाक करावयाचा त्याचा शिधा एका कुडवात-टोपलीत-ठेवून यात्रेला निघण्यापूर्वी या कुडवाची पूजा करण्याचा प्रघात पूर्वी होता. हा कुडव डोक्यावर घेऊन यात्रेला जात असत. आज सर्वच सामग्री देवस्थानी मिळत असल्याने तेथेच कुडबात शिधा ठेवून देवाला प्रदक्षिणा घालण्यात येत असते.] की ग कुडवाँतु

गेले जाऊन मांडवाँतु की ग मांडवाँतु
सनामंदिल [सर्व सणांत श्रेष्ठ सण शंकराचा] सनु की ग सनु
देवा राजन्नाचं माजं की ग माजं

देवा माजं राजन्नाचं ग राजन्नाचं
संकराचा सनु होई की ग होई
संकराचा सनु होई की ग होई

❖ ❖ ❖

२

कोत्ता कुंडं जातं की ग जातं
गावाचं ग खाल्लाकडं की ग कड ऽ
राजे गंगा दारी की ग दारी

हरहर मनिल्यातु हरपूंजा केलीयातु
पोचमायीच [स्थानिक देवता पोचम्मा] की ग गूडी [देऊळ] की गूडी
देव माजं पोचमायी की ग मायी

अनुक्रमणिका

सक्काले [सकाळी] ऊटुनू बोलिते रामदासु
सक्काले ऊटुनू सत्तं बोलावं नारी

सकलिके देवामन्दी मियाँ काइ उन्नं केलं
बापु न्हाइ म्हायेरीले की म्हायेरीले
बापु राजन्ना माजा की ग माजा

अन्तकाले ईसरू पुसू ग पुसू
अन्ता [सर्व-सर्व भार देवावर-राजन्नावर घालावा हा भाव] ऊकलू
देवावरे ग देवावरे
बापू न्हाइ म्हायेरिले की म्हायेरीले
रूसावं कुन्नावरे घालावंग देवावरे देवावरे
घालावं ग तेचंवरे तेचंवरे ।।

## २ आरती भवानीची

आरती माई अंबा भवानी पावनी
भोरूलं [भरली] आरती निवाली [ओवळी] तुलाचु
अनसूट पूलू तुला पुजाला.. .आरती... ।।१।।
आरती घेवा वो आमाला दया देवा वो
घरनी माताचं रानी अंबा भवानी
आरती माई अंबा भवानी पावनी... ।।२।।
हलदु कुंकू तू अवतारी [अवतार धारण करून] उचलुनू
परसरामाला कडंला घेउनु
जलजलाटु [उत्कर्ष] जलकुन राहिलीनु... ।।३।।
मराटी [मराठ्यांच्या कुलाचा उत्कर्ष करण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे' हा भाव] वंसु उतपती करायीची
उक्षलवानी अंबा भवानी
तुलजापुराँतु अवतार उचलूनु
घरनी उपेंदराला पावता जालीसु.... ।।४।।

## ३. आरती श्रीरामचंद्राची

आरती घेवा वो श्रीरामचंद्रा
आरती घेवा वो मला वइव [दैव] देवा बो
भरूला हारती निवाली तुलाचु
वानराचं कलपानं [कळप; कल्प = असंख्य] वारधि [समुद्र] बांदुनु
वारधि बांदुनु तू श्रीरामचंद्रा... ।।१।।
हनुमान चेला करूनु च
वालीला मारूनु श्रीरामचंद्रा
आरती घेवा वो श्रीरामचंद्रा... ।।२।।
लंकंला जाउनु रावनाला मारूनु

**सीताला घेउनु अयोध्या नगरी येउनु**
**तगताला** [सिंहासन] **धनी होउनु श्रीरामचंद्रा... ।।३।।**
**धरनी उपेंदराला दया फावा वो श्रीरामचंद्रा आरती घेवा वो श्रीरामचंद्रा**
**भरूलं हारती निवाली तुलाचु.. ।।४।।**

### ४. दान देवावं

[वर्षातून एकदा सुगीच्या दिवसात तुळजापूरचे भुते या भागात भिक्षेला येऊन तुळजा भवानीच्या नावे दान मांगत असत.]

**मऱ्हाट** [मराठ्यांच्या कुळात जन्माला आलास त्या अर्थी तू मोठा होशील.] **कुलाँतु जल्मुनु थोलूं व्हैलाचु**
**कारू** [औत पास] **आऊतु जोपुनु मोतं पिसाचं कन्सं घेयाचं ।।१।।**
**कालं रेगडींतु भोइकस्ट पडुनु कस्ट भोई पडूनु**
**धावरे** [बारा] **दोनो खंडी दानं त्याँतु पिकूनु त्याँतु दानं पिकूतु**
**कारये देवाचं चोक्कटु देऊनु चोक्कटु देऊनु**
**वरसाला येका दीसी वरसाला येकादीसी आमी येतुमु येतुमु ।।२।।**
**कम्मासे तुजं घराला आमी येइनामु आमी येइनामु**
**आमावरे तुमँचं मनु ऱ्हावावं मनु ऱ्हावावं**
**म्हात्मीला** [देवी] **पाँचु रुपीये दानु देवावं दानु देवावं**
**आमा दानु देवावं दानु आमा देवावं देवावं देवावं ।।३।।**

## २. शेतीविषयक गीते

या समाजातील शेतीविषयक गीते फारच कमी उपलब्ध झाली. पेरणी करताना, कापणी चालू असताना, रोपे लावताना, मोट चालू असताना, खळ्यांच्या हंगामात श्रमपरिहारार्थ अनेक प्रकारची गीते गायिली जातात. आश्चर्य हे की अशा प्रकारची तेलगू गीते या समाजाच्या तोंडी आहेत. विस्कळित स्वरूपात मराठ्यांच्या वसाहती असल्या कारणाने सामूहिक परिश्रमाच्या निमित्ताने उभय भाषिक समाज एकत्र येतो. त्यामुळे कदाचित शेतीविषयक गीते इतिहासजमा झालेली असावीत.

या ठिकाणी तीनच गीतांचा संग्रह करण्यात आला आहे. कोरडवाहू शेतीवर निर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांना पावसाचा एकमेव आधार असतो. पहिल्या गीतात समारंभपूर्वक केलेली वरुणाची (मृग नक्षत्राची) आराधना असून पाऊस पडल्यामुळे झालेला आनंद दुसऱ्या गीतात प्रकट झाला आहे. तिसऱ्या गीतात पावसात माहेराहून आलेल्या पक्षांच्या गुजगोष्टीने सासुरवाशिणीस झालेला आनंद चित्रित झाला आहे.

### १. बरसरे मेगोबा

वरंगल जिल्ह्यातील येलकुर्ती गावी हे गीत उपलब्ध झाले. अरे जमात ही प्रामुख्याने कोरडवाहू शेती करते. तेलंगणात ज्या ज्या ठिकाणी काळी जमीन

आढळते त्या त्या भागात या जमातीच्या वसाहती हमखास आढळतात. कोरडवाहू शेतीत मृगाचा पाऊस अत्यंत महत्त्वाचा तसाच निर्णायकही असतो. मृग वेळेवर बरसला तर पीक येणार. कापूस, तूर, मूग आणि खरीफाची ज्वारी इत्यादी पिकांचे भवितव्य मृगाचाच पाऊस ठरवीत असतो. म्हणूनच मृग नक्षत्र कोरडे जाऊ लागले की शेतकरी हवालदिल होतो. अशा प्रसंगी तेलंगणातला मराठी शेतकरी पारंपरिक पद्धतीने मृगाची आराधना करतो. या आराधनेच्या प्रसंगी समारंभपूर्वक गाण्यात येणारे गीत.

"घड घडायचं गीत" असे या गीताचे नाव आहे. पारंपरिक प्रथा अशी की, किमान पाच सवाष्णी प्रथम कुंभाराच्या घरी जाऊन कोरी मडकी घेतात. नंतर त्या जातात बुरडाच्या घरी. त्या ठिकाणी या घटांवर हळदी-कुंकवाचे पट्टे ओढण्यात येतात. नंतर हा मोर्चा जातो सुताराकडे. तिथे प्रत्येक घटात लाकडी चाटू ठेवण्यात येतो. कासार या घटांना घुंगराची जोड देतो. तेली तेल घालतो आणि शेतकरी कापूस देतो. तदनंतर या सवाष्णी गीत गात गात गावाबाहेर वडाच्या झाडाखाली जातात. सारे घट एकत्र ठेवण्यात येतात आणि सर्व सवाष्णी फेर धरून हे गीत म्हणतात. या गीतातील विंचू हा दंश करणारा वृश्चिक नव्हे. तो आहे विंचवाच्या आकारासारखे दिसणारे आकाशातले मृग नक्षत्र. हे प्रतीक ध्यानात घेतले म्हणजे गीताचा अर्थ स्पष्ट होतो.

**इंचू** [मृगनक्षत्र] **जल्मला चिंचचा गं कौडी**
[खोडावर (चिंचेच्या खोडापलीकडे दिसणाऱ्या आकाशातील मृगनक्षत्र उद्देशून]
**इंचू गेला गंगंचा गं अंगोली** [आंघोळीला]
**इंचू गुंडलं गं शापुरी शेला**
**इंच धरलं ग बेतव्वाचं काटी**

**इंचू जल्मला चिंचचा गं कौडी**
**इंचू नेसला नकियाचं** [काठ असलेले धोतर] **गं धोत्रं**
**इंचू ताकला कापराचं गं ईडं**
**इंचू जल्मला चिंचचा गं कोडी...**

**तित्तून इंचू फडकेला** [पुढे गेला]
**बइसु बइसु ग इंचोबा**
**बइसायाचं काम न्हव्वं**
**घडाला घाघरी फउजे** [पाहिजे]

**कुबाराचं घरी गेला**
**कंदी** [कधी] **न्हाइ त इंचोबाला**
**काय काम बेगी सांगू**
**इंचू जल्मला ग चिंचचा कोडी...**

**तित्तून इंचू फडकेला**
**बइसु बइसु ग इंचोबा**
**काय काम बेगी सांगू**

**वाडवाचा घरी गेला**
**बइसायाचं काम न्हव्वा**
**घडाला चाटू फउजे... इंचू ०...**

**तित्तून इंचू फडकेला**
**बइसु बइसु रे इंचोबा**
**घडाला कुंकू फउजे**

**बुरूडाचा आली गेला**
**बइसायाचं काम न्हव्वं**
**इंचू जल्मला ग चिंचचा कोडी...**

अनुक्रमणिका

तित्तून इंचू फडकेला
कन्दी न्हाइ ते इंचोबाला
बइसायाचं काम न्हव्वं
घडाला घागरू [घुंगरू] फउजे

तित्तून इंचू फडकेला
बइसु बइसु ग इंचोबा
काय काम बेगी सांगू

तित्तून इंचू फडकेला
बइस बइस ग इंचोबा
काय काम बेगी सांगू

अग सतवाचं नारी
जिली जिली पाऊस पडला
आगर आगर मेंडकूली [बेंडकुळी]

शेरी फाया राजू गेला
नारी तू तर मल्लक्का
वट्टीन [परिटीण] तू तर रामक्का
लेन्की तू तर शशिअव्वा
वट्टीन आलीयानं देयावं

जिल जिल पाऊस पडलं
पानी जातं सरसर
साली दान वाल्हे
बरस बरस ग मेगोबा
सुतले सुंब येव्हडे घार

कंसाराचा आली गेला
बइसु बइसु ग इंचोबा
काय काम बेगी सांगू
इंचू जन्मला ग चिंचचा गं कोडी ...

तेलव्याचा घरी गेला
बइसायाचं काम न्हव्वं
घडाला तेलू फउजे ... इंचू ० ...

कंपाराचा [शेतकरी] घरी गेला
बइसायाचं काम न्हव्वं
घडाला कापूस फउजे... इंचू ० ...

पाऊस मग देवा घरी
दुसऱ्याचे शेरीवरे [शेतावर]
सोडावं अऊताच हूरबुडे .. इंचू ० ...

सेलं भिलून घरी आला
सेलं अंबडून [खळवळून धुणे] घे ग
सेलं खुंबी [धुवून घडीकरून] करून आन
सेलं सलदं [पेटी] भरी
इंचू जल्मला चिंचंचा ग कोडी...

सुतले [सुटले] सुंख [सुंबा एवढी धार] येव्हडे धार
धरस बरस रे मेगोबा
राले भुरके वाल्हे
जिल जिल पाऊस पडलं
पानी जात सरसर ... इंचू ० ...

अनुक्रमणिका

## २. दिवसु सोन्याचा

आजचा दिवसु सोन्याचा, सोन्याचा
पाऊस पडतं मोत्याचा, मोत्याचा
गुद गुद पंकरे [पाखरे] माहियेरी, माहियेरी
अंबाच्या बनी बस ऽ तु, बस ऽ तु ।। आज ० ।। १ ।।
मऱ्हाट कुलाँतु जल्मुनी, जल्मुनी
पुडं संबर [शंभर] बाइलु गेऊनी, गेऊनी
काले रेगडींतु आऊतु, आऊतु
साप्ते तेला जोडुनु, जोडुनु ।। आजचा ० ।। २ ।।
कस्ट करुनु पिकाचं, पिकाचं
मंडाला लाऊ भवानीचं, भवानीचं
रास गालू खंडाचं [खंडीची], खंडाचं
रान गेऊ [घेऊ] देवाचं, देवाचं ।। आजचा ० ।। ३ ।।

## ३. पाऊस पडतं मोत्याचं

आद्या दिवसु बाई सोनाचं बाई सोनाचं
पाऊस पडतं मोताचं मोताचं ...
गुजु पंकारे मायेरीचं [माहेरचे] मायरीचं
अंबियाचं बनु मायिहेरिचं
गुजु [पक्षी गुजगोष्टी करतात] गुजु पंकारे सावलीला बसंत [बसलेले]
गुजु [गुजगोष्टी सांगणारे पक्षी माहेरच्या आमराईतून आले आहेत. सावलीला बसून ते माहेरचा वृत्तांत सांगताहेत. [माहेरचा वारा देखील जेथे प्रिय असतो तेथे माहेरच्या वनातून आलेले पक्षी आपल्याच माहेरची वार्ता सांगताहेत असा आभास सासुरवाशिणीस होणे अशक्य नाही.]] गुजु पंकारे मायिहेर साँगातु ।। आज ० ।। १ ।।
मराटान्तु जलमून पुडे शंबरू बईलु
काले रेगडीतु वाँटु काडुनु जोडू सप्ताचं [जोते] कांसर [कासरा]
धावारे दोन दाने कास्तु [शेती] करुनु ।। आज ० ।। २ ।।
मोडाला लवतरू डोलाला जोडू
पीकाला अमरावती हज्ञार खंडाचा ।। आज ० ।। ३ ।।

अनुक्रमणिका

## ३ विवाहविषयक गीते

लग्न समारंभ कोणाच्याही घरी निश्चित झाला तरी गावातल्या प्रत्येक घराने आपल्या परीने 'कार्याला' हातभार लावणे हे पुण्यकर्म समजले जाते. गरीब वा श्रीमंत असा भेदभाव या प्रसंगी दाखविला जात नाही. ज्याच्या घरी कार्य आहे अशी व्यक्ती सामान्य आर्थिक परिस्थितीतली असल्यास उभा गाव अशा घराच्या मदतीस जात असे. बदलत्या परिस्थितीमुळे आणि सुधारणेच्या वाढत्या प्रभावाने काही चांगल्या प्रथा नष्ट होत आहेत. त्यातच गावातल्या एखाद्या घरचे लग्न म्हणजे गाव सोहाळा ही जाणीव देखील बुजत चालली आहे. अरे समाज 'सुधारलेला' नसल्याकारणाने तो आजही जुन्या परंपरेस चिटकून आहे. 'जाय जुइ सेवंती' या गीतात मुलीचे लग्न ठरल्यामुळे विहीण झालेली स्त्री आपल्या वस्तीत सर्वांना लग्न ठरल्याचे सांगते व सहकार्याचे आश्वासनही मिळविते, कुंभार, आतार, सोनार, सुतार, कोष्टी (खोटी), शिंपी या सर्वांचे साहाय्य या विहीणबाईने मिळविले आहे.

वर्तमान समाजजीवनाचे चित्र या दृष्टीनेही हे गीत सूचक आहे. आपली कन्या जाई-जुई-शेवंती या फुलांसारखी कोमल आहे हा मातेचा भाव पालुपदात आलेला आहे तोही हृद्य वाटतो.

पहिले गीत आहे तुळजाभवानीस आवाहन. शुभकार्याच्या प्रारंभी कुलदेवतांना आवाहन करण्याची प्रथा सार्वत्रिक असते. या समाजाचे कुलदैवत तुळजापूरची भवानी. तुळजापूर कोणीच पाहिले नाही. परंतु, तुळजा भवानी आपली कुलदेवता आहे ही जाणीव मात्र सार्वत्रिक आहे. भवानीची प्रतिमा कोठेही आढळली नाही. अष्टभुजा देवीची चित्रे मात्र कित्येक घरी पाहण्यात आली. आवाहनाच्या वेळी पूर्ण कलशावर नारळ ठेवण्यात येतो. तेच भवानीचे प्रतीक. परंपरेने संग्रही असलेल्या तरवारींची पूजाही या आवाहनाच्या समयी होत असते. तरवारीचा मान कुलदेवतेच्या बरोबरीचा. नारळासह कलश आणि तरवार यांची पूजा झाल्यानंतर देवीची स्थापना पूर्ण झाल्याचे समजण्यात येते.

### १. लग्नाला येवावं जगदंबा

**अंबा गिरिवरु तुज जगदंबा तू लग्नाला येवावं जगदंबा**
**पाँजनु** [पांचजणी] **सव्वासिनी मिलूनु या लिंबं नारेलु आनुनि या**
**पाँजनु गोंदले मिलूनु या लिंबं वंटी भोरुनु या**
**लिंबाचं गोंदलु घालुनुया पाँजनु सव्वासिनी मिलुनुया**
**अंबा जगदंबा, अंबा जगदंबा तू लग्नाला येवावं जगदंबा ।।**

## २. जाय जुई सेवंती

बाय-लेंकी [कन्या] परनिली [लग्न केले (लग्न ठरले हा संदर्भानुसार भाव;] जाय जुई सेवंती ।। ध्रु० ।।
हीनीबाई निगाली गेली कुंबार आली
कुंबारदादा का मन्तो ।। जाय ० ।।
बाय लेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
वारुलं [वारले-शकुनाचे मृत्तिका घट] कित्ती मी देऊ ।। जाय ० ।। १ ।।
हीनीबाई निगाली गेली कोमट आली
कोमटदादा का मन्तो ।। जाय ० ।।
बाईलेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
वाट्या खोब्रं किती देऊ ।। जाय ० ।। २ ।।
हीनीबाई निगाली गेली आतार आली
आतारदादा का मन्तो ।। जाय ० ।।
बायलेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
कुक्कू कित्ती मी देऊ ।। जाय ० ।। ३ ।।
हिनीबाई निगाली गेली कँसार [कासार] आली
काँसारदादा का मन्तो ।। जाय ० ।।
बायलेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
काँकनु कित्ती मी देऊ ।। जाय ० ।। ४ ।।
हिनीबाई निगाली गेली सोनार आली
सोनारदादा का मन्तो ।। जाय ० ।।
बायलेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
सोनं कित्ती मी देऊ ।। जाय ० ।। ५ ।।
हिनीबाई निगाली गेली वाडव्या आली
वाडिवीदादा [सुतार] का मन्तो ।। जाय ० ।।
बायलेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
पाटं [पाटबांधणे हा विवाहसमारंभातला एक आवश्यक विधी असतो. लग्नाच्या आदल्या दिवशी नवरदेवाने (मुलीच्या घरी वधूच्या मोठ्या भावाने) शेतात जाऊन पळसाचे खोड तोडावयाचे असते. या खोडाचा तिपईसारखा पाट त्याच दिवशी तयार करावयाचा असतो. या पाटावरच सारे धार्मिकविधी होतात.] कित्ती मी बांदू ।। जाय ० ।। ६ ।।
हिनीबाई निगाली गेली खोट्याचं [कोष्टी] आली
खोटीदादा का मन्तो ।। आय ० ।।
बायलेंकी मी कां देऊ ।। जाय ० ।।
नुगडे कित्ती मी धाडू ।। जाय ० ।। ७ ।।
हिनीबाई निगाली गेली सिंप्याचं आली
सिंपीदादा का मन्तो ।। जाय ० ।।
बायलेंकी मी का देऊ ।। जाय ० ।।
चोले [चोळ्या] कित्ती मी देऊ ।। जाय ० ।। ८ ।।

अनुक्रमणिका

## ३. वारूलं आनायासु गीतु

[लग्नाचा मंडप उभारल्यानंतर मंगल कलशाची स्थापना करावयाची असते. पाच सुवासिनी मिळून कुंभाराच्या आव्यावर मिरवणुकीने जातात. या सुवासिनींच्या डोक्यावर 'चांदणी' (चादर) धरण्यात येते. 'चांदण्यातली' मिरवणूक. कुंभाराच्या आव्यातून कलश आणल्यावर लग्नमंडपात कलशाची स्थापना होते.]

पाँजनी सवासिनी वारूली आनाया चाल्ली
चांदव्या खालं जाता वरे सोनाचं धनी
त्याला मोतीयाचं हारू त्याला मोतीयाचं हारू
कुंबारू माजं दादा कुंबारू माजॅ दादा
तुजं आवा गंगकडं तुज आया गंगकडं
तुजं चक्कर [चक्र] सोनीयाचं तुजं वारूलं मोतीयाचं
मोते घेवावं दादा वारूलं देवाचं दादा
वारूले ऊचलीतु कंथाचं [पति] नावं घेतु
नवरीचे माय बाप वरसा वरमाय होतु
पातीले [पाहतात] कवतिकु लाविले वजंतरु ।। १ ।।
कुंबारू माजं दादा कुंबारू माजं दादा
वारूलाला ग जाता तुज वारूलं मोते
नवरीचं माय बाप वरसा वरमाय होतं
कंथाचं नाव घेतं वरसा बरमाय होतं
हिरवे ग मांडवाँतु हलदीचं ग कवतुकं
नवरीचं माय बाप वरसा वरमाय होतं
पाँजन सव्वासिनी वारूलला जातं पुडं
कुंबारू माजं दादा कुंबारू माजं दादा
पाँजन सव्वासिनी वारूलाला जात होतं ।। २ ।।
वरे [गर्भात चांदी असलेला चांदण्यातला चांदवा. (गर्भ रेशमी चांदीसारखा चमकणारा).] तेला रूपीयाचं गरबं
सानियाचं चांदवा
त्याला मोतीयाचं जालरू त्याला मोतीयाचं जालरू
कुंबारू माजं दादा चांदवा खालुन जाता
पाँजन सव्वासिनी वारूलाला जात होतं
तुजं चक्कर सोनीयाचं तुज आवा रूपीयाचं
वारूलु मोतीयाचं तुजं चक्कर सोनीयाचं
वारूलं देवावं दादा मोते घेवावं दादा ।। ३ ।।
तुजं आवा खाल्लाकडं तुज आवा गंगकडं
वारूलं देवावं दादा मोती घेवावं दादा
पाँजनी सव्वासिनी वारूलाला जातजाता
कुंबारू माजं दादा वारूलं देवावं दादा

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **तुजं चक्कर मोतीयाचं** | **तुजं वारूलं रूपीयाचं** |
| **मोती घेवावं दादा** | **वारूलं देवावं दादा ।।४ ।।** |

**४ हळदीचं गीतु**

प्रत्यक्ष कार्याचा शुभारंभ हळद कांडण्याचा मुहूर्त करून होत असतो. त्या प्रसंगीचे हे गीत. हा मुहूर्त झाल्यानंतर देवांना व नियोजित वधू-वरांना आपापल्या घरी हळद लागते. हळद लागल्यापासून ती ओघळेपर्यंत (हा कालावधी १६ दिवसांचा किंवा पाच आठवड्याचा असतो) मांडवात वा घरात अशुभ-सूचक असे काही करावयाचे नसते. या कार्यक्रमात पाटा वरवंट्याला बराच मान असतो. एखाद्या माणसाला सजवावे त्याप्रमाणे पाट्या वरवंट्याला भूषविले जाते व त्याची पूजा होत असते. म्हणून पहिली हळद लागते ती पाट्या-वरवंट्याला.

जेटिया म्हणजे नवरदेवाचा मोठा भाऊ. लग्नसमारंभात त्याचे स्थान महत्त्वाचे. नवऱ्या मुलाच्या सोपस्कारापूर्वी जेटियाचा मान करावा लागतो. मांडवात नवरी मुलगी आणण्याची कामगिरी (मुली लहान असत तेव्हा तिला कड्यावर घ्यावे लागे) जेटियाची. वरातीतही जेटिया अग्रभागी असतो. वधू लहान असल्यास तिला कडेवर घेऊन मिरवणे त्याचेच काम.

या गीतात आलेली क्रमवाचक विशेषणे लक्षात घेण्यासारखी आहेत. चौथा, पाचवा असे प्रयोग न करता चारजो, पाचजो अशी विशेषणे योजली जातात. गुजराती भाषेत 'जो' शेवटी असलेली क्रमवाचक विशेषणे आहेत. पण या भाषेचा अरे बोलीवर परिणाम होण्याची शक्यता दूरान्वयानेही गृहीत धरता येत नाही. मग, ही रूपे आली कोठून? यादवपूर्वकाळात अशा प्रकारची विशेषणे रूढ होती काय?

—अथवा दुजा, तिजा या विशेषणांच्या धर्तीवर साधर्म्याने ही विशेषणे रूढ झाली आहेत काय?

| | |
|---|---|
| **हलदाई खंदीले** | **गोन्याहीं भरीले** |
| **दोनी पानं हलदाई** | **तिनी पानं आलं ग** |
| **नवरीचे भावानं** | **नवऱ्याच्या भावानं** |
| **दोनी पानं हलवाई** | **तिनीं पानं आलं ग** |
| **हलदनी मलदनी** | **बाइका नीका पाटावरे** |
| **हलदीला मलदीता** | **मालानं** [गोरी मालन (वधूचे लाडातले नाव)] **गोरीला** |
| **अवा वो या पंदऱ्याबाई** | **क्रुशन नव्वरा** [कृष्ण] **बाई** |
| **राधाबाई नव्वरीया** | **हलदनी मलदनी** [मर्दनी] **।।१ ।।** |

**पय्येनी** [पहिली] **हलद पाटावरूवंट्याला**
**दुसरी हलद वाँटाच्या बाईला**
**तीनजी हलद नव्वानरसिंगाला**
**चारजो हलद दावा जेटीयाला**

अनुक्रमणिका

पाँचजे हलद पाँजन सव्वासिनीला
साजो हलद ईर हनुमंताला
सातजो हलद ईर-पारवतीला [ईश्वर = शंकर; शंकरपार्वतीला]
सातजो हलद गंगा भागीर्तीला
आटजो हलद रामाचं सीताला
नवजो हलद सगलेका देवाला
धाजो हलद कुस्नाला लावी
धाजो हलद रादाला लावीले

## ५. वंटी भरायसं गीतु

| | |
|---|---|
| नंदन बइनीचे | तोरू राजे |
| तांचे कन्या | रूक्कुमबाई |
| नुगडं नेसीलं | हलदीसं |
| चोली लेविले | खनावाचं |
| दँत रंगीले | दँतोनानं |
| होट रंगीले | तँबोलानं |
| डोले रंगीले | काजलानं |
| सेस भरीले | मोतीयानं |
| भाँका [भांग] भरीले | कुंकवानं |
| वरवंट भरीले | हलदीनं |
| वंटी भरीले | तंदोलानं |
| नुगड [लुगडं] पदरी | रामसीता |

## ६. तेलवण

तेलवण हा विवाह-समारंभातला एक कार्यक्रम. प्रथम देवाला तेल अर्पण करून नंतर वधू-वरांना आपापल्या घरी तेल लावण्यात येत असते.

टेलू टेलू ग ऽ टेंबुरनी ।। टेलू टेलू ग ऽ टेंबुरनी
टेलू लागलं ग ऽ अंबाबाईचं कानी ।
टेलू लागलं ग आई भावानीचं कानी ।।
टेलू लागलं आई पोचाईचं कानी । टेलू लागलं देवा राजन्नाचं कानी
टेलू लागलं देवा ईरन्नाचं कानी ।। टेलू ० ।।

| | |
|---|---|
| तीर-बासिंग पलान केलं | नागदेवाचं मांडवा खाले |
| फिरून देवाचं लगनसाटी | कंबल घडीले कदंबराचे |

अनुक्रमणिका

**तीर बासिंग पलान केलं** **मादेवाचं** [महादेव] **मांडवाखाले**
**क्रुश्न देवाचं लगनसाटी** **कॉंकनु घडीले कदंबराचे**
[नामाचे सामान्यरूप न करता विभक्ति प्रत्यय वा विभक्ति वाचक अव्यय लावण्याचा प्राचीन मराठीचा विशेष अरे बोलीत अवशिष्ट आहे;]

**गामदेवीला** [ग्रामदेवता] **वंटी भरीले पांची पांडव सोनियाचे । दारी मांडव रुपियाचे ।।**
**पोचाईला वंटी भरीले ।। पांची पांडव ० ।।**
**आई भवानीना वंटी भरीले ।। पांची ० ।।**
**देवा राजन्नाला** [देवींच्या बाबतीत वंटी (ओटी) भरल्याचा उल्लेख असून देवाच्या संदर्भात मात्र 'कटी भरीले' असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. 'कटी भरीले' याचा नेमका वर्य मात्र स्पष्ट झाला नाही.] **कटी भरीले ।। पाची ० ।।**
**देवा इरन्नाला कटी भरीले ।। पाची ० ।।**
**देवा मल्लन्ना कटी भरीले ।। पाची ० ।।**

### ७. देवकाची गीते

देवकासंबंधी दोन गीते उपलब्ध झाली. त्यांपैकी प्रथम देण्यात येणारे गीत अधिक रूढ असून दुसरे फारसे प्रचारात नाही. ही दोन्ही गीते या भागातील मराठ्यांच्या पूर्वेतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरतात. दोन्ही गीतांत 'देवक्या' (नियोजित वर) डोंगराकडे जात असल्याचा उल्लेख आहे तो लक्षात ठेवण्यासारखा आहे. आपल्या मुलखातून मराठे आले ते डोंगरात, निर्जन अरण्यात वसाहत करण्यासाठी आणि क्षात्र धर्माचे परिपालन करून पराक्रम गाजविण्यासाठी हे या दोन्ही गीतांत नमूद करण्यात आले आहे. समाजाची पूर्व परंपरा अशा रीतीने या गीतात केवळ सुरक्षित नसून लग्नप्रसंगी तिचा आवर्जून उल्लेख झाल्याने समाजाला आपल्या कुळधर्माची जाणीव करून देण्याचे कार्यही या गीतांनी साधले आहे.

'देवक बांधणे' हा विवाहसमारंभातला एक आवश्यक विधी आहे. नवऱ्या मुलाला हळद लागल्यानंतर त्याने नवी वस्त्रे परिधान करून हनुमंताच्या दर्शनासाठी मिरवत जावयाचे असते. या मिरवणुकीत जाण्यापूर्वी नवरदेवाची बहीण त्याच्या खांद्यावरच्या उपरण्यात दही-भाताची 'शिदोरी' बांधते व कुऱ्हाड त्याच्या खांद्यावर ठेवते. ही तयारी झाली की देवक 'बांधले' असे समजावे. तदनंतर देवकाची मिरवणूक निघते ती गीत गातच. देवकाची गीते पुरुषमंडळीच सामूहिक रीत्या गातात. या गीतांतील 'गोंदाडिले', 'असाडिले', 'पसाडिले' या शब्दांचे अर्थ लागत नाही.

#### देयक बंदाइसु गोतु

**आई भवानीचं ये गोंदलु**
**गोंदाडिले तुज लगाडिले**
**असाडिले तुज पसाडिले**
**आई पोचाईचं ये गोंदलु**

**आई पोचाईचं ये गोंदलु**
**गोंदाडिले तुज लगाडिले**
**आसाडिले तुज पसाडिले**
**तुलजापूर तुकाईचं ये गोंदलु**

अनुक्रमणिका

गोंदालिले तुज लगाडिले देवा राजन्नाचं ये गोंदलु
देव ईरन्नाचं ये गोंदलु ईर हनुमंताचं ये गोंदलु
नवरा दासरावचं ये गोंदलु गोंदालिले तुज लगाडिले ।।१ ।।
सोनाचं कुराडी रुपीयाचं दांडा
सोनियाचं गाडा रुपीयाचं नाडा
धौले पौले बईलु धौले पौले बईलु
शेत्री [शेती / छत्री = क्षत्रीय] चालला डोंगरा छेत्री [शेती / छत्री = क्षत्रीय] चालला डोंगरा
त्यानं तोडीले मोगरु [मोगरु हा शब्द दोन अर्थाने योजला जातो. झोपडीला आधारभूत असलेली मुख्य मेढी आणि पायदळ. क्षत्रिय डोंगरात जाऊन झोपडीसाठी मेढी तोडतो व नगर बसवितो हा एक अर्थ. त्याच प्रमाणे तो डोंगरात जाऊन शत्रूचा पराभव करतो व आपल्या विजयाच्या स्मरणार्थ नगर वसवितो असा दुसरा अर्थ हा या चरणांतून निघतो. हे दोन्ही अर्थ मराठ्यांच्या पूर्व परंपरेत बसतात. त्यांनी निर्जन प्रदेशात नव्या वसाहती केल्या त्याचप्रमाणे मुलुखगिरी करून स्वतःची नगरे वसविली. स्थलांतराची ही दोन्ही कारणे परंपरेने नोंदवून ठेवली आहेत.] त्यानं तोडीले मोगरु
त्यानं बांदीले नगरु त्यानं वसीले नगरु ।।२ ।।
हतो [असलेला (पुरुष वा स्त्री)] रे पुरुसा भरम [ब्रह्मगाठ] गाँटु घालुनु
सौंदरीचा फाँटा सोनाचं चाल्याँतु
वाजतं गाजतं बाजारु मिर्वतं
देवक आलं ग मांडवाचं दारी
बईसु बईसु ग देवका बईसु बईसु ग देवका
बइसायाचं काम न्हव्वं बइसायाचं काम न्हव्वं
राम-सिताचं लगीन रामसीताचं [लग्न] वराडं ।। ३ ।।
रामसीताचं वराडं, रामसीताचं वराडं
नव्वरा परमेसु,नवरा परमेसु नव्वरी पारबती नव्वरी पारबती
नईभोंतिले [नदीभोवती] पाय बांधिले जंबिये वना
जंबी तोडुनि वंटी भरीले नव्वरीला वो नव्वरीला
वाटी घालीन वंटी भरीले, नवरीला वो नव्वरीला
आकासु मंटपु जरतारी बडले
वाजतु गाजतु चहू बाजारु मिर्वतु ।।४ ।।
धया-भाताचे सिदोरे धया भाताचे सिदोरे
शेत्री चालिला डोंगरा शेत्री चालिला डोंगरा
रामसीताचं लगीनं रामसीताचं वराडं
सोनाचं कुराडी रुपीयाचं दांडा, बाजतु गाजतु चहूबाजारु मिर्वतु
आकासु मंटपु जरतारी बहूले
वाजतु गाजतु चहू बाजारु मिर्वतु ।।५ ।।

अनुक्रमणिका

## २. बइसई देवका, बइसई देवका

**बइसई देवका, बइसई देवका ।।**

**अंबु** [आंबा, पेरु, सौंदडी यांपैकी कोणत्याही झाडाचा दांडा कुऱ्हाडीला असावा असा संकेत आहे] **कुसं राय**
**कुसं जंबु कुत्तं सौंदडी**
**नॉक घातलं सोनेरी**
**हिरवी पाटाऊ** [रेशमी वस्त्र] **करंजा**
**काळी कनिक तांदुलु,**
**तेची केली सिदोरी**
**देवक्या दादाचं पदरी,**
**देवक्या दादाचं पदरी**
**देवक्या चालिला डोंगरी,**
**देवक्या चालिला डोंगरी**
**आलं वाजतु गाजतु,**
**तेन पिरथिमी लवतु**
**सूर्व्याचं** [सूर्य काजव्या सारखा दिसावा एवढे नवरदेवाचे तेज; किंवा नवरदेवाचे तेज पाहून सूर्याच्या डोळ्यापुढे काजवे चमकले हा भाव. 'नवरदेव चालत असताना पृथ्वी लवत होती' ही पराक्रमसूचक भावना या गीतात आढळेल.] **घरी काजवं,**
**सुर्व्याचं घरी काजवं**
**आलं पिरथिमीधं राजं,**
**आलं पिरथिमीचं राजं**
**अंबू पुसतं जंबूला,**
**जातं कुनाचं वाड्याला**
**सुर्व्याचं घरी काजवं,**
**आलं पिरथिमिचं राजं**

## ८. बाशिंग

[मारुतीच्या पारावर देवतांच्या साक्षीने बाशिंग बांधतात त्यावेळचे गीत]

**सेर सेर मोत्याचं बासिंगं । सेर सेर मोत्याचं बासिंगं**
**सेर सेर मोत्याचं बासिंगं । तित्तं अन्विलं ईरन्ना ।। सेर० ।।**
**दोन सेर मोत्याचं बासिंगं । तित्तं अन्विलं हनुमंतं ।। सेर० ।।**
**तीन सेर मोत्याचं बासिंगं । तित्तं अन्विलं वीरन्ना ।। सेर० ।।**
**चार सेर मोत्याचं बासिंग । तित्तं अन्विलं नरसिय्या ।। सेर० ।।**
**पाच पाच सेराचं बासिंग । तित्तं अन्विलं मल्लन्ना ।। सेर० ।।**
**सा सा सेराचं बासिंग । तित्तं अन्विली भवानी ।। सेर० ।।**
**सात सात सेराचं बासिंग । तित्तं अन्विली पोचाई ।। सेर० ।।**

### मांडवातील गाणी

विवाह विधीत मांडवातल्या मानपानाला महत्त्व असते. समाज कितीही सुधारला तरी मानपानाची प्रथा या ना त्या रूपात कायम आहे. मानपानाच्या निमित्ताने मांडवात हास्यविनोद आणि थट्टामस्करी उभयपक्षी होत असते. उभयपक्षीही उणी दुणी वरीच निघतात. मांडवातल्या हास्यविनोदाची बरीच गीते उपलब्ध झाली.

अनुक्रमणिका

त्यातील काही निवडक गीते पुढे दिली आहेत. प्रारंभ भावाबहिणीच्या थट्टेतून होतो. दुसरे गीत दोन विहिणींची प्रश्नोत्तरे असल्यासारखे आहे. सामाजिक आशयाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे वाटते. अर्थात् ते किती मर्यादेपर्यंत समजून उमजून गाण्यात येते हा प्रश्नच आहे! वधूपक्ष वराच्या दारी उभा राहून प्रश्न करतो. 'सोनं किती घेणार?' 'वरपक्षाचे उत्तर आहे, तुमच्या सोन्याचा ढीग करा तुमच्या घरी. आम्हाला फक्त सून पाहिजे.' शिक्षणाचा गंध नसलेल्या समाजात हा विचार व्यक्त होतो हेही महत्त्वाचे म्हटले पाहिजे.

६, ७, ८ या गीतांत मांडवातला रूसवा-फुगवा वर्णिलेला आहे. शेवटच्या गीतात सासूला वाटणारे जावयाचे कौतुक चित्रित झाले आहे.

**१**

**कम्मल देतं बुट्टालु देतं, दादा तुज्या लग्नाला येतं**
**कम्मल नोक्को, बुट्टालु नोक्को, भइनी माजं लग्नाला नोक्को**
**नानलु देतं, गुलसलु देतं दादा तुजं लग्नाला येतं**
**नानलु नोक्को गुलसल नोक्को, भइनीनं माजं लग्नाला नोक्को**
**गाजत देतं पाटाऊ देतं, दादा तुजं लग्नाला येतं**
**गाजलु नोक्को पाटलु नोक्को, भइनीनं माजं लग्नाला नोक्को**

**२**

**कित्ती सोनं घेता, दार** [दार उघडा] **काडवा दार बाई दारी अंबीले** [गहूले वळवट] **घऊले**
**तुमचं सोनं तुमा घरी रास कर आमाघरी सून होयी**
**कित्ती सोनं घेता बाई बाई घेता दारी अंबीले घऊले**
**तुमचं सोनं तुमाघरी ऱ्हाऊ द्या आमाघरी सून होयी**
**सिंपी सिंपी सोनं देतं बाई दारी अंबीले घऊले**
**तुमचं सोनं तुमाघरी रास कर आमाघरी सून होयी**
**धा सिंपी सोनं देतं दार काडवा बाई घरी अंबीले घऊले**
**तुमचं सोनं तूच रास कर आमाघरी सून होयी**

**३**

**सोन्याचं पाटु याहिनी** [विहीण] **ऊट्टना**
**लिंबाचं पाटु याहिनी ऊट्टना**
**मोत्याचं पाटु याहिनी आली न्हायाया**
**याहिनी आली न्हायाला ये ना हिनी न्हायाला**

अनुक्रमणिका

४

चिक्कटु मातीनं भवले घातिले, घातिले तित्तं सिरीमुक दोगं बसले
बसले नव्वऱ्याचं माय बाप काय मागले
मागले लावून घ्याया बोटू [मानाचा टिळा] मागले
चिक्कटू मातीनं भवले घातिले, घातिले तित्तं सिरीमुक दोगं बसले
बसीले नौरीचे मायबाप काय मागिले
मागले, लावून श्याया गुलसी मागले
चिक्कटु मातीनं भवले घातिले, घातिले तित्तं सिरीमुक दोगं बसिले
बसिले नोऱ्याचे माय बाप काय मागिले
मागले नोऱ्याला घडियारम् मागिले
चिक्कटू मातीनं भवले घातिले, घातिले तित्तं सिरीमुक दोगं बसिले
बसिले नौरीचं मायबाप काय मागिले
मागिले लाऊन घ्याया सोनं मागिले
चिक्कटु मातीनं भवलं घातिले.....

५

गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमच्या नौरीला कम्मलू घडव
गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमंच्या नौऱ्यनला घडियारम् घडव
गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमचे नौरीला पइंजन घडव
गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमचे नौऱ्याला बंडुऊ घडव
गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमचे नौरीला गोलसलु घडव
गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमचे नौरीला गुन्नालु घडव
गंगं ग पैलाडू सिद्रामु सोनारू आमचे नौरीला कनसेला घडव

६.

नव्वरी काइ रूसली कळयीचं कांकनवरी
त्यावरे काइ बोलु गुन्नाला धरियेवर
नव्वरा काइ रुसला हाताचे पोचीवरी
त्यावरे काइ बोलं गुन्नाला धरियेवर
नव्वरी काइ रुसली गल्याचं नानवरी
त्यावरे काइ बोलं गुन्नाला धरियेवर
नव्वरा काइ रूसला हाताचं घडियारावरी
त्यावरे काइ बोलं गुन्नाला धरियेवर

अनुक्रमणिका

ऊट ऊट नवरदेवा घरी सास वाँटु फाली [पाहते]
अउरंगी घोड्यावरे चउरंगी गुंफिल्यातु
ऊट ऊट नवरदेवा तुज सास्त्रा वाँटु फाला... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरदेवा तुज म्हेवनी वाँटु पाली... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरदेवा तुज म्हेवना बल्वूआला... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरीदेवी तुज सासु वाँटु फयली... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरीदेवी तुज सास्त्रा वाँटु फयला... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरीदेवी तुज भाया [भावा, नवऱ्याचा मोठा भाऊ] बोलवाला... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरीदेवी तुज जाउ बलवायाली... अउरंगी ।।
ऊट ऊट नवरीदेवी तुज देर बोलवाला... अउरंगी ।।

## ९. नवरा का ऽ की रूसलं

नवरा का ऽ की रुसं ऽ लं, रुसं ऽ लं
नवरा का ऽ की रुसं ऽ लं, रुसं ऽ लं
त्यावरे का ऽ की पूसंलं, पूसंलं
नवरा का ऽ की रुस ऽ लं, सोन्याचे घडियारवरे
त्यावरे का ऽ की पूस ऽ लं, पूस ऽ लं ।। नवरा ० ।।
नवरा का ऽ की रुस ऽ लं, हात्तंचं घडियारवरे
त्यावरे का ऽ की पूस ऽ लं पूस ऽ लं ।। नवरा० ।।
नवरा का ऽ की रुस ऽ लं, हाताचं बटनवरे
त्यावरे का ऽ की पूस ऽ लं पूस ऽ लं ।। नवरा० ।।।
नवरा का ऽ की रुस ऽ लं, कांकांचं [काखेतल्या रेडिओवर] रेडिओवरे
त्यावरे का ऽ की पूस ऽ लं पूस ऽ लं ।। नवरा० ।।
नवरा का ऽ की रुस ऽ लं, कूडाचं सायकलवरे
त्यावरे का ऽ की पूस ऽ लं पूस ऽ लं ।। नवरा० ।।

## १०. थोरू जाँमाँई

हिरे मोडिले हालू हालू । चिरे मोडिले हालू हालू ।।
नकरखंडे पानाचे केले बाई ईडे
तारा [घोडा, नक्षत्रांकित आहे] पडल्यात्तं घोड्यावरे
मोरं [समोर] बसले थोरू जाँमाई

अनुक्रमणिका

अंगनी बसले थोरु जाँमाई
वसऱ्या बसल्या दोनो लेंकी
नवरा-नवरीला बसवून आनल्यातं
तोंडु रंगलं हळदीनं
कपाळु रंगलं कुंकवानं
भोंकु रंगलं मोतीयानं
अंगु रंगलं हळदीनं
नाभी रंगलं मासपट्यानं [कमरपट्टा]
हातु रंगलं येरावानं
मनकट रंगलं चुडीयानं.
पायी रंगलं पइंजनानं
होटु रंगलं ताम्बोलीनं
दाँतु रंगलं दाँतोनीनं
डोले रंगलं काजळीनं
मोरु उवा न्हाई, थोरू जाँमाई
घोड्यावरे त्यानं बसीलं ।।
घोडं परतुनु आनाया कोनु गेलं
घोडं पिराया रंगु गेलं
हनुमं परताया कोनु गेलं
घोडं परताया रामलु गेलं
पायी धराया कोनु गेलं
पायी धराया म्हेउनं गेलं
हातं [हातवा] धराया कोनु गेलं
हातं धराया म्हेउनी गेलं
दोरी धराया कोनु आलं
दोरी धराया पिरय्या आलं
आन [अन्न] वाडाया कोनु आले
आन वाडाया चंदर आलं
मोरू म्होराई थोरू जाँमाई
आमँचे लेन्कीला थोरू जाँमाई

अनुक्रमणिका

## ११. लगीन लागतं या!

विवाहाशी संबंधित असलेली वेगवेगळी गीते अगोदर दिली आहेतच. एकंदरीत विवाह समारंभ कसा होतो, संस्कार गीते कोणत्या क्रमाने येतात यासंबंधी अगदी 'अधिकृत' माहिती नोंदविता यावी म्हणून हुजुराबाद (ता. करीम नगर) येथील नव्वद वर्षाचे बालय्या मोकले यांना विनंती केली. त्यांनी ऐंशीच्या दारवंट्यात असलेल्या आपल्या बहिणीच्या मदतीने (राजम्मा आंग्रे) समारंभाचे जे क्रमवार वर्णन केले आहे ते त्यांच्याच शब्दांत पुढे देण्यात येत आहे.

या भावंडांनी विवाह-समारंभाचे एकूण ९ टप्पे संबंधित गीतासह सांगितले. काही गीते अगोदर येऊन गेली असली तरी या 'अधिकृत' कथनाचा संदर्भ बरोबर लागावा या हेतूने ती पुन्हा या निवेदनात आली आहेत.

तेलुगू समाजात विवाह समारंभ वेगळ्या पद्धतीने होतात. पुढे दिलेले विवाह समारंभाचे टप्पे मराठवाड्यातील ग्रामीण विभागात होणाऱ्या विवाहात आजही पहावयास सापडतील. शहरांतून होणाऱ्या विवाहपद्धतीत थोडा बदल कालपरत्वे घडला आहे. शेकडो वर्षे महाराष्ट्राशी संपर्क नसूनही आणि भिन्न पद्धतीने विवाह समारंभ साजरा करणाऱ्या तेलुगू समाजाच्या सहवासात राहूनही अरे समाजाने या संस्काराच्या बाबतीत आपली मराठी परंपरा कायम ठेवली आहे हे ध्यानात येईल.

**अंबील मांडव :** देव ब्राह्मणाच्या दिवशी सकाळी होणारा सोहळा. वधूवरांना अपेक्षित असलेल्या विविध अलंकारांची नावे या गीतात आली आहेत. देवतांना आवाहन आहेच. पाटाभोवती अंबीलाने भरलेली पाच मडकी ठेवून ती दोऱ्याने सुतवितात. करवली वारली सुतवीत असते. पाच सुवासिनींनी ही वारली वधूवराच्या डोक्यावर उपडी करावयाची आणि नंतर मंगल स्नान घालावयाचे. मडकी चांभार घेऊन जातो. याचवेळी हळकुंड, पैसा, सुपारी, उडीद एका पिवळ्या फडक्यात बांधतात व ती गाठोडी नवरा/नवरी यांच्या हाताने मांडवावर टाकतात. अथवा मांडवाच्या एखाद्या खांबाला बांधतात.

अनुक्रमणिका

## १. अंबील मांडव

नवरी येदिसी नवऱ्याला बलाउनु घेउनुसिनी अंबीलु करूनु मडकं भरूनु टिवावं. पांचकडं पांचु वारूली टिउनु घेउनु सुतुनु नवऱ्याला पानी घालावं. मांग [चांभार] पायाचं येऊन त्यानं काडीत गेलं अंबीलचं मडकं तेनं घेउनु जावावं. [जी बारली सुतविते तिने] सुतील तेन नवऱ्याला गीतु गावावं :

**मांडवं भोरावं मांडव भोरावं मांडव भोरावं हो**
**नवऱ्या इरन्नाचं कवतीक फावावं कवतिक फावावं** [पहावे] **हो**
**आमंच्या नवऱ्याला आमंच्या नवऱ्याला भीकबाली फउजे**
**आमंच्या नव्वरीला आमंच्या नव्वरीला लतकडं** [हातात घालावयाचे कड] **फाउजे**
**देवा इरन्नाचं कवतिक फावावं कवतिक फावावं हो**
**आमच्या नवऱ्याला पोचिया** [पुरुषांच्या मनगटावर बांधाल्याचा पट्ट्यासारखा अलंकार (चांदीचा)] **फाउजे पोचिया फाउजे हो**
**मांडव भोरावं मांडव भोरावं कवतिक फावावं हो**
**आमच्या नव्वरीला आमंच्या नव्वरीला गुन्नालु फउजे हो**
**मांडव भोरावं नव्वरीच्या जल्माचं कवतिक फावावं हो**
**आमंच्या नवऱ्याला गाइवाँन्सरू फाउजे हो**
**मांडव भोरावं नवऱ्या इरन्नाचं कवतिक फावावं हो**
**आमंच्या नव्वरीला आमंच्या नव्वरीला बुगडीलु फाउजे हो**
**मांडव भोरावं मांडव भोरावं नवरीच्या जल्माचं कवतिक फावावं हो**
**आमँच्या नवऱ्याला आमँच्या नवऱ्याला घलसिलु पाइजे**
**मांडव भोरावं मांडव भोरावं कवतिक फावावं हो**
**आमच्या नव्वरीला आमंच्या नव्वरीला तोडलु पाइजे हो**
**मांडव भोरावं मांडव भोरावं कवतिक फावावं हो**

## २. हळद

फाटं [पहाटे] नव्वरी येतं तम्मां [तेव्हा] तस्सचु. सांजेला नवरा येतं तम्मा बी तस्सचु करावं. तर्वाता हलदी लावुनु गीतु गाचं. हलदीचं गीतु गायित्तं [गात गात] जाचं :

| | |
|---|---|
| **सोनियाचं खुंटं** | **रूपियाचं वरवंटं** |
| **तेनं हलदी दलावी** | **लेन हलदी दलावी** |
| **कारयंजं पानी** | **पान्यानं कालवाई** |
| **तेलानं मर्जाई** [मर्दन करावे] | **तेलानं मर्जाई** |
| **राम सीताचं लगीनु** | **रामसीताचं वराडु** |

अनुक्रमणिका

## ३. देवता आवाहन

ये हुइन तर्वाता देवाला बलवावं गीत गाउनशानी :

**देवारं भोरिलं देवारं भोरीलं देव राजन्ना गोरा हो**
**त्याहीचं कुलीचं याहीचं कुलीचं हिरे मानिक जोडिले हो**
**देवारं भोरिलं देवारं भोरिलं आई पोचाइ गोरी हो**
**त्याहीचं कुलीचं याहीचं कुळीचं हिरे मानिक जोडीले हो**
**देवारं भोरीलं देवारं भोरिलं आइ पोचाइ गोरी हो ।। त्याही ०**
**देवारं भोरीलं देवारं भोरिलं आइ भवानी गोरी हो ।। त्याही ०**
**देवारं भोरिलं देवारं भोरिलं देव मल्लन्ना गोरा हो ।। त्याही ०**
**देवारं भोरिलं देवारं भोरिलं देव रावन्ना गोरा हो ।। त्याही ०**

## ४. तेलवण

हलदी लाउनु जालेवरे टेलु लावाचं. नवरा नवरीला टेलु लाउनु पुन्ना गीत गावित :

**टेलु टेलु ग टेंबुंरनी टेलु टेलु ग टेंबुरनी**
**टेलु लागिलं आई भवानीचं काना टेलु ०**
**टेलु लागलं आई पोचाइचं काना टेलु ०**
**टेलु लागलं देवा राजन्नाचं काना टेलु ०**
**टेलु लागलं देवा इरन्नाचं काना टेलु ०**
**टेलु लागलं देवा मल्लन्नाचं काना टेलु ०**
**टेलु लागलं देवा म्हैसम्माचं काना टेलु ०**
**टेलु लागलं नवरा राजन्नाचं काना टेलु ०**
**टेलु लागलं नवरी इरम्माचं काना टेलु ०**

अनुक्रमणिका

## ५. शकुनाचे घट

टेंलु लाउनु जालेवरे वारूले आना जातं. पांचु सव्वासिनी. लेन्कु असन त्या सव्वासिनी मिलोन कुंबाराच आव्याकडं जातं. गीत गावित जातं.

| | |
|---|---|
| **पाँजन सव्वासिनी** | **पाँजन सव्वासिनी** |
| **वारूले आना जातं** | **वारूले आनाया जातं** |
| **चांदाखालुनु जातं** | **कँताचं नांवु घेत** |
| **कंताचं नांवु घेत** | **वारूलं ऊचलितं** |
| **कुंबारू माजं दादा** | **कुंबारू माजं दादा** |
| **तूजे वारूले मोते** | **तूजे वारूले मोते** |
| **मोते घेवावं दादा** | **वारूले देवावं दादा** |
| **नवऱ्याचं माइबापु** | **नवऱ्याचं माइ बापु** |
| **वरसा वरमाई होतं** | **वरसा वरमाई होतं** |
| **पातिले कवतिकु** | **पातिले कवतिकु** |
| **कुंबारू माजं दादा** | **कुंबारू माजं दादा** |
| **तुज आवा खाल्ला कडं** | **तुज आवा गंगाकडं** |
| **मोते घेवावं दादा** | **वारूले देवावं दादा** |

## ६. कांडणाने मुहूर्त

वारूलं आनुनु मांडवान्तु टुवितं. ते जालेवरे मोत्रं [मुहूर्त] करितं :
हलदी दलाचं गीत गावित :

| | |
|---|---|
| **हलदाई खंदिले हलदाई खंदिले** | **गोन्याही भोरिले गोन्याही भोरिले** |
| **नवऱ्याचं भावानं नवरीचं भावानं** | **गोन्याहीं भोरिले गोन्याही भोरिले** |
| **येक पानं हलदाइ दोनपानं आले हो** | **हल ०** |
| **दोन पानं हलदाई तिन पानं आले हो** | **हल ०** |
| **तिन पानं हलदाई चार पानं आले हो** | **हल ०** |
| **चार पानं हलदाइ पाच पानं आले हो** | **हल ०** |

[असे दहा पानांपर्यंत हे गीत चालते]

अनुक्रमणिका

## ७. देवक बांधणे

हलदी खंदुनु जालेवरि देवकु ऱ्हातं. देवकु मन्त्रु काय की नवऱ्या पोराला न्हाऊ घालावं, नए बट्टे देवावं तेला नेसावं. उत्तरीयं चं सेवामंदी [शेव = टोक] काय की बायलेन्की सिदोरे बांदतं. सिदोरे कां मनितं : धइ भातु नवऱ्या पोराचं थोल्ली भइन बांदतं. येकु कुराडी त्याचे खांदेवरि टुवितं. वाजतु गाजतु भासिंग घेउनु हनुमंताचं पारावरे जातं. पानपुडा घेउनु जातं. तित्तं गीतु गावितं. मुंदु देवकाचं, तर्वाता भासिंगाचं.

**सोन्याचं कुराडी** | **रूपियाचं दांडा** | **सोनियाचं गाडा रूपियाचं नाडा**
**छत्री गेल्यातं डुंगरा** | **छत्री गेल्यात डुंगरा**
**धया भाताचं सिदोरे** | **धया भाताचं सिदोरे**
**धोले पोले बइलु** | **धोले पोले बइलु**
**छत्री गेल्यातं डुंगरा** | **त्याहीं तोडिले मोगरू**
**तेनं वसीले नगरू** | **तेनं वसीले नगरू**
**आकासं मंटपु** | **आकासं मंटपु**
**मोते पवल्याचं दरोनु** [द्रोण] | **मोते पवल्याचं दरोनु**
**रामसीताचं लगीनु** | **राम सीताचं वराडु**
**वाजतं गाजतं** | **चहू बाजारू मिर्वतं**

## ८. बाशिंग

हनुमंताचं पारावर देवाला भासिंग दावतं. गीत गावितं :

**सेर सेर मोत्याचं भासिंग** | **सेर सेर मोत्याचं भासिंग**
**तित्तं राजन्नं अन्विलं** | **तित्तं राजन् अन्विलं**
**तुज्नं मल्लारू तुजं देतं** | **माजी मियाँ नव्वरी मी नेत**
**तित्त आई भवानी अन्विलं** | **तुज्नं पल्लारू** ['हे देवा, तुझ्यासाठी मी फलाहार आणला आहे. तो तुला अर्पण करतो आणि माझी नवरी मी घेऊन जातो' हा भाव भिन्न देवतांना उद्देशून प्रकट झाला आहे.] **o**
**तित्तं आई पोचाई अन्विलं** | **तुज्नं पल्लारू o**
**तित्तं गौराई अन्विलं** | **तुज्नं पल्लारू o**
**तित्तं इरन्ना अन्विलं** | **तुज्नं पल्लारू o**
**सेर सेर मोत्याचं भासिंग** | **सेर सेर मोत्याचं भासिंग**

अनुक्रमणिका

## ९. शुभमंगल

हनुवंतांचं पारावरूनु वजत्री घेउनु नवरा काय की भासिंग लाउनु कुराडु कंद्यावरे टाकुनु सिदोरे घेउनु, वाजतु गाजतु मांडवान्तु येतं. मांडवान्तु आल्यावरे का की नव्वरीचं आई पाय धुतं. भातु उतरूनु ताकतं. बावनु काय की लगीनु लावीतं. पीले दानेचं अक्षता न्हात. थोल्ले [ज्वारीची दोन पिके खरीफ व रबीची; रबीची ज्वारी ती ‘थोल्ला जोन्नला’ (थोरला जोंधळा).] जोन्नले का की तूपू हलदी लावुनु पीलं करित्तं. ते दोने अक्षता ताकुनु लगीनु लागतं.

## ४. वैवाहिक जीवनाची सफलता

वैवाहिक जीवनाची सफलता पुत्रजन्मोत्सवाने होते. नवविवाहितेचे प्रथम अपत्य हा कुटुंबातील सर्वांचाच कौतुकाचा व आनंदाचा विषय असतो. बालविवाह रूढ होते त्या काळात विवाहित मुलीला ऋतुप्राप्त होणे हा देखील आनंदोत्सव गणला जात असे. या विभागातल्या पहिल्या गीतात 'मुका नातु' झाल्याचा समारंभ वर्णिला आहे. प्रौढ विवाह आता रूढ झालेले असल्याने हा समारंभ देखील इतिहासजमा झाला आहे.

न्हाणवलीला १६, १२ अथवा ४ दिवस मखरात बसवून वेगवेगळी गाणी गाऊन हा प्रसंग साजरा करण्यात येत असे. माहेरची मंडळी सामान्यपणे हा उत्सव साजरा करतात व सासरची मंडळी आपल्या ऐपतीप्रमाणे वस्त्रप्रावरणे घेऊन येतात. मुलगी सासरी जाते व ऋतुशांती सासरी होते.

डोहाळे लागणे ही त्यानंतरची अवस्था. पहिलटकरणीचे डोहाळे हा आजही कौतुकाचा विषय आहे. त्याला सामाजिक मान्यता आहे. पुराणादिकांनी देखील दोहद पूर्ण करण्याच्या परिपाठीवर शिक्कामोर्तब केले आहे.

डोहाळ्याची दोन पूर्ण आणि एक त्रुटीत अशी तीन गीते येथे दिली आहेत. त्रुटीत असलेले गीत अधिकच काव्यमय होते. दुर्दैवाने ते समग्र घेता आले नाही. 'आमँच मनसं तुमी काइ जाना' हे गीत साधारण स्त्रियांच्या तोंडी असलेल्या लोकगीतापेक्षा फारच वेगळ्या जातीचे होते. लोकनाट्यातील मैना, संस्कृतवाङ्मयातील विप्रलंभ शृंगाराश्रित नायिका यांच्या पंक्तीला बसू शकेल अशी नायिका या गीतात चित्रित झाली आहे. रणावर गेलेल्या पतीच्या विरहाने तळमळणारी विरहिणी पोटी वाढणाऱ्या बालकाचे कौतुक पतीस सांगण्यास उत्सुक आहे. ती तुर्की तंबोरा घेऊन स्वतःचे मन रिझवू पाहाते... या गीताचा हा सर्वसाधारण काव्यमय आशय. या गीताचे फक्त चारच चरण घेता आले.

डोहाळ्याची इतर दोन गीते पारंपरिक आहेत. पहिल्या गीतात गर्भिणीच्या अवस्थेचे वर्णन असून दुसऱ्यात तिचे मनोगत चित्रित झाले आहे. गर्भिणी ही साक्षात देवकी असल्याची मुळ धारणा आहे. त्यामुळे पुत्रजन्मोत्सवाच्या गीतांत स्वाभाविकपणेच श्रीकृष्ण आणि गोकुळ यांचे संदर्भ आले आहेत. पाळण्यासंबंधीच्या गीतावरून हे सहज ध्यानात येईल.

अनुक्रमणिका

## १. न्हानं आलं नेनंतीला

| | |
|---|---|
| उन्नाला [उन्हाळा] ग उन्नावरे | पानी न्हाई सेवंतीला |
| न्हानं आलं नेनंतीला | तानी लच्चव्वा माजी ।।१ ।। |
| वरूलाकडं ग बाई | वाजंत्र वाजीयेलं |
| वाजंत्र वाजीयेलं | शारातुनु [शहरातून] कोनु आलं ।।२ ।। |
| घरॉंतु ग म्हाटीनु [कमरपट्टा] | नेसली ग पांडरं लुगडं |
| लाईली ग मासुपटा | तानी लच्चव्वा की ग माजी ।।३ ।। |
| दगडाचा ['मुका नातु होणे' या वाक्प्रचाराचा संदर्भ] की ग नातु | तोंडावरे की ग सावुली |
| तोंडावरे की ग सावली | शारातली की ग भावली ।।४ ।। |
| शारतली की ग भावली | तानी लच्चव्वा माजी |
| तानी लच्चव्वा की ग माजी | शारातली की ग समी [समई] ।।५ ।। |
| सुर्वे-चंद्राचा ग फडा | शारातुनु कोनु केला |
| शारातुनु [पुढच्या तीन कडव्यांत मुलीची आई माहेरच्या कारागिरीचे कौतुक करीत आहे असे वर्णन.] कोनु केला | माययीनं ग उत्तरीला ।।६ ।। |
| शीव-संबू पारवती | कोनु केली करामती |
| केली कोनु करामती | म्हायेरू माजं करामती ।।७ ।। |
| दर्वाजाचं कोनु केलं | मी त सांगायालं |
| मी त सांगायालं | गौरव्वा ग तीनु केलं ।।८ ।। |
| केलं गौरव्वा तीनु | कोन्निगाली कामधेनु |
| माय माजी कामधेनु | गौरव्वा माजी ।।९ ।। |
| पिटाचं ग सान्नं आलं | दर्वाजा ग धुन केलं |
| दर्वाजा ग धुन केलं | म्हाइराचं बोलु आलं ।।१० ।। |
| म्हाइराचं बोलू आलं | भाऊ नरसय्या की ग माजा |
| तेनु उसाचं भवनं केलं | तान्या माज्या कच्चव्याला ।।११ ।। |

अनुक्रमणिका

## २. आमँचुं मनसुं तुमी काइ जाना

अवो देवई गर्बीय [गर्भिणी] नारी
आमँचं मनसं तुमी काइ जाना
भरतार गेले उतूते धना
उतुते [खारकेचे वन (खजुराचा देश?)] वना येलम् गेते
अवो देवई सरगीय [स्वर्गीय] नारो
जाना जाना नंदनवन जाना
भरतार गेले शेत्तीचे [क्षत्रियाच्या रणात] रना
तुरकी तंवोरे सुरात गेते
एकय् पारे नारी पुंजीतं [या गीतासंबंधी अधिक माहिती प्रास्ताविकात आली आहे]........

[अपूर्ण]

## ३. ढव्वाले : १ :

येकीये मासु येकीये मातु येके रूप होती जो जो...
दोनीये मासु दोनीये मासु वंकार [ओकाऱ्या ] देती जो जो...
तीनीये मासु तीनीये मासु वंकार देती जो जो...
चारीये मासु चारीये मासु चौकु [ओटी-पोट रुंद होते] रूंदती जो जो...
पाँचीये मासु पाँचीये मासु बाल [बाळ हुंकार देते] हंकाती जो जो...
सायीये [सहा] मासु सायीये मासु सासु पुसते
सुनु तुमँचं ढव्वालं कस्सं ढव्वालं [डोहाळे] कसं जो जो...
सातुवे मासु सातुवे मासु उमाक्का पुसं
हिनी तुमचं ढव्वालं कस्सं ढव्वालं कस्सं जो जो...
रानीचं मन कशीयेवरी कशीयेवरी जो जो...
आटुये मासु आटुये मासु देर पुसतं
रानी तुमचं ढव्वालं कस्सं ढव्वालं कस्सं जो जो...
नवीये मासु नवीये मासु माय पुसतं
लेन्की तुमचं ढव्वालं कस्स ढव्वालं कस्सं जो जो...
झाडाव्या खोल्या घालाव्या बाजा घालाव्या बाजा जो जो...
बोलावं सुइनबाईला बोलावं सुइनबाईला जो जो...
सखे सिक्रिस्न जल्मले क्रिस्न जल्मले जो जो...

अनुक्रमणिका

## ४. ढव्वाले : २ :

**येकू मासु सये येकू मासु सपे सलदु** [पेटी दारुगोळा ठेवण्यासाठी असलेली पेटी. लष्करीपेशाच्या समाजात रूढ असलेला हा शब्द लीळाचरित्रातच फक्त आढळला.] **वहीले सलदु वहीले**
**अनी** [बाळंतपण फक्त राहत्या घरातच होत असल्याने दिवस भरत आल्यावर बाळंतिणीची खोली स्वच्छ करण्यात येत असते. कुदळ, फरशी आदी टोकदार हत्यारे या खोलीच्या कोपऱ्यात ठेवण्यात येतात. प्रसूतीनंतर बाराव्या दिवशी या हत्यारांची पूजा होते व नंतर ती नित्याच्या वापरात घेतात]
**गेली आनाय फरसी केली कोना**
**देवई निगाली परसं घरे मोत्या बरसं**
**देवई देते धुरे** [गुग्गळाच्या धुराने केस सुगंधित व निर्जंतुक करणे] **वान देवई नेसं जुन्नंपान्नं**
**देवई घरी बाल किस्नाजी धाकुले**
**देवई घरी नारायेनु, देवई घरी नारायेनु ।। १ ।।**

**येकूये मासु येकूये मासु सासु पुसतं सुन तुमँचं ढव्वालं कर्स्सं ढव्वालं कर्स्सं जो जो...**
['तुझे डोहाळे सांगा; मी ते पुरवीन'] **सांगी ढव्वाले पुरमी ढव्वाले जो जो....**
**जावावं हाटं आनावं उतुते भरावं वंटी जो जो...**
**दोनीये मासं दीनीये मासं सासरा पुसतं**
**सुन तुमँचं ढव्वालं कर्स्सं ढव्वालं कर्स्सं जो जो...**
**जावावं हाडं आनावं खुब्रे भरावं वंटी जो जो.... ।। २ ।।**

**तीनीये मासं तीनीये मासं नन्दा पुसतं वहनी तुमँचं ढव्वालं कर्स्सं ढव्वालं कर्स्सं जो जो..**
**जावावं मले आनावं जबे भरावं वंटी जो जो...**
**चारीये मासं चारीये मासं देर पुसतं**
**भाबी तुमेचं ढव्वालं कर्स्सं ढव्वालं कर्स्सं जो जो...**
**जावावं मले आनावं लिंबं भरावं वंटी जो जो... ।। ३ ।।**

**पाँचीये** [पाचव्या महिन्यात पहिलटकरणीला बाळंतपणासाठी माहेरी नेतात. म्हणूनच पुढच्या महिन्यांतील डोहाळे माहेरच्या माणसांनी विचारले आहेत.] **मासं पाँचीये मासं भाऊ पुसतं**
**भइनी तुमँच ढव्वालं कर्स्स ढव्वालं कर्स्सं जो जो...**
**लावावं सेतं आनावं वाल्क भरावं वंटी जो जो...**
**सायीये मासं सायीये मासं भइनी पुसतं**
**भइनी तुमँचं ढव्वालं कर्स्सं ढव्वालं कर्स्सं जो जो...**
**जावावं मले आनावं बोरी भरावं वंटी जो जो... ।। ४ ।।**

**सातुवं मासं सातुवं मासं बापु पुसतं**
**लेन्की तुमँचं ढव्वालं कर्स्सं ढव्वालं कर्स्सं जो जो...**
**घालावं सिदा तोडावं आंबे भरावं वंटी जो जो...**
**आटुवं मासं आटुवं मासं भावा पुसतं**

अनुक्रमणिका

भाबी तुमँचं ढव्वालं कस्सं ढव्वालं कस्सं जो जो...
जावावं मले आनावं कवटे भरावं वंटी जो जो... ।।५ ।।

नवई मासं नवई मासं माय पुसतं
लेन्की तुमँचं ढव्वालं कस्सं ढव्वालं कस्सं जो जो...
आनावं घईभाताचं सिदोरं भरावं ताट जो जो...
धायीये मासं धायीये मासं आज्ज्ञी पुसतं
नाती तुमँचं ढव्वालं कस्सं ढव्वालं कस्सं जो जो...
झाडावं खोली घालावं बाजा जो जो ।।६ ।।

देवाई घरी बालकुस्नाजी धाकुले
देवाई निगाली रंजन वरे मोत्याचं इजान
तेलीन मज बाई तेलीन मज [माझ्यासारखी पुत्रवती होशील हा भाव. अथवा माझी सखी आहेस म्हणू न तुझ्यावर विश्वास] बाई मासकं होसी जो जो...
बालाचं अंगी कुल्लई तेलीनं बुंडुनु आनु जो जो...
सिंपीन मज बाई सिंपीन मज बाई मासक होसी जो जो...
बालाचं अंगी कुल्लई घडी तू सिवून आन जो जो...
वडिवाचं मज दादा वडिवाचं मजं दादा
बालाचा पाल्ला [पाळणा] घडी तू भोरनु आन जो जो...
मांगाचं मज दादा मांगाचं मज दादा
बालाचा पाल्ला घडी तू इनून आन जो जो... ।।७ ।।

अनुक्रमणिका

## ५. पाळणा

### १

देवइ नारायेन, देवइ नारायेन : पैलं मासं सये पैलं मासं सये
सलदं वहीले, सलदं वहीले : आनी गेली आना, फरसी गेली कोना ।। ध्रु ।।
देगइ निगाली परसा वरेमोत्याचं आरसं
देवइ निगाली वसरी वरे मोत्याचं छतरी
देवइ निगाली अंगन वरे मोत्याचं इजन [पंखा]
देवइ नेसं जुन्नपानं देवइ वाती धूरेवानं
देवइघरी बालकुस्नाजी धाकुले, कुस्नाजी धाकुले. ।। १ ।।
पाह्ला आनिला अज्ज्यानं चउरंग उचलिला जेट्यानं [भावा; नवऱ्याचा मोठा भाऊ]
पाह्ला हलिदी घालीन पाह्ला हलिदी घालीन
पाल्ल्या सोनियाचं अंकुडे पाल्ल्या सोनियाचं अंकोडे
कला हालिला नागानं चउरंग गुंपिला ग तेनं ।। देव० ।। २ ।।
पालला हलिला बापानं चउरंग उचिला जेट्यानं
खाह्लाकडं बाई सोनियाचं अंकोडे, सोनियाचं अंकोडे
पाह्ला हालिला मउल्यानं [मावळा-मामा, अत्याचे यजमान अथवा आजोळचे नातेवाईक] चउरंग उचिला जेट्यानं
खाह्लाकडं बाइ सोन्याचं अंकोडे, सोनियाचं अंकोडे

### २

सिंपीन मज बाइ सिंपीन मज बाइ मासकं होसी जो जो
बालाला अंगी टोपी सिऊन देसी जो जो
सोनारू माजं दादा सोनारू माजं दादा मासकं होसी जो जो
बालाला मुदे बिंदली अनुनी देसी जो जो ।। २ ।।
वाडिव्याचं माजं दादा वाडिव्याचं माजं दादा जो जो
बालाचं माजं पाह्ला घडी करूनु आनी जो जो. ।। ३ ।।
मांगाचं माजं दादा मांगाचं माझं दादा जो जो
बालाला पाह्ला इनुनु देसी जो जो ।। ४ ।।
मालीम माजं बाइ मालीनु माजं बाइ मासकं होसी जो जो
बालाचं पाह्ला पुलानं गुंपुनु आनी जो जो ।। ५ ।।

अनुक्रमणिका

## ६. पाळणा शिवाजीचा

[अरे समाजाच्या लोकगीतांत छत्रपति शिवाजी महाराजांचा हा एकमेव उल्लेख आढळला].

**चिमन्या बाला सिवाजी लेन्का जो जो**
**माजे लेन्का सिवाजी बाला जो जो**
**अंबा भवानीच वरदान तुला जो जो**
**तुरेला कवड्याचा गोपु जो जो**
**गल्यान्तु सोनीयाची सरी जो जो**
**घोड्याचं सवारी तुज जो जो**
**हातान्तु तल्वारू तुज्या जो जो**
**कम्माला गोपु करदोराजो जो जो**
**चांद सुर्व्याचं कला बाला जो जो**
**डग्गातलं** [ढगातली वीज] **ईजू बाला जो जो**
**घरनी उपेंदराला दया फावावं जो जो**
**चिमन्या बाला सिवोजी लेन्का जो जो**

## ७. जो जो नंदा

| | |
|---|---|
| **जो जो नंदा परमानंदा राजगोविंदा** | **जो जो** |
| **बालाचं करदोरा कोनु लाविले** | **मायीचे माहेरी माजे आज्ञोले** |
| **बालाचं कुल्लीई फोर लाविले** | **मायीचे माहेरी माजे आज्ञोले** |
| **बालाचं अंगी कोनु लाविले** | **मायीचे माहेरी माजे आज्ञोले जो जो** |

अनुक्रमणिका

## ८. देव पावला

से [सखे] बालक जल्मला  देव पावला
बाला जो जो रे  किती समजावो तूला
अगी टोपी बाई  टीपीला पिंपल पान
दंडाच दंडा बावटे  हाताला येला लाऊनु
माजाला गोपु कडदोला  पायाला पइंजनु.. बाला जो जो...
असं हिरा जल्मला  चंदर ऊगला
जनलोक मनीले बाई  अेवढा चंदू या नारीला
असं हिरा जन्मला  चंदर ऊगला... बाला जो जो...
बालं पनपन [फणफण] तापला  नारी विगरूनि [विघरून-दुःखाने अस्वस्थ] गेली
तुलजापूरी तूकूबाई  तुला गोंदलु गालीन
येमाऊ ग मायबाई  तुजं दरबारी येईन
मालेगावचं मल्लराया  तुला शेरनं वाँटीन
असं हिरा जलमला  चंदर ऊगला... बाला जो जो...

## ९. जौ गालाच गीतु

जो जो जो बाला  जो चिम्नं क्रिस्ना
वासुदेवाचा पुत्र  जोंपी जावा वो
जो जो मनुनु  हालिते यसोदा
बाला या गोविंदा  द्रिस्टु जालिया...
अंगी टोपी  तुलाचु बाला
टिपीला पिंपलपानु  या बाला जो जो...
दंडाचा दंडा  बावटा बाला
हाताला येला [वेल; एक सुवर्णालंकार]  लावुनु तुला
माजाला [कमरेला गोफ] गोपु  करदोल बाला
चांदा सुर्व्याचं  कला सिराला बाला
हातातु सुदामु  चक्कर तुला... जो जो...
बोंबीला [बेंबी भोवती बारा हिरे आणि पाठीला पाचूचे खडे हा भाव] बारा  हिरा या बाला
पाठीमागं पाचू  वाण तुला... जो जो...
जो जो बाला  जो चिम्नं क्रिस्ना
वासुदेवाचं पुत्रा  जोंपी जावा वो... जो जो...
जो जो मनुनु  हालविते यसोदा
बाला रे गोविंदा  दिष्टु जालाया तुला
कंकलास [कोणाची सावली तुझ्यावर पडली?] साउली  पड्ड्या तुला... जो जो...

अनुक्रमणिका

## १०. नाँवु टेवावं

नांदू टेवावं नाँवु टेवावं रतन मानिक जो जो
घुऱ्या घातिले मोते पौले जो जो
हल्ले हल्ले मनकट रूतले
नीज रे बाला गोविंदा नीज रे बाला गोपाला नीजु रे... नाँवु. ।।१ ।।
दोनी वाटे हंतरले ताटे नीज रे....
हल्ले हल्ले मनकट रूतले [पाळण्याला अगदी हलके हलवा. बाळाच्या हातात मनगटी आहे ती रुतेल.] नीज रे...
चार वाटे हंतरले ताटे नीज रे...
नाँवु टेवावं नाँवु टेवा वं रत्न मानिक जो जो ।।२ ।।

अनुक्रमणिका

## ११. चंद्रु ऊगलं

क्रिस्नु तू काला रादा मी गोरी ।।ध्रु०।।
डोइवरे घागरी हाती धरूनु
धई दुद्दु भाकरी आनी घरूनु
नंदाचं मामाला जाउनु सांगतु
यसोदा ऽ ला लेंकु जन्मलं
जेउनु खाउनु यदमु ['जे काही' हा अर्थ (मूळ शब्द तेलुगू); जेवण-खान जे काय असेल ते आटोपून] यांडी ['अहो' या अर्थाचा आदरवाचक तेलुगू शब्द]
आया वा यांडी बाया वा यांडी ।।१।।
अंगी-चोले सिउनु घेउनु
अंगाला लाउनु यदमु यांडी
बालाचा नाँवा रोउनु यांडी
हीरं जल्मलं चंद्रु ऊगलं
सूरजिंती [सूर्याला जिंकणारा] चंद्र होइलो
आया वा यांडी बाया वा यांडी ।।२।।
सोन्नारानं वाली केलं
सरी येला करून्यानलं
वाडिवाचं वाडी गेलं
पाल्ला चांगलं करूनु आन्लो
हलदी कुंकु लावुनु घेउनु
आया व यांडी बाया व यांडी ।।३।।
सिंपवाचं वाडी गेलं
अंगी चोले सिउनु घेउनु
अंगाला लाउनु यदमु यांडी
बालाला करदुला घेउनु यांडी
हीरं जल्मलं चंद्रु ऊगलं
आया व यांडी बाया व यांडी ।।४।।

अनुक्रमणिका

## ५. स्त्रीजीवन विषयक

लोकगीतांचा संग्रह करताना पुरुषवर्गाचे सहकार्य फारसे लाभले नाही. अगदी मोजकी गीते वगळली तर बाकीची सर्वच गीते स्त्रियांकडूनच प्राप्त झाली आहेत. सण-वार आणि संस्कार यांच्या संबंधी असलेली गीते वगळली तर अन्य गीतांतून स्त्रीजीवनाचा मुक्त आविष्कार झालेला आढळून येईल. या गीतांत वर्तमान आणि भूत यांचा संगम आढळेल त्याचप्रमाणे परंपरेला भावाविष्काराची जोड लाभल्याचे दिसून येईल.

सासर-माहेरचे कडू-गोड अनुभव या गीतांत आहेत. काही अपवाद वगळले तर माहेरविषयीचा जिव्हाळा व माहेरचा सातत्याने उत्कर्ष व्हावा ही तळमळ उत्कट स्वरूपात दिसून येईल. सासरच्या जीवनाची कृतार्थताही काही गीतातून आढळेल. स्त्रीजीवनाच्या निमित्ताने एकंदरीत कौटुंबिक वातावरणाची कल्पनाही या गीतावरून येईल. 'नागाच्या ग पंचमीला' आणि 'दुकं सांगं मायापोटी' ही दोन गीते मराठी ओवीच्या रचनेच्या दृष्टीने लक्षात घेण्यासारखी आहेत. या दोन्ही गीतातील ओवी तीन चरणी असून दुसऱ्या व तिसऱ्या चरणांच्या अंती यमक आहे. हा विशेष रचनेचे प्राचीनत्व दर्शविणारा आहे.

### १. आमंचं मनसं अमीय जाना

कन्या सासरी जावयास निघाली आहे. लेक-जावई समारंभपूर्वक निरोप घेत आहेत. लेकीची बोळवण आई करते. 'आमच्या मनातली कालवाकालव तुम्हाला काय कळणार?' हा मातेच्या अंतरीचा भाव या गीतात आढळेल.

**देन्टु** [देठ] **देन्टु मोडिलेतं**
**बसीलेतं सिरिमुक** [श्रीमुख] **दोगं** [दोघे]
**जाने जानं नंदा गरी जानं**
**आमँचं मनसं तुमी काय जाना**

**फान्टं** [फांदी] **फान्टं वेइलेतं**
**भरलीय् कुरडीय वंटी**
**नंदा गरी जानं ग नंदा गरी**
**अमंचं मनसं अमीय जाना**

### २. वाण

**व्हानं** [वाण] **व्हानं खुबऱ्याचं** [खोबऱ्याचे] **व्हा ऽ नं जी ।। व्हानं० ।।**
**त्यानं जातं परिवंटं जा ऽ तं जी ।। व्हानं० ।।**
**राम तोडी लक्षुमन दुर्डी भरं ऽ जी ।। व्हानं० ।।**
**चिमन्या हारी बसलं पानं भ ऽ री जी ।। व्हानं० ।।**
**व्हानं व्हानं उतुत्याचं** [खारीक] **व्हा ऽ नं जी ।। व्हानं० ।।**
**त्यानं जातं परियंटं जा ऽ तं जी ।। व्हानं० ।।**

अनुक्रमणिका

## ३. चल ग ऽ भइनी

चल ग ऽ भइनी दड ऽ दडा, [झप झप, वेगाने] दड ऽ दडा कस्सं चालू दादव्वा, दादव्वा
पायाँतु पइंजनं गालाचे ऽ, गालाचे गळ्ळे [गळ्यात] गळ्ळे वानाचे ऽ [अलंकार] वानाचे
अंठी [आंगठी] करतं सोनाचे सोनाचं चल ग ऽ भइनी दड ऽ दडा, दड ऽ दडा ।। १ ।।
वांग्याचं मळ्ळा लाविल्तं लातिल्तं लिंबाचं मळ्ळा लाविल्तं, लाविल्तं
भावाला भाउजाइ आनिल्तं आनिल्तं भइनीला म्हेउना आनिल्तं आनिल्तं
चल ग ऽ भइनी दड ऽ दडा दड ऽ दडा कस्सं चालू दादव्वा दादव्वा ।। २।।
वेरे भावा माजं घरी माजं घरी
पायाला ग पानी देतं पानी देतं
वोलाला ग पानी जातं पानी जातं
सुकु-दुकू सांग रे भावा, सांग रे भावा
पाटावरे बसून ऱ्हावा, बसुनु ऱ्हावा
नागय् आला पाडाव रे [पहडावर], पाडाव रे
भाऊ आलाय् घोड्यावरे घोड्यावरे ।। ३ ।।

## ४. गाई आले दादा

गाई आले दादा गाई कोन्नाचे ।।गाई०।।
नंदनाबाईचे सूर्वेनारायनाचे
पाडे आले दादा पाडे कोन्नाचे ।।पाडे०।।
नंदनाबाईचे सूर्वेनारायनाचे
मशी आले दादा मशी कोन्नाचे ।।मशी०।।
नंदनाबाईचे सूर्वेनारायनाचे
मेंढुं आले दादा मेंढुं कोन्नाचे ।।मेंढुं० ।।
सूर्वेनारायनाचे ग ऽ सूर्वेनारायनाचे
तेले [शेळी] आले दादा तेले कोन्नाचे ।।तेले०।।
नंदनाबाईचे सुर्येनारायनाचे
हलगटं [रेडा] आले दादा हलगटं कोन्नाचे ।।हल०।।
नंदनाबाईचे सुर्वेनारायनाचे
वाँसरं आलं दादा वाँसर कोन्नाचे ।।वाँस०।।
नंदनाबाईचे सुर्वेनारायनाचे
[या दोन ओळीत गृहिणी नवस बोलून जाते. 'माझा वाडा गाई-वासरांनी भरून जाऊ दे. मी राजन्नाच्या नावाने पांढरा गोऱ्हा (दौला पाडा) सोडीन']
गाईनं वाँसुरानं भोरु दे माजं वाडा
सोडीतं ढौला पाडा देवा माजा राजन्नाला

अनुक्रमणिका

### ५. शाराची मराटीनु

देसाई माजं बाऊ मोगली [पूर्वी हैदराबाद संस्थान मोगलाई या नावाने संबोधले जात असे] माजं गाँऊ । मोगलाई माजं गाँऊ
बारीकु लुगड्यावरे लाईली माजप ऽ टा । शाराची ग ऽ मराटीनु
शाराची गं ऽ मराटीनु, माजी गं भइन बाई । माजी गं ऽ भइन बाई
बोंगूवरीले [वेळूच्या झाडाला एकावर एक पेर असतात, तशाच आम्ही बहिणी वाढलो] बोंगू, गंगू ऽ माजी भइनु । का ग भइनी रुसलीसु
का गं ऽ भइनी रूसलीसु, करतं मोत्याचं नातु [नथ] । रादाबाईला माज्या
काले गं ऽ रेगडीतु, कुंदरु भारी केला । पुतन्या रंगईला
अनुमानु तू नोको ऱ्हाऊ, दे माजी बाइलेन्की । रानी लचाव्का माजी

### ६. मी जातं माहियेरा [पांखराच्या पंखावर बसून माहेरी जाण्याची ओढ]

गुजु गुजु पँकरं, [पाखरे] गुजुगुजु पँकरं
मी जातं माहियेरा, मी जातं माहियेरा
माहियेराचं वाँटंल, [वाटेवर] अंबियाचं जाडू, [झाड] लिंबियाचं जाडू
त्यावरे बस ऽ ते, मताऽरं पुस ऽ ते
लेंकीचं लेंकाला, नाताला पुस ऽ ते
लेन्कीचं लेन्कीला, नातीला पुस ऽ ते

अनुक्रमणिका

## ७. नव्व ऽ री कस्तूरी

[नवपरिणीत वधू माहेरी जाण्यास निघाली आहे. पती तिला आवडतो. माहेराहून वस्तू आंदण आणीन हे वधूचे आश्वासन]

**नव्व ऽ री कस्तूरी बसली पालकींतु** [पालखीत] **।।**
**ध ऽ र ध ऽ र नरसय्या पदुरू धरींचु** [धरतो]
**सो ऽ डी सो ऽ डी मइसराऊ पदुरू सोडीये**
**पदुरू सोडून्दे जाउन्दे म्हायेरा**
**जाऊन्दे म्हायेरा आनुन्दे अंदनु ।। नव्वरी० ।।१।।**
**सोडून्दे पदुरू जाऊन्दे म्हायेरा**
**जाऊदे म्हायेरा आनुन्दे घडियारम् ।। नव्वरी०।।**
**सोडून्दे पदुरू जाऊदे म्हायेरा**
**जाउन्दे म्हायेरा आनुन्दे बटकलु** [कपडे] **।। नव्वरी० ।।**
**पाल्कीतले नवरीले धरीले पदुरू**
**सोडी सोडी मइसराउ जाउन्दे म्हायेरा**
**जाउन्दे म्हायेरा आनुन्दे करदोडे**
**नव्वरी कस्तूरी बसिली पालकींतु ।।२।।**

अनुक्रमणिका

## ८. कोनाचं कोनु बाई

सुखात लोळणाऱ्या भावाला आपल्या बहिणीची आठवण होते. तिला माहेरी घेऊन जाण्यासाठी तो तिच्या सासरी येतो. भावाला पाहून आनंदलेली बहीण हातातले काम तसेच ठेवून सासूला सांगते; 'माझा भाऊ मला घेऊन जाण्यासाठी आला आहे.' सासू खाष्ट- ती विचारते, 'कोण तो? कुणाचा कोण? आपल्याला का ऽ ही माहीत नाही. सासऱ्याला विचार तुझ्या.' सासरा भाव्यावर, भावा तिच्या जावेवर व जाऊ आपल्या दिरावर म्हणजे तिच्या नवऱ्यावर ढकलते. शेवटी ती नवऱ्याला सांगण्यासाठी जाते. पाटील बुवा रागाने लाल होतात! विचारतात, "काय आहे आता माहेरी?" ——बिचारी सासुरवाशीण या प्रश्नाचे उत्तर काय देणार?

**सोन्याचं** [सोन्या-चांदीच्या राइटीत नांदणारा गर्भ श्रीमंत] **ऱ्हाटु रुप्याचं ताटु, सुक्यानं थापितु भाऊ माजा ।। सुक्या० ।।**
**येरीतातु** [वेळीत असताना (शिजलेला तांदूळ वेळूच्या दुरडीत टाकून निथळत असताना)] **येरीतातु मीयी पुसतु, माजे भावंड बोलायाले** [नेण्यासाठी आले] **।। माजे० ।। १ ।।**
**कोनाचं कोनु बाई मला काय पुसतु, तुजे सासुऱ्याले पुस जाउन ये ।। तूजे० ।।**
**सोन्याचं बाजू रुप्याचं सुंबू, सुक्यानं** [सुखाने] **निजलं सास्त्री माजं ।। सुक्यानं० ।।**
**येरीतातु येरीतातु मीयी पुसतु, माजे भावंड बोलायाले ।। माजे० ।। २ ।।**
**कोनाचं कोनु बाई मला काय पुसतु, तुजे भायाला पुस जाउन ये ।। तूजे० ।।**
**दारानं तिरमंदी** [चिरेबंदी दरात बसून असलेला भाव] **बसूंचे भाया, बसूंचे भाया**
**येरीतातु येरीतातु मीयी पूसतु, माजे भावंड बोलायाले ।। माजे ० ।। ३ ।।**
**कोनाचं कोनु बाई मला काय पूसतु, तुजे जावला पूस जाऊन ये ।। तुजे ।।**
**सोन्याचं मडकं रुप्याच भातु, सुक्यानं येरिते जाऊमाजी**
**येरीतातु येरीतातु मीयी पूसतु, माजे भावंड बोलायाले ।। माजे० ।। ४ ।।**
**कोनाचं कोनु बाई मला काय पूसतु, माजे देराला पुस जाऊन ये ।। माजे० ।।**
**सासरचे मानसं मक्याचं कन्सं माडीवर मानसं** [नवरा] **सांगा गेले माजे भावंड बोलायाले ।। माजे० ।। ५ ।।**
**हातॉंतु कॉंटी पाटील रागवं, ॲतां** ['आता माहेर कोणतं?' असा शब्दश : अर्थ] **म्हायेरी कन्चंग ।। ॲंता० ।।**
**सोन्याचं ऱ्हाटू रुप्याचं ताटु? सुक्यानं थापितु भाऊ माजा ।। सुक्यानं ।। ६ ।।**

अनुक्रमणिका

## ९. नागाचं ग ऽ पंचमीला

तेलंगणात नागपंचमीच्या सणाला महत्त्व नसते. अरे समाज मात्र महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणेच हा सण साजरा करीत असतो. सासुरवाशीण माहेरचे मूल येईल याची वाट पाहाते. भावाने बहिणीला या सणाच्या निमित्ताने माहेरी बोलवावयाचे असते व आपल्या ऐपतीप्रमाणे तिची बोळवण करावयाची असते. या गीतात एक विशिष्ट कौटुंबिक चित्र पाहावयास सापडते. गेल्या नागपंचमीस आपली लेक माहेरी नव्हती. ही नागपंचमी देखील तिच्या सासरीच पडते की काय अशी शंका मुलीच्या आईला येते. म्हणून आई आपल्या मुलाला बहिणीस आणावयास पाठविते. भाऊ बहिणीच्या सासरी जातो. सासूला विचारतो. ती सासऱ्याकडे बोट दाखविते. सासरा नमूनेदार. माझ्या सुनेला पाय आहेत तिला घेऊन जाण्याचे काय कारण?" असा प्रश्न तो करतो. प्रकरण पुन्हा सासूच्या दरबारात येते. ती वडील मुलाकडे बोट दाखविते. त्याचे उत्तर नाही बहीण स्वयंपाक करून भावाला जेवू घालते. पुढे बहीण 'आपल्या पायाने' माहेरी येते. भाऊ तिची बोळवण करतो. परंतु——

भावजय मात्र खूप रागावलेली असते. भावाने दिलेली साडी-चोळी तिथेच सोडून बहीण आपल्या सासरी निघून जाते.

या गीतातील तीन चरणी ओवी मराठी ओवीच्या रचनेचे पुरातन स्वरूप दर्शविते.

| | |
|---|---|
| **नागाचं ग पंचमीला** | **नागाला ग इंदुं तूपुं**<br>**आमाला ग मायबापु ।। १ ।।** |
| **आमा भइनीचं ग सनु** | **दारावरले ग खनु**<br>**आमा भइनीचा ग सनु ।। २ ।।** |
| **आमा भइनीचा ग सनु** | **दारावरले ग खनु**<br>**रूसली ग भावावरे ।। ३ ।।** |
| **रुसली ग भावावरे** | **ताकिली ग दारावरे**<br>**रुसली ग भावावरे ।। ४ ।।** |
| **लेंका की रे माज्या लेंका** | **बाबीला या बलवूनानी**<br>**सनुजाते दुसऱ्यांदी ।। ५ ।।** |
| **सनुजाते दुसऱ्यांदी** | **सनु जाते तिसऱ्यांदी**<br>**बाबीला था बलवुनानी ।। ६ ।।** |
| **अन्की बोलू नको मँदे** [मध्येच] | **बाबीला या बोलावुनानी** [बोलावून आण, घेउन ये]<br>**अन्की बोलूनोको मन्दे ।। ७ ।।** |
| [वहाण] **व्हानं सेन लेवनीलं** | **अंगी तेन लेववीलं**<br>**हाती तेनं काँटी धरलं ।। ८ ।।** |
| **हाती तेन काँटी धरलं** | **इंचरनं तेनं इंचरूनु घेतलं**<br>**दबदबा** [वेगाने ] **पइलं व्हइला ।। ९ ।।** |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| दबदबा पइलं व्हइला | सरसरा पइलं व्हइला<br>वाँटा तेनं धरीयेलं ।। १० ।। |
| वाँटा तेन धरीयेलं | दबदबा घरा गेलं<br>सरसरा घरा गेलं ।। ११ ।। |
| सरसरा घरा गेला | अत्या की वो माजं अत्या<br>सनु जातं दुसऱ्यांदी ।। १२ ।। |
| सनु जातं तिसऱ्यांदी | बाबीला या बोलुनतो<br>अत्या की वो माजं अत्या ।। १३ ।। |
| भाच्या की रे माजं भाच्या | तुजं मामाला पुंसी गडे<br>सनु जाते दुसऱ्यान्दी ।। १४ ।। |
| मामा की रे माजं मामा | बाबीलाया बोलून देता<br>सनु जाते दुसऱ्यांदी ।। १५ ।। |
| अन्‌की बोलू नका मामा | सनु जाते तिसऱ्यांदी<br>बाबीला या बोलून देता ।। १६ ।। |
| भाच्या की रे माजं भाच्या | माजं सुनंला पाय हाती<br>तुमँचं लेंकीला पाय हाती ।। १७ ।। |
| दबदबा चूलू पेटली | सरसरा चूलू पेट्‌ली<br>दबदबा पइनु [फराळाचे झाले] व्हइली ।। १८ ।। |
| सरसरा पइनु व्हइली | दादा की रं माजं दादा<br>सनु जाते दुसऱ्यांदी ।। १९ ।। |
| मनु जाते तिसऱ्यांदी | अत्या की वो मानं अत्या<br>सन जाते तिसऱ्यांदी ।। २० ।। |
| भाच्या की रे माजं भाच्या | तुजं भावोला पूंसी गडे<br>सनु जाते दुसऱ्यांदी । । २१ । । |
| भावा की वो माजं भावा | बाबीलाया बोलून देता<br>सनु जाते दुसऱ्यांदी ।। २२ ।। |
| अन्‌की बोलू नगा बाबा | सनु जाते दुसऱ्यांदी<br>सनु जाते तिसऱ्यांदी ।। २३ ।। |
| दबदबा पइनु व्हइली | सरसरा पइनुं व्हइली<br>सन जाते तिसऱ्यांदी ।। २४ ।। |
| दबदबा पइनु व्हइली | अगन [अग्नि] तिनं टोइयीली [ठेवला]<br>पानी तिनं घेती आता ।। २५ ।। |
| इंचरनं तिनं इंचरुनु घेतली | वाँटा तिनं धरियेली<br>म्हाइयेरा ग तिनं आली ।। २६ ।। |
| म्हाइयेरा तिनं आली | सरसरा घरा आली<br>सनु जाते दुसऱ्यांदी ।। २७ ।। |

अनुक्रमणिका

भाबे की ग माजे भाबे — भाऊ जइसं [जसा] चोली लेऊ
सनु जाते दुसऱ्यांदी ।। २८ ।।

भाऊ जइसं चोळी लेऊ — भाऊ जइसं नुगडं [लुगडे] नेसू
सनु जाते दुसऱ्यांदी ।। २९ ।।

दूदं तुपं गाहता पुडं — लाह्या तिनं वंटी भरली
पाँचु मिर्वनं [मिरवण्याची, मानाची लुगडी] लाऊनु घेतं ।। ३० ।।

नोको दादा तुजी चोली — भाऊजई डोलं मोडी
सनु जातं दुसऱ्यांदी ।। ३१ ।।

नुगडं तिनं फेडीइली — चोले तिनं काडीयेली
नोको दादा तुजी चोळी ।। ३२ ।।

[नको] नोको दादा तुजी चोळी — भाऊजइ डोलं मोडी
सरसरा घरा आली ।। ३३ ।।

भावे की ग माजे भावे — सनु जाते दुसऱ्यांदी
सनु जाते तिसऱ्यांदी ।। ३४ ।।

## १०. दुकं सांगं मायापोटी

सुख कोणालाही सांगता येते. परंतु पोटातले दुःख फक्त जिव्हाळ्याच्या माणसांपुढेच व्यक्त करता येते. सासरी आल्यावर असा जिव्हाळा लाभला नाही तर दुःख बाहेर पडणार कसे? सासुरवाशीण त्यातूनही मार्ग काढते आणि 'वय्या' (ओव्या) गावून स्वतःशीच सुखसंवाद साधते.

या गीतात आलेली तीन चरणी ओवी या छंदाचा विकास आणि इतिहास यांच्या दृष्टीने विचारात घेण्यासारखी आहे. अंत्य यमकविरहित तीन चरणी ओवी हा या छंदाच्या इतिहासातला बराच पुरातन असा टप्पा आहे.

सुकं सांगं सुकापोटी — दुकं सांगं मायापोटी
माई नरसम्मा ग माजी ।। १ ।।

माजीया [या घरात आल्यापासून जिव्हाळ्याची माणसे दूर झाली आहेत हे माझ्या जिवाला लागले आहे.] ग जीवा लागेले — माजीया ग गरामन्दी
आया-बाया दूरू होइले ।। २ ।।

आया-बाया दूरु होईले — माजेया ग देसातुनु
वय्या [ओव्या] गावी दे ग मला ।। ३ ।।

वागीना मी जगदंडी — तानी लच्चम्मा ग माजी
वय्या गावी दे ग मला ।। ४ ।।

जामाई ग तीनू चारू — माजी की ग माजदंडी
माजी आली देसातुनु ।। ५ ।।

अनुक्रमणिका

मागीला ग धना याले
माजी आली देसातुनु
तानी लच्चव्वा माजी ।। ६ ।।

येवडु धंडाचा का पिंडू
कोनु नेई उरे भुजा
येकाकी ग पिंडय् आला ।। ७ ।।

येकाकी ग पिंडय् आला
मोरे [पुढे] चालतु ग मला
बाला कौलजी ग माजा ।। ८ ।।

माती ताकितो गवाला
दादा नरसिंगराऊ माजा
मोरे चालतु ग माजा ।। ९ ।।

मोरे घालतु ग मला
वय्या गालितु ग मला
बाई लच्चव्वा ग माजी ।। १० ।।

तेन संगं जनलोकु
त्याहीचा राडा की ग पुड
वय्या गावी दे ग मला ।। ११ ।।

आमी की ग तिग्गी भइनी
फूलाचे [फुलाफुलांची चित्रे असलेली] ग चोले लेवी
होलाला [वेलाला] ग पानी जाई ।। १२ ।।

आमी की ग तिग्गी भइनी
येक्या येलाचं सेंगु
पुलू दादा राजन्ना माजं ।। १३ ।।

माजी ग राजम्मा
गेलो की ग पानीव्याला
देई सेला चिंबोलीला [चुंभळ] ।। १४ ।।

राजा येतो आंगोलीला
देई सेला चिंबोलीला
भइनी कत्तकम्माला माज्या ।। १५ ।।

सेलं देतो चिंबोलीला
राजा येतो आंगोलीला
दादा राजन्ना माजा ।। १६ ।।

आमी की ग तिग्गी भइनी
फुलाचे ग चोले लेवी
थोह्ली भावजय डोले मोडी ।। १७।।

थोह्ली भावजय डोलं मोडी
धरू दादा तुजी चोली
फुलाचे ग चोले लेवी ।। १८ ।।

धरू दादा तुजी चोली
भइनी का ग रूसल्यासु
कनकव्वा माजी ।। १९ ।।

संगी ही ग हाय मन्नू
जाई नोको तिजे गाँवी
येईलु ग जिवावरे ।। २० ।।

काले की ग रेगडींतु
भाऊ हात की ग मन्नू
बापू रामय्या माजं ।। २१ ।।

भइनी न्हाई ते रे गाँमा
जासी तू रे कोने घरी
जोडा सोडी माजं दारी ।। २२ ।।

माऊसु की ग भाऊ मनु
मनुना ग मनी केलं
बोलुनु ग लेंकीला देलं ।। २३ ।।

अनुक्रमणिका

शिरीचं ग शिरीमते
ये ग भाद्ये कडा घेते
लेंकाला करूनु घेते ।। २४ ।।

भुजंचा ग भुजंतर
भाऊ नरसिंगराऊ माजं
लेंकीला या करूनु घेतं ।। २५ ।।

गाँमाँतु ग फडके दारी
देल भाऊ संचकारी [बयाना]
बायलेंकीला पीतांबरू ।। २६ ।।

वैजयंती की ग पीतांबरू
पिवला की ग पीतांबरू
देलं की ग संचकारी ।। २७ ।।

काले काँटाचं [काठाचे] ग लुगडं
नेसूचं आलं मला
भाऊ देला संचकारी ।। २८ ।।

बायलेंकी ग याली मनु
पायाला ग पानी देई
बसाये ग पाटं घाली ।।२९ ।।

पायाला ग पानी देउनु
डोल्याला ग पानी काडुनु
भावजय यंकम्मा माजी ।। ३० ।।

बारीकु सालीचा भातु
येरी नोको मायाबाई
माय माजी जनाबाई ।। ३१ ।।

माई माजं जनाबाई
निंदे फाऊ नोको तेला
जाँमई [जावई] हाये राघू माजा ।। ३२ ।।

भावाचे ग लेंकी मनु
बोलू मला अत्याबाई
तानी लचव्वा ग माजी ।। ३३ ।।

गावाँतु ग इन्तायाई
येउंला [वेळेला] ग कामा आलं
वागीलाजा [पेरणीला] बइलं देलं ।। ३४ ।।

माजं हातंच ग चुडा
उन्नाला जडकिला [झळकला]
देशाई वलकिला ।। ३५ ।।

माजेया हंगनाँतु
पांडऊ जडकतु
आइकावं ग्यानीवंता ।। ३६ ।।

हैकावं ग्यानीवंता
माजे ग देर-भावे
आइकावं ग्यानीवंता ।। ३७ ।।

माज्या ग माईचा
म्हेउना मांडवाँतु
देशाई लिंबोनींतु ।। ३८ ।।

डेरा घाली लिंबोनींतु
म्हेउना मांडवाँतु
दादा राजन्ना माजा ।। ३९ ।।

येक्या वसरी बइसं
गंगा सारया नेसं
तानी माजी सोंदरू बाई ।। ४० ।।

माजे ग हंगयेनी [अंगणात]
सारवे [चांदण्याचे सारवण झाले आहे] ग सांदयेनी
पाऊलु पडं पइंजनाचं ।। ४१ ।।

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| पाऊलु पडं पइंजनाचं | बाला माजा शदिराचं<br>जालय् हंगनु चंदनाचं ।। ४२ ।। |
| लिबूनं लेवू गाली | पंतुलु या सेला<br>लिवनाला पंडिताला ।। ४३ ।। |
| लिवनाला पंडिताला | आनीयेला सेला<br>बाला नरसय्या माजा ।। ४४ ।। |
| इत्तुनं दिसं येतं | पानी सेंदीते सीता<br>माजी समींदरू पतिवरता ।। ४५ ।। |
| वडीलु माजं म्हेउनं | सिऊ संकरू देऊ<br>पारवती माजी भइनु ।। ४६ ।। |
| दाँते [जाते] होरीलं ग पीटू | बईल-होरीलं ग मोटू<br>बोलू ढाडू ढाकलीला [धाकटीला] ।। ४७ ।। |
| बोलू धाडू ढाकलीला | वोडा येतं ईला<br>भइनु यादव्वा की ग माज्या ।। ४८ ।। |
| का ग भइनी रूसलीसु | तुजु कोनु रागेजले<br>भइनी यादव्वा की ग माजे ।। ४९ ।। |
| काले की ग रेगडीतु | चुडे हातं लवनीतु<br>भाऊ हातं दीवानाँतु ।। ५० ।। |
| उँचू उँचू [कापसाची पऱ्हाटी] परवंय्यानं | भाऊ आला भइनीसाटी<br>दादा इरन्ना माजं ।। ५१ ।। |
| सातं संब्राचं ग गोडं [घोडे] | शारातुनु कोनु गेलं<br>भाऊ भइनी गरी आलं ।। ५२ ।। |
| दुरडीवरीलु ग दुरडी | आहे की ग येकु वंसा<br>भाऊ माजा शीदरू की ।। ५३ ।। |
| माडी खालुनु ग पानी | धोत्रं धुविते ग भाऊ<br>भाऊ सिवाजी रे माजा ।। ५४ ।। |
| चोकटु तम्बवाकु | मी देतं माडीवरे<br>दादा इरन्नाला माजा ।। ५५ ।। |
| हातलांडी गोळ्यावरी | दादा माजा ईरन्ना ग<br>हातलंडी गोळ्यावरी ।। ५६ ।। |
| भाऊ आला भइनीसाटी | का ग भइनी रुसल्यासु<br>तेलंगा ग तुजा देसु ।। ५७ ।। |
| नागाच्या ग पंचमीला | नाग येतो घोड्यावरे<br>भाऊ येतो माडीवरे ।। ५८ ।। |
| काले की ग रेगडींतु | त्यानी ग बापु लेंकु<br>त्याहीचा इच्यारू येकु ।। ५९ ।। |

## ११. सासर-माहेर

जात्यावरील गाण्याच्या निमित्ताने रूढ असलेली काही स्फुटगीते पुढे देण्यात आली आहेत. प्रत्येक गीत आपल्यापरीने स्वयंपूर्ण असून कौटुंबिक जीवनातील भावभावनांचे वाहक आहे :

माजे की ग अंगनाँतु पाँची पांडवाचं कता
पाची पांडवाचं कता आइकावं ग्यानीवंता
माजे की ग अंगनाँतु सारं सात्रं की ग टेवा
अंगनाँतु खेला येतं अम्रिताचं की ग मेवा
अम्रिताचं की ग मेवा अंबरू नोको देवा
अंबरू नोको देवा नित्य सुकं तेनं टेवा
नित्य सुक की ग टेवा माज्या की गनागदेवा ।। १ ।।
लोकाचे लेंकुराला कित्ती करूनु काई
कित्ती करूनु काई बडवाया सत्ता न्हाई
लोकाचं लेंकरू भित्तीचं खापयेरू
भित्तीचं खापयेरू माजा माला शाकायेरू ।। २ ।।
चिंटाचं लुगडे वरे राम ग ऽ हत्तकोंडी चोलेवरे राम ग ऽ
हीतीचं पानवरे राम ग ऽ तलपाला किली न्हाई राम ग ऽ
घराला चिंदी न्हाई राम ग ऽ चिंटाचं लुगडे वरे राम ग ऽ ।। ३ ।।
नेरलीचं की ग जाडू लेन्कीला ग चोले धाडू
नोको भावा तुजी चोली भाऊजई डोले मोडी
संगटी ग हाय मन्नू हाय मन्नू की ग मन्नू
जाऊ नोको तिजे दारी लेववील जीववरी
आमी की ग चौगी भइनी ओवीता ग चोललेनी
पुलंचं ग चोललेती फुलला ग पान्या जाई
आमी की ग पानी मन्नू पानी मन्नू की ग पानी मन्नू
वालले ग माजे होंटू लावला वंजारी ग मोटू
राती माजे सपनाँतु शोमे भरीलं ग पानी
आटवला ग माजे मन्नी भाऊ राजा माजे मन्नी
आमी की ग आत-भासे अेक्या यसरीला बइसु
अेक्या वसरीला ग बइसु गंगासारिकं ग दिसू ।। ४ ।।
अंबटी ग अंबराई अंबे लागले की ग गोडू की ग गोडू
भावन्तू भइनी गोडू भइनी गोडू की ग गोडू
दादा दासराव की ग माजा संगटी ग हाय मन्नू हाय मन्नू
जाऊ नोको तिजे दारी ग तिजे दारी येववील जीववरी ग जीववरी
भइनी न्हाइ ते रे भावा की रे भावा जाइसील पुन्यगावा पुन्यगामा ।। ५ ।।

अनुक्रमणिका

मिया जातं माहिवेरा माहिवेरा          वाँटू फांत नित्य राजा नित्य राजा
वाँटु फातं नित्य राजा नित्य राजा          बंदू दासराव की ग माजा की ग माजा
लेन्कराचं की ग माई की ग माई          पांकराचे की ग पाई की ग पाई
जोडव्याचं की ग पाई की ग पाई          हिरा ठीऊ रादाबाई रादाबाई ।। ६ ।।
माजं की ग अंगनान्तु अंगनान्तु          कडब्याचं पेंडी वाजे पेंडी वाजं
भिरकुला सोयरा साजं की ग साजं          बंदू दासराव की ग माजं की ग माजं
वारा की ग वावधानु वावधानु          अरेपल्ले सिवारान्तु सिवारान्तु
घइलू गेलं दर्वाजान्तु दर्वाजान्तु          भाबी लिंगव्वा की ग माजं की ग माजं ।। ७ ।।
घागरे ग गल्लगिल्लु गल्लगिल्लु          वाजवितं की ग बइलू की ग बइलू
वाजवितं की ग बइलू गम्माटे ग येववीलू          बालकिस्टय्या माजा की ग माजा
शंकराऊ ग माजं दादा त्याचं नावं लेवू माला          इनामु ग देतं तुला ग तुला
हात माय ते रे लेन्का          अंगनान्तु अंग येना
आमचं नातं अंगा येना          तुमचं रे भइनीवरे
तुमचं रे भइनीवरे भइनीवरे          बाल इरन्ना माजं की ग माजं
धराडं ग होया आलं          बिगी बिगी नका लाऊ
बिगी बिगी नका लाऊ          पालकीनं परन्या गेलं की ग गेलं
पालकीनं परन्या गेलं          बंदू दासराव की ग माजा की माजा ।। ८ ।।
लांबे लांबे की ग केन्सु की केन्सु          लवंगाला वासू की ग वासू
तेलंगे ग तुजा देसु की देसु          माऊसी कनकव्वा ग माजं
गोरीचं ग गोरं वानं ठेविलं ग माजं मन,          माजी मायव्वा
येइनं ग माजं मन मल्लाबाईला ग माज्या,          माजी मायव्वा
गावाचं ग खाल्लाकडं पोचमाईचं ग गुडी,          माजी मायव्वा
आमी की हा तिगी भइनी तिगी गामानं नांदो,          माजी मायव्वा
सोन्याचं पल्लो बांदो की ग बांदो,          माजी मायव्वा
गामान्तु ग इव्वाहाई येलंला ग कामा येई,          माजी मायव्वा
टिपनीला बइलु देई की ग देई,          माजी मायव्वा
पाऊसं ग पडायाले          वलनीचं घर गेलं
भावान्सु लेकी जाले,          भइनींसु ईसरले ।। ९ ।।
काले की ग रेगडींतु रेगडींतु          बसले ग बापु लेन्कू बापलेन्कु
तितून ग दिसं कुना दिवानाचं          वसरीखाले गव्वानं कुन्ना सोइऱ्याचं
माजं की ग अंगनान्तु पऊडाचा पाऊसू पडं          जोलं जोलं की ग पाऊसं मला रोडायाला उटं
शेंड्याच ग पालीवरे नेरलीचं की ग जाडू          नेरलीचं की ग जाडू की ग जाडू
पीपीला ग चोली धाडू          चोली धाडू की ग धाडू
नोको भावा तुजी चोले          भाऊजई डोलं मोडी डोलं मोडी
पिवलं ग पीतांबर ताकिलं ग दारावरे          ताकिलं दारावरे दारावरे
नोको भावा तुजी चोली तुजी चोली          भाऊजई डोलं मोडी की डोलं मोडी

अनुक्रमणिका

बापु न्हाइ ते बाला तुला कोनु शानं केला
तुला कोनु शानं केला पालकी घेऊनि परन्या गेंला परन्या गेला ।। १० ।।
गोरी की ग गोरी की ग गोरी मत्रू
गोरी गेली पानव्याला पानव्याला
शेलं ताकिलं चिंबोलीला ग चिंबोलीला
शेलं ताकिलं चिंबोलीला ग चिंबोलीला
रानीचं ग घागरीला घागरीला ग...
गोरीचं ग गोरं वानं येइनं माजं मन
सीता माजे भाऊजई सीताला ग दोन लेन्कू ।। ११ ।।
लक्शुमना माजे देरा माजे देरा सीता जातं माहियेरा माहियेरा
सीताला कम्मलू फउंजे मनं लक्शुमना ०...
सीताला गोलसिलू फउजे मनं लक्शुमना ०...
सीताला बइलु फउजे मनं लक्शुमना ०...
सीताला नारलु फऊजे मनं लक्शुमना ०...
सीलाला नागरम् फऊजे मनं लक्शुमना ०...
सीताला पइंजनु फाऊजे मनं लक्शुमना ०...
सीताला पटकुलु फाऊजे मनं लक्शुमना ०.. ।। १२ ।।
सासुरडाला ग जाता डोले भरून आनी पानी
मानू ऊगं मानू नोको मानू नोको सूनबाई, म्हायेरी ग न्हाइ आई
सासुरवाडाला ग जाता डोले भरून आनी पानी
कोम्मेले ग डोले पुसी बापू माजा ग तानी
आमी की ग माय लेन्की बोलू गुज अेके रातो
दिव्याला ग जोडू वाती बोलू गुज अेके राती
माजं की ग सूक दूक सांगितलं सरयेनं
दुरीलं ग सोयरी तू दुदावरील ग साय
माऊसी ग नव्वं हाये की ग माय ।। १३ ।।
येक्या गावान्तु ग दोगी येक्या येलाचं की ग सेंगु
येक्या येलाचं की ग सेंगु हिराबाई की ग माजी
पाऊसु ग पडायेलं वलनीचं जाडु गेलं
भाचा तुला लेन्की जालं भइनीला इसरलं ।। १४ ।।
बाई लेन्की आमी मत्रु पाय धुनं पडं
लेन्की देऊनु गडगिडं पाय धुनं पडं
हाताचं ग कंकयन कित्ती करू जत्तयेन
पाटीचं ग रत्तयेन बंदू संकर की ग माजं
जोडीयाचं की ग पायी हिरा देऊ रादाबाई
जोडीयाचं की ग पायी हिरा ठेवी रादाबाई ।। १५ ।।

अनुक्रमणिका

कुंबारू की ग माजं दादा रेगडींतु घडं घाली
लोनी तुमते मोती पिकं मदनावरे दिसं ग
जोडू ग पंटा आले सारे रानीचं ग माजे
जोंदुले ग पिवल्यानं संकरराउ बापु माजा
संकरराउ तुजं घर चालू दे ग थिरथीर
हाती चालिला ग मस्ती येमुलाडीचं ग वस्ती ।। १६ ।।
देशिदेशीचं ग पांडे रामव्वाला पुसायाले
पालकी भोन्ताले गोडे देशिदेशीचं ग पांडे
तीसंगं गेला मन्नू मिनु गेला की ग मिनु
वरे मोत्यानं आरती की ग आरती
आली न्हव्वं ती ग आली इंद्रव्वा खेलाया आली
लांबे लांबे की ग केन्सु लवंगाला की ग वासू
लवंगाला की ग वासु तेलंगा ग तुजा देसु
तेलंगा ग तुजा देसु बाई जानव्वा माजं ।। १७ ।।
दुरडीवरलं दुरडी बुरडीनबाइचं सखी आली सोनु डौलत मल्लक्का
दुरडीवरलं दुरडी बुरडीन बाईचं सोनी आली राती ढौलत राजम्मा
दुरडीवरलं दुरडी बुरडीनबाईचं तिक्कून आलं माजं ढौलत सांबय्या
सासु न्हाइ ते बाला जासवील पुन्यगामा
हिरव्या मांडवान्तु घरा आला जासवील पुन्यगामा ।। १८ ।।
वराडु चालियेलं बिगिबिगिनं लेन्कू : नवरा कुन्नाचा ग लेन्कु नवरा पाटलाचा की ग लेन्कु ।।
माइबापु मीरवीतु नवरा ग पालकींतु
बाल ग माजं इरन्ना नवरा ग पालकींतु
घरा भित्ती सारिल्यातु चित्तरू काडिल्यातं
लगीनु लाविल्यातु माजी हिरव्या तानी ।। १९ ।।
वसरीखाले ग व्हाना व्हाना कुन्ना सोयऱ्याचं
व्हाना कुन्ना सोयऱ्याचं वडीलु ग जावयाचं
वडीलु ग जावयाचं बाल कुमरय्या माजं
जावई ग आला मन्नु पाटलाचं गावाँतुनु
नव खंड्याचं ग तूरू बाबा मल्लय्या माजं ।। २० ।।

अनुक्रमणिका

## सासर-माहेर

[प्रारंभीचे आकडे कडव्यांचे आहेत]

१. माझ्या अंगणात पाची पांडवांची कथा चालू आहे असा शब्दशः अर्थ असला तरी ध्वनि आहे : माझी सारी मुले पांडवांसारखी -कर्तबगार आणि एकोप्याने राहणारी आहेत.

**माजे... टेवा :** गृहीणीची परमेश्वराला प्रार्थना : ‘माझ्या अंगणात सदैव चांदणे असू दे’.
**अंबडू नोको :** हेळसांड करू नको;
**सुकं देवा :** सुख द्यावे. **नागदेवा :** नवसा-सायासानं झालेली मुले. पुत्रप्राप्तीसाठी नागाचे व्रत करण्याची रूढी आहे. त्याच्या प्रसादाने झालेली मुले म्हणून मुलांना ‘नागदेव’ म्हटले आहे.

२. **बडवाया :** शिक्षा करण्याची : लोकांच्या मुलांना किती माया लावली तरी त्याचा उपयोग नसतो. त्यांना शिक्षाही करता येत नाही. परक्यांची मुले भिंतीवरच्या कौलारू सारखी असतात. थोडा धक्का लागला की कौलारू खाली घसरतात त्याचप्रमाणे थोडा वागण्यात फरक पडला की लावलेली माया व्यर्थ ठरते. पण मातेला आपल्या पुत्राच्या कर्तृत्वावर एवढा विश्वास आहे की, माझा पुत्र अशा कौलारूची शाकारणी त्यांना व्यवस्थित जागच्या जागी ठेवील. परक्यांच्या मुलांना मी लावलेला लळा माझ्या पुत्राच्या कर्तृत्वाच्या योगाने दृढ राहील हा भाव.

४. **नेरलीचं :** नारळाच्या पानांपासून तयार केलेला झाडू;

६. **लेंकराच की ग माई :** कन्येची आई अंतरी जी व्यथा धारण करते ती कोणत्या स्वरूपाची असते त्याचे वर्णन. तिचा जीव पाखराच्या पायासारखा असतो. पक्षी (पाँकरू) वायूवेगाने उड्डाण घेतो त्याचप्रमाणे कन्येच्या जीवनाभोवती आईचा जीव घुटमळत असतो. तिच्या सौभाग्यासाठी ही व्यथा तिला सहन करावी लागते. जोडवे (चांदीचे) पायात रहावेत म्हणून (सौभाग्य लेणे) त्याच्या मोबदल्यात हिरा (कन्या) ठेवावी लागते.

७. **मिरकुला :** वरंगल जिल्ह्यातील एक गाव; वारा-वावधान वारा-वादळ,

८. **गल्लंगिल्लू :** बैलांच्या गळ्यांत बांधलेल्या घंटीचा ध्वनि (नादानुकारी शब्द).
**परन्या गेलं :** परिणय-विवाह; लग्न करण्यासाठी गेला.

९. **गोरे वानं :** गौरवर्ण, **पल्लो**; पदर; **टिपनीला :** तिपुणीला (पेरण्यासाठी)

१०. **गव्वानं :** गव्हाणी-गुरांना खुंटाला बांधल्यावर त्यांच्या पुढे टाकलेला चारा गुरांच्या अंगाखाली येऊ नये यासाठी खूंटाला लागून लांबच लांब लाकूड टाकण्यात येते त्यास गव्हाणी म्हणतात. गुरे बांधण्याची जागा अशा व्यापक अर्थानेही हा शब्द योजण्यात येतो. **रोडायालं :** रडू आले; **ताकिलं :** टाकले

अनुक्रमणिका

११. **पानव्याला :** पाण्याला.

१३. **सासुरडाला :** सासुरवाडीला; **कोम्मेले :** कोमेजलेले, **सरयेना :** संपेना.

१५. **गडगिडं** [ते] विनवणी (हिंदी : गिडगिडाना); **कंकयेनु : काकण.**
**जत्तयेनं :** जतन; **रत्तयेनं :** रान.

१६. **पंटा आले :** पिकले [पंटा (ते) पीक]

१८. **ढौलत :** डौलत.

१९. **सारिल्यातं :** सारविल्या

## १२. येती लक्शुमी घरं

अनेक उन्हाळे पावसाळे पाहिलेल्या एका वृद्धेने आपल्या सफल जीवनाचे चित्र पुढील ओव्यात उभे केले आहे. वरंगळ जिल्ह्यातील मुप्पारम् या गावी या ओव्या उपलब्ध झाल्या.

**१**

**गोरीचं ग गोरे वानु** [वर्ण] **येइनं ग माजं मनु**
**गालाचं ग गोंदयेनु तान्या माज्या लद्यव्वाला**
**बईलु हंकरेला येसीचं ग कोनेवरे**
**येते लक्शुमी घरं रामराऊ बालं माजं**
**मज्ज्या भइनीचु बालु माजं बालू बराबरी**
**आबालाँतु** [आम्ही बहिणी भावांच्या मेळाव्यात बसतो तेव्हा आकाशातले चांदणे हसत असते] **सान्नं हासु भावाँतु भइनी बइसु ।।**

**२**

**काले ग रेगडींतु बारा अवताँचु भागु**
**मज्ञी दुरूपाचा वागु भज्ञी** [भज्ञी=धाकटी बहीण, कन्या] **दुरूपाचा वागू**
**हाताचं कंकयेनु कित्ती करू जत्तयेनू**
**फाटीचं** [पाठचा भाऊ] **रत्तयेनु दादा राजन्ना माजं**

३

सुजाताला मागा येतं देसोदेसीचं ग पांडे
देसोदेसीचं ग पांडे पाल्की मोंताली ग गोंडे
दइऊ [आज वैभव आहे म्हणून डौल मरवू नकोस. [संपत्ती आणि विपत्ती एका पाठोपाठ असतात त्याचा विसर पडू देऊ नकोस.] दौर -डौल] हाय मन्त्रु दौरं नोको ग नारी
दोनी हातं [आहेत] बराबरी दौरं नोको ग नारी
दोनीये भुजंवरी दुरंग चोलीवरे
सोनीयाचं ग सरी तुला साजं सुजाता ।।
दलनु सरं आलं सुपाचं ग कोनेवरी
लक्शुमी आली ग घरं येसीचं दारवंटे ।।
लग्शिमी आली ग घरे येसीचं दारवंटे
बाल सांबव ग माजं लग्शिमी आली ग घरे

४

येवडं माजं धंड वागिलाचा [वागविला, पोसला] ग कोनु
ते माजं माई बापु वागिलाचा ग कोनु
भइनी न्हाइ ते भाऊ जातील पुन्या [पुण्यग्राम, हक्काचे नसलेले स्थान] गाँमा।
ताटं गेउनु वाडितं दादा राजन्ना माजा
सेजीबाईचं गरी जाउनु आलं गेलं
वागिन तुला भित्तिले वन्जी [नवऱ्याची मोठी बहीण] धारम्मा माजे

५

सासू घरीचं सूनु तुला सोने रागे केले
घडीतु कोमलीतु सूनु माजे हिरव्वाले
माई न्हाइ ते लेंकी म्हाइयेरा ग गेली
घडीतु कोमलीतु सूनु माजं हिरव्वाले
माई न म्हाइयेरी बाप नसता थोरू
मावाँसु धरमपूरू भाच्याँसु लंका दूरू

अनुक्रमणिका

६

हातांतु सुईदोरू	सिंपीन आली ग घरं
अंगी तुला जमेदार	बाल गोपालं माजं
तांबं ग रूमालु	गुंडीतो चंडूवानी
दिसन्त पांडेवनी	ताने रवींदर माजं

७

पोचमाईचं गुडी	पदरंनं ग जाडी
पदरनं ग जाडी	सून माजी हिरव्वा ग
गाईनं वान्सुरांनं भरून्दे माजं वाडं	भरून्दे माजं वाडं
सोडीती घोला पाडा	देव माजं राजन्नाला
देवामंदी रे देऊ	कोनते देव सतीपती
फाने मंदील जोती	देव माजं राजन्नाला
कोत्तकुंडी जातं	मनीले हर हर
पन्नीर वँटीलातु	देव माजं इरन्नाला

८

बारीक शावाआले [शेवया]	येलीले पीतलीतु
भुकं येजीलं कचेरींतु	बाल माजं राजन्नाला
दंडवाटीचे चोले	दंडा देतील [शोभून दिसतील] वोप
सुन माजे हिरव्वाला	दंडा देतील वोप
पायीचं [माझ्या पायीचे जोडवे (सौभाग्य) स्थिर ठेव] ग जोडू	थीरू ठोऊ कत्तकाई
अंबाउ रानी तूजे	कनकाई माजे

९

गावान्तु पटकारी	मी देत संचकारीं
हीनीलं पीतंबरू	राजे कनकम्मा माजे
हिस्सं धाडिलं येकू	बुरगुलाचं देशमूकू
दावं राजेंदर माजं	कुट्टं तित्तं फइल्यानं
नागदेवाचं हुतं	बाल खेलाया गेलं तित्तं
कुंदूरू मातीयेलं	पूतनं रंगीरेलं
बाल मल्लव माजं	लवनीतू जात हात
दिवानातु भाऊ हात	दादा पिरन्ना माजं

अनुक्रमणिका

१०

पोचमायीचं ग गूडी पदरानं ग जाडी
नेस फेडीचं लाडी तानं माजं लच्चव्वाला
धुरीनं माजं धडू वागवीलातु कोनु
गुरू मान्जे दोग्ग जन ते माजं माइ बापु
भइनु ग भावाला लाइतीले भंडन
मंडन ग लाईले कवतिकु फाइले

११

पीवळं पीतांबरू ताकीले दारवरे
रूसीले भावावरे ताने माजे लच्चव्वाला
नागस पंचमीसु अवो भइनीचं सनु
दोरन्‌वरील खनु तुला सदं अंबाबाई
जावायाला मन्नू पडलं गावान्तू पूलू
सवाखंडीचं ग पूलू संकराऊ बापु माजं

१२

चुलतु भावाचं येनं येनं ग दोपारास
सोनं जरकलं कटाइस दादा रवींदर माजं
माऊस मन्नू भाऊ मन्नू मनुनु मानु केला
बोलून लेन्कीला देला दादा रवींदर माजं
मावलस रे लेन्का दाऊ नोको रे लाता
पइलू वय्या गाती भइन रामदेवी माजं
तिकून कोनु येतं भाऊरायाचं लेन्कू
हाती पारीत पूलू राये इरोजी माजं

१३

मोटे मोटे ग जोडी अंकडरानी तुजं
बइलू बुजाले गाईन्सु रानी कनकम्मा माजे
बोटबोटास मूदे [आंगठी] ऊरगले घरी पांडे
भाच्या श्रीनिवास माजं दंड दादुकं चोले

अनुक्रमणिका

दंड देतील वोप		माऊसी धाडील टोप
तान्या माजं भुजव्वाला	माऊसी धाडीले ग टोप [टोपदार लुगडे]
लेन्कराच ग भाई		पंकराचं ग पायी
दूरीलं पाने जाई		नाती माजे जानकीला.

१४

दान्तं ग धडधडा		घऊ घाली मलिदाला
देव माजे अंकुशराऊ	इजागरीचं ग गुम्मटाला
दस्तेवरीलु ग पीटू	बइलावरीलु मोटू
यमुलाडी जाइ ऊटू	देव माजे राजन्नाला
बंदू श्रीनिवासु माजं	नेनन्तं पानवंदी
जालं लेन्कुराचं बापू	बाल भूमाजी माजं
घर भिंती सारिल्यात	लगीन लाइल्यात
तानं माजं भुज्ञवाला	लगीन लाविल्यात
जनु जातं जत्तयेला	मी जातु माहियेरा
संगं मोत्याचं जाली	बंदू माजे बापूराजे

१५

थोरलं माजं दन्तं		वडानं येकलीला
बोलू धाडी टाकलीला	ताने माजे श्रीदेवीला
सुपंसं कोनेवाटी		येते लच्चमी घरं
घर माजे सांबव्वाला	तिकून कोन येतं
तिक्कून कोनु येतं	भरलं राजाचं लेन्कू
हातं पारीजात पूलू	रानं इरोजी माजं

अनुक्रमणिका

३

## लोक-कथा

कोणत्याही भाषेतल्या लोककथांचा गाभा तसा पुरातन असतो. मौखिक परंपरेने चालत आलेल्या या कथा केवळ कथावस्तूच घेऊन कालक्रमणा करीत नसतात. स्थळ-काळ, जाती व्यक्ति, इत्यादिकांचे संस्कार घेऊन लोककथा प्रवास करीत असते. निवेदकाच्या हेतू-उद्दिष्टानुसार कथावस्तूतील बीज निरनिराळ्या अंगांनी पालवत असते. कित्येकदा मूळ बीज या पालवीत हरवूनही जाते. बौद्धांच्या जातक-कथा, जैनांच्या धार्मिककथा त्या त्या पंथाची विचार-सरणी घेऊन मूळ कथावस्तूचा निराळा आविष्कार घडवीत असतात हे मान्यता पावलेले तथ्य आहे. तथापि, मानवी जीवनाच्या विकासाची प्रक्रिया, मनुष्यमात्रांचे प्रकृतिधर्म हे कुठे तरी दडलेले अशा लोककथांतून दिसून येतात. भाषाविष्काराच्या दृष्टीने देखील जुन्या नव्याची मनोहर सांगड लोककथांत आढळून येत असते.

अरे समाजात रूढ असलेल्या कथा या सर्वसामान्य विशेषांपासून अलिप्त राहिलेल्या नाहीत. या कथांत दोन प्रवाह आढळले. व्यास-संस्कृतीच्या प्रभावातून सांगण्यात येणाऱ्या रामायण-महाभारतातील कथा आणि लोकपरंपरेतून आलेल्या गोष्टी. अरे-गोंधळी हा या समाजाचा कथाकरी. तो रामायण-महाभारत लावतो तसाच ‘मऱ्हाट देसाच्या’ ‘पुरान्या कथा’ देखील सांगतो. हाडाचा कलावंत असल्याने तो जेवढ्या कौशल्याने कथा-निवेदन करतो तेवढ्याच चतुराईने अशा कथांवर आधारलेल्या नाटकांचेही प्रयोग तो करतो.

अशाच गोंधळ्याकडून ऐकलेल्या दोन लोककथा त्याच्याच शब्दांत पुढे दिल्या आहेत. राजा अंबर सिंहाच्या कथेवर तर याच गोंधळ्याने ‘बालावंती’ हे संगीत नाटक रचले असून त्याचे प्रयोग बरेच लोकप्रिय ठरले आहेत. या दोन्ही कथांतील मराठी नावे आणि वातावरण लक्षात घेण्याजोगे आहे.

कथेची भाषा सहज समजण्याजोगी असली तरी आवश्यक स्थळी टीपा व स्पष्टीकरणे दिली आहेत.

अनुक्रमणिका

## १.

## सिद्दोजी पिरोजीचं कता

**१.** पूर्व आमचं निवास कोन्तं म्हंटलं तर कर्नकोटु. मऱ्हाटी. कर्नकोटान्तु बाजी नु नारायनराऊ धोगं भाऊ. ये नारायनरावाँसू काय की सिद्दोजी मनित्तं. ये सिद्दोजीला काय की लेन्कु न्हाइतं. बाजीला काय की सोमाजी, पिरोजी नु सुगंदाजी ये तिग्गं त्याँनी लेन्कु. घरनकामाला का की ये सोमाजी, पिरोजी सुगंदाजीचं बापु मरून गेलं. काल जालं, काल. त्याँनी ये तिग्गं पोरं, चिम्ने लेकरं. सिद्दोजी चुलता. सिद्दोजीला लेन्करं न्हाइतं, काई न्हाइतं. घर न्हाइतं. तिप्पल टाकुनु वनवासांतु टेविल्तं म्हंटलंया. कोनासु? या चिमन्या लेन्कराँसु.

**२.** वनवासु टिवलं ते आट-धा दिवसान्तु त्याँनी का सांगिटलं : बाबा आमा वतन करा यीना, आमा धीरू साँगाया आजूबाजु कोनु न्हाई. पुडं कोनु न्हाई. मनुनशानी काय की, चुलता का की तूचु बापु काई की तूचु मनुनु आमंचं परतपालु करी. म्हागरी तुलं म्हातारपन आलेवरी आमी काय की आपल्या चुल्त्यासु चोकोटु फाउनु. बापापरिसु ज्याजा फाउनु घेतुम्. मनुनु काय की ये सोमाजी काय की भावाँसु इच्यार केला.

**३.** ये पिरोजी सुगंदाजी काय की मन्लं : नोको रे बाबा, ते चुल्ता हाय. बापु मन्ल्यानं बापु होतं न्हाई. ते देक न सकं. आमाला पोसीनं, जवलु धरीनं. वेगलं, आमाकारनु न्हाई ते कस्टु दाकवा लागलाय्. नोको मनुनु तेनी कुडा सांगलं. ये सोमाजीचं नवरी कोनु? अन्साबाय ते अन्साबाय का म्हंटलं? ते कुडा नोको म्हटलं. नोको म्हटलं तम्मा सोमाजी अइकंनं. न्हाय, आमचं गोटू कोनु आइकत्तं? काई म्हटलं तरी ते आमचं चुलतं हाय की. आमचं चुल्त्यापसी जाउनु बोलू. मनुनु का केलं की धोगा भावाँसु बसूनु घेउनु अन्सुबाइसु बसुनु घेउनु काय म्हंटलं : नाना, आमाला चौकोटु तू पोटच्या लेन्करांसु फाइन असं फउनु परतपाल करी. आमाला वतन करांयेना. आमाला जवळ कर. अनकी पुडच काल का की, आमी तुला चौकोटु फाउनु. माय तूच, बापु तूचु. बापु मरूनु गेला तू येकला बापु हास की म्हटलं. म्हटलं तम्मा का की हाताखाले मांगाचं मुसारदार होतं. ते मांगाला बलऊन ये उत्तर स्मरन-पत्रिका देउनु ये आमच्या बापाला देउनु जा मुनु वाँटं लावलं.

**४.** ये मांग काय केल? आलं कर्नकोटाला. ते उत्तर फाउनु घेउनु ते सिद्दोजी रुक्मिनबायला का की सांगलं. ये रूक्मिनबाय कोनु? सिद्दोजीच बाइकु. तेन का म्हटली की ये वाँटेदार हमी. नानपनातन थोल्ले वाँटे याने घेंटल. आमाला काय की ते वाँटेदारु दुश्मन हाय. तेना का की जव्वल कराचं काम न्हव्व. येचं इब्बंदी करूनु वाँट लाऊन देयावं. पोत्तं या नगराँतुनु भाइरि काडुनु देयाव. मनुनु का की ये रूक्मिनबाय सांगली. सरे मनुनु का केलं ते रूक्मिनबायचं गोटु अइकुनु ते सिद्दोजी का केलाय् : येकु सइनु ऱ्हातं की हाताखाले, तेला सांगुनु का केला की अरे याहीला इत्तुनु वाँट लावा. या नगरान्तुनु वाँटं लावा. या कर्नकोटु नगरान्तु कोन ऱ्हायाचं काम न्हाई. मग तेनं का केला की गावाभाइरू बसुनु जाउनु रडमेरी बडउनु मांगाला वाँट लाउनु चलो, तुमी येऊनु कुट तरी जावा मनुनु घेंटलं. ऱ्हाय तर युयुद करावं मनुनशान घेंटलं.

**५.** ते रडमेरी अइकुनु ते भाउ का मन्लं, नाना हे कसलं काम की, आमी उत्तर पाटवुनु उत्तर पाटउनु देयावं न्हवं का? तसं काय बी न करूनु या नगरान्तुनु कुँट्टबी जावावं मन्तो, आमच्यासंगं युयुद करतो मन्तो ये

कस्सं? मनुनु बोलुनु घेंटलं. असा जाब आला. तिग्गं भाउ का की गावाभाइरू निगुनु येउनु नमस्कारू करूनु म्हंटले, नाना, आमो काँ म्हँटलं तुला? आमी ल्हान पोरं. आमाला का करा यीना. आमाला धंदा करू यीना. मन तुला बोल्लो तर तू युयुद करा आला. काय म्हँटलमु तुला?.

६. इन्ता काकुलत यूनु कुडा तेन मानंना. तेनं का केलं? रागुनं तेन्ला जेला बांदुनु कोटडीतु सोडुनु टाकलाय्. कोटडीतु सोडुनु का की या नगरान्तुनु तुमाला वाँटी लावत मनुनु बसलाय्. तव्वा ये अन्सुबाय का केलीया? तू आमचं नवऱ्यांसु जेलात कशाला घाँटलाय्? तू जावा मन्तुसु. आमी गावाभाइरि जाउनु कोनत्या तरी देसालां जातुम्. तम्मा तू तेइला सोडी. मनुनु काय की काकलूत केलीया. तम्मा सोडलं. सोडुनु का केलं की तीन कुत्री, तीन घोडी देउनु गावाभाइरि जा, कोनत्या तरी देसाला जा मनुनु सांगलं.

७. तेन जातापुडं जातापुडं कोनु तरी रान जाल्तं, मोट्टं रानु जाल्त. जातापुडं जातापुड महायोग अरन्याँतु काय की येकु गवली, गवली मनायासु का की येकु धनगरू. तर गवली का केल्तं? तित्तं बकऱ्या, शेल्या हातं. मेंड्या राकल्यातु. तेनं का केल्तं की, अरे चार मानसं, तीन घोडं तीन कुत्री घेउनु आलं की येनं. आमाला सापडलं तर आमाँसु काय की मन्तील यानं. मनुनु येनी का केलं की जाडा आड बसुनु लपुनु का का मन्लं बाबा आमाला पोटाला आन न्हाइ, आमी मानस होतं. चोर न्हाइतं. आज चार-पांचु दी जालं आन न्हाइ, पानी न्हाइ. काय न्हाई तुमाला का मननं बाबा मनुनु काकलूत केल. अरे तुमचं कोनु गाँमु म्हंटलं तर आमचं कर्नकोटु. आमी तिग्गं भाऊ. सोमाजी, पिरोजी नु सुगंदाजी. बाजीची लेन्करं आमी. सरे मनुनु याँनी का केलं की याँनी मऱ्हाट पाटलं. याहीचं खानदान थोल्लं. तेनी खाऊचे पीउचे न्हव्वं. मनुनु का केलं की, तुमचं पोटाला भूक लागलं काय की. तुमी थोरकुल, थोरू गोतु मनुनु फाऊ नका अंडी. आमचं ताक दुद्दु धई हाय म्हँटल. तर शेल्या मेंड्या हातं. त्याहीचं दुद्दु, धई हाय ते पिऊनु घेयाव. त्यानी ते पिऊनु त्या रोजी तित्तं ऱ्हइले. कुट्ट जाइनं बाबा. इत्तचु ऱ्हावावं मनुनु घेंटले.

८. ते धनगराँसु काय की रोजु रानांतु जाव लागतं. तव्वा काय की जेवायचं सप्लाय मिलत्तं. तेनं काय की ये मऱ्हाट पाटलं चोकोट मानलं. शेल्या-मेंड्या वाड्यापसी काय की टिऊन घेंटलं. ते ऱ्हाइलं; सरे, या तिग्गांनी काय की इच्यारू केला. आमासु कोनु तरी जवल हायतं. मनुनशान तित्तंच ऱ्हाइलं. सा रोवू आट रोजु होतातु. ते पिरोजी मनाइचं ते धाकलं भाऊ का मन्लं : दादा मी इत्तंचु या घोड्यावरे सवारी करून येतं बाबा उगीचु बंदीखान्यातु ताकलं तर का कराचं मनुनु नोको मन्लं. तम्मा काय की इत्तचु जाउनु येतं मन्लं. सोमाजी इजाजत देलं.

जातापुडं जातापुडं काय की येकु कुत्र्याला काय की संगटु घेंटलं. विश्रांतीनं चाललाय. जातापुडं काय की थोल्लं बसंत लागलया. बसत मनुजे काय की थोल्लं रानु, जंगल. या रानान्तु काय की सस्कुलं येकु. ये कुत्रं काय की पिरोजी संगं. ते सस्कुलं फाउनु ये कुत्रं काय की म्हाग सरलं. ते सस्कुलं काय की ये कुत्र्याला फाउनु म्हागं फिरूनु कुत्र्याला पिटु लागलं. तमा ये पिरोजी बरं इच्यार करू लागलं. अब्बा ये सस्कुल काय की कुत्र्याला संग पडुनु पिटवाला. कुत्र्यापरिस सस्कुल्याँतु बल हाय. इत्तं हामी घरू बांदुनु घेतुम्. तित्तं जाउनु ऱ्हातुम्. सोबतीला धनगरं हातं. आमी इत्तंच नगरू बांदुनु ऱ्हातुम्. इच्यार केला घर कसं होआवं हातांतु. काई. न्हाई कस्सं मनुनु होआवं?

अनुक्रमणिका

**९.** इच्यारू केलाय् : भावा आमचं अज्जा पइदा केलं ते धन कर्नकोटी हाय. समदं सोडुनु देउन्शान् अमी इतं आलामु. कर्नकोटी काय की देवल हाय अंबाभवानीचं. ते भवानीचं पूंजा बाँदुनु काय की तिनं सांगीतलं तसं धन येतय्. आमच्या हातांतु का हाय? सरे, काय की पूंजा बाँदुनु येतुम् मन्लं. थेट कर्नकोटावरे आलं. पिरोजी काय की पूंजावरे बसुनु. ते भवानी का केलीया. बोल्ली. पिरोजी तू भेऊ नोको. सात गाड्या दइउ हाय. गाड्या मन्ता बइलाचं गाड्या. सात गाड्या दइउ हा ते दइउ घेउनु पैलं का की नगरू बाँदाइचं. अदगुरू काय की माजं देवलु बांदुनु मला त्यांतु टिवूनु तू नगर बांदी. मी देतं तुला दइउ. गाड्या बाँदुनु घेउनु जा मन्लं.

ते पिरोजी काय की पूंजेवरे उटलाय्, भवानीला नमस्कार केलाय. दादाला सांगलाय् : गाड्या वाँटं लावा. चलो मुन सांगलाय्. ते सिद्दोजीनं कलल तसं चोरपनानं जाउनु दइउ आनुनु घाँटलं. दरव्य आनुनु काय की कर्ननगर मनुनु उबी वालुनु नगर बाँदलं. कोन्त्या मुलकाचं मुन आलं बी तितं रान हाय. भोय हाय. जागा हाय. कोन्त्या मुलकाचं आलं तरी करुनु घेयाव तितक भोइ, बाँदुनु घेयावं तितक घर. कउलाचं पइका न्हाइ. तुमी करूनु घेयाचं मुनु गावा गावाला चिट्या वाँटं लावल्या. चिट्या वाँटं लाउनु फाउनु फाउनु कोन सारे गडी मानसं आले.

**१०.** नगर उद्येपन व्हायलं मनुनु सारे गडी, कुनबी, कोनते कुलचे मते सारं नगर भरपूर जालं. भरपूर जाल तसं का केलं? ते नगराँतु भवानीचं देवलु बांदुनु भवानीचं सनु केल. भवानीचं सनु करून तितं आनकी खुशी चाललं. खुशी सारक चालल मन्ता ये खबरू गावा गावा गेली. सोमाजी, सुगंदाजी, पिरोजी याहीनं नव्वं कर्नकोट नगर बाँदलं मनुनु खबरू गेली. सोमाजीच चुल्त्याँसु कुडा खबरू पहुँचली. तेनं मनु लागलं : अब्बा मी इत्तुनु नुस्तं वाँटं लावलं, इक्तं दरव्य कुट्टुनु आलं तेला. इक्तं धन कुट्टुनु पइदा केलं हेंनी? सरे, जाउनि. ये चोराहो अंडी, तुमी जाउनु ये. ये सोमाजीच गल्लं कापुनु आनावं. त्याम्ला मारूनु टाकुनु त्याम्चे गल्ले कापुनु आनाव. त्याँला टिवाचं काम न्हाइ. मन्नु चोरान्तु येकु शंबाजी, मंगाजी, मनं नारायनजी मन्नु सात चोरं हातं. सातजनु चोराँसु तित्तं धाडुनु. ते सातजन चोरू तित्तं आलं. सातीजन आलं.

ये कर्नकोटाँतू काय की जवानास्नी राकन टिवलय्. दिवस मावलल्यानं कोनु याचं काय की हुकूम न्हाई. येकला का केलाय् : वट्ट्याचं जालाय्. अरं कुटं चाल्लं? तू कोनु? म्हँटलं तर मनं, अय्या मी वट्टी. बट्टी दिवस मावलता लागली. नगराँतु घर हाय. चल्लो मनं. सरे आमचं गावचं वट्टी मुनु सोडुनु देलाय्. नवं मानूस यायाचं काम न्हव्वं. जा मनुनु सोडुनु देलाय्. येकला का केलाय् कुनबी मनु आउतु डोच्कीवरे टिवूनु काँटी हाताँतु धरूनु घेउनु नगराँतु आलाय्. मी कुनबीचं काम करितं. कुनबीचं मानूसु. येकला का केलाय् मी कुनब्याचं ढोर राकायचं मानूसु मुनु नगराँतु आलाय्. तकीनं काय की गावाभाइर न्हाले.

**११.** इकडं का की वरसामागं वरीसु सरकलं. तीर वरसं जालं. तम्मा सोमाजीसु येकु लेंकु जलमलाय्. लेंकाचं नाँवु काय की तुलेरावु टिवलं. तम्मा ये तुलेरावु, तीन वरसाचं. तीन वरसाचं हाय तुलेरावु. तम्मा का जालं या. ते सोमाजीला सञ्ज रातीला परसाकडं आलं. कलावंतीनीचं घरापसूनु जातोमु मुनु परसाकडं निगालं. तम्मा काय की अन्तुबाय, तुलेरावला सांगलाय् मी कलवंतीनीचं घरापसुनु परसाकडं जातोमु मनुनु. गेंलाय्.

इकडं या चोराहीनं का केलाय्. येकले का की कडब्याचं खाले, येकलं का की उकंड्याचं म्हागं, येकलं काय की लिंबाचं महागं ह्यानं सारे लपुनु. ये चोरू जित्तं तित्तं लपुनु न्हाइलाय्. सोमाजी कम्मा येतं तम्मा येनं गल्ला कापुनु नेहावां मनसुबा. ये सोमाजी कम्मा पइलाडु गेलं घरॉंतुनु भाइरी निगुनु सांपडुन धराइस्तुर आवर न्हाई. ये गडी थोल्ला मानूस. बंदकस्त. तेनी यानी युयुद केलं. सॉपडंन सकं. डोस्कीचं मुडासं खाली पडुनु गेलंया. सोमाजी घरी परत आलया. डोस्कीचं मुडासं खाली पडुनु जाताचु : अब्बा आमँचं मऱ्हाटकुलु. डोस्कीचं मुंडासं गेलं डोस्कं सीरू गेलं मनुनु महाजं सीरू तेचं हातॉंतु गेलं मनुनु त्याहीचं गल्ले तरी जाऊ न्हाइतर आमचँ सीरू तरी जाऊ मुनु खांडं घेउनु म्हागारी गेलाय् आमचं मुंडासं देयावं मुनु सांगलाय्. ते सातजन ये येकला मानुस. तेनी येला पाडुनु टाकलाय. गल्ला कापुनु घेटलाय. सीरू घेउनु भाइर पडलाया.

**१२.** ये कुत्री का करताय् : भवतालचं कुत्रं रोडा आवाज काडताय्. ऑंतु भाइरी करताय्. आमचं सोमाजी आलं न्हाइ मुनु काय की ये अन्सुबाय काय की भाइरी आली. भाइरी येउनु फाती त काय? थोडं दूर वरे लिंबाचं जाडाखाले धंडु पडुनु हाय. सीरु न्हाइ मनुनु लबलब बोंबलून घेंटलीया. देरांचं घरॉंसु जाउनु देरॉंसु उटविली. काय मनायन्सं भाबी, काय मनायन्सं भाबी असं मनुनु पुसिलं. कुट्ट कुट्ट गेल मुनु इचारलं. इकडं तिकडं फाइलं. मिलंन जालं. सरे भाबी उग बस. ते चोराहीचं सीरू हमी कापुनु अन्तुम्, धंड इत्तंचु न्हाच दे मुनु ते निगलं. यॉनी संगं पडलं. कुट्टं जावं? फिरत फिरत जुन्नं कर्ननगराला आलं. कोनु.? ते सुगंदाजी नु पिरोजी. ते सिद्दोजी का केलाय् ते पिरोजी नु सुगंदाजीला जेला बादुनु बंदी घॉंटला. त्या चोराहीनं सोमाजीचं सीर देल्तं ते शीरू फाउनु घेंटलाय्. आमचं वॉंटेदाराचं समस्तानु बडुनु गेलं. कोनु दुस्मान न्हाइतु आमाला मनुनु घेंटलाय्.

इकडं का की ते देर येइनं गेलं आमचं सासरेचं ये कामं असंन. सरे मीचु जातं मनुनु अन्सुबाय काय की निगालीया. संग तुलेराउ घेटलीया. तुलेरावाला घेउनु काकाला बांदुनु, सोमाजीचं तल्वारू, सोमाजीचं सिरत्रानु घेउनु सीधा निगालीया. जुन्ने कर्ननगराला गेलीया. जुन्ने कर्ननगराला जाउनु पुसली : हमचे देरु कुट्टं हातं. मन्ता जेला बांदुनु बंदी घाटलं म्हटला. गावचं सिपाइ जवानु सांगला.

**१३.** सिपाइ जवानु सांगताचु सरे मनलीया. मावरे युयुदु कर मनाली. सिद्दोजीला तस्सं सांगली. सिद्दोजी युयुद करा आला. युयुद जालं. ये अन्सुबाय का की सिद्दोजीला खाले पाल्डं. त्याचं छाताडावर पाये टीवलं. तेचं गल्ला कापनार पर मन्ली न्हव्वं. मी बाइको मानूस. सासऱ्याचं गल्ला कापनं आपलं काम न्हव्वं. तस्सी न्हाउनु ते तुलेरावाला बलविली. सोमाजीचं सुरा काय की तेच हाती देली. येच गल्ला काप मन्ली. तुलेरावचं हाती तेचं गल्ला कापली.

तर्वाता, सोमाजीच धंडु, तेचं शीरू येकु करूनु सिद्दोजीचं तीन धांडे करूनु येकु सरनु रचुनु सिद्दोजी सोमाजी याहीला जाल्लं. जालु लावुनु काय की बंदीखाना मोकला करूनु जुन्ने कर्ननगर काय की तुलेरावला देउनू सिद्दोजीचं सिम्मासनु देउनु सिरोजीला नु सुगंदाजीला काय की नव्वं कर्ननगर बांदुनु राज केली.

अनुक्रमणिका

टीपा-स्पष्टीकरण

**सिद्दोजी-पिरोजीचं कता**

(सिद्दोजी-पिरोजीची कथा)

अरे समाजात बरीच लोकप्रिय असलेली ही कथा आहे. आपल्या पूर्वजांचीच ही कथा आहे असे या समाजाला वाटते, तथापि या कथेचे ऐतिहासिकत्व कितपत प्रस्थापित करता येईल हा प्रश्नच आहे. या कथेत मूळ नगर 'कर्णकोट' असा उल्लेख असून कथेच्या उत्तरार्धात 'नवे कर्णकोट नगर' स्थापन केल्याची नोंद आहे. तेलंगणात करीमनगर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या नगरीचा ग्रामीण उच्चार 'करन्नगर' असा आजही होतो. हेच पूर्वीचे कर्णनगर असल्याचे सांगतात. निजामी राजवटीत अनेक गावांच्या नावांचे 'इस्लामीकरण' झाले तसेच या नगरीचेही नाव बदलले असे म्हणतात. करीमनगरपासून जवळच सूर्यापेठ या नावाची व्यापारी पेठ आहे. हे नगर नलगोंडा जिल्ह्यात येते. या नगरीत अद्यापही एक किल्ला तग धरून आहे. सूर्य आणि कर्ण यांची नावे धारण करणारी गावे एकमेकांच्या लगत असावीत आणि दोन्ही ठिकाणी प्राचीन अवशेष थोड्याफार प्रमाणात असावेत हे लक्षात घेता या कथेतील जुने आणि नवे कर्णनगर आजच्या करीमनगर आणि सूर्यापेठ या स्थानाशी संबंधीत असतील अशी कल्पना करणे अगदीच निराधार ठरणार नाही.

या नगरीच्या संदर्भात आणखीही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. डोंगर आणि दाट अरण्य या दोन्ही नगरीच्या सभोवती आजही विद्यमान आहेत. पारंपरिक समजुतीप्रमाणे या भागात मऱ्हाटा क्षत्रिय आला तो जंगल तोडून वसाहत करण्याच्या हेतूने. देवक-विषयक गीतात क्षत्रिय डोंगराला गेला, त्याने मेढी/पायदळ तोडले असे उल्लेख आहेत. ते ध्यानात घेतले म्हणजे डोंगर व अरण्य यांच्या परिसरात असलेली करीमनगर व सूर्यापेठ (नवे कर्णकोट) ही अरे-समाजाच्या वसाहतीची मूळ स्थाने होती असे अनुमान करण्यास हरकत नाही. आजही करीमनगर-सूर्यापेठच्या लगत या समाजाच्या वाड्या विखुरलेल्या आढळतील.

या कथेतील इतर तपशील कोणत्याही लोककथेत येतात त्याचप्रमाणे आहेत.

**परिच्छेद १.** **पूर्व :** प्राचीन काळी [पूर्वज या शब्दाने देखील हा शब्द ओळखला जातो] **कोन्तं :** कोणते; **धोगं :** दोघे, **तिग्गं :** तिघे, **धरन कामाला** कर्मधर्मसंयोगाने; **चिम्ने :** लहान; **तिप्पल :** [ते] त्रास.

**परिच्छेद २.** **टिवलं :** ठेवले; **यीना :** येईना; **परतपालु :** प्रतिपाल; **चोकोटु :** चांगले; **फाउनु :** पाहू; [पाहून या अर्थीही हा शब्द योजला जातो] **ज्याजा :** अधिक [फा-जियाद]

**प० ३.** **मग्लं :** म्हणाला; **नोको :** नको; **देक न सकं :** देखवणार नाही, असूया वाटेल; **कुडा :** [ते] सुद्धा; **तम्मा :** तेव्हा; **गोटू :** गोष्ट, शब्द, भाषा; **हास :** आहेस; **मुसारदार :** नोकर, शेतमजूर (फा-मुशाहिरा); **वाँट लावलं :** [वा. प्र.] वाटी लावलं पोचविले;

अनुक्रमणिका

प० ४. **वाँटेदार :** भाउबंद (म्हणून शत्रु); **नानपनातन :** लहानपणापासून; **इष्बंदी :** [ते] कडेकोट व्यवस्था; **मोत्तं :** [ते] सर्व; **सरे :** [ते] ठीक; **सइनु :** सैन्य; **रडभेरी :** रणभेरी; **युयुद :** युद्ध.

प० ५. **उत्तर :** [ते] ते पत्र; बोल्लो; बोललो; **म्हँटलंमु :** (आम्ही) म्हणालो.

प० ६. **इँता :** [ते] एवढे; **काकलूत :** काकूलती येऊनु, दीन होऊन; **रागून :** रागावून; **तव्वा :** तेव्हा; **तेइला :** त्यांना.

प० ७. **जाता पुडं जाता पुडं :** पुढे जात जात; **महायोग :** थोर; **जाडा आडु** झाडा आड; **थोल्लं :** थोरले; **खाऊचे-पिऊचे :** खाणे-पिणे; **न्हव्वं :** नव्हे, **दुद्दं :** दुध.

प० ८. **सा :** सहा; **इजाजत :** अनुमती; **विश्रातीनं :** आरामात, शांतपणे; **सस्कुलं :** ससा; **पिरवाला :** पिटतो आहे; मारित आहे.

प० ९. **पइदा :** (फा) पैदा; **देवल :** देऊळ; **दइऊ :** दैव; धन; **बसुनु :** बसला; **पैलं :** पहिले; **दरव्य :** द्रव्य; **उब्बी घालुनु :** जमीनीची आखणी करून (Markout); **भोय :** भूमी.

प० १०. **उद्देपम :** उद्यापन; **निस्तें :** नुसते, रिकामे, धनहीन; **गल्लं :** गळा; **टिवाचं :** (जिवंत) ठेवावयाचे; **राकन :** राखण; **वाट्ट्याचं :** वरठ्याचा, परिटाचा; **डोच्कीवरे :** डोक्यावर; **काटी :** काठी; **तकीन** [ते] उरलेले.

प० ११. **सज्रंराती :** मध्यरात्री; **उकंडा :** उकीरडा; **नेहावा :** न्यावा; **बंदकस्त :** [फा] उंच, धिप्पाड (बुलंदकद); **महाजं :** माझे; **खांडे :** खड्ग, तलवार.

प० १२. **रोडा :** रडण्याचा; **धंड :** धड; **जुन्नं :** जुने, पुरातन; **समस्तानु :** घराणे, राज्य; **कालाला :** काखेला

प० १३. **तर्वाता :** तेव्हा; **धांडे :** तुकडे; **जाहलं :** जाळले; **सिम्मासनु :** सिंहासन.

∫∫∫

अनुक्रमणिका

## २

### गोटू अंबरसिंग राजाचं

**१.** अंबरसिंग मऱ्हाटी राजा. अमरावती नगरान्तु ऱ्हातं. तम्मा मोटे मोटे राजे ऱ्हातं. हाताखाले कोन? तर लिंबाजी परदान. राजा अंबरसिंग यानं महीचं परतपालु करतं. राजाला लेन्करं न्हाइतं. लेन्कु न्हाई, लेन्की न्हाई, कोन्नी न्हाइतं. घराँतु गेलन् काइ की आमची नवरी एन्कली. भाइरी काय की तलतल मी एकलाचु. सरे, लेन्करं न्हाइतं. दरव्य कसलं, गाँमु कसलं? सात कोटे दरव्य. घोड्याचं वाडं गाइचं वाडं, पाड्याचं वाडं. वाँसुराचं कल्पं. शेतीवाडी तरी कसलं? येक तरी लेन्करू फाउजे. धोलागिरीला जाउनु, देवल फाउनु, तपस करूनु. शंकरापासी कोनत्या तरी रानाँन्तु जाउनु लेंकु तरी लेंकी तरी वर घ्यायाचा मनु इच्यारू करूनु घेंटलाय्.

**२.** इच्यार करूनु काय की परदानाला बनवुनु घेटलाय : अय लिंबाजी, मियाँ लेंकराचं दानासाठी जातुम्. वर घेवायासाटी भक्तीसाटी जातुम्. मियां येजेतो नगर परतपालु तुवा करावं. तू काय की कउलाचं पइका गोला कराचं निम्मं. शंबरु रूपये बाँदाचं कुनबी काय की पाँचु धा रूपीये घेवाचं. पन्नासु काय की सोडूनु देयाचं. धा बांदायचं कुनबी काय की पाँचू घे, पाँचु सोडुनु देयाचं. ते जाल्यानं को होतं? मला चौक्कटु आस्त्रीवादु मिळतं. देवु पावनु होतं. मला वरू मिलतं. तूवा आलस केल्यानं तेनं गरीब असुनु तेन डोल्यानं पानी काडुनु ढोर इकित्तं, वस्ता इकित्तं. अस्सं केल्यानं पइका मिलतं पर त्याहीचं कलकलालानं मला देवु पावंना. वरू सांपडंना. तू मातर चौक्कटु परतपालु करी. सांगुनु हाताँतु ते कट्यारू ते दप्तरू परदानाला देउनु आपन वराला गेलाय्. वराला जायचं पुडं बाइकोला कां सांगिटलाय बालावंती तुम येजोतो माडीवरते हिंवसा चौक्कटु ऱ्हावावं. सांगुनु येकलाचु निगुनु गेलाय् चिंता करू नोको मनालाय्.

**३.** जाता पुडं जातापुडं महायोग रानान्तु ते मादेवाला पावतो मनुनु गेलाय्. ते शकर काय केलाय् : अज्जू दूर कुट्ट जातं. कस्ट ते राजा फाऊ सकत न्हाइ मनुनु इक्तं इभूत काडुनु रानाँतु टाकलाय्. टाकताकनी, देउलु, मला, हीरू, फुलाचं बागशाइ सारे दिसतं. महायोग रान, इत्तं पूर्वकालचं देउलु न्हउचे? काय तरी पुतली न्हउचे? पूँजा तरी कुट्टं होउचे मनुनु का केलाय : हीरीचं पानी सेंदून घेंटलाय् न्हाउनु घेंटलाय्. हातु तोंडू धूनु घेंटलाय्. फइलं त काय? चाऱ्हीकडं चारू लिंगं हातं. मद्दी येकु. पांचु लिंग हातं. माडी सारं जाडुनु वस्त्रपास्त्र मांडुनु, रानाचं फूलु तोडुनु मस्तकी अलंकार केलाय्. अलंकार करूनु भगतु मांडलाय्.. भगत मांडनु येकु दीस कां केलाय् : भूक लागली पानी पेलाय्. येकु दीस, दोनू दीसु थोडं थोडं पानी बंदु केलाय्. अजू पाँचू दीसू पाँचू बेलाचं पान खाल्लाय्. अन्ता धा दीसांतू वारं दम धरूनु भगत मांडलाय्. अस्सं तेनं भगत केलाय्. सा महिनं भगत केलाय्.

**४.** सा महिन भगत केलाय्. काय मानु पडून गेलाय्? इंतं भगत करूनु मानु पडंनं मुनु कस्टी जालाय्. शंकर तर्वाता पावनु जालाय्. येउनु अंबरसिंग तुला काय फउजे मनु लागलाय्. महाराज, मला दरव्य हाय. सारं काइ हाय, लेंकू लेंकी न्हाई. सरे, तुला लेंकु फउजे लेंकी? लेंकु जाले तर काय की कस्ट हाती बारा वरसं. लेंकी जाले तर काय की सुक होतं. कोन्तं फउजे? मन्ला, लेंकी जल्मलं काय की सुक हाये, पुनु लेंकू जालेनं

समस्तानु ऱ्हातं. मला कस्टाला परवा ऱ्हाइ, महाराज, मला लेंकू फउजे. मन्ता येकु अम्रित फलु वंटीत देलाय्. घरी जाउनु सतीपसी पानाचं इडे करूनु ये फलु घालुनु सोमारी घेवांवं. तुमाला लेंकू जलमते मुनु मनाला. सांगल्यावरी घोड्या चडलाय्. गावाकडं आलाय्.

५. इत्तं येयासरी दोनु वरसं व्हइल्तं. ये शंकराचं पूजंला राजा गेला अंबरसिंग महाराज. ते जाताचु ये परदानु काय केलाय? कऊलाचं येलंला कुनब्याँसु बसइलाय्. तम्मा ये परदानाचं बाइकू कोन? मानकाबाय. तिला काय मनलाय् : कऊलाचा पइका घेयाचं येलं आलंया मी घरा येयाचा ऱ्हाइ. तित्तंच ऱ्हाउनु. तम्मा तिनं सांगलं : मुशारदाराँसु बलवुनु सांगावुं कऊलाचं पइका वसूल कर मनावं. येकु रूपीयाला दोनू वसूल करामु. राजाचं राजासु बांदूनु टिवावं तर्वांता राजा आल्यानं काम होइना, आमाला पडका मिलंना. अन्ता सरे मनलाय्, गावाँतु घेलाय्.

६. गावान्तु गेलीया पइका दे मनल्यानं कोनु देइना. कोनु देतं? कोनु होतं गावान्तु? गावान्तु थोल्ले कुनबी होतं. थोल्ल्या कुनब्याँसु मार हानुनु वडुनु जबरदस्ती घेंटलं. धाकले सारे भिवत्तं. तेनी कुडा देलं. मल्ली इच्यार करूनु जवानाहीला बलवून घेंटलं. का म्हंटलं : अरे जवानांनो अंडी, या गावाला थोल्ले कंपारू हाती. कंपाऱ्याँसु बलवून आना अंडी. आनलं. ये रड्डी, तू कऊलाला कित्ती पइका बांदतं? मनलं येक्करांला येकु रूपिया. शंबरू येक्करू भोइ हाय्. शंबर रूपिये बाँदतं. हाँ, अत्ता दोन शंबरू रूपिये बाँद तस्सं म्हटलन्. राजा हाय ते वनाला गेलाय्, राजा आल्यावरे बाँदितुम् म्हटलं. ऱ्हाय ऱ्हाय, राजा येइजो काम ऱ्हाइ तुला बाँदित्त मन्ता पंचाइत पडीन. सोडीनं.

७. इकडं ते पंचाइत अइकिन्या येकु जवानु लावुनु देला. येकु सिंगाचं लाकूडु, वरे येकु काँटी, पाटीवरे टेवलाय्. मानावरे धोंडा येकु टेवलाय्. ये काँटी अंगावरे घेउनु, ये धोंडा मानंवरे घेउनु, मी थोल्ला कपारू, किती नादान मला? माजं ढोर इकलेनु बरंचु, माजं गायी इकलेनु बरंचु. चलो मला काडानु. मी देतो मनितलं. दोनु शंबरु रुपीये आनला. देला. थोल्ले कंपारू बलऊनु आनुनु लिंबाजी डबल पइका वसूल केलाय्. साऱ्या गावाँतु बलवा जाला. गाँमु सारं भिऊनु घेउनु ढोरं, बइलं, अन्तासारं इकुनु घेउनु कउलु देला. येकु कंपऱ्याला केला. तस्सचु येक्या धनगराला केला. गाँमु सारं तस्सचु केला.

८. अंबरसिंगु राजाचं दोस्तु, जीवाचं दोस्तु कोनु? येकु मोती शावकारु, लाले शावकारु येकु. ये अंबरशाऊ राजा ये दोनं भाऊ येक्या येक्या इस्कुलान्तु जाउनु घेउनु, येक्या पलंगावरे जोंपु घेउनु त्याँनी दोस्तु. तेन कां केलाय् : येकु दुकानु मनुनु त्याचं तासील मनुनु मानसी धा तोलं सोनं देवावं. तेला बलविलं. तुमी काँ देता इचारलं. हमी धा तोलं सोनं देतं सांगलं. ते ऱ्हाइ, ईसु ईसु मोत्तं चार धा तोलं सोनं देवावं मुनु सांगलं. हमी देइनं. ते बोल्लं. राजा आल्यावरे डबल कित्ती बाँद मन्लं तिकतं बाँदतमु मन्लं. आमी तुज मननं आइकिनं मनलं. ते मन्ल्या तसं जवानु बलउनु कानु घरूनु ऊट-बइस करा लावलं. ऊटु बइसु करिता, हमी इकते कोमटी ऱ्हाउनु इज्ज़त करता बेइज्ज़तु कराला यानं. सरे, चार धा तोले देतामु मुनु सांगलं. राजा आल्यावरे फाउनु घेतामु मुनु सांगलं. सरे, वस्त्र, पात्र, चीज बस्ता. घरु, दारु, सारं इकुनु चार धा तोलं सोनं हवाली केलं. अन्ना काय नाय्. घरु गेलं, दारु गेलं. भीकु मागुनु पोट भरितं त्यानं कोमट्यानं. तेन काँ करावं. सर्वें इकिलं. का हाय्. चार

अनुक्रमणिका

धा तोळं सोनं देवावं मुनु सर्वे इकिलं. जोली बांदुनु घरा घराँतुनु भीक्शा मागुनु राहिले. राजा येइजो न्हावं मनुनु घेंटलं. राजा आलंनं हमँचा अवतारू दाकवितामु. ये लिंबाजी जबरदस्तीनं पैइका वसूल केलं मुनु सांगतामु.

**९.** सरे, इकडं काय की राजा गावाँतु आलं. राजा अम्रित फलु घेउनु आलं. मी येतुसं पायानं, अनसुठ पायानं जाऊने. तम्मा लालबागाँतु अंब्याचं मल्याँतु बसुनु वडवाजत्री घेउनु जावावं मनुनु काय केलंय, लाल बागाँतु आलंय्. लाल बागाँतु येउनु का केलंय्? पानी बाँदायचं माल्याला बलउन आन्लाय्. अरे माल्या, गावाँतु जा अंडी. लिंबाजी परदानु, मोती शावकारू, लाले शावकारू माजे जिवाचं दोस्तु, पाटीलु, पांड्या सारजन घेउनु वडवाजंत्री लावुनु मला गावाँतु न्या अंडी. मी लेन्कराचं वरू घेउनु आलं सांग जा अंडी. मन्लं.

**१०.** तम्मा ते माली का केलं बिगी बिगी जाउनु सांगावं मुनु गेलं. गावाँतु मोती शावकारू लाले शावकारू भीक मागुतु ते पयले भेटलं ये शावकारांनो, थांबा अंडी, थांबा अंडी, कुट्ट जातामु? आमी भीकु मागा जातुम् अंडी. राजा आलाय्, अंब्याचं लालबागाँतु बसलाय्. अजगुरु जा अंडी. ते माली गेलं. शावकारू मल्याँतु गेलं. ते परदान येतं, लबाड गोस्टी सांगतं अजगुरु जावा अंडी अस्सं कोनु मन्लं? ते माली मन्लं. सरे, ते माली गेलं. शावकारू काय की मल्याँतु गेलं. तेचु वस्त्रु येसु नेसु गेलं. राजा फइलं. अरे कोनु तुम्मी? माजे जिवाचं दोस्तु नव्वं? इकतं कस्टु कोनु तुम्माँसु देल? माज्या इकतं सम्सारु तुमँचं. तुम्मा इकतं कस्ट कोनु देलं? ते लिंबाजी येसं केलं, गाव सारं येसचु केलं. सांगला. राजा वस्त्रु काडलाय्. दोगा कोमट्यांसु देलाय्. फाटकं वस्त्रं टाकुनु देलाय्. इकडं तिकडं फइलाय्. सरे, थांबा अंडी अन् ते कोमट्यांसु बसुनु घेउनु ते राजा बोलतु बसलाय्.

**११.** ते माली का केलंय्. तित्त आलं लिंबाजीपासी. लिंबाजी परदानु. कां सांगलंया? परदाना, राजा आलाय्. तित्तं लालबागाँतु बसलाय्. जा, वडवाजंत्री घेउनु जावा अंडी. पाटीलु, पांडे सर्वे घेउनु जावा अंडी. राजाला घेउनु यावा. अब्बा, राजा आलाय्. ये गावाँतु कोनु जाउनु सांगलाय्, ते कोनु जाइलु तेचं अदगुरु जाउनु धा लबाडु बोलुनु घेउनु पाँचु खरं बोलुनु सांगतामु. ये राजाला हाती धरुनु घेयावं. मनुनु घोडं घेतलाय्. तित्तं लालबागाँतु गेलाय्. लालबागाँतु जायामुंदु तित्तं मोती शावकारू, लाले शावकारू. येकु येकीकडं, येकु येकीकडं बसलाय्. अब्बा, याचं गट चांगलं करुनु घेंटलाय्. अन्ता कस्सं बरं जावावं राजापुडं? मनुनु घेंटलाय्. राजापुडं नमस्कारु केलाय्. तीन बारू नमस्कारु केलाय्. तीन बारु नमस्कारू करताँचु राजा रागानं कुद्द होउनु, रुद्र होउनु, डोलं लाल करुनु तल्वारू फइलाय्. हाताँतु तल्वार न्हाइ, काइ न्हाइ हाताँतु. लई लालु जालाया. तू नगराचं कामु इतकं केलंया. गुलाम, मादरचोद, ये राज माजं, ये वतन माजं. तू का करून टिवलंसु? उद्या उजडाया तुज्ञ सीरु माज्या तल्वारीनं तोडून ताकतूया. तर माजं नांवु अंबरसिंगु नव्वं.

**१२.** दोगं शावकारू संगट घेंटलाय्. रागानं क्रुद्द होउनु गावाँतु आलाया. गावाँतु येताचु ये परदानु काय केलाय्. मेव सिरुन टेवलंय् पोटान्तु कांकी, राजा गावाँतु शिरलाय्. तेन केलं चुकंना. तस्संचु मेव घेउनु घराँतु गेलाय्. बाइकुजवल गेलाय्. मानकावती अन्ता का करू मी? तू वसूल कर डबल मुनु म्याँ केलं. माजा जीवु जाचं येल आलंया. मनुनु मूर्चित होउनु खाली पल्डाय. मानकावतीनं उटविलाय्. जागं केलंया. मन्ली : तू मेऊ नोको. मजाजवल जादु हाय. तू ऊट मनुनु उटविलं. बट्टेवस्त्र सरं फेडाया लावलं. मनली मी तुला नाग सरप करतं. राजाचं माडीला जाउनु ये. रातच्याला राजाला ईखु भरूनु येवावं. मनुनु सांगली. सरे म्हंटलंया. ते लिंबाजी सरपु केलंया. लिबाजींला सरपु करताचु ते वर खाले, दडतु लपतु करीतु राजाचं माडीवरे आलंया.

अनुक्रमणिका

**१३.** राजाचं म्हालात काय की राजाचं बाइकु बालावंती पूजा केलीया. पूजा करिताचु ते परसादाचं फुलु मंगलारती घेउनु भवानीचं चौकट पूजा करूनु सतीपुरूसं बसुनु, पांचु इडे बनउनु देवाचं इडे देवाला देउनु आपले इडे आपनु घेउनु ते पलंगावरे जोंपली, पलंगावरे जोंपी जाताचु तम्मा कां जालंया. तम्मा उन्नल्याचं दीसु. उकडाया लागलं. तम्मा पारवरी हतरून टाकी म्हंटलंया.. पलंग टाकलंया. राजा जोंपलंया. तम्मा बालावंतीला मन्तुया : माजं पायाला कष्ट जालंया. पायावरे शालू टाकी. मनुनु घेंटलया. सरे म्हंटलीया. राजा तितं निजून हाय. पायावरे शालु ताकलीया. शेवा करलीया. शेवा करूनु करूनु तीकुडा जोंपलीया. कोन? बालावंती. बालावंती राजाचं उशाला जोंपलीया.

**१४.** जोंपी जाताचु ते सरपाला काय की म्हाला भोंतालु ऑन्तु जाया जागा न्हाइ. कुट्टं जागा न्हाइ. तर पानी जाचं सुरंग ऱ्हातं न? सुरंग म्हंटल्यानं पावसाचं पान्याचं पन्नालु ऱ्हातं ना? ते दिसलं. फिरून फिरून काय की म्हालातु सुरंगावाटं गेलाय्. पुन्ना पुन्ना फिरलाय्. ते सरपांसु काय की पलंग चडायाचं हुकूम न्हाइ. ते जोंपीतु पाय वरता करता करता काय की शालू लोंबता पडलाय्. शेव खाले आलाय्. ते शेवानं वरे चडूनु पायाला सप मनुनुशान् चावलाय्. चावलाय् की घप मनुनशान खाली उतरलाय्. घरी आलाय्.

**१५.** बालावंती मला सरप चावला सरप चावला मनता मनता च्यारी बाजूला हुडकिलाय्. फाइलाय्. कुट्टं बी न्हाई. अन्ता का करावं? गडबडीमंदी सरपु काय की मानकावतीचं जवली घरी आलाय्. पुन्ना मानूस जालाय्. इकडं बालावंती अन्ता का करावं मनुनु घेंटली तित्तं बाराजनी दासी होत्या. ते दासीनं कां केली का न्हाई. चलो तुम् इकडं जावा, तिकडं जावा मनाली गडबडींतु का की राजाला येकु मूर्चा आली. तम्मा कां केली गावाभाइरी कैकाडी हाती. ते कइकाड्यॉंसु बलवून आना मनाली. कइकाड्यातुनु काय की मंत्र घालुनु घेवावं मनाली. मंत्र घालाया लावताचु इखु उतरून गेलंया. राजा चोक्कटु-निकटु चांगला जालायां. कइकाड्यॉंसु इनामु देलाया. इनाम घेउनु गेलाया. ते कां केलाया : राजा चोकटु जालाया, राजा चोकटु जालाया, मुनु गावामंदी येकच हुल्लडी जालाया.

**१६.** हुल्लडी जाली तम्मा लिंबाजी परदानु कां मनतुया : मानकावती अन्ता कां करावं, राजा चोकटु जालाया. अन्ता माजं परान ऱ्हाइना. सींर जातं, जीव जातं मनुनु घेंटलंया. मानकावती कां केली. घूस केली. उल्टं मंत्र जपलीया. कॉंकनं का की जबरदस्तीनं फोडलीया. हातानं कांकनं हिनं फोडुनु घेताचु इकडं राजाचं जीव गेलाया. जीव जाताचु मंग अन्ता कां करावं? अन्ता कां कराचं? राजाचं जीव गेला मनतांचु गावॉंतले पाटीलु, पांडे, देसाई, कोमटी अन्ता आले. अन्ता कां करावं? सरन रचूनु दान करावं मनले. येक गेले, दोनु गेले, धा दीसु जाले राजाला मरूनु. सरे लोकु मन्ले राजाला अन्ता दानु करावं. दानु करावं मनताचु गावाभाइरी सरन रचलं. थोल्ले थोल्ले लोकु हिकमत केलं. हिकमत कां केलं की ते मोतीशावकारू कां केलं की राजाला दानु करतांचु ते काय की जलुनु जातं. राक होती रक्शा होउनु जातं. राजा काय की आमाला भुशेनु. या राजाला काय की पोटु चिरूनु, पोटान्तुनु काय की नरकु काडुनु टाकुनु, पोटॉंतु काय की अबीरू, गुलाल, बूक्का, कापूसु, कापुरू, बिसमीचा रंगु पुरनी करूनु ते राजाला पोटभर भरूनु. ते राजाला चुकट वालू घालुनु, येकु संदुकु बनुनु. संदुकॉंतु घालुनु रोजु राजाचं तोंडु फउनु घेउनु. असं केलंना आमाला कस्टु होइलु. पुन राजाचं तोंडु फउनु. मुनु का की मोती शावकारू का की कचेरीपुडं घरडं लिंबाचं जाडलाय् पाल्ना बॉंदुनु ते पालन्यॉंतु काय

की संदूक टिवलं. ते मोती शावकार काय की गावाँतु जावावं, धरम मांगुनु आनावं, तित्तंचु सैंपाकु करावं, राजाचं शेवा भगत फावं. ते मोती शावकारू लाले शावकारू का की रोजु शेवा करित्तु.

**१७.** इत्तं काय की ते फलु खान्यातु बालावंती अंबरसिंग पलंगावर मिलून गेलं की तस्संच गरबं ऱ्हाइलाय्. गरबु तस्सचु ऱ्हाइला. येकु दीस गेलं, दोनु दिसु गेलं, पाँचु म्हइने पडलं. पाँचु म्हइने पडलं की भाजी घोलंचं खाउसं वाटलं. कोनाला? बालावंतीला. तर काय केलीया : दासीनो अंडी, येकले जाउनु घोलंच भाजी आना अंडी मनलीया. इनं का केलीया : ते मानकावती कुडा गरब हाय. तिनं कुडा दासीला भाजी आनाया मुन वाँटं लावलं. तीबी तित्तचु हाय. ईबी तित्तंचु. तम्मा राजाचं रानीचं दासीनं सांगलं रानी गरबु हाय. पाँचु म्हइन्याचं गरबु हाय. रानीला कस्संबी लेन्कु जलमतं. लेन्कु जलमते तम्मा का की आमाला सुकु ऱ्हातं.

**१८.** ये खबरु का की दासीनं मानकावतीला सांगली. मानकावतीनं सांगलं : काय नाई. ये लिंबाजी अन्ता जाउनु धरमारु करूनु बालावंतीला अन्ताचं अन्ता घराभाइरू काडी. सर्वे आन मनताचु जबरदस्तीनं आलाय् लिंबाजी. जवानु घेउनु वरलाकडं, खाल्लाकडं चोरु हाय तिकडं, बंदीकोटु करतामु मुनु मनु लागलं. ये सर्वे तुला कशाला? मी घेऊनु जातं. तुजं येकटं पोटु, मी परतपालु करतं. सरे सारं सांगुनु सारं घेउनु गेलाय्. बालावंतीला खायाचं कोनु? पियाचं कोनु? भाइरचं येकु अंगनु देलाय्. सगलं नेउनु घराकडं नेलंया. भाइरचं अंगनु हाय. सोन्याच साकल्याचं पाल्ला हाय, तेकुडा सोडुनु नेलाय्. तम्मा बालावंती काय मन्ली : दादा तुज्ञं नु राजाचं म्हेउन्याचं नातं. तू मजा भाऊ फउजे.. दादा, ये सोन्याचं पाल्ला तू घेउनु न्हाइ जावं दादा. न्हाइ, न्हाइ. ये तुजं घराँतु ऱ्हाउ न्हाइ. पालनं का कराचं तुला रांडबाइला? मन्ता ते कुडा सोडूनु नेलाय्. अन्ता का करावं? कोनु बोलावं? कोनु न्हाइतं. मुनु रोडा लागली ते पाल्ला घेउनु जातायु ती रोजाला ते दारोगा आलं. दासी धोगंचु ऱ्हाइचं मनलं. धाजनु दासी जाया सांगटलंय्. ऱ्हाया लावलं. कां करतीया? ते होउनु अजुनु दोनु म्हइने जालं.

**१९.** पाँचु म्हइने जाउनु अज्ञु दोनु म्हइनं जालं. घोलाचं भाजी खाउसं वाटलं मनुनु काय की तम्मा मानिकु चउकांतु जाउनु काय की दासी भाजी आनाया गेलीया. ये मानकावती अन्की येकु दासी भाजी आनाया पाटविलीया. आन्की ते दासी ये दासी भाजीपाला घेउनु काय की तुमची मालकीन चोकटु हाय, आमची मालकीन चोकुटु हाय सांगुनु घेंटलीया. तम्मा काय की ते दासी मन्ली मालकीन काय की अमाला हरबरे भल्डाया लावतीया. पानी आना लावतीया. कस्टु सांगती मनुनु घेटली. तम्मा बालावंतीची दासी काय की मनुनु घेटली: आमचं राजं काय की जल्माला येतं. आमचं राजं आमाला मिलतं. मनु काय की कस्टु जातं आमी सुकाँतु पडतं. अजुकु चार-सा म्हइनं जालं की आमचं कस्टु जातं.

**२०.** दासी दासीनं सुकदुक सांगलं ते काय की दासीनं मानकावतीला जाउनु सांगलं : अस्सं अस्सं अज्ञु सा म्हइनं जालं की सुकु पडतं. मनुनु दासी म्हंटलीया. दासीनं दासीला मनुनु घेंटलं. ते काय की मानकावतीचं कानी गेलं. दासीला बलवून घेंटलं. काय, काय, कस्सं कस्सं म्हँटलंन् ते सांगी. राजाची दासी मनलं अस्सं अस्सं. सा म्हइन्यांन्तु राज मिलतं. आमी सुकांतु पडतं मनुनु घेंटलं. मानकावती काय की नवऱ्याला बलऊन घेंटलं. लिंबाजी, आज रातचं जाऊनु बालावंतीचं गल्ला कापावं. पोटं चिरावं. पिंडाचं गल्ला कापाव. सरत्या राती सरं होआवं. सरे, म्हँटलंया. सुरा घेंटलाय्. सज्ञ राती मुन सांगलाय्. ते काय की ते दासीनं ये दासीला सांगलय्. लिंबाजी येतुया, बालावंतीचं गल्ला कापतुया. पोटातल्या पिंडाचं गल्ला कापतुया तू जाउनशानी सांग.

अनुक्रमणिका

सरे मनलीया. गेली. सरं सांगली. ये दासी बालावंतीला काय मनलीया. तू माय. मी लेंकी तुजी. तुजं वस्त्र मला दे. माज नुगडं तू नेसुन घे. मी काय की पलगावरे निजतं. तू काय की माजं पाय दाबीत बइसु. लिंबाजी येईल. तू काय की तस्संचु बसुनु ऱ्हा. उटु नोको. ते आंल्यानं दासरु, रांड, मी आल्यानं उट्टंना मनुनु तुला लात मारतं. तू तश्शीचु उट्टुनु जा. ते माजं गल्ला कापतं. मी मरून जातं. तू ऱ्हावं मुनु यंता काकुलती येतं.

**२१.** ये दासी का केलीया. बालावंतीचं वस्त्र नेसलीया. पलंगावरे निजलीया. ये बालावंती काय की पलंगाखाले बसुनु दासीचं पाय दाबतीया. पायाचं शेवा करतापुडं ते लिंबाजी का केल : मादरचोद, रांड, मला फाउनु उट्टु न्हाइ. मन्लंया. लात मारलंया. लात मारल्यावरे ते बालाबंती काय की तश्शीचु भाइर पडलीया. गावाँतु आलीया. बालावंती काय की पलुनु गेलीया. ये दासी का की निजुनु. रागानं काय की तिचा गल्ला कापलाय्. रगताचं खून का की डोल्यॉतु चडुनु ते पोटाचं पिंड चिरायचं का की इसरुन गेलाय. रगताचं खून चडलंया. पिंडु चिरला न्हाइ. मीचु राजा मनुनु घेंटलाय्. गेलाय्. कोनु? लिंबाजी. कापलं का बालावंतीला मनलीया. कोन? मानकावती. आमचं पीडा चुकलंया. राजा गेला. रानी गेली. आता तूचू रानी. मी राजा. अन्ता तू राजा मी रानी. या गावाला हाय कोनु? चोकोटु कोनु पुसुनु घेईल. तू राजा रानी मीचु मनुन घेंटलीया.

**२२.** इकडं बालावंती का केलीया : गावाँतु ऱ्हाइल्यानं मला कापूनु टाकतं मनु काय की अज्ञु येक्या गावाला गेलीया. जातु जातु पंधरा दी, धा दी ऱ्हाइली. गेली अज्ञु येक्या गावाला. इकडं काय की उजियेडु होताचु रानीचं गल्ला कापुलं, रानीचं गल्ला कापुलं, येकचु हुल्लड उडालीया. मानकावती कुडा फाया गेली. फाइली. त काय? रानीचं दासी मरुनु पल्डी. घरा आली. नवऱ्याला बलविलं. अये लिंबाजी तू कुन्नाचं गल्ला कापलं? बालावंती काय की न्हाइ. दासी मरुनु पल्डीया. जाव. कोपरे कोपरे धुंडावं. बालावंतीचं गल्ला कापावं. बालावंतीचं गल्ला कापला न्हाइ त तू राजा होतु न्हाइ, मी रानी होइना. जावं. बालावंतीचं गल्ला कापावं. पोटाँतलं पींडु चिरावं. राजाचं वंवसु ऱ्हाइला न्हाइ फाउजे.

**२३.** जातुम् मन्लाय्. येकु तल्वारू घेतलाय्. येकु घोडा घेउनु मागाला निगालाय्. जाता पुडं जाता पुडं दोनु तीनु नगराँतु हाय मन्नु खबरू लागलीया. अंबरसिंग राजाची रानी दोरसिंग राजाचं नगराँतु हाय मनु कलताचु ये लिंबाजी काय केलाय् : दोरसिंग राजाचं दरबाराँतु गेलाय्. राजाला नमस्कार मांडलाय्. हुबा ऱ्हाइलाय. कोनु तू? राजा इच्यारलाय्. माज गांवु अमरावती. अंबरसिंगराजाचं हाताखाले परदानु मन्लाय्. माजं नाव लिंबाजी. कशासाटी आलाय् मन्लाय्. ते अंबरसिंग राजाची रानी तुज्यानगराँतु आली मनं. मी जाउनु रानीला पालन्यांतु बसाया लाउनु पुरस्कारू मुन आलाय्. ते रानी न्हाइ. माय हाय. आमी लेंकु तिचं. ती भइन मी भाऊ. रानीचं तोंडु फाउसं वाटलं. गावाँतु ऱ्हाउ न्हाइसं वाटलं. मन्नु आलं. ते रानीला जाउनु सुकानं पुरस्कार करतं. महाराज मनु नमस्कार केलाय्.

**२४.** ते दोरसिंग राजा सरे मन्लाय्. पर ते रानीला काय तरी कस्टु देलं की तुजं नगराँतु येऊनु तुजा गला कापतं. तुज्या बाइकूचा गला कापतं. बालावंतीला बलविलाय्. बोल्लाय्, जावं तू भइनी. तुजं नगर, तुजं राज, तुजं वतन हाय. परदानु तुला बलाऊ आलाय्. इन्ता काकुलती करलाय्. नमस्कार करलाय्. तू भइनी मनलाय्. अजुक धाडून देलाय्. बालावंतीला घोड्यावरे बसुनु दूर रानातु आलाय्. सरत्या रानान्तु आल्यावरे घोड्यावरूनु उतर मनलाय्. तित्तं इस्माइल बंडा मनुनु येकु धोंडा हाय. त्या धोंड्यावरे निजाया लावलाय्. तुजा गला कापतो मन्लाय्. सुरी काडलाय्. सुरी काडताचु बालावंती काय मन्लीया : दादा मी भइन. तू मजा भाऊ.

माजं गला कापू नोको. सारं तुजं तू घे. सर्वे तुजं. मला सोड. मी कुटल्यातरी मुलकान्तु जातं. मला जीवदान कर मनुनु नमस्कार केलाय्. तरी बंड्यावर आडवा केलाय्. गला कापलाय्. ते धंड काय की इकडं तिकडं फिरूनु फिरलाय्. फिरतुया तम्मा काय केलाय् : मला नमस्कारू करूनु पाया पडावं मन्नु इकडं तिकडं फिरविलाय्. ते रगत इकडं तिकडं फिरूनु का जालंया : ते पोटु चिराचं इस्नुनु गेलाय्. काय केलाय् : उरावरे पाय टेउनु लात देलाय्. लात देतांचु का जालंया : ते नऊ मास पूरं जालेलं गरबु उडुनु गवताँतु पडलंया. गवतांतु पडताचु ते पोट चिराचं काय की न्हाउन गेलंया. परदानु घरी परतुनु आलंया.

**२५.** परतुनु येताचु ते रगताला फाउनु घारी जमलीया. ते रान कोनाचं? गुरूवूचं, मुनीचं. माजं रानाँतु घारी कां आलीया. इत्तं कन्दी पापु न्हाई गाइ नि वागु मिलुनु चरत्तं. मुंगी सरपु मिलुनु न्हात. माज्या रानाँतु पापु न्हाइ. घारी काउन येतं? मनुनु काय केलाय्. गेलाय् तिकडं. फाइलाय्. सीरू हाय बंड्यावरते. धडं गेलंय् येकीकडं. रगत सांडलंया. मायघरची लेंकी की सासुघरची सूनु? कोनु तरी पापु कामु केलंया. कोनु तरी गला कापुनु गेलाय्. मादरचोद, गुलामु. कापिलं तेला पापु न्हाइ. मला पापु की. धंडाला का करावं. मनुनु इकडं तिकडं इच्यारू केलाय्. हुबा न्हाइलाय्. होजाताचु दिवस वरे आला की. उन्नाचं छत छत तरीपु पिंडाला लागलाय् की. ते काय की गवतान्तु गडबड करित्तं. अरे, ये कोन काय की गला कापुनु गवतातु लपुनु बसलं काय की मनुनु फाइलाय्. अब्बा, नवमास नव दी भरलं ते पिंडू मनुनु का केलाय्? कमंडलुचं पानी आनुनु धुतलं या. मंत्रोपदेशु करूनु ते बेताची छेडी पिंडावर टेवलंया. ते पिंडु मुस्कटुनु काय की मोकलं जालं या. मग काय केलं या. कमंडुलुचं पानी आनुनु धुतलंया. कपड्यांतु घेतलंया. भुजवर ताकलं या. ते शिरू ते धंडु येकजागी करून आपल्या मटाँतु नेलं या.

**२६.** मटाँतु नेउनु कां केलं या. ते पोटु कोनुचं? बालावंतीचं. पोटु चिरूनु शाप केलं या. रंगु भरूनु वालू भोरूनु माडविरे टेवलंया. ते पिंडाला कां केलंया : शेलाचं दुद्दु, गाइचं दुद्दु घालुनु परतपालु केलंया. ते पिंडाचं परतपालु केलं या. दोन वरसु, च्यार वरसु, धा वरसु, बारा वरसाचं पोरगं जालं या. ते पोराला नाँवु कां टिवलंया : रानान्तु जलमलं मन्नु रानासिंगु नाँवु टिवलं या. टेवुनु कां केलाया : ये गुरूवु ते चेला. चेला गुरूवुचं शेवा कराचं. पाय दाबितु, अंगुलीला पानी टेवितु. येसं शेवा करित्तं.

**२७.** येकू रोजु कां जालं या? ते मानकावती मन्तीया : मला अन्ता नवरत्नाचं हारू फाउजे. फाउजे मन्ता आनुनु देलाय्. तर्वाता पुन्ना मन्लीया सिंव्वासनावरे मी खरी रानी होती, तू खरा राजा. त कां करावं? रानाँतु जाउनु वागाचं गल्ला कापावं. ते आनुनु सिंव्वासनावरे टेवावं. टेवुनु बइसावं. तू राजा होतं. मी रानी. मुन ते लिंबाजी कां केलंया : ये वागाला माराया रानाँतु कोनु कोनु हातं त्याहीला मन्लं : ये पाटील सावकारहो अंडी, जे कोनु रानांतु जाउनु वागाचं गल्ला कापुनु आनितं त्याँसु वागासु धराया धारू कटार, घोडं ये सर्वे देतं. वागाचं गल्ला कापुनु आनावं. मनुनु यानी गस्त फिरविलं. गस्त फिरविलं तर शिकार कराचे कोनु कोनु हातं तेनं रानांतु निगाले. जाता पुडं जाता पुडं तित्तं इडा कडीला बांदलाय्. वागाचं कामाला कोनु जातुया तेला बसाया घोडं, हातांतु तल्वारू ये सारं भाइरि काडलं. तू धर म्हंटलं, मी धर म्हंटलं. कोनी इडा पइजंचा उचलीना.

**२८.** इकडं ये पोरगं का केलंया. गुरूवु काय की जोंपी गेलाया. ये चेला काय की गुरूवूला सोडुनु देलाय्. मुंडासं बांदलाय्. पुडं निगालाय्. फइलाय्. लइ मानसं हाती. बोलनं अडाओडीचं. आपन का बोलावं. मानसं सरेजन असत. जोरानं खोंकु केलाय्. कोन हाय? का कामु हाय? रानाँतु वागाचं गल्ला कापाचं काम हाय.

घोडं देतुम्. इनाम देतुम्. वागाचं गल्ला कापावं मुन सांगलाय्. ते पोरगं मनलं मी इडा धरुशे. ते वागाला मारा निगालं. तेला कोनु न्हाइ मनिनं. गेला. ते इडा उचललाय्. हिंगं बाबा इत्तं पन्नास घोडं हातं. पन्नासु घोड्याँतु तुजी खुशी तुजं मन लागंल ते घोडं घे. फाउनु घेतलंया. घोड्याचं जीन धरलंया. घोड्यावर बसलंया. हतियार कोन्तं तरी घे म्हंटल्या बापाचं हतियार बापाचं कटियार घेतलंया. रानाँतु गेलंया. रानाँतु जाताचु इकडं जाचं काम न्हाइ, तिकडं जाचं काम न्हाइ. बापाचं कराचं धोंडं हुतं. धोंडं उचलूनु मस्तकी धरलंया. रानांतु गेलाया. वागू कापुनु आनलाया. देलाया. ते पाटील मन्लाय्, बाबा, तुज अजुक का फाउजे? मला काइ नोको. मी रानाँतु ऱ्हानार मानुस. मला काइ नोको.

**२९.** सरे, सरे माघारं गेलंया. लिंबाजीला वागाचं डोस्कं देलंया. लिंबाजी मानकावतीला मन्हया : ये मानकावती, वागाचं डोस्कं कापुनु आनलं या. तम्मा ते बोल्ली : ते कोनु हाय? वागाचं डोस्कं कापुनु आनलं ते कोनु हाय? फायचं मला. इतकं जबरदस्त वागाचं डोस्कं कापुनु आनलं ते कोनु हाय? फलानं रानांतु येकु लेंकरू हाय तेनं वागाचं गल्ला कापलाय् मनाले. मानकावती बोल्ली, आपला दुस्मान जल्मून हाय इत्तं. जा ते पोरालं वाट लावा. तू रानाँतु जाऊनु गुरूवुची शेवा कराचं ते पोराला इत्तं वाँट लाऊनु द्याचं. मी पोराला शाप करूनु टिवतं. पोराला मारूनु ताकतं. ते पोराला मनावं : तू वागाचं गल्ला कापलं मनं. आमचं नगरिचं लेंकु तुला फाचं मन्नु तेला वाँटं लाव.

**३०.** गेला लिंबाजी. पोराला बलविलं. तू कोनु? मी हाय लिंबाजी. का आलं? तू वागाचं गल्ला कापलं मनं. आमचं नगरिचं लोंकु तुला फातात मनं. आमचं मानकावती कुडा फातं मनं. तू जाऊनु आमचं नगरिचं लोकाँसु फाऊनु ये. तुला कोन्तं मागनं मन्ता इनामु देतुम्. काम कोनतं? फायाचं मन्ता? जातुम्. तू इत्तं गुरूवुची शेवा करीतु बइसं. सरे मन्लाय्. मनुनु का केलाय : झगा घाटलाय्, मुंडासं बाँदलाय्. लेवुनु भाइरि हुबा ऱ्हाइलाय्. लिंबाजीला इच्यार पडलाय्. येकु चिटी लेवुनु ये मानकावतीला दे मुनु बोल्लाय्. मानकावती ये पोरगं तित्तं येयातु. तेचं मरन घे. ये पोरगं मारून टाकलं त आमचं जल्माचं वइर गेलं. मुनुनु चिटी लिवलाय्. बाबा, ये कोनाला दावु नोको. पक्कं काम कर. मन्लाय्. ते पोरगं का केलाय् मी नेत्तं, तित्तं देतं बोल्लाय्. चिटी काय की टोपीत टेवलाय्. निगालाय्.

**३१.** वरे ते शंकर का केलाया. मियाँ अम्रिताचं फल देलं. मी देलं ते वराचं पोरगं मरूनु जातं. समस्तानु सारं बुडून जातं. मुन का केलाया. घार केलंया घार. ते घार काय की ये चिटी ऊडविलाय्. दुसरी चिटी लिवलाय्. कोनु? ते शंकर. काय लिवलाय? मानकावती ये पोरगं येयातु. ये पोराला आमंची लेन्कु देऊनु बावनाला बलवुनु अक्षता टाकी. लगन लावी. नाइ केलं त तुजा गल्ला कापतु. मुनु ये शंकर का केलाया ये चिटी टिऊनु टोपी टिवलाय्. ये पोरगं का की तस्संच चल्लं. तेला काइ म्हाइत न्हाइ. जाता जाताचु तुमचा नवरा ये चिटी देलाय् का ते फाऊनु घेवावं मन्लाय्. ते चिटी फइलाय्. नवऱ्यानं काम केलंया. नवऱ्यानं सांगलं ते गोस्ट कराचं. मन्जे कस्सं? सरे ते शंकराचं मावंनं ब्रामनाला बलावलीया. अक्षता केलीया जगन लावलीया.

**३२.** इकडं का की ते लिंबाजी गुरूवूला रानाँतु सोडुनु देलाय्. नगराला आलाय्. मानकावती तू का केलं मन्लाय्. तू लिवलं लेन्कीला देऊनु लगन कर मनु लगीन केलीया. म्या चिटी तसी लिवली नवती मग तसं कशानं केलंया. चिटीमंदल्ली गोस्ट ते न्हव्वं. तसं कसं जालं ये गोस्टी. अन्ता का करावं? मानकावती बोलली. मला मंत्र येतं. ते पोरगं मावानं मारूनु टाकावं. इनं का केली? पोरगं पोरगी निजून हा तवरी थोल्लं मुरगा

होआवं. मुरगा होऊनु डोले फोडुनु जीव घेयावं. मुनु इनं का केलीया थोल्लं मुरगं जालीया. मुरगा होताचु ते लेन्की का केलीया. आमची माय मुरगा होलीया. इच्यार केलीया. ते लेन्कीला कुडा इद्या येतीया. इच्यार केलीया माय मुरगा जालीया त इनं का की मंजरू जालीया. मंजरू का की मुरगाला मारूनु ताकलीया. तर्वाता तिनं का केलीया : ये रानासिंगु उटू तू काय की या मुरगीवरे पांगरूनु ताकुनि ये मन्लीया.

**३३.** ये लिंबाजी इकडं का केलंया. या पोराला सांगलं तुजं लगीन कराया होवं. गाव भाइरि हनुमंताचं पारी जाऊनु पानपुडा टेवुनु ये. मी का की भाइरि जाऊनु पानपुडा वाँटी लाविंत. भाइरि जाऊनु कां केलाया. चोरांसु बलविलाय्. बलावुनु का सांगलाय्? ये पोरगं कालं घुंगडं घेऊनु हनुमंताला पानपुडा घेऊनु येतं. तेला घेऊनु सरनाँतु जालावा. इनामु देइनु. सरे मनलेया. तर्वाता, ये पोरगं खरंच लगीन हाय मन्नु पानपुडा घेऊनु निगालाय्. हनुमंतापारी पानपुडा टिवलाय्. जाता पुडं तित्तं कोमट्याचं पोराचं कुडा लगीन हाय. ये पोरगं पानपुडा घेऊनु आलं. कोन रे बाबा? लगीन हाय? पानपुडा घेऊनु आलं? अस्सं कस्सं पानपुडा? अस्सं कस्सं लगीन? वड नाइ, वजंतर न्हाई सोयरा न्हाइ, मानुस न्हाइ. न्हावं आमचं दरबारी मनुनु बसूनु घेंटलाय्. मरून जाऊ दे लिंबाजी ते काइ मारून ताकित न्हाइ मन्लाय्. कोमट्यानं बसून घेंटलाय्.

**३४.** इकडं लिंबाजी कालं घोगडं घेऊनु फाया निगालाय. जाताच ते चोर का केलाय् तेला धरूनु सरनान्तु ताकलाय्. इकडं रानासिंगु कोमट्याचं पोरासंगं हनुमंतापुडं पानपुडा टिवलाय्. घराला आलाय् जाताचु ते कनकावती का बोल्लीया. माजं बापु गेलाया, माजं माय गेलंया मी शानी मनुनु का की मजं रांडवपन हुलं न्हाइ. मज अहेवपन मी का की राकून घेंटलं. अन्ता तू लगीन करूनु घे.

**३५.** ये रानासिंगु का मन्लं? आमचं रानाँतु गुरूवु हातं. ते गुरूपसी जाउनु येतं. चल मन्ली. रानाँतु ते नवरा-नवरी गेलीया. गुरूवुपसि जाताचु ते दोग्गं नवरा-नवरी नमस्कार केलीया. नमस्कारू करिताचु का चेला मनिताचु दादापु मला फार येलु होउनु गेलाय्. फार परसंग जालंया मनताचु सारं संगती सांगलाय्. अब्बा नवरा-नवरी धोगं हातं? मग ते माडीवरे जाउनु तितं ते धंडु नु सीर होतं तितं गेलं. बाबा, तुज्री माय हा ये. ते फाउनु रोडू लागलं. ते फाउनु शंकरानं का केलं या? तित्त आलंया. तुमी दूर सरका अंडी मन्लाय्. मनुनु का केलंया? अम्रित आनुनु तोंडाला लावलाय्. ते बालावंती होतं. हुटलीया. देवांसु नमस्कारू केलीया. देवानं गुरूवूला नमस्कार करी मुनु सांलाय्. ये गुरूवु कोनु? सारी कता सांगलीया. गुरू, माजं नवरा हाय. त्यानं उटिलं तर मला उटिवा. न्हाइ तर न्हाऊ द्या मलाकुडा. दूर न्हाइ माजं गावाला हाय.

**३६.** बालावंती नमस्कारू करिताचु ते गुरू, ते शंकरू, रानासिंगु, सूनु गावाकडं कोमट्याचं घरी आलीया. कोमट्यानं काय की धंडाचं परतपालु केलाया. शंकरानं काय की राजाला उटविलाय्. राज उटताचु आमचं समस्तान आमचं पूर्वीचं मिलावं मन्लं. ते दासीलाकुडा उटविलं. ते सिम्मसनावरे रानासिंगु कनकावती बसविलं. ते राजा-रानी जाले.

अन्ता आनंदु जाले.

∫∫∫

अनुक्रमणिका

## गोटु अंबरसिंग राजाचं
[गोष्ट अंबरसिंग राजाची]

चंद्रहासराजाच्या कथेचे स्मरण करून देणारी ही एक अद्‌भुतरम्य कथा आहे. लोककथेचे सारे विशेष या कथेत आले आहेत. देव-देवतांचा प्रसाद व शाप, मंत्र-तंत्र, जादू-टोणा, साधु-संतांचे आशीर्वाद इत्यादी लोककथेचे घटक या कथेत दिसतील. कथा सांगणारा शेतमजूर असून व्यावसायिक कथेकरी व नटही आहे. कथेची भाषा प्रचलित बोलीपेक्षा थोडी परिष्कृत आहे.

**परिच्छेद १.** **परदान :** प्रधान; **तलतल :** निखल, एकाकी; **कोटे :** कोठे, भांडार; **कल्पं :** समूह; **धोलागिरीला :** धवलगिरीला;

**परिच्छेद २.** **दान :** (संदर्भाने) वर; **येजेतो :** येईपर्यंत; **कडलाचं :** खंडाचे, शेतसाऱ्याचे (फा. कौल); **पइका :** पैका; **आस्त्रीवादु :** आशीर्वाद; **वस्ता :** अलंकार; **कलकलानं :** तळतळाटाने, शापाने; **हिंवसा :** निश्चिंत, शांत;

**प० ३.** **मादेवाला :** महादेवाला; **इभूत :** भस्म; **न्हउचे :** नसेल ना? **जाडुनु :** झाडून; **भगतु :** भक्ति;

**प० ४.** **मान पडुनु गेलाय :** गुण आला, फलप्राप्ती झाली; **अम्रित :** अमृत. वंटी : ओटी.

**प० ५.** **येयासरी :** येईपर्यंत (सरी, तेलुगू अव्यय); **न्हाउनु :** राहीन (ऊन प्रत्ययांत धातुसाधिताचा, भविष्यकाळी व भूतकाळीही प्रयोग होतो); **अंता** [ते] : सर्व; **सरे** [ते] : ठीक.

**प० ६.** **वडनु :** ओढून, **कंपारू** [ते] : शेतकरी.

**प० ७.** **दोन शंबरू :** दोनशें;

**प० ८.** **तासील :** तहसील, शेतसारा, मोत्तं (ते) सर्व; **चार धा :** चाळीस (४x१०).

**प० ९.** **अनसूटू :** अनवाणी;

**प० १०.** **मुनु :** म्हणून; **अजगुरू :** आगोदर; **नव्वं :** नव्हे.

**प० ११.** **अद्‌गुरू :** आगोदर; **जायामुंदू :** जाण्यापूर्वी (मुंदु : आगोदर).

**प० १२.** **भेव :** भीती; **अन्ता :** आता; **बट्टेवस्त्र :** वस्त्रप्रासरण [वेट्टे (ते) वस्त्र].

अनुक्रमणिका

प० १३. **शेवा :** सेवा.

प० १४. **पुन्ना :** पुन्हा.

प० १६. **दान :** दहन; **भूशेनु :** भूषण; **वालु घालुनु :** वाळत घालून.

प० १७. **खाउसं :** खावेसे (वाटणे).

प० १८. **पाल्ला :** पाळणा; **फउजे/फाउजे :** पाहिजे;

प० १९. **अज्ञू :** आणखी.

प० २०. **सुकदुक :** सुखदुःख.

प० २२. **उजियेडु :** उजेड; **वंवसु :** वंश.

प० २५. **कन्दी :** कधी; **हुबा :** उभा; **ताकलं :** टाकले.

प० २७. **गस्त :** डांगोरा; **इडा :** विडा (पैजेचा); **पइजंचं :** पैजेचा.

प० २८. **जोंपी :** झोपी; **अडावडीचं (ते) :** आवेशाचे; **धरूशे :** धरीन.

प० २९. **फायचं :** पहावयाचे; **शाप :** साप (लक्षणेने वध करणे).

प० ३०. या व पुढच्या पत्रात आलेला पत्राचा उल्लेख व आशयात झालेले परिवर्तन चंद्रहास-कथेचे स्मरण देणारा आहे. लिंबाजी हा चंद्रहास- कथेतील दुष्टबुद्धि प्रधानाची प्राकृत आवृत्ति वाटतो.

प० ३१. **मावंनं :** मायेने.

प० ३२. **निजून हा :** निजून आहे; **इद्या :** विद्या.

प० ३४. **हुलं न्हाइ :** झालं नाही;

प० ३५. **दारापु :** (ते) सुमारे, जवळजवळ; **हुटलिया :** उठली.

प० ३६. **अन्ता :** सर्व.

∫∫∫

४

## अरे-बोलीच्या क्षेत्राबाहेरील मराठी

अरे-मराठी बोलीची क्षेत्र-मर्यादा प्रारंभीच्या प्रास्ताविकात दिलेली आहे. तथापि हैदराबाद आणि तेलंगण या विभागाबाहेर महाराष्ट्रात वा अन्यत्र वास करणाऱ्या मराठी भाषिकांच्या या क्षेत्र-मर्यादेतला बारकावा फारसा लक्षात येईल असे वाटत नाही. त्यांच्या दृष्टीने हे सारे आंध्रप्रदेशातले फार तर तेलंणातले क्षेत्र एवढाच त्याला अर्थ येऊ शकतो. हैदराबाद शहर याच भागात असल्याने या शहरात कधीकाळी कोणीतरी येऊन 'अरे-मराठा बोलीचा' शोध घेऊ लागला तर त्याची फसगत व्हावयाची! तसे घडू नये यासाठी हैदराबादच्या परिसरातील शहाण्णव कुळी मराठ्यांच्या कुटुंबांतून रूढ असलेले काही प्रतिनिधिक नमूने या ठिकाणी मुद्दाम दिले आहेत. ही बोली अरे बोलीपेक्षा भिन्न आहे हे त्यायोगे ध्यानात भरावे.

शेवटचा उतारा 'जोशी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भटक्या जमातीत रूढ असलेल्या बोलीचा आहे. एकाच नगरीच्या परिसरात जाति, व्यवसाय आणि परंपरा यांच्या भेदाने किती निराळ्या बोली मराठीच्या नांदतात त्याची कल्पना त्यायोगे यावी.

भाषा कालपरत्वे बदलत असते. परंतु बोली काळानुसार तर बदलतातच. तथापि, एकाच काळात एकाच भूखंडात राहणाऱ्या व्यक्तींची बोली व्यवसायपरत्वे भिन्न असल्याचे निदर्शनास येते. कापड गिरणीत काम करणारा कामगार, कापड दुकानावर काम करणारा विक्रेता, एलेक्ट्रॉनिक व्यवसायात राबणारा तंत्रज्ञ, हे शेजारी रहात असले तरी त्यांच्या बोलीत फरक दिसून येईल अरे-समाजाच्या बाबतीत तशा अनेक मर्यादा आहे. व्यवसाय शेतीचा व्यवहार तेलगू भाषिकांशी, क्षात्रकुळाचा अभिमान, सामाजिक परंपरा या अनेकविध संस्कारांमुळे त्याच्या बोलीत वैशिष्ट्यपूर्ण रूप आले आहे. महाराष्ट्राबाहेरील मराठ्यांची बोली एवढ्या मर्यादित स्वरूपात या बोलीस रंगरूप आलेले नाही याचाही बोध या तुलनात्मक अध्ययनासाठी दिलेल्या नमून्यावरून व्हावा.

आंध्रप्रदेशात स्थलांतर करणाऱ्या सर्वच मराठी भाषिकांची बोली सारखी नसते हे या मुलाखतीतून निदर्शनास येईल. निरनिराळ्या भागातले मराठी भाषिक वेगवेगळ्या काळात भिन्न भिन्न निमित्ताने तेलंगणात आले. ही मंडळी एकाच भागात स्थायी झाली नाही. त्याचप्रमाणे समान वातावरणातही वाढली नाही. कित्येकांचा मूळ मराठी भाषिक प्रदेशाशी संपर्क कायम राहिला; कित्येकांचा तो खंडित झाला. भिन्न व्यवसायातल्या दोन मराठी भाषिक जमाती शेजारीशेजारी राहूनही त्यांची भाषा सारखी राहिली नाही. त्यांच्या बोलीवर सभोवतालच्या व्यावसायिक वातावरणाचे जसे परिणाम झाले तसेच स्थलांतर करताना ज्या बोलीचा वारसा घेऊन हे लोक आले होते त्याचाही त्यांच्या वर्तमान बोलीवर संस्कार घडला. या सर्वांची भाषा मराठी असली तरी त्यांच्या व्यवहारात असलेल्या बोलीची रूपे मात्र भिन्न आहेत.

या विभागात असलेली सर्व सामग्री हैदराबाद शहराच्या परिसरातून गोळा केलेली आहे. ती येथे त्या त्या बोलीला अभ्यास करण्याच्या हेतूने दिलेली नाही. तेलंगणात स्थायी झालेल्या सर्वच मराठ्यांची बोली

अनुक्रमणिका

सारखी नाही हे लक्षात यावे व अरे बोलीच्या तुलनेने या बोली किती वेगळ्या आहेत हे ध्यानात यावे हे या संकलनाचे उद्दिष्ट आहे. एकच भाषा भिन्न व्यवसाय, विभिन्न वातावरण व सामाजिक परंपरा यांच्या भेदाने भिन्न बोलींचे स्वरूप कसे धारण करते हेही या निमित्ताने निदर्शनास येईल.

पहिली प्रदीर्घ मुलाखत आहे श्री. नारायणराव पवार यांची. पवारांचे घराणे मूळचे उत्तर कर्नाटकाच्या सरहद्दीवरचे, पुढे ते वरंगल शहरी स्थायी झाले. मूळच्या बोलीवर असलेल्या कानडी भाषेच्या संस्काराला तेलुगू भाषेच्या वातावरणाची जोड मिळाली. शिक्षण काही काळ उर्दू माध्यमातून झाल्यावर श्री. नारायणराव यांचा आर्यसमाजाशी संबंध आला. मातृभाषा कोणतीही असली तरी आर्यसमाजी कार्यकर्त्यांवर हिंदी भाषेचा गाढा संस्कार होत असतो. हैदराबाद शहरात नारायणराव याच वर्तुळात वावरत असल्याने त्यांची मराठी बोली हिंदीने प्रभावित झाली. ऐन उमेदीच्या काळात नारायणरावांनी रजाकारांच्या चळवळीचा प्रतिकार करण्याचे कार्य केले. रजाकारांचे विचार आणि हालचाली यांचा अभ्यास नेटकेपणाने करता यावा म्हणून त्यांना उर्दू वर्तमानपत्रांचे वाचन सातत्याने ठेवावे लागले. कानडी, तेलुगू, हिंदी आणि राजकारणाच्या निमित्ताने उर्दू अशा चार भाषांचा संस्कार त्यांच्या वाणीवर झाला. व्यवसाय कायद्याच्या सल्लागाराचा व नित्य संपर्क सुशिक्षित तेलुगू भाषिकांचा असल्याने हेही परिणाम न कळत दैनंदिन भाषाव्यवहारावर होत गेले. त्याबरोबरच आपल्याला चांगले मराठी बोलता येत नाही ही जाणीवही वाटू लागली घराबाहेर मराठी बोलण्याचे इतर आर्यसमाजी कार्यकर्त्यांप्रमाणे तेही टाळत असत. आता मात्र जमेल तसे मराठी बोलण्याचा ते प्रयत्न करतात.

श्री. नारायणराव पवार यांनी भूतपूर्व हैदराबाद संस्थानाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे. ते रजाकारी वातावरणात जिवंत राहिले त केवळ अपघाताने. पोलीस कारवाई झाली नसती तर ते फासावरच गेले असते. भाषाव्यवहाराच्या दृष्टीने अन्य तांत्रिक प्रश्न विचारून त्यांची बोली नोंदविण्यापेक्षा मी त्यांनी जे असाधारण शौर्य दाखविले, त्यासंबंधीचे आत्मकथन करण्यास त्यांना सांगितले. त्यांनीही ते मान्य केले. त्यामुळे श्री. नारायणराव पवार यांची मुलाखत बोलीच्या दृष्टीने महत्त्वाची आहेच. परंतु एका झुंजार वीरांचे आत्मकथन या दृष्टीने या मुलाखतीस असाधारण महत्त्व आहे.

या भागात असलेली दुसरी मुलाखत श्री. शंकरराव गायकवाड व सौ. पार्वतीबाई गायकवाड यांची. गायकवाड घराणे मूळचे परभणी परिसरातले. सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी दिनकरराव नाईक काही लढाऊ शिपायांचा काफिला घेऊन या परिसरात आले. निजामाने आपल्या फौजेत या मराठ्यांना सामील करून घेतले व हैदराबाद शहर व गोवलकोंड्याचा किल्ला यांच्या दर्म्यान अगदी माऱ्याच्या जागेवर या शिपायांना त्यांच्या सरदारासह गढी उभारून दिली. सरदारांची व त्यांच्या तुकडीत असलेल्या शिपायांची घराणी अद्यापही त्याच गढीवर नांदतात. शिपाईगिरी गेली आहे. आजची पिढी भिन्न व्यवसायाला लागली आहे. तरीही ही मंडळी शहरातल्या मराठा समाजात फारशी मिसळत नसल्याने त्यांची मराठी बोली आजही वेगळी वाटते. पुरुषमंडळी दरबारी संस्काराच्या आहारी गेली तरी खानदानी मराठ्यांची भाषा व रीतिरिवाज कायम ठेवण्याचा प्रयत्न या घराण्यांतील स्त्रियांनी सतत चालू ठेवला. सौ. पार्वतीबाई गायकवाड यांची भाषा तुलनेने या प्रयत्नाची साक्ष देईल. हैदराबाद शहरात स्थायी झालेल्या अरे कुटुंबीयांच्या मुलाखतीवरून मूळ बोली आणि शहरी बोली यातील फरक लक्षात येईल.

मोरे पतिपत्नींची मुलाखत दुसऱ्या एका कारणाने लक्षात घेण्याजोगी आहे. छत्रपतींच्या दक्षिण दिग्विजयाच्या काळात लष्करी बंदोबस्त व महसूल-वसूली यांच्या निमित्ताने बरेच सरदार आंध्रप्रदेशात नेण्यात आले. कडप्पा, कर्नूल, अनंतपूर, चिमूर आदि रायलसीमा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात आजही मराठा सरदारांचे वंशज नांदत असून त्यांच्या बोलीने एक वेगळेच स्वरूप धारण केले आहे. मोरे दांपत्याच्या मुलाखतीवरून या बोलीची कल्पना येईल.

आपली परंपरागत बोली सोडून पांढरपेशांची प्रमाण मराठी बोलण्याचा प्रयत्न माधवराव गायकवाड यांच्या भाषणातील उताऱ्यात दिसून येईल. जोशी वाड्यातील मुलाखती भटक्या जमातीने मराठी बोली कोणत्या स्वरूपात कायम ठेवली याची साक्ष देतील.

### १. श्री. नारायणराव पवार

[शेवटचा निजाम मीर उस्मानअली खान यांच्यावर बॉंब फेकल्याबद्दल श्री. नारायणराव व त्यांच्या सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा झाली होती. ही शिक्षा अमलात येण्यापूर्वीच पोलीस कारवाई झाल्यामुळे त्यांची मुलाखत घेता आली.

ही धाडसी योजना आपण आखली कशी आणि ती अमलात कशी आणली यासंबंधी त्यांचे निवेदन पुढे दिले आहे-]

सन १३०९ फसली ज्यावेळी मराठवाड्यात दुष्काळ पडला होता त्यावेळेस आमचे वडील, त्यांचे मेव्हणे मिळून काय तरी आपला रोजगार करून कामधंदा करण्याकरिता इकडे आले. त्यावेळी रेल्वेलाइन इकडं काम सुरू झालं होतं विजयवाडा रेल्वेलाइन. त्यावेळेस बरेच लोक आमचे गावचे इकडं आले. आमचं गाव भालकी तालुक्यामधे दाबकं, हरसूलच्या जवळ. आणि आमच्या वडिलांच्या मेव्हण्याचं गाव काठमाळ. वलांडी, अलेगाव अशी अनेक गाव मिळून जवळ जवळ १५ ते २० कुटुंबं मिळून ते आले. वरंगलला. तितं काइ तरी मेहनत मजूरी करून, कस्ट करून तितं रहात होते. काही घरंही बांदली त्यांनी. सध्या गोविंदराजकुंटा म्हणून आहे तितं, त्याच्या खाली. त्यावेळची साधारण घरं. एक मोठा महलाच तितं बांदला. मग रेल्वेलाइन बांदल्यावर स्टेशन झालं. बरेच लोक मऱ्हेटवाड्याचे तितं राहिले. नंतर मग शेती वगैरे तितं घेऊन काम करू लागले. तिथंच काम करू लागले. तरी पण नातलग सारे इकडं आहेत म्हणून वर्षाला दो-वर्षाला येणं जाणं चालूच होते. सोयरसंबंध वगैरे आपल्याकडे चालू होते.

नंतर माझा जन्म वरंगलला जे घर तितं बांदलं होतं तितं झाला. रेल्वेस्टेशनवरून एक मैलाच्या आतच आमचं घर होतं. शिक्षण देखील तिथंच मठवाडा हायस्कूलमध्ये झालं. सातवीपर्यन्त. कारण तेव्हा ते हायस्कूल जाऊन मिडलस्कूल झालं. १९४२ साली मी मॅट्रिक पास झालो. त्यावेळी एस्. एस्. सी. वगैरे काही नवतं. उर्दू मीडियम. सातवीपर्यन्त उर्दू-फारसी शिकलो. दहावीपर्यन्त उर्दू मीडियम, हनमकुंडा कॉलेज तितं इंटर पास झालो १९४४ साली. तितं त्यावेळी रेशनिंग सुरू झालं. इंटर केल्यावर रेशनिंग आफिसमधे एक वर्ष नवकरी करून काही पैसे जमा करून वकालत शिकावं या हेतूनं उद्देशानं मी हैदराबादला आलो. लॉक्लासमधे शरीक

झालो. हायकोर्टचा लॉक्लास. तितं मॅट्रिक किंवा इंटर पास झालेला शिकू शकत असे. दोन वर्षाचा कोर्स होता. नंतर एक्सल्सीयर हायस्कूल म्हणून संस्था आहे सध्या विवेकवर्धिनी शिक्षणसंस्था ते चालविते. तितं टीचर म्हणून काम करू लागलो. संध्याकाळी लॉक्लास दर्जे अव्वल आणि दर्जे दुव्वम. इंटरचे लोक दर्जे अव्वलचं शिक्षण घेऊ शकत असत. मुसलमान लोक जे आहेत त्यांना साहायता व्हावी म्हणून उर्दू मीडियममधून शिक्षण होई. मुन्शी फाजील फारसीमधून झालं. बराच काळ लोटला.दोन वर्षाचा अभ्यासक्रम संपला. परिक्षा १५-२० दिवस होती.

हैदराबादला लॉक्लासला आल्यावर त्यावेळेसच्या निजामच्या विरूद्ध चळवळ त्याकाळात होती. त्यावेळी रेव्हेल्युशनरी ग्रूप इथं जे होतं, विशेषतः आर्यसमाजी कार्यकर्ता. एक क्रांतिकारी संघ म्हणून आम्ही काम करीत होतो. त्याच्या आगोदर मी वरंगलला जेव्हा होतो तेव्हा हरिजन लोकांना ख्रिश्चन करण्यासाठी मिशनरी लोक बरंच काम करीत. कन्व्हर्शनचं काम जारी होतं. तेथे आम्ही आर्यसमाजाचं काम करू लागलो. आर्यप्रतिनिधी सभा मध्यदक्षिण मधूर उत्तर भारतातून पं. जयदेवजी आणि खम्ममधे विश्वदेवजी हे दोघे आर्यप्रतिनिधिसभा मध्यदक्षिण म्हणजे हैदराबादचे जे आर्यसमाज आहे त्याचे प्रचारक म्हणून काम करीत. त्यांचं व्याख्यान वगैरे ऐकून मला आर्यसमाजाची माहिती झाली. आर्यसमाजासाठी एक लहानसा कार्यकर्ता म्हणून मी काम करू लागलो.

तिथल्या वरंगलच्या लोकांचं मिशनरी काम बघून फार मनाला धक्का वसला. म्हणून चार महिन्यामधून आम्ही हळू हळू आपलं शिक्षण देणं सुरू केली. त्याचा परिणाम असा झाला की, तिथं ख्रिश्चन मिशन नाव बदलून पुष्कळ लोकांना ख्रिश्चन केलं होतं ते बंद झालं. ख्रिश्चन लोकांना तिथून निघून जावं लागलं. डेव्हिड इत्यादि नावं जाऊन रामय्या लक्ष्मय्या अशी नावं देऊन त्यांना कन्व्हर्ट केलं. विद्यार्थीकालात हे सारं केलं.

पुढे १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. हैदराबादच्या समस्या. या समस्याच निवारण झाला नव्हता. म्हणून भारत स्वतंत्र झाल्यावर हैदराबाद स्टेट काँग्रेसची मागणी होती की इंडियन यूनियनमध्ये हैदराबाद शरीक झालं पाहिजे.

हैदराबाद स्टेटकाँग्रेसची मागणी होती. स्वामी रामानंदतीर्थ यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनात हा लढा सुरू झाला. आर्यसमाजाचे नेता पंडित नरेंद्रजी यांचा माझा बराच परिचय होता. त्यांचं कुठंही व्याख्यान कळालं की सर्व काम सोडून ते व्याख्यान हजर होऊन त्यांचा काय उपदेश होतो ते ग्रहण करीत होतो. त्यांचे जे लेक्चर्स होत होते त्यांचा नवयुवकांना मार्गदर्शन होत होत येथे मी आर्यसमाजाचा मेंबर असून काम करीत होतो.

नंतर चळवळ बरीच झाली. निजाम सरकारने स्टेट काँग्रेसवर प्रतिबंध घातला. तेव्हा आर्य समाजाच्या प्लॅटफार्मवर चळवळीचं बरंच काम झाला. आर्य समाजावरही बरीच पाबंदी होती. १९३६ साली आर्य समाजाची मोठी चळवळ झाली होती. त्यावेळी हजारो संख्यांनी ऑल इंडियामधून सत्याग्रही इथं आले होते. त्यावेळी निजामचा जो जुलूम होता तो असा होता की कोणी हवन करू न शकता. कोणी होमहवन केलँ त्याला जेल.

अनुक्रमणिका

त्यावेळी, १९३६ साली मी दहा-बारा वर्षाचा होतो. त्यावेळी संबंध भारताचे लोक इथं आले होते हे मला नंतर कळलं.

१९४७ साली स्टेट काँग्रेसवर जेव्हा पाबंदी आली तेव्हा आर्य समाज ही जरी धार्मिक संस्था होती तरी धार्मिकच नाही तरी राजनैतिक कार्यक्रम देखील १९४७ साली आर्य समाजच्या प्लॅटफार्मवर होऊ लागले. आर्य समाज हे घर होतं म्हणा ना? महिल्लयाचं रक्षण कसं करायचं, रजाकाराचं जे जुलूम चाललं होतं ते मुकाबला कसं करायचं? याची वाटाघाटी करायचं ते एक ठिकाण होतं. हे मार्गदर्शन आर्य समाज करीत असे.

त्या दिवसात बलिदानही पुष्कळ झाले. स्वतः पंडित विनायकराव विद्यालंकार, पं. नरेंद्रजी, मीही होतो गुलबर्ग्याच्या संमेलनात. त्यावेळी संमेलन चालू होतं. इतक्यात त्या समाजाच्या जमावावर हल्ला करण्याकरिता रजाकारांचा बत होता तरी पण निर्भयपणे मुकाबला करण्यास आम्ही सिद्ध झालो. तरी पण पोलीस पण त्यांना हल्ला न करण्याचा प्रबंध झाला तरी पण नेता लोकांना बोलाऊन त्यांच्यावर हल्ला झालाच. पं. नरेंद्रजीचा डावा पाय आणि उजवा हात मोडला. पोलीस आणि रजाकार मिळून पं. नरेंद्रजी आणि विनायकराव विद्यालंकार यांच्यावर हल्ला झाला, बरेच त्यांना मारपीट करण्यात आली.

१५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटिशलोक गेले. पण, म्हणतात ना पार्टिंग किक देले. नीटपणाने गेले नाहीत. इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट जे आहे त्याच्या मधी काय आहे? इंडियामधी मेजॉरिटी हिंदू प्राव्हिन्सेस ज आहेत त्याच्या मध्ये हिंदुस्तान आणि मुस्लिम ज्यामधे आहे ते पाकिस्तान. अशी योजना होती आणि देशी रियासते आहेत पाचशे-सहाशे आहेत. तर त्यांचा उद्देश काय होता की त्या राजेरजवाडे यांच्या हातात निर्णय देला होता की ते पाहिजे तर हिंदुस्तानात शरीक होऊ शकतात किंवा पाकिस्तानात. नसतन इंडिपेंडंट राहू शकतात. प्रजेला लोकांना मात्र काही अधिकार दिला नाही. राजा, नवाब यांनाच ते अधिकार देऊन गेले. म्हणून भारत देशाला फार मोठी समस्या होती.

निजाम आपली सैनिकी शक्ती वाढवीत होता. त्यानं भारत देशात विलीन होण्यास इन्कार केला. स्टँड स्टिल ॲग्रिमेंट झालं होतं. नोव्हेंबर १९४७ ला ते संपलंही होतं. वाटाघाटीही संपल्यासारख्याच होत्या. जसजशी वेळ मिळत होती तसतशी निजामची सैनिकी शक्ती वाढत होती. येथील रजाकारी लोक देखील निजामाकडून वाटाघाटी वगैरेला जे जात होते नवाब छतारी वगैरे त्याच्या मिशा उपटून टाकल्या, प्लेन थांबविले. दिल्लीला जाऊ नये, वाटाघाटी करू नये म्हणून रजाकारांनी ठरवून टाकलं होतं.

इत्तेहादुल्मुसल्मीन आणि रजाकार यांनी आणखी एक काम शुरू केलं होतं. इत्तेहादुल्मुसल्मीनचे एजंट मोठ मोठे शहर आहेत तिथं मुसलमानांची संख्या अधिक आहे तिथं लखनौ, भूपाल वगैरे तेथे जाऊन सिक्रेट म्हणजे गुप्त मीटिंग घेऊन त्यान्ला आव्हान देल की, बाबा, या आम्ही तेथील हिंदूंना खाली करून टाकलं आहे. घरं खाली आहेत. शेतं खाली आहेत. तुम्ही यावा असं म्हणून सगळे बहुमत स्टेटमधे आहेत तिला मुस्लिम बहुमतामध्ये परिवर्तित केलं पाहिजे. तिथल्या मिलिटरी व पोलीसमध्ये तुम्ही शरीक व्हा, पिटाळून लावलेल्या हिंदू लोकांचे जे घर आहेत तिथं रहा. त्यांची शेती वगैरे करा. हे लोक जे गेले होते त्यांनी लाखो मुसलमानांना येथे येण्याचं आव्हान दिलं. त्या काळी १८ लक्ष मुसलमान हिंदुस्तानच्या वेगवेगळ्या शहरातून येथे आले होते.

अनुक्रमणिका

इथं मोलाअली, येरागड्डा, असे कॅम्प्स होते ठिकठिकाणी व जिल्ह्याच्या ठिकाणी असेच कॅम्पस् होते. तर सगळे मिळून १८ लक्ष लोक इथं आले होते.

या लोकांना महाजिर म्हणत असत महाजिर म्हणजे धर्माकरिता हिजरत म्हणजे स्थलांतर केलेले. हिजरीचा अर्थ असा आहे की, महम्मद पैगंबरसाहेब मक्याहून मदिनेला हिजरत करून गेले. तेव्हापासून हिजरी सन शुरू झाला. आपलं स्थान सोडून दुसऱ्या स्थानावर धर्मावर जुलूम झाल्याकारणानं ते आले होते. त्याकरिता त्यांचं नाव महाजिर ठेवलं होतं, अर्थ असा की हिंदुस्तानात मुसलमानावर जुलूम जबरदस्ती भारी होत आहे म्हणून मुसलमान हैदराबादला गोळा होत आहेत. प्रचारही तसाच शुरू झालं होतं.

हे खरं किती होतं हे पाहण्यासाठी मी आणि आमचे मित्र बालकिशन शेरवानी आणि जिना कॅप घालून वेगवेगळ्या कॅम्पमध्ये जाऊन जवळ जवळ पाऊणशे शंभर लोकांना भेटून आलो. खरोखर माहिती करून घेण्याकरिता की खरंच त्यांच्यावर जुलूम होतो काय? मुसलमानाच्या नात्यानं त्यांना विचारलं. शंभरामध्ये नव्यान्नव टक्के लोकांनी सांगितले आमच्याकडे जुलूम वगैरे काही होत नाही. तुमच्याकडचं इत्तेहादुल्मुसल्मीनचे लोक आले होते. त्यांनी सांगितलं म्हणून आम्ही आलो. आम्ही आनंदात होतो. पण त्यांच्या सांगण्यानं आम्ही आलो. याचा अर्थ काय? याचा उद्देश कपटी होता. इथल्या हिंदूंना त्रास देण्याकरिता आणि इथं इस्लामी सत्ता स्थापित करण्याकरिता ही मंडळी आली होती. म्हणून आमची ही योजना होती की या लोकांच्या कॅम्पवर काही ना काही हल्ले करावेत. कारण, हे लोक खप्ती आहेत, बदमाश आहेत. त्यांचा उद्देश इथं सहारा घेण्याचा नाही तर ते इथं जुलूम करण्याकरिता आले आहेत.

आम्ही वंदेमातरम् रामचंद्रराव यांच्याकडे गेलो. आणि म्हणालो असं असं आम्हाला हतियार पाहिजेत. बॉंब पाहिजेत. हे प्रवाह जे चालू आहे लाखो संख्यामध्ये मुसलमानांना इथं येण्याचा व हिंदूना इथून पळवून लावण्याचा ह्याला बंद करण्याकरिता. कमीत कमी इथं आलेले लोक नाही गेले तरी येणारे बंद होतील. म्हणून आम्ही त्यांना विनंती केली. तर त्यांनी सांगितलं काही दिवस थांबा. आता सध्याच मी काही करू शकत नाही. त्यानंतर आम्ही काही योजना केल्यानंतर तुम्हाला आम्ही बोलावू. सध्यातर आमच्याजवळ काही योजना नाही.

मग आम्ही निराश होऊन काय केली की आमचे एक मित्र लोकोशेड मध्ये काम करीत होते. त्यांच्याकडून आम्मी जे पाने रेल्वेचे जॉइंट काढण्याकरिता ते चार पाने आम्ही मिळविले. मिळवून मौलाअली आणि घटकेशरच्या दर्म्यान रेल्वेलाइन उखडून काढून ठेवली. सकाळी साडे नऊच्या सुमारास. कारण, दहा वाजता ये महाजरीन लोकांची स्पेशल ट्रेन बल्लाशाहाहून येत होती. दिल्लीकडून मुसलमान लोकांची. तेचेनं पूर्ण तेच लोक रहात होते. ते गाडी येऊन उलटून गेली तर ते बाहेरचे लोक यायचे तरी थांबतील. इतक्यात तो गॅंगमन तिथून जात हासता. तो पळत जाऊन सांगून टाकला. त्यामुळं तो प्रयत्नही निष्फळ ठरला.

त्याच्या आधी काय झालं जिनाचं व्याख्यान झालं होते. दारूस्सलाममध्ये झालं होतं. त्याच्यामध्ये हिंदू लोकांची त्यांनी बरीच अवहेलना केली होती. ते ऐकून त्या दिवसापासून आम्ही हे व्रत घेतलं होतं, जोवर आमचं आखरी सास तोवर हे निजामशाही खतम करण्याकरिता काही ना तरी केलं पाहिजे. तेव्हापासून हे क्रांतिकारी भावना आमच्यात निर्माण झाली. त्यावेळी आमचे मित्र बालकिशन म्हणून रहात होते सिद्दीअंबर बाजारमध्ये.

त्यांचे मावळे जी. व्ही. नागय्या मुंबईचे टेलर होते. हे पण टेलर होते. बॉंबे टेलर या नावानं त्याचं दुकान होतं. मावळे म्हणजे माईचे भाऊ. त्यांचे माईचे भाऊ. बालकिशन हैदराबादलाच रहात होता. पण, चार-सहा महिने तो उत्तर भारतला, अमृतसरला जाऊन आला. तेथे त्यांनी एक पुस्तक आणली होती. शहिदोंकी टोली : हिंदीमध्ये ब्रिटीश सरकारचं पाबंदी होती त्यावर. तरी पण त्यानं तो पुस्तक लपवून धरला. त्याच्यामध्ये भगतसिंग, चंद्रशेखर, आजाद असे अनेकांचं ७०-८० क्रांतिकारकांचं जीवनचरित्र होतं. बिस्मिलच्या हिंदी कविताही होत्या त्यात. ते वाचून ते बलिदान कसं झालं याची माहिती आम्हाला मिळाली.

ते बालकिशनच्याच घरी आम्ही रहात होतो. आमचे आणखी एक मित्र जी नरसप्पा म्हणून होते. ते माझे क्लासमेट होते. आठवी, नववी, दहावीमध्ये वरंगल हायस्कूलमध्ये. ते राहणार होते काजीपेठ जागीरचे. ते लोकोशेडमध्ये सिकंद्राबादला काम करीत होते. तेही आम्हाला कधी कधी भेट्ययाकरिता येत होते. तसेच आमचं गंडय्या ऊर्फ गंगाराम. ते पाल्माकूरचे होते. ते माडर्न हेअर कटिंग सलूनमध्ये तेथे सुलतानबाजारमध्ये होते. तिथे नवकर होते. त्यांचे जे मालक होते सीताराम तिथं बरेच नेतालोक कॉंग्रेसचे, आर्य समाजाचे जात होते. ते राजनीतीचा एक अड्डा होता. मॉडर्न हेअर कटिंग सलून. तिथं नेतालोक जात होते. नंतर नेतालोक शेव्हिंग वगैरे करताना राजनीतीवर बोलत होते. गंगाराम ऊर्फ गंडय्या तेथे नवकर होते. हेअर कटिंग सलूनमध्ये नेतालोकांचं बोलणं एकून त्यांना बरीच स्फूर्ती आली होती. तेही बालकिशनच्या घरी येत असत. आर्य समाज सूर्यनगर म्हणजे सध्या गनफॉन्ड्री आहे तिथं. आर्य समाजानं त्या भागाचं नाव सूर्यनगर ठेवले होतं. तिथं पं. विश्वनाथ ऊर्फ, गालय्या या नावाचे प्रचारक होते तेही तिथं येत असत. आमच्यात शामील होत असत. नंतर नंतर जगदीश म्हणून मुस्ताजर आहेत तेही आमच्यात अधून मधून शरीक होत असत. असे आठ- नऊ आम्ही लोक होतो.

तर त्या दिवसात रोजचा कार्यक्रम असं होतं की रात्री नऊच्या नंतर आम्ही आठ-नऊ लोक बालकिशनच्या घरी जमत असू. ते पुस्तक वाचून बलिदान कसं झालं याची माहिती घेत असू. पेपरमध्ये येणाऱ्या ज्या काही घटना असत तेची माहिती घेत असू. ते दिवसात मिलाप आणि प्रताप पेपर उत्तर भारतातून येत होते. प्रताप होतं महाशय कृष्ण यांचं. तसंच युद्धवीरचे वडील पुढे महात्मा झाले ते यांचा खुशालचंद यांचा मिलाप. तसंच हिंदुस्तान, नवभारत टाइम्स देखील. या पेपरला त्या दिवसात पाबंदी होती. फारच गुप्त रीतीनं हे पेपर त्या दिवसात विकल्या जात असत ते वाचून कुठं कुठं काय काय झालं, जुलूम झाला हे वाचून दाखवीत असत.

माझं राहणं बालकिशनच्या घरी. दिवसा शाळेत टीचर म्हणून काम करीत होतो. सायंकाळी हायकोर्टच्या जवळच्या लॉक्लासला जात होतो. आपले सिद्यंबर बाजार मधून नयापूल क्रॉस करून जाणं रोजचं. तर येक्या दिवशी मी लॉक्लासला जायला निघालो. तर बालकिशन म्हणाले मीही येतो लॉक्लासला. ठीक आहे म्हणालो. आम्ही दोघे निघालो. नयापुलावर आम्ही दोघे पोचलो. पाच-सव्वा-पाचला सायंकाळी. तो पोलीस व्हॅन पुढं रस्ता बंद झाले. निजामचीसवारी निघाली होती. किंगकोठीहून चारमिनारकडे. हे आमचे मित्र बालकिशन म्हणाले : देखो निजाम जा रहा है. आम्ही हिंदीतून बोलत होतो. रस्ता बंद हो रहा है. मी म्हणालो ये भारत देशका सबसे बडा गद्दार है. उस्को तो खतम करदेना चाहीये. सहज मी उद्गार काढले. ते ऐकून घेतले. त्यावेळेस ते काही बोलले नाहीत. मी लॉक्लासला गेलो. रात्री लेक्चर संपल्यावर नऊच्या नंतर आम्ही बोलत बसलो होतो. तेव्हा बालकिशन म्हणाले :

अनुक्रमणिका

देखा, तुम जो बोले वह करना है

मी म्हणालो काय बालकिशन तुम्ही वेडे की काय? निजामाला मारलं तर किती लोक खतम होतील याची तुम्हाला कल्पना आहे काय? ते म्हणाले ठीक आहे, जे होतील ते होतील. आपलं जे उद्देश आहे हैदराबाद इंडियन युनियनमध्ये शरीक झालं पाहिजे इथं जिम्मेदारानाहुकूमत आली पाहिजे त्याकरिता काही ना काही बलिदान केलं पाहिजे. त्यासाठी काही ना काही अशी घटना घडली पाहिजे जेणेकरून भारतदेशाचा हस्तक्षेप या स्टेटमध्ये होण्याची सोय होईल.

हैदराबाद ही खरोखरच भारतदेशाला फार मोठी समस्या होती. ते उघडपणे येथे येऊन हल्ला केले तर निजाम युनायटेड नेशनमध्ये ते प्रश्न नेऊ शकतात. ते प्रश्न नेण्याचे कारण होईल म्हणून नेहरू आणि पटेल म्हणत होते की, बाबा, निजामस्टेटची समस्या आहे ते तेथील लोकांनी, ते जनताच हल करु शकणार. आम्ही हस्तक्षेप करु शकना. म्हणून जनतेकडूनच काही ना काही तरी झालं पाहिजे.

मग आम्ही काय करू म्हणावं? आमच्याकडे हतियार काही जास्त नाही. पैसा जास्त नाही. शिक्षण नाही. कमीत कमी हतियार, कमीत कमी संघटना वापरून जास्तीत जास्त परिणाम आम्हाला मिळावा या उद्देशाने निजामाला खताम करण्याखेरीज दुसरी कोणतीच योजना सापडली नाही. या प्रश्नावर आमची बरीच चर्चा झाली. व्यक्तिगत हिंसा करून काहीच यश मिळणार नाही ही तर खरीच गोष्ट. कारण, हा मला माहित आहे की रशियामध्ये अलक्जांडर जार सेकंड जेव्हा राजा होता तेव्हा येक नवयुवक येऊन त्याला खतम केला. खतम केल्यानंतर त्याचा मुलगा तख्तावर येऊन बसला. आणि जुलूम जबरदस्ती पहिल्याऊन जास्त सुरू झाला. तर व्यक्तिगत हिंसा करण्याकडून आपला राजनैतिक उद्देश सफल होत नाही याची मला जाणीव होती. जो पर्यन्त एक आंदोलन, संघर्ष करण्याचा लढा देण्याचा प्रेत्न जनतेमध्ये जबर येणार नाहीतवर व्यक्तिगत हिंसा करून काहीच यश मिळणार नाही. त्यामुळे हा प्रयत्न करून राजनैतिक दृष्ट्या फार मोठे यश मिळेल अशी आम्हाला मुळीच खात्री नव्हती.

आम्ही खूप विचार केला आणि निर्णय झाला की हे कार्य केलाच पाहिजे. आणि आमच्या या रेव्हयुलिशनरी ग्रूपने हे काम हाती घेतले. आमचा उद्देश असा होश की, निजाम खतम झाल्यावर त्याची दोन मुले गद्दीसाठी भांडणार. आणि एक ना एक पार्टी हिंदुस्तान सरकारची मदत मागेल. निजामाचे त्यावेळी दोघे मुलगे होते : एक आजमजा व दुसरा मोजामजा. त्यांच्या आपसामध्ये देखील वैमनस्य फूट होती. आणि दोघेही मिळून ती जशी मोगलपरंपरा आहे त्यांची गादीची की बापाला खतम करा आणि गादी घ्या. त्याप्रमाणे या निजामालाही, मीर उस्मानअलीखान यालाही एक-दोनवेळा विष देण्याचा प्रयत्न या मुलांकडून झाला होता असं आमच्या एकविण्यात होतं. त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही परंतु त्यांचं उद्दिष्ट स्पष्ट होतं. बाप खतम झाला की या दोघाचं गद्दीसाठी भांडणं होणार हे निश्चित होतं. आणि एक न एक पार्टी पटेलसाहेबाकडे, त्यावेळचे होममिनिस्टर हिंदुस्तान सरकारचे यांच्याकडे मदत मागेल हे निश्चित होतं. अशा कारणानं दिल्ली सरकारला येथील प्रश्नात दखल देण्याची संधी मिळेल.

अनुक्रमणिका

इतिहासचा पुरावाही त्याला आहेच. निजामुल्मुल्क आसफजा अव्वल म्हणजे येथले संस्थापक पहिला निजाम ज्यावेळेस वारले त्याला संतान नव्हते. मूल बाळ नव्हते. एक भावाचा मुलगा मुजफ्फरजंग आणि एक बहिणीचा मुलगा नासरजंग होता. मुजफरजंग आणि नासरजंग यांच्यामध्ये युद्ध शुरू झाले. गादीसाठी. मुजफरजंग फ्रेंच लोकांची मदत मागितला आणि हे नासरजंग ब्रिटिश लोकांची. फ्रेंच आणि ब्रिटिश सेना यांच्यामध्ये युद्ध झाले. त्यामध्ये फ्रेंच हरले आणि ब्रिटिश विजयी झाले. तेव्हापासून ब्रिटिश सरकारचा पक्का टप्पा येथे बसला. नासरजंग ब्रिटिशांच्या हातचे बाहुले होते. राजकाज सारे ब्रिटिश चालवीत. तेव्हापासून ब्रिटिशांचा पाया या देशात मजबूत झाला. नासरजंगाच्या द्वारे समजा ना.

तसंच आम्हाला वाटलं हे दोघा मुलात भांडण होईल आणि हिसट्री रिपिटस् म्हणतात तसं या दोघात एक न एक दिवस अशी परिस्थिती येईल. समजा या दोघा भावात आजमजा आणि मोजमजा यांच्यात भांडण नच झालं एकी झाली तर परिणाम हे होईल की रजाकार लोक निजाम खतम झाला म्हणून हिंदू लोकांवर अत्याचार करतील. हजारो लोक मारले जातील. परंतु पहले पहले तर आमच्यावर फारच हल्ले होतील आणि कुरबानी होईल. पण नंतर मात्र सरदार पटेल उगं बसणार नाहीत. आम्हाला हा विश्वास होता. इथं हिंदू लोक मारले गेले म्हणजे हिंदुस्तानच्या इतर भागात मुसलमानांचं संरक्षण होणं कठीण होईल. निजामाच्या राज्यात हिंदू लोकांवर हल्ला झाला म्हणून इतरत्र असलेले मुसलमान वाचविण्याकरिता सरदार पटेल या भागात शांतिसेना जरूर पाठवतील. सरदार पटेलांकडून काही ना काही हस्तक्षेप होईल म्हणून आम्हाला विश्वास होता.

समजा कोणत्या कारणानं हे काँग्रेस गवरमेंट आपली सेना न पाठविले तरी आम्हाला हा विश्वास होता की, इथले लोक आणि आमचे वालेंटीर बॉर्डरवर आपला मिलिशिया जमवून लढा देण्याकरिता तय्यार होतील. महाराष्ट्र साइडकडून, मध्यप्रदेश, मद्रास, बंगलोर मिलिशिया म्हणजे जनताचे वालेंटियर चारीकडून निजामाचा बदला घेण्याकरिता, निजामस्टेट भारतात विलीन करण्याकरिता पुढे येतील आणि अंतिम विजय आपली होईल असा आमचा विश्वास होता. आता स्वतंत्रता पाहिजे म्हणजे बलिदान हे करायलाच पाहिजे. कोणी म्हणतील आमच्या पोरपणामुळं एवढ्या लोकांचा जीव गेला तर त्याचं समाधान काय? पंधरा-वीस दिवस आम्ही याच गोंधळात सापडलो होती. तर काय झालं मला अेक पुस्तक मिळालं होतं. सुभाषचंद्रबोस यांच्या संबंधीचं. त्यात आजाद हिंद फौज आणि मलाया सिंगापूरकडे जे हिंदी लोक होते त्यांच्यापुढे नेताजींनी व्याख्यान दिलं होतं. त्यात एक व्याख्यान असं होतं : तुम हमको खून दो, मैं आजादी दूंगा. तुम्ही त्याग आणि बलिदान केलात तरच तुम्हाला आजादी मिळणार.

तर काही लोक असं म्हणतील की बहोतसे लोकां मर गये ये क्या बचपना है. असं जर म्हणाले तर माझं अेक प्रश्न त्यांना राहील : की जर त्यांना स्वतंत्रता आजादी पाहिजे? जे म्हणाले आम्हाला स्वतंत्रता कशाला? निजामशाहीच बरी. त्यांच्याशी आम्हाला बोलणं नाही. पण जे म्हणतील नाही आम्हाला आजादी पाहिजे, जनताचे नुमायंदे चुनून जायला पाहिजे, आम्हाला स्वराज्य मिळायला पाहिजे, स्वामी रामानंद जसं म्हणत होते: जोपर्यन्त हैदराबादची आजादी होत नाही तोपर्यन्त भारताची स्वतंत्रता अधूरी आहे. भारताच्या पोटात हैदराबाद हे नासरू आहे ते बरोबर होते. म्हणून ज्या लोकांना हे म्हणनं होतं निजामशाही गेली पाहिजे, स्वतंत्रता पाहिजे मग त्यांना आमची विनंति राहील की बाबा, जव्हा करिता तुम्हाला हे पाहिजे तर त्याकरिता

अनुक्रमणिका

तुम्हाला काही तरी केलं पाहिजे. काही लोक मरतील. पण, पिढ्यान्‌पिढ्या तुम्ही स्वतंत्र रहाल. जे संतान आहे ते स्वतंत्र भारतात जातील. पुढं त्यांची उन्नती होईल. म्हणून या उद्देशाने आम्ही हे कार्य केलं. ठीक आहे हे लोक जे आधी मारले जातील त्याच्या आधी आम्ही मारले जाऊ.

म्हणून आम्ही पुढच्या तयारीला लागलो. आम्हाला हत्यार पाहिजे होते. बॉंब पाहिजे होते. आम्ही सोलापूरला गेलो. आम्हाला बॉंब आणावयाचे होते ते बॉंब जे आहेत हॅंडग्रेनेड अमेरिकन मिलिटरीचे ते ब्लॅकमार्केटमध्ये गोव्याचे लोक आणून देत होते. मुंबईला एक गुजराती साहेब होते ते त्यांच्याकडून ते विकत घेत होते. ते त्यांच्याकडून विकत घेऊन आम्हाला सप्लाय करीत असत. दीड-दिडशे रूपयाला एक एक बॉंब मिळायचा... सोलापूरला त्यावेळी कोंडा लक्ष्मण आमचे गालय्या, पं. विश्वनाथ आणि आर्यसमाजचे कार्यकर्ते राजपाल रहात असत. तर राजपालकडे जाऊन आपण काही ना काही तरी बॉंब घेऊन यावं म्हणून आम्ही ठरविलं. त्यांना उद्देश काही सांगू नये की आम्हाला निजामावर हल्ला करावयाचा आहे. उद्देश हेच सांगायचा की, आमच्या वस्तीवर हल्ला होण्याची शक्यता आहे. म्हणून आमच्याकडे जर बॉंब असतील तर आम्ही मुकाबला करू शकू. कारण, लालदरवाजा दूदबावली या भागावर रजाकाराचे हल्ले झाले होते. देशी बॉंब वापरून त्या लोकांनी मुकाबला केले होते. तेव्हापासून ‘अरे, येलोग बंब फेकते हैं, नही जाना उधर’ म्हणून लालदरवाजाचे हल्ले बंद झाले होते. त्यामध्ये दोघे तिघे मुसलमान मारले गेले होते. प्रत्येक महिल्यामध्ये बॉंब ठेवून वेळ पडली तर त्यांच्यावर हल्ला करता येईल, आपली रक्षा करता येईल एवढाच उद्देश त्यांना सांगायचा.

राजपाल आणि कोंडालक्ष्मण यानाही आम्ही हेच सांगितलं. तेच म्हणाले एवढा मोठा काम जीव धोक्यात घालून तुम्ही करणार आहात तर यापेक्षा आणखी मोठा काम का नाही करीत? तेच सांगितलं : तुम्ही जर आपल्या महिल्यावर हल्ला झाला तरच मुकाबला करणार त्यापेक्षा अजुक एक मोठं काम करा. बरं म्हटलं. सांगा. ते स्वतःच म्हणाले, राजपाल आणि कोंडालक्ष्मण. ते स्वता या प्रयत्नात होते. जर ज्या दिवशी कोंडा लक्ष्मण आणि राजपाल यांनी आम्हाला हे सांगितलं तो आमच्या आयुष्यात फार आनंदाचा दिवस होता. आमच्यासारखे विचार करणारे दुसरे आम्हाला सापडले म्हणून आम्हाला फार आनंद झाला.

फारच चांगलं झालं. आम्ही म्हणालो साहेब, आम्ही याच कामाकरिता निघालो आहोत. पाहिजे म्हणून तुम्हाला आम्ही हे सांगितलं नाही. तुमचा आमचा उद्देश एकच बाहेर आहे तर आम्हाला साह्य करा. त्यांनी तिथल्या तिथं चंदा जमा करून सहाशे रूपये आणि विषाची वाटली आणून दिले. पुढे आम्ही मुंबईला जाऊन येण्याचा खर्च या पैशात झाला. पण, केवळ त्यांच्या मदतीवर आम्ही गेलो नाहीत. तर आमचे बालकिशन म्हणून जे मित्र होते त्यांनी **आम्हाला जाण्या-येण्याकरिता पैशे पाहिजे म्हणून आपल्या बायकोवरचे दागदागिने विकून तीनशे रूपये आणून दिले होते**. त्यावेळी ते पैसे घेऊन आम्ही सोलापूरला गेलो होतो. आम्हाला एक बॉंब मिळाला होता. तो जर नाकाम झाला तर आम्हाला अजू एक बॉंब पाहिजे होता. तर कोंडा लक्ष्मण यांच्याकडून मदत वगैरे घेऊन तीन बॉंब आणले. दोन रिव्हालव्हर्स घेतले. बस्तीवर हल्ला वगैरे झाला तर मुकाबला करता यावा म्हणून काही बॉंब सप्लाय झाले होते. त्यातला एक आम्हाला मिळाला होता. आता ही तीन बॉंब घेतले आगोदरचा एक असे चार बॉंब आम्ही गोळा केले.

इकडे हैदराबादला येऊन आम्ही तय्यारी करू लागलो. कोणता रस्ता चांगला आहे, कोणती जागा ठीक आहे वगैरे पाहून नंतर निर्णय दिला की बाहेरच्या दुसऱ्या जागा वगैरे काही नाही. निजामच्या किंगकोठीची जी गल्ली आहे त्या गल्लीमध्येच आक्रमण केले पाहिजे. पहिल्या नंबरवर मी होतो आल्सेंट्सच्या मार्गावर. आमचे मित्र गंगाराम हे वेल्स्ले हायस्कूलच्या गल्लीजवळ. दुसरा मित्र जगदीश बोगलकुंट्याला जी गल्ली जाते तिथं तोंडावर उभे होते.

निर्णय हा होता की, हल्ला केल्यानंतर निजामाची कार पुढं आली की नंबर दोन गंगाराम यांनी आपलं हत्यार चालवावं. त्यानंतर ही कार्य झालं नाही तर आणखी तिसरं हत्यार वापरावं. जर कोण्या कारणानं मोटार यांच्यापर्यंत नच गेली तर, किंवा तिथंच थांबली, परत गेली तरी ते परत येऊन आपले हत्यार वापरलेच पाहिजे. निजाम ठार झाल्यानंतरच आम्ही निघून जायला पाहिजे. इतक्यावर निजाम खतम नच झाला तर आणि कोणी धरायला आले तर आणखी एक बॉंब आपल्यावर टाकून काही लोकांना घेऊन आपण मरून गेलं पाहिजे. तर आमच्याकडे विषाची एक एक वाटली होती. प्रसंग पडल्यास ते विष पिऊन खतम् झालं पाहिजे. म्हणजे परत जाण्याचा काही विचारच येऊ द्यावयाचा नाही. कारण हे आमच्या दृष्टीनं फारच महत्त्वाचे कार्य होते. आणि एका दृष्टीने ज्या अर्थी आपण एका माणसाचा प्राण घेत आहोत तर आपण पहिलं बलिदान द्यावयास पाहिजे. परत जाण्याचा सवालच नाही म्हणून या धोरणाने आम्ही हे काम केलो.

४ डिसेंबर, १९४७ रोजी तिसऱ्या पाआरी मी गंगाराम आणि जगदीश या कामावर निघालो. माझ्याकरिता गंगारामने एक सैकल टॅक्सी आणली होती. ती मी ऑल्सेंट्स हायस्कूलच्या पटांगनात सोडली. आणि किंगकोठीकडे जरा वेगातच जाऊ लागलो. ऑल्सेंट्सजवळ एक पोलीस पहारेकरी होता मोटारवर हल्ला करण्याकरिता मी किंगकोठीकडे जाऊ लागलो तेव्हा ते माझा पाठलाग शुरू केला. त्याच्यापासून मी दहा पावलावर असतानाच मी मोटारीवर पहला बॉंब टाकला. निशाना बराबर लागला नाही. मोटारच्यामधी पडायच्या बदली तो दरवाजावर लागून काचेच्या जवळ रस्त्यावर विस्फोट झाला; बॉंबचा दुसरा बॉंब मी खिशातून काढत होतो तेव्हाच त्या पहारेकऱ्यानं माझा हात धरला. निजामची गाडी निघून गेली. पुढं ब्रेक घातला कोण? ड्रायव्हर. सवारी गेली नाही. तरी पण आमचा निर्णय ठाम होता. दोघं परत आलं पाहिजे. पण, तसं झालं नाही. ते बॉंबचा विस्फोट एकून ते समजले की की निजाम खतम झाला. ते निघून गेले.मी तिथल्या तिथं धरल्या गेलो.

तिथं जे मुसलमान होते त्यांनी रस्त्यावर येऊन कोणी दगडांनी कोणी बुटांनी, कोणी नालांनी मारझोड शुरू केली. सर्व रक्तप्रवाह झाला होता. सगळे मार म्हणजे तोंडावर, डोक्यावर. कोट-पाटलून फाटून गेला. त्यावेळेस बहादुर- खान एक सर्जन रहात होते. हकीम नांरायनदासच्या समोर. त्यांच्या घरचा पहरेकरी चाऊंस हे गडबड ऐकून भाला घेऊन आला. भाला उगारून माझ्या पाठीत वार करणार होता. इतक्यात एक ख्रिश्चन सब्इन्स्पेक्टर होता त्यानं हात धरून सांगला. आताच मारू नका जिवंत राहू द्या. अजून दहा-बारा लोक असतील त्यांना घेतल्यावर मग याला खतम करा बरेच लोक मारहाण केले. इतक्यात पोलीस चौकी अबिडशाप मधले सब्इन्स्पेक्टर आले. जवान आले. त्यांनी पब्लिकला मागं सारून मला ताब्यात घेतले. आणि तिथंच किंगकोठीच्या समोर पोलीस चौकी होती तिथं मंला चौकशीसाठी नेलं.

अनुक्रमणिका

मी बेहोशीचा बहाना केला. इतक्यात पोलीस व्हॅन आलं. आणि रिझर्व पोलीसांनी मला पोलीस कमिशनरच्या ऑफिसमध्ये नेलं. तिथं लॉकअपमध्ये ठेवलं. तिथं बरीच मारहाण केले तीन-चार दिवस. तोंडावर थुंकणं, शिवीगाळ चालूच होतं. एक जन पाणी मागलं तर पिशाब करू लागला. पिशाब करणार इतक्यात लायकअली प्राइममिनिस्टर निजामचा तिथं आला. म्हणून ते तिथंच थांबलं. परंतु चार दिवस तरी ते रूळाचे दंडे घेऊन जॉइंटवर मारहाण केले. दात पडून गेले. चमडे समदे निघून गेले. तीन-चार दिवस झोपी जाऊ दिलं नाही. कशा करता तर तुझं नाव काय, कोण कोण आहेत तुझ्यासंग ते सांगं.

जर आम्ही जिवंत सापडलो आणि विष खाण्याची संधी नाही मिळाली तर नाव काय सांगायचं हे आगोदरच आम्ही प्लॅन केलं होतं. आणि धरल्या जाऊन कोर्टामध्ये केस गेली तर काय बयान कोर्टात द्यायचं याचा पण आम्ही विचार. केला होता. पोलीस कस्टडीत मारहाण चालू असताना इकडं पोलीस दुसऱ्या साथीच्या शोधात होतं. ऑलसेंटस्च्या मैदानांत मी जे सैकल टॅक्सी सोडलं होतं तेचेवर दुकानचं नाव होतं पोलीस ते दुकानात जाऊन आमचे मित्र जे गंगाराम त्यांच्या खेड्यात जाऊन तेना अरेस्ट केलं. असे या केसमधे आम्ही दोघे अरेस्ट झालो. तीन दिवस मारहाण झाली तरी स्वताचं देखील नाव सांगितल नाही. नाव काय तर बाबू. तर ते विचारीत की तू बाबूलाल आहेस की बाबूखान? मी फक्त सांगत असे की मी फक्त बाबू आहे. आणि ज्यावेळेस ते नाक्यावर बसविले होते ते मीर लायकअली जे निजामच प्राइम मिनिस्टर होते ते आले. मी बेहोशीचा बहांना करीत होतो. तो मला म्हणाला क्या तू महाजिर है?

ते समजत होते की इथल्या हिंदू नवजवानामध्ये काही जोशच नाही. तर हे जे निर्वासित आहेत त्यांच्याकडून किंवा निजामाच्या नातेवाइकाकडून या नवजवान मुलाला काही हजार रुपये रुश्वत देऊन ते निजामावर हल्ला करण्यासाठी तय्यार केले असेल. नंतर ते मला हेडक्वाटर्समध्ये घेऊन गेले. तेथे बरीच विचारपूस झाली. मी म्हणालो बाबा, मी फक्त बाबू आहे. मग ते कपडे वगैरे काढून खतना आहे की नाही ते पाहून घेतले. खतना नाही. ये हिंदू है मादरचोद. मग बरीच मारपीट झाली. झोपी जाऊ न देता बरीच मारपीट केले. आम्हाला पाहायाला बरीच पब्लिक येत असे. ते पब्लिक कडून पोलिसांना बरीच माहिती मिळाली.

तर आमचा मोकद्दमा बरेच दिवस चालला. आम्ही दोघांनी बॉंब टाकला साजिश केली हे कबूल केलं. आमची इच्छा नसताना जबरदस्तीनं आमच्यासाठी वकील मुक्करर केला. आम्हाला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. पण, अपीलची मुदत जाण्या आगोदर पोलीस ॲक्शन झालं. मिलिटरी गव्हर्नरनं आमची फाशीची सजा जन्मठेपेत तबदिल केलं. आम्ही तुरूंगात एक वर्ष अकरा महिने होतो. ४ डिसेंबर, १९४७ ला ही घटना झाली आणि १३ सप्टेंबर १९४८ ला पोलीस ॲक्शन झालं. निजाम शरण आला. त्यानंतर देखील आम्ही जवळ जवळ अकरा महिने जेलमध्ये होतो. १९ ऑगस्ट १९४९ या दिवशी आम्हाला बिनशर्त सोडून देण्यात आलं.

आम्हाला मुक्त कसं करण्यात आलं याची सुद्धा एक कथा आहे. कॉंग्रेसचे पुढारी म्हणत होते हे हिंसा आहे. आणि आमचा मार्ग अहिंसेचा आहे. त्यामुळे आम्हाला सोडण्याकरिता त्यांना बराच विचार पडला. तरी पण पब्लिकमध्ये आमच्या करिता बरीच सहानुभूती होती. म्हणून जिथं जिथं स्वामी रामानंदतीर्थ अगर दिगंबरराव बिंदू जात तिथं तिथं नवजवान लोक आणि ग्रामीण जनता ज्याना रजाकारी अत्याचाराचा अनुभव होता ते त्यांचं लेक्चर होण्यापूर्वी विचारीत हे दोघे सुटणार कधी? आगोदर ते सांगा आम्हाला. जिल्ह्यामध्ये

अनुक्रमणिका

म्हणा, तालुक्यामध्ये म्हणा अशी मागणी पब्लिक करीत. सुलतानबाजारामध्ये सुद्धा हडताल करीत होते. फारच आंदोलन झालं होतं. त्यावेळेस हे मिलिटरी गव्हमेंट नव्हतं. हे बखलेसाहेब होते.

इन्स्पेक्टर जनरलप्रिझन्स यांनी हैदराबाद सेंट्रल जेल चंचलगुडाच्या मोहतमीम यास पत्र पाठविले की आमच्याकडून एक माफीनामा लेहून घ्या. म्हणजे आम्हाला सोडण्यात येईल. मोहतमीम जेल आले आणि आम्हाला म्हणाले तुम्ही माफीनामा लेहून द्या. तुम्हाला सोडण्यात येईल. आम्ही म्हटलं आम्ही माफीनामा देणार नाही. लेहून द्या म्हणाले. तर लेहून देलं.तर मग पेच पडला कसं सोडायचं यांना. मग त्यांनी काय केलं आमचे म्हातारे वडील आणि गंगारामची आई यांना कळंविलं माफीनामा द्या म्हणून. आम्ही कळविलं आमच्याकरिता माफीनामा द्या नको म्हणून. या म्हाताऱ्यांनी साथ देली आम्हाला आणि सांगितलं : ठीक आहे, आम्ही माफीनामा नाही लेहून देणार. तर नरेंद्रजी आणि स्वामी रामानंदतीर्थ आमच्या वडिलांना आणि गंगारामच्या आईला बलवून घेतले. ते म्हणाले माफीनामा काही लेहून देऊ नका आमची पण इच्छा नाही तुम्ही माफीनामा द्यावा अशी. तर इतकंच लिहा की आमचा मुलगा जेलात आहे. त्याला सोडा. हे चूक झालं, माफ करा, वगैरे काहीच नाही. तसं लेहून देण्यात आलं : गंगारामच्या आईकडून आणि माझ्या वडिलांकडून. आणि आमची सुटका झाली. बिना काही शर्त लावता. जनतेनं आमची सुटका केली म्हणा ना.

तर आम्ही आमच्या कामात नाकाम झालो. परंतु उद्देश सफल झाला. कारण त्याच्याकरिता जगामध्ये जी पब्लिसिटी झाली. अमेरीकन पेपरमध्ये तर प्रसिद्ध झालं की जगातल्या सर्वाधिक श्रीमंत माणसाला त्याच्याच प्रजाजनानं बॉंब टाकला. त्याची जनता त्यानं राज्य करावं म्हणून मान्य नाही. म्हणून हे राज्य खतम व्हावं या करिता त्याचीच प्रजा त्याच्यावर आक्रमण केलं. हा उद्देश सफल झाला की इथली बहुसंख्य जनता हिला हा राज्य नको आहे. हा धारणा सगळ्या जगाला मान्य झाला. आणि त्यानंतर येथील नवजवान लोकांचं प्रस्थान वाढलं. आणि बॉर्डरवर आमचे जे स्वयंसेवक होते त्यांचं संघर्ष ठिकठिकाणी वाढलं.

### २. श्री. शंकरराव गायकवाड

शंकरराव गायकवाड मन्तेत मला. वयाला झाली पाऊनशे वर्स. आजा तुकाराम पडदादा सकाराम. आमी हे जे दानसे वर्सापासून आमी या जिमिनीवरे टिकून हाव. पूर्वी आमचे जे वडील होते ते मुलाजिम होते. निजामाच्या कालात. आमी पन मुलाजिमच सर्फेखासमदे. त्या जमान्यात निजामानं आमाला ये जिमिन देल. तित्तून ये घरं बांदून घेतलंय्. तीस-चालीस घरामदे थोडे धनगराचे, थोडे जोशाचे थोडे आमी मराट्याचे. आमचे वाडवडील तिक्कून परभनीऊन आले. दिनकरराव या नावाचे सरदार होते. ते आपल्या काफिल्याचं साथ इथं आले. त्यांची समादी इतं हाय. त्यांचं नावनं आमी भजन करतो. भजनात सांगलाय्. :

कार्तिक मास बुधवार दूज दिन चार घडिका शुमार
दिनकरराव वैकुंठ सिधारे छोड जगत संसार

संवते १८८२ ला दिनकरराव मयत झाले. हमी त्यांच्या कुलातले. दिनकरराव लस्कराच्या कामाला होते. आमची घरं गडीवानी आहेत. येक्या कोन्त्या तरी घरात गेलं की भाइर रस्त्यावरे न येता सऱ्या घरामंदी जा येतं.

सऱ्या सनाला, कार्याला मान दिनकररावाचा. ते आमचं मूळ पुरुष. कोन्ता पन सन यो : लगीन असो, कार्य असो पैले समादीचं दर्शन., पूजा, बाद कार्य. होलीला बी पैले समादीची पूजा, भजन होतं. मग मंडळी रंग खेळतात.

हमचे वडील सरकारी मुलाजिम होते. त्यांनी आमाला मऱ्हाटी शिक्षन ऱ्हाइ देलं. थोडं उर्दू, थोडं फारसी शिकलो. पुडं लगीन झालं तरी बी मऱ्हाटी येयाचं ऱ्हाइ. कोनी सोयरे धाइरे आले तरी बी अरे भाइ, खाना खाये क्या? असंच पुसायचं. ये पोलीस ॲक्शन झालं. तव्वापुन लोक नावं ठिवा लागले : अरे, असं कसं? मराटे तुमी, तुमा मऱ्हाटी बोलाया येइना. तव्वा कुटं आमी थोडं थोडं मऱ्हाटी बोलाया लागलो. अदुगर सारा येव्हार उर्दूचाच. बामनी भास आमी नजाकतनं घेतली. पैले आमी आमच्या मायला आई मनत नजतो. माय, अम्मा असं मनायचं. आता नजाकत शुरू झाली मायची आई झाली. बरं, आई तर आई. आमी मायच्या मायला आई मनायचे.

इतं जोशीवाडा हाय. विजापूर मऱ्हाटे हायतं. तेबी मराटे. पन तेंच्या आमच्या बोलीत फरक हाय. काय पकवलंस तू असं बोलतात ते. आमचे सोयरे-धायरे सरे हैदराबादलाच. मऱ्हाटवाडीशी आता आमचा समंद उरला ऱ्हाइ. प्रतापचे बाप आमचे म्हेउने. ये त्याचं आत्तचं घर. आमाला मूल बाळ नाइ. लानपनापसून आमी तेला लावून घेयावं. क्या करते मामूसाब? कहां जाते मामूसाब असं ते मनायचं. येल उर्दू येयाचं नाइ. लान होतं. तव्वा निजामाची सवारी येत. ये बरोबर असायचं. पोलीस हट जाव मनायचं येबी हट जाव मनाचं. हसायचे भवतालचे. येनं घरी येवावं, इत्तच जोपावं असं चाललं. शालीबंड्याला आमी सात वर्स होतो. तव्वापुन आमची भास बदलली.

दसरा, दिवाली, तिलसंक्रांत, होली हे आमचे सन. तुलजापूरची अंबाबाई आमचं कुलदैवत. तुलजापूरला कदी जानं झालं नाइ. वडिलांनी करून ठेवलेल्या चांदीच्या मूर्ती आहेत. पूजा करतो. पन तुलजापूर अजून पाइलं नाइ. नऊ दीस नवरात्र करतो. दहावे दीसी चालले सिलंगनाला. घोडेबिडे आता काइ नाइ. देवलात जातो. पूर्व तल्यात हनुमंताचं देऊळ असं. तितं रावन जालायचे. तित्तून घरी यायाचे. आता सारे देवलात जमा होतात. झाड हाय तितं पोरं चडून सोनं रूपं काडतात. कुप्पे लावतात. तितंच भेटतो. घरला आले भेट होत नाइ. त्याच्या करिता देवलात भेटून जातो. मग कुनीकडं जाइना, मुलाखती तितंच होतात.

मुसलमानाचा त्या काळात लइ तरास नवता दसरा मोहरम एक आलं की तरास व्हायाचा. बाजा बजवायचा नाइ. तीन-चार गश्त्या काडल्या होत्या सरकारनं. ते मनायचं, यहां मुसलमान रियासत है. सख्तीके साथ पाबंदी की जाय. सगळं सरकार त्याचं. आमी सरकारचं नमक खातं, सारं करीत होतो. का कराचं? मऱ्हाट्यावर मुसलमानाचा लइ डोळा. त्याहीला कुनी कुनी बनवून सांगायचं : मऱ्हेटे बडे खराब ऱ्हातेत, लडे सो हैं, हुकूमत चलाये सो हैं. तव्वा येक सर्क्यूलर काडलं होतं. सिवाजी जयंती कराची नाई. सिवाजीचं नाव घ्याची चोरी होती. उस्मानअलीखानानं सिवाजीच्या नावावर पाबंदी घातली सरकारी मुलाजिमानं सिवाजीचं नाव घेवावं नाई. सिवाजीचं गुरू दादोजी कोंडदेव त्यानं काय शिक्षन देलं कुना ठाव. जितं गेलं तितं हर हर मादेव बोलायचं. काबीज करायचं. मनुनु मराटी ब्रामनावर पन लइ राग. ते मनायचे :

मऱ्हेटे बंद हतियार : क्या मिले घरमें तो एक तल्वार.

अनुक्रमणिका

## ३. पार्वतीबाई गायकवाड

[सुमारे सत्तर वर्षे वयाच्या सौ. पार्वतीबाई गायकवाड या श्री. शंकरराव गायकवाड यांच्या पत्नि, सासर-माहेर गावातच. फरक एवढाच की माहेरी शालिबंड्याला सभोवतालचे वातावरण ब्रह्मणी आणि सरदारी थाटाचे. अनेक बऱ्या घराण्यात ये-जा असल्या कारणाने भाषेवर संस्कार निराळे झालेले. लग्नसमारंभाचं वर्णन करण्याची त्यांना विनंती केली असता त्यांनी पुढील माहिती दिली :]

नवरा मांडवात आल्यावर घोड्याला ओवाळणी करायची. घोड्याला पाणी घालायचं. मग नवरा मांडवात यायचा. मग ब्रामनानं मंगलाष्टक मनायचं. हळद नवरा करायच्या आगोदर असते. हळद यथाशक्ती असते. कोणी पाच दिवस हळद लावून नवरा ठिवतं. आजकाल सकाळी हळद की लागलीच लग्न. आमच्या दिवसात पाचा दिवसाची हळद. तित्तून पाच दीस लगन. लगनानंतर पाचा दिवसाला वरात. वरात झाल्यावर पाचादिवसाला गावजेवन, नंतर पाचा दिवसाला मांडवपरतनी. आता कशाचं आलं सगळ? सरं झटपट.

देवक बसताना देवाची पूजा वगैरा करून एक पाच सवाष्णी मांडवात बोलावून गानं मनून देवाची स्थापना करायची. : :

बसई बसई देवका : बसई वसई देवका :

अंबू कुसं राय कुसं जंबूकुसं सौंदडी : नाव घातलं सोनेरी हिरवी पाटावू करंजा
काळी कनिक तांदूळ : त्याची केलीया शिदोरी : देवक्या दादाच्या पदरी :

देवक्या चालला डोंगरी : देवक्या चालला डोंगरी

असं वाजत गाजतं : त्यानं प्रिथिमी लवतं

सूर्व्याच्या घरी काजवं : सूर्व्याच्या घरी काजवं. आलंय् प्रिथिमीचं राजं आलं
अंबु पुसतं जंबूला : जातं कुनाच्या वाड्याला : सूर्व्याच्या घरी काजवं :
आलं प्रिथिमीचं राजं : आलं प्रिथिमीचं राजं :

अनुक्रमणिका

## हैदराबाद शहरात स्थायी झालेली अरे घराणी

### ४. शेलार श्रीमती बाबूभाई

माजं नाव बालूबाई सेलाऱ्यांचे. वयसु असंल सात दहा. मन्जे नदी आलं तम्मा पोटात होते मन्तेत. माज्या माईचं माहियेर तिकडं गावाकडे परकाल तालुक्यात. अरेपल्लीकडं कुडा आमची मानसं हातं. ही सून धवल्यांची करून घेंटली. ही नात. लेन्काची लेन्की. लेन्कु काय की नवकरी करितं. कुट्टं करितं ठाव कुना बाबा. डोले गेलं. धा वर्स जालं. गावाकडूं, जाया न्हाइ. याया न्हाइ. दाल्ला गेला. सरं गेलं. लेन्की नवरा मरून गेलं ती बी इत्तंच आलीया. अन्ता इत्तंच ऱ्हानं, इत्तंचु, बसनं, दोगी लेन्की. दुसऱ्या लेन्कीचा दाल्ला बसडिपूत हाय ते बी इत्तंच. माजं माहियेर काय की भुस्साऱ्यांच. सूनु काय की माहियेर धवल्यांचं.

### ५. धवले (ढवळे)

आमचं नाव बाबूराव धवल्यांचे. इत्तं हमी तीन पिडीपासून हाव. मऱ्हाटी तुमच्यावनी साफ बोलाया जमत न्हाइ. आमचं मऱ्हाटी अच्चं मऱ्हाटी. आमचं पूर्व कुट्टून आले काय आले ठावं न्हाइ. दादा मिलिटरीत होते. तव्वा निजामाचा काल. सासुरडी काय की निजामाबाद. सिंदे त्यांचं घरचं नावू. आमी काय की धवले.

मराट मंडळ परचय होउनु धा वर्स जाली. तेलंगण अरे मराटा संगमु मीया डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंट. कोन्सा जागा न्हाइ तित्तं आपलं मानसं न्हाइ. आमचा संगम् वरे याला युनिटी न्हाई. दुसरे कोमपैकी बगा, मुन्नूर कापू बगा, मुस्लिम बगा. आमचं समोर कार्यक्रम न्हाई. ते असलं मन्जे काम चालत्तु. सद्या काम न्हाइ. मीटिंग घेतुम् जातुम्. स्कीम न्हाइ, काय न्हाइ. तव्वा काय काम बी न्हाइ. आदी सिटीत आपले लोक हातं ते म्हाइतं न्हाइतं. संक्राती-दसरासंमेलन मिलुनु घेतुम्. पनु काम बनत न्हाइ.

आमचं देव तुलजा भवानी. आमी तुलजापूरला गेलो न्हाइ. देवी कम्मा तरी तिकून आनली. मुख्य सनु दसरा नवरात्री करतुम्. आमचं गोत्र भारद्वाज.

### ६. सौ. ढवळे

माजं माहियेर निजामबाद. बापु रामचंद्रराउ सिंदे. पूर्व जिराती पाटील होते, आता सरपंच. लेन्की येकु नरसुबाई सेलाऱ्यांच्याकडे देली. आमी मोट सगळे सनु करतुम्. दसरा नवमी पूजा ऱ्हात. दिवाली बी करतुम्. पोल्याला बइलाला सजविते. पोल्या करते. नवमीची पूजा होतं. त्या दी दिवटी धरतं. माहियेरचं दैवत काय की बालाजी. आमचं काय की भवानी.

अनुक्रमणिका

### ७. **श्री. माधवराव गायकवाड**

[आंध्रप्रदेश मराठा मंडळ या संस्थेच्यावतीने दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी हैदराबाद येथे एक संमेलन भरत असते. १९७९ च्या दसऱ्याला संस्थेचे चिटणीस श्री माधवराव गायकवाड यांनी केलेल्या स्वागतपर भाषणाचा काही भाग पुढे देण्यात येत आहे. हे भाषण व्यासपीठावरून केलेले असल्याने आपल्या परीने प्रमाण भाषा योजण्याचे वक्त्याने केलेले प्रयत्न भाषणातील भाषेत दिसून येतील.]

"जगदंबे माता प्रसन्न. आदरणीय अध्यक्षमहोदय, बंधुभगिनींनो, आणि मातापित्यासमान आदरणीय बंधूनो, या सर्वांना माझा आदरपूर्वक व हृदयपूर्वक नमस्कार. या शुभप्रसंगी एकत्र जमा होऊन आपण आपला वार्षिक समारंभ दसरा साजरा करीत आहोत ही अभिमानाची गोष्ट आहे. लोकांनी आपला अमूल्य वेळ कहाडून या कार्यक्रमासाठी उपस्थित झाले यासाठी मी आंध्रप्रदेश मराठा मंडळ या संस्थेतर्फे आपणा सर्वांचे स्वागत करतो. त्या बरोबर या प्रसंगी चार शब्द बोलण्याचा मला अवकाश दिला याबद्दल मी आपला व या मंडळाचा फार फार आभारी आहे.

आपल्या सर्व तरूण बांधवाचा परिचय वाढावा, ओळख वाढावी, यूनिटी कायम रहावी या उद्देशाने हा कार्यक्रम गेल्यावर्षीपासून करीत आहोत. आपल्या आशीर्वादानं हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे की, आपण सर्व लहान थोर मंडळी आपला कार्यक्रम समजून हा कार्यक्रम यशस्वी करता. एकता आहे, संघटना आहे, आपूलकी आहे. आपण कोणतं कार्य करीत बसलो की आश्वासनपूर्वक सांगू इच्छितो की, मोठ्या जोराने करू शकतो. त्याच प्रमाणे सांगू इच्छितो की, मराठा मंडळ साहू कारवान आणि मराठा मंडळ शालिबंडा यांनी तन, मन, धनाने या कार्यक्रमास भाग घेउन साह्य केले. हा कार्यक्रम यशस्वी पाडलं या बद्दल आम्ही आभारी आहोत.

हे आता सिद्ध झालं आहे की आपल्यात एकी आहे. आपूलकी आहे. या येकीची शक्ती, या यूनिटीची शक्ती आपण काही चांगल्या कामासाठी उपयोगात आणली तर आम्हास आमच्या येणाऱ्या पिढीस फारच उपयोगकारक राहील असे मी समजतो."

### ८. **श्री. सुब्बराव मोरे**

[हैदराबाद शहर ही आंध्रप्रदेशाची राजधानी झाल्यापासून तेलंगणाच्या बाहेरचे बरेच मराठे उद्योग-धंद्याच्या निमित्ताने या शहरात स्थायी झाले आहेत. चित्तूर भागातील सुब्बराव मोरे, त्यांपैकीच. कडप्पा, कर्नूल चित्तूर, अनंतपूर आणि बल्लारी हे पाच जिल्हे रायलसीमा या नावाने ओळखले जातात. या पाचही जिल्ह्यात मराठी भाषिकांची वस्ती विपुल आहे. कित्येक घराणी शिवाजी महाराजांच्या दक्षिणदिग्विजयाच्या कालात या भागात आली आणि याच ठिकाणी स्थायी झाली. तेव्हापासून मूळ मराठी भाषिक प्रदेशाशी त्यांचे संबंध कधीच आले नाहीत. या भागाचे

सोयरपण बंगलोरला वस्ती करून असलेल्या मराठ्यांशी होत असते. या समाजाच्या भाषेवर आणि सांस्कृतिक परंपरांवर आंध्र आणि कर्नाटक या भागांतील भाषिक व सांस्कृतिक परंपरांचा बराच परिणाम झालेला आढळतो.]

मी सुब्बराव मोरे. मूळ गाव चित्तूर. चित्तुरान्तु वासु करितो. दोन वर्स जालं इत्तं आलो. सिक्स्टी टू लोनि डिपेन्सान्तु काम करूनु. सिक्स्टी सेवनलोकुडा डिपेन्सान्तु काम करूनु. आता इन्स्टिट्युट काम करूनु. तीन वर्स काम करूनु तम्मा सेवन्थ बटालियनला जॉइन आई. तिकन्नी भारत इलेक्ट्रिकललो ज्युनियर स्टेनोग्राफर सिलेक्ट होइ. मगु जातो घरू कन्स्ट्रक्ट करी जाती इन्स्टिट्यूट करी काम करीला.

आमी चित्तूरला कन्दीनु आलू मला कलंना. बापु जिरातु करीतु. पेशवा बाळाजी विश्वनाथ याचं बरोबरी पूर्व अलनु मनुनु. काकाकुडा खेतीबाडी करितु. मियां तानं लेन्करू जालंनं बापु मरूनु गेलं. भइनी दोनु. येकु भइनु कर्नूलला देलं. येकु हैदराबादला. हैदराबादला भइनु देलं ते पँवारू. आमचं आता बरं हा. का की घर लेनु मनल्यानु घर कन्स्ट्रक्ट केलं. बरं केलं मनुनु इन्स्टिटूट केलं. तुमचं आसीर्वादनं बरंच हाय. इन्का आस न्हाई. मला दोन दादलं पोरगं.

आमी संक्रांती करितुम् हिंदू फेस्टिवल सरे करित्तेतु. शस्त्रपूजा, मशीनपूजा करलेनु. बरं करूलेनु मनुजे विनायक चतुर्थी. खेतीबाडी करलेनु. संक्रांती बरं करलेनु. आमचं गोत्र श्रीवत्सु.

**९. सौ. सौंदरी मोरे**

नाव मजं सौंदरी. घरचं नावु मोहरे. अम्माचं कडप्पा. बापु पॅमारू. इकडचं काय की मोहरे. चित्तूरू. अम्माचं बाऊ ननंदु इत्तं ऱ्हातु उप्पुगुड्याला ऱ्हातं. आमी सनु दसरा करित्तु, दिवाली, संक्रांत कुडा करित्तु. उगादी करितातु. लेन्क होई तम्मा पालून्यात गालितातु. आमच्या घरान्तु गालित नाई. बावन येउनु नांवु टिवतं. मला गावाईना. गीतु आमच्यान्तु गात्याय कानी मला गावा ईना. आमचं वराड हुनु धा वर्सं जालं. दोन वर्सं येकु लेन्कु जाला. दोन वर्सं होउनु गेला मरुनु गेला. गर कंप्लीट होउनु दोन वर्सं जाला. पयले देड शंबर बाडं हुतं माहियेरचं वइनी, वइनीचं लेन्कु येत ऱ्हातं. आत्ता मी जावं. जानवरी मंदी जावं. तिच्या लेन्काचं नामकरन ऱ्हातं. ये मनुनु कागदु आलं. लेकीला संक्रांतीला बलविल्यात. गाँवामंदे संक्राती पार बेस करित्यातु.

**जोशीवाडा**

[जोशी हे आडनाव धारण करणारी एक ब्राह्मणेतर जमात हैदराबाद शहराच्या निरनिराळ्या भागात राहते. ही मंडळी ज्या ज्या भागात राहतात त्या भागाला जोशीवाडा हे समान्य नाव देण्यात येते. या जमातीत बरेच पोटभेदही आहेत. प्रत्येक पोटजमात स्वतःला उच्चकुलीन आणि इतर जमातीस हीन कुलातले लेखते. रस्त्यावर चार ज्योतिषाची पुस्तके घेऊन बसणारे आणि पादचाऱ्यांना त्यांचं भविष्य सांगण्याचा व्यवसाय करणारे जोशी याच जमातीचे. प्रातःकाली डमरूच्या घोषात

फिरणारे आणि लोकांना व कलियुगाला जागविणारे तेही जोशीच. दर शनिवारी तांब्याच्या तांब्यात तेल आणि शनिदेवाची प्रतिमा ठेवून दक्षिणा मागणारे जोशी याच जमातीतले. घरोघर फिरून जुन्या कपड्याच्या मोबदल्यात स्टीलची भांडी विकण्याचा व्यवसाय करणाऱ्या बोहारणी याच जोशीकुलातल्या, जुने कपडे रफू करून किंवा गोधड्या शिवून जुन्या बाजारात दुकान मांडणारे देखील या जोशांपैकीच. अगदी सूर्योदयाच्या सुमारास "अल्लं मुरब्बा" ही आरोळी देऊन आलेपाकाच्या वड्या विकणारे जोशी जमातीतलेच.

या सर्व जोशांची मातृभाषा मराठी आहे. निरनिराळ्या भाषिक प्रदेशात व्यवसायाच्या निमित्ताने फेरफटका करूनही या जमातीने आपली मराठी भाषा कायम ठेवली आहे. कारवान-अलमपूर भागातल्या जोशीवाड्यात घेण्यात आलेली एक मुलाखत पुढे देण्यात येत आहे. प्रश्न एकाच व्यक्तीला विचारले पण, मुलाखत मात्र सामूहिक झाली. कारण, उत्तरे अनेकांनी दिली.]

माजं नावं किशनराव. घरचं नाव बंडी. इत्तं जोशीवाड्यात ऱ्हातु. पैदाश इत्तल्लीच. इतं कोन आलं, कुट्टून आलं म्हाइत नाही. लई वर्स जाली. बाचा बा, पडदादा इतं आलं असंन. आमचा धंदा काय की अद्रकचा मुरब्बा इकायचा. जोशी मंडळीबिगर हे काम कोनी करीना. आमची बायका मानसं इस्टील बासनचा धंदा करते. कोनी कोनी पुरूष मानसबी इस्टीलचा धंदा करतो. हाइत ते मोटे धंदे करतात. न्हाइत ते अल्लम् मुरब्बा बेचतात. कुन्नी पुलीसमदे हाय, कुन्नी चौकीदार हाय. ल्हान धंदे करनारे बी हातं. गवरमेंटमद्दे बी कुन्नी कुन्नी हैत. दालमंडीत ऱ्हातेत ते आमचं नव्वं. सीताफलमंडीत ऱ्हातेत ते दुकानवाले, धनवंत पर कमजात अक्करमासे व्हावेत त्याहीनं. आमी थोरले, उच्च. आमी वारमासे.

आमचं देव माताजी : गावामंदी हाय. पोचम्मा हाय, तुकम्मा हाय, मल्लन्ना बी हाय. राजन्ना, नरसय्या हाय. कनकदुर्गम्मा लइकरून हाय. विजयवाड्याला कनकदुर्गम्माचं देवलं ऱ्हातं ते आमची माता. मराट लोक तितं पूजा बांदतात. आमचं बारा देवथान हैत. आमचं आमी देवपुडं बकरं मारून घेतं. कुंबडं पन मारतं.

आमचं लोक गुडंवा लइ पितं. तुजं रे माजं रे करतं. आमच्या आमच्यात लइ करतं. आमच्यात हिम्मत नाई. एक तर पैसा नाई, लीडर नाई. पंचलोक आमच्यात ऱ्हातात. तुजं रे माजं रे होतं तम्मा न्याव निवाडा करतात. माजी लेक दाल्ला सोलून पलून गेली. तिला पंचलोक धरून आनतात. पुसतात : कारे, करून घेतली नाई. ते मनतं : दाल्ला मले माराला, जालाला. अदला देइना, पोटाला देइना, मी करून घेतं दुसरा दाल्ला. तव्वा पंच पोराला पुसतं : कारे, करून घेइनं? पैसा खर्चून तिनं का करून घेववावं? ती मारून घेनारी नाई. का रे, लेकीच्या बापा, असं कसं जालं? दोगा दाल्ला-बायला करून घेतं, मी का मनतं? पंच का मनतं ते करतं. देक बा, पंच लोक ताकीद करून देतं. माय बापावानी करून घेतं. नाईतर देक. आये बाई दाल्ला-बायकूचं भंडन नु कुत्र्याचं भंडन सारकंच ऱ्हातं. तुमी रस्त्यावर नाई यावं. पुन्ना ताकिद देतं. काय रे लेकीच्या बापा, लेकाच्या बापा, ठाव जालं? म्या काय साँगू? तेला लई सांगलं. नक्को पेऊ रे. सतरादा सांगलं. ना याचं अइकिनं, ना याचं

वागनं. मुंडे हात, मुंडे घर सोडुनु गेलं. पंच लोग समजून सांगावा तेला पोरा, देक रे, पुन्ना भंडन आलं तर तिला वाटनी देउनु येगलं काडू जावा आता.

अस्सं हाय आमचूं लोक. तू रे मी रे मारून घेतं. दारू पेतं. येक शंबर घेतं. दारू पेतं. खराब करतं. बाइको येऊनु तोंड करतं. लेकरं बाळं येउनु बोंबलत बसतं. यानं धरनं, मारनं चालतं. जात आमची तेनं वर येइना. शालिबंडा आलीयाबाद इत्तं प्यूर आमची जात. गाड्यावर फळभाज्या इकतं ते आडजात. आडमासे. आमी मोडूमासे. शनवार तांब्याचा तांब्या घेउनु भिक्षा मागतात ते प्युर आमचं जात. दुसरे जोशी मननारे ते हलके, बारमासे नव्हत. आमी निखळ बारमासे.

**विजापुरी मराठा**

> [विजापुरी मराठा हा एक वेगळा समाज हैदराबाद शहरात संख्येने अल्प असला तरी लक्षात घेण्याजोगा आहे. ही मंडळी कर्नाटकातून या भागात आली असावी. मुळचे शहाण्णव कुळी असून सुद्धा इतर मराठे विजापुरी मराठ्यांना आपल्या बरोबरीचे मानित नाहीत. या समाजात मुली देताना किंवा या समाजातल्या मुली करताना इतर मराठा समाज बराच विचार करतो. अगदी शेजारीशेजारी राहून देखील या समाजाची बोली बरीच वेगळी वाटते.]

माजं नाव नागोजीराव जगताप. ऱ्हातो इतंच, अमलापुरी. आमाला विजापुरे का मनितं की आमी विजापुरीऊन आले मनुनु. विजापुरे आन मऱ्हाटे लइ फेर ऱ्हाइ. येकच. आमचंबी मुख्य देव तुळजापुरची आंबाबाई. दसरा मुख्य सन. खंडोबा हाय. सटीला रोटगा, खोबरं भंडारा ऱ्हातं. तळी उचलतं. खंडोबाची तळी. सोयरपन हैदराबादेत हाय. तिकडं कर्नूल, गदवाल,, इकडं पुनामंदी सुद्दा हाय. आमची भास थोडी वायली हाय. तुमी बोलता ते भास नाई. आमच्या खानदानमद्दे शेतीबाडी आता कोनी करून घेइनं. सरे नोकरी-चाकरीवाले.

∫∫∫

अनुक्रमणिका

## प्रमुख आधार ग्रंथ


१. उपाध्ये आदिनाथ नेमिनाथ (सं), उद्योतनसूरि विरचिता **कुवलयमाला**, बंबई, सिंधी जैन ग्रंथमाला, १९५९.

२. उपाध्ये आदिनाथ नेमिनाथ (सं), कोऊहल विरइया **लीलावई** णाम पाइय कहा, बंबई, सिधी जैनशास्त्र विद्यापीठ, भारतीय विद्याभवन, १९४९.

३. उपाध्याय बलदेव (सं.), वररुचिविरचितः **प्राकृतप्रकाश**; वाराणसी, संस्कृत विद्यालय, १९७२.

४. कर्वे इरावती, **हिंदूसमाज : एक अन्वयार्थ**, मुंबई, मौज प्रकाशन गृह, १९७५.

५. कुळकर्णी, सु. बा. **पोवारी बोली**, नागपूर, नागपूर विद्यापीठ प्रकाशन, १९७४.

६. कुळकर्णी, भीमराव, (सं), श्रीचक्रधर निरुपित **श्रीकृष्णचरित्र**, पुणे, सुविचार प्रकाशन मंडळ, १९७३.

७. कुळकर्णी व. दा. (सं), नाथपरंपरेतील एक गद्य ग्रंथ **: विवेकदर्पण**, हैदराबाद, मराठी स्वाध्याय संशोधन पत्रिका, उस्सानिया विद्यापीठ, १९७१.

८. केतकर श्रीधर व्यंकटेश, **प्राचीन महाराष्ट्र : शातवाहन पर्व**, विभाग २ रा पुणे, व्हीनस प्रकाशन १९६३ [या ग्रंथाच्या शेवटी केळकर नी. म. यांनी संपादिलेली **गाथासप्तशतीची** संहिता सर्वत्र आधारादाखल घेण्यात आली आहे.]

९. केळकर अशोक, **मराठी भाषेचा आर्थिक संसार**. औरंगाबाद, मराठवाडा साहित्य परिषद, १९७७.

१०. कोलते वि. भि. (सं), **लीळाचरित्र**, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, १९७८.

११. कोलते विष्णु भिकाजी, (सं) **पंचोपाख्यान**, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, १९७९.

१२. कोलते विष्णु भिकाजी (सं) म्हाइभट संकलित **श्रीगोविंदप्रभुचरित्र**, मलकापूर, अरुण प्रकाशन (चौथी आवृत्ती) १९४१.

१३. गुप्त माताप्रसाद (सं), **राउलबेल और उसकी भाषा**, इलाहाबाद, मित्र प्रकाशन, १९६२.

१४. गोगटे गोपाळ रावजी (सं), **विवेकसार ऊर्फ मननग्रंथ**, धुळे, राजवाडे संशोधन मंडळ, १९३८.


अनुक्रमणिका

१५. घोष मनमोहन, रामशर्माकृत **प्राकृत कल्पतरु**, कलकत्ता, एशियाटिक सोसायटी, १९५४.

१६. जैन देवेंद्रकुमार, **अपभ्रंश भाषा और साहित्य**, कलकत्ता, ज्ञानपीठ प्रकाशन, १९६५.

१७. जैन हिरालाल (सं), **सावय धम्म दोहा**, कारंजा, दिगंबर जैन ग्रंथमाला, १९३२.

१८. जैन हिरालाल (सं), मुनिकनकामरविरचित **करकण्डचरिउ**, कारंजा, अंबादास चावरे दिगंबर जैन ग्रंथमाला, १९३४.

१९. जोशी वसंत (सं), **भाषा व साहित्य : संशोधन**, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद, १९८१.

२०. ठाकुर मौलीराम, **पहाडी भाषा**, नई दिल्ली, सन्मार्ग प्रकाशन, १९७५.

२१. डोळके सुरेश म., **संशोधनशलाका**, नागपूर, अमेय प्रकाशन, १९८३.

२२. तुळपुळे शं. गो. (सं), **मराठी भाषेचा तंजावरी कोश**, पुणे, व्हीनस प्रकाशन, १९७३.

२३. तुळपुळे शं. गो. (सं), रामकविकृत **भाषाप्रकाश**, पुणे, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६२.

२४. तुळपुळे शं. गो. (सं), केशिराज संकलित **दृष्टांतपाठ**, नागपूर, सुविचार प्रकाशन मंडळ, १९६४.

२५. तुळपुळे शं. गो. (सं), **स्मृतिस्थळ**, पुणे, सिटी बुक स्टॉल, १९६९.

२६. तुळपुळे शं. गो. (सं), विश्वनाथ काशिनाथ राजवाडेकृत **ज्ञानेश्वरीची प्रस्तावना** आणि **ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण**, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, १९७९.

२७. तुळपुळे शं. गो. **यादवकालीन मराठी भाषा**, पुणे, व्हीनस प्रकाशन, (दुसरी आवृत्ती) १९७३.

२८. तुळपुळे शं गो. (सं), **प्राचीन मराठी कोरीव लेख**, पुणे, पुणे विद्यापीठ प्रकाशन १९६३.

२९. नरेंद्रनाथ, **प्राकृत भाषाओं का उद्‌भव और विकास**, लखनऊ, शब्दसागर, १९७७.

३०. नामदेव, **नामदेवगाथा**, मुंबई शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, १९७०.

३१. नामवरसिंह, **हिंदी के विकास मे अपभ्रंश का योग**, इलाहाबाद, लोकभारती प्रकाशन, चतुर्थ संस्करण, १९६५.

३२. पटवर्धन एम्. व्ही. जयवल्लभ विरचित **वज्जलग्गम्**, अहमदाबाद, प्राकृत टेक्स्ट सोसायटी, १९६९.

३३. पठाण यू म. (सं), चोंभाकृत **उखाहरण**, औरंगाबाद, मराठवाडा विद्यापीठ,

३४. पानसे मु. ग. (सं), श्रीपति भट्टविरचित **ज्योतिषरत्नमाला**, पुणे, डेक्कन कॉलेज, १९५७.

३५. प्रभुदेसाई वि. बा. **सतराव्या शतकातील गोमांतकीं बोली**, मुंबई, मुंबई विद्यापीठ प्रकाशन, १९६३.

३६. प्रियोळकर अ. का. **ग्रंथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली**, पुणे, पुणे विद्यापीठ प्रकाशन १९६६.

३७. बनहट्टी श्री. ना. (सं) **श्री ज्ञानदेवी प्रतिशुद्ध संहिता**, अध्याय १ व ७ पुणे, ज्ञानोपासना निकेतन, १९७३.

३८. भावे शिवाजी नरहर, **श्रीज्ञानेश्वरी पदकोश**, धुळे, राजवाडे संशोधन मंडळ, १९७४.

३९. भावे वि. ल. **महाराष्ट्र सारस्वत** (आवृत्ति ५ वी, पुरवणी-संपादक : डॉ. शं. गो. तुळपुळे) पुणे, विश्वकर्मा प्रकाशन, १९६४.

४०. राजवाडे वि. का. (सं), **ज्ञानेश्वरी**, धुळे, सत्कार्योत्तेजक सभा, शके १८३१.

४१. वऱ्हाडपांडे व कृ. **नागपुरी बोली** नागपूर, इंदिरा प्रकाशन, १९७२.

४२. वैद्य पी. एल्., महाकवि पुष्पदंत विरचित **महापुराणम्**, मुंबई, माणिकचंद दिगंबर जैन ग्रंथमाला, [प्रथम खंड १९३७, द्वितीय खंड, १९४० तृतीय खंड, १९४१].

४३. शास्त्री परमशिव, **सूत्रशैलि और अपभ्रंश व्याकरण**, वाराणसी, नागरी प्रचारिणी सभा, १९६७.

४४. सिन्हा मंगल बिहारी शरण, **सिद्धोंकी संधा भाषा**, पाटणा, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, १९७३.

45. Bloomfield Leonard, **Language**, Varanasi, Motilal Banarasidas, (Reprinted in India) 1963.

46. Chatterji Sunit Kumar (Ed), **The Culltural Heritage of India**, vol V, Calcutta, The Ramkrisna Mission Institute of Culture, 1978.

47. Chatterji, Sunit Kumar, **Indo-Aryan Languages & Hindi**, Calcutta, Firma K. L. Mukhopadhya, 1960.

48. Enthoven R. V. **The Tribes and Castes of Bombay**, Delhi, Cossmo Publications (Reprint) 1975 (first Published 1922).

49. Chomsky Noem, **Reflections on Language**, Newyork Panthen Books, 1975.

50. Dell Hymes (Ed), **Language, Culture and Society**, Newyork Harper & Row, 1964.

51. Ghatge A. M., **Gawdi of Goa**, A survey of Marathi Dialects Series VIII, Bombay Stale Board for Litrature & Culture, 1972.

52. Ghatge A. M., **Konkani of South Kanara**, A Survey of Marathi Dialectes Series I, Bombay State Board for Literature & Culture, 1963.

53. Ghatge A. M., **Kudali**, A Survey of Marathi Dialects Series II, Bombay, State Board for Literature & Culture, 1965.

54. Ghatge A. M., **Kunbi of Mahad**, A Survey of Marathi Dialects Series III, Bombay, State Board for Literature and Culture, 1966.

55. Ghatge A. M., **Konkani of Konkan**, A Survey of Marathi Dialects Series, V, Bombay, State Board for Literature & Culture, 1978.

56. Ghatge A. M., **Marathi of Kasargod**, A Survey of Marathi Dialects Series, VI, Bombay. State Board for Literature & Culture, 1970.

57. Ghatge A. M., **Marathi of Kochin**, A Survey of Marathi Dialects Series, IV, Bombay, State Board for Literature & Culture, 1967.

58. Ghatge A. M., **Warli of Thana**, A Survey of Marathi Dialects Series, VII, Bombay, State Board for Literature & Culture 1969.

59. Ghosh, Manmohan (Ed), **The Natya Sastra**, Calcutta, The Manisha Granthmala, 1967.

60. Greenberg, Joseph, Language, Culture and Communication (Essays Selected and introduced by Anwar S. Dil), Standford, Standford University Press, 1971.

61. Gumperz John J., **Language In Social Groups**, (Essays selected and introduced by Anwar S. Dil.), Standford, Standford University Press, 1971.

62. Hangen Eniar, **The Ecology of Language**, Standford, Standford University Press, 1972.

63. Lambart Wallace E., Language Psychology & Culture, Standford, Standford University Press, 1972.

64. Katre S. M., **Formation of Konkani**, Poona, Deccan College (Second Edition) 1966.

65. Lehman Winfred P., **Historical Linguistics**, New Delhi, Oxford and I. B. H. Publishing Co. 1962.

66. Lyons John (Ed), **New Horizons in Linguistics**, Harmonds Worth, Penguin Books Ltd., 1977.

67. Macdonell Arthur A, **A Vedic Grammar for Students**, Bombay, Oxford University Press, (reprint) 1975.

68. Malmstorm Jeen, **Language in Society**, New Jersy, Hyden Book Company (Second Ed.) 1973.

69. Malikram R. Balurao (Ed), **Indo-Iran**, New Delhi, Indo-Iran Society, 1974.

70. Master Alfred, **A Grammer of Old Marathi**, Oxford, Oxford University Press, 1964.

71. Mehrotra Ramesh Chandra, **Hindi Phonology**, Raipur, Bhashik Prakashan, 1980.

72. Pandit Shankar Pandurang (Ed), **Kumarpal charit**, Bombay Sanskrit Series, LX, Pune, Bhandarkar Oriental Institute, 1936.

73. Platt John & others (Ed), **The Social Significance of Speech**, Amesterdem, North Iraland Linguistic Series, 1975.

74. Pishel R. (Ed), **Deshinammala of Hemchandra**, Bombay, Bombay Sanskrit Series, (Second Edition Ed. by P. U. Ramanuj Swami) 1938.

75. Pride J. B. & Holmes Janet (Ed), **Socio Linguistcs**, Hormonsworth, Penguin Books Ltd. (reprint) 1976.

76. Russel R. V. & Hiralal, **The Tribes and castes of the Central Provinces of India**, Delhi, Cosmo Publications, (reprint), 1975.

77. Sharp Derrick, **Language In Bilingual Communities**, London, Edward Arnold Ltd, 1973.

78. Tulpule S. G., **An Old Marathi Reader**, Poona, Venus Publications, 1960.

79. Trudgill Peter, **Sociolinguistics**, Hormonds worth, Penguin Books Ltd, 1977.

80. Vaidya P. L. **Prakrit Grammer of Hemchandra**, Bombay, Bombay Sanskrit Series, 1958.

∫∫∫

# सूची

## १. विषय-सूची


अकरणरूप आणि संयुक्त क्रियापद
अभ्यासाची दिशा
अरे बोलीची असाधारण पार्श्वभूमी
अरे बोलीची वर्णव्यवस्था
अरे बोलीतील विभक्ति-व्यवस्था
अरे बोलीतील वाक्यरचना
अरे बोलीतील ध्वनिलोपाची मीमांसा
अरे-मराठी बोलीची सांस्कृतिक पार्श्वभूमी
अरे बोलीच्या क्षेत्राबाहेरील मराठी
अविकारी आणि विकारी शब्द
आणखी एक प्रमाण
आणखी काही उच्चार विशेष
आंध्र प्रांतात मराठी गीतांना लोकप्रियता आणि प्रतिष्ठाही
आंध्र-महाराष्ट्राचे शेजार संबंध
आर्य, अरे आणि मराठे
आख्यात विभक्ती
आख्यात-रूपांवर प्राकृताचा प्रभाव
इतर भाषांचा परिणाम
‘उकारबहुला’ भाषा
एकरूप होऊनही पृथगात्म
कर्तृप्रधान वाक्य
कालवाचक ऊन प्रत्ययांत धातुसाधिते
काही ध्वनींचा अभाव
ग्रामीण नेतृत्व
तालव्य आणि दंततालव्य वर्णाचे उच्चार
तेलुगु भाषेतील शब्दांचा व वाक्प्रचारांचा अनुवाद असलेले
तेलुगु भाषेचे संस्कार
तेलंगणातील मराठ्यांचे स्थलांतर केव्हा झाले?
तेलंगणातील अरे-समाज
देव-दैवते आणि सण-वार
द्वैभाषिक अरे-मराठा
ध्वनिव्यवस्था : प्राकृत-अरे बोली-प्राचीन मराठी
ध्वनिव्यवस्थेचा शोध आणि बोध
ध्वनिपरिवर्तनाशी संबंधित अन्य समाज-विशेष
ध्वनिपरिवर्तनाची प्रक्रिया
‘नाटक आमच्या रक्तात आहे!’
नाटकाचे वेड सुटेना!
नाटकातील गाणी
नासिक्य उच्चार
पंढरीचा विठ्ठल आणि तिरुपतीचा बालाजी
पुढील अभ्यासाची दिशा
प्रमाण मराठीची वर्णव्यवस्था
प्रमाण भाषेतील संयुक्त वर्णाचे उच्चार
प्रयोग-व्यवस्था
प्रस्तुत अभ्यासाची क्षेत्र मर्यादा
प्राकृत-अपभ्रंशाचे गाढ संस्कार
प्राचीन ऋणानुबंधाच्या अर्वाचीन गाठी
बोलीच्या अभ्यासाची उपेक्षा
बोलीच्या अभ्यासाचे महत्त्व
बोली मराठीची की अपभ्रंशाची?
बोलीची स्वयंपूर्ण उच्चार-प्रक्रिया
बोलींनाही व्याकरण असते
भाण्डीर भाषा व्याकरणम्
भाषा : बोलींचा समूह
भाषा व्यवहार व ध्वनि-व्यवस्था
भाषेचे ऐतिहासिक व्याकरण
भूतकालवाचक अन्य धातू-साधिते
मद्य-मांस निषेध
मराठी भाषेची प्राचीनतम अवस्था : अरे बोली
मऱ्हाटी बाणा
मऱ्हाटी संस्कृतीचे सातत्य
मराठी भाषेच्या उत्पत्तीशी संबंधित महत्त्वाची सामग्री
मराठे : तेलुगु रंगभूमीचे आद्य शिल्पकार

महाप्राण व्यंजने आणि ‘ह’
माधुर्य आणि लयबद्धता
‘मानापमान’ : रंगभूमीवर व समाजात
यादवकालापूर्वी
यादवकालीन मराठीचे रूपदर्शन
रूपसिद्धीत सुरक्षित राहिलेली पुरातन परंपरा
लोकगीतांतील समाज जीवन
वतन, वतनदार आणि गावगाडा
वंशश्रेष्ठत्वाची जाणीव
वसाहत व कुलपरंपरा
वाक्यरचनेचे घटक
विकारी शब्दांचे प्रकार आणि विकार
विकृती नव्हे प्रकृतीच
विशेषण अविकारी
वैवाहिक जीवनाची सफलता
वैशिष्ट्यपूर्ण वास्तुरचना
शब्दसंग्रहाचे महत्त्व
शेती आणि शेतकरी
संकीर्ण वाक्यसंग्रह
समाजनिष्ठ भाषाविज्ञान
समाज-नियंत्रण पंचाकडे
सर्वनाम - नामांची विभक्ती
सामाजिक एकात्मतेचा आदर्श
सुशिक्षित समाज
स्त्रीजीवनविषयक
स्त्रियांच्या मुलाखती
स्थलांतर तेराव्या शतकापूर्वी
‘हा तो क्षात्रधर्म’
‘होउनि’ या अव्ययाची साक्ष


∫∫∫

## २. व्यक्तिनाम सूची


अमृताबाई
अमलय्या (येलकुर्ती)
अल्फ्रेड मास्टर
आजम जा
आमक्का
इरन्ना (कॅमलपुरे)
उस्मानअली खां बहादूर
उपाध्ये, आदिनाथ नेमिनाथ
उपेंद्र
एकनाथ
Enthoven, R. V.
कनकम्मा
कान्हरदेव
किशनराव
कुळकर्णी, व. दि.
कोंडा लक्ष्मण
कोनेरी
कोलते, वि. भि.
कौटिल्य
खुशालचंद
गंडय्या उर्फ गंगाराम
गोगटे, गोपाळ रावजी
गोविंद प्रभु
गोविंदराव वनारसे
Greenberg
Gumperz
घटोत्कच
घाटगे, अ. य.
चक्रधर
चणु
चंदरराव
चंद्रशेखर आजाद
चिपळूणकर कृष्णशास्त्री
चेन्नारेड्डी
जगदीश
जगन्नाथम् पौर्वारम जनार्दन
जयदेवजी
जवाहरलाल नेहरु
Jean Malmstrem
तुकाराम
तुळपुळे, शं. गो.
दत्तात्रय
दादाजी कोंडदेव
दासराव फेरारे
दिगंबरराव बिंदू
दिनकरराव
दिनकरराव नाईक
धनाजी
धवले (ढवळे)
नरसय्या
नरसिंहराव स्थानम्

नरसूबाई
पं. नरेंद्रजी
नरहरी
नव्वाव छत्तारी
नागय्या
नागोजीराव जगताप
नारायणराव पवार
नारायणराव (हकीम)
नामदेव
नामवर सिंह
नायकराव सुराव
नासरजंग
निजामुल्मुल्क आसफ जाह अव्वल
Noam Chomsky
परमशिवशास्त्री
परशुराम लिंगमूर्ती
पापाबाई
पालकुरी सोमनाथ
पार्वतीबाई गायकवाड
परांजपे ताराबाई
परांजपे वा. गो.
पिरोजी थाडेगामे
प्रकाशराव
प्रताप
Prider Holms
बखले
बलभद्र पागडु सुगंराव
बहादूरखान
बाबाराव अवेटी
बाबूराव
बालकिशन
बालगंधर्व
बालूबाई शेलार
बाबू, बाबूलाल, बाबूखान
बाळकृष्णानंद सरस्वती
बाळाजी अंथाजी
बाळाजी विश्वनाथ
बिस्मिल
Bloomfield
भगतसिंग
मंगल बिहारी शरण सिंहा
मल्लय्या लकडे
मल्लवक्का
मल्लाक्का
महादेव योगी
मांगोजी
माधवराव गायकवाड
मुच्यमरावु भलेरावु
मुजफ्फर जंग
मोजम जा
मोरे
म्हाइंभट
येलकूर्ती
रघुनाथेन्द्र स्वामी
राजपाल
राजन्ना
राजला अंगरके (आंग्रे?)
राजन्ना शिंदे
राजन्ना हिंगे
राजन्ना बिझेंगी
राजवाडे, वि. का
रामचंद्रपंत अमात्य
रामचंद्रराव सिंदे
रामलू गाजलपाटी
रामय्या (चिन्न)
रामय्या (पेद्द)
रामय्या माचलपाडे
रामय्या शिंदे
राम शर्मा
रामी रेड्डी
लायक अली
वंदेमातरम् रामचंद्रराव
वल्लभभाई पटेल
विनायकराव विद्यालंकार
वररूची
विश्वदेव जी
विश्वनाथ उर्फ गालय्या
वासुदेवेंद्र स्वामी
श्रीपाद
शंकरराव गायकवाड
शंकरराव नायकोट
शंकरराव शिंदे
शकुंतला देवी
शांताबाई
शिवराम कवडे
शिवराव भलेराव
शिवाजी महाराज
श्यामसुंदर
सकाराम
सत्यवान
संजीवराव
सांबाशिवराव बांसरे
सावित्री
सीताराम
सिद्दोजी-पिरोजी
सुब्बराव मोरे
सुभाषचंद्र बोस
सुभाषचंद्र सुराव
सौंदरी
स्वामी रामानंद तीर्थ
हिरामण नागर्ले
हिरालाल
हेमचंद्र
ज्ञानेश्वर

∫∫∫

## ३. स्थलनाम सूची

अपरेडपल्ली
अरमूर
अरेपल्ली
अलेगाव
अनंतपूर
अमृतसर
आदिलाबाद
कडप्पा
कॅमलपूर
करीमनगर
कारवार
कर्नुल
काठमाळ
काजीपेठ
कान्हेगाव
कालर्वेडी
कोल्हापूर
खम्मम
गढवाल
गुलवर्गा
गोवलकोंडा
गोविंदपूर
चांदा
चोंडपुरी
चित्तूर
चिमूर
जमीकुंटी
तंजाउर
तिरुपंती
तुळजापूर
दाबकं
दिल्ली
धानेगामु
नरसक्कापल्ली
नलगोंडा
नांदेड
नारायणपूरम्
निजगुंडा
निजामाबाद
पंढरी
परकाल
परभणी
पाल्माकूर
पापनपल्ली
पुणे (पुना)
बंगलोर
बल्लारी
बल्लारशाहा
बिज्रेंगी
भालकी
भूपाल (भोपाळ)
मद्रास
महबूबनगर
महालिंगपल्ली
मातापूर
मुंबई
मेदक
येलकूर्ती
येलकूर्ती हवेली
येलमपुरी
रगुनाथपल्ली (रघुनाथपल्ली)
वरंगल (ओरंगल) हनुमकुंडा
वलांडी
विजयवाडा
शंकरपल्ली
सिकंदराबाद
सीतारामपूर
सुरभी
सोलापूर
हरसूल
हैदराबाद

∫∫∫

अनुक्रमणिका

## ४. लोकगीतांची सूची

अंबील मांडव
आधी जेवा माझ्या घरी
आमँचं मनसं अमीय जाता
आमँचं मनीचं तुमी काइ जाना
आरती भवानीची
आरती रामचंद्राची
कथा गीत
कांडणाने मुहूर्त
कोनाचं कोनु बाई
गाई आले दादा
गिरीचा आनंद
चल ग ऽ भइनी
चंद्रु ऊगलं
जाय जाई सेवंती
जो जो नंदा
जो गालाचं गीतु
ढव्वाले
तेलवण
तेलंग राजा
थोरु जॉमांई
दान देवावं
दिवसु सोन्याचा
दुकं सांगं मायापोटी
देव पावला
देवकं बंदाइसु गीतु
देवकाची गीते
देवता बांधणे
देवता आवाहन
देवता विषयक गीते
नवरा का ऽ की रुसलं
नव्वरी ऽ कस्तुरी
नागाचं ग ऽ पंचमीला
नांवु टेवावं
न्हानं आलं नेनंतीला
पाऊस पडतं मोत्याचं
पाळणा
पाळणा शिवाजीचा
बइसई देवका, बइसई देवका
बरसरे मेगोबा
बापु राजन्ना माजा
बालाजी आणि विठोबा
बाशिंग
मांडवातील गाणी
मी जातं माहियेरा
येती लक्शुमी घरं
लग्नाला येवावं जगदंबा
लगीन लागतं या
बाण
वारुलं आनायासं गीतु
विवाह विषयक गीते
वंटी भरायचं गीतु
शकुनाचे घट
शाराची मराटीनु
शुभ मंगल
शेती विषयक गीते
सासर माहेर
हळद
हळदीचं गीतु

∫∫∫

अनुक्रमणिका

## ५. अरे-मराठा समाजात रूढ असलेली आडनावे

अडकने
अनगाये
अंबरडे
अंबीरे
अमदापुरम्
आंग्रे
आंगरके (आंग्रे?)
आसरे
इंगोले (इंगळे?)
इरकला
इवरे (हिवरे)
उसरपल्ली
कदम
कलवारे
कबडे
कॅवलपुरे
कारले
कुसुंबे
कोले (कोल्हे)
कोल्लुरे
कोडगाते
खवले
खातबांडे
गाजलपारी
गायकवाड
गुजले
गुंड
गुजरे (गुर्जर-गुजर)
गुवरे
गुवाडे
गोवाडे
घुबीरे
चल्लनगारी
चव्हान

चेटपल्ले
चेन्नूर
चेलके (शेळके, सोळंखे)
चौगुले
जगताप
जाधव
जंबलपुरे
जोनकले
टिवाले
टेंकाले
डुकरे
डेंग
डोंगले
ढवळे
तिमनापुरे
तुमरपल्ले
थोडगाये
दुंबाळा
दुर्गनाल
देवकार
धाबाड (दाभाडे)
धोने
नखाते
नागलान
नागुरले
नायकोट
निकम
निठुर
पकडे
पॅमार (पवार, परमार)
पुलीमारी (वाघमारे)
पेटमिंदे
पेन्तुर
पौरावरम् (पवार)

फैरारे
बडे
बाळापूर
बॉसले (भोसले)
बांसरे
बास्वल
बासलपट्टी
बुरगुले
बेंबरे
भलेराव
भालेराव
भूताला
भुस्सार
मचलपाडे
मर्जे
मदनपेटे
मांसपल्ले
मोकडे
मोकिले
मोगडे
मोगे
मोताला
मोतंले
मोरताल
मोरे
येरवल
येस्के
रनपिसे
रामपुरे
लकडे
लडे
लासने
लिंगमपल्ली
वडे

अनुक्रमणिका

वज्येपल्ले
वज्रे
व्हलगे
सिर्ले (शिरोळे?)
सांडसारे
सिकलपते
सिंदे (शिंदे)
सुकने
सुराव (सुर्वे)
सेलार (शेलार)
हतमकुंडे
हवदापूर
हंबीरे
हंगीरजे
हिंगे

∫∫∫

तेलंगणातील अरे-मराठा समाज
भाषा आणि संस्कृती

अनुक्रमणिका